# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक २०-०४-१९९९ ते २०-११-२०००**

**रजिष्टर क्र. ०८**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २० एप्रिल १९९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंगळवार, दिनांक २० एप्रिल ९९ रोजी सकाळी ११.३० वाजता मा, महापौर, सा.शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली मा. महापौर व उप महापौर पदाची निवडणूक साठीची सर्वसाधारण सभा बोलाविण्यात आली ती संपन्न झाली. तीचे इतिवृत्त सभेची सुरूवात "वंदेमातरम गिताने " सकाळी ११.३० वाजता झाली. सभेस खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १ | मा.डॉ.कराड भागवत किशनराव | उप महापौर |
| २ | मा.सौ.लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | सदस्य |
| | मा.श्री.अफसर खान यासिन खान | सदस्य |
| | मा.श्री.विधाते सिताराम | सदस्य |
| ३ | मा.सौ.साजेदा बेगम | |
| ४ | मा.श्री.महंमद सलीम म.हनिफ कुरेशी | |
| ५ | मा.श्री.गौतम भागाजी खरात | |
| ६ | मा.श्री.ॲड गणेश किशनराव वानखेडे | |
| ७ | मा.सौ.रजनी रमेश जोशी | |
| ८ | मा.सौ.उषा दिलीप गायकवाड | |
| ९ | मा.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | |
| १० | मा.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | |
| ११ | मा.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिक | |
| १२ | मा.श्री.भालेराव अभिमन्यु रामभाऊ | |
| १३ | मा.श्री.नरेंद्र यादवराव पाअील | |
| १४ | मा.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | |
| १५ | मा.श्री.सोनवणे सुदाम रामदास | |
| १६ | मा.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | |
| १७ | मा.श्री.बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | |
| १८ | मा.सौ.पदमा बाबुराव शिंदे | |
| १९ | मा.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | |
| २० | मा.श्री.मालानी प्रफल्ल लालचंद | |
| २१ | मा.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | |
| २२ | मा.सौ.धनश्री अशोक विसपूते | |
| २३ | मा.सौ.फरहद बानो भ्र मो.नवाज | |
| २४ | मा.श्री.फजउल्ला खान अजमतउल्ला खान | |
| २५ | मा.श्री.अजिज खान गणी खान | |
| २६ | मा.श्रीमती आबेदा बेगम मंहमद मुस्तफा | |
| २७ | मा.श्री.महमद मुश्ताक अहमद | |
| २८ | मा.श्रीमती नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | |
| २९ | मा.श्री.देशमुख वसंत विनायकराव | |
| ३० | मा.श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद | |
| ३१ | मा.श्री.मुजिब आलमशाह मीर आलमशाह | |

३२ मा.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन
३३ मा.श्री.अ.जावेद रज्जाक
३४ मा.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर
३५ मा.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
३६ मा.सौ.यशोदा धनंजय वाडेकर
३७ मा.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
३८ मा.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र
३९ मा.श्री.हमीदउद्दीन ताबा फासियोद्दीन
४० मा.श्री.स.अब्दुल रऊफ म.अ.माबुद
४१ मा.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
४२ मा.श्री.,खाखोरडीया धीरज शांतीलाल
४३ मा.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
४४ मा.श्री.सय्यद अली मिरा सलामी
४५ मा.श्री.लाहोट रमेश दिपचंद
४६ मा.श्री.संजय किसनराव केनेकर
४७ मा.श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी
४८ मा.सौ.वाघमारे मुक्ताबाई सुदाम
४९ मा.सौ.दलाल लता श्रीनिवास
५० मा.श्री.ओक जयवंत केशवराव
५१ मा.श्रीमती अलका रमेश पाटील
५२ मा.सौ.धांडे शकुंतला हरिदास
५३ मा.श्री.अब्दुल रशिद खान (मामू)
५४ मा.श्री.कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
५५ मा.कु.माया लिंबाजी लाडवाणी
५६ मा.सौ.आव्हाड सविता संजय
५७ मा.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे
५८ मा.श्री.अब्दुल रशिद भ्र सत्तार
५९ मा.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंह महेंद्रसिंग
६० मा.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन
६१ मा.श्री.जैन विकास रतनलाल
६२ मा.श्री.गाडे गंगाधर सुखदेव
६३ मा.श्री.बारवाल गजानन रामकिसन
६४ मा.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६५ मा.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
६६ मा.श्री.जोशी संजय रामदास
६७ मा.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
६८ मा.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
६९ मा.सौ.ज्योत्सना हिवराळे
७० मा.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे
७१ मा.सौ. राधाबाई तळेकर
७२ मा.श्री.ढगे नरसिंग मुरलीधर
७३ मा.श्री.विठ्ठल किसन जाधव

७४ मा.श्री.मेहेर विजयकुमार गजानन
७५ मा.सौ.काळुसे मंदा धनंजय
७६ मा.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे
७७ मा.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
७८ मा.श्री.घडामोडे भगवान देविदास
७९ मा.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

**विषय क्र. १/१**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) व महानरपालिका (महापौरांचे आरक्षण ) नियम १९९४ चे तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई कडील अधिसूचना क्रमांक जीईएम/प्रक्र.१९१/९८/नवि-२४ दिनांक ५-८-१९९८अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर पद बिन राखीव ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार महापौर पदावर निवड करणे.

**संवाद**

श्री.अविनाश कुमावत : मा.महापौर यांना विनती करण्यांत येते की, आजच्या बैठकीतील विषयसूची नुसार कार्यवाही चालू करावी आजच्या बैठकीतील विषय सूचीनुसार प्रथमतः महापौर पदाच्या निवडणूकीसाठी ज्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरलेले असतील व ज्यांना आपली उमेदवारी परत घ्यावयाची आहे त्यांचेसाठी अर्ध्यातासांचा अवधी देण्यांत येतो. (वेळ ११.३५ वा.) तोपर्यंत सभा तहकुब करण्यांत येते. (सभेला सुरूवात १२.०५ वाजता)
सचिवांनी महापौर पदासाठीचे किती उमेदवारांनी अर्ज परत घेतले याची माहिती द्यावी.

नगरसचिव : मा.महापौर पदासाठी एकूण बारा उमेदवारांचे अर्ज दाखल झालेले होते. त्याची नांवे वाचून दाखविली व या पैकी किती उमेदवारांनी आपआपले उमेदवारी अर्ज परत घेतले त्यांचही नांवे वाचून दाखविली आणि उर्वरित फक्त दोनच उमेदवार मा.महापौर पदासाठी शिल्लक आहेत त्यांची नांवे सांगितली ती खालील प्रमाणे.
१) श्री. तरवेंद्रसिंह धिल्लन
२) श्री.सुदाम सोनवणे.

मा.महापौर : आता बॅलेट पेपर तयार करण्यसाठी एका तासाचा अवधी देण्यांत येतो (वेळ अंदाजे १२.१० वा.) तोपर्यंत सभा तहकुब करण्यांत येते.

(सभेला सुरूवात अंदाजे १.१० वाजता)
मतपत्रिका तयार करण्यात आली असून मतदान प्रक्रियेला सुरूवात करण्यांत येणार आहे.

श्री.गंगाधर गाडे : (मा.महापौर यांचेकडे लेखी निवेदन देवून) मी अशी सूचना सभागृहात करतो की, मतदान सुरू करण्यापूर्वीच्या या सुचनांवर आदेश व्हावा की, मतपत्रिकेवर काही खुणा अथवा चिन्ह दिसू नये व तशा प्रकारच्या खुण अथवा चिन्ह दिसलयास त्या मतपत्रिका रदद् करण्यांत याव्यात,कारण मतदान प्रक्रिया निपक्षपातीपणाने व निर्भरित्या पार पाडणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ाबत मा.महापौर तथा पिठासन अधिकारी जे सक्षम आहेत त्यांनी तसे आदेशित करावे. कोणत्याही

प्रकारची गडबड होता कामा नये त्याची खबरदारी घ्यावी. मतदान हे गुप्त पध्दतीने व्हावे, पैशाच्या अमिषाने मतदान होवू नये याची दखल घ्यावी.

श्री.गजानन बारवाल : स.सदस्य श्री.गंगाधर गाडे सभागृहात काय सूचना करीत आहेत, कृपया त्याची माहिती अवगत करावी.

मा.महापौर : सचिवांनी माहिती दयावी.

नगरसचिव : स.सदस्य श्री.गंगाधर गाडे, मनमोहनसिंग ओबेरॉय व इतर स.सदस्यांनी दिलेल्या निवेदनाचे वाचन सभागृहात करून दाखविले.

श्री. गजानन बारवाल : या निवेदनामध्ये असा शब्द प्रयोग आहे की, फार मोठया प्रमाणात पैशाचे अमिष दाखविण्यात आले आहे, हे शब्द निवेदनातुन वगळण्यात यावे.

श्री.अब्दुल रशिद (मामू) : महापौर पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडत असतांना गुुप्त मतदान पध्दतीने पार पडावे असे सभागृहात सूचना करणे काही गैर नाही कारण आम्हाला मतदान प्रक्रियेपूर्वीच कळलेले असल्याने आमही तसे निवेदन पिठासन अधिकारी व नगरसचिव यांना दिलेले आहे.

श्री.महादेव सुर्यवशी : मा.महापैारांना विनंती की, त्यांनी नियमाप्रमाणे मतदान प्रक्रियेची कार्यवाही सुरू करावी.

श्री.अविनाश कुमावत : मतदान सुरू करणे पूर्वी मी अशी सूचना करतो की, स.सदस्या श्रीमती गंगवाल यांची प्रकृती ठिक नाही त्यांना अगोदर मतदानासाठी नांव पुकारण्यात यावे व त्यांना सभागृहात न बोलविता खालीच थांबलेल्या असल्याने तेथेच मतदान करणेसाठी आदेशित करावे.

श्री.रशिद खान मामू : स.सदस्यांची प्रकृती जरी ठिक नसली तरी त्यांनी गुप्तरित्या श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय मतदानासाठी सभागृहात येवूनच मतदानात भाग घ्यावा लागेल.

श्री.प्रकाश निकाळजे : तत्पुर्वी मतदान प्रक्रियेची माहिती सभागृहाला द्यावी.

श्री.प्रदिप जैस्वाल : सचिवांनी मतदान प्रक्रियेचे नियम सांगावेत

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मतदान प्रक्रियेचे नियम व त्या नियमांची अंमलबजावणी होणेसाठी सभागृहात नियम सांगावे.

श्री.गजानन बारवाल : सभागृहात मतदान प्रक्रियेची कार्यवाही नियमाप्रमाणेच होत असते.

नगरसचिव : मतदान प्रक्रियेसाठीची नियम सभागृहात वाचून दाखविले.

श्री.गजानन बारवाल : आत मतदान प्रक्रियेला सुरूवात करावी

मा.महापौर :

(मतदान प्रक्रियेला सुरूवात होण्यापूर्वी मतदान पेटी रिकामी असल्याचे सभागृहात दाखविण्यात आले व पिठासन अधिकारी यांची स्वाक्षरी घेवूनच मतपेटीला सिल लावण्यात आले.)

जनसंपर्क अधिकारी यांनी वार्ड निहाय स.सदस्यांची नावे पुकारावी व स.सदस्या.श्रीमती गंगवाल यांची प्रकृती ठिक नसल्या कारणाने त्यांना सभागृहात अगोदर मतदान करणेसाठी नांव पुकारावे.

जनसंपर्क अधिकारी : यांनी वार्ड क्र.१ येथील स.सदस्यांचे नांव पुकारण्यात आले व ते मतदानासाठी आले असता त्यांनी मागणी केल्यानुसार मा. महापौर यांनी उप आयुक्त (म) यांना सहकार्य करणेसाठी आदेशित केले. तयावेळी वार्ड क्र.१ च्या सदस्यांनी मतदानात भाग घेवून मतदान केले. त्याचप्रमाणे वार्ड क्र.२ ते ४ च्या सदस्यांनी मतदानात भाग घेतला. तर वार्ड क्र.५ चे स.सदस्य यांनी मागणी केल्यानुसार त्यांना मतदान करणेसाठी मा.महापौर यांनी उप

आयुक्त (म) यांना सहकार्य करणेसाठी आदेशित केले . त्यानुसार स.सदस्यांनी मतदानात भाग घेवून मतदान केले. त्यानंतर वार्ड क्र.६ ते १० च्या स.सदस्यांनी आपआपले मतदानात भाग घेवून मतदान केले.तर वार्ड क्र.११ च्या सदस्या व पिठासन अधिकारी यांचे नाव पुकारल्या गेले त्यावेळी त्या उठल्या व त्यांनी मा. उप महापौर यांना तात्पुरते पिठासन अधिकारी पदी आमन ग्रहण करावे असे सांगितले व आपल्या जागेवरून उठून मा. महापौरांचा गाऊन काढून मा. उप महापौरांना दिला व मतदान प्रक्रियेत भाग घेवून मतदान केले याच वेळेस स.सदस्या, श्री.गंगवाल , वार्ड क्र.४० या सदस्या मतदानात भाग घेण्यासाठी सभागृहात एका खुर्चीवर बसवून आणण्यात आले. मागणीवरून त्यांना मतदान करणेसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सहकार्य करावे असे पिठासन अधिकारी यांनी आदेशित केले, त्याप्रमाणे स.सदस्यांनी मतदान केले. पुन्हा अशाच प्रकारे अगोदरच मतदान करणेसाठी स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी स.सदस्य श्री.फैय्याज कुरैशी यांची प्रकृती ठिक नसल्याकारणाने त्यांना अगोदर मतदान करणेसाठी नांव पुकारणेची विनंती केली असता मा. महापौर तथ पिठासन अधिकारी यांनी माय केले व वार्ड क्र.४९ चे स.सदस्यांनी मतदानास येवून मतदान केले. मा.महापौर सौ.शिलाताई गुंजाळे या मतदानात भाग घेणेसाठी जागेवरून उठल्या होत्या त्या परत आपल्या आसनावर जावून बसल्या व तात्पुरते पिठासन अधिकारी मा.उप महापौर हे पुर्वत आपल्या स्थानावर आसन ग्रहण केले.

वार्ड क्र.१२ ते १९ पर्यंतचे स.सदस्यांनी मतदानासाठी येवून मतदान केले तर वार्ड क्र.२० चे स.सदस्यांना मा.महापौर तथा पिठासन अधिकारी यांनी मागणीवरून मुख्य लेख परिक्षक यांना मदतीसाठी आदेशित केले त्याप्रमाणे स. सदस्यांनी मतदान केले वार्ड क्र.२१ व २२ च्या स. सदस्यांनी मतदानात भाग घेवून मतदान केले. तर वार्ड क्र.२३ चे स.सदस्य यांना मागणीवरून पिठासन अधिकारी यांनी मुख्य लेख परिक्षक यांनी मदत करावयाचे आदेशित केल्याने तयांनी मतदान केले. तसेच वार्ड क्र.२४ चे स.सदस्यांना मागणीवरून आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी पिठासन अधिकाऱ्याच्या आदेशान्वये मतदानात भाग घेवून मतदान केले, तर वार्ड क्र.२५ चे स.सदस्य यांनी मागणीवरून उप आयुक्त (प्र) यांच्या मदतीने पिठासन अधिकाऱ्याच्या आदेशान्वये मतदानात भाग घेवून मतदान केले. त्याच प्रमाणे वार्ड क्र.२६ ते ३० चे स.सदस्य यांची नावे पुकारल्यानुसार त्यांनी मतदान केले व वार्ड क्र.३१ चे स.सदस्यांनी मागणी केल्यानुसार व पिठासन अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मुख्य लेखाधिकारी यांनी मतद केली व स.सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. (त्याच वेळी सभागृहात विरोधी बाकावरील स.सदस्य, श्री.मनमोहनसिंग ओवेरॉय, गंगाधर गाडे, अफसर खान, रशिद मामू व इतर स.सदस्यांनी ज्या सदस्यांना लिहीता वाचता येत नाही जे अंध ,अपंग आहेत , निरक्षर व अज्ञान आहेत अशांना मतदानात भाग घेणेसाठी एखाद्या सहकार्याची आवश्यकत असते. मात्र या सभागृहात २-३ सदस्य सोडले तर बाकी सर्व सदस्य साक्षर आहेत त्यांनी कोणालाही स्वतःहून मदत न मागता पिठासन अधिकारी हे स्वतःहून संबंधित काही सदस्यांना मदतीसाठी अधिकाऱ्यांना आदेशित का करतात असे सभागृहात

जोरजोरात सांगत होते. अशा प्रकारची गुप्त मतदानाची पध्दत नसूनल ती लोकशाही व नियमाला अनुसरून नसून ती मारक व घातक असल्याचे मत सभागृहात मांडीत होते. तर सत्ताधारी बाकावरून पिठासान अधिकारी यांचे्कडे स. सदस्यांना मदतीची गरज असल्यास ते मागणी करू शकतात व नियमा प्रमाणे पिठासन अधिकारी आदेश देवू शकतात असे उत्तर देत होते. त्यामुळे सभागृहात दोन्हीही पक्षांकडील स.सदस्यांचे मोठमोठयाने आवाज व आरडाओरड होत असल्याने त्याबाबत काही स.सदस्य मा.महापौर तथा पिठासन अधिकारी यांच्या आसनाकडे धावून येवून राजदंड पळवून नेण्याचा प्रयत्न होईल अशा शंकेने सारखा गराडा व आवाज होत होता. काहीही ऐकू येत नव्हते.

मा.महापौर : सर्व स.सदस्यांना विनंती करण्यांत येते की, सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे व सभागृहात शांतता बाळगावी.

(तरीही सभागृहात दोन्हीही पक्षाकडील सदस्यांचा सारखा आवाज होत होता. काहीही ऐकू येत नव्हते.)

(पुन्हा पिठासन अधिकारी यांनी सभागृहाला विनंती केली की, सभागृहात शांतता बाळगावी नसता शिस्त भंगाची कार्यवाही करण्यांत येईल. अशी २-३ वेळेस सारख्या सूचना करीत होत्या. तरीही सभागृहातील आपसातील आवज काही कमी होईना. वेळ अंदाजे १.५५ वाजता. याच वेळी त्यांची सुरक्षा अधिकारी, श्री.राऊत यांच्याशी काही स.सदस्यांची बाचाबाची होत असल्याचे चित्र दिसून येत होते. सुरक्षा अधिकारी सभागृहातून जात असतांना त्यांच्या मागे काही स. सदस्य जोरजोरात बोलत होते. काहीही ऐकू येत नव्हते. नंतर मा.आयुक्त यांनी स्वतः सुरक्षा अधिकाऱ्याचा हात धरून सभागृहाबाहेर नेत असल्याचे चित्र दिसले व सभागृहात शांतता झाली. )

श्री.अफसर खान : सुरक्षा अधिकारी यांनी सभागृहात स.सदस्यांच्या बाबतीत जे वर्तन केले त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबीत करावे.

श्री.गिरजाराम हळनोर : आता याबाबतीत कोणत्याही प्रकारचा निर्णय होवू नये मतदान प्रगि.या शांतते होवू दयावी. चौकशी करून नंतर निर्णय घ्यावा.

(यावेळी पुन्हा काही विरोधी सदस्य जोरजोरात आवाजाने नाही, नाही आताच निर्णय व्हावा म्हणून सभागृहात ओरडतात.)

मा.महापौर : सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे व पुढील मतदान प्रक्रियेस सुरूवात व्हावी.

जनसंपर्क अधिकारी : वार्ड क्र.३२ ते ३६ च्या स.सदस्यांची नांवे पुकारले व त्यांनी मतदानात सहभाग नोंदवून मतदान केले तर वार्ड क्र.३७ चे स.सदस्य यांच्य मागणीनुसार पिठासन अधिकारी यांनी उप आयुक्त (म) यांनी मदत करण्याचे आदेशित केल्याने स.सदस्यांनी मतदानक`ले व वार्ड क्र.३८ ते ४३ च्या सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र.४४ चे स.सदस्यांनी त्यांच्या मागणीनुसार पिठासन अधिकारी यांनी उप आयुक्त (प्र) यांना मदत करण्यासाठी आदेशित केल व त्यानुसार स.सदस्यांनी मतदानात भाग घेवूनच मतदान केले (यावेळी पुन्हा सभागृहात स.सदस्य श्री.गंगाधर गाडे,मनमोहनसिंग ओबेरॉय व रशिद मामू यांनी सभागृहाला सूचना केली की, ज्या सदस्याला खरोखरच मदतीची गरज असेल व जे सदस्य निरक्षर

व अज्ञान अपंग असतील त्यांनाच नियमाप्रमाणे मदत करता येवू शकते, परंतू या ठिकाणी जे सदस्य नेहमी प्रमाणे मदत मतदानात स्वतःहहून भाग घेतात ते कुठल्याही प्रकारची मदतीची आवश्यकता असल्याचे मागणी करीत नाही त्यांनाही मदत का दिली जाते ही गुपत मतदान करण्याची प्रक्रिया नसून ती जाचक व लोकशाही प्रक्रियंची क्रुर थटट्‍ा व अपमान केल्याचे या सभागृहात दिसून येत आहे. असे सांगितले. त्ययावर सत्ताधारी बाकावरून पुन्हा त्यास कडाडून विरोध होवून नियमाप्रमाणे स.सदस्यांनी मागणी केलेली असल्यास ती पिठासन अधिकरी यांनी मान्य करणे योग्य असल्याचे सांगितले व पुन्हा एकच आवाज सभागृहात होत होता.) वार्ड क्र.४५ व ४६ चे स.सदस्यांची नांवे पुकारले असता त्यांनी मतदान केले व वार्ड क्र.४७ चे स.सदस्य यांना पिठासन अधिकारी यांनी त्यांच्या मागणीनुसार मुख्य लेखा परिक्षक यांनी मदत करण्यांचे आदेशित केले, त्या नुसार संबंधित स.सदस्यांनी मतदान केले वार्ड क्र.४८ चे सदस्यांनी मतदानात भाग घेतला व वार्ड क्र.५० चे सदस्य यांना त्यांच्या मागणी नुसार पिठासन अधिकारी यांनी मुख्य लेखाधिकारी यांना मदतीसाठी आदेशित केले त्यानुसार त्यांनी मतदान केले. (त्याच वेळी स.सदस्य श्री.केनेकर यांची मतपत्रिका खराब झ ाल्याचे पिठासन अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिल्याने पिठासन अधिकारी यांनी ती मतपत्रिका रदद् करून दुसरी मतपत्रिका देवून मतदानात भाग घेण्याचे आदेशित केले व त्यानुसार स.सदस्य यांनी मतदान केले. ) तर वार्ड क्र.५१ ते ५५ च्या स.सदस्यांनी मतदान केले व वार्ड क्र.५६ चे स.सदस्यांच्या मागणीनुसार पिठासन अधिकारी यांनी मुख्य लेखाधिकारी यांनी मदत करण्याचे आदेशित केल्याने त्यांनी मतदान केले व वार्ड क्र. ५७ व ५८ चे स.सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. वार्ड क्र.५९ चे स.सदस्य यांना मागणीवरून पिठासन अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये उप आयुक्त (प्र)यांनी मदत करण्याचे आदेशित केल्याने संबंधित स.सदस्यांने मतदान केले तर वार्ड क्र.६० चे स.सदस्य यांनाही पिठासन अधिकारी यांनी त्यांच्या मागणी नुसार उप आयुक्त (प्र) यांनी मदत करण्याचे आदेशित केले (त्यावेळेस पुन्हा विरोधी बाकावरून स.सदस्य श्री.गंगाधर गाडे, अफसर खॉन, मनमोहनसिंग ओबेरॉय, रशिद खान (मामू)व इतर सदस्यांनी स.सदस्यांना लिहीता वाचता येत नाही काय ? ते निरक्षर आहेत काय ? निवडणूकीस उभे असता वेळेस त्यांनी प्रतिज्ञापत्रा द्वारे लिहून दिलेले आहे काय? याची तपासणी नगर सचिवांनी करावी.) जर अशा प्रकारचे कृत्य सीाागृहात होत असल्यास लोकशाहीच्या दृष्टीने "घातक" होय असे सांगून ज्या स.सदस्यांना लिहीता वाचता येते त्यांना मदतीची आवश्यकता नाही हे नियमान्वये आहे, जर अशाच प्रकारचे सभागृहात सर्वांना मदतीची अपेक्ष करून मतदान होत असल्यास तसेच करीत राहावे. गुप्त मतदान कशासाठी ठेवावे. आम्ही सभागृहाबाहेर निघून जातो. याबाबत पिठासन अधिकारी यांनी पारदर्शक निवडणूक पार पाडणेसाठी सहकार्य करावे. असे असतांना पिठासन अधिकारीच सदस्यांना मदतीसाइी नांव पुकारतात ते काही बरोबर नाही . यावर आमचा आक्षेप असून आम्ही न्याय मागणीसाठी कोटीत दाद मागणार असे सांगितले. यावेळी सत्ताधारी बाकावरून पुन्हा स.सदस्यांच्या मागणीनुसारच पिठासन अधिकारी मदत देतात असे वेळोवेळी

उल्लेख करून सांगत होते व प्रतिकार करत होते) वार्ड क्र.६१ ते ६३ चे स.सदस्यांनी मतदानात सहभाग नोंदवून मतदान शांत रितीने केले तर वार्ड क्र.६४ चे स.सदस्य यांनी मदतीची आवश्यकता असल्याचे सांगितल्याने पिठासन अधिकारी यांनी उप आयुक्त (प्र) यांना मदतीसाठी आदेशित केले व स.सदस्यांनी मतदान केले व वार्ड क्र.६५ ते ८२ च्या स.सदस्यांची नांवे पुकारली असता त्यांनी आप आपले वार्डनिहाय येवून मतदान पूर्ण केले.

मा.महापौर : आता मतदान संपलेले आहे.

मा.श्री.गंगाधर गाडे, श्री.अशफाक सलामी, श्री.मनमोहनसिंग ओवेरॉय, श्री.प्रकाश निकाळजे, श्री.अफसर खान :या सभागृहात असे लक्षात आलेले आहे की, ५०% पेक्षा जास्त सदस्यांनी वकीलाची सहाय्यता घेवून मतदानात भाग घेतलेला आहे ते योग्य नसून लोकशाहीची या सभागृहात थटट्ा केली जात आहे. जर वकीलाचे सहाय्य घेवून निर्णय सभागृहात घ्यावयाचे झाल्यास गुप्त मतदान प्रक्रिया कशासाठी करायची या बाबत सभागृहात सविस्तर निवेदन प्रशासनाने द्यावा. या निवडणूक प्रक्रियेबाबत नियमाप्रमाणे अंमलबजावणी होत नसलयाने यास आमचा आक्षेप आहे व पिठासन अधिकारी व नगरसचिव यांनी तशी नोंद घ्यावी व लेखी स्वरूपात किती सदस्य साक्षर व किती निरक्षर याची माहिती दयावी.

मा.महापौर : नगरसचिव यांनी तशी लेखी स्वरूपात माहिती स.सदस्यांच्या मागणी नुसार दयावी. आप आपले उमेदवाराचे प्रतिनिधी म्हणून लेखी निवेदन देवून मोजणीच्या ठिकाणी सदस्यांनी उपस्थित रहावे.(त्याच वेळी मतपेटी उचलून सर्वांना दाखविण्यांत येते व पिठासन अधिकारी यांच्या पुढे ठेवून पेटील लावलेली सिल काढण्यात येवून मत पेटीतील पत्रिका एक एक काढून प्रत्येक मतपत्रिकेवर पिठासन अधिकारी तथा मा.महापौर यांची स्वाक्षरी घेवून छाननी अधिकारी यांचेकडे सुपूर्द केल्या जाते.(याचवेळेस विरोधी पक्ष नेता व इतर सदस्यांनी पिठासन अधिकारी यांचेकडे ज्या स.सदस्यांनी साक्षर असूनही मतदानाच्या वेळी मदत मागवून मतदान केले त्या बाबत माहिती देण्यासाठी पत्र दिले व २२ सदस्यांनी अशा प्रकारे सहाय्यता मागवून मतदान केल्याने सभागृहात निषेध नोंदविला व तसे पत्र लेखी स्वरूपात दिले.)

मतमोजणी संपलेली असून खालील प्रमाणे निर्णय जाहीर करण्यात येतो.

| **उमेदवाराचे नांव** | **पडलेली मते** |
|---|---|
| स.सदस्य श्री.सुदाम सोनवणे | ५० विजयी |
| स.सदस्य श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन | ३१ पराभूत |
| बाद मते | ०१ |
| **एकूण मते** | **८२** |

नुतन मा.महापौर श्री.सुदाम सोनवणे यांना विजयी घोषित करून त्यांचे अभिनंदन करण्यांत आले.

(नुतन महापौरांना पिठासन अधिकारी पदी विराजमान करून मा.उप महापौर पदाच्या निवडणूकीसाठी प्रक्रियेला सुरूवात करण्यांत आली.)

स्वाक्षरित/-
महापौर

महानगरपालिका औरंगाबाद

**विषय क्र. २/२**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९(१) अन्वये मा.उप महापौर पदावर निवड करणे,

**संवाद**

मा.महापौर : आता उप महापौर पदासाठीची निवडणूक प्रक्रियेला सुरूवात होत असून ज्या उमेदवारांनी उप महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहे व ज्यांना आपली उमेदवारी परत घ्यावयाची आहे त्यांचेसाठी अर्धा तासाचा अवधी देण्यांत येतो.

(अंदाजे वेळ ३.२० वाजता)

सचिवांनी उप महापौर पदासाठी किती उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत याची माहिति दयावी.

नगरसचिव : उप महापौर पदाच्या निवडणूकीसाठी ज्या उमेदवारांनी अर्ज भरलेले होते व ज्यांनी आपली उमेदवारी अर्ज परत घेतली या सर्वांचे नांवे वाचून दाखविली व आता उप महापौर पदाच्या निवडणूकीसाठी रिंगणात दोनच उमेदवार उभे असल्याचे वाचून दाखविले ती नांवे खालील प्रमाणे

१. श्री.संजय केनेकर २. श्री.तरविंदरसिंग धिल्लन

मा.महापौर बॅलेट पेपर तयार करण्यासाठी अर्ध्या तासाचा अवधी देण्यात येतो.

(वेळ अंदाजे ३.५५ वाजता तो पर्यंत सभा तहकुब करण्यांत येते.)

सभेला सुरूवात ४.३० वाजता

मा.मनमोहनसिंग ओबेरॉय सभागृहात मतदान प्रक्रिया पार पाडीत असतांना ज्या स.सदस्यांना आवश्यकताही नसतांना मदतीची आदेश दिल्या जाते ही बाब योग्य नसून असे जर होत असेल तर मतदान प्रक्रियेवर आघाडी तर्फे बहिष्कार टाकण्यांत येईल.

श्री.गौतम खरात :जे सदस्य साक्षर असूनही त्यांनी कोणत्याही प्रकारचे सहकार्य न मागता पिठासन अधिकारी मदतीचे आदेश देतात ही बाब लोकशाहीचा घोर अपमान करणारी असून त्यामुळे लोकशाहीचा पाया खालावलया जात आहे व सभागृहाचा अपमान होत आहे. ज्या स.सदस्यांना लिहीता वाचता येत नेसल, जे अपंग व अज्ञानी असतील त्यांना नियमाप्रमाणे मदत किंवा सहकार्य देण्यांस काही हरकत नाही परंतू ज्या सदस्यांनी गेल्या ४ वर्षाच्या काळात कधीही मदतीची अपेक्षा निवडणूक काळात केलेली नव्हती त्यांनी आजच्या निवडणूकीसाठी मदतीची अपेक्षा केल्याचे दिसून येते. आणि जर अशाच प्रकारे आताही मा.उप महापौर पदाच्या निवडणूकीसाठी मदतीची प्रक्रिया सदस्यांना होत असल्यास या बाबत आम्ही न्यायालयात दाद मागणार आहेत त्यासाठी पिठासन अधिकारी यांनी नियमा प्रमाणे कार्यवाही करावी व लोकशाहीचा भंग करू नये.

मा.प्रदिप जैस्वाल : ज्या सदस्यांनी सहकार्यालची मदत मागितली त्या सदस्यांना मदत देणे आवश्यक राहील.

मा.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री,गौतम खरात, श्री.मुश्ताक अहमद, श्री.अफसर खान, श्री.प्रकाश निकाळजे : सभागृहात ज्या सदस्यांना लिहीता वाचता येत नाही

त्यांना सहकार्य करणे ठिक राहील परंतू निवडून येणे पूर्वी जे सदस्य साक्षर व शिक्षीत असल्याने नमुद केलेले आहे व ज्यांनी मतदानाच्या वेळी मदत दिल्या गेली त्या सदस्यांनी पुन्हा मदतीची मागणी न करताच मदत देणे म्हणजे लोकशाहीची घोर चेष्टा करणे होय. यापेक्षा गुप्त मतदान पध्दतच अवलंबणे ठिक होणार नाही असे वाटते. भारतीय लोकशाही पध्दत अस्तित्वात असतांना गुप्त मतदान पध्दतीत साक्षर सदस्यांना मदत देणे लोकशाहीला मारक असून ते उचित नाही.

मा.महापौर : आता मा.उप महापौर पदाच्या निवडणूक प्रक्रियेला सुरूवात होत आहे. जनसंपर्क अधिकारी यांनी नांवे वार्डनिहाय पुकारावे तत्पुर्वी स.सदस्या, श्रीमती गंगवाल यांची प्रकृती ठिक नसल्या कारणाने त्यांना मतदानासाठी अगोदर नांव घ्यावे मतदानासाठी ४५ मिनिटाचा अवधी देण्यांत येतो.

(यावेळी प्रथमत: मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहात दाखविल्या जाते व पिठासन अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून मतपेटीला सिल लावून ती ठेवण्यांत येते. )

जनसंपर्क अधिकारी : वार्ड क्र.४० चे स.सदस्यांचे नांव अगोदर पुकारल्या जाते त्यांच्या मागणी नुसार पिठासन अधिकारी यांनी मुख्य लेखा परिक्षक यांनी मदत करण्याचे आदेश दिले. त्यानुसार त्यांनी मतदान केले, त्या नंतर वार्ड क्र.१ चे स.सदस्या यांना त्यांच्या मागणीवरून उप आयुक्त (म) यांनी मदत करण्यांचे निर्देश दिल्याने त्यानुसार त्यांनी मतदान केले.

(याच वेळी विरोधी बाका वरील सर्व स.सदस्यांनी शिक्षित सदस्यांना पिठासन अधिकारी यांनी मदत दिल्याचे निषेधार्थ सभागृहात नोंदविला व सुचना केली.)

त्यानंतर वार्ड क्र.२ चे स.सदस्यांचे नांव पुकारण्यात आले त्यांनी मतदानाचा हक्क बजावला नाही त्यानंतर पिठासन अधिकारी यांनी वार्ड क्र.४७ चे स.सदस्यांना त्यांची प्रकृती ठिक नसलया कारणाने त्यांना अगोदर मतदानात भाग घेण्यासाठी आदेशित केले. मागणीनुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना मदत करण्यासाठी आदेशित केले. त्यानुसार संबंधित स.सदस्यांनी मतदानात सहभाग घेवून मतदान केले. तसेच वार्ड क्र.३ च्या स.सदस्य यांचे नांव पुकारल्या गेले.

(याच वेळेस विरोधी बाकावरील सर्व सदस्यांनी पिठासन अधिकारी तथा मा.महापौरांच्या आसनाजवळ येवून निषेघाच्या घोषणा दिल्या जात होत्या.व वेळोवेळी सदस्यांना मतदान करता वेळी सहकार्य करण्याचे जे आदेश दिले जात होते त्यामुळे लोकशाहीचा खुण करणे हा सभागृहाचा अपमान अशा घोषणा सभागृहात निनादत होत्या व असे लोकशाही विरूध्द सभागृहातून सभात्याग करित असल्याचे सांगून सर्व विरोधी सदस्यांनी घोषणा देत सभात्याग केला अंदाजे वेळ ४.४५ वाजता. )

त्यानंतर वार्ड क्र.४,५,६ चे स.सदस्यांनी मतदानात भाग घेतलेला नाही तर वार्ड क्र.७ व ८ चे सदस्यांनी मतदान केले व वार्ड क्र.९ च्या स.सदस्यांनी मतदानात सहभाग नोंदविला नाही. वार्ड क्र.१० व ११चे सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र.१२ चे स.सदस्यांनी मतदानात भाग घेतला नाही व वार्ड क्र.१३ चे स.सदस्य यांनी मतदानात सहभाग घेवून मतदान केले तर वार्ड क्र.१४,१५ व १६ चे स.सदस्यांनी मतदानात सहभाग घेतला नाही. वार्ड क्र.१७ चे स.सदस्य व पिठासान अधिकारी यांचे नांव पुकारल्या ंनतर ते

स्वतः जागेवरून उठातंना मा.उप महापौर यांना तात्पुरते पिठासन अधिकारी म्हणून स्थानापन्न होण्याचे सांगितले व जागेवरून उठले . त्यानुसार मा.उप महापौर पिठासन अधिकारी म्हणून जागेवर बसले व संबंधित स.सदस्य यांनी मतदानात भाग घेवून मतदानाचा हक्क बजावला. वार्ड क्र.१८,१९ व २० चे स.सदस्यांनी मतदानात भाग घेवून मतदान केले (त्याच वेळेस मा.महापौर हे स्वतः मतदान करून पिठासन अधिकारी या खुर्चीवर जावून बसले व मा. उप महापौर हे परत स्वतःच्या आसनावर स्थानापन्न झाले) नंतर वार्ड क्र.२१ व २२ चे स.सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र.२३ च्या स.सदस्य यांच्या मागणीनुसार पिठासन अधिकारी यांनी उप आयुक्त (म) यांना मदत करण्याचे आदेशित केले त्यानुससार संबंधित सदस्यांनी मतदान केले. व वार्ड क्र.२४ चे स. सदस्य यांनी सभात्याग केल्याने मतदानात सहभाग घेतला नाही. व वार्ड क्र.३१ चे स. सदस्य यांच्या मागणीनुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यानी मदत करण्याचे पिठासन अधिकारी यांनी आदेशित केले. त्यानुसार सबंधितांनी मतदान केले. तर वार्ड क्र.३२ ते ३६ चे स. सदस्य यांनी सभात्याग केल्याने मतदानात सहभाग घेतलेला नाही.वार्ड क्र.३७ चे स. सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र.३८ चे स. सदस्य यांच्या मागणी नुसार उप आयुक्त (प्र) यांनी सहकार्य करण्याचे पिठासन अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार त्यांनी मतदान केले. तर वार्ड क्र.३९,४१ ते ४३ चे स. सदस्यांनी सभात्याग केल्याने मतदानात सहभाग घेतलेला नाही. वार्ड क्र.४४ चे स. सदस्यांनी सभात्याग केल्याने मतदानात सहभाग घेतलेला नाही. वार्ड क्र.४८ चे स. सदस्य यांनी मतदान केले व वार्ड क्र.४९ चे स. सदस्य यांनी सभात्याग केल्याने मतदानास सहभाग घेतला नाही. तर वार्ड क्र.५० चे स.सदस्य यांच्या मागणी यनुसार त्यांना उप आयुक्त (प्र) यांनी मदत करावे. असे पिठासन अधिकारी यांनी आदेशित केले तर त्यानुसार संबंधितांनी मतदान केले व वार्ड क्र.५१ व ५२ चे स. सदस्य यांनी मतदान केले. तर वार्ड क्र.५३ ,५४ व ५५ चे स. सदस्य यांनी सभात्याग केल्याने मतदानात सहभाग घेतला नाही . वार्ड क्र.५६ ते ६० चे स.सदस्यांनी मतदान केले व वार्ड क्र.६१,६२व ६३ चे स. सदस्यांनी सभात्याग केल्याने मतदानात सहभाग घेतला नाही वार्ड क्र.६४ चे स. सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र.६५ चे स. सदस्यांनी यांनी सभात्याग केल्याने मतदानास सहभाग घेतलेला नाही. वार्ड क्र.६६ चे स. सदस्यांनी मतदान केले. तर वार्ड क्र.६७ व ६८ चे स. सदस्य यांनी सभात्याग केल्याने मतदानासाठी सहभाग घेतलेला नाही.वार्ड क्र.६९ ते ८२ पर्यंतचे स.सदस्य यांनी नांवे पुकारल्या प्रमाणे मतदान केले.

मा.महापौर : अद्यापही दहा मिनीटाचा अवधी बाकी असून ज्या स.सदस्यांनी मतदान पूर्ण व्हावयाचे आहे त्यांची नांवे पुन्हा पुकारण्यांत यावीत असे पिठासन अधिकारी व मा.महापौर यांनी सांगितले.

जनसंपर्क अधिकारी : उर्वरित राहिलेल्या व मतदानासाठी ज्या स.सदस्यांनी भाग घेतलेला नाही त्यांची नांवे पुन्हा पुकारण्यात आली.

(तरीही विरोधी स.सदस्य व ज्यांनी सभात्याग केला ती नांवे पुकारूनही मतदानासाठी आलेले नाहीत.)

मा.महापौर : आणखी पांच मिनिटांच्या अवधी ज्यांनी मतदान केलेले नाही त्यांचेसाठी देण्यांत येतो. जनसंपर्क अधिकारी यांनी नांवे पुकारावीत.

जनसंपर्क अधिकारी : ज्या स.सदस्यांनी मतदान करण्यासाठी सहभाग घेतला नाही त्यांची पुन्हा २-२ वेळेस नांवे पुकारण्यांत आली तरीही सभात्याग केलेल्या स.सदस्यांनी मतदानात भाग घेतला नाही.

मा.महापौर आता वेळ संपलेली आहे. मतदान प्रक्रिया थांबवावी. (त्याच वेळेस मतपेटी सभागृहात दाखविल्या जाते व सिल उघडून पिठासन अधिकारी यांचे कडे मतपेटी समोर ठेवून सिल उघडण्यांत आली व मतपत्रिकेवर पिठासन अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या घेवून छाननी अधिकारी यांचेकडे छाननीसाठी देण्यांत आले व छाननी अधिकारी यांनी मतपत्रिकांचे छाननी करून मतमोजणी अधिकाऱ्यांकडे दिले. (त्याच वेळेस पिठासन अधिकारी यांनी दोन्हीही उमेदवारां बाबत मत मोजणी ठिकाणी प्रतिनिधी पाठविणेसाठी सुचना केली. मतमोजणी अधिकारी यांनी मोजणी करून पिठासन अधिकाऱ्याकडे स्वाधिन केले. )

मा.महापौर : मत मोजणी संपलेली आहे व खालील प्रमाणे निकाल जाहिर करण्यांत येते.

| **उमेदवारांचे नांव** | **पडलेली मते** |
|---|---|
| स.सदस्य श्री.संजय केनेकर | ४६ विजयी |
| स.सदस्य श्री.तरविंदरसिंग धिल्लन | निरंक पराभूत |
| बाद | ०१ |
| **एकूण मते** | **४७** |

याच वेळी मा. महापौर व उप महापौर यांची निवड झाल्या बदद्ल अभिनंदन करण्यांत आले व "जन गण मन" राष्ट्र गिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद
औरंगाबाद

स्वाक्षरित/-
मा.महापौर
महानगरपालिका

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
## दिनांक २०-५-१९९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक २०-५-१९९९ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.महापौर श्री.सुदाम पाटील सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस महापालिका मुख्य कार्यालयातील "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात "वंदे मातरम्" गिताने सुरूवात झाली. या सभेला कार्यालयीन अधिकाऱ्यांसह स.सभासद उपस्थित होते.

स.सभासदाचे नांव

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.केनेकर संजय किसनराव | उप महापौर |
| २. | मा.श्री.ढगे नरसिंग मुरलीधर | स.सदस्य |
| ३. | मा.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव | स.सदस्य |
| ४. | मा.श्री.अफसर खॅा यासिन खॅा | स.सदस्य |
| ५. | मा.सौ.लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | स.सदस्य |
| ६. | मा.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | स.सदस्य |
| ७. | मा.सौ.साजेद बेगम | स.सदस्य |
| ८. | मा.श्री.म सलिम म हनिफ | स.सदस्य |
| ९. | मा.श्री.गौतम भागाजी खरात | स.सदस्य |
| १०. | मा.सौ. रजनी रमेश जोशी | स.सदस्य |
| ११. | मा.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | स.सदस्य |
| १२. | मा.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | स.सदस्य |
| १३. | मा.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | स.सदस्य |
| १४. | मा.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | स.सदस्य |
| १५. | मा.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | स.सदस्य |
| १६. | मा.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | स.सदस्य |
| १७. | मा.श्री.इंगळे रंविंद्र बाबुराव | स.सदस्य |
| १८. | मा.श्री.बैनाडे कवरसिंग किसनसिंग | स.सदस्य |
| १९. | मा.सौ.पदमा बाबुराव शिंदे | स.सदस्य |
| २०. | मा.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | स.सदस्य |
| २१. | मा.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | स.सदस्य |
| २२. | मा.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | स.सदस्य |
| २३. | मा.सौ. धनश्री अशोक विसपुते | स.सदस्य |
| २४. | मा.सौ.फरहद बानो भ्र. मो.नवाज | स.सदस्य |
| २५. | मा.श्री.फजलउल्लोद्दीन अजमत खान | स.सदस्य |
| २६. | मा.श्री.अजिज खान गणी खान | स.सदस्य |
| २७. | मा.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | स.सदस्य |
| २८. | मा.श्री.महंमद मुश्ताक अहमद | स.सदस्य |
| २९. | मा.श्रीमती नुजहॉं बेगम अ रहेमान | स.सदस्य |
| ३०. | मा.श्री.देशमुख वसंत विनयकराव | स.सदस्य |
| ३१. | मा.श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशिर अहेमद | स.सदस्य |
| ३२. | मा.श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | स.सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३३. | मा.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्यीन | स.सदस्य |
| ३४. | मा.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर | स.सदस्य |
| ३५. | मा.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | स.सदस्य |
| ३६. | मा.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | स.सदस्य |
| ३७. | मा.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | स.सदस्य |
| ३८. | मा.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | स.सदस्य |
| ३९. | मा.श्री.हमीदउद्यीन ताबा फसीयोद्यीन | स.सदस्य |
| ४०. | मा.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | स.सदस्य |
| ४१. | मा.श्री.स.अ.इकबालोद्यीन स.मो. कुतुबोद्यीन | स.सदस्य |
| ४२. | मा.श्री.सय्यद अली मिरा सलामी | स.सदस्य |
| ४३. | मा.श्री.लाहोट रमेश दिपचंद | स.सदस्य |
| ४४. | मा.श्री.फैय्याज अहेमद महंमद हाजी कुरेशी | स.सदस्य |
| ४५. | मा.सौ.वाघमारे मुक्ताबाई सुदाम | स.सदस्य |
| ४६. | मा.सौ.दलाल लता श्रीनिवास | स.सदस्य |
| ४७. | मा.श्री.ओक जयंवंत केशवराव | स.सदस्य |
| ४८. | मा.श्रीमती अलका रमेश पाटील | स.सदस्य |
| ४९. | मा.सौ.धांडे शकुंतला हरीदास | स.सदस्य |
| ५०. | मा.श्री.अब्दुल रशिद खान (मामू) | स.सदस्य |
| ५१. | मा.श्री.कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | स.सदस्य |
| ५२. | मा.डॉ.श्री.कराड भागवत किशनराव | स.सदस्य |
| ५३. | मा.सौ.आव्हाड सविता संजय | स.सदस्य |
| ५४. | मा.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | स.सदस्य |
| ५५. | मा.श्री.अब्दुल रशिद अ.सत्तार | स.सदस्य |
| ५६. | मा.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | स.सदस्य |
| ५७. | मा.श्री.विखारोद्यीन पि खुदबोद्यीन | स.सदस्य |
| ५८. | मा.श्री.गंगाधर सुखदेव गाडे | स.सदस्य |
| ५९. | मा.श्री.बारवाल गजानन रामकिशन | स.सदस्य |
| ६०. | मा.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | स.सदस्य |
| ६१. | मा.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव | स.सदस्य |
| ६२. | मा.श्री.जोशी संजय रामदास | स.सदस्य |
| ६३. | मा.श्री.गिरजाराम हाळनोर | स.सदस्य |
| ६४. | मा.सौ.ज्योत्सना हिवराळे | स.सदस्य |
| ६५. | मा.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे | स.सदस्य |
| ६६. | मा.सौ.राधाबाई तळेकर | स.सदस्य |
| ६७. | मा.श्री.विठ्ठल किसन जाधव | स.सदस्य |
| ६८. | मा.डॉ.श्री.मेहेर विजयकुमार गजानन | स.सदस्य |
| ६९. | मा.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे | स.सदस्य |
| ७०. | मा.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | स.सदस्य |
| ७१. | मा.श्री.नवपुते कचरू चंद्रभान | स.सदस्य |

**संवाद**

कोरम अभावी सभा १.३० तासाठी तहकुब करण्यांत आल्याचे मा.महापौरांनी घोंषित केले. सकाळी ११.३० वाजता १.३० तासासाठी तहकुब झालेली सभा दुपारी १.३० वाजता परत सुरू झाली.

मा.महापौरांनी घोषित कले की, कोरम अभावी १५ मिनिटांसाठी तहकुब करण्यांत येत आहे.

दुपारी १.३० वाजता तहकुब झालेली सभा १.५५ वाजता परत मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली.

स.नगरसेवक तथा सभागृहनेता श्री.अविनाश कुमावत यांनी क्रिकेट खेळाडू सचिन तेंडूलकर यांच्या वडीलांच्या दु:खद निधनामुळे त्यांना सभागृहात श्रंध्दांजली अर्पण करण्याची सुचना मांडली त्यास श्री. अफसर खान यांनी अनुमोदन दिले.

श्री. सचिन तेंडूलकर यांच्या वडीलांच्या दु:खद निधनामुळे सभागृहात दोन मिनीटे उभे राहून स्तब्धता पाळून त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

मा.महापौरांनी विषद केले की, या शहराच्या विकास विकासात्मक कामे या सदंर्भाने सभागृहात प्रश्न उपस्थित होवून त्यावर चर्चा व्हावी व यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. आपल्या रास्त मागण्यांशी मी सहमत आहे.

श्री.रशिद खान (मामू) : मागील सर्वसाधारण सभेत सभागृहात ऐनवेळी ठेवलेल्या प्रस्तावावरती चर्चा न होताच ते मंजूर केलेले आहेत. तेव्हा या प्रश्नावर परत चर्चा घडवून आणावी.

श्री.अफसर खान : मागील बैठकीत ऐनवेळी आलेल्या प्रस्तावावर प्रशासकिय मत घेवून ठेवण्यांत यावे.

श्री.मुजीब आलम शाह खान : बैठक घेण्यासाठी निश्चित पध्दत असावी शहराच्या विकासाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी निश्चित वेळ देण्यांत यावा . सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा प्रशासनातर्फे करण्यांत यावा व विचारलेली माहिती दिली जावी.

मा.महापौर : प्रशासनातर्फे मांडण्यांत येणारे प्रशासकीय ठराव बैठकीच्या सात दिवस आधि मांडण्यांत यावेत, अन्यथा असे प्रस्ताव विषय पत्रिकेवर घेतले जाणार नाहीत. सर्वसाधारण सभेत स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे संबंधित अधिकाऱ्याऐवजी मा.आयुक्त स्वतः देतील . स.सदस्यांनी विचारवयाचे प्रश्न सात दिवस अगोदर देण्यांत यावे. मा.महापौरांनी घोषित केले कि, या बैठकीपासून सभागृहातच चहापान व नाष्टा दिला जाणार नाही. यासाठी सभागृहाबाहेर व्यवस्था केलेली आहे. तेथे जावून सर्वांनी चहापान व नाष्टा करावा.याच बरोबर सभागृहात ऐनवेळचे विषय सादर करण्यास मनाई केलेली आहे. स.स. मनमोहनसिंग ओबेरॉय व इतर काही सभासदांनी सभागृहात पिण्याचे पाणी आणू देण्याबाबत विनंती केल्यानुसार मा. महापौरांनी स. सदस्यांसाठी सभागृहात पिण्याचे पाण्याची व्यवस्था केली जाईल असे घोषित कले. स. नगरसेवक श्री.गौतम खरात यांनी सुचना मांडली की, सभागृहात मोबाईल फोन आणू देवू नये.

मा.महापैरांनी घोंषित कले की, स.सदस्य व इतरांनी सभागृहात पेजर मोबाईल आणू नयेत अथवा ते जवळ ठेवल्यास ते बंद करून ठेवावेत.

श्री.अफसर खान : सभागृहात काही सदस्य स्वत:जवळ रिव्हालवर बाळगातत त्याचे काय ?

मा.महापौर : नियमानुसार सभागृहात रिव्हालवर आणत येत नाही.

श्री.गौतम खरात : लवकरच लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकी संदर्भाने आचार संहिता लागु होणार आहे. तसेच आगामी वर्षात महानगरपालिकेचीही निवडणूक होणार आहे. नुकतेच आर्थिक वर्ष सुरू झालेले आहे. पुढील दोन महिन्याच्या काळात अंदाजपत्रके विकासाची कामे सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यास प्रशासनास सूचना द्याव्यात.

मा.महापौर : या संदर्भात संबंधीत विभागंना मी यापूर्वीच पत्र दिले आहे. परत सुचना देण्यांत येते की, जी अंदाज पत्रके सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीसाठी ठेवणे आवश्यक आहे ती तात्काळ तयार करून आचार संहिता सुरू होण्यापूर्वी सर्वसाधारण सभेसमोर ठेवावीत.

श्रीमती अलका पाटील : नगरसेवक स्वेच्छा निधीतील मागील वर्षातील काही कामे होणे अद्याप बाकी आहे. ती तातडीने पुर्ण करण्यासाठी सूचना दयाव्यात.

**विषय क्र.३/१**

दिनांक १६-३-९९ ची विशेष सर्वसाधारण सभा, तसेच दिनांक २१-३-९९ संपन्न झाली त्या सभेचे व दिनांक ३१-३-९९ व २०-४-९९ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

श्री.नरेंद पाटील : सभागृहात शिस्त पाळत असतांना एका वेळेस एकाच स.सभासदास उभे राहण्याची व बोलण्याची परवानगी द्यावी. माजी महापौर श्री.गजानन बारवाल त्यांच्या काळात स.सदस्यांच्या नावांचा बोर्ड सभागृहात लावण्याची मी विनंती केली होती व ती मान्यही झाली होती.

परंतु अद्यापही प्रशासनाने ही कार्यवाही केलेली नाही. याची गंभार दखल घ्यावी. दिनांक २१-३-१९९९ च्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१२ वरती विषयपत्रिकेवर सर्व प्रस्ताव व पुरवणी विषयपत्रिकेवरील ऐनवेळचे व ऐनवेळी सभागृहात सादर झालेले सर्व विषयास मंजुरी देण्यांत येते. असा निर्णय दिलेला आहे. या विषयावर कोणतीही चर्चा झालेली नाही. हे ठराव रद्य करून त्या ठरावांवर ऐक बैठक बोलावून नंतर त्यावर विचार व्हावा.

मा.महापौर : विषयपत्रिका ऐनवेळेस चर्चेस घेता येत नाही म्हणून दिनांक २१-३-९९ च्या बैठकीतील पृष्ठ क्र.१३ ते २४ वरील विषय क्र.२४८/३ व २५४/९ ते २६०/१५ ऐनवेळेचे विषय व पुरवणी विषय स्थगित करण्यांत येतात. सदरचे विषय पुढील सर्वसाधारण सभेत प्रशासना मार्फत ठेवण्यांत यावेत. याच बरोबर सर्व संबंधित विभागंनी या विषयाची माहिती सादर करावी. प्रथम विषय पत्रिकेवर चर्चा करण्यांत यावी नंतर इतर प्रश्नांवर एक तास चर्चा करावी.

श्री.नरेंद्र पाटील : मागील बैठकीतील विषय क्र.२३७/२ ते २६०/१५ वरती चर्चा झालेली नाही. तेव्हा ते एक स्वतंत्र बैठक घेवून त्या बैठकीत चर्चेसाठी ठेवावेत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : २१-३-९९ च्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्र.२४२/३ मध्ये दैनिक वेतन कम्रचाऱ्यांना रू.९४/- प्रमाणे दैनिक वेतन वाढवून देण्यास मान्यता दिलेली आहे. परंतु ते केव्हापासून वाढून देणार.

श्री.गिरजाराम हळनोर : २१-३-९९ च्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.२३६/१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.१ नुसार ठराव क्र.२१४/५ मध्ये अट (अ) मध्ये ज्या संस्था धर्मदाय आयुक्त, सहकार निबंधक यांच्याकडे पंजीकृत असेल तर त्यांना वापरण्यास दयाव्यात. जर त्या संस्थांचा वापरासाठी नकार असेल तर इतर संस्थांना देण्यांत यावे या ऐवजी " ज्या संस्था पंजीकृत असतील आणि लोकल असतील त्यांना प्राधान्य देण्यांत यावे व त्यांनी नकार दिल्यास इतर संस्थांचा विचार करण्यांत यावा " अशी दुरूस्ती करण्यांत यावी.

मा.महापौर : विषय क्र.२३६/१ मधील अ.क्र.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ठराव क्र.२१४/५ मध्ये स.नगरसेवक श्री.गिरजाराम हळनोर यांनी सुचविलेली दुरूस्ती मंजुर करण्यांत येते.

श्रीमती अलका पाटील : विषय क्र.२५६/११ वर चर्चा व्हावी.

मा.महापौर : सदरचा ठराव यापुर्वीच रदद् केला आहे.

मा.मनमोहनसिंग ओबेरॉय : जी मालमत्ता मनपाने विकसीत केलेली आहेती इतर संस्थांना किरायाने का द्यावयाची ती जागा खाली आहे ती भाडयाने देण्यांत यावी यासाठी कमेटी स्थपन करावी. अशा प्रकारचे स्वतंत्र प्रस्ताव प्रत्येकी बैठकीत ठेवू नयेत अशा ठरावांना माझा विरोध आहे.

श्री.गिरजाराम हळनोर: मनपाकडे अनेक वाचनालये व इतर इमारती आहेत. त्यांची देखभाल दुरूस्ती मनपा करू शकत नाही त्यामुळे अशा इमारती भाडयाने देण्यांत येत आहेत.

श्री.रशिद खान (मामू) : शहरातील सर्व नाले ही देण्यांत आलेले आहेत.

डॉ.विजयकुमार मेहेर : दिनांक २१-३-९९ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.२३८/३ बाबत माहिती देण्यांत यावी सिडकोस आपण दिलेले पैसे व्याजासह परत घेणार काय ? सिडको प्रशासनावर दबाव आणून नाटयकृह बांधण्यांत सिडकोस भाग पाडावे.

मा.महापौर : सिडकोशी उद्या बैठक होणार आहे. तेथे हा मुद्या चर्चेस घेतला जाईल तथापि काम लवकर सुरू करण्यांबाबत मा. आयुक्तांनी सिडकोस पत्र द्या.

श्रीमती नुरजहॉं बेगम : नाल्याजवळ घरे नसावीत असा शासनाचा निर्णय आहे मात्र मनपा नाल्याच्या पुर्ण जागा विकत आहे. याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : सर्वसाधारण चर्चेसाठी दिलेल्या वेळात हा प्रश्न विचारण्यांत यावा.

मा.महापौर : विषय क्र.१ सर्वानुमते मंजुर करण्यांत येते.

**ठराव**

दिनांक २१-३-९९ च्या इतिवृत्तातील

१ ठराव क्र.२४८/३,२५४/९ ते २६०/१५ हे स्थगित करून हे ठराव प्रशासनातर्फे परत पुढील बैठकीत सादर करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

२ विषय क्र.२३६/१ मधील अ.क्र.१ मध्ये दर्शविलेला ठराव क्र.२१४/५ मध्ये अट (अ) मध्ये ज्या संस्था धर्मदाय आयुक्त सहकार निबंधक यांच्याकडे पंजीकृत असेल तर त्या संस्थांना वापरासाठी नकार असेल तर इतर संस्थाना देण्यांत यावे. " या ऐवजी ज्या संस्था पंजीकृत असतील आणि स्थानिक असतील त्यांना प्राधान्य देण्यांत यावे. व त्यांनी नकार दिल्यास इतर संस्थांचा विचार करण्यांत यावा." अशी दुरूस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील दुरूस्त्यासह दिनांक १६.३.९९ ची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २१.३.९९ ( दिनांक २०.३.९९ रोजी तहकुब करण्यात आलेली ) ची सर्वसाधारण सभा आणि दिनांक ३१.३.९९ व २०.४.९९रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## सर्वसाधारण चर्चा

मा.महापौर : चर्चेसाठी अर्ध्या तासाचा वेळ देण्यांत येतो. एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे.

श्री.रशिद खान (मामू) : पैठणगेट रस्ता विकासाठी १९७५ मध्ये घेतलेला होता. आता न्यायालयाची स्थगिती उठविण्यांत आली आहे. त्यातील अर्धा रस्ता डेव्हलप झालेला आहे.उर्वरित केव्हा होणार. बाधीत होणारी मालमत्ता हटवून रस्ता रूंदीकरण करावयास पाहिजे मी माझी मालमत्ता रत्ता रूंदीकरणासाठी दिलेली होती. ज्यांनी १९७५ ला मोबदला दिला त्याचा ताबा घेण्यांत आला किंवा नाही त्याचा ताबा घ्यावयास पाहिजे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : केवळ थोडासा भाग अक्वॉयर करावयाचा आहे. हायकोर्टाचा स्टे पण उठलेला आहे. तात्काळ पजेशन घेवून रस्ता रूंदीकरण करण्यांत यावे. या संदर्भाने सुप्रिम कोर्टात कॅव्हेट दाखल करण्यांत यावे.

श्री.स.अली मिरा सलामी : हायकोर्टाचे स्टे उठलेला आहे. केव्हा पर्यंत कार्यवाही होणार याचा खुलासा व्हावा. स्थगिती उठल्यापासून कार्यालयीन कार्यवाही काय झ ाली.

मा.महापौर : अति.शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

सौ लता दलाल : गुलमंडी ते पैठणगेट पर्यंत मालमत्ता ॲक्वॉयर करण्याबाबत प्रशासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणाचा १९९५ पासून मी पाठपुरावा करत आहे. औरंगपूरा गुलमंडी पैठणगेट रस्ता रूंदीकरण बाबत खुलासा करावा.

नगर रचनाकार : सिल्लेखाना ते क्रांतीचौक या रस्त्याचे भुसंपादनाचा निवाडा जाहिर झ ालेला आहे. यासाठी ५० लाखाच्या वर रक्कम द्यावयाची आहे. ती अद्याप पाठवलेली नाही ती वाठवताच आपणास जागेचा ताबा मिळेल.

श्री.अविनाश कुमावत : निवाडा कधी घेषित झाले हे पैसे आपण कधी देणार याचा मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.महापौर : संबंधित विभागाचे अधिकारी बैठकीस उपस्थित नाहीत. मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त : क्रांतीचौक ते पैठणगेट हा शहरातील महत्वाचा रस्ता आहे. हा रस्ता १०० फुटी करावा असे महानगरपालिकेने ठरवलेले आहे. आणि १९९० साली या रस्त्याचा निवाडा तयार झाला. परंतु या रस्त्यात बाधीत होणाऱ्या काही लोकांनी उच्च न्यायालयात याचीका सादर केली होती, व त्यांनी स्थगनादेश मिळविला होता. त्यामुळे रस्ता रुंदीकरण करता आला नाही. हा रस्ता रूंद व्हावा ही अनेक सदस्यांची नागरिकांची व मनपाची इच्छा आहे. न्यायालयीन स्थगनादेशामुळे काम करता आले नाही. परंतु १५ दिवसापूर्वी उच्च न्यायालयाने स्थगनादेश उठवलेला आहे. न्यायालयाकडे निकालाची

प्रत मागीतली आहे. ती मिळताच विशेष भुसंपादन अधिकारी यांचेकडे रू.५६ लाख भरले जातील व त्यांच्याकडून आपणास ताबा मिळेल. सुप्रिम कोर्टात कॅव्हेट दाखल करावे अशी काही स.सदस्यांची मागणी आहे. त्याचाही विचार महानगरपालिका करत आहे. रंगारगल्ली प्रमाणेच ही केस आहे. या बाबतीत महानगरपालिका प्रशासन योग्य ती कार्यवाही करित आहे.

श्री.रशिद खान (मामू) : रंगारगल्ली अद्यापही रूंद झालेली नाही. लँड ॲक्वीजीएशनसाठी तात्काळ पैसे भरण्यांत यावेत १५ दिवसापासून निकालाची प्रत प्राप्त करून का घेण्यांत आली नाही.

मा.महापौर : उच्च न्यायालयाच्या निकालाची प्रत तात्काळ हस्तगत करून घेण्यांत यावी व सुप्रीम कोर्टात कॅव्हेट दाखल करण्यासाठी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.म.अ.रऊफ : चेलिपूरा, रोषनगेट,लोटाकारंजा, शहागंज रस्त्याच्या रूंदीकरणाचे काय झ ााले.

मा.महापौर : संबंधित अधिकारी आज उपस्थित नाहीत. तथापि रस्त्या संदर्भाने न्यायप्रविष्ठ प्रकरणत मा. आयुक्तांनी स्वतः लक्ष घालावे या संदर्भाने पुढील बैठकीत खुलासा करावा.

श्री.नरसिंग ढगे : विभाग क्र.४ खुप मोठा आहे. २० वार्डामध्ये काम करणे विभागीय अधिकाऱ्यास त्रासाचे आहे. या विभागात हजेरी सेंटर ( १० वार्डाचे मिळून एक) बांधावे.

श्री.महादेव सुर्यवंशी : दिनांक २७-१०-९८ रोजी प्रशासनास पत्र देवून कर्मचाऱ्यांची जात व संवर्गनिहाय माहिती मागितली होती. त्यानंतर रितसर स्मरणपत्र देवूनही माहिती मागितली होती नंतररितसर प्रश्न विचारण्यात आले असता आज उत्तर दिले सदरची माहिती विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध असल्याचे कळविले आहे हे बरोबर नाही. यावर कार्यवाही व्हावयास हवी.

मा.महापौर : उप आयुक्त (प्र) यांनी या संदर्भाने माहिती द्यावी.

मा.उपआयुक्त(प्र): स.सदस्यांनी जात व धर्मनिहाय मागितलेली माहिती विभागीय कार्यालयाकडून संकलित करण्यांत येत आहे. आस्था-२ मार्फत माहिती दिलेली आहे. पुढील बैठकीपुर्वी माहिती दिली जाईल.

श्री.महादेव सुर्यवंशी : प्रशासन ही माहिती का देवू शकत नाही. आपणाकडे माहिती नाही तर भरती कशी झाली. यापूर्वी अ.रशिद खान (मामू) यांनी मालमत्ता विषयक असाच प्रश्न विचारलेला होता. माहिती मिळत नाही.

उप आयुक्त (प्र) : प्रत्येक विभागीय कार्यालयात मिनी आयुक्तालय सुरू केलेले आहे. सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक व अभिलेख विभागीय कार्यालयात पाठविलेले असल्याने हा विलंब झालेला आहे.

मा.महापौर : स.सदस्यांनी लेखी विचारलेली माहिती १५ दिवसांचे आंत देण्यांत यावी. अन्यथा मा. आयुक्तांच्या माध्यमातून कार्यवाही करण्याचे आदेश देण्यांत येतील.

श्री.स.अली.मिरा सलामी : मान्सुन लवकरच सुरू होणार आहे. शहरातील नाले साफ करून त्यावर ढापे टाकणे आवश्यक आहे. ढापे सप्लाय होत नाहीत याचा खुलासा व्हावा. शहरात बऱ्याच ठिकाणी फरशी बसविण्यांत येत आहे. परंतु ३-३ महिने काम होत नाही. फरशी पुरवठा होत नाही ही कामे

लवकरात लवकर पुर्ण करावीत याचा खुलासा व्हावा. सादीया टॉकीज समोर नालीवर ढापे टाकणे आवश्यक आहे.

मा.महापौर : शहरातील सर्व नाले ७ जुन पुर्वी साफ करवून घेतले जातील. ढापे आता आलेले आहेत. मोठया गटारीही ७ जुन पुर्वी साफ करवून घेण्यांत येणार आहे.

श्री. गंगाधर गाडे : मुकदस वृत्तपत्रात एक बातमी आलेली आहे त्यात म्हटले आहे की, जवळपास १.५ कोटीची डांबरीकरणाची कामे मनपाने काढली आहेत व कंत्राटदारांनी टेंडरही भरले आहेत. माझी माहिती अशी आहे की, यापुर्वी जवळपास २५ ते ३५% कमी दराने कामे दिलेली आहेत. १.५ कोटी रूपयाच्या कामामध्ये काही कंत्राटदारांनी रिंग केली व एस्टीमेट रेटने कामे काढून घेतली. यामुळे मनपाचे जवळपास ५०-६० लाखाचे नुकसान होणार आहे. यापुर्वी डांबरीकरण संबंधिच्या कामाबाबत खुप तक्रारी आलेल्या आहेत. कामाची गुणवत्ता पाहिली जात नाही. यावर मनपा प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. याचा खुलासा व्हावयास पाहिजे.

अति.शहर अभियंता : सदरील कामाचे टेंडर मागविलेले होते. गुत्तेदारांनी भरलेल्या निविदा उघडल्या त्या निविदेतील दरानुसार रेकंमडेशन केले आहे.

श्री.गंगाधर गाडे : यापुर्वीच्या निविदा २५ ते ३५% कमी दराच्या होत्या व आता हे काम एस्टीमेट रेटने होणार आहे. या कामात तुम्हास शंका का आली नाही? यामुळे ५० ते ६० लाखाचा भुर्दंड मनपास पडणार आहे. ही बाब विचारात घेतली नाही. ठेकेदार एकमेकांशी मिळालेले आहेत.

श्री.विजयकुमार मेहेर : निविदा स्विकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार प्रशासनास आहे त्यांनी हा अधिकार का वापरला नाही.

श्री.रशिद खान (मामू) : सदरचे काम रिकॉल करण्यांत यावे, म्हणजे परत कामात रिंग होणार नाही व होणाऱ्या बचतीतून हायमास्ट बसविण्यांत यावे.

मा.महापौर : शहरातील रोड बाबत बऱ्याचशा तक्रारी आहेत कमी दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दराने निविदा येत आहे. या टेंडरमध्ये जातीने लक्ष घालून ७ दिवसाचे शॉट टेंडर काढावे.

श्री.गजानन बारवाल : आपणांस टेंडर रिकॉल करता येणार नाही.

श्री.हमीद ताबा: शहरात अनाधिकृत टपऱ्या काढत आहेत. माझ्या वार्डात १० अनाधिकृत टपऱ्या बसल्या आहेत त्यास जिम्मेदार कोण अनाधिकृत बांधकामेही वाढत आहेत यास जिम्मेदार कोण. रातोरात ६ टपऱ्या बसल्या आहेत.

श्री.अफसर खान : शहागंज भागात अनाधिकृत टपऱ्या बसलेल्या आहेत या टपऱ्या काढण्यात याव्यात मनपाने ही जी उप महापौर परिषद घेतली त्यासाठी किती बजेट मंजुर केले याचाही खुलासा व्हावा.

मा.महापौर : टपऱ्या बाबत स.नगरसेवकांनाही विनंती की, टपऱ्या काढत असतांना प्रशासनास सहकार्य करावे. शहागंज चमन येथील सर्व टपऱ्या काढाव्यात व तीन दिवसात अहवाल द्या ावा रस्ता रूंदीकरणासाठी टपऱ्या हटविणे आवश्यक आहे.

श्री.अफसर खान : वाचमन पदे मंजुर होवून २ महिने झाले. मार्च-९९ च्या सभेत ठराव क्र.१८१/४ नुसार मंजुर झालेली पदे ताबडतोब भरण्यांत यावी. तसेच इतर पदे देखील भरण्यांत यावी.

श्री.अ.रशिद खान : महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांची विविध पदे निर्माण करण्याचे बऱ्याच दिवसापासून चालू आहे वर्ग -३ व वर्ग -४ कर्मचाऱ्यांची जेथे जेथे गरज आहे तेथे गरजेप्रमाणे नेमणूक करण्यात यावी. त्यामुळे जनतेच्या कामात अडचण निर्माण होणार नाही. व लोकांची कामे लवकर होतील.

मा.महापौर प्रशासनाला विविध पदे भरण्याची गरज आहे. पदनिर्मितीचा प्रस्ताव माझ्याकडे आलेला आहे. त्यास मंजुरी घेवून शासनाकडून मंजुरी मिळण्यास वेळ लागेल तो पर्यंत गरजे प्रमाणे जशी वर्ग -३ व वर्ग-४ ची पदे भरणे आवश्यक आहे ती पदे मा.आयुक्तांनी भरावी व जेथे जेथे गरज आहे त्या विभागत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

**विषय क्र.४/२**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सुतगिरणी ते शहानुरमियाँ दर्गा या ८० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सन ९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रूपये ३७,००,६८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यांत आलेले रू.३७,००,६८०/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : एस्टीमेट मंजुर करण्यास हरकत नाही. काम चांगले होईल यावर प्रशासनाने लक्ष दयावे.

श्री.अफसर खान : हे काम एक वर्षापुर्वीच झाले आहे.एक वर्षातच डांबरीकरण खराब कसे झाले याची चौकशी व्हावी.

श्री.नरेंद्र पाटील निकृष्ट कामाबांबत गंभीरपणाने लक्ष दयावयास हवे. सदरचे काम एक वर्षापुर्वीच करण्यांत आले होते. ४ कोटीचे कामात ३७ लाखाचे काम एक वर्षात परत होत असेत तर संबंधित एजन्सी व अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावयास पाहिजे.

श्री.अनिवाश कुमावत : विषय क्र.२५०/५ दिनांक २१-३-९९ चे इतिवृत्त याबाबत माहिती देण्यांत यावी.

अति.शहर अभिंयता : मजबुती करणासाठी प्रस्तावित केलेला रस्ता ब्लॅक कॉट साईल एरीयातील आहे. उडड्ाणपुलामुळे या रस्त्यावर ट्रॅफीक झालेली आहे. त्यामुळे हा रस्ता खराब रस्ता होता. त्यामुळे ही ब्लॅक कॉटन साईल काढून रस्ता करण्यांत येईल व त्यावर डांबरीकरण करण्यांत येईल.

श्री.महादेव सुर्यवंशी : रस्त्याचे मजबुतीकरण डांबरीकरण एकदाच करणार का या रस्त्यावर किती टन वजनाची ट्रॅफीक होवू शकेल याची माहिती दयावी.

श्री.अविनाश कुमावत : रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण एकाच वेळी करणार का ?

श्री.अली मिरा सलामी : यावर एकूण किती लाख खर्च होणार याची विचारणा करावी.

मा.महापौर : विषय क्र.२ सर्वानुमते मंजुर करण्यांत येतो, याच बरोबर शहरातील एक वर्षात केलेल्या डांबरीकरणाच्या कामाची चौकशी करण्यांसाठी मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली सभागृहनेता, उप महापौर, सभापती ,स्थायी समिती, विरोधी पक्ष नेता, व स.सदस्य श्री.अब्दुल रशिद खाँ

(मामू),स.सदस्य अब्दुल रशिद,अ.सत्तार ,स.स.श्री.राजकुमार बचाटे व स.स.गौतम लांडगे, पाच सदस्यांची समिती स्थापन करण्यांत येते. समितीने येत्या सर्वसाधारण सभेसमोर आपला अहवाल ठेवावा.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी ते शहानुमियाँ दगाई या ८० फुट रूंद विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी रक्कम रूपये ३७,००,६८०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमे स्वीकृतिस मंजुरी देण्यांत येते. तसेच डांबरीकरणाच्या कामा बाबत सभागृहात झ ाालेल्या चर्चेनुसार मनपातर्फे एक वर्षाच्या काळात जी विविध डांबरीकरणची कामे झाली आहेत अशा कामाची पाहणी करून चौकशी करण्यासाठी खालील सभासदांची एक उपसमिती गठीत करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.महापौर | समितीचे अध्यक्ष |
| २ | मा.उप महापौर | समितीचे सभासद |
| ३ | मा.सभापती स्थायी समिती | समितीचे सभासद |
| ४ | मा.सभागृह नेता | समितीचे सभासद |
| ५ | मा.विरोधी पक्ष नेता | समितीचे सभासद |
| ६ | स.स.अ.रशिद अ.सत्तार | समितीचे सभासद |
| ७ | स.स.अ.रशिद खॉन (मामू) | समितीचे सभासद |
| ८ | स.स.श्री.राजकुमार बचाटे | समितीचे सभासद |
| ९ | स.स.श्री.गौतम लांडगे | समितीचे सभासद |

सदर समितीने आगामी सर्वसाधारण सभेपूर्वी चौकशी अहवाल तयार करून सभेपुढे ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.५/३**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालाननगर भागातील रस्त्याचे मजबुतीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचीनुसार र.रक्कम १३,९८,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्रापत शासकीय अनुदानामधुन करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रू.१३,९८,०५०/-चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दशेविल्याप्रमाणे जालाननगर भागातील रस्त्याचे मजबुतीकरण करणे साठी रक्कम रूपये १३,९८,०५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६/४**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पैठणगेट ते क्रांतीचौक या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम

खात्याच्या दरसुचीनुसार रू.२६,५६,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रू.२६,५६,७००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे पैठणगेट ते क्रांतीचौक या रस्त्याचे पुर्नः डांबरीकरण करण्यासाठी रक्कम रूपये २६,५६,७००/- चे अंदाजपत्रक सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७/५**

अतिरिक्त शहर अभियता यांनी प्रस्ताव दिला की, पुंडलिकनगर अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुची नुसार रक्कम रू.६५,४०,०८६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आल`आहे. सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले र.रू.६५,४०,०८६/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रसतावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर येथील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रूपये ६५,४०,०८६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्व्किृतीसह मंजरुी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८/६**

अतिरिक्त शहर अभियता यांनी प्रस्ताव दिला की, सुतगिरणी ते शिवाजीनगर ( सिडको हदद्) या रस्त्याचे रूंदीकरण करणे व दुभाजक टाकणेया कामासाठी सन १९९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रूपये २०,५५,०५२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदाना मधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रूपये २०,५५,०५२/-चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी ते शिवाजी नगर (सिडको हदद्) या रस्त्याचे रूंदीकरण करणे व रस्ता दुभाजक टाकणे हे काम करण्यासाठी रक्कम रूपये २०,५५,०५२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९/७**

अतिरिक्त शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला की, सुतगिरणी ते शिवाजीनगर (सिडको हदद्) या रस्त्याचे डांबरीकरण करणे या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचिनुसार रक्कम रूपये ३२,३६,०५५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्चशासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रू. ३२,३६,०५५/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी ते शिवाजीनगर (सिडको हदद्) या रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी रक्कम रूपये ३२,३६,०५५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०/८**

अतिरिक्त शहर अभिंयता प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडकोतील म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी सन १९९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने रक्कम रूपये १६,४३,८००/- चे सादर करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात ठेवलेल्या नविन डांबरीकरण या लेखा शिर्षातून करण्यांत येईल.

तसेच आर-२९ सिडको नविन औरंगाबाद या योजनेच्या आराखडयातील मोकळया जागेच्या बदल्यात रस्ते हस्तांतर करून घेण्यास मान्यतेस्तव.

करता म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणेस्तव व आराखडयातील मोकळया जागेच्या बदल्यात रस्ते हस्तांतर करून घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

ठराव प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको येथील म्हाडा कॉलनीमधील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी रक्कम रूपये १६,४३,८००/- चे अंदाजपत्रकास आणि आर -२९ सिडको नविन औरंगाबाद या योजनेच्या आराखडयातील मोकळया जागेच्या मोबदल्यात रस्ते हस्तांतरण करून घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११/९**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका मार्फत हाती घेण्यांत आलेल्या वेगवेगळया कामासाठी सिमेन्टची आवश्यकता आहे. त्यानुसार ५०,०००/- गोणी सिमेंट खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९९-२००० वर्षाचे दरसुची नुसार प्रती गोणी रू.१२५/- (भांडारात पोचते) रक्कम रूपये ६२,५०,०००/- चे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यांत आले. त्यास मा. आयुक्त साहेब यांनी दिनांक ४-५-९९ रोजी मान्यता दिली आहे. खर्चासाठी खरेदीसाठीच्या तरतुदीमधून करण्यांत येईल. तरी वरील प्रमाण प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका मार्फत हाती घेण्यात आलेल्या वेगवेगळया कामासाठी सिमेंटची आवश्यकता असल्याने रू.१२५/- प्रति गोणी नुसार ५०,०००/- गोणी सिमेंट महानगरपालिकेच्या भांडारात पोचती करण्याच्या अटीसह खरेदी करण्यासाठी रक्कम रूपये ६२,५०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२/१०**

कार्यकारी अभियता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किराडपुरा स्लम वार्ड -२५ मध्ये शहाबाद फरशी बसविणे, कॉंक्रट रस्ते तयार करणे व इतर कामासाठी साव्रजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुची नुसार रक्कम रूपये १०,४४,७०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम " खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ४-५-९९ रोजी प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रू.१०,४४,७०३/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपूरा स्लम प्रभाग क्र.२५ मध्ये शाहबाद फरशी बसविणे, कॉंक्रीट रस्ते तयार करणे व इतर काम करण्यासाठी रक्कम रू.१०,,४४,७०३/- चे अंदाजपत्रकास सार्वनुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३/११**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.भिमनगर भावसिंगपूरा (स्लम) येथे संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरीता सार्वजनिक बांधकाम याच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुचीनुसार रूपये ३१,८४,१८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम स्लम भागातील खुल्या गटारी व संरक्षित भिंत बांधणे शिर्षका अंतर्गत शासकीय अनुदानातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेब यांनी दिनांक १०-५-९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रूपये ३१,८४,१८०/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर भावसिंगपूरा (स्लम) संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी रक्कम रूपये ३१,८४,१८०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४/१२**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.प्रज्ञानगर (स्लम)येथे संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष

९७-९८ च्या दरसुचिनुसार रूपये १८,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम सन ९९-२००० सालच्या स्लम भागात खुल्या गटारी व संरक्षित भिंत बांधणे शिर्षकातून शासकीय अनुदानातुन करण्यांत येईल. सदरील कामास मा. आयुक्त यांनी दिनांक ४-५-९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रूपये १८,००,०००/-चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे मोहला प्रज्ञानगर (स्लम) येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कमाची रक्कम रूपये १८,००,०००/- अंदाजपत्रकास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५/१३**

कार्यकारी अभिंयंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.मसनतपुर (स्लम) येथे अशोकनगर भागात दगडी गटारीवर स्लॅब टाकून रूंदीकरण करणे कामाकरीता रू.१७,५९,२२९/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम दरसुची सन ९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असून या कामास मा. आयुक्त यांनी दिनांक ४-५-९९ रोजी प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

सदरील कामाचा खर्च अठरा खेडी विकास या लेखाशिर्षका अंतर्गत आणि सन १९९९-२००० सालच्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

करिता अंदाजपत्रक रू. १७,५९,२२७/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला मसनतपुर येथे अशोकनगर भागात दगडी गटारीवर छत (स्लॅब) टाकून रस्ता रूंदीकरण करणेच्या कामासाठी रूपये १७,५९,२२७/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.१६/१४**

मा.कार्यकारी अभिंयता (स्लम)यांनी प्रस्ताव सादर केला आहे कीृ मो.संजयनगर मुंकुंदवाडी (स्लम) येथे रोहीदासनगर ते रामनगर पर्यंत दगडी गटार बांधणे कामाकरीता रूपये १३,४६,९१२/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम दरसुची सन ९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असून या कामास मा. आयुक्त यांनी दिनांक ४-५-९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील कामाचा खर्च अठरा खेडी विकास या लेखा शिर्षका अंतर्गत आणि सन १९९९-२००० सालच्या शासकीय अनुदानातुन करण्यांत येईल.

करिता अंदाजपत्रक रू. १३,४६,९१२/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला संजयनगर मुकुंदवाडी (स्लम) येथे रोहीदासनगर ते रामनगर पर्यंत दगडी गटार बांधणेचे कामाकरीता रक्कम रू. १३,४६,९१२/- अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७/१५**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.चिकलठा ाण गांव पुष्पक गार्डन कामगार कॉलनी ते नदीपर्यंत दगडी गटार बांधणे कामाकरीता रक्कम रूपये २३,५७,७७०/- चे अंदाजपत्रका सार्वजनिक बांधकाम दरसुची सन ९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असून या कामास मा. आयुक्त यांनी दिनांक ४-५-९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील कामाचा खर्च अठरा खेडी विकास कार्यक्रम या लेखाशिर्षाका अंतर्गत आणि सन १९९९-२००० सालच्या शासकीय अनुदानतुन करण्यांत येईल.

करिता रूपये २३,५७,७७०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील पुष्पक गार्डन कामगार कॉलनी ते नदीपर्यंत दगडीगटार बांधणेच्या कामाकरीता रक्कम रूपये २३,५७,७७०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८/१६**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर मुकुंदवाडी (स्लम) येथे १५० मी.मी. व्यासाची २२५ मी.मी.व्यासाची उप जलनिःसारण वाहिनी व ३०० मि.मि. व्यासाची मुख्य जलनिःसारण वाहिनी टाकणे कामाकरीता रू.३७,३८,४५९/- चे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन ९८-९९नुसार तयार करण्यांत आले असून, या कामास मा. आयुक्त यांनी दिनांक ४-५-९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील कामाचा खर्च स्लम भागात पाणी पुरवठा व जलनिःसारण या शिर्षकातून आणि सन १९९९-२००० सालच्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

करिता अंदाजपत्रक रू.३७,३८,४५९/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.अविनाश कुमावत : कार्यकारी अभियंता (स्लम) हे पद आपल्याकडे आहे काय ? झ ोपडपट्टी विकासासाठी कार्यकारी अभियता पद निर्माण करावा असा ठराव सभागृहात झाला होता. तो शासनाकडे मंजुरीस्तव पाठविला आहे.आतापावेतो त्यास मंजुरी मिळालेली नाही. परंतू मंजुरी मिळेपर्यंत कार्यकारी अभियता यांचे अधिकार उप अभियता यांना दिलेले आहेत. या सर्व ठरावावर कार्यकारी अभियता स्लम ऐवजी उप कार्यकारी अभियता स्लम असे वाचावे.

मा.महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी आपली नेमणूक ज्या पदावर झालेली आहे ते पदनाम लिहावे पुढे अशी चूक करू नये.

सौ.लता दलाल : शब्दांचा खेळ करून सभागृहाची दिशाभुल करू नये. उप कार्यकारी अभियता हे पद आपल्याकडे आहे का याचा खुलासा व्हावा.

मा.आयुक्त : प्रभारी कार्यकारी अभियंता असे म्हणता येईल . प्रभारी म्हणून पदाचा उपयोग करतील.

मा.महापौर : त्यांनी प्रभारी कार्यकारी अभियंता म्हणून आपल्या पदाचा वापर करावा.
मा.महापौर : सर्वानुमते मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला संजयनगर मुकुंदवाडी (स्लम) येथे १५० मी.मी. व २२५ मी.मी. व्यासाची उप जलनिःस्सारण वाहिन्या व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य जलनिःस्सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरीता रूपये रू.३७,३८,४५९/-चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९/१७**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या शाळा सर्व दृष्टीने परिपुर्ण करण्याचा महानगरपिलकेचा प्रयत्न आहे. विद्यार्थी क्रीडा, कला व सांस्कृतिक गुणाची जोपासना व शिक्षण मुलांना देणे आवश्यक आहे. इतर सर्व खाजगी शाळामध्ये कला व क्रीडा हे स्वतंत्र विभाग असतात . महानगरपालिकेच्या एकुण ८२ शाळापैकी ३१ केंद्रीय शाळामध्ये तुर्त एक क्रीडा शिक्षक व एक कला शिक्षक यांचे पद निर्माण करून केंद्रीय शाळांमध्ये कला व क्रीडा विभाग सुरू करता येईल. केंद्रीय शाळेच्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व शाळांची जबाबदारी या शिक्षकांवर राहील.

१ कला शिक्षकांची निवड खालील शाखामधून करण्यांत येईल.
(संगीत, नाटय, चित्रकला,हस्तकला) व पात्रता खालीलप्रमाणे

**अ संगित कला शिक्षकांसाठी**

१ कोणत्याही शाखेचा स्नातक आणि संगीत विशारद किंवा बी.ए.संगीत
२ तबला व पेटीची साथ करण्याचे ज्ञान असणे आवश्यक युवक महोत्सव, राज्य पातळीवरील तसेच स्थानिक स्पर्धामध्ये सहभाग

**ब नाटय कला शिक्षकांसाठी**

१ कोणत्याही शाखेचा स्नातक अणि नाटय शास्त्राची पदविका / पदवी
२ प्रत्यक्ष नाटय स्पर्धामध्ये सहभाग घेतलेला असणे/ बालनाटय क्षेत्रात विशेष कार्य केलेल्यांना प्राधान्य.

**क चित्रकला शिक्षकांसाठी**

१ कोणत्याही शाखेचा स्नातक अणि चित्रकला शिक्षक पदविका
२ इंटरमीजीएट ड्रॉईंग ग्रेड परिक्षा पास असणे आवश्यक ,बी.एफ.ए. असल्यास प्राध्यान्य.

**ड नृत्य शिक्षकांसाठी**

१ कोणत्याही शाखेचा स्नातक अणि नृत्यातील पदविका/पदवी
२ नृत्य क्षेत्रात काम करण्याचा कार्यक्रमआयोजनाचा अनुभव आवश्यक तसेच युवक महोत्सव,राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवरील नृत्यस्पर्धेत सहभाग

**ई हस्तकला शिक्षकांसाठी**

१ कोणत्याही शाखेचा स्नातक आणि सीटीसी (क्राप्ट टिचर्स सर्टीफिकेट कोर्स पास)
२ क्रीडा शिक्षक कोणत्याही शाखेचा स्नातक अणि शारिरिक शिक्षण पदवी.
प्राधान्य राज्यस्तरीय स्पर्धामध्ये प्राविण्य मिळविलेले असल्यास विशेषतः कबडड्ी, खो-खो,फुटबॉल, ॲथेलटीक्स, हॉकीत असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

वरील दोन्ही पदे रू.२०००/- प्र.म. प्रमाणे निश्चित वेतनावर भरण्यांत येतील.
करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

**श्री.गजानन बारवाल :** क्रीडा शिक्षक पदासाठी राज्यस्तरीय स्पर्धामध्ये प्राविण्य मिळविललेले असावे ही अट काढून टाकण्यांत यावी.

**श्री.अविनाश कुमावत :** आपल्याकडे बालवाडी शिक्षकही आहे त्यातुन अर्हताधारक शिक्षकांना घेण्यांत यावे.

**श्री.हमीद ताबा :** ही पदे कशा प्रकारे भरण्यांत येणार आहेत याचा खुलासा व्हावा व आजच का गरज भासली.

**श्रीमती मोहसिना बिल्कीस :** शिक्षकांची संख्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणात कमी आहे ती वाढविण्यांत यावी.

**श्री.नरसिंग ढगे :** चित्रकला शिक्षकांना ठेवलेली पात्रता आपल्या शाळा कोणत्या वर्गापर्यंत आहेत हे पाहून ठरवली पाहिजे. आपल्या शाळा ७ वी पर्यंत आहेत. चित्रकला शिक्षक हा ग्रॅज्युएट असला पाहिजे ही अट काढून टाकावी .१० वी पर्यंतचे काही कोर्सेस आहेत त्यांनाही मुलाखतीस बोलावण्यात यावे. क्राप्ट टिचर्स साठीही ग्रॅज्युएशनची अट नसावी. डी.एड दर्जाचे काही कोर्सेस आहेत ही कोर्सेस केलेल्यांना मुलाखतीस बोलाविण्यात यावे.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** असे शिक्षक भरावेत जे शिक्षकही आहेत ते कलाही शिकवू शकतील.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिका केवळ ७ वी पर्यंतच्या शाळा चालवते ही बाब पहाता विविध विषयांच्या शिक्षकांसाठी ठेवलेल्या अटीमुळे शंका निर्माण होते. टाकलेल्या अटी चुकीच्या आहे. यात दुरूस्ती करणे आवश्यक आहे. शारिरिक शिक्षण असलेल्या शिक्षकांना वाव देण्यांत यावा.

**मा.महापौर :** सदराचा विषय मंजुर करण्यात येतो. शिक्षकांची भरती ७ जुन पुर्वी केली जाईल. पात्र उमेदवारांची यादी सेवा योजन कार्यालयाकडून मागविण्यांत येईल. शिक्षकांसाठी ठेवलेली पदवीधर व राज्यस्तरीय वरील खेळाडूंना ही अट रदद् करण्यांत येते. बालवाडी शिक्षकांमधून पात्र उमेदवार असेल त्यांना प्राधान्य द्यावे. या दुरूस्तीसह ठराव मंजुर.

**श्री.रशिद खान (मामू) :** या शिक्षकांना उर्दु शिकविता येईल कि हे ही पहावयास पाहिजे. उर्दु माध्यमासाठी उर्दुचे शिक्षक नेमावे.

**मा.महापौर :** वरील दुरूस्तीसह ठराव मंजुर.

**श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :** या बाबत आर्थिक बाजू ही पहाणे गरजेचे आहे. या शिक्षकांना २०००/- रूपये मानधन देण्यांत येणार आहे. परंतू नंतर वेतनवाढीचे प्रस्ताव सादर करण्यांत येतात. दोन वर्षापर्यंत त्यांना २०००/- रूपये मानधन देण्यांत यावे.

**श्री.गजानन बारवाल :** असे करता येणार नाही त्यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे.

**श्री.गंगाधर गाडे :** प्रथम मुलभूत शिक्षण देण्यांत यावे. व शिक्षकांचा दर्जा सुधारण्यांत यावा. संगीत शिक्षणाची आज गरज नाही.

**श्री.महादेव सुर्यवंशी :** केवळ केंद्रीय शाळांऐवजी इतरही शाळांमधून असे शिक्षक देण्यांत यावे. माझ्या वार्डातील शाळेत विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहें. तेव्हा त्या शाळेत असे शिक्षक देण्यांत यावेत.

**श्री.गंगाधर गाडे :** शिक्षण विभागासाठी एक स्वतंत्र बैठक बोलवावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपिालकेने एकूण ८२ शाळा पैकी ३१ केंद्रीय शाळांमध्ये रूपये २०००/- प्रतिमहा या प्रमाणे निश्चित वेतनावर प्रत्येकी एक क्रीडा शिक्षक व एक कला शिक्षक या प्रमाणे शिक्षकांची पदे निर्माण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | कला शिक्षक | ३१ | १. संगित विशारद किंवा संगीत पदवीधर (बी.ए.संगित) |
| | अ संगीत कला शिक्षक | | २. तबला व पेटीची साथ करण्याचे ज्ञान आवश्यक तसेच राज्य पातळीवर स्थानिक स्पर्धेत सहभाग असल्यास प्राधान्य |
| | ब. नाटय कला शिक्षक | | १.नाटय शास्त्राची पदविका<br>२. नाटयशास्त्र पदवीधर असल्यास प्राधान्य<br>३. प्रत्यक्ष नाटय स्पर्धेत सहभाग आवश्यक व बालनाटय क्षेत्रात विशेष कार्य केलेल्यांना प्राधान्य |
| | क. चित्रकला शिक्षक | | १.चित्रकला शिक्षक पदविका<br>२.इन्टरमेजीएट ट्रेनिंग ग्रड परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>३. बी.एफ.ए. असल्यास प्राधान्य. |
| | ड.नृत्य शिक्षक | | १. नृत्य शिक्षणातील पदविका<br>२. नृत्य शिक्षणातील पदविधर असल्यास प्राधान्य<br>३. नृत्य क्षेत्रत काम करण्यांच व कार्यक्रमाचा अनुभव आवश्यक तसेच युवक महोत्सव , राज्य जिल्हा पातळीवर नृत्य स्पर्धेत सहभाग |
| | ई.हस्तकला शिक्षक | | १. हस्तकला शिक्षक प्रमाणपत्र पदविका (कोर्स) |
| २ | क्रीडा शिक्षक | ३१ | १. शारिरिक शिक्षण पदविका (बीपीएड)<br>२. कबडड्ी,खो-खो, फुटबॉल,ॲथॅलटिम्स,हॉकी या खेळात प्राविण्य असल्यास प्राधान्य. |

अनुक्रमांक १ व २ या जागा भ्रतांना सध्या महानगरपालिकेत बालवाडी शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या शिक्षकांमधून पात्र उमेदवार उपलब्ध होत असतील तर अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत यावे. तसेच अनुक्रमांक १ व २ च्या पदाची भरती करतांना केंद्रीय शाळा माध्यमाची असेल त्याच माध्यमाचे शिक्षक नियुक्त करणे आवश्यक राहील. व

या शिक्षकांची भरती येत्या शैक्षणिक वर्षातल्या सुरूवातीपासून म्हणजेच ७ जुन पुर्वी होईल अशी व्यवस्था प्रशासनाने करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०/१८**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःस्सारण यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, शासकीय अनुदान १९९९-२००० मध्ये खालील कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भावसिंगपुरा व परिसरासाठी जलवाहिनी टाकणे. | - | अ.प.रू.५७.६४ लाख |
| २. | खोकडपूरा येथे २० लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ व जलवाहिनी टाकणे | - | अ.प.रू.८६.३७ लाख |
| ३. | जिन्सी परिसरात जमिनीवरील जलकुंभ व पंप हाऊस (पंपींग मशिनरी सहित) बांधणे. | - | अ.प.रू.४५.०० लाख |

करिता उपरोक्त शासकीय अनुदानामधून हाती घ्यावयाच्या कामाच्या अंदाजपत्रकाना मंजुरी मिळणे करीता प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (१) भावसिंगपूरा व परिसरासाठी जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रूपये ५७.६४ ,(२) खोकडपुरा येथे २० लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधणे व जलवाहिनी टाकणेसाठी रक्कम रूपये ८६.३७ लक्ष आणि (३) जिन्सी परिसरात जमिनीवरून जलकुंभ व पंप हाऊस (पंपींग मशिनरी सहित) बांधणेच्या कामासाठी रक्कम रूपये ४५.०० लाखाचे या तिन्ही अजंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र.२१/१**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये दिनांक १-१-९८ पासून कायमस्वरूपी नगरसचिव हे पद भरलेले नाही. श्री.पठाण एम.ए. यांची तात्पुरती नियुकती केलेली असून या पदासाठी नियमाप्रमाणे आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व अनुभव त्यांच्याकडे आहे. शिवाय नगर सचिव पदावरील प्रत्यक्ष कामाचा देखिल त्यांना मागलि १ १/२ वर्षाचा अनुभव असल्याने तसेच या काळात विविध सभाचे कामकाज, निवडणुका इत्यादी कामे त्यांनी उत्कृष्ट रित्या पार पाडलेली आहेत. सर्वसाधारण सभेने यापुर्वी दोन वेळा श्री. पठाण यांचे नगरसचिव पदावर तात्पुरती नियुक्ती करण्यांस मंजरी दिलेली आहे. तरी श्री.एम.ए.पठाण यांना नगरसचिव पदावर त्यांच्या नगरसचिव पदावरील पहिल्या नियुक्ती पासून व महानगरपालिकेने यापुर्वी या पदासाठी मंजुर केलेल्या वेतनश्रेणीत त्यांची महानगरपालिकेतील सेवा व वेतन संरक्षण देवून नियमित स्वरूपात (कायमस्वरूपी) नियुक्ती देण्यांस प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यांत येत आहे.

सुचक : सर्वश्री

१ अविनाश कुमावत
२ गैतम खरात
३ प्रदिप जैस्वाल
४ काशिनाथ कोकाटे
५ फैय्याज कुरेशी
६ राजकुमार बचाटे
७ गिरजाराम हाळनोर
८ संजय केनेकर
९ अफसर खान
१० मोहसिन अहमद
११ गंगाधर गाडे
१२ अजिज खान गणी खान

अनुमोदक :

१ गौतम लांडगे
२ डॉ.भागवत कराड
३ मनमोहनसिंग ओबेरॉय
४ नरसिंग ढगे
५ महादेव सुर्यवंशी
६ किशोर तुळशीबागवाले
७ विकास जैन
८ अब्दुल रऊफ
९ महमंद विखारोद्यीन

**संवाद :**

श्री.गौतम खरात : प्रस्ताव मंजुर करता असतांना सर्व कायदेशिर बाजु तपासून घेण्यांत याव्यात.

मा.महापौर : ठराव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये श्री.एम.ए.पठाण हे नगरसचिव पदावर दिनांक १-१-१९९८ पासून पुर्णवेळ तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत आहेत. नगरसचिव पदासाठी महानगरपिालकेतुन पदोन्नतीने कोणीही सक्षम नसल्याचे व श्री.एम.ए.पठाण हे सेवाभरती नियमानुसार विहित अर्हता धारण करतात असे ठराव क्र.१७४/१० दिनांक १-१-९८ मध्ये प्रशासनातर्फे नमुद केलेले आहे. श्री.एम.ए.पठाण यांना विविध सभाकामकाजाचा निवडणुक व इतर कामाचा अनुभव आलेला असून नगर सचिव म्हणून ते उत्कृष्ट रित्या सेवा पार पाडित असल्याने आणि मुंबई प्रांतिकमहानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये व या अधिनियमाखालील अनुसूची "ड" चे प्रकरण ३ मधील नियम क्रमांक २ अन्वये श्री.एम.ए.पठाण यांना नगरसचिव या पदावर नेमणुक केली जाण्यास योग्य आहे. असे महानगरपालिकेचे मत असल्याने श्री.एम.ए.पठाण यांना नगर सचिव पदावर यांच्या पहिल्या नियुक्ती पासून म्हणजेच दिनांक १-१-९८ पासून या पदावर त्यांची अखंड सेवा असल्याने महानगरपिालकेचा ठराव क्र.१३०/८ दिनांक २७-१२-९५ व

स्थायी समितीचा ठराव क्र.३०१ दिनांक २८-१०-९७ अन्वये मंजुर केलेल्या वेतन श्रेणीत त्याचे विद्यामान वेतन व सेवा संरक्षण देवून (service and pay protection) नगर सिचव या रिक्त पदावर नियमित स्वरूपात(कायमस्वरूपी) नियुक्ती देण्यांस एकमताने स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२/२**

औरंगाबाद महानगरपालिका हदद्दीतील शेळी आणि मेंढी कत्तलखाना दर प्रती जनावर रक्कम रूप५/- अशी फी दिनांक १-४-९९ पासून आकारण्यात आलेली आहे . जी फार जास्त आहे त्यावर इतकी फी खाटीक तर्फे देवू शकत नाही. या अगोदर हि रक्कम रूपये १ हुन रक्कम रूपये २ करण्यांत आलेली आहे. तरी सध्या दिनांक १-४-९९ पासून जी फी वाढवून रक्कम रूपये ५/- करण्यांत आलेली आहे ती कमी करून रक्कम रूपये २ प्रती जनावर स्वीकारण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.मोहसिना बिल्कीस

अनुमोदक : श्री.अब्दुल रऊफ

**<u>संवाद :</u>**

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो. प्रस्ताव शासनाकडे मंजुरी येईपर्यंत सध्याचेच दर चालू ठेवावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १-४-९९ पासून महानगरपालिका हदद्दीतील शेळी व मेंढी कत्तलखान्यावर प्रति जनावर रू.५/- आकारण्यांत येणारी फिस कमी करून रू.२/- प्रती जनावर करण्यांस आणि ही आकारणी करण्यांसाठी प्रथम शासनाची मंजुरी घेणे व शासनाने मंजुरी केलेल्या तारखेपासून कमी दर रूपये २/- प्रती जनावर आकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३/३**

औरंगाबाद महानगरपालिकांचे माजी नगरसेवक श्री.खाजा नासीरोद्दीन यांच्या पत्नीस हदय रोगाच्या उपचारासाठी ऑक्सीजन कॉन्सीटॅक्ट डिव्हीलस लस मशीन खरेदी करण्यसाठी मेर्सर्स मॉक्शीन सर्जीकल क्र. यांनी ८०,०००/- ऐंशी हजार रूपयाची दर पत्रिका दिलेली आहे. सदरील मशीन खरेदी करण्याकरीता स.नगरसेवकांच्या निधीतून खरेदी करावयाची असून रक्कम रूपये ८०,०००/- (ऐशी हजार फक्त ) मंजुरी मिळणे आवश्यक आहे. सदरील रक्कम नगरसेवक निधीतून देण्यांत येईल. प्रसताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अफसर खॉं दिनांक १२-५-९९

अनुमोदक : १. श्री.गिरजाराम हळनोर
२. श्रीमती जाहेदा बेगम
३. श्री.अ.रशिद अ.सत्तार

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री.खाजा नसीरोद्यीन यांच्या पत्नीस हदय रोगाच्या उपचारासाठी ऑक्सीजन कॉन्सीटॅक्ट डिव्हीलस लस माशिन रक्कम रूपये ८०,०००/- स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून खरेदी करण्यास विशेष बाब म्हणून सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४/४**

मंजुर विकास योजना आरक्षण क्र.१६२ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र.१६३ "खुली जागा" तसेच प्रारूप विकास योजनेमधील आरक्षण क्र.२३० प्राथमिक शाळा आ.क्र.२३१ खेळाचे मैदान व आरक्षण क्र.२३८ प्राथमिक शाळा ते आरक्षीत आहे. वरील आरक्षीत असलेल्या जागेवर बऱ्याच वर्षापासून नागरी वसाहती झालेल्या असुन नागरिकांना मुलभुत सुविधाही पुरविण्यांत आलेल्या आहेत. या ठिकाणी जागा संपादन करून विकसित करणे सद्यपरिस्थितीत शक्य होणार नाही.

करिता वरील दर्शविलेल्या आरक्षण क्रमांकाची त्या त्या कारणकरीता आरक्षित असलेली जागा आरक्षणातुन वगळून रहिवास क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यांत यावी.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नरसिंग मुरलीधर ढगे

अनुमोदक : श्री.अविनाश कुमावत

श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

दिनांक १५-५-९९

**<u>संवाद :</u>**

श्री.हमीद ताबा : हा शासकीय प्रस्ताव असावयास पाहिजे होता हा विषय रद्य करण्यांत यावा.

मा.महापौर : सर्वानुमते मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजुर विकास योजना आरक्षण क्र.१६२ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आरक्षण क्र.१६३ प्राथमिक शाळा व प्रारूप विकास योजनेचे आरक्षण क्र.२३० प्राथमिक शाळा व आरक्षण क्र.२३१ खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र.२३८ प्राथमिक शाळा या आरक्षीत जागेवर बऱ्याच वर्षापासून नागरी वसाहती झालेल्या असून या वसाहतींना नागरी मुलभूत सुविधा ही पुरविण्यांत आल्या असल्यामुळे सदर आरक्षण खालील जमिन आरक्षणातून वगळून रहिवास क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५/५**

यांत्रिकी विभागामध्ये वाहनांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली असून वहानांची देखभाल दुरूस्तीकरीता या विभागामध्ये "कनिष्ठ अभिंयता" हे पद नाही. तरी या विभागासाइी आवश्यक त्या प्रमाणामध्ये "कनिष्ठ अभिंयता" पदाची यनिर्मिती करून सदरील पद त्वरीत भरण्यांत यावीत.

तसेच पशुधन विकास विभागाच्या अंतर्गत असलेल्या पशुवध गृहाकरीता तसेच या विभागाचा व्याप एकंदारीत वाढल्याने "पशुधन पर्यवेक्षकाची  जादा पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे.  पशुधन गृहासाठी पूर्णवेळ नियंत्रणासाठी सुपरवायझरची आवश्यकता आहे. तरी यास्तव दोन पशुधन पर्यवेक्षकांची जादा पदे आवश्यक तेवढया प्रमाणात भरण्याकरीता त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. वरील दोन्ही विभागासाठी  पदनिर्मिती करून पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.
सुचक : सौ.सुनंदा कोल्हे
अनुमोदक : श्री.गिरजाराम हळनोर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागात व पशुधन विकास विभागाची कामाची निकड लक्षात घेवून एक कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) व दोन पशुधन पर्यवेक्षक, अनुक्रमे महानगरपालिकेच्या अस्थापनेवर पदनिर्मिती करून भरण्यांतस सर्वानुते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६/६**

महानगरपालिका खुली जागा सर्व्हे नं.२९ सि.स.नं.११६०१ आणि ११६०२ सदरील जागे पैकी १०% जागा, व्यायाम शाळेसाठी गोल्डन स्पोटर्स असोसिएशन ऑफ मराठवाडा नोंदणीकृत संस्था नोंदणी क्र.९६८२/८२ ला लीजवर देण्यांत यावी.
सुचक : श्री.मोहसिन अहेमद
श्री.अजिज खॉं गणी खॅा
अनुमोदक : श्री.अब्दुल रऊफ
श्री.किशोर तुळशीबागवाले

सदर ठरावाच्या वेळी सभागृहात सुचक हजर नसल्याने हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७/७**

प्रस्तावात सादर करण्यांत येते की, महानगरपिालकेतर्फे जकात लेखा मालमत्ता विभागाचे संगणकीकरण करण्यांत येत आहे या संगणकी करणाकरीता मनपा तर्फे लाखो रूपये खर्चून संगणक व इतर साहित्य खरेदी करण्यांत आलेले आहे.

तथापि या संगणकी करणाकरीता तसेच या किमती साहित्याची देखभाल करण्याकरीता आवश्यक असलेले "कॉम्प्युटर प्रोग्रामर " हेपद अद्यापही महानगरपालिकेतर्फे भरण्यात आलेले नाही.

सदरील पद मनपा अस्थापनेवर निर्मिती करून मनपातील पात्र कर्मचाऱ्यांमधून त्वरीत भरणे बाबत स्थायी समितीने सुचना केलेली आहे.

करिता महानगरपालिकेतील कॉम्प्युटर प्रोग्रामर हे पद निर्मिती करून आकृतीबंधात दर्शविलेल्या नियमित वेतन श्रेणी मध्ये मनपातील पात्र कर्मचाऱ्यांमधून भरणे करीता सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.राजकुमार बचाटे

श्री.नरसिंग ढगे
अनुमोदक : श्री.गिरजाराम हाळनोर
श्री.संजय केनेकर

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेत विविध विभागाच्या कामासाठी संगणकीकरण करण्यांचे काम सुरू असून संगणक व इतर साहित्य खरेदी करण्यांत आलेले असून त्यांचे देखभाल व्यवस्थापन करणे शिवाय संगणक हाताळणेसाठी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "कॉम्प्युटर प्रोग्रामर " हे पद निर्मिती करून प्रारूप आकृतिबंध दर्शविलेल्या वेतनश्रेणीत महानगरपालिकेच्या पात्र कर्मचाऱ्यांमधून कायमस्वरूपी भरण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हवी.

**विषय क्र.२८/८**

सिडको नविन औरंगाबाद टी. व्ही. सेंटर येथे हायमास्ट लाईट बसविणे.

सुचक :श्री.रविंद्र (राजू) इंगळे
अनुमोदक :सौ.रजनी जोशी
श्री.सुभाष टाकळकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको नविन औरंगाबाद टी.व्ही.सेंटर येथे हायमास्ट बसविणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९/९**

आम्ही खालील सहया करणारे नगरसेवक आपणास नम्र विनंती करतो की, सिडको एन-७ बी ६९/७० या घरात श्री.दिनकर पाटील हे राहत होते.

दिनांक १६-०५-९९ च्या वादळी पावसामुळे शेजारील घराच्या भिंत कोसळून ते व त्याचा मुलगा बबलु हे दाबुन गेले होते. परंतु नागरिकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढण्यांत आले ते सध्या एम.जी.एम. हॉस्पीटल मध्ये उपचार घेत आहेत. त्याची परिस्थीती गरिबीची असून त्यांना मदतीची गरज आहे. तरी नगर सेवकांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रू.२०००/- (रू.दोन हजार फक्त ) आर्थिक मदत म्हणून देण्यांत यावेत अशी विनंती करण्यांत येते.

**सुचक:** श्री.डॉ.भागवत कराड ,श्रीमती विमलताई मुंडलिक,अ.रशिद खान मामु
**अनुमोदक:** श्री.डॉ.विजयकुमार मेहेर, श्री.संजय केनेकर , श्री.राजकुमार बचाटे (मामा) श्री.कुँवरसिंग बैनाडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १६-५-९९ च्या वादळी पावसात सिडको एन-७ बी ६९/७० या घरात रहाणारे श्री.दिनकर पाटील व त्यांचा मुलगा बबलु शेजाराची भिंत कोसळल्याने दबून जखमी झाले व एम.जी.एम.दवाखान्यात उपचार घेत असून त्यांची

आर्थिक परिस्थीती गरीबीची असल्याने स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रू.२०००/- रू.२५०००/- पर्यंतची अर्थसाहय देण्यांत सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०/१०**

विनंती करण्यांत येते की, नगरसेवक स्वेच्छा निधीतून रू.८०,०००/- युनिर्व्हसिटी ऑफ बॉडी बिल्डींग ॲन्ड हेल्थ केअर असोसिएशन औरंगाबाद शासकीय नोंदणीकृत नं.एफ २५८६ /९३ या संस्थेला देण्याची शिफारस या पत्राद्वारे करत आहेत तरी ऐन वेळीचा प्रस्ताव म्हणून सर्वसाधारण सभेत सदरील प्रसतावाला मंजुरी दयावी.

सुचक : श्री.स.अ.एकबाल
श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय
श्री.फैय्याज कुरेशी
श्री.अफसर खान
अनुमोदक :श्री.अब्दुल रऊफ
श्री.संजय केनेकर
श्री.प्रकाश निकाळजे
श्री. मोहसिना बिल्कीस
श्री.गौतम खरात
श्रीमती जाहेदा बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे युनिव्हसिटी ऑफ बॉडी बिल्डींग ॲन्ड हेल्थ केअर असोसिएशन औरंगाबाद या शासकीय नोंदणीकृत संस्थेस स.सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून रू.२५०००/- अर्थसहाय्य करण्यास सर्वानुमते स्वीकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळेचे विषय

**विषय क्र.३१/१**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, साईनगर म्हडा कॉलनी जवळील खुल्या जागेत व्यापारी संकुल बांधण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूप१६,१०,०८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक २९-४-९९ अन्वये मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये १६,१०,०८०/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईनगर म्हडा कॉलनी जवळील खुल्या जागेत व्यापारी संकुल बांधण्याकरीता रक्कम रूपये १६,१०,०८०/- चे अंदजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२/२**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरातील प्रामुख्याने जायकवाडी प्रकल्पातून पाणी पुरवठा केला जातो. जायकवाडी पासून औरंगाबाद शहरापर्यंत पाणी आणण्यासाठी जायकवडी, ढोरकीन, फारोळा,नक्षत्रवाडी, क्रांतीचौक या ठिकाणी पंप घरे उभारलेली आहेत. या संपुर्ण व्यवस्थेत वरील ठिकाणी खालील प्रमाणे एकूण २१ पंप अव्याहतपणे चालू असतात.

| | |
|---|---|
| जायकवाडी | नविन ४ पंप ५०० अश्वशक्ती प्रत्येकी |
| | जुने ३ पंप ४९५ अश्वशक्ती प्रत्येकी |
| ढोनकीन | ३ पंप ३५० अश्वशक्ती प्रत्येकी |
| फारोळा | नविन ४ पंप ६७० अश्वशक्ती प्रत्येकी |
| | जुने ३ पंप ५०० अश्वशक्ती प्रत्येकी |
| नक्षत्रवाडी | ३ पंप ३०० अश्वशक्ती प्रत्येकी |
| क्रांतीचौक | पंप १८० अश्वशक्ती प्रत्येकी |
| | २१ पंप |

याशिवाय औरंगाबाद शहरात ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा होण्यासाठी पंपींग केले जाते. शहराच्या दररोज ११० ते १२० दशलक्ष लिटर्स पाण्याच्या किमान गरजेसाठी या प्रमाणे २४ तास पंपींग होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील इतर शहराशी तुलना करता औरंगाबाद शहराची पाणी पुरवठयाबाबत परिस्थिती खुपच वेगळी आहे. शहराच्या जवळपास व योग्य पातळीवर शहरासाठी उपयोगात आणले जावू शकणारे असे उद्भव नाहीत की, ज्यामुळे चालू असलेली ठिकठिकाणी पंपीग कमीत कमी केली जावू शकेल. किमान औरंगाबाद साठीजायकवाडी जलाशयाशिवाय कोणताही इतर पर्यायच नाही व सदर जलाशय औरंगाबाद शहराच्या जमीन पातळीपेक्षा खुप खाली (१६०मीटर) असल्याकारणाने २१ मुख्य पंपाद्वारे होणाऱ्या पाण्यांचा उपसा करणे अपरिहार्य आहे. या कारणास्तव विजबिलापोटी दर महिन्याला १.८० ते २.०० कोटी इतके

होतात व ही रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास अदा करणे मनपाच्या आर्थिक परिस्थितीमुळे शक्य होत नाही.

आजमितीस विजबिलापोटी मनपाकडे विद्युत मंडळाची रूपये ७३.५४ कोटी इतकी थकबाकी आहे. जेमतेम आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून व गेल्यावर्षी बैठकीत ठरल्यानुसार मनपा मार्फत दरमहा ७५.०० लक्ष रूपये विज बिलापोटी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे अदा होतात.

शहराच्या पाणी पुरवठयातुन करापोटी ग्राहकाकडून मनपाकडे दरवर्षी ७ ते ८ कोटी जमा होतात यातुन इतर खर्च भागवून विजबिलाची रक्कम अदा करणे ही एक अवघड बाब आहे. तथापि याचा विचार प्रामुख्याने करणे जरूरीचे आहे.

विजबिला पोटी दरमहा कमीत कमी रू.१.०० कोटी अदा करावेत अशी म.रा.वि.मंडळाची तसेच मा. अशोक बसाक अध्यक्ष मराविमं यांची मागणी आहे. मनपाकडे पंपींग पोटी विजेचे बिल दरमहा १.८० ते २.०० कोटी इतके येते. याशिवाय म.रा.वि.मंडळाची रूपये ७३.५४ कोटी इतकी थकबाकी आहे.

तथापि मनपास प्राप्त होणारे पाणीपटट्रीपासूनचे उत्पन्न व पाणीपुरवठा योजनेवर होणारा खर्च लक्षात घेता वाढीव २५ लक्ष अदा करणे शक्य नाही. पाणी पुरवठा योजनेवर मनपास दरवर्षी १८ कोटी तोटा सहन करावा लागतो. यास्तव पाणीपटट्री वाढ करणे बाबत वेळोवेळी प्रशासनाने सुचविले आहे. तथापि अपेक्षित पाणीपटट्री वाढ मान्य करण्यांत आलेली नाही. त्यामुळे तीकडे उत्पन्न लक्षात घेता १ कोटी म.रा.वि.मंडळ यांचे मागणीनुसार १ कोटी प्रतीमहा अदा करावयाचे झाल्यास अतिरिक्त ३ कोटी बोजा वाढणार आहे. व ही रक्कम विकास कामाच्या रक्कमेतून वळती करावी लागणार आहे. उपरोक्त बाबी लक्षात घेवून म.रा.वि.मंडळ यांना १ कोटी अदा करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.गजानन बारवाल : देयकाची रक्कम वरचेवर वाढत आहे. आपणांस हे बिल देणे आवश्यक आहे.

मा.महापौर : एम.एस.ई.बी.ला पुर्वीप्रमाणेच रक्कम अदा करण्यांत येणार आहे. पुढील बिले देण्याची तरतुद होण्यासाठी शेतीच्या दराने विद्युत देण्यांत यावे यासाठी मा.मुख्यमुंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांना भेटण्यासाठी एक कमेटी स्थापन करण्यांत येते. त्यात मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली मा.उपमहापौर, मा.सभागृहनेता, मा.सभापती, स्थायी समिती, मा.विरोधी पक्ष नेता, स.स.श्री.गिरजाराम हाळनोर स.स.श्री.भगवान घडामोडे, स.स.श्री.नरेंद्र पाटील , स.स.श्री.अ.रशिद खॉंन (मामू) स.स.श्री.कचरू नवपुते, स.स.श्री.गौतम खरात, स.स.श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचा कमेटीमध्ये समावेश राहील.

**ठराव :**

प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जायकवाडी जालशय ही या शहराच्या जमिन पातळीपेक्षा खुपच (१६० मीटर) खाली असल्याने आणि या जलाशया शिवाय पाणी पुरवठयाबाबत इतर कोणताही पर्याय नसल्याने औरंगाबाद शहरासाठी प्रस्तावात

दर्शविल्याप्रमाणे विविध प्रकारच्या २१ पंपाद्वारे उपसा करून पाणी पुरवठा करावा लागत आहे.आणि यासाठी विज बिलापोटी प्रशासनास दरमहा अंदाजे २.०० कोटी इतके देयक येते.या उलट पाणीपटट्ी पासून मिळणारे वार्षिक उत्पन्न विचारात घेता बराच यतोटा सहन करावा लागत आहे. महानगरपालिका पाणी पुरवठा ही मुलभुत सेवा, म्हणून पुरवित आहे. सबब पाण्याचा उपसा करणाऱ्या पंपाना शेतीच्या दराने वीज बीलाची आकारणी करण्यांत यावी अशी मागणी शासनाकडे करण्यासाठी खालील प्रमाणे समितीचे गठण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते

| | | |
|---|---|---|
| १ | मा.महापौर | समितीचे अध्यक्ष |
| २ | मा.उप महापौर | समितीचे सदस्य |
| ३ | मा.सभापती स्थायी समिती | समितीचे सदस्य |
| ४ | मा.सभागृह नेता | समितीचे सदस्य |
| ५ | मा.विराधी पक्ष नेता | समितीचे सदस्य |
| ६ | स.स.श्री.अ.रशिद खॅान (मामू) | समितीचे सदस्य |
| ७ | स.स.श्री.नरेंद्र पाटील | समितीचे सदस्य |
| ८ | स.स.श्री.गौतम खरात | समितीचे सदस्य |
| ९ | स.स.श्री.कचरू नवपुते | समितीचे सदस्य |
| १० | स.स.श्री.भगवान घडामोडे | समितीचे सदस्य |
| ११ | स.स.श्री.गिरजाराम हाळनोर | समितीचे सदस्य |
| १२ | स.स.श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय | समितीचे सदस्य |

या उपसमितीने पाणी पुरवठयाच्या उपसासाठी वापरण्यांत येणाऱ्या पंपाना शेतीसाठी उपयोगात येणाऱ्या पंपाना ज्या दराने वीज दराची आकारणी करण्यांत येते. त्याच दराने या पंपानाही वीजबीलाची आकारणी करणे बाबत सविस्तर निवेदन तयार करून प्रत्यक्ष भेट देवून महानगरपालिकेची मागणी त्यांच्याकडे सादर करावी व विजदर कमी करण्याबाबत प्रयत्न करावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३/३**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाचे पत्रक दिनांक १० ते ९९ अन्वये घन कचरा व बायोमेडीकल वेस्ट साठी डलसॅटेक्सस या अमेरिकेच्या एका शहरात एक जागतिक किर्तीची कार्यशाळा व प्रदर्शन दिनांक ८ ते १० जुन ९९ रोजी भरणार असून महाराष्ट्र शासन व यु.एस.ई.पी. तर्फे आयोजित केलेली असून यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे दोन जेष्ठ अधिकारी पाठवावेत त्यासाठी मा.श्री.डी.एन.वैद्य, आयुक्त व डॉ.दिनकर देशपांडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे नांवे प्रस्तावित करणे योग्य. महानगरपालिकेतर्फे जाणे येण्याचा खर्चासाठी रूपये साठ हजार प्रत्येकी येणार असून हा खर्च महानगरपालिकेने करावयाचे आहे. व इतर येणारा सर्व खर्च शासन युएसएड फंउ मधून करणार आहे.

तरी वरील कार्यशाळेस डल्स् (अमेरीका) येथे हजर राहण्यास मा. श्री.डी.एन.वैद्य, आयुक्त,व डॉ.दिनकर देशपांडे , आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना अमेरिकेस जाणेसाठी व कार्यशाळेस हजर राहणेसाठी मंजुरी दयावी. तसेच येणाऱ्या खर्चास रूपये एक लाख तीस हजाराची मंजुरी देणेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केल्या प्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाचे पत्रक दिनांक १० मे ९९ अन्वये घनकचरा व बायोमेडीकल वेस्टसाठी डल्स् टेक्सस या अमेरिकेच्या एका शहरात जागतीक किर्तीची कार्यशाळा व प्रदर्शन दिनांक ८ मे, १० जून ९९ रोजी भरणार असून महाराष्ट्र शासन व युएसईपी तर्फे आयोजित केलेल्या कार्यशाळेस महापालिकेतर्फे मा.डी.एन.वैद्य ,आयुक्त व डॉ.दिनकर देशपांडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यांत येते. यासाठी येणारा खर्च रूपये एक लाख पंचवीस हजार जाणेयेणे साठी मंजुर करण्यांत येतो. व तसेच डल्स् (अमेरीका) परदेशास जाण्यास व कार्यशाळेस हजर राहण्यास मा. डी.एन.वैद्य,आयुक्त, व डॉ.दिनकर देशपांडे ,आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच खर्चासाठी मंजुरी देण्यांत येते. नियमानुसार

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४/४**

बशिरा खाँन पि.अलिम खाँन यांना सर्व स.नगरसेवकांनी आपल्या नगरसेवक निधीतून हदयरोगाच्या उपचारासाठी एक एक हजार रूपये आर्थिक मदत म्हणून दिलेले आहे. असे एकूण २५०००/- रू. रक्कम २५०००/- आर्थिक मदतीचे पत्र मिळाले आहे. परंतु आपल्या महानगरपालिका नियमानुसार फक्त रूपये १५०००/- मंजुर करण्याची तरतुद आहे. या प्रकरणात आपण रक्कम रूपये २५,०००/- ची मंजुरी दयावी म्हणजे संबंधिताच्या रोगाच्या उपचारासाठी आर्थिक मदतीस सोयीस्कर होईल.

तरी कृपया सदरील प्रकरणास विशेष बाब म्हणून मंजुरी करण्यात यावे.

सुचक : श्री.रशिद खान (मामू)
अनुमोदक :श्री.मोहसिन अहमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बशीर खाँन पि. अलिमखाँन यांना नगरसेवक स्वेच्छा निधीतून हदय रोगाच्या उपचारासाठी विशेष बाब म्हणून रू.२५०००/- अर्थसहाय्य करण्यांस स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/५ :**

स्व.मिनाताई ठाकरे स्मरणार्थ २१ वी ज्युनिअर राष्ट्रीय खो-खो स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत. त्यासाठी नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतून स्व.मर्जीने ५,०००/- (पाच हजार) रूपये मदत देण्यांत यावी व रूपये मर्यादा दोन लाख पर्यंत राहील.

सुचक :श्री.अविनाश कुमावत
अनुमोदक : श्री. यशोदा वाडेकर
श्री.रशिद खान (मामू)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वर्गीय मिनाताई ठाकरे स्मरणार्थ आयोजित २१ वी ज्युनिअर राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी स.नगरसेवक यांच्या स्वेच्छेने त्यांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी ५०००/- (पाच हजार)प्रमाणे विशेष बाब म्हणून एकूण रक्कम रूपये २,००,०००/- (दोन लाख) मर्यादेपर्यंत सहाय्य करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६/६**

कार्यकारी अभियंता (पापू) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, यावर्षी औरंगाबाद शहर व परिसरात समाधानकारक पाऊस झालेला आहे. परंतु औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांच्या वस्त्यांची दिवसेंदिवस झपाट्याने वाढ होत आहे. काही नविन वस्त्यांना नळाद्वारे पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. तसेच शहराला नळाद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठयात खंड
झाल्यास टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही व नागरिकांची गैरसोय होते.

नागरी क्षेत्रात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ महाराष्ट्र शासनाच्या तातडीच्या पाणीपुरवठा योजने अंतर्गत महानगरपालिकेस २५ लाखा पर्यंत शासकिय अनुदान मिळणार आहे. यात विधन विहीर खोदणे ,हात पंप बसविणे, विद्युत पंप बसविणे, पाईप लाईन टाकणे इत्यादी कामाचा समावेश आहे.

शासनाच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहर सिडको भागात एकूण ५० विधेन विहिरी खोदुन त्यात हात पंप बसविण्यांच्या कामासाठी भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाच्या दरानुसार रू.१३,६३,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करून दिनांक १२.२.९९ रोजी शासनाकडे अनुदान प्राप्तीसाठी प्रस्ताव पाठविण्यांत आलेला आहे. प्रस्तावास अनुसरून शासनाने खालील अटींची पुर्तता करण्यांबाबत कळविले आहे.

१ योजनेच्या १०% लोकवगर्णी देण्याबाबतचा ठराव.

२ भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून विधन विहीरीची स्थळ निश्चिती अहवाल.

वरील अटीनुसार योजनेच्या १०% रक्कम म्हणजे रू.१,३६,३२५/- मनपास खर्च करावा लागेल तसेच स्थळ निश्चितीसाठी भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागास रक्कम रूपये २१,२५०/- अदा करणे आवश्यक आहे. तरी योजनेच्या १०% रक्कम रूपये १,३६,३२५/- च्या खर्चास व सर्वेक्षण फिस रक्कम रूपये २१,२५०/- भू.स. व वि.यो.विभागास अदा करणेस मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रशिद खान (मामू) : कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगापोटी रू.१०००/- देण्यांत येईल असे ठरले होते. त्यांची अंमलबजावणी का होत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : एकदा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्यांची अमलबजावणी करण्यांत यावी.

मा.महापौर : ही बैठक संपल्यानंतर मा. आयुक्त यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल व झालेल्या ठरावाची अंमलबजावणी केली जाईल.

सर्वांचे आभार मानुन दुपारी ४.१५ वाजता बैठकीचे कामाकाज संपल्याचे मा. महापौरांनी घोषित केल्यानुसार जनगनमन या राष्ट्रगीताने बैठक समाप्त इ ााली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाचा पाणीपुरवठा योजने अंतर्गत ५० विंधन विहिरी खोदुन त्यावर हातपंप बसविण्याच्या कामासाठी तयार केलेले रूपये १३,६३,२५०/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच शासन अनुदान प्राप्तीसाठी या योजनेच्या १०% रक्कम रूपये १३,६३,२५०/-महानगरपालिकेने खर्च करण्यांस व सर्वेक्षण फीस रू.२१,२५०/- भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे भरणा करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

### दिनांक २५-५-९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

मंगळवार दिनांक २५-५-९९ रोजी दुपारी १२.३० वाजता मा. महापौर सुदाम सोनवणे यांच्या अध्यक्षतेखलील औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभेस महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात "वंदे मातरम" या गिताने सुरूवात झाली या बैठकीस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | स.स.श्री.केनेकर संजय किशनराव | मा.उप महापौर |
| २ | स.स.श्री.ढगे नरसिंग मूरलीधर | स.सदस्य |
| ३ | स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव | स.सदस्य |
| ४ | स.स.श्री.अफसरखान यासिन खॅा | स.सदस्य |
| ५ | स.स.श्री.लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | स.सदस्य |
| ६ | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | स.सदस्य |
| ७ | स.स.सौ.साजेदा बेगम | स.सदस्य |
| ८ | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | स.सदस्य |
| ९ | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | स.सदस्य |
| १० | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | स.सदस्य |
| ११ | स.स.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | स.सदस्य |
| १२ | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | स.सदस्य |
| १३ | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | स.सदस्य |
| १४ | स.स.सौ.पदमा बाबुराव शिंदे | स.सदस्य |
| १५ | स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | स.सदस्य |
| १६ | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | स.सदस्य |
| १७ | स.स.सौ.धनश्री अशोक विसपुते | स.सदस्य |
| १८ | स.स.सौ. फरहद बानो भ्र.मो.नवाज | स.सदस्य |
| १९ | स.स.श्री.फजलउल्लाखॅांन अजमत उल्लाखॉन | स.सदस्य |
| २० | स.स.श्री.अजिज खॅांन गणी खॅा | स.सदस्य |
| २१ | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | स.सदस्य |
| २२ | स.स.श्री.महंमद मुस्ताक अहेमद | स.सदस्य |
| २३ | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम अ.रहेमान | स.सदस्य |
| २४ | स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव | स.सदस्य |
| २५ | स.स.श्री.हाजी मोहसिन अहेमद | स.सदस्य |
| २६ | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखाद्यीन | स.सदस्य |
| २७ | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर | स.सदस्य |
| २८ | स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | स.सदस्य |
| २९ | स.स.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | स.सदस्य |
| ३० | स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | स.सदस्य |
| ३१ | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | स.सदस्य |
| ३२ | स.स.श्री.हमीदउद्यीन ताबा फसीयोद्यीन | स.सदस्य |
| ३३ | स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | स.सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३४ | स.स.श्री.स.अ.इकबालोद्यीन स.मो.कुतुबुद्यीन | स.सदस्य |
| ३५ | स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण | स.सदस्य |
| ३६ | स.स.श्री.लाहोट रमेश दिपचंद | स.सदस्य |
| ३७ | स.स.सौ.दलाल लता श्रीनीवास | स.सदस्य |
| ३८ | स.स.श्री.ओक जयवंत केशवराव | स.सदस्य |
| ३९ | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | स.सदस्य |
| ४० | स.स.सौ.धांडे शकुंतला हरीदास | स.सदस्य |
| ४१ | स.स.श्री.अब्दुल रशिद खॉन (मामू) | स.सदस्य |
| ४२ | स.स.सौ.आव्हाड सविता संजय | स.सदस्य |
| ४३ | स.स.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | स.सदस्य |
| ४४ | स.स.श्री.रशिद अब्दुल सत्तार | स.सदस्य |
| ४५ | स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | स.सदस्य |
| ४६ | स.स.श्री. विखारोद्यीन पि.खुदबोद्यीन | स.सदस्य |
| ४७ | स.स.श्री.गंगाधर सुखदेव गाडे | स.सदस्य |
| ४८ | स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | स.सदस्य |
| ४९ | स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव | स.सदस्य |
| ५० | स.स.सौ.राधाबाई तळेकर | स.सदस्य |
| ५१ | स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास | स.सदस्य |
| ५२ | स.स.श्री.कचरू चंद्रभान नवपुते | स.सदस्य |

सभेची सुरूवात "वंदमातरम्" या गिताने झाली. मा.महापौरांनी घेषित केले की, कोरम अभावि सभा ३० मिनिटांसाठी तहकुब करण्यांत येत आहे. १२.३० वाजता तहकुब झालेली सभा दुपारी १.१५ वाजता परत सुरू झाली.

**<u>संवाद</u>**

श्री.अफसर खान : काल ज्या ३ अधिकारी, कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यांत आले आहे त्याबाबत खुलासा व्हावा. याच अनुषंगाने इतर विभागांचीही चौकशी होणार काय याचीही माहिती देण्यांत यावी.

मा.महापौर : आज ज्या गोष्टीवर बैठक बोलविण्यात आली आहे. त्याच मुद्यांवर प्रथम चर्चा करण्यांत यावी. मा.आयुक्त इतर विभागाची चौकशी करतील.

श्रीमती नुरजहाँबेगम : प्रभाग निहाय चर्चा घडवून आणण्यात यावी.

श्री.मोहसीन अहमद : प्रभाग निहाय दोन्ही विषयांवर एकदाच चर्चा घडवून आणण्यात यावी.

श्री.अफसर खान : एकाएकास बोलण्याची संधी देण्यात यावी. प्रभाग निरहाय बोलण्यास खुप वेळ लागेल.

श्री.गौतम खरात : आजची बैठक केवळ पाणीव विद्युत या विषयावरच का बोलवण्यात आली. शहरात पाण्याची व्यवस्था बरोबर नाही काय ? शहरात लाईटस्चे काही प्रश्न आहेत काय ? याचा प्रथम खुलासा व्हावा. अधिकारी काम करत नसतील तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत यावी. आजची बैठक बोलावण्यामागील निश्चित उद्येश काय याचा प्रथम खुलासा व्हावयास हवा.

मा.महापौर : अशातच जनात दरबारचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पाणीपुरवठा व विजेच्या बऱ्याचश्या तक्रारी होत्या. यासाठी स.सदस्यांचे विचार ऐकून घेणे

व मत जाणून घेण्यासाठी आजची विशेष सर्वसाधारण सभा बोलावलेली आहे.

श्री.प्रभाकर विधाते : अशातच गुरू हनुमान पहेलवान यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

श्री.प्रकाश निकाळजे : माझे अनुमोदन आहे.

(गुरू हनुमान पहेलवान यांना सभागृहात दोन मिनीटे उभे राहून व स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

**विषय क्र.३७/१**

औरंगाबाद शहरातील पाणीपुरवठा व विद्युत व्यवस्थे बाबत विचार विनिमय करणे आणि निर्णय घेणे बाबत.

**<u>संवाद :</u>**

श्री.मोहसिन अहमद : आजची बैठक बोलावली या बद्ल आपले अभिनंदन करतो. मागील १०-१२ वर्षाच्या अनुभवावर मी सांगु इच्छितो की, पाणी पुरवठया बाबतची बैठक ही जानेवारी-फेब्रुवारी मध्ये घ्यावयास पाहीजे होती. पाण्याची व्यवस्था करणे ही मनपाची जबाबदारी आहे. उन्हाळयापुर्वी करावयाची कामे मनपाने केली नाहीत. आता पावसाळा सुरू होत आहे व आम्ही पाण्याची बैठक घेत आहोत. शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. विशेषत: रोशनगेट भागात पाण्याचा मोठा प्रश्न आहे या भागात ७-८ नगरसेवक येतात लोकसंख्येच्या प्रमाणात या भागात टाक्या बांधलेल्या नसल्याने पाणी अपूरे पडते. पाण्याच्या टाक्यांवरील टेलिफोन्स काढून घेतल्यामुळे पाणी आले नाही तर टाकीवर फोन करता येत नाही. सर्व टाक्यांवर फोन बसवण्यांत यावेत. व त्याचा गैरवापर होणार नाही याची दक्षता घ्यावी. टाकण्यांत आलेल्या पाईप लाईन्स निकृष्ट दर्जाच्या आहेत, त्यामुळे जागोजागी लाईन्स फुटतात. पाईप्स आयएसआय दर्जाचे आहेत काय याची चौकशी व्हावी. पाणी पुरवठयाचे लाईनमन वेळेवर डयुटीवर येत नाहीत. जीन्सी पाण्याच्या टाकीवर तीन पैकी एक मोटार चालू आहे. ही टाकी दिवसातून सहा वेळा भरली जाते. ही टाकी खूप जुनी आहे. येथील पंप हाऊस खूप जुना आहे. या भागात १-२ टाक्या नव्याने बांधण्यात याव्यात व पुढील ५-१० वर्षाचे नियोजन करण्यात यावे. रोषनगेटवर एक ते दिड वर्षापूर्वी बोरींग केलेले आहे. परंतू वारंवार सांगूनही तेथे ऑपरेटरची व्यवस्था होत नाही. ज्यांनी अनाधिकृत नळ कनेक्शन्स घेतल्यांवर काय कार्यवाही केली जाणार आहे. नळांना तोटया लावलेल्या नाहीत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : केवळ प्रशासनावर ठपका ठेवू नये. पाणी पुरवठयात येणाऱ्या तांत्रिक अडचणीचाही विचार करावयास पाहिजे . दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी हे योग्यच.

श्री.प्रभाकर विधाते : नक्षत्रवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यंतची जलवाहिनी नेहमी फुटत असते. या जलवाहिनीचे आयुष्यसंपलेले आहे. यामुळे नक्षत्रवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यंत परत जलवाहिनी टाकावी लागणार आहे. या बाबत मनपाने काही नियोजन केलेले आहे काय ? लाईनमनच्या नेहमी बदल्या होतात त्यामुळे त्यांना वॉल्व

लवकर सापडत नाहीत. त्यांच्या नेहमी बदल्या होण्याचे कारण काय ? नागरिकांना पाण्यासाठी मोटारी लावू देवू नये. का.अ.यांनी संबंधितांना ताकीद दयावी.

श्रीमती लोखंडे रूख्मणबाई : भावसिंगपूरा प्रभागावर नेहमीच अन्याय होत आलेला आहे.या भागास सापत्न वागणूक दिली जाते. १९९५ पासून पाण्याचे दुर्भीक्ष आहे. राणा पेट्रोल पंपाच्या बाजूला टाकी बांधलेली आहे. पण त्यात पाणी नाही. सुंदरनगर, द्वारकानगर या टाकीद्वारे पाण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. याबाबत मी वारंवार पत्र देत आहे. परंतु त्यावर विचार होत नाही. भावसिंगपुऱ्यात , भुजबळनगर भागात एक खाजगी विहिर आहे. ती सध्या ढासळली आहे. यासाठी या भागात एखादा हातपंप बसविण्यात यावा. सुंदरनगर भागातून हातपंप बसविण्यात यावा. सुंदरनगर भागात स्वेच्छा निधीतून हातपंप बसविण्यात यावा. या भागातील स्मशानभूमीत लाईटची व्यवस्था नाही. याबाबत वेळोवेळी पत्र दिले आहेत. परंतू त्या वर कार्यवाही होत नाही. सुंदरनगर भागात १२ पोलची आवश्यकता आहे. ते बसविण्यात यावेत. भावसिंगपूऱ्यात १२ विद्युत पोल बसविण्यासाठी २.६० लाख रूपये मनपाने विद्युत मंडळाकडे भरलेले आहेत. ते लवकरात लवकर बसविण्यात यावेत.

श्रीमती साजेदा बेगम : खुशबु सोसायटीस अत्यंत कमी दाबाने पाणी येते. याबाबत निवेदनही दिलेले आहे. त्यावर कार्यवाही व्हावी. प्रभाग क्र.४ मध्येही कमी दाबाने पाणी येते.

मा.महापौर : आपले पत्र संबंधित विभागाकडे पाठवले आहे. त्यावर कार्यवाही होईल.

श्री.गौतम खरात : आपण उशीरा का होईना अत्यंत महत्वाच्या विषयावर बैठक बोलावली आहे. आजची बैठक बोलावण्याचे कारण काय ? जनता दरबारात नागरिकांनी केलेल्या तक्रारीवरून ही बैठक बोलावयाचे मा. महापौरांनी सांगितले. फेब्रुवारी ते मार्च ९९ या काळात किती वेळा पाणी पुरवण्यात व्यत्यय आला किती वेळा विजपुरवठा खंडीत झाला याचा खुलासा व्हावा. या शहरात आपण १०० एम.एल.डी. पाणी देतो. परंतु शहराची १६० -१७० पाण्याची गरज आहे. परंतु आपल्याकडे पुरेसी साधने नाहीत. औरंगाबाद शहरास दोन वेळा पाणी पुरवठा व्हावा हे शहर वासीयांचे स्वप्न आहे. आपण आपल्या कारकीर्दित दोन वेळा पाणी पुरवठा करणार की नाही हा मुद्या स्पष्ट व्हावा. पाणीपटट्ीपोटी आपण रू.१०००/- घेतो. यातून एक स्टॅप देण्यासाठी आपणास उत्पन्न किती मिळणे व खर्च किती येतो.याचीही माहिति द्यावी.यापुर्वी ही स.श्री.रशिद मामु महापौर असतांना अशीच बैठक झाली होती. या बैठकीतही सांगितले गेले की, औरंगाबाद शहरात गुरूत्वाकर्षण पध्दतीने पाणीपुरवठा होत नाही, त्यामुळे विजेचे देयक जास्त येते. मनपास शेतीच्या दराने विजचे देयक आकारावे म्हणून शासनाकडे निवेदन दिलेले आहे. तथापी यावर काहीही कार्यवाही झ ाालेली नाही. आपण परत शासनाकडे निवेदन देणार का ? सध्या शहरात व्यवस्थीत पाणीपुरवठा होत आहे. वृत्तपत्रातून काही किरकोळ स्वरूपाच्या तक्रारी येतच असतात जे काय करत नसतील त्या अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात. प्रशासन सुरळीत चालवायच असेल तर काही बदल्या होणे आवश्यकच आहे.

मा.महापौर : १० मे ९९ रोजी मा. मुख्यमंत्री औरंगाबाद भेट देणार आहेत. मा. मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. ही समिती मा.मुख्यमंत्र्यांना या संदर्भाने निवेदन सादर करेल. मा.मुख्यमंत्री महोदय ३० मे रोजी औरंगाबादला आले नाहीत तर मुंबईस जावून त्यांची भेट घेतली जाईल.

सौ.रजनी जोशी : जनतेच्या प्रश्नांवर बैठक बोलावल्या बद्‌ल मा.महापौरांचे अभिनंदन सिडको-हडको भागात नेहमी पाण्याचा प्रश्न असतो. या भागात पाणी येण्याची निश्चित वेळ नाही. या वॉर्डात पाण्याची निश्चित वेळ नाही. काही भागात नियमित पाणी पुरवठा होतो तर काही भगात नेहमीच खंडित पाणीपुरवठा होतो. पाण्याची एकच वेळ असावी व ती सकाळची असावी.

श्री. जयवंत (बंडू) ओक : शहरातील पाणी पुरवठ्याबाबत विशेष असा प्रश्न नाही. नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक ही जलवाहिनी मनपाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. परंतु ही लाईन नेहमीच फुटत असते यामुळे मनपाची बदनामी होते. शहरात दोन-दोन दिवस पाणी पुरवठा होत नाही. सदरची जलवाहिनी मनपाकडे हस्तांतरित झाल्यापासून किती वेळा फुटली या ठिकाणी नविन जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव मनपाकडे आहे काय. महाराष्ट्र शासनाने टँकरमुक्त महाराष्ट्र योजनेतून मनपास २५ लाख रुपये शासकीय अनुदान मिळणार आहे. १२ लाख रुपयातून काही जलकुंभ अथवा संप हाऊस बनविता येतील काय याचा विचार व्हावा. एन-८ भागातील सोसायट्यांमध्ये २० वर्षापासून २ व ३ इंची व्यासच्या जलवाहिन्या आहेत. मोठ्या व्यासाच्या लाईन्स टाकल्यास या भागातील पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.

सौ. विमल मुंडलिक : माझ्या वॉर्डात टाकलेली पाण्याची पाईप लाईन ही बरोबर नाही. यात बऱ्याच ठिकाणी लिकेजेस आहेत. मनपाने यावर १३ लाख रुपये खर्च केलेले आहेत. याची चौकशी व्हावी.

सौ. शिलाताई गुंजाळे : सदरची बैठक बोलाल्या बद्दल मा. महापौरांचे अभिनंदन. शहरात बऱ्याच वसाहती वाढलेल्या आहेत या वसाहतीतील नागरिक २५% रक्कम भरण्यास तयार आहेत. परंतु प्रशासनाकडून अशी माहिती दिली आहे की, जोपर्यंत ३७ कोटीची योजना मंजूर होत नाही तोपर्यंत या वसाहतींना पाणी देता येणार नाही. याबाबत सभागृहात माहिती दिली जावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : मागील अर्थसंकल्पीय बैठकीमध्ये नारेगांव, ब्रीजवाडी, विठ्ठलनगर, राजेंद्रनगर, मसनतपुर, पॉवरलूम, चिकलठाण, मुंकूदवाडी, अशा भागात मनपा अस्तित्वात आल्यापासून पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला नाही. या भागास पाण्यासाठी सिडकोवर अवलंबून रहावे लागते. २० लाख लिटर्स क्षमतेचे स्टोअर बांधण्यात यावे अशी अर्थसंकल्पीय बैठकीत मी सूचना केली होती परंतु तयावर काहीही कार्यवाही झालेली नाही. नारेगांव, ब्रिजवाडी भागात फक्त १०-१२ मिनिटे पाणी दिले जोते. ब्रिजवाडी भागात १९९० मध्ये पाण्याची टाकी बांधली परंतु मागील २ वर्षापासून ती रिकामी आहे याचे कारण काय? या भागासाठी १५०-२०० इंच व्यासाची जलवाहिनी टाकण्यात यावी. अन्यथा आम्ही रु. १०००/- पाणी पट्टी भरणार नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : सदरची बैठक बोलवल्याबद्दल मा. महापौरांना धन्यवाद. लोकसंख्येच्या प्रमाणात पाण्याची विभागणी केली तर सिडको भागास २५-२८ एमएलडी पाणी द्यावयास हवे. अशा प्रकारचा ठरावही यापूर्वी झालेला

आहे. परंतु आजही प्रमाणात पाणी सिडको भागास दिले जात नाही २८ एमएलडी पाणी सिडकोस दररोज दिल्यास पाण्याचा प्रश्न सुटेल. विद्युत पुरवठा खंडित झाल्यास तेंव्हा सिडकोसच पाणी पुरवठा होत नाही. यासाठी व्यवस्थित नियोजन होणे आवश्यक आहे. या भागास अनेक वसाहती निर्माण झालेल्या आहेत. या वसाहतींना मनपाने पाणी पुरवठा करावयाचा की नाही याचाही विचार व्हावयास पाहिजे. हर्सूल मार्केट कमिटी, नारेगांव, मसनतपुर यांना सिडकोच्या मुख्य जलवाहिनीवरून पाणीपुरवठा केला जातो. यामुळे या दोन्हीही भागांना पाणी मिळत नाही या भागसाठी स्वतंत्र लाईन्स टाकण्यात याव्यात ३७ कोटी रुपयांची योजना कार्यान्वित होईपर्यंत ह्या समस्या येणारच आहेत. एन-८, एन-११, एन-१२ भागात जलकुंभ बांधण्यात यावेत. याबाबतचे बजेट प्रोव्हीजन व प्रस्ताव आगामी सर्वसाधारण सभेत सादर करण्याबाबत सूचना द्याव्यात.

सौ. पदमा शिंदे : आजच्या बैठकीबाबत मा. महापौरांचे अभिनंदन एन-५ टाकीतील फोन बंद आहे. त्यामुळे पाणी येणार नाही.त्या दिवशी नेमका कोणास संपर्क साधावा एन-७ टाकीवर फोन बसवावा. एन-९ भागात नविन पाईप लाईन टाकलेली आहे. या लाईनवरून कनेक्शन देण्यात यावेत. चिश्तिया कॉलनी भागात मी माझ्या स्वेच्छा निधीतून एक लाखाची पाईप लाईन टाकलेली आहे.

श्री.सुभाष टाकळकर : आजच्या बैठकीत आयोजनाबाबत मा.महापौरांचे अभिनंदन, सिडको भागास २८ एमएलडी पाणी पुरवठा केला तर पाण्याचा प्रश्न सुटू शकेल काही लोक नळास विद्युत मोटारी लावतात. त्यामुळे इतरांना पुरेसे पाणी मिळत नाही अशा मोटारी जप्त करण्यांत याव्यात. एन-८ भागातील सोसायटयांचा प्रश्न या भागात मोठया व्यासाची लाईन टाकण्यात यावी. या सोसायटयांच्या अंतर्गत जलवाहिन्या मनपाने टाकलेल्या नाहीत. माझ्या वार्डात पाण्याचा प्रश्न नसल्याने अधिकाऱ्यांचे कौतूक करतो. अशा अधिकाऱ्यांना इन्क्रीमेंट देण्यांत यावे.

मा.महापौर : जनता दरबारात असा अनुभव आला की, बऱ्याचशा अधिकाऱ्यांच्या कामाबाबत जनतेने त्यांचे कौतूक केले तर काही अधिकाऱ्यांच्या कामाबाबत तक्रारीही केल्या. ज्या अधिकाऱ्यांनी चांगले काम केले त्यांच्याबद्यल निश्चित विचार केला जाईल.

श्रीमती फरहत बानो : आझाद चौक ते राम मंदिर रस्त्यावरील दाने / तीन पोलवरील तिसरे वायर टाकण्यात यावे. हमीदकॉलनी भागात पाण्याची लाईन टाकलेली नाही. ती टाकण्यात यावी. विजेचे प्रश्न आहेत. पाण्याची वेळ एक असावी. विजेची कामे दोन दिवसात व्हावीत गल्ली नं.१२ मध्ये दोन पोलवरील वायर तात्काळ ओढण्यात यावे. राममंदिर रस्त्यावरील विद्युत दिवे दिवसभर चालू असतात. त्यावर चौथी वायर टाकली जावी.

श्रीमती आबेदा बेगम : माझ्या वार्डात पाण्याचा प्रश्न नाही. पाणी आले नाही तरी टँकर येतो. लाईटची परिस्थिती फार बिकट आहे. वार्डात २१ पोल उभे केले आहेत परंतू त्यावर लाईट नाही.

श्री.मुश्ताक अहेमद : शहरात सर्वात जास्त समस्या लाईट व पाण्याच्या आहेत. पाण्याचा साठाही भरपूर आहे. परंतू विद्युत पुरवठयामुळे पाणी प्रश्न निर्माण होतात. पाण्याच्या हद्यीपर्यंत विजेची कमतरता पडणार नाही. यासाठी आपण आपला राजकीय प्रभाव उपभेगात आणावा. शहरात येणाऱ्या मुख्य पाईप लाईन

वरून डायरेक्ट कनेक्शन दिले आहेत. ते काढून टाकण्यांत यावेत. यामुळे पाण्याचे प्रेशर कमी होणार नाही. माझा भाग उंचावर आहे व जिन्सी टाकी थोडी खाली आहे. माझ्या वॉर्डात दररोज ३०-३५ मिनीटे पाणी येते पाण्याची वेळ निश्चित असावी. लोकसंख्या वाढलेली आहे. परंतु पाणी पुरवठा लाईन्स कमी व्यासाच्या आहेत . त्या मोठया व्यासाच्या टाकल्या जाव्यात. भागातील ९०% लाईट्स नेहमी बंदच असतात. रोषनगेटचा सेंटर लाईटस् नेहमी बंदच असतात. विद्युत लाईनमन काम करत नाहीत. बंद असलेले लाईट्स् तीन दिवसांचे आत चालू करावेत.

श्रीमती नुरजहाँबेगम : आजच्या बैठकी बाबत मा. महापौरांचे अभिनंदन. अशा प्रकारच्या बैठका नेहमी होतात परंतु त्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी होत नाही. पाण्याचा टॅक्स वाढतो. परंतू सुविधा त्या प्रमाणात मिळत नाहीत पाणी येणार नसेल तर नगरसेवकांना सूचना दिली पाहिजे. जिन्सी टाकीवर फोन नाही, मोटारी बरोबर नाहीत, येथे दोन मोटारे बसवाव्यात. पंप दुरूस्त करून घ्यावेत. टयुब लाईटस् लावल्यानंतर २-३ दिवसच चालतो.या ऐवजी काही सोडियम व्हेपर अथवा मर्क्यूरी बसवण्यात यावेत. पोलवर कंझ्युमर वायर टाकल्यास लाईटस् लावणे सोयीचे होईल. माझ्या वार्डात २० पोल पाहिजेत. एक उप अभियंता विद्युत विभागासाठी देण्यात यावा. सांगूनही हँडपंप लावलेले नाहीत. माझ्या वार्डात २ हँउपंप लावण्यात यावेत. व वार्डातील विहिरीची दुरूस्ती करण्यांत यावी.

श्री.वसंत देशमुख : अधिकाऱ्यांनी विविध कामांबाबत सदैव सहकार्यच दिलेले आहेत. शहरात दैनिक सेवा पूरवाव्या लागतात. मागील वर्षी पाऊस चांगला झाला परंतू भविष्याचे सांगता येत नाही. शहरात वारंवार कमी पाणी पुरवठा होतो. माझ्या वार्डही त्यात सामील आहे. जिन्सी पाणी पुरवठा टाकीचे प्रश्न आहेत.

श्रीमती मोहसिंना बिल्कीस : मा.महापौरांचे आजच्या बैठकीबाबत अभिनंदन. अन्हाळयात पाण्याचा प्रश्न येतो याच काळात पाईप लाईन फुटतात याची चौकशी व्हावी. पाण्याची एक वेळ नाही नक्की किती वाजता पाणी येणार याची माहिती दयावी जिन्सी ,शहागंज,पाण्याच्या टाकीवर फोन बसवावा . शहाबाजारला पूर्वी नहरे अंबारीचे व हर्सूलचे पाणी असतांना दोन वेळा पाणीपुरवठा होत होता. शहाबाजार, भोईवाडा मध्ये २ ते ३ इंची पाईप लाईन आहे. वार्डाची लोकसंख्या वाढलेली आहे. त्यामुळे मोठया व्यासाच्या लाईन टाकण्यात याव्यात. माझ्या वार्डात एक हातपंप आहेत.मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे दोन हातपंप बसविण्यात यावेत. माझ्या वार्डातील सार्वजनिक विहीर साफ करवून घ्यावी म्हणजे जनतेस तिचा फायदा होईल. गल्ल्या लाहन असल्यामुळे तेथे टँकर जात नाही. लाईटचे प्रश्न बरेच आहेत. यासाठी एमएसईबी समवेत एक बैठक ठेवावी एमएसईबीच्या लाईनमनची पूर्णवेळ मनपात काम करावे. वाढते काम पहाता आणखी एक उपअभियंता घेण्यात यावा.

(दुपारी २.४५ वाजता १५ मिनीटासाठी सभा तहकूब केल्याचे मा.महापौरांनी घोषित केले.)
(दुपारी २.४५ वाजता तहकुब झालेल्या सभेचे कामाकज ३.२० वाजता परत सुरू झाले.)

श्रीमती आबेदा बेगम : आजची बैठक बोलावल्याबद्यल मा.महापौरांचे अभिनंदन माझ्या वार्डात पाण्याचा प्रश्न नाही. अधिकारी चांगल्या प्रकार सहकार्य देतात माझ

या वॉर्डात लाईटचे प्रश्न आहेत.विजेचे ५ खांब आहेत परंतू त्यावर लाईटस् नाहीत. याबाबत उप अभियंता श्री.बनकर यांना सांगितले परंतू काम झाले नाही.

सौ.लता दलाल : आजच्या बैठकीबाबत मा. महापौरांना धन्यवाद शहराची लोकसंख्या वाढली आहे या वाढत्या लोकसंख्याच्या प्रमाणात जलकुंभाची संख्या वाढावयास हवी. काही जलकुभांचे अंदाजपत्रक तयार असल्याचे सांगण्यात आले. जलकुंभासाठी आर्थिक तरतुद वाढविण्यात यावी. यामुळे पाण्याचे बरेचसे प्रश्न सुटतील पाणी पुरवठयाबाबत अधिकाऱ्यांचे चांगले सहकार्य मिळत आहे. विद्युत लाईनमनकडे दिलेला भाग पाहता त्यांची संख्या कमी पडते. त्यामुळे कामे लवकर होत नाहीत. छोटया छोटया गल्लांमध्ये विद्युत विभागाचीही गाडी जावू शकत नाही. यासाठी छोटी शिडी घेण्यांत यावी. याचबरोबर लाईनमनची संख्याही वाढवावी.

श्रीमती अलका पाटील : पाण्याचा प्रश्न नाही उपअभियंता रामटेके चांगले सहकार्य करतात. लाईटचा ही फार मोठा प्रश्न नाही अधिकारी चांगले सहकार्य करतात. अशा अधिकाऱ्यांना एक एक इंन्क्रीमेंट वाढवून देण्यांत यावेत.

श्रीमती शकुंतला धांडे : माझ्या वार्डात खुप कमी दाबाने पाणी येते. वार्डात केवळ अर्धा तास पाणी येते ते एक तास दयावे. वारंवार तक्रार करूनही कामे केली जात नाहीत.वार्डातील विद्युत दिवे रात्री बंद असतात व दिवसा चालू असतात तक्रार करूनही तिकडे लक्ष देत नाहीत.

श्री.रशिद खान (मामू) : शहरात केवळ एक तास पाणी दिले जाते ती वेळ वाढवून दोन तास करावी. नळावर लावण्यांत येणाऱ्या मोटारी बंद करण्यांत याव्यात. हिमायत बागेजवळ पाईपलाईन टाकण्याचे काम चालू आहे ते पाईप आयएसआय मार्कचे नाहीत. पावसाळयापूर्वी शहरातील नाले, नाल्या साफ करवून घेण्यात याव्यात. जे अधिकारी एखाद्या विभागात चांगले काम करतात त्यांनाच दहा दहा वर्षे एकाच विभाग दिला जातो. ढापे खरेदी संचिका सहा महिन्यापासून स्थायी समितीकडे आहे. अशा प्रकारच्या संचिका आठ दिवसात निकाली निघाव्यात. विद्युत लाईनमन ३.०० वाजता कार्यालयात उपस्थित रहावे असे वारंवार सांगूनही ते कार्यालयात येत नाहीत ते कामावरून ३.०० वाजता परत कार्यालयात आले तर त्यांच्याकडे तक्रारी देता येतील लाईनमन कोणत्या भागात काम गेले आहेत याचा दैनंदिन फलक कार्यालयात लावण्याबाबत सुचित करूनही तसे केले जात नाही. शहरातील बऱ्याचश्या छोटया गल्ल्यांमध्ये चार चाकी गाडी जावू शकत नाही. यासाठी दोन चाकाची ढकलता येणारी शिडी खरेदी करण्यांत यावी. वार्डात काम केल्यानंतर लाईनमनने संबंधीत नगर सेवकाची भेट घेवून कामाची त्यांना माहिती द्यावी.

श्री.गंगाधर गाडे : आज पाण्याची बैठक घेणे संयुक्तीक वाटत नाही. उन्हाळा सुरू असतांनाच पाण्याची बैठक घ्यावयास पाहिजे होती. अनेक मान्यवर सभासदांनी अधिकाऱ्यांचे कौतुक केले काहीनी तक्रारीही केल्या. हे सर्व पाहून पाण्याबाबत काही तक्रारी आहे असे वाटत नाही. मुख्य तक्रारी लाईटच्या आहेत सरकारकडे याबाबत अधिक पैसा मागण्याचे यापूर्वीही ठरले होते जायकवाडीस पाणी भरपुर आहे. परंतू आपल्याकडे व्यवस्था नसल्याने दोन वेळा पाणी देता येत नाही. यासाठी निश्चितपणे कार्यवाही केली पाजि

जेथे जेथे वस्ती आहे तेथे तेथे पाणी दिले पाहिजे. काही सभासदांनी वाढत्या वसाहतींना पाणी पुरवण्याचा प्रश्न उपस्थित केला होता. संत एकनाथंनी गाढवालांही पाणी पाजले होते. तेव्हा मागेल त्याला पाणी मिळाले पाहिजे. यासाठी कोणत्याही अटी टाकण्यात येवू नयेत. ही दुर्दैवाची बाब आहे. पाणी पुरवठा ही आपली नैतिक जबाबदारी व पाणी मागणे हे नागरिकांचे मुलभूत हक्क समजून उचीत कार्यवाही व्हावयास हवी. एखादा अधिकारी चांगले काम करतो म्हणून त्यांनाच परत परत त्या विभागात देण्यात येवून यापूर्वीही इतरही अधिकाऱ्यांना या विभागात दिले होत परंतू ते तेथे प्रभाविरित्या काम करत नव्हते जे अधिकारी पाणी पुरवठा विभागात सातत्याने काम करत आहेत त्यांना इन्क्रीमेंट देण्यांत यावेत. झ ोपडपटट्यांमध्ये मध्यमवर्गीय लोक राहतात. त्यांना सकाळीच कामासाठी घराबाहेर पडावे लागते. पाण्याची वेळ एक नसल्यामुळे या मुलांना पाण्यासाठी घरी रहावे लागते. आणि पर्यायाने शिक्षण घेता येत नाही. असे चित्र या भागातील शाळांत दिसून येते. यासाठी पाण्याची वेळ सकाळची ठेवण्यांत यावी. काही वसाहतीमध्ये कारखान्यातील दुषीत पाणी येते अशा कारखान्यांवर कारवाई व्हावी. लाईट बाबत शहरात अनेक तक्रारी आहेत. विद्युत मटेरीयल सॅम्पल प्रमाणे नसते ते निकृष्ट दर्जाचे असते. याची चौकशी व्हावी. ही मागणी या पूर्वीही केलेली होती. स्टोअरमध्ये येणाऱ्या मालाची नोंद बरोबर होते किंवा नाही याची पहाणी करण्यांत यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : पाणी विद्युत व्यवस्थेबाबत विस्ताराने चर्चा झालेली आहे. टाक्या बांधणे, पाण्याच्या लाईन्स टाकणे याबाबत लवकरात लवकर कार्यवाही व्हावी. शहरातील जुन्या लाईन्स बदलून वाढत्या लोकसंख्येची गरज भागविण्यसाठी ६ इंची पाईपलाईन टाकण्यात यावी. शासनाकडे पाठविलेले प्रस्ताव लवकरात लवकर मंजुर करवून घ्यावेत. लाईनमनवरती लक्ष ठेवावयास हवे. लाईनमनची संख्या वाढविण्यात यावी. पाण्याबाबत तक्रार केल्यानंतर ७-८ दिवस चांगले पाणी येते परंतू परत कमी दाबाने पाणी येते. मनपाने १० वर्षात ३१००० विद्युत पोलस् बसविलेले आहेत ही चांगली बाब आहे. वाढते काम पाहता एक एक कनिष्ठ अभियता व एक उप अभियंता वाढविण्यात यावा. कोणत्या वार्डात कोणते मटेरियल वापरले गेले याचीही नोंद याची माहिती स.नगरसेवकांना असणे गरजेचे आहे. कोणत्या वार्डात कोणते मटेरियलची नोंद कार्यालयात असावयास पाहिजे. भ्रष्टाचार रोकण्यासाठी सर्वानीच प्रयत्न केले पाहिजेत. येणाऱ्या मटमेरियलची नोंद भांडार विभागात व्हावी. वापर्डात काम केल्यानंतर त्यावर स.सदस्यांची स्वाक्षरी घ्यावी.

श्री.प्रकाश निकाळजे : जनता दरबारातील तक्रारीवर स.नगरसेवकांचे मत जाणून घेण्यासाठी आजची सभा बोलावल्याचे मा.महापौरांनी सांगितले याबाबत त्यांचे अभिनंदन पाणी ही जिवनावश्यक गोष्ट आहे. शहरातील श्रमीक वर्ग सकाळीच कामासाठी बाहेर पडतो. यासाठी पाण्याची वेळ सकाळची असावी किंवा ती संध्याकाळची असावी. माझ्या वार्डातील लाईटचे बरेचसे प्रश्न आहेत श्री.देशमुख यांना वारंवार सांगूनही ते काम करत नाही . पिरबाजार मधील बहुतांश लाईटस् नेहमीच बंद असतात सातारा रोडवरील लाईटस्ही नेहमी बंद असतात ते चालू करण्यात यावेत. बरेचसे अधिकारी १०-१० वर्षे एकाच

विभागात कामकारत आहेत. ते चांगले काम करतात म्हणून त्यांनाच परत परत त्या विभागात देण्यात येते. जे काम करत नसतील त्यांना शिक्षा करण्यांत यावी.

सौ राधाबाई तळेकर : मा.महापौरांनी एका जिव्हाळयाच्या प्रश्नावर बैठक बोलावली त्याबाबत त्यांचे अभिनंदन आता पावेता अशा बैठका झाल्या परंतू त्यावर अंमलबजावणी झाली नाही. या बैठकीत झालेल्या चर्चेवर व निर्णयावर अमलबजावणी व्हावी. जवाहरनगर भागास पूर्वी ९.३० वाजता पाणी येत असे. आत मात्र रात्री १०.३० ते ११.०० नंतर येते. काही भागात कमी दाबाने तर काही भागात जास्त दाबाने पाणी येते. सर्वत्र सारख्याच दाबाने व एकाच निश्चित वेळेस पाणी यावे. टयुब्ज बसल्याबरोबर त्या दोन तीन दिवसांत खराब होतात. यासाठी टयुब्ज काढून ५० मक्युरी किंवा सोडीयम व्हेपर बसवावेत. यामुळे वापरलेल्या मटेरीयलमध्ये शंका येते. विभाग क्र.४ पाणी पुरवठयाचे खालचे अधिकारी / कर्मचारी ऐकत नाहीत. त्यांना समज देण्यात यावी. रामटेके यांच्याशी केव्हाही संपर्क साधला तरी ते काम करून देतात. त्यामुळे त्यांचे अभिनंदन.

श्री.नरसिंग ढगे : मा.महापौरांनी शहरात जनता दरबार घेवून तयात आलेल्या तक्रारी वरती उपाययोजना करणे, स.सदस्यांचे मत जाणून घ्यावे. यासाठी बैठक बोलावली त्याबाबत त्यांचे अभिनंदन. माझ्या वार्डात बऱ्याचश्या भागात पाणी पुरवठयातील कर्मचाऱ्यांना बरेच काम करावे लागते याचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा. विद्युत विभागातील कर्मचारी वर्ग कमी आहे. पाणी पुरवठा व लाईट विभागात कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी. व विद्युत विभागाच्या कर्मचारी वर्ग विभागीय कार्यालयातून द्यावा. कोणत्या दिवशी कोणत्या वार्डात काम होणार याची संबंधित नगर सेवकांना कल्पना द्यावयास हवी. नियोजनबध्दरित्या कामे व्हावीत.

श्री.भगवान घडामोडे : कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास पाण्याबाबत सिडको भागासच फटका बसतो. सिडको - हडको भागास न्याय द्यावा. कामगार कॉलनी चिकलठाणा येथे कमी दाबाने पाणीपुरवठा पाणी पुरवठा होतो ही समस्या सोडवावी . जनता दरबारचा पायंडा आपण पाडला याबाबत आपले अभिनंदन.

श्री.कचरू नवपूते : मा.महापौरांच्या या उपक्रमाबद्यल त्यांचे अभिनंदन सिडको नोटीफाईड एरियात बसलेल्या अनाधिकृत वसाहतींना २५% रक्कम भरून सुविधा पुरविणार होतो. पाणी जीवनावश्यक बाब असल्याने २५% वर्गणी रदद् करून पाणी पुरवठा करण्याबाबत विचार व्हावा. माझ्या वार्डात कमी दाबाने पाणी येते. माझ्या वार्डातील मुख्य जलवाहीनीचे एस्टीमेट तयार आहे हे काम झाल्यास हनुमान चौक, मोतीवाला कॉलनी,चौबे कॉलीनतील पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. लाईटस्च्या बऱ्याचश्या तक्रारी आहेत. मटेरियल नाही हे नेहमी उत्तर दिले जाते. मटेरियल केव्हा येणार याची माहिती दयावी.

श्री.अफसर खान : पाणी व विद्युत प्रश्नावर बैठक बोलावली त्याबाबत आपले अभिनंदन पाणी दोन तास दिले जावे. टाकीपासून पाणी येण्यास लागणारा वेळ पाहता खऱ्या अर्थाने अर्धा तास पाणी येते. दोन वेळा पाणी देता येईल काय याचाही विचार व्हावा. लाईटस्च्या खुप तक्रारी आहेत. विजेच्या अनियमतीमुळे पाणी पुरवठयात व्यत्यय येतो. पाणी पुरवठयातील अधिकारी

चांगले काम करतात.विद्युत मटेरियल कंपनीकडून खरेदी केल्याचे सांगितले जाते परंतू टयुब्स, स्टार्टर डूप्लीकेट येतात. याची चौकशी व्हावी. १५०० पोलवर लावण्यासाठी १५०० फिक्शचर खरेदी करण्यात आल्याचे सांगितले जाते. परंतू मी प्रत्यक्ष पहाणी केलेली आहे. १५०-२०० फिक्शचर लावलेले नाहीत. याची चौकशी व्हावी. विद्युत विभागासाठी दोन चाकी गाडी घ्यावी. विद्युत दिवे दिवसा चालू असतात याचा आर्थिक फटका मनपाला बसतो. अधिकारी प्रत्यक्ष स्थळावर जावून पहात नाहीत. आचार सहिंता होण्यापूर्वी एस्टीमेट तयार करून कामे सुरू करण्यांत यावीत.

श्री.अविनाश कुमावत : सध्याचे माहपौर हे दहावे महापैार आहेत. त्यांनी जनता दरबाराच्या माध्यमातून लोकांच्या तक्रारी एकून घेतल्या बदद्ल त्यांचे अभिनंदन . जनतेच्या अडी-अडचणी बरोबरच प्रशासनाचेही म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. या अडचणी एक त्र बसून सोडवल्या पाहिजेत. बऱ्याचशा भागात पाणी पुरवठा चांगला होतो तर काही भागाच्या तक्रारी आहेत. विद्युत विभागासाठी दोन चाकाची हातगाडी घेतल्यास लाईटस्च्या बऱ्याचश्या तक्रारी दुर होतील. कर्मचारी आकृतीबंध मंजुर नसल्याने बऱ्याचशे कर्मचारी कमी पडतात. इतर मनपाशी तुलना करता आपली महानगरपालिका खुप चांगली आहे. आवश्यक असणारे कर्मचारी दैनिक वेतनावर घेण्याची परवानगी द्यावी.

मा.आयुक्त : गेले तीन साडेतीन तास पाणी व लाईट या विषयावर ही अभ्यास पूर्ण चर्चा या सभागृहात चालू आहे. या प्रस्तावाबाबत अत्यंत पोटतिडकिने चर्चा करण्यांत आली. याचा मला अभिमान आहे. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणत आजच्या बैठकीचे कामकाज झाले. लोकपतिनिधींनी प्रशासनाचे कौतुक केले याचा मला अभिमान आहे.पाणी पुरवठा विभागातील उप अभियंता श्री.रामटेके व कलीम अख्तर याच बरोबर कार्यकारी अभियंता (पापू) सोनवणे यांच्या कामाचे कौतूक केले यातून त्यांना भविष्यात काम करण्यासाठी प्रेरणा मिळेल. जनतेस आणखी चांगली सेवा देण्याची त्यांना प्रेरणा याची मला शाश्वती आहे. अधिकाऱ्यांच्या कौतुका बरोबरच सभागृहात दोषही दाखवले जातात. ही चांगली बाब आहे. हा ऐतिहासिक पायंडा आहे. श्री.रशिदमामू यांनी मागणी केल्यानुसार प्रत्येक झोनला ए दोन चाकी हातगाडी विद्युतची कामे करण्यासाठी घेतली जाईल. वास्तविक आपल्याकडे हैड्रोलिक ३ गाडया आहेत. परंतू त्या छोटया गल्ल्यांमध्ये जावू शकत नाहीत म्हणून या हातगाडया तातडीने खरेदी करण्यांत येतील.औरंगाबाद शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा नैसर्गिक नाही. परंतू पाणी ६० किलोमीटर अंतरावर आणावे लागते. इलेक्ट्रीसीटीचा प्रश्न सामंजस्याने सुटत नाही. तोपर्यंत हा प्रश्न शहरात भेडसावणार आहे. मागील उन्हाळयात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही.मनपा व विद्युत मंडळ यांच्यातील सामंजस्य व खंडीत न झालेला विद्युत पुरवठा हे त्याचे कारण आहे. विद्युत मंडळाचे साहय लाभत नाही तोपर्यंत हा प्रश्न भेडसावणार आहे. मा. महापैर विद्युत मंडळ व मनपा अधिकाऱ्यांची एक बैठक लवकरच घेणार आहेत. दरमहा येणार १ कोटी ७५ लाखाचे विद्युत देयक भरणे मनपास शक्य नाही. यासाठी हॉर्स पावरच्या दराने बिल मिळावे ही आपली सातत्याने मागणी आहे. याबाबत गत सर्वसाधारण सभेत मा.महापौर, मा.स्थायी समिती सभापती व इतर सीनीयर कॉर्पोरेटर्सची एक

समिती गठीत केलेली आहे. ही समिती शासनाकडे जावून निवेदन सादर करणार आहेत. शहर वाढते आहे. पाणी पुरवठयासाठी शासनाकडून ६७ कोटीची योजना मंजुर झालेली आहे. या योजनेचा पाठपुरवा करावा लागणार आहे. तरच शहर व सिडको हडकोचा प्रश्न मार्गी व पुंडलिकनगरचाही प्रश्न सुटणार आहे. वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न पाहता गावठयातील २ इंची व ३ इंची लाईन्स काढून त्या ठिकाणी ४ इंची व ६ इंची लाईन्स टाकव्या लागणार आहेत.

१९८४साली शहरात ५००० विद्युत पोल होते. आज शहरात १९७२० पोल आहेत. त्यावर १२००० टयुब्ज लावलेल्या आहेत. यासाठी मेनटेनन्ससाठी मॅनपॉवर पाहिजे . पर्यवेक्षक, डेप्युटी इंजिनियर आहेत काय याचीही पाहणी करावयास पाहिजे. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येणार आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी इलेक्ट्रीसीटी मटेरियल स्टॅंडर्ड प्रमाणे नाही असे सांगितले. आलेले मटेरियल स्टॅंडर्ड प्रमाणे आहे काय ? त्यात काही गैरप्रकार झाले आहेत काय याची आम्ही चौकशी करू मी आपणांस आश्वासन देवू इच्छितो की, आपण प्रशासनाच्या मागे खंबीरपणे उभे असल्यामुळे आपला प्रशासनावर आपला अंकुश असल्यामुळे हया शहराचे मुलभुत प्रश्न सोडविण्याची ताकद आपण उभी केलेली आहे. नक्षत्रवाडी ते रेल्वे स्टेशन ही पाईप लाईन जीवन प्राधीकरणाने टाकलेली आहे. हे सिमेंटचे पाईप प्रेशरमध्ये टिकत नाहीत. ही लाईन बदलण्यासाठी सर्वसाधारण सभेने १.५ कोटीचे टेंडर मंजुर केलेले आहे. ते यापुर्वी कार्यान्वित करण्यात येणार आहे.

श्री.गंगाधर गाडे : वृत्तपत्रात "मनपातील भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही " या मथळयाखली बातमी आलेली आहे. सुरत पॅटर्नच्या नावाखाली बोगस नोकर भरती केल्यामुळे विभागीय अधिकारी अभंग, स्वच्छता निरिक्षक कय्युम व सितापुरे यांना ताबडतोब निलंबीत करण्यांत आलेले आहे. असेही बातमीत म्ळटलेले आहे. न्यायालयाने ठरवून दिलेल्या यादीत बोगस नावे टाकली जातात. व त्यांच्या नावांवर पैसे उचलेले जातात. आयुक्तांनी खुलासा करावी की यापुर्वीही असे प्रकार झाल्यानंतर अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली होती. यापुर्वीही शिक्षक भरतीत गैरप्रकार झाले होते. अशा प्रकारच्या घटना एकाच विभागात होत नाहीत. इतरही विभागात अशा घटना घडतात . आयुक्तांनी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केल्यानंतर स्थायी समितीने अपिल दाखल करून घेवू नये. अन्यथा अशा प्रकारचा भ्रष्टाचार कमी होणार नाही. या बाबत सखोल चौकशी व्हावी.

श्रीमती नुरजहॉंबेगम : यापुर्वी मी असाच आवाज उठवला होता. त्यावेळी माझे सदस्यत्व रदद् करवले होते. आज मी प्रशासनाचे अभिनंदन करते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासनाने कार्यवाही केल्यांनतर त्यावर कोणत्याही सभेने फेरविचार करू नये. अधिकारी निलंबीत होतात परत लागलीच कामाला येतात.

मा.आयुक्त : स.नगरसेवक श्री.गंगाधर गाडे, मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी प्रशासनाने गेल्या दोन दिवसांपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा खुलासा करण्याची विनंती केलेली आहे. विभाग क्र.१ वे तत्कालीन विभागाचे अधिकारी अभंग, स्वच्छता निरिक्षक कय्युम व सितापुरे यांच्या निलंबनाचे आदेश काल रोजी

पारित करण्यात आलेले आहेत. यांच्यावर अधिकाराचा गैरवापर, दुरपयोग करणे, सार्वजनिक पैशाचा अपहार करणे, खोटया नोंदी करणे, खोटे रजिस्टर लिहीणे व खोटया हजऱ्या लावणे असे गंभीर आरोप लावलेले आहेत. स्वच्छ औरंगाबाद मोहिमे अंतर्गत विभागीय अधिकाऱ्यांना काही अधिकार दिलेले होते. परंतू त्याचा योग्य प्रकारे वापर झाला नाही. स.श्री.विधाते, श्री.अफसर खान, गौतम लांडगे, गौतम खरात यांनी गंभीर आरोप केले होते. सदरची चौकशी करण्यासाठी मुख्य लेखा परिक्षक श्री.सोनार यांची विशेष नियुक्ती केली होती. प्राथमिक चौकशी अहवालात बोगस हजऱ्या लावणे आदि बाबत १ लाख ५४ हजार रूपयांचा अपहार झाल्याचे दिसून आले. म्हणून त्यांच्यावर ही कार्यवाही केली. अधिकाराचा गैरवापर व अशा प्रकारच्या घटना इतरही विभागातून झाल्या आहेत काय हे पाहण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहिम हाती घेतली आहे. यासाठी एक विशेष पथक नेमून इतर विभागीय कार्यालयाची तपासणी करण्यांत येत आहे.सदरचा अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर : पाणी पुरवठा विद्युत संदर्भाने स.सदस्यांनी लहान मोठया तक्रारी दिलेल्या आहेत. या तक्रारीचे निवारण लवकरात लवकर करून त्यांची माहिती स.सदस्यांना द्यावी. प्रत्येक वार्डात २ हातपंप बसविण्यांत यावेत. पाणी पुरवठयासाठी विद्युत देयक शेतीच्या दराने लावावे. यासाठी स्थापन केलेली समिती मा.मुख्यमंत्र्याची भेट घेईल. या समितीत ५ पदाधिकारी व विविध पक्षाचे जेष्ठ सदस्य राहतील, विद्युत विभागात खुप तक्रारी आहेत. स.नगरसेवकांनी केलेल्या तक्रारी व त्यावर झालेली कार्यवाही याची माहती पाच पदाधिकाऱ्यांना सात दिवसांत पुरवावी. ज्या अधिकाऱ्यांनी उत्कृष्ट काम केलेले आहे. त्यांना एक जादा वेतन वाढ द्यावी. कर्मचारी वर्ग कमी आहे. याबाबतची माहिती सभागृहासमोर ठेवावी व सभागृहाच्या मंजुरीने कर्मचाऱ्यांची भरती करण्यांत यावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद शहराचा पाणी पुरवठा व सार्वजनिक विद्युत व्यवस्थेत सुसुत्रत आणण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे व्यवस्था, उपाय योजना करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१ पाणी पुरवठा व सार्वजनिक विद्युत व्यवस्थेसाठी आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग नेमण्याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

२ शहरातील जनतेला मुबलक व योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होण्यासाठी भूजल सर्वेक्षण विभागाचे अभिप्रायानुसार प्रत्येक वार्डात दोन याप्रमाणे विधंन विहिरी खोदण्यात याव्यात व त्यावर हातपंप बसविण्यात यावेत.

३ पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी वापरण्यांत येणारी सर्व यंत्र सामुग्री सुसज्ज राहील. याची प्रशासनाने योग्य ती दखल घ्यावी.

४ सभागृहातील चर्चेप्रमाणे पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी अभिंयता, उपअभियंता (शहर /सिडको ) आणि त्यांचे सहकारी यांनी उत्कृष्ट काम केल्याबददल अशा कर्मचाऱ्यांना एक वेतन वाढ देण्यांत येते.

५ शहराच्या लहान लहान गल्ल्यातील विद्युत व्यवस्थेसाठी प्रत्येक झोन करीता एक याप्रमाणे दोन चाकी ढकलगाडया खरेदी करण्यांत याव्यात.

६ पाणी पुरवठा / विद्युत व्यवस्थेबाबत ज्या ज्या तक्रारी आहेत त्या शक्य तितक्या लवकर निवारण करून त्याबाबतची माहिती संबंधित स.सभासदांना त्वरीत पुरवावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सर्वांचे आभार मानून ४.५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौरांनी घोषित केले. "जनगणमन" या राष्ट्रगिताने सभेचे कामकाज संपले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
मा.महापौर
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९ जुन १९९९ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शनिवार दिनांक १९ जुन १९९९ रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मा.महापोर श्री.सुदाम पाटील सोनवणे यांच्या अध्यक्षतेखली "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे " सभागृहात "वंदेमातरम्" या गीताने सुरूवात झाली या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननिय सभासद सभेस उपस्थित होते. सभासदांची उपस्थिती हजेरी रजिस्टर प्रमाणे.**

| | | |
|---|---|---|
| १ | स.स.श्री.केनेकर संजय किशनराव | मा.उप महापौर |
| २ | स.स.श्री.ढगे नरसिंग मूरलीधर | स.सदस्य |
| ३ | स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव | स.सदस्य |
| ४ | स.स.श्री.अफसरखान यासिन खॅा | स.सदस्य |
| ५ | स.स.श्री.लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | स.सदस्य |
| ६ | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | स.सदस्य |
| ७ | स.स.सौ.साजेदा बेगम | स.सदस्य |
| ८ | मा.श्री.महमंद सलिम म हनिफ कुरैशी | स.सदस्य |
| ९ | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | स.सदस्य |
| १० | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | स.सदस्य |
| ११ | स.स.सौ.उषाताई दिलीप गायकवाड | स.सदस्य |
| १२ | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | स.सदस्य |
| १३ | स.स.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | स.सदस्य |
| १४ | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | स.सदस्य |
| १५ | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | स.सदस्य |
| १६ | स.स.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | स.सदस्य |
| १७ | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | स.सदस्य |
| १८ | स.स.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | स.सदस्य |
| १९ | स.स.श्री.बैनाडे कवरसिंग किशनसिंग | स.सदस्य |
| २० | स.स.सौ.पदमा बाबुराव शिंदे | स.सदस्य |
| २१ | स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | स.सदस्य |
| २२ | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | स.सदस्य |
| २३ | स.स.सौ.धनश्री अशोक विसपुते | स.सदस्य |
| २४ | स.स.सौ. फरहद बानो भ्र.मो.नवाज | स.सदस्य |
| २५ | स.स.श्री.फजलउल्लाखॅांन अजमत उल्लाखॉन | स.सदस्य |
| २६ | स.स.श्री.अजिज खॉंन गणी खॅा | स.सदस्य |
| २७ | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | स.सदस्य |
| २८ | स.स.श्री.महंमद मुस्ताक अहेमद | स.सदस्य |
| २९ | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम अ.रहेमान | स.सदस्य |
| ३० | स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव | स.सदस्य |
| ३१ | स.स.श्री.हाजी मोहसिन अहेमद | स.सदस्य |
| ३२ | स.स.श्री.मुजीब आलम शाह मीर आलमशाह | स.सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३३ | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखाद्दीन | स.सदस्य |
| ३४ | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर | स.सदस्य |
| ३५ | स.स.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | स.सदस्य |
| ३६ | स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | स.सदस्य |
| ३७ | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | स.सदस्य |
| ३८ | स.स.श्री.हमीदउद्दीन ताबा फसीयोद्दीन | स.सदस्य |
| ३९ | स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | स.सदस्य |
| ४० | स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबुद्दीन | स.सदस्य |
| ४१ | स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण | स.सदस्य |
| ४२ | स.स.श्री.सय्यद अली मिरा सलामी | स.सदस्य |
| ४३ | स.स.श्री.लाहोट रमेश दिपचंद | स.सदस्य |
| ४४ | स.स.सौ.वाघमारे मुक्ताबाई सुदाम | स.सदस्य |
| ४५ | स.स.सौ.दलाल लता श्रीनीवास | स.सदस्य |
| ४६ | स.स.श्री.ओक जयवंत केशवराव | स.सदस्य |
| ४७ | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | स.सदस्य |
| ४८ | स.स.सौ.धांडे शकुंतला हरीदास | स.सदस्य |
| ४९ | स.स.श्री.अब्दुल रशिद खॉन (मामू) | स.सदस्य |
| ५० | स.स.श्री.कच्छवाह सुभाष लक्ष्मीनाराण | स.सदस्य |
| ५१ | स.स.कु.माया लिंबाजी लाडवाणी | स.सदस्य |
| ५२ | स.स.श्री.कराड भागवत किशनराव | स.सदस्य |
| ५३ | स.स.सौ.आव्हाड सविता संजय | स.सदस्य |
| ५४ | स.स.श्री.अब्दुल सत्तार | स.सदस्य |
| ५५ | स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | स.सदस्य |
| ५६ | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | स.सदस्य |
| ५७ | स.स.श्री.जैन विकास रतनलाल | स.सदस्य |
| ५८ | स.स.श्री.गंगाधर सुखदेव गाडे | स.सदस्य |
| ५९ | स.स.श्री.बारवाल गजानन रामकिशन | स.सदस्य |
| ६० | स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव | स.सदस्य |
| ६१ | स.स.श्री.जोशी संजय रामदास | स.सदस्य |
| ६२ | स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | स.सदस्य |
| ६३ | स.स.सौ.ज्योत्सना हिवराळे | स.सदस्य |
| ६४ | स.स.श्री राजकुमार उर्फ सांडू बचाटे | स.सदस्य |
| ६५ | स.स.सौ.राधाबाई तळेकर | स.सदस्य |
| ६६ | स.स.श्री .विठ्ठल किसन जाधव | स.सदस्य |
| ६७ | स.स.श्री .मेहेर विजयकुमार गजानन | स.सदस्य |
| ६८ | स.स.सौ.काळूसे मंदा धनंजय | स.सदस्य |
| ६९ | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | स.सदस्य |
| ७० | स.स.श्री गांगवे बन्सी तुळशीराम | स.सदस्य |
| ७१ | स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास | स.सदस्य |
| ७२ | स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान | स.सदस्य |

कोरम अभावी सभा ३० मिनीटांसाठी तहकुब करण्यांत येत असलयाचे मा. महापौरांनी घोषित केले. ११.३० वाजता तहकुब झालेली सभा १२.०५ वाजता मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

भारतीय सीमेवरती जे कारगील मध्ये युध्द चालू आहे त्या युध्दात वीरगती प्राप्त झालेले जवान, युध्दात मरण पावलेले नागरीक आणि गमत्या ग्रुपचे नाटय कलाकार श्री.विश्वास साळूंके, त्यांचे सहाकरी श्री.धनधाव यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी असे स. नगरसेवक श्री.अफसर खान, श्री.नरेंद्र पाटील, श्री.स.अली मिरा सलामी यांनी सुचित केले. त्यास स.सभागृहनेता श्री.अविनाश कुमावत श्री,रशिद खान मामू, यांनी अनुमोदन दिले. त्यानुसार सभागृहाने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भारतीय सीमेवरती कारगील युध्दात वीरगती प्राप्त झालेले जवान, सीमा भागातील नागरीक आणि गमत्या ग्रुपचे नाटयकलाकार श्री.विश्वास साळूंके व श्री.घनघाव यांना सभागृहा तर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**विषय क्र.३८**

हिन्दुस्थानच्या पवित्र मातृभूमि मध्ये घुसखोरी करून दहशद निर्माण करणाऱ्या व देशद्रोही कारवाई करणाऱ्या पाकिस्तानच्या घुसखोरांना देशाच्या सिमेबाहेर हकलून लावतांना झालेल्या युध्दात या देशाचे जवान आपले शिर तळहातावर घेवून पराक्रमाची शिकस्त करीत असतांना धारातिर्थ पडलेल्यांना मातृभुमिच्या सुपुत्र जवानाच्या कुटुंबियांचे मदतीसाठी औरंगाबाद महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांतर्फे एक महिन्याचे मानधन पंतप्रधान मदत निधीस, मदत म्हणून पाठविण्यांत यावे.

प्रस्ताव मुजुरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.अफसर खान,श्री.अविनाश कुमावत
श्री.नरसिंग ढगे
श्री.संजय जोशी
श्री.गौतम खरात
श्री.गौतम लांडगे
श्री.स.अली मिरा सलामी
अनुमोदक : श्री.रशिद खॉन (मामू)
श्री.मोहसिन अहमेद
श्री.हमीद ताबा
श्री.गंगाधर गाडे
श्री.गिरजाराम हाळनोर
श्री.काशिनाथ कोकाटे
श्री.प्रकाश निकाळजे
श्री.वसंत देशमुख

**संवाद :**

**श्री.अफसर खान :** सीमे वरती जे कारगील मध्ये वीरगती प्राप्त झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना मदत म्हणून सर्व स.सभासद आपले एक दिवसांचे वेतन दयावे अशी मी सभागृहास विनंती करतो त्यास सभागृहनेता श्री.अविनाश कुमावत यांनी अनुमोदन दिले.

**मा.महापौर :** देशासाठी कारगील भागात जे सैनिक शहिद झाले त्यांच्या कुटुंबियांना आर्थीक मदत म्हणून स. सदस्यांनी त्यांचे एक महिन्याचे मानधन दयावे. अधिकारी ,कर्मचारी यांनी स्वखुषीने जी रक्कम द्यावयाची असेल ती प्रशासनाकडे द्यावी. सर्व रक्कम एकत्र करून ती मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवावी.

**श्री.गौतम खरात :** कामगार संघटनेच्या वतीने मी जाहिर करतो की, शहिद झालेल्या सैनिकांच्या कुंटुबीयांना आर्थिक मदत म्हणून महानगरपालिका कर्मचारी एक दिवसाचा पगार देतील.

**प.वि.अ.तथा अध्यक्ष :** मनपा अधिकारी संघटना महानगरपालिका अधिकारी कर्मचारी यांसाठी एक दिवसाचा पगार देणार आहेत असे मी अधिकारी संघटनेच्या वतीने जाहीर करीत आहे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाकिस्तानी घुसखोरांनी देशाच्या सिमेबाहेर हकलून लावताना झालेल्या लढाईत धारातिर्थी पडलेंल्या भारतीय जवानांच्या मदतीसाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व नगर सेवकांतर्फे एक महिन्याचे मानधन तसेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यातर्फे एक दिवसाचे वंतन पंतप्रधान निधीस मदत म्हणून पाठविण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.३९ :**

हिंदुस्थानच्या पवित्र भुमित वारंवार घुसखोरी करून पाकिस्तान आपल्या सिमा प्रदेशात दहशत निर्माण करीत आहे.

यापुर्वी ही पाकिस्तान ने अशाच प्रकारे तीन वेळा घुसखोरी करून या देशाच्या एकतेला तडा पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. पाकिस्तान तर्फे वारंवार घुसखोरी करून देशाच्या एकतेला तडा पोहचविणाऱ्या भ्याड प्रवृत्तीचा हे सभागृह तिव्र निषेध करित आहेत.

तसेच जोपर्यंत पाकिस्तान, भारत भुमितून आपले सैन / घुसखोर बिनशर्थ मागे घेत नाही व भ्याड घुसखोरी कायमची थांबवत नाही तो पर्यंत कुठल्याही दबावाला बळी न पडता, पाकिस्तानचे हल्ले नेस्तनाबुत करून देशाच्या सिमा संरक्षित ठेवाव्यात. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.अब्दुल रशिद खाँन (मामू)
श्री.अफसर खाँन यासीन खाँन
श्री.हमीद ताबा
श्री.अविनाश कुमावत
श्री.गिरजाराम हाळनोर
श्री.संजय जोशी
श्री.भगवान घडामोडे
अनुमोदक : श्री.गजानन बारवाल
सौ.लता दलाल
श्री.रविंद्र इंगळे
श्री.मुजीब आलमशाह
श्री.सय्यद इकबालोद्दीन
श्री.गौतम खरात

श्री.प्रकाश निकाळजे

<u>संवाद :</u>

**श्री.रशिद खान (मामू) :** कारगील भागात झालेल्या घुसखोरीचा निषेध झालाच पाहिजे. पाकिस्तानच्या अतिरेकीपणाचा व गुंडागर्दीचा निषेध करावयास पाहिजे व असा ठराव मंजुर करून तो भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे पंतप्रधान यांना पाठवावा. त्यात असाही उल्लेख करावी की, प्रथम अतिक्रमीत जमीन खाली करून घेण्यात यावी व नंतरच पुढील बोलणी करावी.
पाकिस्तानला असे उत्तर दयावे त्यानी परत तोंड वर करू नये.

**मा.महापौर :** या सभागृहात पाकिस्तानच्या घुसखोरीचा निषेध करण्यांत येतो.

**श्री.अफसर खान :** प्रथम पाकिस्तानला मागे हटण्यास सांगावे व नंतरच त्यांच्याशी बोलणी करावी असा ठरावात उल्लेख करावा.

**श्री.गंगाधर गाडे :** पाकिस्तानचे सैन्य भारतात ७ ते १३ कि.मी. आत आले ही गोष्ट एका दिवसात घडलेली नाही. त्यासाठी काही महिने लागले असतील या काळात सरकार काय झोपी गेले होते काय ?

**श्री.संजय जोशी :** स.सभासदांनी देशावर अविश्वास दाखविला आहे . ही बाब बरोबर नाही यात सरकारचा दोष नाही.
यावेळी पाकिस्तान मुर्दाबदच्या घोषणा सभागृहात दिल्या जातात.

**मा.महापौर :** या ठिकाणी स.श्री.रशिद खान (मामू) यांनी मांडलेल्या सूचना स्विकारल्या जातात. याबाबत भारताचे पंतप्रधान मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी यांना पत्र लिहून सभागृहाच्या भावना कळविल्या जातील तसेच पाकिस्तानचे पंतप्रधानानाही पत्र पाठविण्यात येईल. पाकिस्तानी गुंडगिरीचा निषेध करण्यांत येतो.

**श्री.गौतम खरात :** पाकिस्तानने तीन वेळा भारतावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केलेला आहे, पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्यात यावा.त्यांना नेस्तनाबूद करण्यात यावे.

**श्री.संजय जोशी :** महाराष्ट्राच्या एका नेत्यानें अविश्वास दाखवला त्या नेत्याचा या सभागृहात निषेध करण्यात यावा.

**श्री.भागवत कराड :** स.श्री.रशिद मामू ,अफसर खान यांचे अभिनंदन परंतू ज्यांनी देशाच्या सैनिकांवर अविश्वास दाखवला त्यांचा मी निषेध करतो.

**मा.महापौर :** आपल्या देशाचा आपणांस अभिमान आहे हा ठराव शासनाकडे पाठविण्यांत येईल हा ठराव संपूर्ण सभागृहाचा आहे.

**श्री.रशिद खान (मामू) :** आम्ही या देशाचे नागरिक आहेत. मेल्या नंतर तीन फुटाची जागा या देशातच मिळणार आहे.कोणाचे अभिनंदन करण्याचा प्रश्नच येत नाही. आमच्या भावना राष्ट्राशी आहेत. हा ठराव संपूर्ण सभागृहाचा आहे. कोणा एकाचा नाही.

**श्री.भागवत कराड :** या सभागृहातील प्रत्येकजण राष्ट्रप्रमी आहे. कोणाचे मन दुखावण्याचा माझा हेतू नव्हात. माझ्या वक्तव्याने कोणाचे मन दुखावले गेले असेल तर त्याबद्यल मी दिलगिरी व्यक्त करतो.

**श्री.रशिद खॉुन (मामू) :** सभागृहात राजकारण कोणी करू नये, स.श्री.गंगाधर गाडे यांचे म्हणणे समजून घ्यावे. अमेरिका व रशियाच्या प्रंतप्रधानानाही पत्र पाठवून पाकिस्तानच्या कृतीचा निषेध करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिंन्दूस्तानच्या पवित्र भूमित घुसखोरी करून सिमा प्रदेशात दहशत निर्माण करणाऱ्या पाकिस्तानचा हे सभागृह तिव्र निषेध करीत आहे. यापूर्वी ही पाकिस्तानने तीन वेळा घुसखोरी करून या देशाच्या शांततेला तडा पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. पाकिस्तानच्या या भ्याड प्रवृत्तीचे हल्ले कायमचे नेस्तनाबूद करून या देशाच्या सिमा संरक्षित ठेवण्यात याव्यात आणि जोपर्यंत पाकिस्तान त्यांचे घुसखोर सैन्य या देशाच्या भूमितून मागे घेत नाही तोपर्यंत कोणतीही बोलणी न करता कुठल्याही दबावाखाली बळी न पडता पाकिस्तानचे हल्ले आणि घुसखोर यांना देशाच्या सिमेबाहेर घालविण्यात यावेत.

ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## <u>चर्चेतून आलेला प्रस्ताव</u>

**विषय क्र.३९ :अ**

गमत्या ग्रुपचे नाटय कलाकार श्री.विश्वास साळुंके आणि श्री.धनघाव यांना आर्थिक मदत करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>**संवाद**</u> :

श्री.गंगाधर गाडे : बहुजन समाज व गोरगरिबांचे प्रश्न रंगभुमिच्या माध्यमातून प्रभावीपणे जनतेसमोर मांडणार ेव जनतेस नाटयरुपाने मनोरंजन करणारे कलावंत श्री.विश्वास साळूंके व घनघाव यांचे अशातच अपघातात दुदैवी निधन झाले. त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात आलेलीच आहेत या कलावंताच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत म्हणून प्रत्येकी १ लाख रूपये अर्थसहाय्य देण्यांत यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे : स.सदस्य गंगाधर गाडे यांनी मांडलेल्या सुचनेस माझे अनुमोदन आहे.

श्री.नरेंद्र पाटील : स्व. श्री.विश्वास साळूंके यांच्या कुटुंबियांना थोडीफार का होईना आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव पारीत करून द्यावा.

श्री.अविनाश कुमावत : अपघातात मृत पावलेल्या कलाकारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे. अशा प्रकारची आर्थिक मदत देता येवू शकते काय याचा खुलासा आपल्याकडे तशी तरतुद आहे काय ? अशा बाबतीत महाराष्ट्र शासनाकडे तरतुद आहे तशी तरतुद आपल्या कडे आहे काय ?

श्री.अफसर खान : अशा प्रकारच्या तरतुदीची आवश्यकता नाही. आपण जेवढी मदत करू शकतो तेवढी करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : माझ्या स्वेच्छा निधीतून दोन्ही कलावंताच्या कुटुंबियांना रू.१० हजाराची प्रत्येकी मदत यावी .

मा.महापौर : आपल्या शहरातील दोन कलाकार श्री. साळूंके आणि घनघाव यांचे अपघाती निधन झालेले आहे. दोन्ही कलाकारांनी या शहरातील नागरिकांचे मनोरंजन केलेले आहे. स.सभासद श्री. कोकाटे यांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी दहा हजार आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव** :

नाटय कलाकार श्री.विश्वास साळूंके व श्री.घनघाव यांच्या अपघाती निधनानिमित्त स.नगरसेवक श्री.काशिनाथ कोकाटे यांच्या स्वेच्दा निधीतून प्रत्येकी १० हजार रूपये आर्थिक मदत म्हणून संबंधितांच्या कुटुंबियांस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

## सर्व साधारण चर्चा

**संवाद :**

श्री.गंगाधर गाडे : काल महानगरपालिकावर ग्रामीण भागातील नागरिकांचा मोर्चा आला होता. शहरातील घाण पाणी या वसाहतीमध्ये येते ते थांबविण्यात यावे अशी या नागरिकांची मागणी होती. याबाबत आपण काही निर्णय घेणार आहात की नाही ?

मा.महापौर : यावर निर्णय घेण्यात येत आहे. याबाबत चर्चा करण्यासाठी आपणास वेळ दिला जाईल.

श्री.नरेंद्र पाटील : महानगरपालिका तर्फे शहरामध्ये एक उत्तम प्रकारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय बांधलेले आहे. ते तयार होवून कित्येक महिने लोटले परंतू ते अद्याप जनतेस खुले करण्यात आलेले नाही. मला वाटते या औरंगाबाद महानगरपालिकेस शाप आहे की, मनपाने जे काही प्रकल्प घेतले स्वीमींग पूल असो, एकनाथ नाटय मंदिर असो, गरवारे स्टेडीयम असो हे वर्षानुवर्षे उद्‌घाटना अभावी लोकांकरीता खुली केली गेलेली नाहीत. हीच बाब या संग्रहालयाबाबत घडते आहे. तर आपण जातीने लक्ष घालून उद्‌घाटन करावे याच बरोबर यावर झालेल्या खर्चाची माहती सभागृहास देण्यात यावी.

मा.महापौर : स.नगरसेवक नरेंद्र पाटील यांनी मागितलेली माहिती पुरविण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : वर्ग-४ च्या भरतीबाबतची माहिती मी मागीतली होती हा प्रश्न आपण घेतलेला आहे काय याची माहिती दयावी.

**विषय क्र.४०/१**

दिनांक २०-५-९९ च्या सर्वसाधारण सभेचे व दिनांक २५-५-९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.नरेंद्र पाटील : दिनांक २०-५-९९ च्या सर्वसाधारण सभेत २१-३-९९ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.२३७/२ ते २६०/१५ वर स्वतंत्र बैठक घ्यावी. अशी मी केलेली मागणी आपण मान्य केली होती. परंतू इतिवृत्तांच्या पृष्ठ क्र.५ वरती आपण दिलेली रूलिंग चूकीची दर्शविलेली आहे. आजच्या सभेत हे विषय ठेवले आहेत. किंवा नाहीत याची माहिती देण्यात आलेली नाही याचा खुलासा व्हावा. आपल्या रूलिंगमध्ये ठराव क्र.२४८/३ व २५४/९ ते २६०/१५ असे म्हटले आहे हे चूक आहे. २३७ ते २६० ठराव पुढील बैठकीत ठेवावे असे ठरले होते.

श्री.गजानन बारवाल : सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावेत असे मी म्हटले होते. या बैठकीत स्थगित ठेवलेल्या विषयावर चर्चा होणार आहे काय ?

मा.महापौर: या बैइकीत इतिवृत्तांस मंजुरी मिळाल्यानंतर पुढील बैठकीत सदरचे प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर करण्यात येतील.

श्री.नरेंद्र पाटील: आपणाकडून पारदर्शी पणाची आम्ही अपेक्षा करतो ऐन वेळचे बरेचसे ठराव सभागृहातून बाहेर गेल्यानंतर वा सक्युलेट न होताच मंजुर होतात हे योग्य नाही.

मा.महापौर : याची दखल घेतली जाईल.

श्री.अविनाश कुमावत : महानगरपालिका आयुक्त श्री.वैद्य साहेब यांची बदली झाल्याचे वृत्तपत्रात आलेले आहे. त्याची बदली झाली आहे काय याची माहिती सभागृहास देण्यात यावी. त्यांची खरोखरच बदली झाली असेल तर चांगल्या प्रकारे कामकाज केल्याबद्यल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे तसा ठरावी मी सभागृहा पुढे ठेवत आहे.

श्री.वसंत देशमुख : मागील बैठकीत स्थगित केलेले विषय स्थागितच ठेवले आहेत काय याची माहिती देण्यात यावी. तसे पत्र प्रशासनास दिले आहे खुलासा व्हावा.

मा.महापौर : मागील बैठकीत जे प्रस्ताव स्थगीत केले होते त्या बैठकीच्या इतिवृत्तात आज मंजुरी मिळेल .पुढील बैठकीत प्रशासकीय माहितीसह सदरचे प्रस्ताव ठेवण्यात येतील.

श्री.महादेव सुर्यवंशी : महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यां संदर्भात मी मागीतलेली माहिती १५ दिवसाचे आत देण्यांत येईल असे सांगितले होते. परंतु मला पुरविण्यात आलेली माहिती अपूर्ण आहे.वर्ग -४ कर्मचाऱ्यांची माहिती मिळालेली नाही.

मा.महापौर : उप आयुक्त (प्र) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : स.सभासदांना जात, संवर्ग निहाय माहिती अपेक्षित आहे. वर्ग-४ कर्मचाऱ्यांचे सेवापट विभागीय कार्यालयात पाठविलेले आहेत. संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना याबाबत सूचना दिलेल्या आहेत. विभागीय अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त करवून घेवून १५ दिवसाचे आत देण्यांत येईल.झोन कार्यालयाला सूचना दिल्या आहेत.

मा.महापौर : ८ ते १० दिवसाचे आत माहिती देण्यात यावी माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्याविरूध्द कार्यवाही प्रस्तावित करावी.

श्री.हमीद ताबा : तीन अधिकारी कर्मचाऱ्यांना सस्पेंड करण्यात आले होते. त्यांच्या चौकशीबाबतची माहिती देण्यात यावी.

श्री.अफसर खान : इतर विभागाची चौकशी करण्याचे ही आपण आदेश दिले होते. किती विभागाची आपण चौकशी केली नसेल तर का नाही चौकशी करणाऱ्या

अधिकाऱ्यांवर दबाव येत आहे असे समजते. दोषी अधिकाऱ्यांवर पडदा टाकण्यात येवू नये.

मा.महापौर : सध्या चौकशी चालू आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर सभागृहा समोर सर्व माहिती ठेवण्यात येईल पूर्ण माहिती दिल्याशिवाय सभागृहात प्रस्ताव ठेवला जाणार नाही विषय क्र.१ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

दिनांक २०-५-९९ ची सर्वसाधारण सभा दिनांक २५-५-९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.४१/२**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक १८-२-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.२३४/५ अन्वये विभागीय अधिकारी पदावर निवड करतांना अधिकारी / कर्मचारी सेवा भरती नियमात करावयाच्या दुरूस्तीस मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

तथापि ठरावात उक्त पदासाठी पदोन्नतीसाठी अनुभव अर्हता ही

१ कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक

२ कार्यालय अधिकाऱ्या संवर्गातील किमान २(दोन) वर्षाचा अनुभव अशी दुरूस्ती करण्यांत आलेले आहे.

तथापि कार्यालय अधिकाऱ्याच्या वर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

करिता पदोन्नतीसाठी अनुभव ही कार्यालयातील अधिक्षकाच्या वर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव अशी दुरूस्ती ठराव २३४/५ मध्ये करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

ठरावातील इतर बाबीत काहीही बदल नाही.

**<u>संवाद :</u>**

श्री.अफसर खान : आर आर मंजूर झाले आहेत काय ? पद्वीधारकांबाबतचा प्रस्तावात उल्लेख आहे. परंतू जे लोक १५ ते २० वर्षापासून काम करत आहेत. त्यांच्या बाबतचा प्रस्तावात उल्लखे नाही. संपूर्ण माहिती देण्यात यावी.

श्री.मुजीब खान : एकंदर किती लोक काम करत आहेत, त्यांचा अनुभव काय याचा खुलासा पाहिजे. त्यानंतर ठराव समोर आणला पाहिजे.

श्री.गिरजाराम हाळनोर : ज्या वेळेस आर आर बसविण्यात आले त्यावेळी अभ्यासपूर्ण आर आर तयार केले गेले नाहीत काय पुन्हा पुन्हा दुरूस्त्या का करण्यात येतात. एखाद्या माणसाचे हितसंबंध जपण्यासाठी दुरूस्त्या केल्या जात आहेत. बनविलेले आर आर बरोबर नाही प्रशासनाचे म्हणणे आहे काय ?

श्री.प्रकाश निकाळजे : यास आमचा विरोध आहे. एका विशिष्ट माणसाचे हितसंबंध जोपासण्यासाठटी हा प्रस्ताव आलेला आहे.

श्री.महादेव सुर्यवंशी : आर आर मध्ये दुरूस्ती करावयाची आवश्यक का भासली यात दुरूस्ती रकण्यात येवू नये.

श्री.रशिद खान (मामू) : तत्कालीन प्रशसकांनी आर आर तयार करवून घेतले होते. शासनाने विचारण केली होती की या आर आर सर्वसाधारण सभेची मान्यता आहे काय ? यापूर्वीही आर आर मध्ये दुरूस्त्या करण्यांत आलेल्या आहेत. स्टेनोग्राफर्सना प्रमोशन्स नाहीत. आर आर मध्ये दुरूस्ती करातंना स्टेनोग्राफर्सना त्यांच्या पुढील वेतन श्रेणीची पदे भरतांना प्रमोशनसाठी संधी द्या ावी. तशी प्रस्तावात दुरूस्ती करून नंतरच दुरूस्त प्रस्ताव सभागृहात मांडावा. सांस्कृतिक अधिकारी ,जनसंपर्क अधिकारी यांच्या प्रमाशन बाबतही प्रस्तावात दुरूस्ती करावी.

उप आयुक्त (प्र) : सेवा भरती नियमास शासनाची मंजुरी आहे. कोणत्याही कायद्यात परिस्थितीनुसार बदल होत असतांना १००% पदोन्नतीने पदे भरण्याची तरतुद विभागीय अधिकारी कॅडरमध्ये आहे. कार्यालय अधिक्षक पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. ती पदे ६ आहेत मात्र भरावयाची पदे १२ आहेत. या पदांसाठी सक्षम उमेदवार उपलब्ध व्हावेत यासाठी २८-२-९९ ला ठराव ठेवलेला होता. टायपीस्टच्या चुकीमुळे २ वर्ष असे लिहीले गेले. त्यामुळे दुरूस्तीचा ठराव सादर करण्यात आला.

श्री.मुजीब खान : खुलासा बरोबर नाही. डेलीविजेसवर किती काम करतात, प्रमाशन किती लोकांचे झाले याचा खुलासा व्हावयास पाहिजे.

मा.महापौर : हा विषय स्थगित ठेवण्यात येतो. स.रशिद मामू यांनी सुचविलेल्या दुरूस्त्यासह पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करावा.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सविस्तर माहितीसह सदर प्रस्ताव आगामी सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा.

**विषय क्र ४२/३**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.के.एम.मोईनोद्दीन यांची नाका कारकून म्हणून प्रथम नियुक्ती दिनांक १३-५-६३ रोजी झालेली आहे. ते १४-६-७९ पर्यंत कामावर होते. परंतू दिनांक १५-६-७९ पासून ते खाली दर्शविल्या प्रमाणे रजेवर होते.

१ आ.क्र./आस्था-१/५१२९/७९ दिनांक १३-९-७९ नुसार

अ) १५-६-७९ ते २८-६-७९ (१४ दिवस खास रजा)

ब) २९-६-७९ ते १४-१२८१ बिना पगारी रजा

अ. आ.क्र./आस्था-१/८२७३/८१ दिनांक ३०-१२-८१ नुसार दिनांक १५-१२-८१ ते १४-६-८४ पर्यंत बिना पगारी रजा.

संबंधिताने दिनांक २५ मे ८४ च्या अर्जान्वये पुढील दोन वर्षाची रजा वाढवून देणेसाठी व धारणाधिकार वाढवून देणेसाठी विनंती केली होती. तथापी कार्यालयाने जा.क्र./७४४८/८४ दिनांक १७-५-८४ नुसार त्यांची विनंती अमान्य केली व म. ना. से (रजा) नियम १९८१ चे नियम १६ चे अनुषंगाने त्यास कळविण्यात आले की, त्यांनी ५ वर्ष सलग रजा उपभोगली असल्यामुळे त्यास पुढील रजा देय रहात नाही व धारणधिकार संपविण्यात आला.

त्यानुसार संबंध्ािताचा एकूण सेवा कालावधी कालावधी खालील प्रमाणे येतो. दिनांक १३-५-६३ ते १४-६-८४ = २१ वर्ष १ महिना. तथापी कार्यालयातर्फे त्यास धारणाधिकार संपविण्यात आल्याचे कळविण्यात आलेले आहे.

संबंधित कर्मचारी यांनी त्यांचे दिनांक ३१-१०-९६ च्या अर्जाद्वारे त्यास दिनांक २५-६-८४ पासून इनव्हॅलीड पेन्शन मंजुर करणेसाठी विनंती केली व सर्व कागदपत्रे सादर केली, अर्जदाराने त्यास म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम १९८२चे नियम ६८ नुसार पेन्शन मंजुर करण्याची विनंती केली.

त्यानुसार दिनांक ३०-३-९८ च्या पत्रान्वये रूग्णता सेवा निवृत्ती वेतन संदर्भाने वेतन नियम ७२ अन्वये विहित नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र या कार्यालयास पाठवणेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांना कळविण्यांत आले.

त्यानुसार वैद्यकीय मंडळाने त्यांचेकडील पत्रक्र. १३१७ दिनांक १४-७-९८ नुसार पुढील सेवेसाठी अपात्र ठरविले आहे. त्यावर कोणत्या तारखेपासून अपात्र ठरविले याचा उल्लेख नाही. त्यामुळे प्रमाणपत्र २४-६-९८ चे असल्यामुळे त्या तारखेपासून म्हणजे २४-६-९८ रोजी सेवा निवृत्त झालयाचे संबंधिताना कळविण्यात यावे. १५-६-८४ ते २४-६-९८ या कालावधीत ते कामावर हजर झालेले नाही. यापूर्वी त्यांना ५ वर्षाची असाधारण रजा मंजूर केलेली आहे. त्यामुळे आता पुन्हा असाधारण रजा नियमानुसार मंजुर करता येणार नाही. मात्र सेवा निवृत्तीच्या तारखेपर्यंत त्यांच्या महानगरपालिकेतील सेवेशी संबंध असल्याचे दर्शविल्याशिवाय सेवानिवृत्त प्रकरण मंजुरीसाठी पाठविता येणार नाही. त्यामुळे धारणाधिकार संपविण्यात आल्याचे आदेश रदद् करून या प्रकरणात विशेष बाब म्हणून १५-६-८४ ते २४-६-९८ कालावधीची विशेष असाधारण रजा मंजुर करावी सदरचा कालावधी हा सेवानिवृत्ती वेतन अथवा इतर कोणत्याही कारणासाठी धरण्यांत येवू नये करिता सर्वसाधारण सभेकडे प्रकरण मंजुरीस्तव सादर.

<u>**संवाद :**</u>

श्री.अविनाश कुमावत : हे प्रकरण काय आहे याचा प्रथम खुलासा व्हावा.

मा.महापौर : मुख्य लेखा परिक्षक यांनी खुलासा करावा.

मुख्य लेखा परिक्षक : सदर कर्मचारी हे १९६३ पासून ७९ पर्यंत नगरपालिकेत सेवेत होते. ७९ पासून ८४ पर्यंत ते कामावर नव्हते. ८४ ला कामावर घेतांना त्यांचे लिन नामंजुर केले होते. परंतू पेन्शन कार्यवाही झालेली नव्हती. १९९६ मध्ये त्यांनी इनव्हॅलिड पेन्शन मंजूर करावी असा त्यांनी अर्ज दिला होता. मेडीकल बोर्डाने त्यांना इनव्हॅलिड पेन्शन द्यावी असे प्रमाणपत्र दिलेले आहे. १९७९ ते ८४ पर्यंतची त्यांना रजा मंजूर केलेली असली तरी त्यांना सेवेतून कमी केले नव्हते. त्यांचा लिन रद्य केला होता.

श्री.मिरा सलामी : १९९८ पर्यंतचे ऑडीट झालेले आहे. लेखापरिक्षण अहवालात या संदर्भाने आक्षेप का घेण्यात आले नाही.

मुख्य लेखापरिक्षक : ऑडीटसाठी ही केस अद्या ाप आलेली नाही. प्रकरण चालू असतांना ऑडीटकडे येत नाही.

श्री.महादेव सुर्यवंशी : तब्बल १९ वर्षाने प्रशासन जागे झाले हे प्रकरण १४ वर्षानंतर समोर आलेले आहे. ५ वर्षाची रजा घेतलेली आहे. १९ वर्ष प्रशासनाने यावर काय कार्यवाही केली हा महत्वाचा मुद्या आहे. अशा आणखी किमती केसेस आहेत.

श्री.मोहसिन अहमद : सदराचा कर्मचारी हा घाटी इस्पीतळात उपचार घेत असून त्याची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. सध्या तो ऑक्सीजनवर आहे कधी त्याचा मृत्यु होईल हे सांगता येत नाही. तो केवळ पेन्शन मागत आहे. त्याच्याकडे औषधासाठी पैसाही नाही ही बाब पहाता त्याची इनव्हॅलीड पेन्शन मंजुर करण्यात यावी.

श्री.अविनाश कुमावत : एकंदर परिस्थिती पहाता ठराव मंजुर करण्यांत यावा.

श्री.अलका पाटील : ठराव मंजुर करण्यास हरकत नाही.

श्री.गौतम खरात : रिटायरमेंट दिल्यानंतर त्यांच्या वारसदारास इतर कोणतेही फायदे वा अनुकंपा धर्तीवर नोकरी देण्यात येवू नये. तशी ठरावात दुरूस्ती करावी व पेन्शन द्यावी.

श्री.अफसर खान : मंजुरी देण्यास हरकत नाही. त्यांना इतर सवलती द्यावी की देवू नये हेही ठरवावे.

श्री.नरेंद्र पाटील : माझे असे स्पष्ट मत आहे की, पेन्शन व्यतिरिक्त इतर कोणता ही फायदा मनपाच्या माध्यमातून देण्यात येवू नये.

श्री.महादेव सुर्यवंशी : पेन्शन देण्यात यावी परंतू इतर कोणत्याही सवलती देवू नयेत.

मा.महापौर : या सभागृहाची सहानुभुती लक्षात घेता विशेष बाब म्हणू्न सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो. इतरही अशा प्रकारच्या केसेस असतील तर त्या सभागृहासमोर ठेवाव्यात सदर व्यक्तीस मनपाच्या माध्यमातून इतर कोणताही फायदा न देता केवळ प्रन्शन मिळेल या अटीसह सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाका कारकून श्री.के.एम.मोईनोद्दीन यांचेकडील दिनांक ३१-१०-९६ च्या विंनती अर्जानुसार सेवानिवृत्ती प्रकरण मंजुर करणेसाठी श्री.के.एम.मोईनोद्दीन यांना सेवा निवृत्तीच्या तारखेपर्यंत त्याचा महापालिकेतील सेवेशी संबंध असल्याचे दर्शविल्याशिवाय संबंधिताचे सेवानिवृत्ती प्रकरण मंजुरीसाठी पाठविता येणार नसल्याचे धारणाधिकार संपविण्यात आल्याचे आदेश रदद् करून सदरचा कालावधी हा सेवानिवृत्त वेतन अथवा इतर कोणत्याही कारणासाठी धरण्यात येवू नये अटीवर विशेष बाब म्हणू्न दिनांक १५-६-८४ ते २४-६-९८ पर्यंतचा कालावधी विशेष असाधारण रजा म्हणून मंजूर करण्यास व सेवा निवृत्तीचे प्रकरण मंजुरीस पाठवल्यास सर्वानुमते मंजुरी येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेची स्थापना ८-१२-८२ रोजी झ ाली त्या नंतर शहराचा झपाटयाने विस्तार झाला . शहरातील नागरीकांना प्राथमिक सुख सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम महानगरपालिकेचे असल्यामुळे शहराच्या वाढत्या विस्तारासोबत वाढत्या लोकसंख्येला आहे. त्या कर्मचाऱ्यांकडून सेवा उपलब्ध करून देतांना अडचणी निर्माण झाली होती. त्यामुळे वर्ग ४ सवंर्गात मोठया प्रमाणावर आवश्यकतेनुसार दैनिक वेतनावर कर्मचारी नियुक्त करून कामे करून घेण्यात येत आहेत. तसेच वर्ग -३ संवर्गातील आहे त्या कर्मचाऱ्यांकडून व ज्या ठिकाणी कर्मचारी नियुक्त करणे आवश्यकच आहे अशा ठिकाणी फार कमी प्रमाणावर दैनिक वेतन कर्मचारी नियुक्ती करून कामे करून

घेण्यात येत आहेत. त्यामुळे वर्ग -३ संवर्गातील कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण मोठया प्रमाणावर पडत आहे.

शहराचा विस्तार झाल्यामुळे कार्यालयीन कामात सुसुत्रता आणण्यासाठी कामाची विभागणी करून नविन उप विभाग निर्माण झाले . परंतू त्यासाठी वर्ग -३ संवर्गातील कर्मचाऱ्यांची पदे निर्माण केलेली नाहीत जसे की, कार्यकारी अभियता (स्लम) अतिरिक्त शहर अभियता, विभाग क्र.८ पाणी पुरवठा -२ ,ड्रनेज -२ ,विद्युत -२ , छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्राहलय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, जलतरण तलाव, गरवारे क्रीडा संकुल, विविध वाचनालये, व्यापारी संकुल, आरोग्य केंद्र इ नविन विभाग निर्माण झाले आहेत व काही निर्माण होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे प्रत्येक विाागाचे काम योग्यरित्या होण्यासाठी व नागरीकांना प्राथमिक सोयी चांगल्या प्रकारे उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रस्तावित पदे निर्माण करणे गरजेचे आहे.

तसेच सध्या दैनिक वेतनावर कार्यरत कर्मचाऱ्यांना जे की, आवश्यक अर्हता धारण करीत आहेत त्यांना सेवेत कायम करण्याच्या दृष्टीने पद निर्मिती करणे गरजेचे आहे.

झा समितीच्या शिफारशीनुसार तसेच सफाई कर्मचाऱ्यांकडून घ्यावयाच्या कामाच्या मापदंडानुसार तयार करण्यांत आलेल्या आकृतीबंधात आवश्यक त्या विविध पदाची निर्मिती प्रस्तावित करण्यात आली आहे.

तथापी आकृतीबंधास अद्या ाप अंतिम मंजुरी प्रदान झालेली नाही.

महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होत असून विविध मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नानतून आस्थापनेवरील होणाऱ्या खर्चाचे प्रमाण ठरवून दिलेल्या मापदंडाच्या आतच राहीले.

सोबत जोडलेल्या प्रपत्रात प्रस्तावित करण्यांत आलेल्या पदाची पदनिहाय संख्या वेतनश्रेणी नमुद करण्यात आली आहे.

करिता सोबतच्या प्रपत्रानुसार प्रस्तावित पदनिर्मितीचा प्रस्ताव निर्णयास्तव व मान्यतेस्तव सादर. आकृतीबंध, अतिमतः मंजुर होते वेळी उक्त पदे त्यातुन वगळण्यात येतील.

**प्रस्तावति पदाचा संवर्गनिहाय गोषवारा**

| अ.क्र | पदाचे नांव | पदांची संख्या | वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | उप अभियंता (विद्युत) | १ | २२००-४००० | |
| २ | विभागीय अधिकारी | १ | २२००-३७०० | |
| ३ | काया्रलयीन अधिक्षक | ५ | १६४०-२९०० | |
| ४ | क्युरेटर (पुराणवस्तू संग्रहालय) | १ | २०००-३५०० | |
| ५ | असिस्टंट क्युरेटर | १ | १६४०-२९०० | |
| ६ | सहाय्यक ग्रंथपाल | १ | १४००-२३०० | |
| ७ | ग्रंथालय सहाय्यक | ८ | ९७५-१५४० | |
| ८ | तांत्रिक सहाय्यक | २ | ९५०-१५०० | |
| ९ | कनिष्ठ अभियंता | ६ | १६४०-२९०० | |
| १० | दुय्यम आवेक्षक | ६ | १४००-२३०० | |
| ११ | कृषी सहाय्यक | २ | १३५०-२२०० | |
| १२ | पशुधन पर्यवेक्षक | २ | १२००-१८०० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | इलेक्ट्रीक सुपरवायझर | २ | १४००-२३०० | |
| १४ | मेकॅनिक | २ | १२००-१८०० | |
| १५ | संगणक प्रोग्रामर | १ | १६४०-२९०० | |
| १६ | संगणक ऑपरेटर | ३ | ९५०-१५०० | |
| १७ | गरवारे क्रीडा संकुल व्यवस्थापक | १ | १६४०-२९०० | |
| १८ | ज्येष्ठ स्वच्छता निरिक्षक | १ | १६४०-२९०० | |
| १९ | वरिष्ठ लिपीक | ३ | १४००-२३०० | |
| २० | जकात निरिक्षक | ६ | १४००-२३०० | |
| २१ | उपलेखापाल | ७ | १४००-२३०० | |
| २२ | नाका लिपीक/ लिपीक/रोड कारकुन/लेखा लिपीक/लिपीक-टंकलेखक/ | ४० | ९५०-१५०० | |
| २३ | वाहन चालक | ५१ | ९५०-१५०० | |

**<u>प्रस्तावित वर्ग -४ पदाचा विभाग निहाय व संवर्गानिहाय गोषवारा</u>**

| अ.क्र. | विभागाचे नांव | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सर्व विभागीय कार्यालय | सफाई मजुर/स्त्री/पुरूष | ९१ | ७५०-९४० |
| २ | शिक्षण विभाग | सेवक/सेविका/ वॉचमन | ७८ | ७५०-९४० |
| ३ | सुरक्षा विभाग | वॉचमन | २२ | ७५०-९४० |
| ४ | मालमत्ता विभाग | मजुर/वॉचमन | २४ | ७५०-९४० |
| ५ | मुख्य कार्यालय विविध विभाग | शिपाई | ०४ | ७५०-९४० |
| ६ | आरोग्य विीाग | सेवक/सेविकाउ | ०२ | ७५०-९४० |
| ७ | मलेरिया विभाग | मजुर | ०४ | ७५०-९४० |
| ८ | उद्या ान विभाग | माळी | १७ | ७५०-९४० |
| ९ | पाणी पुरवठा-१ | मजुर | ०५ | ७५०-९४० |
| १० | पाणी पुरवठा-२ | मजुर | ०५ | ७५०-९४० |
| ११ | विभाग क्र.७ (पाणीपटट्री वसुली) | मजुर | ०३ | ७५०-९४० |
| १२ | यांत्रिकी विभाग | क्लिनर/हेल्पर | ०४ | ७५०-९४० |
| १३ | जकात विभाग | जवान/हमाल | ०४ | ७५०-९४० |
| १४ | प्रकल्प विभाग | सेवक | ०१ | ७५०-९४० |
| १५ | बांधकाम विभाग | मजुर | ०३ | ७५०-९४० |
| १६ | शहर अभिंयता विभाग | मजुर | ०४ | ७५०-९४० |
| | | सुतार | ०१ | ७५०-९४० |
| | | गवंडी | ०१ | ७५०-९४० |
| १७ | मुख्यालय | लिफ्टमन | ०२ | ७५०-९४० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | पशुधन विकास विभाग | मजुर | १४ | ७५०-९४० |
| | | मुल्ला | ०२ | ७५०-९४० |
| १९ | वाचनालय | शिपाई/वॉचमन | २५ | ७५०-९४० |
| २० | डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र | शिपाई | ०२ | ७५०-९४० |
| | | स्विपर | ०१ | ७५०-९४० |
| | | माळी | ०१ | ७५०-९४० |
| | | सुरक्षा रक्षक | ०४ | ८२५-१२०० |
| २१ | .छत्रपती शिवाजी पुराण वस्तू संग्रहालय | मजुर | ०४ | ७५०-९४० |
| | | माळी | ०२ | ७५०-९४० |
| | | सुतार | ०२ | ७५०-९४० |
| | | लाईनमन(विद्युत) | ०१ | ९५०-१४०० |
| | | स्विपर | ०२०२ | ७५०-९४० |
| | | गगॅलनी असिस्टंट | ०६ | ९५०-१४०० |
| | | सुरक्षा रक्षक | ०८ | ८२५-१२०० |
| | | बुकिंग क्लार्क | ०१ | ९५०-१४०० |
| २२ | जलतरण तलाव | सेक्शन स्विपर | ०२ | ७५०-९५० |
| | | साईड ब्राशिंन | ०३ | ७५०-९५० |
| | | मजुर/सफाई कामगार | ०१ | ७५०-९४० |
| | | स्त्री सफाई मजुर | ०२ | ७५०-९४० |
| | | शिपाई | ०१ | ७५०-९४० |
| | | वॉचमन | ०२ | ७५०-९४० |
| २३ | गरवारे क्रीडा संकुल | ग्राऊडमन | ०४ | ७५०-९४० |
| | | सुरक्षारक्षक | ०६ | ८२५-१२०० |
| २४ | महापौर निवासस्थान | माळी | ०१ | ७५०-९४० |
| | | सुरक्षारक्षक | ०३ | ८२५-१२०० |
| | | शिपाई | ०३ | ७५०-९४० |
| २५ | आयुक्तांचे निवासस्थान | आचारी | ०१ | ७५०-९४० |
| | | आचारी | ०१ | ७५०-९४० |
| | | मजुर/स्वीपर | ०२ | ७५०-९४० |
| | | माळी | ०२ | ७५०-९४० |
| २६ | वर्ग-१ अधिकारीची निवासस्थान | शिपाई/वॉचमन | १३ | ७५०-९४० |
| | | | ३९७ | |

**संवाद :**

श्री.मोहसिन अहमद : एकीकडे आकृतीबंधाची चर्चा केली जाते व त्यांचवेळी असे प्रस्ताव सभागृहासमोर येतात या पदांमुळे एकंदर किती खर्च होणार आहे. या बाबींचा तपशिल देवून पुढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव ठेवावा. पाचवा

वेतन आयोगही मनपास लागू होणार आहे. त्यामुळे मनपाची आर्थिक परिस्थिती कशी आहे याचाही खुलासा व्हावयास हवा.

श्री.अफसर खान : वर्ग -२,३ व वर्ग-४ ची किती पदे पूर्वीच भरलेली आहे. याची प्रथम माहिती देण्यात यावी. यातील काही जागा पुर्वीच भरलेल्या आहेत काय की नव्याने या संपूर्ण जागा भरावयाच्या आहेत याची माहिती दयावी. आकृतीबंधाबाबतची माहिती मागूनही दिलेली नाही. समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे कय याची माहिती देवून पुढील बैठकीत ठराव ठेवण्यात यावा . मागितलेली माहिती न देता प्रस्ताव आणणे चूक आहे.

श्री.अविनाश कुमावत : ज्या ज्या जागंची आवश्यकता असेत त्या जागा भरण्यात याव्यात या प्रस्तावात सविस्तर माहिती दिलेली नाही. त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी जागा भरलेल्या आहेत काय ? भरल्या असतील तर केव्हा भरल्या याची माहिती दयावी.

श्री.मुजीब आलमशाह खान : सफाई कर्मचाऱ्यांच्या पदांचा प्रश्न समोर आलेला आहे ही पदे भरणे आवश्यक आहे . विभाग क्र.३ चे सफाई कर्मचारी दैनिक वेतनावरून कमी केलेले आहेत. त्यामुळे स्वच्छता बरोबर होत नाही. केवळ विभाग ३चेच कर्मचारी का कमी करण्यात आले इतर झोनचे कर्मचारी कमी का करण्यात आले नाहीत.

मा.महापौर : याबाबतची माहिती आपणांस दिली जाईल प्रथम आपण संबंधित विषयावर बोलावे.

श्रीमती अलका पाटील : जे कर्मचारी १५-१५ वर्षापासून दैनिक वेतनावर काम करत आहेत त्यांच्या सीनियरटी लिस्ट मध्ये घोळ झालेले आहेत.

मा.महापौर : आपण पूरावा सादर करावा. त्यानंतर संबंधितावर कार्यवाही केली जाईल केवळ तोंडी आरोप करू नयेत.

श्री.मुजीब आलम शहा खान : माझ्या विभागात साफसफाई साठी एकही मजुर नाही. सध्या पावसाळयाचे दिवस आहेत घाण साचल्यामुळे रोगराई उद्‌भवू शकते. एका एका झोनला किती माणसे लागतात याचा प्रथम सर्व्हे करण्यांत यावा.

मा.महापौर : आपण संबंधित विषयावर बोलावे इतर विषयावर बोलण्यासाठी स्वतंत्र वेळ दिला जाईल.

श्री.नरेंद्र पाटील : हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. स.स.मोहसिन अहदम यांनी सांगितले की, आकृती बंधात ज्या जागा दाखविल्या त्याच्या १/४ जागा आजच्या प्रस्तावात दाखविल्या आहेत. बरेचसे लोक टेपररी काम करत आहेत. मंजुरांना कामावर लावण्याची पध्दती चुकीची आहे. माझेच नाही तर सर्व सभागृहाचे म्हणणे आहे. की आर्धि नोकर भरती ही आधिच झाली आहे. गेल्या तीन वर्षात अनेक प्रकारची नौकर भरती झालेली आहे. भरावयाच्या जागा नेमक्या कोणत्या विभागासाठी आहे याचा ठरावात उल्लेख नाही सर्व माहिती देवून नंतरच सभागृहात ठेवावा.

श्रीमती जाहेदा बेगम : स्वच्छता कर्मचाऱ्यांना हॅन्डग्लोव्हज पुरवावेत.जे अनेक दिवसांपासून दैनिक वेतनावरच काम करत आहेत त्यांचाही विचार करावा.

श्री.गिरजाराम हाळनोर : प्रस्ताव पूर्णपणे चूकीचा मांडला गेला आहे. एकाही पदाची आवश्यकता नाही.फायरब्रिगेडच्या पदाचा यात उल्लेख नाही. ५२ वाहन चालकांची पदे मागितली गेली आहेत. परंतू जेसीबी चालकांचा स्केल वेगळा आहे तो प्रस्तावात यावयास हवा होता.त्यांचा या वाहन चालकांच्या पदात

समावेश केला गेला आहे काय याचा बोध होत नाही. यांत्रिकी विभागात उपअभियंता त्यांच्या नंतर हेल्पर /मॅकेनिक आहेत मधल्या पोस्ट नाहीत. संपूर्ण अभ्यास करून पुढील बैठकीत प्रस्तांव मांडण्यात यावा.

श्री.स.अली मिरा सलामी : प्रस्तावाप्रमाणे ७००-२०२५ लेबर लागणार आहेत प्रस्तावात दर्शविलेली बेरीज चुकीची आहे. विकास कामे पार पाडण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद नाही म्हणतात मग यांचे पगार कसे करणार पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे ही पदे भरण्यास यावर किती खर्च होणार आहे याची माहिती द्या ावी यापूर्वी किती कर्मचारी भरले आहेत याची माहिती दयावी.

श्री.अब्दुल रशिद खान (मामू) : पदाधिकारी स.नगरसेवक यांच्याकडे गरीब नोकरी मागण्यासाठी येतात त्यांना दैनिक वेतनावर घेण्याची शिफारस आपण करतो ते लोक ॲडजस्ट करण्यासाठी हा शॅाटकट असावा असे वाटते. आकृती बंधच मंजुर करावा. बऱ्याचश्या नगरसेवकांनी नोकरी संदर्भाने पत्रे दिलेली आहेत. मोहसिना बिल्कीस यांनीही पत्र दिले होते.

श्री.मोहसिना बिल्कीस : त्यांनी त्यांचे शब्द परत घ्यावेत. नोकरी संदर्भाने मी कोणतेही पत्र दिलेले नाही.

श्री.रशिद खान मामू : ज्यांनी ज्यांनी नोकरी संदर्भाने पत्रे दिली असतील त्यांची माहिती पुढील बैइकीत देण्यात यावी.

श्रीमती नुरजहाँबेगम : आपण आपल्या परिने भरती करावी.

श्री.रशिद खान मामू : कोणाचाही अवमान करण्याचा माझा हूतू नव्हात श्रीमती बिल्कीस यांनी कदाचित पत्र दिले नसेल परंतू बऱ्याचशा स.नगरसेवकांनी पत्र दिलेले आहेत.

मा.महापौर : रशिद मामू यांनी आपले शब्द परत घेतलेले आहेत.

दुपारी १.२५ वाजता ३० मिनीटांसाठी सभा तहकूब केल्याचे मा.महापौरांनी घोषित केले.

दुपारी १.२५ वाजता तहकुब केलेली सभा परत २.१५ वाजता मा.महापौरांनी अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री.अ.रशिद खान (मामू): मोहसिना बिल्कीस यांनी त्यांच्या मुलास नौकरी लावण्यासाठी पत्र दिलेले होते . परंतू मा. आयुक्तांनी सांगितले की यामुळे तुमचे नगरसेवक पद धोक्यात येवू शकते त्यामुळे त्यांनी ते पत्र परत घेतले.

श्रीमती मोहसिना बिल्कीस : हा आरोप खोटा आहे मी कोणासही नोकरी लावण्यासाठी पत्र दिलेले नाही. महापौरांनी न्याय द्यावा (श्रीमती मोहसिना बिल्कीस मा.महापौरांचे आसनासमोर बसतात)

श्री.संजय जोशी : आकृतीबंध मंजुर करून घेण्यात यावा तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर : विद्युत व मेकॅनिक हे विभाग एकत्र करून एक कार्यकारी अभियंता यांत्रिकी पद निर्माण करावे.

श्री.अविनाश कुमावत : विद्युत आणि यंात्रिकी विभागातील वाढते काम पाहता एक कार्यकारी अभिंयत्याचे पद निर्माण करण्यात यावे. यांत्रिकी विभागात पाणी पुरवठा व जायकवाडी यंत्र सामुग्रीचा देखिल समावेश होवू शकतो.

श्री.भगवान घडामोडे : आकृतीबंधासाठी कमेटी स्थापन केली होती त्याचे काय झाले याची माहिती देण्यांत यावी.

मा.महापौर : सदर प्रस्तावांत तात्पुरती मंजुरी देण्यात येते आकृतीबंधा संदर्भाने स्वतंत्र बैठक घेण्यांत येईल.

श्री.गिरजाराम हाळनोर : त्यात जेसीबी चालकांचाही समावेश करण्यांत यावा.

मा.महापौर : सर्व सदस्यांच्या सुचनांचा विचार करून प्रस्तावात समावेश करून मंजुर करण्यांत येतो. आकृतीबंधासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल.

सौ.लता दलाल : हा प्रस्ताव मंजुर करत असतांना शहराचा वाढलेला व्याप लक्षात घ्यावा. शहरात प्रत्येक चौकात सिग्निल्स बसविण्यांत आलेले आहेत. त्यावर देखरेख करण्यासाठी विद्युत सुपरवायझर तथा वाहतूक संकेत निरिक्षक पद असणे आवश्यक आहे. अशा कर्मचाऱ्यांची नियुक्त करत असतांना विभागाचा त्यात समावेश करण्यात यावा. इतर पदांप्रमाणेच हे पद निर्माण करणे आवश्यक आहे. पात्र कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीभरण्यात यावे. आपल्याकडे दोन बांधकाम विभाग आहे. रस्त्यांची छोटी मोठी दुरूस्ती करण्यासाठी स्वतंत्र विभाग तयार करण्यांत यावा. या प्रस्तावात नोंद घेण्यात यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : महापौर पद महत्वाचे आहे. त्यांना स्टेनो नाही. त्यांना स्टेनो असावा. उपमहापौरांना देखिल स्टेनो असावा.

मा.महापौर : स.सौ.लता दलाल व महादेव सुर्यवंशी व स.नगरसेवक यांच्या सुचनांचाही ठरावात नोंद घ्यावी. या दुरूस्त्यांसह विषय क्र.४ सर्वानुमते तात्पुरती मंजुर करण्यांत येतो. आकृतीबंधाची स्वतंत्र बैठक घेण्यांत येईल.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराचा झपाटयाने विस्तार झाला असून शहरातील नागरिकांना प्राथमिक सुखसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व कार्यालयीन कामात सुसुत्रता आणण्यासाठी प्रस्तावित अ.क्र.१ ते २४ पर्यंतची आणि वर्ग -४ ची अ.क्र.१ ते २६ पर्यंतची पदांना तात्पुरत्या स्वरूपात निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. या शिवाय सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खालील पदे तात्पुरत्या स्वरूपात निर्माण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | विभागचे नांव | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | यांत्रिकी यांत्रिकी पा.पु. व यांत्रिकी जायकवाडी | कार्यकारी अभिंयता | १ |
| २ | यांत्रिकी | जेसीबी चालक | २ |
| ३ | विद्युत | सुपरवायझर तथा वाहतुक संकेत निरिक्षक | १ |
| ४ | लघुलखक | सभाकक्ष | २ |

यापुर्वी कर्मचारी आकृतीबंधा बाबत प्रस्ताव सभागृहाचे मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. त्याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ४४/५ :**

(प्र) कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.इंदिरानगर (स्लम) येथील उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामा करीता रू.१३,२१,२१६/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम दरसुची सन ९८-९९ तयार करण्यांत आले असून या कामास मा. आयुक्त यांनी दिनांक ७-५-९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील कामाचा खर्च स्लम नविन डांबरी रस्ते शिर्षका अंतर्गत असलेल्या तरतुद रूपये ९०.०० लाखातून करण्यांत येईल.

तरी अंदाजपत्रक रू.१३,२१,२१६/- यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर (स्लम) भागात उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रू.१३,२१,२१६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५/६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिंधी कॉलनी मागील ५० फुट विकास योजना रस्ता तयार करणे संबंधी माजी उप महापौर सौ.जोस्ना हिवराळे यांनी मागणी केलेली आहे. सदर रस्ता हा अमरप्रित हॉटेल ते शहनुरमियाँ दर्गा रोड व सेव्हनहिल ते गजानन महाराज या रोडला जोडणारा सलग रस्ता आहे. हया विकास योजना रस्त्यावर ९०% अतिक्रमाण झालेले आहे. परंतु हा रस्ता जालना रस्त्याला समांतर असा रस्ता असल्याने या विकास योजना रस्त्याचे भुसंपादन झाल्यास जालना रोडवरील बरीच वाहतुक कमी होईल व सदर भागातील नागरीकांची गैरसोय दुर होईल.

करिता सदर रस्त्याचे भुसंपादनास लागणाऱ्या खर्चासह भुसंपादन करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अमरप्रित हॉटेल ते शहानुरमियाँ दर्गा रोड व सेव्हनहिल ते गजानन महाराज मंदिर या रोडला जोडणारा सिंधी कॉलनी मागील ५० फुट रूंद विकास योजना रस्ता विकसीत करण्यास या रस्त्याने बाधित मिळकतीचे भुसंपादनाची कार्यवाही करण्याकरीता भुसंपादनाच्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६/१ :**

अतिरिक्त शहर अभियता यांनी प्रस्ताव सादर केला की, मा.सभापती श्री.नरसिंग ढगे यांनी पत्र देवून सुतगिरणी चौक सौंदर्यीकरणा अंतर्गत या चौकात पैठण येथील तिर्थखांबाची प्रतिकृती बसविण्यात यावी व सदर चौकाचे ज्ञानेश्वर चौक असे नामभिदान करण्यांत यावे म्हणून मागणी केली आहे.

मा.आयुक्त यांनी सदर चौकाचे ज्ञानेश्वर चौक असे नामभिदान करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेच्या धोरणत्मक निर्णयास्तव प्रस्ताव सादर करण्यांत यावा असे सुचविले आहे.

करिता सूत गिरणी चौकात सौंदर्यीकरणा अंतर्गत पैठण येथील तिर्थखांब बसविणे बाबत तसेच सदर चौकाचे ज्ञानेश्वर चौक असे नामभिदान करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या धोरणत्मक निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी चौक सौंदर्यीकरणाअंतर्गत या चौकात पैठण येथील तिर्थखांबाची प्रतिकृती उभारण्यास आणि या चौकास "ज्ञानेश्वर चौक" असे नामभिदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## सभागृहातील चर्चा

श्री.मुजीब आलम शाह खाँन : विभाग क्र.३ मधून मजुर काढण्यात आलेले आहेत. त्यामुळे वेळेवर साफसफाई होत नाही. यामागे काय राजकारण आहे. एकटया विभाग ३ चेच मजूर का काढण्यात आले.

श्रीमती फरहत बानो : विभाग ८ मध्ये दररोज सांगितले होत परंतू काम होत नाही. या नाल्या साफ केल्या जात नाहीत. याबाबत आयोग्य वैद्यकीय अध्किारी यांना सांगितले होते परंतू काम होत नाही. या नाल्यांमध्ये २५-२५ ट्रक कचरा साठलेला आहे. वारंवार सांगूनही कामे होत नाहीत. विभागीय अध्किाऱ्यांची बदली करण्यांत यावी. त्यांना बोलता येत नाही, सांगितलेले समजत नाही. कब्रस्तानात कंबरे इतके गवत वाढलेले आहे. त्यामुळे तेथे साप निघतात. याबाबत कार्यवाही व्हावी. साफसफाई नंतर त्या भागातील ५-६ लोकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात. फक्त मेनरोड साफ करतात. गल्ल्यांमध्ये स्वच्छता होत नाही.

श्री.मोहसिन अहमद : स.स.श्री.मुजीब आलमशाह खाँन यांनी उचललेला प्रश्न बरोबर आहे. विभाग क्र.३ मोठा असल्याने त्याचे विभाजन करण्यात आले. विभाग क्र.८ मध्ये दररोज साफसफाई होत नाही. पावसाळयाचे दिवस लक्षात घेता साफसफाई ,गटार साफसफाई होणे आवश्यक आहे. विभागीय अधिकारी यांना बरोबर दिसत नाही, ऐकावयास येत नाही त्यांची बदली करण्यात यावी.

श्रीमती नुजहाँ बेगम : मागील आठ दिवसांपासून साफसफाई बाबत मी सांगत आहे. परंतू साफसफाई होत नाही. कमरे एवढाले कमऱ्याचे ढीग साचलेले आहेत. मोकळया जागांवरती कचरा साठवलेला आहे. अशा मालमत्ता धारकांना नोटीसा देण्यांत याव्यात व त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यांत यावी. दोन दिवसांत साफसफाई न झाल्यास मी उपोषण करेन.

श्रीमती आबेदा बेगम : वार्ड क्र.२८ मधील नाल्याची सफाई करावी.

श्रीमती बिल्कीस बेगम :माझ्या वार्डात दैनंदिन साफसफाई होत नाही त्यामुळे कचरा साठलेला आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सांगितले आहे परंतू कामे होत नाहीत. शहाबाजार नाल्यात मोठया प्रमाणावर कचरा साठलेला आहे तो उचलण्यात यावा. पावसाळयापूर्वी ही कामे व्हावीत. औषध फवारणी झ ाालेली नाही. कचऱ्या कुंडयासाठी बरेच अर्ज दिलेले आहेत. परंतू तक्रारी

दूर होत नाहीत. ड्रेनेज लाईन्स चोकअप झालेल्या आहेत. त्या साफकरवून घेण्यांत याव्यात.

श्रीमती अलका पाटील : घाटी भा ागातील कचराकुंडया दररोज साफ होत नाहीत. कचरा कुंडयामध्ये कचरा जाळण्यात येतो. त्यामुळे सगळीकडे धुर पसरतो. हे बंद करण्यांत यावे. कर्मचाऱ्यांना हॅन्ड ग्लोव्हज देण्यांत यावेत.

श्रीमती जाहेदा बेगम : माझ्या वार्डात साफसफाई होते. त्याबाबत तक्रार नाही . परंतू लहान गाडया तुटलेल्या आहेत त्या दुरूस्त करण्यांत याव्यात.

श्री.स.अली मिरा सलामी : शहरात अशातच शुन्य कचरा मोहिम राबविण्यात आली होती. परंतू ती फेल झाली. त्यामुळे मोठया प्रमाणत कचरा साठला आहे, त्यामुळे आरोग्याचा प्रश्न उद्‌भवणार आहे.

श्रीमती जाहेदा बेगम : केवळ तक्रारी करण्यापेक्षा सकाळी लवकर वार्डात फिरावयास पाहिजे असे किती स.नगरसेवक करतात हे याचा पण विचार करावयास पाहिजे.

श्री.प्रकाश निकाळजे : विभाग क्र.४ मध्ये बरोबर साफसफाई होत नाही. याबाबत वेळोवेळी तक्रारी केलेल्या आहेत. माझ्या वॉर्डात स्लम आहेत त्याची साफसफाई होत नाही.

श्री.अफसर खान : ही संपूर्ण शहराची गोष्ट आहे. पावसाळा सुरू झाला आहे. विभागीय अधिकारी व स्वच्छता निरिक्षक बर कमी असल्याचे नेहमी सांगतात विभागीय कार्यालयातून काम करणारे दैनिक वेतन कर्मचारी हे कमी करण्यात आलेले आहेत. त्यांना परत कामावर घेण्यात यावे. तुटलेल्या हातगाडया तातडीने दुरूस्त करण्यांत याव्यात दोषी ५-१० होते त्यांची शिक्षा सर्वांना का द्यावयाची दैनिक वेतनावरील लोकांना पुन्हाः घ्यावे. वृक्षारोपणासाठी देखिल दैनिक वेतनावर मजूर घेण्यात यावे.

मा.महापौर : उप-आयुक्त (म) यांनी खुलासा करावा. गाडी खरेदी करण्याचे आदेश दिलेले आहेत. सफाई कर्मचाऱ्यांना हातमोजे, बूट देण्याचे आदेश दिलेले आहेत. सुरत पॅटर्नवर घेतलेले कर्मचारी कमी का केले याचा खुलासा ते करतील.

उप आयुक्त (म) : विभागीय कार्यालयाकडून सुरत पॅटर्न अंतर्गत दैनिक वेतनावर लावलेले कर्मचारीच केवळ कमी केलेले आहेत. शहरातील एकंदर चटई क्षेत्र ३५६५१०५ चौरस मिटर ऐवढे आहे. झा समिती अहवालानुसार साधारणतः ७८० मजूर आवश्यक आहेत प्रत्यक्षात ५३१ मजूर काम करत आहेत हा भाग जास्त वाढल्यामुळे शहर अभियता, अति.शहर अभिंयता यांचेकडून क्षेत्रची खात्री करून घेण्यात येत आहे. शहरातील गटारींची लांबी साधारणतः ३,२४,००० रनींग मिटर ऐवढी आहे. यासाठी ४६६ कर्मचारी आवश्यक आहेत. प्रत्यक्षात ३६० कर्मचारी कार्यरत आहेत. या एरियाची तपासणी कार्य.अभियंता (पापू) यांचेकडून करवून घेण्यात येईल. आपल्याकडे सध्या २८-३० वाहने आहेत. या वाहनांवर ३०० मजूर पाहिजेत. प्रत्येक वाहनावर ६ मजूर लागतात. बऱ्याच भागात सकाळी व दुपारी कचरा उचलला जातो. मोठया ट्रकवर ७-८ कर्मचारी आवश्यक असतात. कारण गाडीची उंची वाढवलेली आहे. सध्या २०० मजूर आहेत व १०० ची आवश्यकता आहे. प्रत्येक विभागासाठी २०-२५ मजूर दिल्यास साफसफाई चांगल्याप्रकारे होवू शकेल. ४०० जादा मजूर आवश्यक आहेत. परंतू त्याचें व्हेरीफीकेशन चालू आहे.

श्री.मुजीब आलमशाह खान : उप आयुक्त सभागृहाची दिशाभूल करत आहेत. विशिष्ट वॉर्डातीलच मजूर का काढण्यात आले याचा खुलासा व्हावा. सर्वत्र कचरा पडलेला आहे. जाणून बूजून काही वार्डातील लोक कमी करण्यांत आले आहेत.

श्री अफसर खान : प्रत्येक विभागासाठी किती मजुरांची आवश्यकता आहे याची माहिती दयावी. कामावर असलेली माणसे का काढावी लागली याची माहिती देण्यांत यावी.

मा.महापौर : सर्वच विभागातील मजूर कमी करण्यांत आलेले आहेत. सुरत पॅटर्नच्या नावाखाली काही लोकांची भरती करण्यांत आली होती. त्या सर्वांनाच कामावरून कमी केलेले आहे. झालेल्या प्रकरणची चौकशी चालू आहे. ही चौकशी झाल्यानंतर सभागृहापुढे अहवाल ठेवण्यात येईल. काही ठिकाणी भ्रष्टाचार झालेला होता म्हणून कर्मचारी कमी करण्यांत आलेले आहेत. काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी बनविण्यात येत आहे. त्यांना पूर्ववत कामावर घेण्यात येईल. कामावर केवळ १०-१२ कर्मचारी असावयाचे, एकाच्या नावार दुसरा पगार दयावयाचा यासाठी कर्मचारी कमी करावे लागले. शहरातील स्वच्छतेची काळजी घेतली जाईल.

श्री.संजय जोशी : सर्व मजुर कामावर येतात. याची दररोज नोंद घ्यावी. त्यांना ओळखपत्र देण्यांत यावेत.

श्री.मुजीब आलमशाह खान : मा.महापौरांच्या निर्णयाचे स्वागत शहरात साठलेला कचरा साफ कसा होणार केवळ विभाग ८ चेच कर्मचारी कमी का करण्यात आले.

श्रीमती फरहत बानो : माझ्या वार्डात २ नाले आहेत. त्यांची सफाई झालेली नाही. ते केव्हा साफ होणार याची माहिती देण्यात यावी.

मा.महापौर : नाला सफाईचे टेंडर काढून ते काम लवकरात लवकर सुरू करण्यांत यावे.

श्री.महादेव सुर्यवंशी : ब्रिजवाडी भागातील नाल्यांचीही सफाई करण्यांत यावी.

श्रीमती रूख्मणबाई लोखंडे : विभाग क्र.१ मधील भावसिंगपूरा येथील नाल्याच्या साफसफाई बाबत मी पत्र दिले आहे. परंतू ते साफ झालेले नाहीत. या ठिकाणी एका माणसाचा मृत्यु झालेला आहे. ती तातडीने साफ करण्यांचा सुचना दयाव्यात.

श्री.कचरू नवपुते : सुखना नदिच्या किनाऱ्यावरील नागरिकांनी अशातच मनपावर मोर्चा आणला होता. महाराष्ट्र डिस्टलरी व इतर कारखान्यातील पाणी बाहेर सोडल्याने प्रदुषण वाढत आहे. मोर्चाच्या वेळी दिलेल्या आश्वासनाचा खुलासा व्हावा. महाराष्ट्र डिस्टीलरीला नोटीस देण्यांत यावी.

श्री.संजय जोशी : यासाठी एक स्वतंत्र ठराव घेवून वेगळी पाईपलाईन टाकावी. यासाठी शासनाकडून वेगळे फंडस् घ्यावेत.

श्री.कचरू नवपुते : नारेगांव मधून ड्रनेज लाईन झाल्टा पर्यंत टाकलेली आहे. परंतू ती ट्रिटमेंट प्लॉन्ट अद्या ाप चालू झालेला नाही याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : साफसफाई बरीचशी चर्चा झालेली आहे. कर्मचारी कमी करण्यांचे कारणही सांगितले आहे. स.सदस्यांनी आपआपल्या वॉर्डातील समस्या सांगितलेल्या आहेत.साफसफाई काम करीत असलेल्या लोकांडून अर्ज, फोटा मागविलेले आहेत. मंगळवारपासून त्या लोकांना आपण पुर्ववत कामावर घेवू ज्या वार्डात कचरा साठलेला आहे. अशा वार्डात मी स्वतः संबंधित अधिकाऱ्याबरोबर

पाहणी करेन, विभागीय अधिकाऱ्याबाबत तक्रारी आलेल्या आहेत त्यांची चौकशी करून त्यांची बदली केली जाईल.

श्री.अविनाश कुमावत : कचरा गोळा करण्यासाठी एक घंटा गाडी घेण्यात यावी. जेणेकरून आवाज ऐकून लोक त्या गाडीत कचरा आणून टाकतील.

श्री.गंगाधर गाडे : बोगस कर्मचारी दाखवून ज्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे. त्यांच्यावर कार्यवाही केल्याबाबत सभागृहाने आपले अभिनंदन केलेले आहे. परंतू असे कर्मचारी लावण्यासाठी ज्यांनी परवानगी दिलेली आहे. ते अधिकारीही जबाबदार आहेत विभागीय कार्यालयात जे वरिष्ठ अधिकारी नेमलेले आहेत तेही यासाठी जबाबदार आहेत. प्रत्यक्षात किती कर्मचारी दिलेले आहेत आणि कितीजण काय करत आहेत त्यांची त्यांनी शहानिशा करावयास पाहिजे होती. त्यामुळे विभाग आयुक्तावरही कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर : ज्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला आहे त्यांची गोपनिय चौकशी चालू आहे या भ्रष्टाचारासाठी जे जबाबदार आहेत वा यात त्यांचा सहभाग आहे अशांचीही चौकशी करण्यात येईल.

श्री.मोहसिन अहमद : त्या अधिकाऱ्यांना त्याच जागेवर ठेवून कशी चौकशी करणार त्यांची बदली करण्यांत यावी.

श्री. गंगाधर गाडे : विभाग आयुक्तांना मा. आयुक्तांनी कामे लवकर व्हावीत यासाठी पॉवर डेलीगेट केल्या होत्या.

मा.महापौर : सुखना नदि काठच्या लोकांचा मार्चा काल आला होता त्यात मनपाशी निगडीत २-३ गोष्टी होत्या यात ड्रनेजचे पाणी नदीत जावू नयेत महाराष्ट्र डिस्टीलरीवर कार्यवाही करावी. नारेगांव येथील कचरा कचरा डेपोतच जमा करावा. आजच नारेगांवची पहाणी केली. जेसीबी लावून रस्त्यावरील कचरा उचलण्यात येत आहे. ड्रेनेजच्या पाण्याबाबत निर्णय घेण्यात येत आहे. प्लॅन्टला मंजुरी दिलेली आहे. लवकरच हे काम सुरू करता येईल. महाराष्ट्र डिस्टीलरी कंपनीस नोटीस देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येत आहेत. शुन्य मोहिम सध्या बंद करण्यांत आली आहे.

श्री.गंगाधर गाडे : कालच्या मोर्चात दोन प्रमुख प्रश्न होते. त्यापैकी पहिला प्रश्न ड्रनेजच्या पाण्याचा होता. त्या भागात सातत्याने स. श्री.हरीभाऊ बागडे निवडून आलेले आहेत. ग्रामीण भागातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न ते सोडवू शकलेले नाहीत.

सभागृहाने ठराव करून हा भाग मनपा क्षेत्रात समाविष्ट करून घ्यावा.

श्री.संजय जोशी : मनपा या गावातील नवीन शहराचे घाण पाणी सोडले ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे. ही अतिशय दुर्दवाची गोष्ट आहे. यास जबाबदार मनपा आहे.

श्री.गजानन बारवाल : आपण एम.आय.डी.सी. वर ॲक्शन घ्यावी. यास तीच जबाबदार आहे.

मा.महापौर : हा भाग मनपा हदद्ीत येत नाही. म्हणून आपण या भागास पाणी पुरवठा करू शकती नाही. २८ तारखेस मा. मंत्री महोदयांची बैठक ठेवली आहे. त्यात या विषयावर चर्चा करण्यात येईल. शासनाने या भागास पाणी पुरवठा करण्यासाठी अनुदान द्यावे अशी मागणी आपण करणार आहेत.

## <u>पुरवणी विषय पत्रिका</u>

**विषय क्र.४७ :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासमोरील दर्शनी जागा सध्या तेथे नर्सरी आहे. भुसंपादन करण्यांत यावी व संबंधित जमीन मालका सोबत वाटाघाटी करून तडजोड करावी व जमीन संपादित करण्यांत यावी व उद्घाटन पूर्वी कार्यवाही करावी.

सुचक : श्री.गौतम खरात
श्री.रशिद खान मामू
श्री.नरेंद्र पाटील
श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय
अनुमोदक : श्री.जयवंत ओक
श्री.प्रदिप जैस्वाल
श्री.गौतम लांडगे
श्री.अब्दुल रऊफ
श्री.हमीद ताबा
श्री.गजानन बारवाल
श्री.प्रफुल्ल मालाणी

<u>**संवाद :**</u>

सौ.लता दलाल : आपण जी जमीन संपदन करणार आहोत त्याला किती खर्च येणार आहे. भुसंपादनासाठी जिल्हाधिकरी यांची एनओसी घेण्यात यावी. त्यानंतरच संपादन करण्यात यावे.

श्री.रशिद खान मामू : संबंधित मालक जागा देण्यास तयार आहे. जागेचा मावेजा देवून संपादन करण्यात यावे. हा अशासकीय ठराव आहे खुलासा कशाचा करणार

सहा.संचालक नगर रचना : हया प्रस्तावाबाबत प्रशासनास माहिती नाही.

श्री.गौतम खरात : मागील दहा वर्षापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे काम सूरू आहे. चार वर्षापासून काम अर्धवट पडलेले आहे. या रस्त्यावर समोरच नर्सरी तयार झालेली आहे. मुख्य रस्त्यावरून संशोधन केंद्राकडे जातांना समोरच नर्सरी झालेली आहे. सदर इमारत उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. मुख्य रस्त्यावरून ही इमारत दिसत नाही. यामुळे ही जागा संपादित करावी असा प्रयत्न चाललेला आहे. संबंधित जागेच्या मालकाबरोबर वाटाघाटी करून जागा संपादित करण्यात यावी. या ठरावास मान्यता देण्यांत यावी.

श्री.अविनाश कुमावत : सध्या संपादित करावयाच्या जागेबाबत काही कोर्ट केस चालू होती. याबाबतची माहिती जिल्हाधिकारी यांच्या कडून घेण्यात यावी. ठरावस कोणाचा विरोध नाही.

श्री.महादेव सुर्यवंशी : प्रशासनामार्फत जागेची चौकशी करण्यांत यावी.ठरावास मान्यता प्रदान करण्यांत यावी.

मा.महापौर : ठरावास मंजुरी देण्यांत येते. तथापी या जागे संदर्भात प्रशासनाने सविस्तर माहिती तपासून घ्यावी जिल्हाध्किारी कार्यालयात चौकशी करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या दर्शनी भागा समोरील मिळकत भुसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदर मिळकतीच्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात सविस्तर चौकशी करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८/२** :

लक्ष्मण चावडी येथील चौकाचे नांव प्रबोधनकार चौक असे नांव देण्यांत यावे.

सुचक : सौ.यशोदा धनंजय वाडेकर

अनुमोदक : श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्ष्मण चावडी येथील चौकाचे प्रबोधनकार चौक असे नामाभिदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र.४९/३** :

समर्थनगर येथील चौकात "स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पुर्णाकृती पुतळा महानगरपालिकेतर्फे उभारण्यात आलेला आहे. तरी या रस्त्यास म्हणजेच महात्मा फुले यांच्या पुतळयापासून ते निराला बाजार विवेकानंद कॉलेज मार्गे अदालत रोड पर्यंत "स्वातंत्र्य वीर सावरकर मार्ग " असे नांव देंण्यात यावे.

सुचक : श्री.गिरजाराम हाळनोर

अनुमोदक :सौ.लता दलाल

सौ.यशोदा वाडेकर

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे महात्मा फुले यांच्या पुतळयापासून निराला बाजार विवेकानंद कॉलेज मार्गे अदालत रोड पर्यंतच्या रस्त्यास "स्वातंत्र्य वीर सावरकर मार्ग " असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०/४**

महानगरपालिका विविध मंजुर रेखांकनातील खुल्या जागा हस्तांतरण करून विकास नियंत्रण नियमाप्रमाणे नाममात्र एक रूपया किंमत देवून हस्तांतरण कहरून घेते. परंतू जेव्हा एखादया विश्वस्त संस्थेला अनुज्ञेय वापरासाठी जागा प्रदान करते तेव्हा प्रचलित बाजार भावाप्रमाणे वार्षिक भाडे आकारते. हे सिंगत आहे. करिता प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, त्याच मंजुर रेखंकनातील रहीवाशांच्या धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत विश्वस्त संस्थांना /गृहनिर्माण संस्थांना/ क्रीडा संस्थांना त्याच मंजुर रेखांकनातील खुल्या जागे पैकी अनुज्ञेय वापरासाठभ् जागा प्रदान करतांना भाडे रूपये शंभर प्रती वर्ष आकारण्यात यावे. त्याच मंजुर रेखांकनातील रहिवाशांच्या विश्वस्त संस्था व्यतिरिक्त इतर विश्वस्त संस्थांना ही सवलत लागू करू नये. त्यांचेकडून स्थानिक नागरिकांची कोणाचीही हरकत नसल्यास

प्रचलित बाजार भावा प्रमाणे भाडे आकारण्यात यावे या सवलती फक्त धर्मदाय उददेशांसाठी असलेल्या संस्थांनाच लागू करण्यांत यावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

ही सवलत सन १९८२ नंतरच्या विश्वस्त संस्थांनाच लागू करण्यात यावी.

सुचक : श्री.गिरजाराम हाळनोर

अनुमोदक : सौ.लता दलाल

सौ.यशोदा वाडेकर

**<u>संवाद :</u>**

श्री.गिरजाराम हाळनोर : बरेच रेखांकन मंजुर झालेले आहेत. खुली जागा रू.१/- देवून मनपा हस्तांतर करून घेते. रेखांकनातील जागा ज्यावेळी तेथील रहिवाशी अनुज्ञेय वापरांसाठी मागतात त्यांना नाममात्र रू.१००/- भाडे आकारण्यात यावे. ज्या संस्था नोंदणीकृत आहेत व त्याच भागातील आहेत. त्यांना नाममात्र भाडे आकारून जागा अनुज्ञेय वापरासाठी देण्यात यावी. १९८२ नंतरच्या संस्थाना ही सवलत द्यावी. दुसऱ्यांना जागा देतांना या भागातील लोकांचे एनओसी घेतल्याशिवाय देण्यात येवू नये. तसेच त्यांना बाजार भावाप्रमाणे आकारणी करावी.

मा.महापौर : ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजुर रेखांकनातील खुल्या जागेपैकी अनुज्ञेय वापरासाठी देतांना त्याच मंजुर रेखांकनातील रहिवाश्यांनी धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणीकृत विश्वस्त संस्था / गृहनिर्माण संस्था / क्रीडा संस्थांना त्याच मंजुर रेखांकनातील खुल्या जागेपैकी अनुज्ञेय जागा वापरासाठी प्रदान करतांना प्रतिवर्ष रूपये शंभर आणि रेखांकनातील रहिवाश्यांच्या नोंदणीकृत विश्वस्त संस्थे व्यतिरिक्त इतर विश्वस्त संस्थांना स्थानिक नागरीकांची हरकत नसल्यास बाजार भावाप्रमाणे भाडे आकारून अनुज्ञेय वापरासाठी खुली जागा भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१ /५:**

संगणक हा आजच्या काळात अत्यावश्यक झाला आहे जवळ जवळ प्रत्येक कार्यालयात संगणकाचा वापर होत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासासाठी संगणकाचे ज्ञ ाान आवश्यक झाले आहे. शहरात अनेक शाळा मध्ये संगण्काचे शिक्षण देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या शाळा कोणत्याही शाळाच्या मागे राहणार नाही हया हेतूने आपण शाळेत संगण्काची खरेदी केली आहे. त्याचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक आवश्यक आहे.

तरी सदर प्रशिक्षणसाठी, शाळांमध्ये शिकविण्यासाठी कमीत कमी सद्या दोन संगणक प्रशिक्षकाची पदे निर्माण करण्यात यावी मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहसिन अहमद

अनुमोदक : सौ.शिलाताई गुंजाळे

श्री.त्र्यंबक तुपे

श्री.रशिद खान (मामू)

**ठराव :**

प्रस्तावात दश्रविल्याप्रमाणे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी मनपाच्या शाळेतुन विद्यार्थीना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी दोन संगणक प्रशिक्षकाची पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२/६**

औरंगाबाद महानगरपालिका हदद्तीतील महानगरपालिका तर्फे टपरी धारकांना परवानगी देण्यांत आलेल्या जागेवर चार रूपये प्रती फुट या दराने भाडे आकारण्यात आला होता परंतु मार्च १९९९ च्या सर्वसाधारण सभेत सदरील भाडे ४ रू. चौरस फुटाहुन ८ रूपये चौरस फुट वाढ करण्यांत आलेली आहे. सदरील वाढ एकदक दुप्पट झाली असून नियम बाहय दिसते शहरात गोरगरीब नागरिकांना टपऱ्या चालविण्यासाठी जागा भाडयाने देण्यांत आले आहे. असे गोरगरीब नागरीकांवर भाडयाचा दर दुप्पट करून वसूल करणे त्यांच्यावर अन्याय होण्यासारखे आहे. चार रूपये हुन पन्नास पैसे किंवा एक रूपया भाडयाच्या दरात वाढ करून प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.अफसर खॉन

अनुमोदक :श्री.अ.रशिद अ. सत्तार

संवाद

मा.महापौर : टपरी समितीचा अहवालासह सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

श्री.गंगाधर गाडे : टपऱ्यांवर नंबर टाकण्यात यावा. जाहिरात बोर्डावर नंबर व तारीख टाकावी म्हणजे त्या जाहिरात बोर्डास नक्की केव्हा परवानगी देण्यात आली ते समजू शकेल.

मा.महापौर: स.स.श्री.गंगाधर गाडे यांची सूचना चांगली आहे. विषय क्र.६ टपरी समितीकडे पाठवण्यास मंजुर करयात येतो. टपरी समितीचा अहवाल लवकरच सभागृहापुढे ठेवण्यात येईल. याबाबत उटपरी कमेटीने निर्णय घ्यावा.

**ठराव**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेली चर्चा विचारात घेता टपरीसाठी जागा भाडयाने देण्याबाबत सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला प्रस्ताव बाबत योग्य तो निर्णय घेण्यासाठी सदर प्रसतव टपरी समिती कडे वर्ग करण्यांत सर्वानमुते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३/७** :

जिल्हाधिकारी कर्यालय लेबर कॉलनी ते मुकबधीर शाळा मजनुहिल पर्यंत या मुख्य रस्त्याला "अब्दुल रज्जाक मास्टर रोड " हे नांव देण्यांत यावे.

सुचक :श्री.अफरस खान

अनमोदक :श्री.अजिज खॅा गणी खॅा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कर्यालय लेबर कॉलनी ते मुकबधीर शाळा मजनुहिल पर्यंत या मुख्य रस्त्याला "अब्दुल रज्जाक मास्टर रोड " हे नांव देण्यांस सर्वानुंमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४/८** :

महानगरपालिकेचे जे मोठेमोठे दवाखाने (२० खाटी रूग्णालय) त्याचप्रमाणे मोठी वाचनालये आणि मंगल कार्यालय / सांस्कृतिक सभागृह आहेत अशा इमारती मध्ये दुरध्वनीची व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे आहे. तरी अशा इमारतीमध्ये दुरध्वनी बसविण्याची व्यवस्था करणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. या दुरध्वीनकरीता येणारा खर्च मनपा प्रशासन करू शकत नसेल तर सदरील खर्च संबंधित वार्डाचे नगरसेवकांचे निधीतून दुरध्वनी करीता लागणारा खर्च मागविण्यात यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.मोहसिन अहमद बशीर अहमद
अनुमोदक : श्री.गिरजाराम हाळनोर
श्री.अजीज खॅा गणी खॅा
सौ.रजनीताई जोशी

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपिालकेच्या मोठेमोठे दवाखाने मोठी वाचनालये, मंगल कार्यालय सांस्कृतिक सभागृह अशा ठिकाणी दुरध्वनीची व्यवस्था करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र.५५ :१**

कार्यकारी अभियता , पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून दिनांक १-४-९८ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घेण्यात आली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून खालील शाखा अभियता कनिष्ठ अभियंता महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्ती वर घेण्यात आलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.जी.बी.जावळे | शा.अ. | स्थापत्य |
| २ | श्री.एन.बी.वाघमारे | शा.अ. | स्थापत्य |
| ३ | श्री.एस.पी.ढवळे | शा.अ. | स्थापत्य |
| ४ | श्री.आर.ए.गोसावी | का.अ. | स्थापत्य |
| ५ | श्री.डी.आर.गवई | शा.अ. | यांत्रिकी |
| ६ | श्री.सी.एल.राठोड | का.अ. | विद्युत |

वरील अभियते हे दिनांक १-६-९८ पासून एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीवर काम करत आहेत. तसेच श्री.सु.रा.फडनीस (उपविभागीय अधिकारी ) व श्री.एन.लक्ष्मीनारायणराव (उप

अभिंयता) यांत्रिकी हे दिनांक १-९-९८ पासून एक वर्ष प्रतिनियुक्तीवर काम करीत आहेत. उपरोक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी हा अनुक्रमे दिनांक ३०-५-९९ व ३१-८-९९ रोजी संपत आहे.

जायकवाडी पाणी पुरवठा योजनेवर वरील अधिकारी व कर्मचाऱ्यांची गरज आहे . सदर योजना चांगल्या तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवेची पुढील एक वर्षाकरीता महानगरपिालकोत नितांत आवश्यकता आहे.

तरी अ.क्र.१ ते६ मधील कर्मचारी व उपविभागीय अधिकारी व उपअभिंयता (यांत्रिकी) यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ३१-५-२००० पर्यत वाढविण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गिरजाराम हाळनोर :त्यांना त्यांच्या खात्यात परत पाठविण्यात यावे. मनपातील कर्मचाऱ्यांना प्रमोशन देवून जागा भराव्यात एक वर्षापासून ते डेप्युटेशनवर काम करत आहे. मग आपल्या कर्मचाऱ्यांना ट्रेंनिंग का दिले नाही

श्री.अफसर खान : त्यांना त्यांच्या खात्यात परत पाठविण्यात यावे.

कार्य.अभिंयता (पापू) : जायकवाडी पाणी पुरवठा प्रकल्पावर मागील वर्षापासून प्राधिकरणाचे अधिकरी प्रतिनियुक्तीवर काम करत आहेत. या एक वर्षाच्या कालावधीत कनिष्ठ अभिंयता / शाखा अभिंयता या संवर्गातील अधिकारी काम करत आहेत. आपल्या कर्मचाऱ्यांना अद्याप ट्रेनिंग झाले नाही. म्हणून प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी. व त्या कालावधीत आपल्या आस्थापनेवर जागा निर्माण करून त्या कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : या अत्यावश्यक सेवा असल्याने प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : एक वर्षापर्यंत प्रशासन काय करत होते. त्यांनी एक वर्षाच्या कालावधीत आपल्या कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग का दिले नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :आपल्याकडे ही ट्रेन्डस्टाफ आहे.प्रतिनियुक्तीच्या कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना परत पाठविण्यात यावे.

मा.महापौर : या सभागृहाच्या भावना लक्षात घेवून प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना तीन महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात येईल. या कालावधीत आपल्याकडील कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग देण्यांत यावे. तीन महिन्यानंतर प्रतिनियुक्तीच्या अधिकाऱ्यांना परत पाठविण्याच्या अटीसह हा ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

श्री.गंगाधर गाडे : जायकवाडी पासून शहरास जो पाणीपुरवठा होतो त्या पाईप लाईनवरून काही फैक्ट्रीज शेतकरी यांनी पाणी घेतलेले आहे हे खरे आहे काय ? या बाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली मनपाने करोडो रूपये खर्च केलेले आहेत. हे लोक पाण्याचे पैसे भरत आहेत काय ? शेती वा फक्टरीत यांनी पाणी देण् मनपाचे काम नाही. अशा लोकांवर क्रिमिनल केसेस कराव्यात पाण्याची चोरी होणार नाही. याची खबरदारी घ्यावी.

मा.महापौर : या जलवाहिनीवरून सात जणांनी कनेक्शन घेतलेले आहेत. त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत येत आहे.

श्री.अफसर खान : अशा लोकांवर पोलिस केसेस करण्यांत याव्यात, असे आदेश द्या ावेत त्यामुळे परत असे करण्याची कोणी हिंमत करणार नाही.

श्री.गंगाधर गाडे : यापुर्वी महानगरपालिकेकडे ही योजना (जलवाहिनी) हस्तांतरीत झालेली नसतांना महामंडळाने अशा लोकांवर काहीही कार्यवाही केलेली नाही. आपली ही नैतिक जबाबदारी आहे, त्यामुळे आपण अशा लोकांविरूध्द कार्यवाही करावयास पाहिजे. काल महानगरपालिकेवर जो मार्चा आला होता त्यातील मोर्चेकरी म्हणत होत की, औरंगाबाद शहरात पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी आमच्याच गावातून जाते तिचा वापर कसा करावा हे आम्हास समजते ही आपणास एक हिंट आहे.तेव्हा पाण्याची चोरी होवू नये, तिचा दुरूपयोग होवू नये हे पाहिले जावे.

मा.महापौर : १-६-९९पासून तीन महिन्याची मुदतवाढ देण्यांत येते.
१-९-९९ रोजी त्यांनी त्यांच्या खात्यास परत पाठवणे .
मनपा कर्मचाऱ्यांना पदोन्नती द्यावी. पदोन्नतीने भरता येत नसेल तर मनपा कर्मचाऱ्यांमधून नामनिर्देशनाने भरावीत.

**ठराव :**

सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता जायकवाडी पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्तीवर आलेल्या प्रस्तावीत दोन अधिकारी व सहा कर्मचारी यांचा प्रतिनियुक्ती कालावधी दिनांक १-६-९९ पासून तीन महिने वाढवून देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या कालावधीत महानगरपालिका आस्थापनेवर जे अधिकारी / कर्मचारी पदोन्नतीस पात्र आहेत अशा अधिकारी / कर्मचारी यांना प्रतिनियुक्तीवरील अधिकारी व कर्मचारी यांचे बरोबर कामे देवून जायकवाडी पाणी पुरवठा योजने संबंधिची सर्व माहिती हस्तगत करण्यांत यावी. असे सर्वानुमते ठरले आणि जायकवाडी पाणी पुरवठा योजनेसाठी आवश्यक असलेली खालील पदे महानगरपालिका अस्थापनेवर निर्माण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | उपविभागीय अधिकारी | १ | २२००-४००० |
| २ | उप अभियता (यांत्रिकी) | १ | २२००-४००० |
| ३ | कनिष्ठ / शाखा अभियता (स्थापत्य) | ४ | १६४०-२९०० |
| ४ | कनिष्ठ शाखा अभियता | १ | १६४०-२९०० |
| ५ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | १ | १६४०-२९०० |

तसेच महाराष्ट्र जिवन प्राधिकारणाकडील कर्मचाऱ्यांचा ३ महिन्याचा प्रतिनियुक्ती कालावधी संपल्यानंतर वरील पदे महानगरपालिका कर्मचाऱ्यांमधूनच पदोन्नतीने भरण्यात यावी. कनिष्ठ / शाखा अभियता या पदावर पदोन्नतीने उमेदवार न मिळाल्यास महानगरपालिका कर्मचाऱ्यांमधूनच नानिर्देशनाने हे पद भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात यते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६/२ :**

कार्यकारी अभिंयता, पापु, व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला बाबर कॉलनी , हत्तेसिंगपूरा स.नं.३० मध्ये २५० मि.मि.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे करीता अंदाजपत्रक रक्कम रू.८,८०,८१०/- चे तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रक परिसर अभिंयांत्रिकी विभागाच्या सन १९९६-९७ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील वस्ती अनाधिकृत असलयाने २५% लोक वर्गणी भरून सदरील कामास मंजुरी मा.आयुक्तांनी दिलेली आहे.

सदरील काम लेखाशिर्षक "भांडवली कामे " यातुन प्रस्तावित केले सदरील काम स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर करण्यांत आले होते.

अनाधिकृत वस्तीत २५% लोकवर्गणी भरून घेवून काम करणे करीता स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. व त्या प्रमाणे २५% लोकवर्गणी भरणे करीता अनाधिकृत वस्तीतील लोकांनी नोटीसा देण्यांत आलेल्या आहेत. परंतु अनाधिकृत वस्तीतील लोकांनी २५% लोकवर्गणी भरलेली नाही.

स्थायी समितीने अनाधिकृत वस्तीत २५% लोकवर्गणी बाबत चर्चा करून निर्णय घेतलेला आहे की, लोकवर्गणी रदद् करणे करीता सदर प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे करीता स्थायी समिती मध्ये चर्चा झालेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.महादेव सुर्यवंशी : असा प्रस्ताव मंजुर कसा करणार मग ज्या लोकांनी २५% लोकवर्गणी भरली आहे त्यांची लोकवर्गणी परत करण्यात यावी सर्वांना एकच न्याय असावा.

श्री.कचरू नवपुते :हा प्रस्ताव मंजुर करावयाचा असेल तर इतर अनाधिकृत वसाहतीतील लोकांनी भरलेली लोकवर्गणी परत करणार काय ?

श्री.अफसर खान : सुरेवाडी, पुंडलिकनगर , जाधववाडी अशा वसाहतींना शासकीय अनुदानातील पैशातून सुविधा पूरविल्या आहेत त्या कशा पुरविल्या . अशा वसाहतींना दिलेल्या सुविधा रद्य करण्यांत याव्यात.

श्री.अविनाश कुमावत : अशा ठरावास आमचा विरोध नाही. ज्या वसाहतीमधून २५% रक्कम वसूल केली आहे. ती परत करण्यांत यावी.

श्रीमती फरहत बानो : या वसाहतीतील लोक अत्यंत गरीब आहेत. त्यांना खाण्यापिण्याची भ्रांत आहे ते पैसे कुठून भरणार या वसाहतीच्या बाजूची वसाहत अनाधिकृत आहे ही वसाहत अनाधिकृत नाही.

श्री.मुजीब आलमशाह खान : ही वसाहत खुप जुनी आहे ती अनाधिकृत नाही तिचा टॅक्स भरलेला आहे. बेटरमेंट भरलेला आहे. लाईट , नळ , रस्ते इत्यादी सुविधा देण्यांत आलेल्या आहेत.

श्री.अफसर खान : आजच्या नंतर २५% रक्कम माफ करण्यात यावी. या वसाहतीतील लोक गरीब आहेत.

श्री अजीज खान : ही वस्ती १७ वर्ष जुनी आहे. ती अनाधिकृत नाही. बाजूची वसाहत अनाधिकृत आहे.सदर भागात अनेक विकासाची कामे चालू आहेत ६-७ गल्ल्यात ड्रेनेजची कामे झालेली आहेत विविध विकासाच्या कामांवर लाखो रूपये खर्च झालेला आहे. हे काम या बजेट मध्ये घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते. खडी , रस्ते, डांबरीकरण , जलवाहिन्या, पथदिवे

इ.विकासाची कामे झालेली आहेत. ही अनाधिकृत वसाहत नाही. त्यावेळेस २५% रक्कम भरण्यात आलेली नाही. १७-१८ वर्ष जुनी वसाहत आहे. स्थायी समितीमध्येही रूलींग देण्यांत आली आहे की, सर्वसाधारण सभेत ठेवावे.

श्री.जयवंत (बंडू) ओक : वसाहतीची समक्ष पाहणी करून निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर : बाबर कॉलनी, हत्तेसिंगपूरा भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी २५% रक्कम भरण्याचा प्रस्ताव आहे. हा खर्च मनपाने करावा. अशी सदस्यांची मागणी आहे. यापूर्वी जी जी कामे त्या विभागात झालेली आहेत त्या त्या कामाची २५% रक्कम का घेतली नाही ही रक्कम संबंधित अधिकाऱ्यांकडून का भरून घेण्यात येवू नये. या वसाहतीची सर्व संबंधिता बरोबर पाहणी करण्यांत येईल व नंतर निर्णय घेण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत स्थळ पाहणी करण्यात आली असून मोहल्ला बाबर कॉलनी, हत्तेसिंगपूरा स.नं. ३० या वसाहतीमध्ये पाणी पुरवठा, खडी रस्ते, डांबरी रस्ते, विद्युतीकरण अशा प्रकारची नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली आहेत. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेचा विचार करता बाबर कॉलनी ,कटकट गेट भागातील नागरिकांकडून २५% लोकवर्गणी वसूल न करता या भागात २५० मि.मि. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी रक्कम रूपये ८,८०,८१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७/३** :

औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त श्री.डी.एन.वैद्य यांची बदली झाल्याबाबत वर्तमान पत्राद्वारे समजले आहे. श्री.डी.एन.वैद्य या महानगरपालिकेत आयुक्त पदावर आल्यानंतर शहरातील विकासाच्या कामात मोठया प्रमाणात गती आली आहे व सध्या लोकसभा निवडणूक, विधानसभा निवडणूक व महानगरपालिकेची निवडणूक होणार असून अशा काळात श्री.डी.एन.वैद्य यांची बदली करणे बरोबर नाही. या महानगरपालिकेत लोकप्रतिनिधीची मुदतीला ८-१० महिने राहीले आहे. नागरिकांच्या कामासाठी शहराच्या विकासासाठी वसर्व लोकप्रतिनिधींना सोबत घेवून चालणारे आयुक्त श्री.वैद्य यांची बदली होवू नये किंवा बदली करणे योग्य नाही या संबंधात १ वर्षाकरीता श्री.डी.एन.वैद्य यांची बदली रद्द करून या महानगरपालिकेच्या आयुक्त पदी मुदतवाढ देवून प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूर करून शासनाची मंजुरीसाठी पाठविणे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.अफसर खानर
श्री.गौतम खरात
श्री.अब्दुल रशिद खान (मामू)
श्री. गौतम लांगडे
अनुमोदक :श्री. हमीदउ्द्दीन ताबा
श्री. अब्दुल रऊफ
श्री.साजेदा बेगम
श्री. अजीज खान गणी खान
श्री. फरहद बानो

<u>**संवाद :**</u>

श्री.गंगाधर गाडे : स.आयुक्तांना वरच्या पदावर बढती मिळत असेल तर त्यांना रोकण्यात येवू नये अन्यथा त्यांना मनपात ठेवण्यात यावे.

श्री.अविनाश कुमावत : तसा ठराव करून शासनास पाठविण्यात यावा

श्री.अफसर खान : आयुक्तांनी बदली करून नये असा ठराव करून तात्काळ मा.पालकमंत्री व शासनास फक्स पाठवावा.

मा.महापौर : तसा प्रस्ताव सभागृहात मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त श्री.डी.एन.वैद्य (भा.प्र.से.) यांची बदली झाल्या बाबतची बातमी वृत्तपत्रातून प्रसिध्द झाली आहे तरी श्री.डी.एन.वैद्य यांचे कार्यकाळात या शहराच्या सर्वांगीण विकासाची कामे गतीमान होत असून या विकास कामाची गती सातत्याने पूढे चालू रहावी यासाठी आयुक्त श्री.डी.एन.वैद्य यांची औरंगाबाद महानगरपिालकेतून करण्यांत आलेले बदली रद्य करण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी.

या निर्वाचित लोकप्रतिनिधीचा अल्प कालावधी, विधानसभा व लोकसभा निवडणूक व लगेचच महानगरपालका सार्वत्रिक निवडणूक व त्यानुषंगाने आचासंहिता इ. बाबतचा विचार करता व या महानगरपालिकेची कामे या ही काळात व्यवस्थित व्हावी. त्यमुळे श्री.डी.एन.वैद्य यांना महानगरपालिकेच्या आयुक्त पदी किमान एक वर्ष मुदतवाढ देण्यास शासनास हे सभागृह विनंती करत आहे. ठरावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते .

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५८/४** :

औरंगाबाद महानगरपालिका तर्फे मो.रशिद मामू कॉलनी ते छावणी कडे जाणाऱ्या रस्त्यावर (पश्चिम भाग) पुल पासून ते मुगलपूरा पर्यंत संरक्षण भिंत बांधण्यात येवून काम चालू आहे त्याच ठिकाणी पुलापासून ते सिध्दार्थ गार्डन धोबीघाट पर्यंत चा काही भाग संरक्षण भिंत बांधणे बाकी आहे. सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे नागरीकांची सोय सुविधासाठी सदरील ठिकाणी तेथील रहिवाश्यांच्या घराला धोका टाळण्यासाठी उरलेल्या भागात म्हणजे पुलापासून ते सिघ्दार्थ गार्डन धोबीघाट पर्यंत संरक्षक भिंत सध्या चालू असलेल्या भिंतीच्या कामासोबत बांधण्याची मंजुरी सर्वसाधारण सभेत त्वरीत अंदाजपत्रक तयार करून मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रशिद खान (मामू)
श्री.संजय केने०कर
श्री.अफसर खान
अनुमोदक : श्री.गौतम खरात
श्री.अविनाश कुमावत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रशिद मामू कॉलनी ते छावणीकडे जाणाऱ्या रस्त्यावर (पश्चिम भाग) पासून ते मुगलपुऱ्यापर्यंत संरक्षित भिंत बांधण्याचे काम चालू आहे. पुलापासून

सिध्दार्थ गार्डन धोबीघाटापर्यंत च्या भागास संरक्षित भिंत बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या कामाचे अंदाजपत्रक तयार करून मंजुरीसाठी सादर करण्यांत यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/५** :

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा व भुमिगत गटार व्यवस्था सध्या एकाच कार्यकारी अभियता मार्फत पाहण्यात येते. दिवसेंदिवस शहराचा विस्तार झपाटयाने होत असून पाणी पुरवठा व ड्रनेज व्यवस्थेवर प्रचंड ताण पडत आहे. त्यामुळे एवढया प्रचंड व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे एका कार्यकारी अभियंतास कठीण जात आहे.

नुकतीच पैठण ते औरंगाबाद शहर ही जायकवाडी पाणी पुरवठा वाहीनी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे कामाचा व्याप आणखीच वाढला आहे.

तरी जनतेच्या अडीअडचणी वेळेवर सोडविणे करीता व नगरवासियाना चांगल्या प्रकारची सुविधा मिळणेसाठी तसेच पाणी पुरवठा व ड्रेनेज यंत्रणेत नियमितपणा, सुसुत्रता आणणेसाठी पाणी पुरवठा व जलनि:स्सारण विभाग स्वतंत्र करणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

तसेच महानगरपालिकेतर्फे विद्युत विभाग हा स्वतंत्र होवू घातलेल्या ड्रनेज विभागास जोडल्यास ड्रेनेज विभाग हा स्वतंत्र कार्यकारी अभियता यांचे अधिपत्याखाली येईल व विद्युत विभागातील कामकाज सुरळीत पार पाडणेस मदत होईल. करीता ड्रेनेज व विद्युत विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियता हे पद निर्माण करून या पदावर तांत्रिक संवर्गातील उप अभियंत्यास सेवाभरती नियमानुसार पदोन्नती देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.अविनाश कुमावत (सभागृह नेता)
श्री.गौतम लांडगे
अनुमोदक :श्री.अफसर खान (विरोधीपक्ष नेता)
श्री.गौतम खरात

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचा विस्तार व लोकसंख्येत झालेली लक्षणीय वाढ यामुळे एकाच कार्यकारी अभियता कडून पाणी पुरवठा, ड्रनेज व जायकवाडी ते औरंगाबाद पाणी पुरवठा योजनांवर लक्ष केंद्रीत करणे व नियंत्रण ठेवणे कठीण होत आहे. यामुळे जनतेला पाणी पुरवठा व ड्रेनेजची सुविधा चांगल्याप्रकारे पुरविता यावी, यात सुसुत्रता व प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे म्हणून पाणी पुरवठा विभाग स्वतंत्र ठेवून ड्रेनेज व विद्युत विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियताचे पद निर्माण करण्यास आणि हे पद महानगरपिालका सेवा भरती नियमाप्रमाणे महानगरपालिकेतील उप अभियंता या सवंर्गातून पदोन्नतीने भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०/६**

श्री.मो.जलालोद्यीन मो बुऱ्हानोद्यीन यांना हदय रोग असल्यामुळे उपचार चालू आहे सदरील उपचारावर फार मोठया प्रमाणे आर्थिक खर्च होत आहे संबंधिताचे घराची आर्थिक परिस्थिती फार बिकट असल्यामुळे महानगरपालिकातील नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून

हदय रोगाच्या उपचारासाठी रक्कम रूपये २५०००/- हाजर विशेष बाब म्हणून प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.
सुचक :श्री. रशिद खान (मामू)
अनुमोदक :श्री.गौतम खरात

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.मो.जलालोद्यीन मो बुऱ्हानोद्यीन यांचे हदय रोगाचे उपचारासाठी त्यांची आर्थिक परिस्थिती हलाक्याची असल्याने स.नगरसेवक यांच्या स्वेच्दा निधीतून रूपये २५,०००/- अर्थसाहय करण्यास विशेष बाब म्हणून

सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक काग्रवाही व्हावी.

**विषय क्र.६१/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अभिनय ते किराणचावडी हा रस्ता विकसित करण्यात आला आहे . या रस्त्याला "स्व:लखन पहेलवान" असे नांव देण्यांत यावे ते सामाजिक कार्यकर्ते होते. शहरातील प्रत्येक सामाजिक कार्य करत होते.

तसेच गोमटेश मार्केट ते साहिदया मार्केट रस्त्यचे नांव "शहीद अशफाक उल्ला खान " असे नांव देण्यांत यावे ते शहीद भगतसिंग राजगुरू बरोबर स्वातंत्र्य काळात शहीद झाले आहे. प्रस्ताव चिरार्थ व मंजुरीस्तव सादर.
सुचक :श्री. स.अली मिरा सलामी
अनुमोदक : श्री. किशोर तुळशीबागवाले
श्री.मोहसिन अहमद
श्री.विखारोद्यीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अभिनय टॉकीज ते किराणा चावडी या रस्त्यास "स्व:लखन पहेलवान"आणि गोमटेश मार्केट ते सादिया मार्केट या रस्त्सास "शहीद अशफाक उल्ला खान "असे नामाभिदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६२ /८:**

सहाय्यक संचालक नगररचना यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रारूप विकास योजना औरंगाबाद (सु) ही शासनाकडे मंजुरीस्तव सादर केलेली आहे. उक्त विकास योजनेत आ.क्र.३३४ क्रीडांगण व आ.क्र.३४७ "आरोग्य केंद्र" या सार्वजनिक वापरासाठी आरक्षित आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द केलेल्या विकास योजनामध्ये आ.क्र.३४७ "आरोग्य केंद्र" या आरक्षणचा अंतर्भाव नव्हता.नियोजन समितीने आ.क्र.३३४ "क्रीडांगण" या आरक्षणचे हदद्‌ व क्षेत्र यात अंतर्गत बदल करून पूर्वोत्तर हदद्‌जवळ आ.क्र.३४७ "आरोग्य केंद्र" या वापरासाठी नव्याने आरक्षण प्रस्तावित केले आहे.

आ.क्र.३३४ मधील औरंगाबाद महानगरपालिकेच्या ०.११ हेक्टर क्षेत्र नविन आरक्षण क्र.३४७ आरोग्य केंद्रासाठी दर्शविण्याचा प्रस्ताव नियोजन समितीचा होता असे नियोजन प्राधिकरणाने प्रारूप विकास योजनेत केलेले फेरबदल दर्शविणाऱ्या तक्त्यातील एम-१३८ या

नोंदीवरून आढळून येते व त्या प्रमाणेच जागेवर महानगरपालिकेतर्फे दवाखान्याची इमारतही बांधण्यात आलेली आहे.

तथापी प्रारूप विकास योजना औरंगाबाद (सु) चे नकाशात मुळ आ.क्र.३३४ च्या हददीत बाहेर सि.सि.नं.१८७७४ या लगतच्या मिळकतीच्या काही भागात आ.क्र.३४७ आरोग्य केंद्र भागशः नगर चुकीने दर्शविलेले दिसून येते. उक्त बाबही संबंधित जमिन मालकांनी शासनाकडे व महानगरपालिकेकडे निवेदन देवून लक्षात आणून दिलेली आहे.

वर नमुद बाबींचा विचार करता आ.क्र.३४७च्या हददीत फेरबदल करणे योग्य वाटत असल्याने त्यात पुढील प्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.

प्रारूप विकास योजना औरंगाबाद (प्रसिध्द) च्या आ.क्र.३३४ क्रीडांगण या आरक्षणाच्या हददीतच अंतर्गत बदल करून आ.क्र.३४७ आरोग्य केंद्र दर्शविणे व आ.क्र.३४७ ची उत्तर हदद् दर्शविताना झालेली आरेखनातील चूक दुरूस्त करणे याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर करणत येत आहे.

ठरावाच्या मंजुरीनंतर त्याबाबतचा आवश्यक पत्र व्यवहार शासनाकडे करण्यांत येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रारूप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) प्रसिध्द केलेल्या विकास योजनेतील आरक्षण क्र.३३४ क्रीडांगण या आरक्षणच्या हददीतच अंतर्गत बदल करून आरक्षण क्र.३३४ क्रीडांगण व आरक्षण क्र.३४७ आरोग्य केंद्र दर्शविणे व आरक्षण क्र.३४७ ची उत्तर हददी दर्शवितांना झालेली आरेखनातील चुक दुरूस्त करण्यास व तसे शासनास कळविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६३/९** :

शहर अभियंता मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेतर्फे करण्यांत येणाऱ्या बांधकामासाठी वेगवेगळया व्यासाचे पिळदार लोंखंडाची गरज आहे. वेगवेगळया उपविभागामार्फत चालू असलेल्या विकासाच्या तसेच प्रगती पथावरील कामासाठी सन ९९-२००० या वित्तीय वर्षात ३२० मॅ.टन लोखंडाची आवश्यकता दर्शविलेली आहे. त्याकरीता सन ९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीप्रमाणे अंदाज पत्रक रक्कम रूपये ५७,४४,०००/- (सत्तावन लाख चौरेचाळीस हजार) चे तयार करण्यांत आले आहे. त्यास मा.आयुक्त साहेबांनी दिनांक ११-६-९९ रोजी मान्यता दिली आहे.

आवश्यक असलेले वेगवेगळया व्यासाचे लोखंड खालील प्रमाणे खरेदी करणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | ६ मी.मी. | १५ मॅ.टन |
| २ | मी.मी. | ६० मॅ.टन |
| ३ | १० मी.मी. | ५० मॅ.टन |
| ४ | १२ मी.मी. | ६० मॅ.टन |
| ५ | १६ मी.मी. | ६५ मॅ.टन |
| ६ | २० मी.मी. | ४५ मॅ.टन |
| ७ | २५ मी.मी. | २५ मॅ.टन |
| | **एकूण** | **३२० मॅ.टन** |

वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपातर्फे करण्यांत येणाऱ्या बांधकामासाठी प्रस्तु५त प्रस्तावातील अ.क्र.१ ते ७ अन्वये दर्शविण्यात आलेले विविध आकारमानातील ३२० मॅ.टन पिळदार लोखंडे खरेदीसाठी रक्कम रू.५७,४४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६४/१०** :

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.एन.बी.गिते, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामिण विकास योजना जालना यांची प्रतिनियुक्ती नगर विकास यांचे संमतीने ग्रामीण विकास व जल संधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक भविस १०९८/प्र.क्र./२६९०/१० दिनांक १५ एप्रिल ९८ अन्वये उप आयुक्त या पदावर ते सदर पदाचा पदभार स्विकारतील , त्या दिनांकापासून तीन वर्षासाठी केली आहे.

डॉ.एन.बी.गिते हे उप आयुक्त पदावर दिनांक १४-४-९८ रोजी माध्यान्हानंतर रूजू झ ाले आहेत. दिनांक १७-६-९८ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेमध्ये विषय क्र.९/५ अन्वये दिनांक १७-४-९८ पासून प्रथम एक वर्षाच्या कालावधीसाठी उप आयुक्त (महसूल) या पदावर प्रतिनियुक्तीस मान्यता देण्यांत आलेली आहे.

त्यानुषंगाने दिनांक १६-४-९९ रोजी एक वर्ष पूर्ण झाले असल्याने दिनांक १७-४-९९ पासून पुढील एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीचा कालावधी शासनाच्या अटी व शर्तीनुसार मंजुरी देण्यांबाबत ठराव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.महापौर : सर्वानुमते निर्णय घेण्यात येईल.

श्री.गौतम खरात : त्यांनी महानगरपालिकेचा कोणताही फायदा केलेला नाही. या ठरावास आमचा विरोध आहे महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमात महसुल विभागाचा अधिकारी असावा अशी तरतुद आहे.

श्री.अफसर खान : त्यांना त्यांच्या विभागात परत पाठविण्यात यावे.

(स.सभासद मा.महापौरांच्या टेबलसमोर एकत्र जमून जोरजोरात बोलतात)

श्री.गिरजाराम हाळनोर : हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करता येणार नाही.

मा.महापौर : त्यांना ३० जुन पर्यंत महानगरपालिकेत ठेवण्यात यावे.

**ठराव**

प्रस्तुत प्रस्तावा बाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार उप आयुक्त (म) या पदावर प्रतिनियुक्तीने काम करणारे डॉ.एन.बी.गिते यांच्या दिनांक १६-४-९९ रोजी संपणाऱ्या एका वर्षाचे प्रतिनियुक्ती कालावधीस महाराष्ट्र शासनाची मंजुरी मिळाली नाही. या बाबींचा विचार करता दिनांक १७-४-१९९९ ते ३०-६-१९९९ प्रतिनियुक्ती कालावधीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येवून डॉ.एन.बी.गिते यांचा प्रतिनियुक्ती कालावधीस सर्वानुमते मंजुरी देण्यत येवून

डॉ.एन.बी.गिते यांचा प्रतिनियुक्ती कालावधी संपवून संबंधितास त्यांच्या मुळ विभागाकडे परत पाठविण्यांत यावे यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव | मा.महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## शनिवार दिनांक १७-७-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक १७.७.९९ रोजी मा.महापौर श्री.सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरूवात झाली. सभेला मा. आयुक्तांसह संबंधित अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | स.स.श्री.केनेकर संजय किशनराव | मा.उप महापौर |
| २ | स.स.श्री.ढगे नरसिंग मूरलीधर | स.सदस्य |
| ३ | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | स.सदस्य |
| ४ | स.स.श्री.अफसरखान यासिन खॅा | स.सदस्य |
| ५ | स.स.सौ.साजेदा बेगम | स.सदस्य |
| ६ | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | स.सदस्य |
| ७ | स.स.श्री.ॲड.गणेश किसनराव वानखेडे | स.सदस्य |
| ८ | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | स.सदस्य |
| ९ | स.स.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | स.सदस्य |
| १० | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | स.सदस्य |
| ११ | स.स.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | स.सदस्य |
| १२ | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | स.सदस्य |
| १३ | स.स.श्री.मालानी प्रफल्ल लालचंद | स.सदस्य |
| १४ | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | स.सदस्य |
| १५ | स.स.श्री.फजलउल्लाखॅान अजमत उल्लाखॉन | स.सदस्य |
| १६ | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | स.सदस्य |
| १७ | स.स.श्रीमती नुरजहाँ बेगम अ.रहेमान | स.सदस्य |
| १८ | स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव | स.सदस्य |
| १९ | स.स.श्रीमती मोहसिना बिल्कीस विखारोद्यीन | स.सदस्य |
| २० | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर | स.सदस्य |
| २१ | स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | स.सदस्य |
| २२ | स.स.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | स.सदस्य |
| २३ | स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | स.सदस्य |
| २४ | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | स.सदस्य |
| २५ | स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | स.सदस्य |
| २६ | स.स.श्री.स.अ.इकबालोद्यीन स.मो.कुतुबुद्यीन | स.सदस्य |
| २७ | स.स.श्री.लाहोट रमेश दिपचंद | स.सदस्य |
| २८ | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | स.सदस्य |
| २९ | स.स.श्री.अब्दुल रशिद खॉन (मामू) | स.सदस्य |
| ३० | स.स.कु.माया लिंबाजी लाडवाणी | स.सदस्य |
| ३१ | स.स.सौ.आव्हाड सविता संजय | स.सदस्य |
| ३२ | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | स.सदस्य |
| ३३ | स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | स.सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३४ | स.स.श्री. विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | स.सदस्य |
| ३५ | स.स.सौ.ज्योत्सना हिवराळे | स.सदस्य |
| ३६ | स.स.श्री राजकुमार उर्फ सांडू बचाटे | स.सदस्य |
| ३७ | स.स.श्री .विठठ्ल किसन जाधव | स.सदस्य |
| ३८ | स.स.श्री .मेहेर विजयकुमार गजानन | स.सदस्य |
| ३९ | स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास | स.सदस्य |
| ४० | स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान | स.सदस्य |

**संवाद :**

श्री.रशिद खान मामू : महापालिका आस्थापनेवर वर्ग -४ चे पदावर २०० कर्मचाऱ्यांची नोकर भरती करण्यासाठी शासनाने मंजुरी दिलेली आहे.जेष्ठता यादीनुसार ज्या कर्मचाऱ्यांची २०० पदांमध्ये नांव येत असतांना काही हितचिंतक लोक तुमचे नाव ज्येष्ठता यादीत आणतो अशा प्रकारची दिशाभूल करून या कर्मचाऱ्यांकडून ५-५- हजार रूपया पर्यंत रक्कम घेत आहे. या बाबत मा. आयुक्त यांनी दखल घ्यावी व शासनाने दिलेल्या २०० पदांना मंजुरी नुसार ज्येष्ठता यादीप्रमाणे नियमाने भरती व्हावी.

श्री.अफसर खान : जेष्ठता यादीतील काही कर्मचारी मलाही प्रत्यक्ष येवून भेटले त्यांनी माझ्याकडे तोंडी तक्रार केल्यानुसार पत्रकार परिषद भरून त्यांची समजूत घातली कोणत्याही प्रकारे बोगस भरती न होता न्यायालयाने घालून दिलेल्या ज्येष्ठता यादीनुसार २०० कर्मचाऱ्यांची भरती करण्यांत यावी व कुणी पैसे वगैरे असेल तर त्याबाबत कडक प्रशासकीय कार्यवाही करावी.

श्री.विजयकुमार मेहर : उपमहापौर हे सभागृहात प्रवेश करते वेळी वंदेमातरम सुरू करण्यात आले थोडा वेळ थांबता आले असते.

मा.महापौर : या पुढे असे होणार नाही.

श्री.महादेव सुर्यवंशी : माजी महापौर श्री.रशिद खान (मामू ) विरोधी पक्ष नेता यांनी केलेली तक्रार योग्यच आहे. दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांची यादी बनवतांना नावे खाली वर केलेली आहेत. ज्यांची नावे ज्येष्ठता यादीनुसार खाली होती त्या कर्मचाऱ्यांची नावे यादीत मधल्या नंबरवर आलेली आहे. या पदांना शासन मंजुरी देणारच आहे हे काही लोकांना माहित नसल्यामुळे अगोदरच खालची नावे वर घेण्यात येवून जेष्ठता यादी बनवलेली असावी. काही कर्मचारी माझ्याकडे येवून लवकरच या बाबतचे आदेश मिळणार आहे असे सांगत होते. कर्मचाऱ्यांकडून पैस घेवून त्याचे नांव जेष्ठता यादीत आणतो म्हणून आमिष दाखवून त्या कर्मचाऱ्यांची कामे होणार आहे काय ? पैसे दिले तरच यादीत नांव येणार अशी आशा त्यांना दाखवलेली आहे. २०० कर्मचाऱ्यांची नोकर भरती करण्याबाबत शासनाची त्या पदांना मंजुरी आलेली आहे. जेष्ठता यादीनुसारच व शासनाने ज्या जातीच्या वर्गवारीसाठी प्राधान्य दयावयाची सूचना केली त्यानुसार प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

श्रीमती मोहसिंना बिल्कीस : जे कर्मचारी सध्या दैनिक वेतनावर काम करतात व जेष्ठता यादीत त्यांची नांव असून त्यानुसारच २०० कर्मचाऱ्यांची नोकर भरती करण्यात यावी. अनधिकृत भरती होवू नये याकडे लक्ष देण्यांत यावे.

श्री.विजय कुमार मेहेर : सवो भरती मध्ये पारदशर्कता कशी ठेवता येईल हे प्रशासनाने पाहावे. या पदावर भरती करतांना प्रशासन कशा पध्दतीने भरती करणार या बाबतची माहिती पदाधिकारी अधिकारी तसेच सर्व स.सदस्यांना दयावयास पाहिजे. त्यामुळे फसवणूक होणार नाही. जे पैसे उकळतात त्यांना आळा बसेल. कर्मचारी भरती संबंधी स.सदस्यांना माहिती दयावी.

श्रीमती नुरजँहा बेगम : शहरात ठिकठिकाणी रस्त्यावर, कुंडयामध्ये कचऱ्याचे ढिग लागलेले असून त्यामुळे डांस झालेले असून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना त्रास होत आहे. काही ठिकाणी कचरा सडून दुर्गंधी सुटलेली आहे. साफसफाई योग्य होत नाही . मा आयुक्त यांना याकडे जातीने लक्ष दयावे जेणे करून नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही.

श्री.विठठ्ल जाधव : माझ्या वार्डामध्ये एकच टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असून आणखी दोन टँकरची आवश्यकता आहे टँकर दु रूस्तीला असेल तर दुरूस्त करून आणखी दोन टॅकरने पाणी पुरवठा करण्याबाबतची कार्यवाही व्हावी.

श्रीमती अलका पाटील : स्वेच्छा निधीतून कामे करण्यास पत्र दिले . आंचारसंहितेत करता येणार नाही परंतू अत्यावश्यक जी कामे आहेत ती स.सदस्यांच्या स्वेच्दा निधीतून करता येईल काय जसे मुरूम टाकण्याचे पत्र दिले अशी कामे करावी माझ्या वार्डामध्ये घाणीचे ढिगारे साचलेले आहे. नागरीकांना जाता येता त्रास होत आहे. कचरा उचलण्याची कार्यवाही करावी.

श्री.अफसर खाँन : महानगरपालिकेचे उप आयुक्त (म) श्री.गिते साहेब यांचा मुदतवाढी बाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी आला असता सर्वसाधारण सभेने त्यांना फक्त तीनच महिने मुदतवाढ दिली आहे. नियमाने त्यांची मुदतवाढ संपलेली असून त्यांच्या बदली संदर्भात मा.महापौर यांनीही मा.आयुक्तांना याबाबत कार्यवाही करण्याबाबतचे पत्र पाठवले आहे. त्यांना कार्यमुक्त केले नाही तर पगार कोठून देणार तसेच मा.शिक्षणाधिकारी यांनाही सर्वसाधारण सभेने दिलेल्या मुदतीचा विचार करता त्यांनाही या महानगरपालिकेतून दुसरीकडे पाठवण्याची कार्यवाही मा.आयुक्तांनी करावी या दोन्ही अधिकाऱ्यांना लवकरात लवकर कार्यमुक्त करावे.

श्री.स.अ.एकबालोद्दीन : मा. उप आयुक्त (म) तसेच मा.शिक्षणाधिकारी हे अकार्यक्षम असल्याने त्यांना लवकरात लवकर महापालिका सेवेतून कार्यमुक्त करावे.

श्री.कचरू नवपुते : लोकसभेची आचारसंहिता लागू झालेली आहे परंतु आचार संहितेच्या काळात कोणती विकास कामे करावी कोणती करू नये याबाबत सभागृहात खुलासा व्हावयास पाहिजे. माझ्या वार्डामध्ये एक ड्रनेज लाईन चोकअप झ ालेली आहे. आचारसंहितेच्या काळात ते काम करता येणार नाही असे सांगतात. अत्यावश्यक विकास कामे प्रशासनाच्या माध्यमातून व्हावयास पाहिजे.

मा.महापौर : सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार उप आयुक्त (म) यांची बदली संदर्भात शासनास पत्र पाठविण्यात आले आहे ञ नविन नियुक्ती होईपर्यंत त्यांना कार्यमुक्त करता येणार नाही.

श्री.अफसर खान : नियमाने त्याची मुदत एप्रिल महिन्यामध्ये संपलेली आहे. तीन महिन्याचा विचार करता ३० जून पर्यंत त्यांना का कार्यमुक्त केले नाही.

मा.महापौर : सभा संपल्यानंतर मा.आयुक्तांबरोबर सविस्तर चर्चा करून योग्य तो निर्णय घेता येईल.

श्री.विजयकुमार मेहेर : आचार संहितेच्या काळात आवश्यक ती विकास कामे करण्याबाबत मा.महापौर यांनी न्यायालयाकडे धाव घेतली त्या बद्यल अभिनंदन करतो. जी विकासात्मक उदा.पाणी.ड्रेनेज ,लाईट केरकचरा, इ कामे करण्यासाठी अधिकारी यांनी आचारसहिंतेचे नियमित्त करून कामात व्यत्यय आणू नये. तसेच कर्मचारी सेवा भरती करतांना शासनाने दिलेली २०० पदांची मंजुरीनुसार योग्य व नियमाने जे जेष्ठता यादीत येतील त्यांचाच विचार करावा व जे लोक वाल्मीक (सफाई कामगार) समाजाचे आहेत त्यांचा या भरतीमध्ये शासनाने दिलेल्या निर्देशानुसार प्राधान्य देण्यात यावे. कोणत्याही प्रकारे भ्रष्टाचार होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी.

मा.महापौर : शासनाने २०० पदांना मंजुरी दिलेली आहे. त्यात शासनाने जे निर्देश घालून दिलेले आहे त्यानुसार नोकरभरती करण्यात येईल, भ्रष्टाचार करणाऱ्यांवर प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रशिद खान (मामू) : आचार संहितेच्या काळामध्ये कोणती कामे करता येतील कोणती करता येणार नाही याची माहिती देवून करण्यात येणारी कामे किती रक्कमेपर्यंत करता येतील याची सभागृहाला मा. आयुक्त यांनी माहिती दयावी.

मा.महापौर : शासनाने आचारसहिंतेच्या कालावधीमध्ये कोणती कामे करता येतील कोणती करात येणार नाही याबाबत वृत्त पत्रात प्रसिध्दी केलेली आहे. यात महापालिका ही स्वायत्त संस्था असल्यामुळे शहरातील ड्रनेज, पाणी, लाईट इ.विकास व आवश्यक कामे समजून करण्यात येतील.

श्री.महादेव सुर्यवंशी : नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून विकास कामे करण्यांत यावी. पंरतू जे काम करावयाचे आहे त्या कामाबाबतचे उद्घाटन स.सदस्यांनी न करता माननीय आयुक्त यांनी करून ते काम पूर्ण होण्याबाबतची कार्यवाही करावी यास कुणाचीही हरकत राहणार नाही . आवश्यकतेनुसार ज्या त्या वार्डात ड्रेनेज , पाणी , लाईट या संदर्भातील सर्व विकास कामे करण्यात यावी.

मा.आयुक्त : सभागृहात काही स.सदस्यांनी चर्चेद्वारे आचारसंहितेच्या काळात आवश्यक सेवेची जी कामे उदा पाणी पुरवठा , ड्रेनेज ,स्वच्छता, लाईट ही करता येतील काय ? तसे नियमात आहे काय असे विविध प्रश्न उपस्थित केले आहे. महापालिका ही स्वायत्त संस्था असल्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोगयाच्या दृष्टीने जी आवश्यक कामे आहेत ती महापालिकेला करणे गरजेचे आहे ही सर्वसाधारण सभा झाल्यानंतर विभाग प्रमुख यांची माझ्या दालनात बैठक बोलावली आहे. त्यावेळी काही कामे थांबली का याचा आढा ावा घेण्यात येणार आहे. सर्व स.सदस्यांच्या निर्दशनास आणून देण्यात येते की, आचारसहिंतेची अंमलबाजवणी, सुरू झाली असून आचारसंहिता बाबतचे नियम पथ्य पाळायचे व त्याचे महत्व सर्वांनाच आहे विनंती आहे की, आपण आचार संहितेचे काटेकोरपणे पालन करावे व सहकार्य करावे. जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करण्या इतपत वेळ येवू नये धन्यवाद.

श्री.गौतम खरात : चार ते पाच दिवसापूर्वी मा. आयुक्त यांच्या दालनात विरोधी पक्ष नेता , मी व काही स. सदस्य भेटण्यांस गेलो व अधिकारी वर्ग काम करत नाही.

कोणते काम करावे कोणते काम करू नये याबाबत सर्वासमवेत चर्चा झ ााली.संचिकेवर लवकरात लवकर सहया कराव्या विकासात्मक कामे थांबलेली आहे. सदस्यांनी विनंती केली त्यात विराधी पक्ष नेता हे मोठया आवाजात बोलले असता मा. आयुक्तांनी सांगितले की, माझे काम आपणांस पसंत नसेल तर बदली करून टाकावी . मा. आयुक्तांनी असे बोलणे अशोभनीय आहे. शहरातील विकास कामे ही स.सदस्य व प्रशासन यांचे समन्वयक साधून सोडवली जातात. नगरसेवकांना समजून घ्या नियमात बसत असेल तर करावे अन्यथा समजून सांगावे.

श्री.विखारोद्यीन : टपरी बाबत टपरी कमिटीचा काय निर्णय झालेला आहे. एकूण ४ वर्षाचा कालावधी निधून गेलेला असून अद्याप निर्णय झालेला नाही. सेंट्रल बसस्टँड ते मिलकॉर्नर या दरम्यान बऱ्याच नागरिकांनी परवानगी दिली त्यानुसार स्थयी समिती मध्ये चर्चा झाली व अद्याप पर्यंत कार्यवाही का कली नाही.

मा.महापौर : टपरी संदर्भात प्रशासन कार्यवाही करेल. आचारसंहितेच्या काळामध्ये कोणती विकास कामे करावयाची व कोणती करता येणार नाही . या बाबत मा. आयुक्त सर्व अधिकारी वर्ग यांच्या समवेत बैठक घेवून चर्चा करतील परंतू विकास कामे करतांना कुणाचीही अडवणूक होणार नाही याची दक्षता मा. आयुक्तांनी घ्यावी. तातडीची जी विकास कामे करणे आहे ती योग्य वेळीच करावी.

मागच्या बैठकीत उप आयुक्त (म) श्री.गिते साहेब यांचा मुदतवाढी बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी होता. सभागृहाच्या चर्चेनुसार त्यांना ३ महिन्याची पुढील मुदतवाढ म्हणजेच ३० जुन पर्यंत दिलेली आहे. त्यानंतर त्यांच्या बदली संदर्भात मा. आयुक्त यांना मी पत्र देवून कार्यवाही करण्याची आदेश दिलेले आहे. आचारसंहितेच्या काळात बदली करता येत किंवा नाही या बाबत सभा संपल्यानंतर मा. आयुक्त यांच्याशी चर्चा करून निर्णय घेता येईल.तसेच शिक्षणाधिकारी यांच्याही बदली संदर्भात चर्चा करणार आहेत. आजच्या सभेत लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागू झ ाल्यामुळे कोणत्याही विषयावर निर्णय घेता येणार नाही.

या बरोबरच जन, गण, मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## गुरूवार दिनांक १९-०८-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक १९-०८-९९ रोजी मा.महापौर श्री.सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात दुपारी १२.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरूवात झाली. सभेला मा. आयुक्तांसह संबंधित अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | स.स.श्री.ढगे नरसिंग मूरलीधर | स.सदस्य |
| २ | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | स.सदस्य |
| ३ | स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | स.सदस्य |
| ४ | स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | स.सदस्य |
| ५ | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | स.सदस्य |
| ६ | स.स.श्री.ॲड.गणेश किसनराव वानखेडे | स.सदस्य |
| ७ | स.स.श्रीमती जोशी रंजना रमेश | स.सदस्य |
| ८ | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | स.सदस्य |
| ९ | स.स.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | स.सदस्य |
| १० | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | स.सदस्य |
| ११ | स.स.सौ.पदमा बाबुराव शिंदे | स.सदस्य |
| १२ | स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | स.सदस्य |
| १३ | स.स.श्रीमती चंपाबाई विश्‍वनाथ पांचाळ | स.सदस्य |
| १४ | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | स.सदस्य |
| १५ | स.स.श्री.महंमद मुश्ताक अहेमद | स.सदस्य |
| १६ | स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव | स.सदस्य |
| १७ | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर | स.सदस्य |
| १८ | स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | स.सदस्य |
| १९ | स.स.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | स.सदस्य |
| २० | स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | स.सदस्य |
| २१ | स.स.श्री.हमीदउद्यीन ताबा फसीयोद्यीन | स.सदस्य |
| २२ | स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | स.सदस्य |
| २३ | स.स.श्री.लाहोट रमेश दिपचंद | स.सदस्य |
| २४ | स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल | स.सदस्य |
| २५ | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | स.सदस्य |
| २६ | स.स.सौ.धांडे शकुंतला हरीदास | स.सदस्य |
| २७ | स.स.श्री.अब्दुल रशिद खॉन (मामू) | स.सदस्य |
| २८ | स.स.कु.माया लिंबाजी लाडवाणी | स.सदस्य |
| २९ | स.स.सौ.आव्हाड सविता संजय | स.सदस्य |
| ३० | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | स.सदस्य |
| ३१ | स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | स.सदस्य |
| ३२ | स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | स.सदस्य |
| ३३ | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भावूराव | स.सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३४ | स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | स.सदस्य |
| ३५ | स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव | स.सदस्य |
| ३६ | स.स.सौ.राधाबाई तळेकर | स.सदस्य |
| ३७ | स.स.श्री.विठठल किसन जाधव | स.सदस्य |
| ३८ | स.स.श्री.मेहेर विजयकुमार गजानन | स.सदस्य |
| ३९ | स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | स.सदस्य |

**संवाद :**

श्री.रशिद खान (मामू) : अति.शहरी अभ्यिंता यांच्य मातेश्री स्व.भागेरथी शंकरलाल सोनी तसेच पश्चिम बंगालमधील आसाम मेल रेल्वेच्या अपघातात मृत्यु पावलेल्यांना सभागृहात ०१ मिनिटे श्रंध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा.महापौर : स्व.भागेरथी शंकरलाल सोनी व पं.बंगाल रेल्वे दुर्घटनेतील मृतांना सभागृहात ०१ मिनिटे स्तब्धता पाळून श्रंध्दांजली अर्पण करण्यांत येते

(याचवेळी ०१ मिनिटे स्तब्ध अभे श्रंध्दांजली वाहण्यात आली)

श्री.रशिद खान (मामू) : औरंगाबाद सिटीचॅनलचे संपदाक श्री.अहेमुद हफसैन तसेच औरंगाबाद टाईम्सचे संपादक श्री. शोएब खुसरो यांच्यावर गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी खुनी हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. अशा गुंड प्रतृत्तीच्या लोकांचा या सभागृहात निषेध ठराव होवून त्यांची प्रत मा.पोलिस आयुक्त यांचेकडे देवून कार्यवाही करण्याचे सांगण्यात यावे.

श्री.गौतम खरात : अशा प्रकारचा ठराव पारीत करण्यात यावा व पोलीस आयुक्तांना पत्र देण्यांत यावे.

मा.महापौर : तसा ठराव मंजुर करता येणार नाही सध्या आंचारसंहिता लागू आहे एक निवेदन करून त्यानुसार आपण मा.पोलिस आयुक्तांना प्रत्यक्ष भेटून कार्यवाही करण्यांचे सांगण्यात येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.हमीद ताबा : मा.महापौर तसेच सर्व स. सदस्य समवेत एक निवेदन तयार करून मा.पोलिस आयुक्त यांना प्रत्यक्ष भेटून संबंधितातवर कार्यवाही करण्याचे सांगण्यात यावे.

श्री.विजयकुमार मेहेर : एक निवेदन तयार करून सर्व स. सदस्यांच्या सहीनिशी व सर्वासमवेत मा.पोलिस आयुक्तांना देवून कार्यवाही करण्यांस सांगता येईल.

श्री.रशिद खान (मामू),श्री.प्रकाश निकाळजे : निषेधाचा ठराव करण्यास आचांरसंहितेचा काहीही संबंध येत नाही ठराव मंजुर करून मा.पोलिस आयुक्तांना प्रत देवून कार्यवाही शिफारस करावी.

श्री.गिरजाराम हाळनोर : निवडणूक आयोगाने आचार संहितेचे जे नियम घालून दिलेले आहे त्यानुसार निषेधाचा ठराव करता येतो. किंवा काय प्रशासनाचे मत घ्यावे. तसेच निवडणूक आयोगाशी प्रशासनाने केलेल्या पत्रव्यवहाराची माहती सभागृहात देण्यांत यावी.

मा.महापौर : एक निवेदन तयार करून स. सदस्या समवेत मा.पोलिस आयुक्तांना प्रत्यक्ष भेटून कार्यवाही करण्याची शिफारस करण्यांत येईल.

श्री.रशिदखान (मामू) : शहरात अत्यावश्यक विकास कामे होत नाही. आचारसंहितेच्या नावाखाली अधिकारी फायदा घेत आहे जी कामे ५० हजारापर्यंत मर्यादित

आहेत ती मा. आयुक्तांचे मंजूरीने करता येणार नाही काय ? आचारसंहितेच्या काळात कोणती कामे करावयाची व किती रक्कमे पर्यंत करावयाची व कोणती कामे करता येत नाही याबदद्लचे आचारसंहितेचे नियम व अटी काय आहेत वाचून दखवावे.

श्री.हमीद ताबा : वार्डातील ड्रनेज पाणी व आरोग्य या बाबतची आवश्यक कामे आचारसंहितेमध्ये ही करणे आवश्यक आहे. माझ्या वार्डात ड्रनेज पाणी पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन मध्ये जात असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. कामे अर्धवट असून आचारसंहितेचे कारण दाखवून अधिकारी पक्षपाती पणाने ठराविक नगरसेवकांच्या वार्डात कामे करण्याची कार्यवाही करतात मुस्लीम नगरसेवकांच्या वार्डातील कामे होत नाही. शहरातील अत्यावश्यक विकास कामासाठी आचारसंहितेचे नियम ग्राहय घरू नये.

मा.महापौर : स.सभासदांनी सभागृहात बोलतांना शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम प्रत्येकाने करावे. स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत खुलासा अधिकारी करतील.

श्री.गिरजाराम हाळनोर :सभागृहात जातीवाद युक्त भाषा बोलली जात आहे असे असेल तर त्यांचा निषेध म्हणून नोंद व्हावी.

मा.महापौर : सर्व स.सभासंदानी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे कुणी ही मोठमोठयाने बोलू नये.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आचारसंहिता नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांना लागू पडते. परंतू अत्यावश्यक विकास कामासाठी प्रशासनाने मंजुरी देवून कामे केल्यास आचारसंहितेचा भंग होवू शकत नाही. मा. आयुक्तांना प्राप्त अधिकारात त्यांनी अत्यावश्यक कामे करवून घ्यावीत. त्यामुळे आचारसंहितेचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

श्री.कुमावत अविनाश : स.सदस्य यांनी ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्याच्या लाईन मध्ये जाते याबाबत सूचना मांडली त्यानुसार मा. आयुक्त यांनी चौकशी करून प्रशासनाच्या माध्यमातून कार्यवाही करावी.

मा.महापौर : सभागृहात मांडलेल्या स. सदस्यांच्या सूचनांचा विचार करून शहरातील ज्या आवश्यक नागरी सुविधा उदा.पाणी, ड्रेनेज, आरोग्य, स्वच्छता इ साठी आचारसंहिता आड येवू शकत नाही. जसे स.सदस्य श्री.ताबा यांनी मांडलेली ड्रनेज लाईन बाबतची सूचना विचारात घेवून प्रशासनाने कार्यवाही करावी. अशा प्रकारचे कामे करण्यास अधिकारी यांनी कुणाचीही अडवणूक होईल तसेच अडचण निर्माण होईल असे कृत्य करू नये तशी प्रशासनाने त्याची दखल घ्यावी. आचारसंहितेचे कारण दाखवून होत असलेल्या कामास अधिकारी यांनी नकार दिला असेल तर मा. आयुक्त यांनी संबंधितांवर कार्यवाही करावी. डेनेज लाईनचे कामास काय अडचण आली याचा खुलासा करावा.

श्री.अब्दुल रऊफ : वार्डात घरा समोरचं ड्रेनेज लाईन चोकअप झाली असून रस्त्यावर ड्रेनेजचे पाणी वाहत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता टाळता येत नाही. त्यासाठी जेटींग मशिन आणून कार्यवाही करण्यास बऱ्याच वेळा संबंधिताना सांगण्यात आले परंतू अद्याप कार्यवाही झाली नाही.

मा.महापौर : कार्यकारी अभिंयता यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पापू) : ड्रेनेज लाईन तसेच पाणी पुरवठया बाबतचे देखभाल दुरूस्तीचे काम तातडीने करण्यांत येतात. स.सदस्य श्री.रऊफ यांच्या घरासमोरील ड्रनेज लाईन मधून घाण पाणी बाहेर येते ही बातमी मला आताच कळाले त्या ठिकाणी नवीन ड्रेनेज पाईप लाईन करावी लागणार असून त्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेवून नवीन पाईप लाईन टाकावी लागेल. सध्या तात्पुरते दखभाल दुर्रूस्तीचे काम पाहणी करून करण्यांत येईल.

श्री.रशिद खान (मामू) : ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अंदाजपत्रकास सभागृहाची मंजुरी घ्यावी लागणार असे अधिकारी सांगतात परंतु जे सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी झ ाालेली विकास कामे उदयापर्यंत झालेली नाहीत. एकाच कामामध्ये २५ + २५ ते ५०-५० हजारा रूपयाची मंजुरी घेवून कामे करावीत . १ - १ लाख रूपया पर्यंतची कामे थांबून आहेत. प्रत्येक वार्डामध्ये बोरिंग घेण्याबाबत सभागृहाने मंजुरी दिलेली असतांना अद्या ाप पर्यंत काम पूर्ण झाली नाहीत. यास जबाबदार कोण अत्यावश्यक विकास कामे टप्प्याटप्प्याने करण्यांत यावीत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : अधिकारी हे स.सदस्यांचा आदर ठेवत नाही. महानगरपालिकेच्या सदस्यांची मुदत संपत आलेली आहे. तेव्हा सदस्यांनी सुचित केलेली कामे थांबवून ठेवू नयेत.

श्री.अब्दुल रऊफ : मी एका विकास कामाबाबत मा. आयुक्तांना फोनवरून विचारणा केली होती. मा. आयुक्त हे दालनात असतांना त्यांनी फोन हातात घेवून बाजूला ठेवला हे योग्य नाही.

श्री.गौतम खरात : मा.आयुक्त यांना पदभार स्विकारून जवळ जवळ २ महिने झाले असून आचार संहितेच्या काळात काहीच करायचे नाही चामडी वाचवायची त्यामुळे काही कार्यवाही होणार नाही. जाणिवपूर्वक टाळाटाळ करतात. परंतू अत्यावश्यक नागरी सेवा पुरविणे गरजेचे असेते याच आचारसंहितेची अडचण नाही मागील बैठकीत कमी रक्कमेची विकास कामे करण्याबाबत चर्चा होवून ती करण्यांत यावी व तसे अधिकार मा. आयुक्तांना आहेत. ५०-५० हजार पर्यंतचे अधिकार कार्यकारी अभियंत्यांना दिलेले आहेत व ३ लाख रूपया पर्यंतचे विकास कामे करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत. स.सदस्यांनी विकास कामे करण्याची मागणी करत असतांना आचार संहितेचे कारण दाखवून कामे करता येत नाहीत असे उत्तर अध्किारी यांनी देणे हे धोरण प्रशासनाचे योग्य वाटत नाही. आचर संहिता आड येत असेल तर प्रशासन व सर्व स.सदस्य मा. जिल्हाध्किाारी यांना भेटून अत्यावश्यक विकास कामे करण्याबाबतची मागणी करू परंतू हे सर्व बाजूला ठेवून मनमानीपणाने आंचारसंहितेचे कारण दाखवणे व विकास कामे ठप्प ठेवणे हे योग्य नाही.

सौ.दलाल लता : अधिकारी यांना दुपारी भेटावयास गेल्यास ते कार्यालयात भेटत नाहीत. निवडणूकीच्या कामासाठी गेलेले आहेत अशी उत्तरे मिळतात. गेल्या पंधरा दिवसापासून अधिकारी यांना निरवडणूकीच्या कामासाठी नियुक्त्या केलेल्या आहेत काय ? आचारसंहितेच्या नावाखाली अधिकारी कोणत्याही तक्रारीची दखल घेत नाहीत. विभाग प्रमुखाकडे तक्रार केली तरीही कार्यवाही होत नाही.शहरात घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. महानगरपालिकेकडे दक्षत कक्ष अस्तित्वात आहे

काय ? पावसाळयाचे दिवस असून नाल्यामधील घाण काढण्याची कार्यवाही व्हावी. शहरातील पाणी पुरवठा, ड्रेनेज, आरोग्य व स्वच्छता या दृष्टीने त्या त्या विभागाचे अधिकारी यांनी दक्षता घ्यावी तसेच टेलिफोन विभाग नेहमी रस्त्याच्या कडेला खोदकाम करतात त्यामुळे शहरामध्ये बऱ्याचशा रस्त्यावर खडड्े पडलेले आहे. डासांचा प्रार्दुभाव वाढण्याची शक्यता आहे अशी अत्यावश्यक कामे झाली पाहिजेत तसेच अधिकारी दुपार नंतर कार्यालयात उपलब्ध होतील याची प्रशासनाने दक्षत घ्यावी.

मा.महापौर: टेलिफोन विभागामार्फत शहरातील रस्त्यावर जे खडड्े होत आहे त्या संदर्भात चर्चा करण्यासाठी मागे एक बैठक घेण्यात आली होती. त्यात संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते असे ठरले की, संबंधित विभाग यापुढे महानगरपालिकेची परवानगी घेवून व नियमाने पैसे भरल्यास त्यांनी खोदकाम करावे परंतू पैसे न भरता परवानगी न घेता खोदकाम होत व रस्त्याची दुरावस्था होत असेल तर तशी कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांवर मा.आयुक्तांनी करावी. अधिकारी यांनी टेलिफोन विभागाने पैसे भरल्यावरच यापुढे परवानगी दयावी. त्यामुळे कुठे कामे केले व त्या विभागाने केले किंवा महानगरपालिकेने केले हे दिसून येईल यामुळे रस्त्यांवर खडड्े पडणार नाही व पाणी साठून डांस होणार नाही.

सो.लता दलाल : माझ्या वार्डा अंतर्गत एका रस्त्यावर टेलिफोन विभाग खोदकाम करत आहेत त्यास परवानगी दिलेली आहे काय विचारणा करण्यात यावी. प्रत्यक्षात टेलिफोन विभागाने रस्ता दुरूस्तीसाठी मनपाकडे भरलेले पैसे व त्यावर होणारा खर्च यात मोठी तफावत आहे ही रक्कम कोण भरणार.

श्री.हमीदोद्यीन ताबा : माझ्या वार्डामध्ये टेलिफोन विभागाने खोदकाम केले हे काम करत असतांना काही फरशी काढण्यांत आली होती. संबंधित विभागाचे पुर्ण काम संपेपर्यंत त्या ठिकाणची फरशी लोक घेवून गेले यात महानगरपालिकेचे नुकसान होते आहे यास जबाबदार कोण ?

मा.महापौर : स.सदस्य मी ताबा यांच्या वार्डात झालेल्या खोदकाम व त्या वरील फरशी कोण घेवून गेलेत यांची संबंधित अध्किाऱ्यांची चौकशी करावी. यापुढे महानगरपालिकाचे सबंधित अधिकारी यांनी टेलिफोन विभागाने पूर्ण पैसे भरल्यावरच परवानगी दयावी, तशी प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.हमीद ताबा : टेलिफोन विभागाने रस्ता खोदला त्यांनी पूर्ण फरशी काढून टाकली फरशी लोक घेवून गेलेत यात महानगरपालिकेचे नुकसान झाले ही बाब स.सदस्यांनी सभागृहात बोलल्यानंतर अधिकारी ॲक्शन घेणार काय ? अधिकारी यांनीच याबाबत लक्ष दयावयास पाहिजे.

मा.महापौर : मा.आयुक्त यांनी सदर ठिकाणची पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल रऊफ : ड्रेनेज व पाणी पुरवठया बाबतचा संपूर्ण खुलासा करावा

श्री.हमीदउद्यीन ताबा :

श्री.सुर्यवंशी महादेव : निवडणूक आचारसंहिता लागू झाली त्यामुळे कामे थांबलेली आहेत. एका महिन्याच्या आचारसंहिते ऐवजी ३ महिने आचारसंहिता सलग आहे. निवडणूक आयोगाने आचारसंहिते बाबतचे जे नियम घालून दिले ते सर्वांनांच सारखे असणार महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालयाचे वृत्तपत्रात २१/२ कोटीचे टेंडर आलेले असून त्या विभागाला आचारसंहिताचे नियम लागू नाहीत काय ? अत्यावश्यक शहरी नागरी सुविधा देण्यांस आचारसंहिता

आड येत नाही. अधिकारी मुददाम कामे करत नाहीत. मुंबई महानगरपालिकामध्ये अत्यावश्यक विकास कामासाठी स्थायी समितीच्या मंजुरीनुसार कामे होवू लागली आहे. ३-३ महिन्याची आचारसंहिता प्रशासन मनाशी बाळगून बसेल तर विकास कामे ठप्प ाहेतील. यासाठी प्रशासनाने निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून देवून तसा संपर्क साधावा व कार्यवाही करावी. काही विकास कामे संदर्भात मंजुरी मिळाल्यानंतर काम सुरू होवून बऱ्याच दिवस चालतात परंतु एकदा काम सुरू केल्यानंतर योग्य त्या कालावधीत ते काम पूर्ण झाले पाहिजे. असे केले तर महानगरपालिकेचे नुकसान होणार नाही. विधानसभा / लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता ११ ऑक्टोंबर पर्यंत असून लगेचच २-३ महिन्याच्या खंडानंतर महानगरपलिकेची सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. पुन्हा आचारसंहिता लागू होईल . या सर्व परिस्थितीचा प्रशासनानेच विचार करून आवश्यक ती शहरातील विकास कामे करण्यावर भर दयावा.

श्री.प्रकाश निकाळजे : आचार सहितेमध्ये कोणती कामे करता येतात कोणती करता येत नाही याचा मा. आयुक्तांनी खुलासा करावा. आचार संहिता लागू होण्याच्या आगोदर ज्या कामा बाबतच्या संचिका थांबून आहेत त्या मा. आयुक्त यांनी तात्काळ निकाली काढाव्यात. मुंबई महापालिकेने टेंडर वृत्तपत्रात जाहिर केले त्या महापालिकेला आचार संहिता लागू पडत नाही काय याचाही खुलासा व्हावा.

श्री.हमीदोद्यीन ताबा :२-३ महिन्यापुर्वी निविदा काढण्यात आल्या त्याची मुदत वाढवण्यात येत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :आचार संहितेच्या अगोदर स्थायी समितीत ज्या ज्या कामंना मंजुरी दिलेली आहे ती कामे करण्यास प्रशासनास काय अडचण आहे अशा प्रकारची कामे ठराविक वेळीच व्हावयात पाहिजे. शहरातील अत्यावश्यक नागरी सुविधा पुरविण्याचे काम प्रशासनाला करणे भाग आहे. याचा विचार प्रशासनानेच करावा.

मा.महापौर : मा. आयुक्त खुलासा करतील.

मा.आयुक्त : सभागृहात बऱ्याच स.सदस्यांनी विकासात्मक कामे होण्याबाबत प्रश्न उपस्थित कले व विचार प्रगट केले. मा.सभागृहाला जितकी आपुलकी आहे तेवढीच आपुलकी प्रशासनाला ओ. ड्रेनेज पाणी पुरवठा स्वच्छता आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्क विकास कामे करण्या संदर्भात तसेच ज्या कामा बाबत स्थायी समितीने मंजुरी दिली आहे ती कामे करता येतील किंवा कसे या बाबत मा. निवडणूक आयुक्त यांना पत्राद्वारे कळविले होते. अत्यावश्यक नागरी सुविधा पुरविण्यास हरकत नाही असे कसे या बाबत मा. निवडणूक आयुक्त यांना पत्राद्वारे कळविले होते. अत्यावश्यक नागरी सुविधा पुरविण्यास हरकत नाही असे निवडणूक आयोगाला कळविले आहे. परंतु ही कामे करतांना आचार संहितेचा भंग होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी असे निवडणूक आयोगातर्फे कळविण्यात आले. त्यामुळे या पत्रव्यवहाराने ही कामे करण्यास उशीर झालेला आहे. स्थायी समितीने मंजुरी दिलेले सर्व कामे योग्य त्या वेळीच होतील यात शंका नाही.तसेच आचार संहितेमध्ये ड्रेनेज, पाणी पुरवठा स्वच्छता आरोग्याच्या बाबतीत नवीन उद्‌भवलेली कामे ही आवश्यक नागरी सुविधा म्हणून करण्यांत येतील. त्या

संदर्भाच्या सर्व संचिका २-३ दिवसांत निकाली काढण्यात येवून कामे सुरळीत होतील.

श्री.अब्दुल रऊफ :माझ्या घरासमोर ड्रेनेज पाणी वाहू लागले त्या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी मा. आयुक्त यांची तात्काळ मंजुरी घेवून कार्यवाही करावी.

मा.महापौर : स.सदस्यांनी विकासात्मक कामाबाबतच्या मांडलेल्या सूचना व त्यानुसार मा. आयुक्त यांनी निवडणूक आयोगाशी केलला पत्रव्यवहार , यास आयोगाने मंजुरी दिलेली आहे. त्यानंतर विलंबीत संचिका २-३ दिवसांच्या आत निकाली काढण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिलेले आहे. आचार संहितेच्या काळात अत्यावश्यक विकास कामे होण्यासाठी निवडणूक अधिकारी यांच्याशी मी स्वत: संपर्क साधलेला होता. जी कामे करता येतात ती करण्याचे अधिकारी यांनी नाकारणे हे योग्य नाही. मा. आयुक्त यांनी सुचवल्यानुसार सर्व संचिका निकाली काढून कुणाचीही अडवणूक होणार नाही याची दक्षत प्रशासनानी घ्यावी. सर्वांच्या सहकार्यानेच कामे होवू शकतात. तसेच लोकसभा व राज्यातील विधानसभेची आचारसंहिता लागू असल्याने कोणत्याही विषयावर चर्चा किंवा ठरांवास मंजुरी देता येणार नाही.

या नंतर जन, गण, मन या राष्ट्र गिताने सभा संपल्याचे १.०० वाजता मा.महापौर यांनी घोषित केले.

| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| --- | --- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८-९-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शनिवार दिनांक १८-९-९९ रोजी मा.महापौर श्री.सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरूवात झाली. सभेला मा. आयुक्तांसह संबंधित अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स.स.श्री.केनेकर संजय किशनराव | उप महापौर |
| २. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री.अफसर खॅां यासीन खाँ | स.सदस्य |
| ४. | स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई | स.सदस्य |
| ५. | स.स.सौ.साजेदा बेगम | |
| ६. | स.स.श्री.ॲड गणेश किसनराव वानखेडे | |
| ७. | स.स.श्रीमती जोशी रजनी रमेश | |
| ८. | स.स.सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | |
| ९. | स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | |
| १०. | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | |
| ११. | स.स.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | |
| १२. | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | |
| १३. | स.स.श्री.बैनाडे कवरसिंग किशनसिंग | |
| १४. | स.स.श्री.मालानी प्रफल्ल लालचंद | |
| १५. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | |
| १६. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | |
| १७. | स.स.श्री.फजलउल्ला खाँन अजमतउल्ला खाँन | |
| १८. | स.स.श्रीमती नुरजहाँ बेगम अ रहेमान खाँन | |
| १९. | स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव | |
| २०. | स.स.श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहमद | |
| २१. | स.स.सौ.मोहसिंना बिल्कीस विखारोद्यीन | |
| २२. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर | |
| २३. | स.स.श्री .तुपे त्र्यंबक गणपतराव | |
| २४. | स.स.सौ.यशोदा धनंजय वाडेकर | |
| २५. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | |
| २६. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | |
| २७. | स.स.श्री.हमीदुद्यीन ताबा फसीयोद्यीन | |
| २८. | स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | |
| २९. | स.स.श्री.स.अ.एकबालोद्यीन स.मो.कुतुबोद्यीन | |
| ३०. | स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण | |
| ३१. | स.स.श्रीमती मुक्ताबाई सुदाम वाघमारे | |
| ३२. | स.स.सौ.लीता श्रीनिवास दलाल | |
| ३३. | स.स.श्री .ओक जयवंत केशवराव | |

३४. स.स.सौ.धांडे शकुंतला हरीदास
३५. स.स.श्री.अ.रशिद खाँन (मामू)
३६. स.स.डॉ.कराड भागवत किशनराव
३७. स.स.श्रीमती आव्हाड सविता संजय
३८. स.स.सौ.निर्मला विठठ्ल कांबळे
३९. स.स.श्री.धिल्लन तरविंद्रसिंग महेंद्रसिंग
४०. स.स.श्री.गंगाधर सुखदेव गाडे
४१. स.स.श्री .निकाळजे प्रकाश भाऊराव
४२. स.स.सौ.ज्योत्सना हिवराळे
४३. स.स.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे
४४. स.स.सौ.राधाबाई तळेकर
४५. स.स.श्रीमती काळुसे मंदा धनंजय
४६. स.स.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे
४७. स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
४८. स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास
४९. स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

**संवाद :**

श्री.हमीदोद्यीन ताबा : मागील बैठकीत ड्रेनेजची कामे करण्याबाबत आश्वासन दिले होते. अद्याप पर्यंत कार्यवाही झालेली नाही .

श्री.नरेंद्र पाटील : सभागृहात सर्वसाधारण चर्चा होवू दयावी. मागील एका बैठकीत रस्ते डांबरीकरण संदर्भात चौकशी समिती नेमलेली होती. अद्या ाप त्या चौकशी समितीचा अहवाल आलेला नाही त्या समितीमध्ये कोणाचा समावेश केलेला आहे हे कळू शकले नाही. याबाबत खुलासा करावा.

मा.महापौर : आचर संहिता असल्यामुळे चर्चा करता येणार नाही. कोरम अभावी सभा २० मिनिटे तहकुब करण्यात येते. (वेळ ११.३५ वा. सभेला सुरूवात १२.०५ वाजता) कोरम अभावी २० मिनिटासाठी स्थगित करण्यात आलेली सभा पुन्हा १२.०५ वाजता सुरू झाली.

श्री.हमीदोद्यीन ताबा : मागील बैठकीत ड्रेनेजची कामे करण्या संदर्भात ८ दिवसात कार्यवाही होईल असे आश्वासन दिलेले होते कार्यवाही झालेली नाही खुलासा करावा.

श्री.देशमुख व्ही.व्ही. : स्वा.सेनानी श्री.तुळशीराम जाधव यांचे दुःखद निधन झाले. मराठवाडयातील थोर व जेष्ठ स्वा.सैनिकांतील एक अग्रगण्य होते. महाराष्ट्र राज्याचे स्वा.सैनिक समितीचे ते अध्यक्ष होते. तसेच थोर स्वातंत्र्य सैनिक श्री.रामगोपाल माहेश्वरी यांचेही दुखद निधन झाले ते "नवभारत " पत्र समुहाचे संपादक , पत्रकारीकेतील युगपुरूष ,महान कर्मयोगी आणि माहेश्वरी महासभेचे अध्यक्ष तसेच राष्ट्र भाषेला गौरवस्थानी नेण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे पुरूष होते या दोन्हीही स्वर्गीय पुरूषांना ०२ मिनिटे भावपुर्ण श्रंध्दांजली सभागृहात अर्पण करण्यात यावी.

मा.महापौर : ठिक आहे स्व.तुळशीराम जाधव तसेच स्व. रामगोपालजी माहेश्वरी यांना ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रंध्दांजली अर्पण करण्यात यावी.
सभागृहातील सुचनेनुसार मराठवाडयातील थोर व अग्रगण्य सांतंत्र्य सेनानी स्वातंत्र्य सैनिक स्वातंत्र्य सैनिक समितीचे अध्यक्ष, स्वातंत्र्य सेनानी

श्री.तुळशीराम जाधव आणि पत्रकारीतेतील युगपुरूष तथा नवभारत पत्र समुहाचे संस्थापक व माहेश्वरी महासभेचे अध्यक्ष श्री.रामगोपालजी माहेश्वरी यांना सभागृहाने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रंध्दांजली अर्पण केली.

श्री.अफसर खॉंन :मागील बैठकीत ड्रेनेजची कामे करण्याबाबत प्रशासनामार्फत आश्वासन दिले होते. अद्या ाप कामे झाली नाहीत. शहरात दुर्गंधी सुटलेली आहे. तसेच आचारसहिंतेच्या नावाखाली शहरातील रस्त्यावर मोठमोठे खडड्े पडलेले दिसून येतात. आचारसहिंता शिथील झाली असेल तर पुन्हा ७दिवसाच्या आत ` बैठक घेण्यात यावी व विकास कामाबाबतचे निर्णय व्हावे.

श्री.मोहसिन अहमद : विकास कामे करण्याकरीता मा. आयुक्त यांनी निवडणूक आयुक्त यांची परवानगी घेवून आचारसंहिता संपण्याच्या अगोदर विकास कामे सुरू केली त्याबदद्ल मी त्यांचे स्वागत करतो. तरी पण आणखी बरेच प्रस्ताव प्रलंबित आहे. पुन्हा ५-६ महिन्यांनतर आचारांहिता लागेल याचा विचार करता नगरसेवकांच्या निधीतून करावयाची जी कामे आहेत ती १ महिन्याच्या आत व्हावी. किंवा लवकर होणे शक्य असेल तर तसे करावे. त्याबाबतचा निर्णय आजच घ्यावा. २. तसेच स.सदस्य पै.श्री.जावेद रज्जाक, संदर्भात जे प्रस्ताव मागील बैठकीत मंजुर कलेले होते आचार संहितेमुळे त्यांची अंमलबजावणी करता येत नव्हती आता त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात येवून देवू केलेली मदत ताबडतोब सूपूर्द करावी.

श्री.जयवंत ओक : स.स.श्री.अफसर खॉंन तसे स.सदस्य श्री.मोहसिन अहमद यांनी मांडलेल्या सुचनाची अंमलबजावणी व्हावी. तसेच शहरातील अत्यावश्यक सुविधा उदा.ड्रेनेज, पाणी, रस्ते , लाईट बाबतीत ज्या अडचणी येतील त्याबाबतची कामे त्या वार्डातील नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून करण्यात यावी. विद्युत दिव्यांच्या संदर्भात ८ दिवसात कार्यवाही व्हावी. पुन्हा महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूकीची आचार संहिता लागेल शहरातील विद्युत दिवे ६ वाजता लावण्याऐवजी ७ वाजता लावण्यात येतात. यामुळे महानगरपालिकेचा आतापर्यंत १ लाख रूपयाचा फायदा झाला. त्याबदद्ल नवीन आयुक्तांचे अभिनंदन.

श्री.हमीदोद्यीन ताबा : मागील बैठकीत मी मागणी केलेल्या ड्रेनजच्या कामा बाबतचा खुलासा दयावा.

मा.महापौर : सभागृहात स.सदस्यांनी मांडलेल्या सुचनांची मा. आयुक्त यांनी नियमाने अंमलबजावणी करून कार्यवाही करावी. आचार संहिता शिथिल करण्यात आलेली आहे किंवा काय याबाबत मा. आयुक्त यांनी फक्सद्वारे विचारणा करावी जर आचार संहिता शिथिल झाली असेल तर ७ दिवसाच्या आत पुन्हा बैठकीचे आयोजन करण्यात येईल. आचार संहिता लागू असल्यामुळे कोणत्याही विषयावर चर्चा करता येणार नाही. ज्यामुळे आजची बैठक संपल्याचे घोषित केले.

या बरोबर जन,गण,मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०-१०-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दिनांक २०.१०९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात सकाळी ११.३० वाजता वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला अधिकरी वर्ग तसेच मा. आयुक्त यांच्यासह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.(मा सभासदांची उपस्थिती रजिस्टर प्रमाणे)**

१ स.स.श्री.सोनवणे सुदाम रामदास
२ स.स.श्री.ढगे नरसिंग मुरलीधर
३ स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव
४ स.स.श्री.अफसर खान यासीन खान
५ स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव
६ स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम
७ स.स.सौ.साजेदा बेगम
८ स.स.श्री.म.सलीम म.हनिफ
९ स.स.श्री.गौतम भागाजी खरात
१० स.स.ॲड. श्री.गणेश किशनराव वानखेडे
११ स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१२ स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१३ स.स.सौ.शिलाबाई गुंजाळे
१४ स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी
१५ स.स.श्री.नरेंद्र यादवराव पाटील
१६ स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१७ स.स.सौ.पदमा बाबुराव शिंदे
१८ स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी
१९ स.स.श्री.मालाणी प्रफुल्ल लालचंद
२० स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ
२१ स.स.श्री.फजलउल्लाखँन अजमतउल्ला खाँन
२२ स.स.श्री.अजीज खँ गणी खाँ
२३ स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्ताफा
२४ स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव
२५ स.स.श्री.हाजी मोहसन अहेमद हाजी बशीर अहेमद
२६ स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्यीन
२७ स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर
२८ स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
२९ स.स.श्रीमती नुरजहा बेगम अ. रहेमान खाँन
३० स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
३१ स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद
३२ स.स.श्री.हमीदद्यीन ताबा फसीयोद्यीन
३३ स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.आबुद

३४ स.स.श्री.स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
३५ स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
३६ स.स.श्री.स.अली मिरा सलामी
३७ स.स.श्री.लाहोट रमेश दिपचंद
३८ स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
३९ स.स.श्रीमती अलका रमेश पाटील
४० स.स.सौ. धांडे शकुंतला हरीदास
४१ अ.रशीद खाँन (मामू)
४२ स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
४३ स.स.डॉ. माया लिंबाजी लाडवाणी
४४ स.स.सौ.आव्हाड सविता संजय
४५ स.स.सौ.निर्मल विठठ्ल कांबळे
४६ स.स.श्री.अब्दुल रशिद अ सत्तार
४७ स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४८ स.स.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन
४९ स.स.श्री.बारवाल गजानन रामकिशन
५० स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
५१ स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
५२ स.स.श्री.जोशी संजय रामदास
५३ स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५४ स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५५ स.स.सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे
५६ स.स.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे
५७ स.स.सौ. राधाबाई तळेकर
५८ स.स.श्री.विठठ्ल किशन जाधव
५९ स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय
६० स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
६१ स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
६२ स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास
६३ स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

**संवाद :**

मा.नगरसचिव :प्रथमतः सभागृहातील सर्व उपस्थिती असलेल्यांना प्रशासनातर्फे "दसरा सणा" निमित्त हार्दिक शुभेच्छा . मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४५ चे अनुसूची प्रकरण २चे नियम १ अ नुसार दर महिन्याच्या २० तारखेच्या आत सर्वसाधारण सभा घेणे आवश्यक आहे. नियम क्र.१(क) अन्वये महापौर/ उपमहापौर पद रिक्त असल्याने मा. सभापती स्थायी समिती यांनी आजच्या सभेचे आयोजन केलेले आहे. आणि नियम क्र.१(ग) अन्वये आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी उपस्थित असलेल्या स.सभासदामधून निवड करावी लागणार आहे. नियम क्र.४३ प्रमाणे साधारणतः मतदान हात वर करून घ्यावे अशी तरतुद आहे.

श्री.अफसर खॉन : आघाडीच्या स. सभासदांतर्फे स.सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांचे नाव सुचविण्यांत येते.

श्री.अ.रशिद खॉन (मामू) : माझे यास अनुमोदन आहे.

श्री.महादेव सुर्यवंशी : आजच्या बैठकीसाठी पिठासन अधिकारी म्हणून स.सदस्य श्री.प्रदिपजी जैस्वाल यांचे नाव सुचविण्यात येते.

मा.नगरसचिव : स.सभासद श्री.नरेंद्र पाटील तसेच स.सभासद श्री.प्रदिपजी जैस्वाल यांचे नाव सुचविण्यात आलेले आहे. हात वर करून मतदान घेवून निवड करण्यांत येईल स.स.श्री.नरेंद्र पाटील यांच्या बाजूने सभासदांनी हात वर करावे.

श्री.अफसर खान : आघाडीच्या स.सभासदातर्फे मा.सभागृहनेता , स.सदस्य श्री.प्रदिपजी जैस्वाल तसेच स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांना विनंती की, आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी स.सभासद श्री.नरेंद्र पाटील यांची निवड होण्यास संम्मती दयावी.

श्री.प्रदिपजी जैस्वाल :माजी महापौर श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय तसेच आघाडीच्या स.सभासदांनी विनंती केल्यानुसार आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी स.सभासद श्री.नरेंद्र पाटील यांची निवड करण्यास आमची संम्मती आहे त्यांनी अध्यक्षस्थान स्विकारावे.

मा.नगरसचिव : सभागृहाने आता घेतलेल्या निर्णयानुसार आजच्या सभेच्या पिठासन अधिकारी म्हणून स.सभासद श्री.नरेंद्र पाटील यांची एकमताने निवड करण्यात आलेली आहे. त्यांना विनती की, त्यांनी आसनग्रहण करावे. (याच वेळी स.सभासद श्री.नरेंद्र पाटील पिठासन अधिकारी म्हणून आसनग्रहण करतात.)

श्री.रश्दि खॉन (मामू) : उपमहापौरांचे आसन रिक्त आहे या आसनावर श्री.हमीदोद्यीन ताबा यांना बसविण्यात यावे.

पिठासन अधिकारी : सभागृहातील सर्व स.सभासदांच्या भावना लक्षात घेता उपमहापौरांच्या आसनावर स.सभासद श्री.हमीदोद्यीन ताबा यांनी स्थानापन्न व्हावे.

(याचीवेळी उपमहापौरांच्या आसनावर स.सभासद श्री.हमीदोद्यीन ताबा स्थानापन्न होतात.)

पिठासन अधिकारी :सभागृहात स.सभासदांनी शांतता पाळावी आजच्या सभेसाठी सर्व स.सभासदांनी माझी अध्यक्षस्थानी एकमताने निवड केली त्याबद्यल मी सर्वांचा आभारी आहे. तसेच आजची सभाही नियमाने दर महिन्याच्या २० तारखेच्या आत घ्यावी लागते त्यानुसार घेण्यात येत आहे. स.सभासदांना दोन शब्द मांडावयाचे असेल त्यांनी मांडावे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ नेते स्व.श्री.प्रल्हादजी अभ्यंकर , शिवसेना पक्षाचे जेष्ठ नेते , माजी आमदार, खासदार पद भूषवलेले स्व.श्री.वामनरावजी महाडीक, पद्मश्री शामरावजी कदम, औरंगाबादतील नामांकित वकील पै.श्री.बद्रीद्यीन काजी, स्व.चंद्रकांतजी डिंडोरे, त्याच प्रमाणे नांदेडचे स्व.श्री.नारायण चव्हाण, या सर्वांचे दु:खद निधनाबद्यल सभागृहात ०२ मिनिटे उभे रूान श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र.६५.१**

नवनिर्वाचित विधान सभा, लोकसभा सदस्य महाराष्ट्राचे मुख्यमंत्री भारताचे पंतप्रधान यांचे अभिनंदन करणे संबंधी.

सुचक : श्री.कचरू नवपुते
श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय
अनुमोदक :श्री.महादेव सुर्यवंशी

**<u>संवाद :</u>**

श्री.कचरू नवपुते : या शहराचे खासदार म्हणून श्री.चंद्रकांतजी खैरे तसेच शहराचे आमदार, राज्यमंत्री मंडळावर निवड झालेले श्री.राजेंद्र दर्डा तसेच पुर्व मतदार संघातून आमदार पदावर निवडून आलेले श्री.हरीभाऊ बागडे यांनाही या सभागृहात अभिनंदानाचा ठराव संम्मत करण्यांत यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : महाराष्ट्रात कॉंग्रंस व राष्ट्रवादी कॉंग्रेस याचें संयुक्त सरकार स्थापन होवून सत्ता परिवर्तन झाले महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदासाठी मा.ना.श्री.विलासराव देशमुख राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माननीय श्री.छगनरावजी भुजबळ यांची उपमुख्यमंत्री म्हणून, तसेच या जिल्हयाचे खासदार पदी श्री.चंद्रकांतजी खैरे व या शहराचे आमदार पदी श्री. राजेंद्र दर्डा व मा. श्री.हरीभाऊजी बागडे यांचीही आमदार पदी निवड झाल्याबद्यल या सर्वांचा एकत्रित अभिनंदनाचा ठराव या सभागृहाने मंजूर करावा.

श्री.गौतम खरात : काही स.सभसदांनी महाराष्ट्रात कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस व बहुजन समाज पार्टी, रिपाई , शेकापा, पक्षाचे संयुक्त सरकार स्थापन करण्यात आले त्या बद्यल अभिनंदानाचा ठराव ठेवण्याबाबत सुचना केल्या आहेत

(याचवेळी सभागृहात काही स.सभासदांनी टेबले वाजवून मोठमोठयाने बोलणे सुरू केले.)

पिठासन अधिकारी : सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. कोणत्याही राजकीय पक्षाबाबत सभागृहात चर्चा करू नये.

श्री.संजय जोशी : कॉग्रेस प्रणीत राष्ट्रवादी कॉग्रेसचे व इतर काही पक्षाचे हातभार घेवून संयुक्त सरकार स्थापन केलेले आहे. परंतु त्यांना आणखी बहुमत सिध्द करून दयावयाचे आहेत त्यानंतर पुढील कामकाज हे सयुक्त सरकार चालविणार आहे. बहुमत सिध्द झाल्यास अभिनंदनाचा ठराव मंजुर करणे योग्य होईल.

श्री.महादेव सुर्यवशी : केंद्रात भाजप व मित्र पक्षाचे संयुक्त सरकार स्थापन्नाबद्यल तसेच प्रतप्रधानपदी श्री.अटल बिहारी वाजपेयी यांची नियुक्ती झाली त्याबद्यलचा अभिनंदनाचा ठराव मंजुर करून तशी त्या ठरावाची प्रत केंद्र सरकारकडे पाठवावी.

पिठासन अधिकारी : सभागृहात स.सदस्यांनी सुचविल्यानुसार व सर्वांच्या भावना लक्षत घेवून भारताचे प्रतप्रधान पदी श्री.अटल बिहारी वाजपेयी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदी श्री.विलासरावजी देशमुख व त्यांच्या मित्र पक्षातील सदस्य यांनी सरकार स्थापन केल्याबद्यल तसेच या शहराचे खासदार पदी श्री.चंद्रकांतजी खैरे व आमदार पदी श्री.राजेंद्र दर्डा श्री.हरीभाऊ बागडे यांची निवड झाल्याबद्यल या सभागृहातर्फे सर्वानुमते अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहाच्या संम्मतीनुसार भारताचे पंतप्रधानपदी श्री.अटल बिहारी वाजपेयी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदी श्री.विलासरावजी देशमुख या शहराचे खासदार पदी

श्री.चंद्रकांतजी खैरे आणि पुर्व मतदार संघातून श्री हरीभाऊ बागडे व पश्चिम मतदार संघातून श्री.राजेंद्र दर्डा यांची निवड झाल्याबद्दल या सभागृह या सर्वांचे अभिनंदन करते ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद :**

श्री.प्रभाकर विधाते : मागील आठवडयात कर्मचारी संघटनेने पाचव्या वेतनाबाबत उपोषण केले त्या काळात व आजही बऱ्याच रस्त्यावर घाण साचलेली आहे. त्यामुळे नागरिकांना येण्याजाण्यास त्रास होतो. शहरातील सर्व रस्त्यावरील घाण उचलण्याबाबत आदेश साफसफाई कर्मचाऱ्यांना देण्यात यावे.

श्री.रशिद खान मामू : पाच दिवसापूर्वी कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींनी कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करण्यासाठी उपोषण कले उपोषण मागे घेण्यात आले. परंतू प्रशासनाने याबाबत काय निर्णय घेतलेला आहे पुन्हा उपोषण संप झाल्यास अशाच प्रकारची शहरातील रस्त्यावर घाण होईल. शासनाकडील मंजुरी आलेली आहे काय ? याबाबत प्रशासनाने योग्य खुलासा करावा.

पिठासन अधिकारी : कर्मचारी संघटनेने पाचव्या वेतनाबाबतची मागणी केली त्यास मी सहमत आहे. उपोषण काळात शहरातील रस्त्यावर इतर कचरा वगैरे पडलेला साचलेला दिसून आला. कर्मचारी संघटनेने पुन्हा ५ वा वेतन आयोग मागणीसाठी मा.प्रशासनाने काय उपाययोजना केली व या पुढील उपाय योजना काय ? याबाबत सभागृहाला माहिती दयावी.

मा.आयुक्त : मागील आठवडयात कर्मचारी संघटनेचे नेते, प्रतिनिधी यांनी पाचव्या आयोग लागू करण्या संदर्भात उपोषण केले त्यावेळी शहरातील रस्त्यावर कचरा साठलेला आढळून आला, त्याबाबतच्या आतच काही स.सदस्यांनी सूचना मांडल्या कर्मचारी यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबत प्रशासनाने सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या ठरावाची प्रत पाठवून शिफारस केलेली आहे. या प्रकरणाचा अंतिम निर्णय लवकरच लागेल व पुन्हा कर्मचाऱ्यांना उपोषण संप वगैरे करण्याची वेळ येणार नाही व शहरातील रस्त्यावर कचरा, घाण वगैरे होणार नाही याची प्रशासन योग्य ती दखल घेईल.

श्री.संजय जोशी : महाराष्ट्रात नविन सरकार स्थापन झालेले आहे महानगरपालिकेचे कामगार अहोरात्र साफसफाईचे कामे करत असतात त्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबतची प्रशासनाच्या माध्यमातून लवकर कार्यवाही व्हावी .

श्री.सय्यद अली मिरा सलामी : कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन लागू करण्याबाबत सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्यानंतर तसा ठराव शासनाकडे पाठवण्यात आलेला आहे. त्यानुसार शासनाची मंजुरी दिल्याबाबतची प्रत मा.प्रशासनाकडे आलेली असून ती माहिती गुप्तपणे ठेवलेली आहे. संघटनेच्या नेते, प्रतिनिधींचे म्हणणे आहे की, ५ वा वेतन लागू करण्याबाबत शासनाची मंजुरी दिलेली आहे, मंजुरी आलेली आहे काय याचा खुलासा मा. आयुक्तांनी करावा.

श्री.अफसर खान : शासनाची ५ व्या वेतन आयोगा संदर्भात मंजुरीचे पत्र प्रशासनाकडे आलेले आहे काय ? खुलासा करावा.

श्री.गौतम खरात : राज्य शासनाच्या सर्व शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी ५ वा आयोग लागू झालेला आहे. त्यानुसारच महाराष्ट्रातील सर्व महापालिकेला ही लागू झाला आहे. कर्मचाऱ्यांना ५ वा आयोग लागू केल्यास त्यांना फायदा होईल दिनांक १-१-९६ ते १-१-९९ पर्यंतची मंजुरी दिलेली असून १-१-९९ पासून प्रत्यक्षात वेतन देण्यात येईल असे ठरले असतांना केवळ शासनाची मंजुरी नाही म्हणून पुढील कार्यवाही थांबून आहे. राज्य शासनाकडून मंजुरी संदर्भात प्रशासनाकडे पत्र आलेले आहेत काय ? त्याबाबतचा मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.मोहसिन अहमद : कर्मचारी यांनी ५ वा वेतन आयोग लागू करण्याच्या मागणीसाठी पुन्हा उपोषण करू नये याची दक्षता प्रशासनाने घ्यावी उपोषण काळात शहरातील विद्युत व्यवस्था वेळेवर न होणे, कचरा न उचलणे तसेच पाणी पुरवठा व्यवस्थीत न होणे बाबतची प्रकार दिसून आले शहरात रस्त्यावर घाणीचे ढिगारे आढळून येत होते तर काही ठिकाणी कर्मचाऱ्यांनी मुदद्‌ामहून कचरा रस्त्यावर आणून टाकलेला होता व पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी तर पाण्याची टाकी, पाण्याची लाईनचे वाल अशा ठिकाणी रस्त्यावर पाणी सोडलेले दिसून आहे. त्यासाठी यापुढे असे पुन्हा कर्मचारी मागणी बाबत उपोषण करणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी.

पिठासन अधिकारी : कर्मचारी संघटनेच्या नेत्यांनी ५ व्या वेतन लागू करण्या संदर्भात जी मागणी केली ती या सभागृहालाही मान्य आहेत. ठराव सभागृहाने मंजुरही केलेला आहेत कर्मचारी व अधिकारी यांच्या मागण्या पूर्ण होतील परंतू शहरात अस्वच्छता होऊ देऊ नये यांची काळजी घ्यावी तसेच मा. आयुक्त यांना मी विनंती करून सूचना देवू इच्छितो की, कर्मचाऱ्यांना त्यांच्या मागणीसाठी पुन्हा संप, उपोषण करण्याची वेळ येणार नाही तशी शासनाकडे प्रशासनाने तात्काळ शिफारस करून कार्यवाही करावी.

यानंतर " जन,गण,मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.पिठासन अधिकारी यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ३०-१०-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शनिवार दिनांक ३०-१०-९९ रोजी सकाळी ११.३० वाजता कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात मा.उच्च न्यायालय मुंबई ,खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील हक्क याचीका क्र.२१६२/९९ च्या संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र.४७९७/९९ च्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेले आदेश व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचिचे प्रकरण -२ चे नियम क्र.१ (क) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेशी विशेष सर्वसाधारण सभा आयोजिण्यात आली होती. या विशेष सर्वसाधारण सभेस स. सभासद उपस्थित होते. सभेची सुरवात "वंदे मातरम्" या गिताने झाली.**

१. स.स.श्री.सोनवणे सुदाम रामदास
२. स.स.श्री.केनेकर संजय किशनराव
३. स.स.श्री.ढगे नरसिंग मुरलीधर
४. स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव
५. स.स.श्री.अफसर खान यासीन खान
६. स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव
७. स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम
८. स.स.सौ.साजेदा बेगम
९. स.स.श्री.म.सलीम म.हनिफ
१०. स.स.श्री.गौतम भागाजी खरात
११. स.स.ॲड. श्री.गणेश किशनराव वानखेडे
१२. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१३. स.स.सौ.उषाबाई दिलीप गायकवाड
१४. स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१५. स.स.सौ.शिलाबाई गुंजाळे
१६. स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी
१७. स.स.श्री.भालेराव अभिमन्यु रामभाऊ
१८. स.स.श्री.नरेंद्र यादवराव पाटील
१९. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२०. स.स.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव
२१. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किशनसिंग
२२. स.स.सौ.पदमा बाबुराव शिंदे
२३. स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी
२४. स.स.श्री.मालाणी प्रफुल्ल लालचंद
२५. स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ
२६. स.स.सौ.विसपुते धनश्री अशोक
२७. स.स.सौ.फरहद बानो भ्र मो नवाज
२८. स.स.श्री.फजलउल्लाखॅंन अजमतउल्ला खॅंान
२९. स.स.श्री.अजीज खॅं गणी खॅंा
३०. स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्ताफा

३१. स.स.श्री.महमद मुस्ताक अहेमद
३२. स.स.श्रीमती नुरजहाँबेगम अ रहेमान खाँन
३३. स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव
३४. स.स.श्री.हाजी मोहसन अहेमद हाजी बशीर अहेमद
३५. स.स.श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह
३६. स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन
३७. स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर
३८. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
३९. स.स.सौ.वाडेकर यशोदा धनंजय
४०. स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
४१. स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र
४२. स.स.श्री.हमीदद्दीन ताबा फसीयोद्दीन
४३. स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.आबुद
४४. स.स.श्री.स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
४५. स.स.श्री.खाखोरडिया धिरज शांतिलाल
४६. स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
४७. स.स.श्री.स.अली मिरा सलामी
४८. स.स.श्री.लाहोट रमेश दिपचंद
४९. स.स.श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी
५०. स.स.श्रीमती वाघमारे मुक्ताबाई सुदाम
५१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
५२. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५३. स.स.श्रीमती अलका रमेश पाटील
५४. स.स.सौ. धांडे शकुंतला हरीदास
५५. अ.रशीद खाँन (मामू)
५६. स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
५७. स.स.डॉ. माया लिंबाजी लाडवाणी
५८. स.स.डॉ.श्री.कराड भागवत किशनराव
५९. स.स.सौ.आव्हाड सविता संजय
६०. स.स.सौ.निर्मल विठ्ठल कांबळे
६१. स.स.श्री.अब्दुल रशिद अ सत्तार
६२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
६३. स.स.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन
६४. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
६५. स.स.श्री.गंगाधर गाडे
६६. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिशन
६७. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६८. स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
६९. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७०. स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
७१. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
७२. स.स.सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे

७३. स.स.श्री.राजकुमार उर्फ सांडू बचाटे
७४. स.स.सौ. राधाबाई तळेकर
७५. स.स.श्री.विठ्ठल किशन जाधव
७६. स.स.श्री.मेहेर विजयकुमार गजानन
७७. स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय
७८. स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
७९. स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
८०. स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास
८१. स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आपण सभा कशाप्रकारे घेणार आहात याची प्रथम सभागृहास माहिती देण्यांत यावी.

नगर सचिव : औरंगाबाद महानगरपालिकेच्या महापौर व उप महापौर पदांची निवडणूक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) अन्वये दिनांक २०-४-९९ रोजी घेण्यांत आली. सदर महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीस मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे हक्क याचिका क्रमांक २१६२/९९, २७६४/९९ , २७६५/९९ अन्वये आव्हान देण्यांत आले असता सर्व याचिकांचा एकत्रितरित्या विचार करून मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७-८-९९ रोजी महापौर व उप महापौर पदांची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया रदद् ठरवून नव्याने निवडणूका घेण्याबाबत निर्णय दिला व या निर्णयास दिनांक २७-८-९९ पासून १५ दिवसांसाठी स्थिगितीही दिली.

मा उच्च न्यायालयाचे दिनांक २७-८-९९ रोजी झालेल्या निर्णयाचे संदर्भात निवडणूक प्रक्रिया ही मतदानापासून किंवा नामनिर्देशन पत्र भरण्यापासून सुरू करावी व सभेचे अध्यक्षस्थान कोणी भुषवावे या बदद्ल मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲपलिकेशन दिनांक ६-९-९९ रोजी दाखल करण्यांत आले होते. दरम्यान या निर्णया विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे स्पेशल लिव्ह टू अपील क्र.१३४२१/१९९९ अन्वये अपिल दाखल करण्यांत आल्याने मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयास मोशन बेंच वसे पर्यंत स्थगिती कायम ठेवण्यात आली. सदरचे अपिलाची दिनांक २४-९-९९ रोजी सुनावणी होवून आपिल नामंजुर करण्यांत आले तथापि या प्रकरणांत मा.सर्वोच्च न्यायालात पुनःर्विलोकन अर्ज सादर करण्यांत आले होते व त्याची सुनावणी होवून दिनांक ०५-१०-९९ रोजी पुनःर्विलोकन अर्ज ही नामंजुर करण्यांत आला.

प्रकरणी दिनांक २१-१०-९९ रोजी मा. उच्च न्यायालयाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले त्यानुसार निवडणूक प्रक्रीया नामनिर्देशन पत्र भरण्यापासून सुरू करावी व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण २ चे नियम १ (ग) प्रमाणे सभेच्या अध्यक्षस्थानी उपस्थित स.सदस्यांपैकी एका पालिका सदस्यांची निवड करावी असे आदेश दिलेले असल्यामुळे दिनांक २२-१०-९९ रोजी निवडणूकीची अधिसूचना काढून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (५) व अनुसूची

प्रकरण -२ नियम -१ (क) प्रमाणे निवडणूक कार्यक्रम व विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे.

**विषय क्र.६६/१**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण -२ नियम १-ग अन्वये पिठासन अधिकारी यांची नेमणूक करणे बाबत.

**संवाद** :

नगरसचिव : नियम १ (ग) असा आहे . प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान सभा भरण्यासाठी नेमलेल्या वेळी महापौर उपस्थित असेल तर त्याने स्विकारले पाहिजे आणि महापौरांचे पद रिकामे असेल तर उपमहापौराने किंवा उपमहापौरांच्या अनुपस्थित सभेकडून त्याप्रसंगी अध्यक्ष म्हणून निवडण्यांत येईल अशा अपस्थित असलेल्या पालिका सदस्यांपैकी एका पालिका सदस्यांने अध्यक्षस्थान स्विकारले पाहिजे. सभागृहास विनंती करण्यांत येते की, त्यांनी आपल्या उपस्थित सदस्यांमधून एका सदस्यांची अध्यक्ष /पिठासन अधिकारी म्हणून निवड करावी. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४३ अन्वये सर्वसाधारणपणे मतदान हात वर करून घ्यावे अशी तरतुद आहे.

नरेंद्र पाटील : ज्या नगरसेवकास पीठासन अधिकारी म्हणून नियुक्त करण्यांत येणार आहे त्या कास्टींग व्होट देण्याचा अधिकार असेल काय या बाबत कोठे उल्लेख नाही याबाबत कोर्टाकडून आदेश का घेतले नाहीत.

सचिव : प्रथम पिठासिन अधिकारी यांची नियुक्ती करण्यासाठी कृपया सदस्यांनी आपल्या सदस्यांमधून एका सदस्यांची निवड करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : स.नगरसेवक श्री.नरेंद्र पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करावा व नंतरच निवडणूक प्रक्रिया करण्यांत यावी.

मा.आयुक्त : कास्टींग व्होटच्या संदर्भाने जो मुद्या येथे उपस्थित करण्यांत आलेला आहे. त्यानुषंगाचे विषद करण्यांत येते की, त्यावेळी जी परिस्थीती उद्‌भवेल त्यानुसार त्यावेळी निर्णय घेण्यात येईल. सध्या प्रीसायडिंग ऑफिसर नेमावयाचा आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : ही बाब आपण न्यायालयात गेला होतात तेव्हा आपल्या लक्षात का आली नाही ?

मा.आयुक्त : आपण जो मुद्या उपस्थित केला आहे तशी परिस्थिती उद्‌भवेल तेव्हा आपल्या प्रश्नाचे उत्तर देवून पुढील प्रक्रिया पार पाडली जाईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : पीठासिन अधिकारी रूलिंग पार्टीचा होता. त्यांनी चुकीचा निर्णय दिल्यामुळे कोर्ट प्रकरण झाले. महानगरपालिकेची बदनामी होवू नये म्हणून असा पीठासीन अधिकारी असावी की कोणतीही पार्शलिटी होणार नाही युनॅनीमसली पीठासिन अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

मा.आयुक्त : पीठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती कशी व्हावी याबाबत सचिवांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. कास्टींग व्होटच्या संदर्भाने आपले नियम स्पष्ट आहेत. कास्टींग व्होटबाबत नियमही सचिवांनी वाचून दाखविलेले आहेत.

सचिव : सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.५५ कोणत्याही मतदानात जर सभापतीचे निर्णायक मत धरून एखादया इच्छुकाला इतर सर्व इच्छूकांना

मिळालेल्या मतांच्या सख्येपेक्ष अधिक मिळाली तर तो निवडून आला असे घोषित करण्यांत येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे : कास्टींग व्होट संदर्भाने प्रशासनातर्फे कोर्टाचा सल्ला का घेण्यांत आला नाही.

श्री.नरेंद्र पाटील: ही बाब कोर्टाकडून स्पष्ट करून ध्यावयास हवी होती.

श्री.गजानन बारवाल : कायदयानुसार निवडणूक घेण्यांत यावी कायद्यात दिलेल्या तत्वाहनुसार निवडणूक घेण्यांत यावी.

मा.आयुक्त : कास्टींग व्होटबाबत आपले नियम स्पष्ट आहेत त्यामुळे याबाबत कोर्टाकडून मार्गदर्शन घेण्यांची प्रशासनास आवश्यकता वाटली नाही.

श्री.महादेव सुर्यवंशी : महापौर, उपमहापौर यांच्या संदर्भाने आज घ्यावयाच्या बैठकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून मी मा.श्री.प्रदिप जैस्वाल यांचे नाव सुचवितो.

डॉ.श्री.भागवत कराड : पीठासीन अधिकाऱ्यासाठी सुचविण्यांत आलेल्या स.श्री.प्रदिप जैस्वाल यांच्या नावांस मी अनुमोदन देतो.

श्री.रशिद खान (मामू) : स.नगरसेवक श्री.निकाळजे यांनी पत्र दिले आहे की, जे स.नगरसेवक सहा महिन्यापासून सभेस हजर नाही त्यांस व्होटींगचे पॉवर नसतात.

मा.आयुक्त : आजची निवडणूक प्रक्रिया कायदयाप्रमाणे चालू आहे जो पर्यंत एखादा मुा उपस्थित होत नाही तोपर्यंत त्या मुद्यांचा खुलासा करता येत नाही. उद्‌भवणाऱ्या परिस्थीतीनुसार त्या त्या मुद्यांचा खुलासा केला जाईल.

श्री.स.अली मिरा सलामी : स.सदस्यांनी दिलेल्या पत्रावर आपण कोणता निर्णय घेणार याचा प्रथम खुलासा व्हावा.

श्री.गजानन बारवाल : पीठासीन अधिकारी म्हणून स.नगरसेवक प्रदिप जैस्वाल यांचे नांव सुचविण्यांत आलेले आहे. त्यानुसार पिठासन अधिकारी म्हणून नियुक्त करण्यांत यावे.

नगर सचिव : पीठासीन अधिकारी म्हणून सभागृहातून स.श्री.प्रदिप जैस्वाल यांचे एकच नांव सुचविण्यांत आलेले आहे. त्यानुसार स.श्री.प्रदिप जैस्वाल यांची पिठासीन अधिकारी म्हणून निवड झाली आहे. त्यांनी कृपया आसन गृहण करावे.

श्री.अफसर खान : स.सदस्यांनी दिलेल्या पत्रावर प्रथम खुलासा व्हावा (पीठासन अधिकारी म्हणून स.श्री.प्रदिप जैस्वाल यांनी सुत्र स्विकारली)

**ठराव :**

दिनांक ३०-१०-९९ च्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी स.स.श्री.प्रदिप जैस्वाल यांची पिठासन अधिकारी म्हणून निवड करण्यांत आली. त्यास एकमताने मंजुरी देण्यांत आली.

**संवाद :**

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : पीठासन अधिकारी म्हणून सन्माननीय श्री.प्रदिप जैस्वाल यांची निवड झाली परंतु त्यांना महापौरांचे अधिकार नाही त्यांची काय म्हणून निवड झाली याचा प्रथम खुलासा व्हावा.

श्री.महादेव सुर्यवंशी : नियमानुसार सभा सुरू करण्यांत यावी .

पिठासन अधिकारी : सभागृहात माझी एक मताने निवड केली त्याबदद्ल मी आपणा सर्वांचे आभार मानतो. सभेस सुरूवात करण्यांत येत आहे.

**विषय क्र.६७/२**

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंड पीठाकडील हक्क याचिका क्र.२१६२/९९ च्या निर्णयाचे संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र.४७९७/९९ च्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दिलेले आदेश व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (५) अन्वये आणि महानगरपालिका (महापौर आरक्षण) नियम १९९४चे तुरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाकडील अधिसूचना क्र.जीईएन/प्रक्र.१९१/९८ नवि-२४ दिनांक ५-८-९८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौरपद बीन राखीव ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार महापौर पदावर निवड करणे बाबत.

**<u>संवाद :</u>**

पिठासीन अधिकारी : मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबादने हक्क याचिका क्रमांक २१६२/८८ मध्ये दिलेले आदेश व त्या संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र.४७९७ /९९ च्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेला आदेश व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) अन्वये महापौर व उपमहापौर पदासाठी आजच्या सभेत निवड करण्याकरीता दिनांक २२-१०-९९ रोजी सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४४ व ४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यांत आला. दिनांक २२ ऑक्टोंबर ९९ ते २६ ऑक्टोंबर ९९ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २६ ऑक्टोंबर ९९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महापौर पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहेत.

१ सोनवणे सुदाम रामदास
२ सोनवणे सुदाम रामदास
३ धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४ धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५ धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
६ नरेंद्र यादवराव पाटील

महापौर पदासाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रची छाननीचे काम सभा कामकाज नियमावली नियम क्र.४४,४७ अन्वये आत करण्यांत येत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : पिठासीन अधिकाऱ्यांना त्यांच्या कामात साहय करण्यासाठी सहाय्यक म्हणून स.श्री.मुश्ताक अहमद यांना घेण्यात यावे निवडणूक प्रक्रिया निर्विवादपणे पार पाडली यासाठी पिठासीन अधिकाऱ्यांनी विरोधी पक्षातील सदस्यास सहाय्यक म्हणून घ्यावे.

पिठासीन अधिकारी : कोणताही नविन पायंडा पाडण्यात येवू नये. कायदयाच्या चौकटीत राहून निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे. महापौर पदासाठी प्राप्त अर्जाची छाननी पार पडली आहे. छाननीअंती खालील उमेदवारांचे अर्ज वैद्य ठरलेले आहेत.

१ सोनवणे सुदाम रामदास
२ धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
३ नरेंद्र यादवराव पाटील

श्री.मोहसिन अहमद : १५ दिवसापूर्वी मी प्रशासनास पत्र दिले आहे की, मत पत्रीकांवर उमेदवारांची नावे उर्दुतूनही टाकण्यात यावीत सभागृहात २२ सभासद उर्दु भाषिक आहेत. तेव्हा उमेदवारांची मतपत्रिकेवर उर्दु भाषेतही नांवे टाकण्यात यावीत.

पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये तशी तरतुद नसल्याने येत्या सर्वसाधारण सभेत ठराव घेता येईल किंवा शासनाकडे तसा प्रस्ताव पाठविण्यात येईल. कायदयात तशी तरतुद नसल्याने मतपित्रिकेवर उर्दु भाषेत नावे टाकता येणार नाही. महापौर पदासाठी प्राप्त अर्जापैकी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी ३० मिनिटाचा वेळ देण्यांत येतो. व ही सभा ३० मिनिटासाठी सभा तहकुब करण्यांत येत आहे. १२.१०

वाजता तहकुब झालेली सभा १२.४० वाजता परत सुरू झाली.

पिठासीन अधिकारी : महापौर पदासाठी प्राप्त सहा अर्जापैकी मुदतीत खालील उमेदवारांचे अर्ज मागे घेतलेला आहे.

१ श्री.नरेंद्र यादवराव पाटील

**महापौर पदासाठी खालील दोन उमेदवार आहेत.**

१ श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
२ श्री.सोनवणे सुदाम रामदास

या दोन उमेदवारांमध्ये महापौर पदाची निवडणूक होईल. ही निवडणूक सभा कामकाज नियमावली नियम क्रमांक ४५ अन्वये गुप्त मतदान पध्दतीने घेण्यांत येईल. सदर निवडणूक शांततेने व योग्य प्रकारे पार पाडता यावी म्हणून खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती निवडणूक कामासाठी करण्यांत येत आहे.

**१) मतमोजणी परिनिरीक्षक:**

१. श्री.एम.वाय.कांबळे,उप आयुक्त (प्र)
२. श्री.एस.आर.जरारे,मालमत्ता अधिकरी

**२) मतदान अधिकारी - मतपत्रिका वाटप करणे**

१ श्री.व्ही.व्ही.जावरे,प्रकल्प संचालक
२ श्री.एन.जी.दुराणी, वरिष्ठ लेखापाल
३ मतपेटीजवळील मतदान अधिकारी
१. श्री.संजय पवार, लेखाधिकारी
२. श्री.गणेश जाधव, क.लिपीक
३. स.सभासदांची नावे पुकारणे
१ श्री.रमेशचंद्र जैस्वाल, जनसंपर्क अधिकारी

महापौर पदाची गुप्त मतदान पध्दतीने निवडणूक घेण्यासाठी मतपत्रिका तयार करण्याकरीता एक तासाचा वेळ देण्यांत येतो. श्री. एच.आर.बाहेती व श्री.एच.एस.सपाटे यांनी मतपत्रीका तयार करून घ्यावी. मतपत्रीकेवर गोपनीयतेच्या द्रष्टीकोनातून अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रकांची

ढळमिसळ करण्यांत येईल तसेच स्थळप्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकांनी मतपत्रिका कोणास दिल्याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल. मतपत्रीका तयार करण्यासाठी एक तासाचा अवधी देण्यांत येत आहे.

श्री.नरेंद्र पाटील : उमेदवारांना मतदारासमोर आपली भुमिका मांडण्यासाठी संधी देण्यांत यावी.

श्री.गजानन बारवाल : नियमानुसार निवडणूक घेण्यांत यावी कोणताही नविन प्रस्ताव स्विकारण्यांत येवू नये.

पिठासीन अधिकारी : मतपत्रीका तयार करण्यासाठी एक तासाचा अवधी देण्यांत येतो. एक तासासाठी सभा तहकुब करण्यांत येते सभेचे कामकाज १.४५ वाजता सुरू होईल.

(१२.४५ वाजता तहकुब झालेली सभा १.४५ वाजता परत सुरू झाली)

पिठासीन अधिकारी : महापौर पदाच्या निवडणूकीची प्रक्रिया सुरू होत आहे. स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग व सोनवणे सुदाम रामदास हे दोन उमेदवार महापौर पदासाठी आहेत. सचीव मतदान प्रक्रियेंची माहिति देतील.

नगरसचिव : मतदानासाठी प्रभागनिहाय स.सदस्यांची नावे पुकारण्यात येतील. महापालिकेने पुरविलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे सभा काकाज नियमावलीच्या नियम क्र.४५ (आय ) प्रमाणे स. सदस्यांस पुरविलेली मतपत्रिका खराब झाली तर पिठासीन अधिकाऱ्यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रीका देण्यांत येईल. नियम क्र.४५ (जे) नुसार जर सभासद आपले नांव किंवा शब्द मतपत्रीकेवर लिहीला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खुण केली असेल ,जी छिद्रांकित (परपोरेटेड) नसेल तीच्यावर मत नोंदले नसेल अथवा जी संदीध्दतेमुळे निरूपयोगी होईल अशी मतपत्रीका अवैध समजली जाईल. नियम क्र. प्रमाणे प्रत्येक सदस्यांस एकमत देण्याचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजुला इच्छुकाला मत द्यावयाचे असेल त्यांच्या नांवासमोर गुण (X) फुली मारावी. सभा कामकाज नियमावली नियम ५१ अन्वये स्वत: उमेदवारास मतमोजणीच्या वेळी उपस्थित रहाण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्यास एखादा सभासदास आपला प्रतिनिधी प्रतिनिधी म्हणून पाठवता येईल. त्यासाठी मतदान सुरू होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी नावे पिठासन अधिकारी यांचेकडे द्यावीत. मोजणीच्यावेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधींनी व्यतिरिक्त इतर स.सभासदस्यांनी कृपया गर्दी करू नये. सर्व स.सभासदाच्या माहितीसाठी नमुना मतपत्रिका बायसच्या दोन्ही बाजून लावण्यांत आलेल्या आहेत.

पिठासीन अधिकारी : श्री.जाधव यांनी सभागृहात मतपेटी उघडून दाखववावी जाधव यांनी सभागृहास मतपेटी रिक्त असल्याचे दाखविली आहे. पेटी सील करून चावी पिठासीन अधिकाऱ्याकडे मतदानासाठी एक तासाचा अवधी देण्यांत येत आहे. जनसंपर्क अधिकारी श्री.रमेशचंद्र जैस्वाल यांनी प्रभागनिहाय स.सदस्यांची नांवे पुकारावीत.

खालील प्रमाणे स.सदस्यांनी मतदान केले.

| प्रभाग क्र.स.सदस्यांचे नाव | प्रभाग क्र.स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| १ श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | २. श्री.अफसर खाँन यासीन खाँन |

पिठासीन अधिकारी : स.ना.श्री गाढे साहेबांना मुंबईत जावयाचे असल्याने त्यांनी मतदान करून घ्यावे.

श्री.अविनाश कुमावत :स.सदस्य श्री.गंगाधर गाडे यांची मंत्रिमंडळात समावेश झाल्याने त्यांचे हार्दिक अभिनंदन.

पिठासीन अधिकारी : सभागृहातर्फे स.स.श्री.गंगाधर गाडे यांचा मंत्रीमंडळात समावेश झाल्याने त्यांचे एकमुखाने स्वागत करण्यांत यते.

| प्रभाग क्र.स.सदस्यांचे नाव | प्रभाग क्र.स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| ६५ श्री.गंगाधर सुखदेव गाडे | ३. श्री.विधाते प्रभाकर सिताराम |
| ०४ सौ.साजेदा बेगम | ५ श्री.म.सलिम म.हनिफ |
| ०६ श्री.गौतम भागाजी खरात वानखेडे | ७ श्री.ॲड गणेश किसनराव |
| ०८ सौ.जोशी रजनी रमेश मुंडलिक | १० सौ.विमलबाई नंदकुमार |
| ११ सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | १२ श्री.लांडगे गौतम लिंबाजी |
| १३ श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | १५ श्री.नरेंद्र यादवराव पाटील |
| १६ श्री.कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | १७ श्री.सोनवणे सुदाम रामदास |
| १८ श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | १९ श्री.बैनाडे कवरसिंग किशनसिंग |
| २० सौ.पदमा बाबुराव शिंदे | २१ श्री.टाकळकर सुभाष भिकाजी |

पिठासीन अधिकारी : स.नगरसेवक इंगळे रविंद्र यांची मतपत्रीका शाईचा डाग पडल्यामुळे खराब झालेली आहे. ती मतपत्रीका रदद् करून त्यांना दुसरी मतपत्रीका देण्यांत यावी. खराब झालेली मतपत्रीका पॅकेटमध्ये बंद करून ठेवावी.

| | |
|---|---|
| २२ श्री.मालाणी प्रफुल्ल विश्वनाथ | २३ श्रीमती पांचाळ चंपाबाई |

पिठासीन अधिकारी : श्रीमती पांचाळ चंपाबाई यांनी मतदानासाठी मदतनिसाची लेखी मागणी केलेली आहे. त्यांना उप आयुक्त कांबळे साहेबांनी सहाय्य करावे.

श्री.रशिद खान मामू : श्रीमती पांचळ आक्का नेहमी सही करतात आंगठा लावतात याचा खुलासा व्हावा त्यांनी पत्रावर सही केली आहे की आंगठा याचा खुलासा व्हावा.

पिठासीन अधिकारी : त्यांना लिहीता वाचता येत नसल्यामुळे त्यांनी मदत निसाची लेखी मागणी केलेली आहे. त्यानुसार त्यांना मदतनीस देण्यांत येत आहे. याबाबत मी श्रीमती पांचाळ यांनी दिलेले पत्र पाहिले आहे.

| प्रभाग क्र.स.सदस्यांचे नाव | प्रभाग क्र.स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| २४ सौ.विसपूते धनश्री अशोक | २५. सौ.फरहदबानो भ्र मो.नवाज |
| २६ श्री.फजलउल्ला खॉन अजमलउल्ला खॉन | २७ श्री.अजीज खाँ गणी खाँ |
| २८ श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | २९ श्री.अहमद मुश्ताक अहमद |
| ३० श्रीमती नुरजहाँबेगम अ.रहेमान खाँन | ३१ श्री.देशमुख वसंत विनायकराव |

३३ श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह
३४ सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन
३६ श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर
३७ श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
३८ सौ.वाडेकर यशोदा धनंजय
३९ श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
४० श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद
४१ श्री हमीदद्दीन फसीयोद्दीन
४२ श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद
४३ श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन
६४ श्री.जैन विकास रतनलाल
४५ श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण

पिठासीन अधिकारी : स.नगरसेवक श्री.महादेव सुर्यवंशी यांची पिठासीन अधिकाऱ्यांचे पद सांभाळावे यावेळी सभागृहाचे सम्मतीने स.श्री.महादेव सुर्यवंशी यांनी आसन ग्रहण केले.

४६ श्री.स.अलि मिरा सलामी
४७ श्री.लाहोट रमेश दिपचंद
४८ श्री.केनेकर संजय किशनराव
४९ श्री.फैय्याज अहेमद म हाजीकुरैशी
५० श्रीमती वाघमारे मुक्ताबाई सुदाम
५१ श्री.लता श्रीनिवास दलाल

पिठासीन अधिकारी : मा.आयुक्तांनी श्रीमती वाघमारे मुक्ताबाई यांना मतदानासाठी मदतनीस द्यावा. स.सदस्यांनी तशी लेखी मागणी केली आहे. व त्या निरिक्षर असल्याची माझी खात्री आहे.

मा.आयुक्त : मुख्य लेखा परिक्षक श्री.सोनार यांनी सौ.वाघमारे यांना मतदानासाठी साहय करावे.

यावेळी स.स.श्री.प्रदिप जैस्वाल यांनी आपला मतदानाचा हक्क बाजवून पिठासीन अधिकारी पदाची सुत्रे पुन्हा स्विकारावी.

५२ श्री.ओक जयवंत केशवराव
५३ श्रीमती अलका रमेश पाटील
५४ सौ.धांडे शकुंतला हरिदास
५५ श्री.अ.रशिद खान (मामू)
५६ श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
५७ डॉ.कु.माया लिंबाजी लाडवाणी
५८ डॉ.श्री.कराड भागवत किशनराव
५९ सौ.आव्हाड सविता संजय
६० सौ.निर्मला विठठल कांबळे
६१ श्री.अब्दुल रशिद अ सत्तार
६२ श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
६३ श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन
६६ श्री.वारवाल गजानन राम किशन
६७ श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६९ श्री.जोशी संजय रामदास
७० श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
७१ श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
७२ सौ.ज्योत्साना दौलत हिवराळे
७३ श्री.राजकुमार बचाटे
७४ सौ.राधाबाई तळेकर
७५ श्री.ढगे नरसिंग मुरलीधर
७६ श्री.विठठ्ल किसन जाधव
७७ श्री.मेहेर विजयकुमार गजानन
७८ सौ.काळुसे मंदा धनंजय
७९ सौ.सुनंदा उत्तम कोल्हे
८० श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
८१ श्री घडामोडे भगवान देविदास
८२ श्री.नवपुते कचरू चंद्रभान

पिठासीन अधिकारी : जे सन्माननीय नगरसेवक मतदान करावयाचे राहीले असतील त्यांची नांवे परत पुकारण्यात यावीत.

९ सौ.उषाबाई दिलीप गायकवाड ३२ श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहमद
४४ श्री.खाखोरडिया धीरज शांतिलाल

पिठासीन अधिकारी : स.नगरसेवक श्री.निकाळजे यांनी स.नगरसेवक श्री.धीरज खाखेरडिया यांचे सदस्यत्व रद्य करण्याचा अर्ज दिला आहे. श्री.खाखोरडीया यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे अर्ज सादर केलेला होता. दिनांक २९-१०-९९ रोजी मा. उच्च न्यायालयाने सदर अर्जावर विचार करून श्री.खाखोरडिया यांना महापौर व उपमहापौर निवडणूकीच्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाण्याचे व सभेचे कामकाजात सहभागी होण्याची अनुमती दिलेली आहे. त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम (११) (क) प्रमाणे सलग सहा महिन्यात कोणतेही कारण नसतांना गैरहजर राहिल्यास सदस्यत्व रद्य होते तथापि श्री.खाखोरडीया एप्रिल ९९ च्या सर्वसाधारण सभेत हजर होते व आता ते ऑक्टोंबर ९९ सर्वसाधारण सभेस हजर आहेत. त्यामुळे स.नगरसेवक श्री.निकाळजे यांनी सादर केलेला आक्षेप फेटाळण्यांत येतो.

श्री.गौतम खरात, श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : या निर्णयास आमचा विरोध आहे. तो नोंदविण्यात यावा.

पिठासीन अधिकारी : यांची नोंद घेण्यांत यावी १.५५ मिनिटांनी मतदानास सुरूवात झालेली होती. मतदानासाठी एक तासाचा अवधी दिलेला होता. ३ वाजेपर्यंत मतदानासाठी वेळ देण्यांत येतो. स.स.श्री.प्रकाश निकाळजे व श्री.अभिमन्यु भालेराव यांना मतदानासाठी ३.०० वाजेपर्यंत अवधी देण्यांत येतो.

६८ श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव १४ श्री.भालेराव अभिमन्यु रामभाऊ

पिठासीन अधिकारी : आता ३.०० वाजले असून मतदानाची वेळ संपलेली आहे. ८१ स.सदस्यांनी मतदान केलेले आहे. उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून धिल्लन तरवेंद्रसिंग यांच्यातर्फे श्री.रशिद मामू यांचे व सुदाम सोनवणे यांचेतर्फे सौ.लता दलाल यांचे उमेदवार प्रतिनिधी म्हणून नांवे आलेली आहेत. मतपेटी जवळील मतदान अधिकाऱ्यांने मतपेटी पिठासीन अधिकाऱ्याकडे द्यावी. उमेदवारांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींनांच मतमोजणी पार पाडण्याची परवानगी आहे. इतर स.सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी गर्दी करू नये.

पिठासीन अधिकारी : मतमोजणी अंती दोन्ही उमेदवारांना खालील प्रमाणे मते पडलेली आहेत. एकूण झालेले मतदान ८१, वैध मते ८१, अवैध मते ०० श्री.धिल्लन तरविंद्रसिंग महेंद्रसिंग- ३२, श्री.सोनवणे सुदाम रामदास - ४९

मतमोजणीच्या निकालावरून मी असे घोषित करतो की, महापौर पदासाठी श्री.सोनवणे सुदाम रामदास यांची निवड झाली असून ते १७ मतांनी विजयी

झालेले आहेत. मी प्रथम त्यांचे अभिनंदन करून त्यांना विनंती करतो की, त्यांनी महापौर पदाची सुत्रे स्विकारून आसन गृहण करावे.

**ठराव** :

मतमोजणीच्या निकालानुसार महापौर पदाचे उमेदवार स.स.श्री.तरविंद्रसिंग धिल्लन यांना ३२ आणि स.सदस्य श्री.सुदाम रामदास सोनवणे यांना ४९ मते मिळाली असून महापौर पदासाठी स.स.श्री.सुदाम रामदास सोनवणे हे १७ मतांनी विजयी झाल्याचे मा.पिठासन अधिकारी यांनी घोषित कले त्यास सभागृहातर्फे सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्र.३ वरील कार्यवाही सुरू करावी.

**विषय क्र.६८/३**

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडील हक्क याचीका क्र.२१६२/९९ च्या निर्णयाचे संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र.४७२७/९९ च्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेले आदेश व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (५) अन्वये मा.उप महापौर पदावर निवड करणे.

सचिव : मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी हक्क याचिका क्र.२१६२/९९ मध्ये दिलेले आदेश व त्या संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र.४७९७/९९ च्या अनुषंगाने न्यायालयाने दिलेले आदेश व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (५) अन्वये महापौर उपमहापौर पदासाठी आजच्या सभेत निवड करण्याकरीता दिनांक २२.१०.९९रोजी सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४४,४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यांत आला दिनांक २२ ऑक्टोंबर ९९ ते २६ ऑक्टोंबर ९९ पर्यात नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २६ ऑक्टोंबर ९९ पर्यंत उपमहापौर पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहेत.

१ संजय किशनराव केनेकर
२ संजय किशनराव केनेकर
३ धिल्लन तरविंद्रसिंग महेंद्रसिंग
४ धिल्लन तरविंद्रसिंग महेंद्रसिंग
५ धिल्लन तरविंद्रसिंग महेंद्रसिंग
६ हमीदोद्यीन ताबा फसीयोद्यीन
७ नरेंद्र यादवराव पाटील
८ अजीज खान गणीखान
९ अजीज खान गणीखान
१० अजीज खान गणीखान
११ अजीज खान गणीखान

मा.महापौर : उप महापौर पदासाठी पांच उमेदवारांचे नामांकन पत्र प्राप्त झालेले असून ते सर्व वैध आहेत उपमहापौर पदासाठी खालील पाच उमेदवार रिंगणात आहेत.

१ संजय किशनराव केनेकर

२ धिल्लन तरविंद्रसिंग महेंद्रसिंग
३ हमीदोद्यीन ताबा फसीयोद्यीन
४ नरेंद्र यादवराव पाटील
५ अजिज खॅन गणी खॉन

उप महापौरपदाची उमेदवारी मागे घेण्यासाठी १० मिनिटांचा अवधी देण्यांत येतो. १० मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यांत येते.वाजता तहकुब झालेली सभा ३.४० वाजता परत मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

मा.महापौर : पाच पैकी खालील तीन उमेदवारांनी अर्ज मागे घेतलेले आहेत.
१ नरेंद्र यादवराव पाटील
२ हमीदोद्यीन ताबा फसीयोद्यीन
३ अजीज खॉन गणीखॉन

आता उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.
१ संजय किशनराव केनेकर
२ धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

उपमहापौर पदाची निवडणूक सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४५ अन्वये गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्यांत येईल. सदर निवडणूक शांततेने व योग्य प्रकारे पार पाडता यावी म्हणून खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १ | मतमोजणी परिभिरीक्षकः | १. श्री.एम.वाय.कांबळे,उप आयुक्त (प्र) |
| | | २. श्री.एस.आर.जरारे ,मालमत्ता अधिकारी |
| २ | मतदान अधिकारी | १. श्री.व्ही.व्ही.जावरे,प्रकल्प संचालक |
| | मतपत्रिका वाटप करणे. | २. श्री.एन.जी.दुराणी, वरिष्ठ लेखापाल |
| ३ | मतपेटी जवळील मतदान अधिकारी | १. श्री.संजय पवार, लेखाधिकारी |
| | | २. श्री.गणेश जाधव,क.लिपीक |
| ४ | स.सभासदांची नावे पुकारणे | १. श्री.रमेश जैस्वाल,जनसंपर्क अधिकारी |

उपमहापौर पदाची निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने घेण्यांत येईल. मतपत्रीका तयार करण्यासाठी अर्ध्या तासाचा वेळ देण्यांत येतो. बाहेती एच.आर. व श्री.सपाटे एच.एस. यांनी मतपत्रीका तयार करावी. अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करण्यांत येते.

तहकुब करण्यांत आलेली सभा परत ४.०० वाजता मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली.

मा.महापौर : उपमहापौर पदाच्या निवडणूकीची प्रक्रीया सुरू होत आहे. मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिक्त असल्याचे सभागृहाला दाखवावे व ती सिल करून घ्यावी माझ्याकडे द्यावी. कामकाज नियमावलीचे नियम ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी अमेदवारास किंवा त्यांनी स्वतःस उपस्थित रहाण्याची

इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पहाण्यासाठी एखादया सभासदास आपला प्रतिनिधी म्हणून पाठवता येईल. त्यांची मतदान सुरू होण्यापुर्वीच नांवे द्यावीत मतमोजणीच्यावेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर सदस्यांस उपस्थित रहाता येणार नाही. सचिव यांनी निवडणूक प्रक्रिया सभागृहाच्या निदर्शनास आणून दयावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : निवडणूक व मतदान प्रक्रिया सर्वांना माहित आहे मतदानास सुरूवात करण्यांत यावी.

मा.महापौर : सभागृहाचे नियम सर्वांना समजावून सांगणे आवश्यक आहे.

सचिव : मतदानास प्रत्यक्ष सुरूवात करतांना प्रभाग निहाय स. सदस्यांची नावे पुकारण्यात येईल. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यांत आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे, सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपित्रका खराब झाली तर त्यांना मा. पिठासीन अधिकाऱ्याच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल. नियम क्र.४५ (जे) नुसार जर मतपत्रीकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहिला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खूण केली असेल तर छिद्रांकित (परपोरेटेड) नसेल, जिच्यावर मत नोंदले नेसल अथवा जी संदिग्धतेमुळे निरूपयोगी होईल अशी मतपत्रीका अवैध समजली जाईल. नियम क्र. ५० प्रमाणे प्रत्येक सदस्यास एक मत देण्यांचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला (X) फुली करावी. सर्व स.सभासदाच्या माहितीसाठी नमुना मतपत्रिका व्यासपिठाच्या दोन्ही बाजुस लावण्यांत आलेल्या आहेत.

मा.महापौर : मतपत्रिका तयार करण्यांत आली असून क्रमांक १ व धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग यांचे नांव असून क्र.२ वर संजय किशनराव केनेकर यांचे नांव आहे. मतदानासाठी १ तासाचा अवधी देण्यांत येतो. स.स.श्री.रमेश लाहोट यांची प्रकृती खराब असल्यामुळे त्यांना प्रथम मतदान करू देण्यांत यावे.

| प्रभाग क्र. | स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| ४७ | श्री.लाहोट रमेश दिपचंद |
| ०१ | श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव |
| ०२ | श्री.अफसरखान यासीन खान |

मा.महापौर : स.स.श्री.प्रफुल्ल मालानी यांना काही महत्वाच्या कारणांमुळे त्यांना मतदान करून देण्यांत याव.

| प्रभाग क्र. | स.सदस्यांचे नांव | प्रभाग क्र. | सदस्याचं नांव |
|---|---|---|---|
| २२ | श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद | ३३ | श्री.मजीब आलम शाह अलम शाह |
| २७ | श्री.अजीज खॉंन गणी खॉंन | ३ | श्री.विधाते प्रभाकर सिताराम |
| ४ | सौ.साजेदा बेगम | ५ | श्री.म.सलीम म.हनिफ |
| ६ | श्री.गौतम भागाजी खरात | ७ | ॲड.श्री.गणेश किशनराव वानखेडे |
| ८ | श्रीमती जोशी रजनी रमेश | ९ | सौ.उषाबाई दिलीप गाडेकर |
| १० | सौ.विमलबाई नंदकुमतार मुंडलिक | ११ | सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळ |
| १२ | श्री.लांडगे गौतम लिंबाजी | १३ | श्री.सुर्यवंशी महोदवराव लेकराव |
| १४ | श्री.भालेराव अभिमन्यु रामभाऊ | १५ | श्री.नरेंद्र यादवराव पाटील |
| १६ | श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | १७ | श्री.सोनवणे सुदाम रामराव |

मा.महापौर : स्थायी समिती सभापती यांनी पिठासीन अधिकारी यांना सांभाळावे.( श्री.नरसिंग ढगे यांनी पद ग्रहण केले.)

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | १९ | श्री.बैनाडे कँवरसिंग किशनसिंग |
| २० | सौ पदमा बाबुराव शिंदे | २२ | श्री.टाकळकर सुभाष भिमराव |
| २३ | श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | २४ | सौ.विसपुते धनश्री अशोक |

मा.महापौर मतदानानंतर परत महापौर पद ग्रहण केले.

२५ सौ.फरहद बानो भ्र मो नवाज

मा.महापौर : स.स.श्रीमती चंपाबाई पांचाळ यांनी अर्ज दिल्यानुसार त्यांना मा. आयुक्तांनी मदतनीस द्यावा.

मा.आयुक्त : आरोग्य वैद्यकीय अधिकारी , डॉ.देशपांडे यांनी स.स.श्रीमती पांचाळ यांना साहय करावे.

| **प्रभाग क्र.** | **स.सदस्यांचे नांव** | **प्रभाग क्र.** | **सदस्याचं नांव** |
|---|---|---|---|
| २९ | श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | २९ | श्रीमंहमद मुश्ताक अहेमद |
| ३० | श्रीमती नुरजहाँबेगम अ रहेमान खॉ | ३१ | श्री.देशमुख वसंत विनायकराव |
| ३२ | श्री.हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद | ३४ | सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्यीन |
| ३६ | श्रीमूती जाहेदा बेगम म जमीर | ३७ | श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव |
| ३८ | सौ.वाडेकर यशोदा धनंजय | ३९ | श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल |
| ४० | श्रीमती गंगवाल पुष्पाताई | ४२ | श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद |
| ४३ | श्री.स.अ.इकबालोद्यीन स.मो.कुतुबोद्यीन | ४४ | श्री.खाखोरडीया धिरज शांतीलाल |
| ४५ | श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण | ४६ | श्री.स.अली मिरा सलामी |
| ४८ | श्री.केनेकर संजय किशनराव | ५० | श्रीमती वाघमारे मुक्ताबाई सुदाम |

मा.महापौर : स.स.सौ.मुक्ताबाई सुदाम वाघमारे यांनी अर्ज दिल्यानुसार मा. आयुक्तांनी त्यांना मतदानासाठी साहय करावे. मदतनीस द्यावा.

मा.आयुक्त : उप आयुक्त (प्र) श्री.एम.वाय कांबळे यांनी स.स. सो.मुक्ताबाई वाघमारे यांना मतदानासाठी साहय करावे.

| **प्रभाग क्र.** | **स.सदस्यांचे नांव** | **प्रभाग क्र.** | **सदस्याचं नांव** |
|---|---|---|---|
| ५१ | सौ.लता श्रीनिवास दलाल | ५२ | श्री.ओक जयवंतराव केशवराव |
| ५३ | श्रीमती अलका रमेश पाटील | ५४ | सौ.धांडे शकुंतला हरिदास |
| ५५ | श्री.अब्दुल रशिद खान (मामू) | ५६ | श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह |
| ५७ | डॉ.कु.माया लिंबाजी लाडवाणी | ५८ | डॉ.श्री.कराड भागवत किशनराव |
| ५९ | सौ.आव्हाड सविता संजय | ६० | सौ.निर्मला विठ्ठल कांबळे |
| ६१ | श्री.अब्दुल रशिद अ.सत्तार | ६२ | सौ.धिल्लन तरविंद्रसिंग कॅवरसिंग |
| ६३ | श्री.विखारोद्यीन पि.खुदबोद्यीन | ६४ | श्री.जैन विकास रतनलाल |
| ६६ | श्री.बारवाल गजानन रामकिशन | ६७ | श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग |

| | | | |
|---|---|---|---|
| ६८ | श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव | ६९ | श्री.जोशी संजय रामदास |
| ७० | श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | ७१ | श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव |
| ७२ | सौ.ज्योत्सना दौलत हिवराळे | ७३ | श्री.राजकुमार बचाटे |
| ७४ | सौ.राधाबाई तळेकर | ७५ | श्री.ढगे नरसिंग मुरलीधर |
| ७६ | श्री.विठ्ठल किशन जाधव | ७७ | श्री.मेहेर विजयकुमार गजानन |
| ७८ | सौ.काळुसे मंदा धनंजय | ७९ | सौ.सुनंदा उत्तम कोल्हे |
| ८० | श्री.गांगवे् बन्सी तुळशीराम | ८१ | श्री.घडामोडे भगवान देविदास |
| ४० | श्री.हमीदोद्यीन ताबा फसीयोद्यीन | | |

मा.महापौर : अद्याप तीन स.सदस्य मतदान करावयाचे बाकी आहेत त्यांसाठी ५.१५ वाजेपासून १५ मिनिटाचा अवधी देण्यांत येतो. सर्व सदस्यांनी नांवे तीन तीन वेळा घोषित करावीत.

मा.महापौर : ५.३० वाजलेले आहेत. मतदानाची वेळ संपलेली आहे. मतपेटी माझ्याकडे आणावी. उमेदवारांनी अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी मतमोजणीच्या स्थळी उपस्थित रहावे.

मा.महापौर : उपमहापौर पदासाठी एकंदर ७८ सदस्यांनी मतदान केले त्यापैकी वैध व अवैध मते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| **एकूण मते** | **७८** |
| वैध मते | ७८ |
| अवैध मते | ०० |

उपमहापौर पदासाठी रिंगणात असलेल्या उमेदवारांना खालील मते पडली.
स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग ३५
स.स.श्री.संजय किशनराव केनेकर ४३
श्री.संजय किशनराव केनेकर हे ८ मतांनी उपमहापौर पदी निवडून आल्याचे मी घोषित करतो.

**ठराव :**

उपमहापौर पदाचे उमेदवार स.सदस्य श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन यांना ३५ आणि स.सदस्य श्री. संजय केनेकर यांना ४३ मते मिळाली असून उपमहापौर पदासाठटी स.सदस्य श्री. संजय केनेकर हे ८ मतांनी विजयी झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले. त्यास सभागृहातर्फे सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

या प्रसंगी स.सदस्यांची समयोजित भाषणे झाली सर्वांचे आभार मानून सायंकाळी ६.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौरांनी घोषित केले.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभेची सांगता झाली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०-११-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त शनिवार दिनांक २०-११-९९ मा.महापौर श्री.सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह मा.आयुक्त तसेच खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | स.सदस्य |
| २ | स.स.श्री.अफसर खॉुन यासीन खान | |
| ३ | स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | |
| ४ | स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | |
| ५ | स.स.श्री.म.सलिम म हनिफ | |
| ६ | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | |
| ७ | स.स.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | |
| ८ | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | |
| ९ | स.स.श्री.भालेराव अभिमन्यु रामभाऊ | |
| १० | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | |
| ११ | स.स.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | |
| १२ | स.स.श्री.बैनाडे कँवरसिंग किशनसिंग | |
| १३ | स.स.सौ. पदमा बाबुराव शिंदे | |
| १४ | स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | |
| १५ | स.स.श्री.मालाणी प्रफुल्ल लालचंद | |
| १६ | स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | |
| १७ | स.स.सौ. विसपुते धनश्री अशोक | |
| १८ | स.स.सौ. फरहद बानो भ्र.मो नवाज | |
| १९ | स.स.श्री.अजीज खॉ गणी खॅा | |
| २० | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | |
| २१ | स.स.श्रीमती नुरजहाँबेगम अ रहेमान खाँन | |
| २२ | स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव | |
| २३ | स.स.श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद | |
| २४ | स.स.श्री.मुजीब आलमशाह मीर आलम शाह | |
| २५ | स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | |
| २६ | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | |
| २७ | स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | |
| २८ | स.स.सौ.वाडेकर यशोदा धनंजय | |
| २९ | स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर | |
| ३० | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | |
| ३१ | स.स.श्री.हमीदोद्दीन ताबा फसीयोद्दीन | |
| ३२ | स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | |
| ३३ | स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | |

३४ स.स.श्री.जैसवाल प्रदिप शिवनारायण
३५ स.स.श्री.स.अली मिरा सलामी
३६ स.स.श्री.लाहोट रमेश दिपचंद
३७ स.स.सौ. लता श्रीनिवास दलाल
३८ स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
३९ स.स.सौ.धांडे शकुंतला हरिदास
४० स.स.श्री.अ.रशिद खॉन (मामू)
४१ स.स.श्री.डॉ.कराड भागवत किशनराव
४२ स.स.सौ.आव्हाड सविता संजय
४३ स.स.सौ.निर्मला विठठ्ल कांबळे
४४ स.स.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन
४५ स.स.श्री.बारवाल गजानन रामकिशन
४६ स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४७ स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
४८ स.स.श्री.जोशी संजय रामदास
४९ स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५० स.स.सौ.ज्योत्सना दौलत हिवराळे
५१ स.स.श्री.राजकुमार बचाटे (मामा)
५२ स.स.सौ.राधाबाई तळेकर
५३ स.स.श्री.विठठ्ल किशन जाधव
५४ स.स.श्री.मेहेर विजयकुमार गजानन
५५ स.स.सौ.काळुसे मंदा धनंजय
५६ स.स.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे
५७ स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
५८ स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास
५९ स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान
६० स.स.श्रीमती अलका रमेश पाटील

**संवाद :**

श्री.कचरू नवपुते : महानगरपालिकेच्या झोन क्र.५ मधील कार्यरत रोखपाल श्री.भोकरे यांचा निर्घृण खुन करण्यांत आला त्यांच्या निधना निमित्त त्यांना ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

श्री.मोहसिन अहेमद : याच बरोबर बिहार मध्ये १२ खिश्चन समाजातील लोकांची हत्या झाली त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

श्री.अ.रशिद खान मामू : बिहारच्या राबडीदेवी सरकारच्या कार्यकाळात १२ लोकांची एकत्रित हत्या होणे म्हणजे सरकार निष्काळजीपणे चालवित आहे. त्याबद्दल सभागृहातर्फे बिहार सरकारचे हे सभागृह निषेध करते अशी नोंद व्हावी.

मा.महापौर : ठिक आहे महानगरपालिकातील रोखपाल श्री.भोकरे तसेच बिहार मधील १२ खिश्चन लोकांची हत्या झाली, त्याच बरोबर ओरिसातील वादळामुळै तसेच पुरग्रस्त भागात जे लोक मृत्युमुखी झाले या सर्वांना ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

याच वेळी महानगरपालिका कार्यालय झोन क्र.५ मधील श्री.भोकरे, बिहार मधील १२ ख्रिश्चन समाजातील लोकांची हत्या झाली , त्याच बरोबर ओरिसातील वादळामुळे तसेच पुरग्रस्त भागामध्ये सापडून जे मृत्युमुखी पडले त्या सर्वांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

श्री.मोहसिन अहमेद : झोन क्र.५मधील श्री.भोकरे यांचा खुन कोणत्या कारणाने झालेला आहे याची सभागृहात प्रशासनाने माहिति दयावी. झोन क्र.३ मध्ये एकूण ३० ते ४० हजार रूपयाचा अपहर झाला त्यात कायम स्वरूपी कर्मचारी यांचाही सहभाग होता त्यांच्यावर कार्यवाही न होता एक दैनिक वेतनावरील कर्मचारी यांच्यावर कार्यवाही झालेली आहे.

मा.महापौर : चर्चा करण्यासाठी नंतर वेळ देण्यांत येईल अगोदर मुळ विषय पत्रिका वरील विषयावर चर्चा करावी.

श्री.अफसर खान, श्री.मोहसिन अहेमद : अगोदर चर्चा होवू दयावी नंतर विषय पत्रिकावरील व पुरवणी विषय मंजुर करण्यां बाबत चर्चा व्हावी.

मा.महापौर : अगोदर मुळ विषयपत्रिकेवरल विषयावर चर्चा करावी नंतर सर्व साधारण चर्चा करण्यासाठी वेळ देण्यात यईल. व त्यानंतर पुरवणी व ऐनवेळचे विषय मंजुर करण्यात येतील. वेळ पडल्यास दोन दिवस सभागृहाचवे कामकाज चालविण्यांत यईल.

श्री.जैस्वाल प्रदिपकुमार : विषय पत्रिका व जनरल चर्चा करण्या अगोदर ज्या स. सदझ ास्यांनी पत्र दवून त्या पत्राद्वारे प्रश्न उपस्थित करून उत्तराची मागणी केलेली आहे. काहींना उत्तरे मिळाली काहींना मिळालेली नाही. ज्यांना मिळाली नाही ती का मिळाली नाही यांचा अगोदर खुलासा व्हावा, नंतर च पुढील कामकाज व्हावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : जनरल चर्चा विकास कामा संदर्भात करणार की, वैयक्तिक प्रश्न मांडल्ेल्या प्रश्ना बाबतचा खुलासा मागविण्याबाबत चर्चा करणार याची माहिति दयावी.

श्री.मुजीब आलम शाह खान : आजची सभा आचारसंहितेमुळे ४ महिन्याच्या कालावधीनंतर होत आहे. अधिकारी यांनी आचारसंहितेच्या काळात मनमानीपणाने विकास कामे केलेली आहे बऱ्याच ठिकाणी अनाधिकृत कामे करण्यांत आलेली आहे . ४ महिन्याच्या काळात कोणकोणती अधिकृत/अनाधिकृत कामे करण्यात आलेली आहे याची संपूर्ण माहिति आजच्या सभेत सर्व सभासदांना मिळाली पाहिजे त्यासाठी अगोदर चर्चा होवू दयावी नंतर विषय पत्रिकेवर निर्णय व्हावे.

श्री.सुर्यवंशी महादेव : विकास कामा संदर्भातच चर्चा व्हावयास पाहिजे विनाकारण चर्चा करणे योग्य होणार नाही. ज्यांनी लेखी प्रश्न उपस्थित कला आहे त्यावर चर्चा व्हावी.

श्री.मोहसिन अहेमद :सचिव यांच्याकडे पत्र देवून काही उत्तरांची माहिति १५दिवसा पुर्वीच मागविलेली आहे. काही प्रश्नाबाबत माहिति अद्याप मिळालेली नाही. त्यासाठी अगोदर चर्चा करून खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर : आजची सभा बऱ्याच दिवसांनतर होत असून विकास कामा संदर्भात चर्चा होवून योग्य असे निर्णय एकमताने घेण्यास सर्वांनी सहकार्य करावे. अगोदर

मुळ विषयपत्रिकावर चर्चा करावी नंतर सर्वसाधारण चर्चा घेण्यात येईल्. सर्वांच्या सहमताने हा निर्णय मी घेत आहे.

श्री.मोहसिन अहेमद : श्री.भोकरे यांचा मृत्यु संदर्भात तसेच झोन क्र.३ मधील दै. वेतन कर्मचारी यांच्या संदर्भात विचारलेली माहितीचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : जनरल चर्चा नंतर करावी अगोदर विषय क्र.१ वर चर्चा करावी.

श्री.हमीदोद्दीन ताबा : मागील काही सर्वसाधारण सभा संपन्न झालेल्या इतिवृत्ताच्या प्रती मिळालेल्या नाही. सचिव यांनी याबाबत खुलासा करावा.

मा.महापौर : इतिवृत्ताच्या सर्व प्रती स.सभासदांना दिलेल्या असून दिनांक १९-६-९९ चे इतिवृत्त यापूर्वीच माहे जुलै ९९ च्या विषय पत्रिके सोबत दिलेले आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : दिनांक १९-६-९९ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१९ वर कार्यकारी अभियंता पद निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव कुणाच्यातरी ॲडजेस्टमेंटसाठी मंजूरीला आलेला आहे. सदर पद निर्माण करण्याची कार्यवाही त्वरीत थांबवावी. ड्रेनेज विभागाकडे सध्या कोणती कामे करण्यास येतात. सदर कामे ाकेणते अधिकारी करतात कामे योग्य होतात काय ? होत नसेल तर संबंधित अधिकारी कामे योग्य का करत नाही याचा खुलासा व्हावयास पाहिजे. ऐनवेळेला प्रस्ताव घेवून कार्यकारी अभियंता पद निर्माण करण्याबाबत मंजुरी घेणे योग्य नाही. महापौरांनीच असे प्रस्तावास मंजुरी देवू नये. मंजुरी दिल्यास प्रशासनाला अंतिम निर्णय घेण्यास त्रास होईल. एका अधिकाऱ्यांच्या हितासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे. कोणत्या पदाची आवश्ययकता आहे कोणत्या नाहही याचा विचार होवून प्रशासनामार्फत असे प्रस्ताव मंजुरीसाठी यावयास पाहीजे व त्यानुसार निर्णय घेणे योग्य होईल हे पद निर्माण केल्यास किती आर्थिक भार पडणार आहे याचीही माहिति दयावी.

श्री.अ.रशिद खॉन (मामू) : कार्यकारी अभिंयता पद निर्माण करण्या बाबत विरोध नाही सभागृहानेच निर्णय घेतलेला आहे परंतू सदर पद विद्युत व ड्रेनेज विभागासाठी एकत्रित पद निर्माण करण्यासाठी आलेला आहे असे वाटते. शहरातील विद्युत बाबत प्रॉब्लेम आहेत ८-८ महिन्यापासून काही ठिकाणी विद्युत समस्या सुटलेल्या नाहीत त्याप्रमाणे बऱ्याच रस्त्यावर ड्रेनेजचे घाण पाणी दिसून येते. विद्युत विभागातील कर्मचारी वैतागलेले दिसतात. दोन उपविभागात विभागणी केली त्यात समन्वय आवश्यक आहे. हा ठराव शहराच्या हिताचे असेल तर करावे असे केल्याने जनतेचे हित होत असेल तर ठराव मंजुर करण्यात यावा.

श्री.संजय जोशी : काही स.सभासद पद निर्माण करण्यास विरोध करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु या अगोदर बरेच पद निर्मिती करण्याबाबतचे प्रस्ताव आलेले आहेत व ते मंजुरही झालेले आहे. त्यावेळी का विराध झालेला नाही. प्रशासन नियमात बसत असेल तर करतील नियमात बसत नसेल तर करणार नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : ऐनवेळी सभागृहात मंजुरीसाठी बरेच प्रस्ताव येतात व मंजूर होतात परंतू नंतर वादविवाद होतो. मा.महापौरांनी ऐनवेळी प्रस्ताव टाकलेला दिसतो. त्यासाठी यापुढे ऐनेवेळचे प्रस्ताव घेवू नये. प्रशासनाचे मत घ्यावे तो पर्यंत स्थगिती दयावी.

श्री.हमीदोद्दीन ताबा : स.सभासद श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी जी सुचना मांडली ती योग्य आहे.

श्री.विजयकुमार मेहेर : कार्यकारी अभियता पद निर्माण करण्याच्या संदर्भात प्रशासनाच्या माध्यमातून सभागृहात खुलासा व्हावा व पुढील बैठकीपर्यंत स्थगित ठेवण्यांत यावे.

श्री.भागवत कराड : हा प्रस्ताव सूचक व अनुमोदकांनी लेखी मांडलेला प्रस्ताव आहे हा प्रस्ताव टाकण्यात आलेला नाही.

श्रीमती नुरजहाँ बेगम : एका वेळेस एकाच स.सभासदांना बोलू देण्याची परवानगी दयावी कोण काय बोलू लागले काहीही ऐकावयास येत नाही.

श्री.अ.रशिद मामू : विद्युत व ड्रेनेज हे टेकनीकली दोन विभाग वेगवेगळे आहेत. दोन्ही विभागाला दोन अधिकारी वेगवेगळे असावयास पाहिजे.

श्री.गिरजाराम हाळनोर : इतिवृत्तांत दुरूस्ती सुचविण्यात येते की, विद्युत व ड्रेनेज एकत्र नउ करता विद्युत यांत्रिकी विभागाला जोडण्यात यावे व ड्रेनेज वेगळे करण्यात यावे.

श्री.डॉ.मेहेर विजयकुमार : प्रशासन या पदाची अंमलबजावणी करील काय याचाही विचार व्हावा.

श्री.मुजीब आलम शाह खॉन : अस्थापनेवर कोणत्या पदाची व किती कार्यकारी अभियता पदाची आवश्यकता आहे हे प्रशासनाने अगोदर ठरविले पाहिजे. प्रशासनाने तसा प्रस्ताव मंजुरीसाठी आणावयास पाहिजे परंतु अधिकारी वैयक्तिक हित साधण्याच्या दृष्टीने असे प्रस्ताव मंजुरीसाठी आणत आहेत. आतापर्यंत बऱ्याच अधिकारी व काही कर्मचाऱ्यांची दिर्घकालीन सेवा झालेली आहे. इमानदारीने कार्यालयीन सेवा केलेली आहे. त्यापैकी कोणत्या कर्मचाऱ्यांनी चांगल्या प्रकारे सेवा केलेली आहे याची चौकशी करून प्रशासनाने अशा पदावर जेंष्ठतेनुसार या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नियुक्ती केली पाहिजे जे मागे राहतात ते मागेच राहतात त्यांचा विचार पदोन्नतीच्या बाबतीत होत नाही अशी पदे निर्माण करण्यास कुणाचा यामागे हात आहे. याचीही प्रशासनाने चौकशी करावयास पाहिजे.

सौ.लता दलाल : आतापर्यंत अधिकारी संवर्गातील ३ पदे निर्माण केलेली आहे ही पदे निर्माण करत असतांना आकृतीबंधामध्ये ज्या पध्दतीने पदे निर्माण केली त्या पध्दतीचा उपयोग ही पदे निर्माण करतांना केला काय ? ड्रेनेज व विद्युत ही दोन्ही पदे टेक्नीकली वेगवेगळी असून या दोन्ही विभागासाठी एकत्र कार्यकारी अभियता हे पद निर्माण करणे योग्य नाही. कोणत्या अध्किाऱ्यांना या पदावर नियुक्त करणार यास आमचा विरोध नाही . परंतू आकृतीबंधाच्या पध्दतीनुसार स्थापत्य व विद्युत एकत्र करण्यात आले त्या प्रमाणे ड्रेनेज विद्युत एकत्र केले आहे का ? हे प्रशासनाने सभागृहाच्या नजरेस आणून दयावे अशी विनंती आहे की पदे नियमाला धरूनच भरण्यांत यावे.

श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन : विद्युत विभागामध्ये किती जागा रिक्त आहे . अधिकारी संवर्गातील किती कर्मचारी पदावर सध्या कार्यरत आहे कार्यकारी अभियंता हे पद निर्माण करणे प्रशासनाला गरजेचे आहे काय ? मंजूर केल्यास बजेट आहे काय ? याचा पुर्णत: विचार करूनच निर्णय व्हावा. तसा खुलासा प्रशासनाच्या माध्यमातून व्हावा.

डॉ.श्री.भागवत कराड : प्रस्ताव स.सदस्यांनी मांडलेला आहे व मंजूरही केलेला आहे शासनाकडे पाठवण्यात यावा.

श्री.सअली मिरा सलामी : जी पदे निर्माण करण्या संदर्भात प्रस्ताव मंजूरीसाठी येतात ती पदे निर्माण करणे गरजेचे आहे काय हे प्रशासनाने मत मांडावयास पाहिजे यात जनतेचा किती व महापालिकेचा किती फायदा आहे विद्युत स्वतंत्र पद निर्माण करणे योग्य होईल एकत्रीत पद निर्माण केल्यास विद्युत विभागातील कामे होण्यास आणखी वेळ लागेल त्यासाठी कार्यकारी अभियंता हे एकत्रीत पद निर्माण न करता दोन्ही विभागामध्ये वेगवेगळे उप अभियंता यांची पदे निर्माण करण्यांत यावी अशी विनंती आहे.

२. महापालिकेच्या अस्थापनेवर बजेट नुसार किती कार्यकारी अभियंत्याची आवश्यकता आहे, सहा. अभियंता किती पाहिजे , उपअभियंता किती, प्रत्येक झोनला तसेच विद्युत विभागामध्ये कनिष्ठ अभियंता आहे काय ? किती पदाची आवश्यकता आहे याचा विचार करता पदे निर्माण करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे. स. सदस्या सौ.लता दलाल यांनी सांगितल्या प्रमाणे टेक्नीकली दोन्ही विभाग वेगवेगळे आहे. त्यासाठी एकत्र कार्यकारी अभियंता हे पद कार्यान्वित करू शकते काय ? हा विचार व्हावयास पाहिजे.

श्री.प्रदिप जैस्वाल : काही स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की, ऐनवेळी प्रस्ताव आलेला आहे. प्रशासनामार्फत आलेला नाही लोक प्रतिनिधी मार्फत प्रस्ताव मांडावयाचा अधिकार आहे. किती पदे बजेट नुसार आवश्यक आहे किती पदे कार्यकारी अभियंत्यांची भरणे कायदयानुसार आवश्यक नाही. याची पडताळणी करण्याचे काम प्रशासनाचे आहे. नियम ६८ नुसार महानगरपालिका प्रशासनाला ६ महिनेसाठी पदे भरण्याचा अधिकार आहे. कदाचित एखादा प्रस्ताव नियमबाहय मांडण्यात आलेला असेल तर कलम ४५१ नुसार जो रद्य करण्याचा अधिकार प्रशासनाला आहे. प्रत्येकाला आपआपले मत मांडण्याचा अधिकार आहे त्याप्रमाणे चर्चा करावी या अगोदर उप आयुक्त, ३ कार्यकारी अभियताची पदे सर्वांच्या सम्मतीने मंजूर झालेली आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : स.सदस्य श्री.जैस्वाल यांनी मांडलेली सूचना योग्य वाटत नाही या अगोदर बऱ्याच पोस्ट निर्माण झालेल्या असून त्यांनाच शासन मंजुरी नाही तर आणखी पोस्ट निर्माण करणे योग्य नाही. आवश्यकता नसतांना पदे निर्माण केल्यास मयहापालिकेला आर्थिक बोजा सहन करावा लागतो. एका अधिकाऱ्याच्या हितासाठी हे पद निर्माण करण्याबाबत प्रस्ताव टाकण्यात आला आहे. या प्रस्तावास स्थागिती दयावी.

मा.महापौर : कार्यकारी अभियता पद निर्माण करण्यासाठी महापौर यांचे तर्फे कोणताही हस्तक्षेप झालेला नाही. प्रशासन नियम प्रमाणेच पद भरण्याची कार्यवाही करेल.

(याच वेळी मा. महापौर यांच्या आसनाजवळ जावून काही स.सभासद मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकावयास येत नव्हते.)

मा.महापौर : आजची सभा १० मिनिटासाठी तहकुब करण्यांत येते. वेळ अंदाजे १२.३० वाजता १० मिनिटासाठी तहकुब करण्यात आलेली सभा पुन्हा १२.४०

वाजता सुरूवात करण्यांत आली असता गणपुर्ती अभावी आजची सभा पुन्हा ३० मिनिटासाठी तहकुब करण्यात येत असल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले. तहकूब करण्यास आलेल्या सभेस पुन्हा १.१० वाजता सुरूवात झ ाली.

श्रीमती नुरजहाँ बेगम :यापुर्वीच्या दोन महापौर यांच्या कार्यकाळापासून व आपण तिसरे महापौर आहात बऱ्याच वेळा विद्युत विभागामध्ये शहरातील विद्युत (लाईटची) कामे करण्यासाठी खरेदी करण्यात यावी अशी मागणी केलेली असतांना अद्या प २५०००/- रूपयांपर्यात सीडी या विभागात खरेदी करू शकले नाही आणि त्याच विभागाच्या संदर्भाने विद्युत व ड्रेनेज साठी एक कार्यकारी अभियता पद निर्माण करून होणारा खर्च कोठून करणार कोणत्या नियमाच्या आधारे हे पद भरण्याचा निर्णय होत आहे याबाबत सविस्तर माहिती देण्यांत यावी यास सर्व महिला आघाडी सदस्यांचा विरोध असून पद निर्माण करण्यांत येवू नये नसता सर्व महिला आघाडी सदंस्या सभागृहात बैठा सभात्याग करतील.

मा.महापौर : स.सदस्या श्रीमती नुरजहाँ बेगम यांनी पण केलेल्या मागणी बाबत लवकर कार्यवाही होईल आपण सभागृहात बैठा सभात्याग करू नये. तशी इतिवृत्तात नोंद होईल स.सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे तशी इतिवृत्तात नोंद होईल. परंतू बैठा सभात्याग करू नये सर्व महिला सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

श्रीमती अलका पाटील :आतापर्यंत शासन नियमानुसार ३३% महिलांसाठी आरक्षण समजून मिती महिलांना महानगरपालिकेत अधिकर पदावर पदोन्नती देण्यांत आलेली आहे याचा अगोदर खुलासा करावा.

(पुन्हा महिला सदस्या मा. महापौर यांच्या आसनाजवळ जावून मोठमोठयाने बोलतात.)

श्रीमती मोहसिना बिल्कीस :४ वर्षापासून विद्युत विभागामध्ये सीडी खरेदी करण्याची कार्यवाही का झाली नाही महिला सदस्यांनी प्रश्न मांडल्यानंतर तसेच पत्र देवून कामे होण्या बाबत मागणी केली असता ६-६ महिने संचिका एक एका विभागामध्ये पडून राहतात. याची नोंद व्हावी व तशी संबंधित अध्किाऱ्यांना कार्यवाही करण्याचे आदेश देण्यांत यावे.

मा.महापौर : सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे व आपले म्हणणे मांडावे.

श्रीमती नुरजहाँ बेगम : विकास कामासाठी पैसा नसतो नवीन पोस्ट निर्माण करण्यास महानगरपालिकेकडे कोठून पौसा येतो याची माहिती दयावी प्रस्ताव वापस घेण्यात यावा नसता सभागृहात मी बसून कामकाज करते.

(याचवेळी स.सदस्या नुरजहाँ बेगम ,सौ फरहद बानो, मा.महापौर यांच्या आसनासमोर सभागृहात खाली बसतात)

मा.महापौर : तुमचा विरोध आहे मी नोंदविला आहे आपण व्यासपिठासमोर बसू नये परत आपणांस विनंती करतो की, आपण आपल्या जागेवर बसून घ्यावे अन्यथा एक दिवसासाठी सभासदत्व रद्य करण्यांत येईल. (स.सदस्या श्रीमती नुरजहाँबेगम व स.सदस्या सौ.फरहत बानो तेथून उठत नाही.) मी केलेल्या सूचनेचे पालन महिला स.सदस्या करत नाही त्यामुळे श्रीमती नुरजहाँ बेगम तसेच श्रीमती फरहद बानो यांचे आजच्या दिवसासाठी (एक दिवस)

सभासदत्व रद्द करण्यात येत असून त्यांनी कृपया सभागृहाच्या बाहेर जावे नसता सुरक्षा विभागातर्फे सभागृहातून बाहेर काढण्यात येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :स.सदस्या यांचे एक दिवसाचे सभासदत्व रद्द करू नये त्यांना त्यांच्या जागेवर बसण्याबाबत समज घालण्यात येईल सभासदत्व रद्द केलेला निर्णय मागे घेण्यात यावा.

(याच वेळी पुन्हा मा.महापौर यांच्या आसनाजवळ काही स.सभासदांनी मोठमोठयाने बोलणे सुरू केले कोण काय बोलत आहे काहीही ऐकू येत नव्हेते.)

मा.महापौर : आजची सभा ३ दिवसासाठी तहकूब करण्यात येत असून पुढील सभा आयोजना बाबत स.सभासदांना कळविण्यात येईल. यानंतर जन,गण,मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०-११-९९ रोजी तहकुब सर्व साधारण सभा दिनांक २५-११-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त दिनांक २०-११-९९ ची तहकुब सर्व साधारण सभा दिनांक २५-११-९९ गुरूवार रोजी मा. महापौर श्री.सुदाम रामदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्व साधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वाजता " वंदेमातरम् " या गीताने सुरू झाली सभेला अधिकारी वर्ग याच्यासह मा.आयुक्त तसेच खालील स.सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स.स.श्री.केनेकर संजय किशनराव | उप महापौर |
| २. | स.स.श्री.ढगे नरसिंग मुरलिधर | स.सदस्य |
| ३. | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | स.सदस्य |
| ४. | स.स.श्री.अफसर खॉुन यासीन खान | |
| ५. | स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | |
| ६. | स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | |
| ७. | स.स.सौ.साजेदा बेगम | |
| ८. | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | |
| ९. | स.स.सौ.जोशी रजनी रमेश | |
| १०. | स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | |
| ११. | स.स.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | |
| १२. | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | |
| १३. | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | |
| १४. | स.स.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | |
| १५. | स.स.श्री.बैनाडे कॅंवरसिंग किशनसिंग | |
| १६. | स.स.सौ. पदमा बाबुराव शिंदे | |
| १७. | स.स.श्री.मालाणी प्रफुल्ल लालचंद | |
| १८. | स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | |
| १९. | स.स.सौ. विसपुते धनश्री अशोक | |
| २०. | स.स.सौ. फरहद बानो भ्र.मो नवाज | |
| २१. | स.स.श्री.फजलउल्ला ाखान उजमतउल्लाखान | |
| २२. | स.स.श्री.अजीज खॉ गणी खॅा | |
| २३. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | |
| २४. | स.स.श्री.महमंद मुश्ताक | |
| २५. | स.स.श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद | |
| २६. | स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान | |
| २७. | स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्यीन | |
| २८. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | |
| २९. | स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | |
| ३०. | स.स.सौ.वाडेकर यशोदा धनंजय | |

३१. स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद
३२. स.स.श्री.हमीदोद्दीन ताबा फसीयोद्दीन
३३. स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद
३४. स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन
३५. स.स.श्री.जैसवाल प्रदिप शिवनारायण
३६. स.स.श्री.स.अली मिरा सलामी
३७. स.स.श्री.लाहोट रमेश दिपचंद
३८. स.स.श्री.फैय्याज अहेमद म.हाजी कुरैशी
३९. स.स.सौ.वाघमारे मुक्ताबाई सुदाम
४०. स.स.सौ. लता श्रीनिवास दलाल
४१. स.स.सौ.धांडे शकुंतला हरिदास
४२. स.स.श्री.अ.रशिद खॉन (मामू)
४३. स.स.डॉ.कु.माया लिंबाजी लाडवाणी
४४. स.स.सौ.आव्हाड सविता संजय
४५. स.स.श्री.अब्दुल रशिद अ.सत्तार
४६. स.स.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन
४७. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
४८. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४९. स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
५०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
५१. स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५२. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५३. स.स.सौ.ज्योत्सना दौलत हिवराळे
५४. स.स.श्री.राजकुमार बचाटे (मामा)
५५. स.स.सौ.राधाबाई तळेकर
५६. स.स.श्री.मेहेर विजयकुमार गजानन
५७. स.स.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे
५८. स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
५९. स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास

**<u>संवाद:</u>**

मा.महापौर : विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**विषय क्र.६९/१**

दिनांक १९-६-९९, १७-७-९९,१९-८-९९,१८-९-९९ व २०-१०-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.हमीदोद्दीन ताबा : मागील बैठक तहकुब करण्यात आलेली होती. कोणत्या कारणाने तहकुब केली त्याचा अगोदर खुलासा व्हावा.

श्री.गिरजाराम हाळनोर : आजची सभा ही तहकुब सभा घेण्यांत येत आहे. त्यामुळे मागील सभेतील जे विषय मंजुर करावयाचे बाकी आहे त्या विषयावर चर्चा करता येईल.

श्री.महादेव सुर्यवंशी : दिनांक १९-६-९९ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.३४ वर क्रमांक ५६/२ नुसार मा. महापौर यांची रूलींग दिलेली आहे की, बाबर कॉलनी, हत्तीसिंगपुरा भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी २५% रक्कम भरण्याचा प्रस्ताव आहे हा खर्च मनपाने करावा अशी सदस्यांची मागणी आहे. यापूर्वी जी जी कामे त्या प्रभागात झालेली आहेत त्या त्या कामाची २५% रक्कम का घेतली नाही ही रक्कम संबंधित अधिकाऱ्याकडून का भरून देण्यांत येवू नये. पाहणी करून नंतर निर्णय घेण्यात येईल असा उल्लेख केलेला आहे. याचा अर्थ सदर प्रस्ताव मंजूर झाल्यात जमा असून सदर प्रभागात पाहणी केलेली आहे काय ? जर पाहणी केली असेल तर हा ठराव मंजूर करणार की नामंजूर करणार मंजूर करावयाचा असेल तर या अगोदर ज्या ज्या अनाधिकृत वसाहतीमध्ये २५% लोकवर्गणी भरून कामे झालेली आहे. ती रदद् करण्यांत यावी व यापुढे अनाधिकृत वसाहतीमध्ये २५% लोकवर्गणी न घेता प्रलंबीत कामे करण्यांत यावी. याबाबतचा निर्णय व्हावा.

मा.महापौर : स.सदस्य श्री.सुर्यवंशी यांनी मांडलेल्या सुचनांची नोंद घेण्यांत येते. यानंतर सर्व प्रकरणांत वरील प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी. फक्त सिडको अधिसूचित क्षेत्रासाठी २५% लोकवर्गणी घेण्यात यावी.

सौ.फरहद बानो, श्री.हमीदोद्यीन ताबा : मागील बैठका का तहकुब करण्यांत आली याचा अगोदर खुलासा व्हावा.

मा.महापौर : विषय पत्रिकेवरील विषय मंजुर झाल्यानंतर चर्चा करण्यांत अर्धा तास वेळ देण्यांत येईल. त्यावेळी खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रफुल्ल मालाणी : दिनांक १६-६-९९ च्या इतिवृत्तातील ठराव क्र.४३ / मध्ये पृष्ठ क्र. १९ वर कार्यकारी अभियंता पद निर्माण करण्याचा ठराव पास केलेला असून त्यात कार्यकारी अभियंता यांत्रिकी व विद्युत अशी दुरूस्ती व्हावी व दिनांक १९-६-९९ चा ठराव क्र.५९/५ मध्ये कार्यकारी अभिंयता जलनिस्सारण ड्रेनेज असे वाचावे.

सौ.फरहद बानो : ठराव क्र.५६/२ नुसार ठराव मंजुर झालेला आहे २५% भरण्याबाबत झोपडपटट्री भागासाठी नाही.

मा.महापौर : ठराव क्र.५६/२ च्या संदर्भात मी स्वत: जागेवर भेट दिली आहे या भागात इतर विकासाची कामे झालेली आहे. त्यावेळी २५% का घेण्यांत आले नाही याबद्यल अधिकाऱ्यांना विचारणा करण्यांत येईल. आता ड्रेनेजचे लहान कामासाठी अडवणूक करणे योग्य नाही तरी काम करून घ्यावे.

श्री.हमीदोद्यीन ताबा :कार्यकारी अभिंयता पद निर्माण करण्याचा प्रस्ताव इतिवृत्तात घुसडलेला आहे असा आरोप लावलेला सत्य आहे काय ?

मा.महापौर : त्याच वेळी मी खुलासा केलेला आहे स.सदस्यांनी विषय क्र.१ मध्ये केलेल्या सुचने प्रमाणे दुरूस्ती करण्यांत येवून विषय क्र.१ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दिनांक १६-६-९९ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.४३/४ अन्वये यांत्रिकी , यांत्रिक पाणीपुरवठा यांत्रिकी जायकवाडी या विभागाकरीता कार्यकारी अभिंयता पद निर्माण

करण्यास मंजुरी देण्यांत आली आहे. ऐवजी "यांत्रिकी पाणी पुरवठा" यांत्रिकी जायकवाडीत विद्युत विभागाकरीता "कार्यकारी अभियंता" पद निर्माण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. अशी दुरूस्ती करण्यांत येते.

२) ठराव क्र.५९/५ अन्वये जलनि:सारण व विद्युत विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता पद निर्माण करण्यास मंजूरी देण्यांत आली आहे. त्या ऐवजी "जलनि:सारण विभागासाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता पद निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. अशी दुरूस्ती करण्यांत येते.

दिनांक १९.६.९९ च्या इतिवृत्तातील वरील दुरूस्तीसह दिनांक १९.६.९९,१७.७.९९,१९.८.९९ व १९.९.९९ आणि २०.१०.९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

मा.महापौर : विषय क्र. इतर चर्चा करावी.

**विषय क्र.७०/२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ ला (दुरूस्ती) नुसार महापालिस प्रत्येक वित्तीय वर्षाकरीता "पर्यावरण अहवाल" तयार करून प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

सदर अहवालावर माहे डिसेंबर ९८ च्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यांत आला होता. या बैठकीमध्ये चर्चा होवून सदर अहवालाबाबत "मशाल" या संस्थेकडून जास्त वेळ मिळावा असा निर्णय होवून पुढच्या सभेमध्ये "मशाल" संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावण्यांत यावे असे ठरले.

त्यानुसार अहवाल सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यांत येत नसून सर्वसाधारण सभेस अवगत झाल्यावर शासनास माहितीसाठी सादर करण्यांत येईल.

सदर पर्यावरण अहवालात शहरातील भागवार नकाशे, पर्यावरण विषय विविध बाबींचा समावेश असणाऱ्या पर्यावरण अहवाल तयार करण्याचे काम पुणे येथील "मशाल" या संस्थेस स्थायी समितीचे मान्यतेने देण्यांत आले होते त्या संस्थ्ेने अभिप्रत असलेलया सर्व महितीचा समावेश करून परिपूर्ण असा अहवाल तयार करून महापालिकेस सादर केला आहे. अहवालाची प्रत यापूर्वी देण्यांत आली होती.

या पर्यावरण अहवालामध्ये शहराच्या सद्यस्थितीचा अधिकृत / अनाधिकृत विकसित भाग, भविष्यातील विकास यासह शहरातील झोपडपटटया नागरी विकसित भागांना पुरविण्यांत येणाऱ्या मुलभूत सुविधा या संदर्भात सविस्तर आकडेवारी , त्याबाबत सुचना शहराची पर्यावरणाची सद्यस्थिती, संभाव्य परिणाम त्या संदर्भातील उपाययोजना, प्रदुषण त्यावरील उपाय योजना इ.समावेश करण्यांत आला आहे.

या अहवालामुळे शहराचा नागरी व औद्योगिक विकास , पर्यावरण मुलभुत सुविधा या बाबतचे प्रश्न त्यामुळे दैनंदिन नागरी जिवनावर होणारे परिणाम इत्यादी बाबत माहिती उपलब्ध होवून त्यासाठी उपाया योजना राबविण्यांसाठी नियोजन करणे सोयीचे होते.

करिता प्रसताव मान्यतेसाठी सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.स.अली मिरा सलामी : मागील तहकुब बैठकीमध्ये विषय क्र.१ झाल्यानंतर चर्चा करण्यात येईल असे सांगितलेले होते. विषय क्र.१ संपलेला असून आता चर्चा करण्यांत यावी.

श्री.अफसर खाँन : विषय क्र.१ मंजुर झालेला असून आता सर्वसाधारण चर्चा करण्यासाठी वेळ देण्यांत यावा तशा प्रकारे चर्चा व्हावी.

मा.महापौर : विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर जनरल चर्चेमध्ये काय प्रश्न उपस्थित करावयाचे ते करावेत विषय क्र.२ सचिव यांनी वाचून दाखवावा.

मा.नगरसचिव :विषय क्र.२ वाचून दाखवतात.

श्री.गौतम लांडगे : चर्चा न होता विषय मंजूर करण्यांत येवू नये विषय क्र.२ च्या संदर्भात "मशाल" या संस्थेमार्फत पर्यावरण अहवाल डिसेंबर ९८ च्या सभेत ठेवण्यात आला होता. चर्चा होवून मशाल या संस्थेला जास्त वेळ मिळावा असा निर्णय होवून पुढील सभेत "मशाल" या संस्थेच्या अधिकाऱ्यांना बोलावण्यात यावे असे ठरलेले असतांना १ वर्षानंतरच्या सभेला प्रस्ताव ठेवण्यात आला असून "मशाल" संस्थेचे कुणी अधिकारी उपस्थित नाही त्या संदर्भात स. सदस्यांना प्रश्न उपस्थित करावयाचा असेल तर त्यांचा खुलासा कोण करणार. बिना चर्चेशिवाय प्रस्ताव मंजुर करू नये स्थागित ठेवावा.

श्री.स.अली मिरा सलामी : एक वर्षापासून संबंधित मशाल या संस्थेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली नाही मशाल या संस्थेला किती रक्कम आता पर्यंत देण्यांत आली व एकूण किती खर्च या प्रस्तावाच्या अनुषंगाने येणार आहे. याची माहिती दयावी. चर्चा न करता निर्णय मंजुर करण्यांत येवू नये.

मा.महापौर : "मशाल" या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी आजच्या सभेस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यांत आले होते. त्यांच्या विभागातर्फे बैठक असल्यामुळे सभेला उपस्थित राहू शकत नाही. असे मशाल संस्थेच्या अधिकाऱ्यांनी कळविलेले आहे.

(विषय क्र.२ ला मंजूरी देण्यांत येते.)

**ठराव :**

प्रस्तावित सविस्तर अहवालानुसार पुणे येथील "मशाल" संस्थेने तयार केलेल्या पर्यावरण अहवालास व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७१/३** :

सहाय्यक संचालक नगर रचना महापालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार ८०" रूंद रस्ता मलीकंबर चौक टाऊन हॉल ते मकाईगेट या रस्त्याने बांधीत होणरा न.भु.क्र.२३७५ मिळकतधारक आनंदनगर हौसिंग सोसायटी सचिव श्री.व्ही मुळे यांनी महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ १०८०.५० चौ. मिटर आहे पैकी सुमारे ८७३.०३ चौ.मिटर क्षेत्र रस्त्याचने बाधीत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना असल्याने सहा महिन्यात भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाध्किारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सहा महिन्यात कार्यवाही झाली नाही तर सदर मळकत आरक्षणातून वगळली जाते. करीता रस्त्याने बांधीत क्षेत्र मुंबई प्रांतिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादक करण्यांत आणि सदर प्रकारणांत होणाऱ्या भूसंपादन खर्चास मंजूरी देणे योग्य प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अफसर खान : या अगोदर बरेच निर्णय मंजूर झालेले आहेत त्या लोकांना रक्कम देण्यांत आलेली नाही. त्याबाबत खुलासा करावा.

मा.महापौर : या अगोदर जे प्रस्ताव मंजूर झालेले आहेत त्या लोकांना पैसे मिळण्याची प्रशासनाने लवकरात लवकर कार्यवाही करावी विषय क्र.३ ला मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार मलिकअंबर चौक ते मकाईगेट या ८०" रूंद रस्त्याने बाधीत होणाऱ्या मिळकत नं.भु.क्र.२३७५ चे मालकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिल्याने नगर भु.क्र.२३७५ च्या एकूण क्षेत्रापैकी बाधीत होणार ८७३.०३ चौ.मी.क्षेत्र भुसंपादन करण्यास आणि त्यासाठी भूसंपादन खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२/४:**

(प्र) कार्यकारी अभिंयता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हमालवाडा स्लम येथे नाल्या लगत रिटेलिंग वॉल बांधणेचे काम करिता अंदाजपत्रक रक्कम रू.११,०२,०००/- सार्वजनिक बांधकाम विभागाचे औरंगाबाद यांची दरसूची सन १९९८-९९ नुसार तयार करण्यांत आली असून त्यास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर काम महानगरपालिका औरंगाबाद अर्थसंपकल्प सन १९९९-२००० लेखाशिर्षक "खुली गटारे व संरक्षित भिंत " मधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

तरी उपरोक्त कामाकरीता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रू.११,०२,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण, सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हमालवाडा स्लम येथील रिटेलिंग वॉल बांधण्याच्या कामासाठी रक्कम रू. ११,०२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/५:**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सभागृहनेता श्री.अविनाश कुमावत यांचा कार्यकाळ दिनांक १५ जुन १९९९ रोजी संपला असल्याने पुढील वर्षाकरीता श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव यांची सभागृहनेता पदा करिता निवड करण्यांत आल्याचे मा. महापौर यांनी दिनांक २८-६-९९ च्या पत्रकान्वये कळविले आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद मामू : विषय क्र.५ व ६च्या संदर्भात माहिती दयावी.

मा.महापौर : या अगोदर सभागृहनेता, विरोधीपक्ष व कार्यरत असलेल्यांचा कार्यकाळ संपलेला होता माहे जुलै मध्ये प्रस्ताव ठेवण्यांत आले होते. सभेच्या पूर्वीच आचार संहिता लागल्याने प्रस्तावावर चर्चा झाली नाही व त्यावर आता प्रस्ताव ठेवण्यांत आला आहे. विषय क्र. ५ व ६ सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १६ जून १९९९ पासून पुढील वर्षाकरीता सभागृहनेता या पदी श्री. महादेव सुर्यवंशी यांची निवड करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/६**

नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला ओ की, आधीच्या एकूण २६ नगरसेवका पैकी २१ नगर सेवकांनी लेखी कळविल्यानुसार मा.महापौर यांनी दिनांक ८-७-९९ च्या पत्रानुसार विरोधी पक्षाची भूमिका सामंजसपणे मांडण्यासाठी विद्यमान विरोधी पक्ष नेता श्री.अफसरखाँन पि.यासिनखॉन यांची सन १९९९-२००० या वर्षासाठी विरोधी पक्ष नेता म्हणून सर्वसाधारण सभेच्या निर्णयांचे अधिन राहून निवड करण्यांस तत्वतः संमती दिलेली आहे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**टराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० सर वर्षाकरीता विरोधी पक्ष नेता या पदी श्री.अफसर खॉन यासीन खाँन यांची निवड करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७५/७** :

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव दिला आहे की, महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचारी यांना खालील शासन निर्णय जा.क्र.१०९८/प्र.क्र.१३४/९८/३९ दिनांक ३ मार्च १९९९ प्रमाणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्ताव सादर करीत आहे.

शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना संगणकाचे प्रशिक्षण घेण्यासाठी काही संस्था पाठयक्रम / अभ्यासक्रमांना संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सदर संदर्भाधिन शासन निर्णय अधिक्रमित करून पुढील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

२. खालील संस्थांना त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या पाठयक्रमांना या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदरहू पाठयक्रमाची परिक्षा उत्तिर्ण झाल्यावर शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना पाठयक्रमासमोर दर्शविण्यात आलेली प्रोत्साहनात्मक रक्कम अनुज्ञेय राहील. त्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांनी परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. जे शासकीय अधिकारी कर्मचारी हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी परिक्षा उत्तीर्ण झाले असतील त्यांना ही परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यावर जी परिक्षा ते उत्तीर्ण झाले असतील त्यासाठीची प्रोत्साहनात्मक रक्कम अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | पत्ता | पाठयाक्रम | स्तर | प्रोत्साहनात्मक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | डी.ओइएसीसी सोसा. | इलेक्ट्रीकल्स निकेतन ६ सीजीओ कॉम्पेक्स | नविन सर्टिफिकेट लेव्हल कोर्स | एक | रू.७,५००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नवी दिल्ली ११०००३<br>दुरध्वीन क्रमांक ०११<br>४३६३३३०/३९/३२<br>फक्स क्र.४३३६३३३५ | ओ लेव्हल कोर्स<br><br>ए लेव्हल कोर्स | एक<br><br>एक | रू.७,५००/-<br><br>रू.१०,०००/- |
| २ सी डॅक | पुणे युनिर्व्हसिटी कॅम्पस, गणेश खिंड बाणेर रोड, पुणे-७,दुरध्वनी क्र.(०२०) ३७००३४/३५७०२० फक्स क्र.३५५०२८ | डिप्लोमा इन इन्फरर्मेशन टेक्नॉलॉजी<br>ॲडव्हॉन्स डिप्लोमा इन्फरर्मेशन टेक्नॉलॉजी | एक<br>दोन | रू.७,५००/-<br>रू.१०,०००/- |
| ३. यशवंतराव चहाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक | ज्ञानगंगोत्री,गंगापूर धरणाजवळ नाशिक ४२२००५ दुरध्वनी क्र.(०२५३) ३५१७१४/१५, ३५४७१७/१८ | सर्टिफिकेट इन ऑफिसऑटोमेशन | एक | रू. ७,५००/- |
| ४ सेन्टार फॉर इलेक्ट्रॉनिक्स डिझाईन अॅन्ड टेक्नॉलॉजी ऑफ इंडिया औरंगाबाद (सीइडीटीआय) | सीइडीटीआय कॉम्पेक्स विश्वविद्यालय परिसर औरंगाबाद ४३१००१ दुरध्वनी क्रमांक (०२४०) ३३२६०१ फॅक्स क्र. ३३१७४८ | सर्टिफिकेट इन्फारमेशन टेक्नॉलॉजी | एक | रू.७,५००/- |
| ५ तंत्रिशिक्षण परिक्षा मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई | शासकीय तंत्र निकेतन इमारत तिसरा मजला, ४९,खरेवाडी आळीयावर जंग मार्ग,बांद्रे (पु) मुंबई ४०००५१,दुरध्वनी क्र ६५१३९७९,६५१३९८० | ॲडव्हॉन्स डिप्लोमा कॉम्प्युटर सॉफ़्टवेअर सिस्टीम ॲनालिसीस अॅन्ड ॲप्लीकेशन्स (अेडीस एस एस ए ए) | एक | रू.७,५००/- |

३ उपरोक्त पाठयक्रम तसेच संस्था यांच्या संदर्भातील तपशिल स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यांत येत आहे. तत्पूर्वी असा अभ्यासक्रम जे शासकीय अधिकारी / कर्मचारी पूर्ण करू इच्छीतात त्यांनी वर नमुद केलेल्या संस्थाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.

४ उपरोक्त परिक्षा पैकी कोणत्याही स्तरामधील कोणतीही एक किंवा अनेक परिक्षा उत्तिर्ण
झाल्यास त्या स्तरासाठी अनुज्ञेय असलेली प्रोत्साहनात्मक रक्कम ही एकदाच अनुज्ञ ेय राहील, जर शासकीय अधिकारी / कर्मचारी इतर एकाची परिक्षा न देता स्तर दोन मधील परिक्षा थेट उत्तीर्ण झाला तर त्यास स्तर दोनसाठी अनुज्ञेनय असलेली रक्कम देय राहील.

५. संबंधित विभागांनी उपरोक्त प्रयोजनासाठी होणारा खर्च हा त्या त्या विभागाच्या प्रथम लेख शिर्षाखालील कार्यालयीन खर्च या उप शिर्षाखाली संगणकाकरीता खर्च या गौण शिर्षाअंतर्गत त्या त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून करावा. यासाठी अंदाजपत्रकीय तरतुद करण्यासाठी कार्यवाही संबंधितांनी वेळेवर करावी.

६. हाशासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीओएस - १०९८/प्र.क्र.११३/९८/३९ दिनांक ११ डिसेंबर १९९८ अन्वये उच्चाधिकार समितीच्या कार्यकारी गटास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू करण्यांसाठी प्रथम सत्रामध्ये २०० कर्मचारी व अधिकारी यांना लाभ देता येईल. अधिकारी व कर्मचाऱ्यांना ५०००/- रूपये फी भरून संबंधीत शासन मान्य संस्थेकडे प्रशिक्षण घेवून व तसे प्रशिक्षणात उत्तीर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. प्रमाणपत्र सादर केल्या नंतर अधिकारी / कर्मचारी यांना वरील शासन निर्णयाप्रमाणे फायदा देण्यात येईल. संगणक प्रशिक्षण एजन्सी शासन निर्णयाप्रमाणे शासन संलग्नीत असणे आवश्यक आहे.

**अशा संस्थांची यादी पुढील प्रमाणे आहे.**

१ आर.सी.,एम.टी. (सी.ई.डी.टी.) विश्वविद्यालय परिसर,औरंगाबाद
२ सिलीकॉन कॉम्प्युटर ॲक्ाडमी,औरंगाबाद
३ सॉफ़टटेक कॉम्प्युटर औरंगाबाद
४ अे.डी.सी.सी.निराला बाजार, औरंगाबाद
५ एम.आय.टी.इंजिनिअरिंग कॉलेज, औरंगाबाद
६ नोबेल कॉम्प्युटर ॲकॅाडमी, खडकेश्वर, औरंगाबाद
७ तलत काम्प्युटर कबाडीपूरा, औरंगाबाद
८ वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद
९ सीरीन कॉम्प्युटर,औरंगाबाद
१० कॉम्प्युटर कन्सेप्ट चेतना टॉवर, श्रेयनगर, औरंगाबाद
११ हायटेक कॉम्प्युटर ॲक्ाडमी, औरंगाबाद
१२ नोव्हेल कॉम्प्युटर ॲकाडमी, औरंगाबाद
१३ ओॲसिस सॉफटवेअर ॲकाडमी, औरंगाबाद
१४ एक्सपर्ट हयुमन रिसोसेस, औरंगाबाद
१५ ग्लोबल कॉम्प्युटर, औरंगाबाद
१६ गर्व्हनमेंट आर्टस ॲन्ड सायन्स कॉलेज,किलेअर्क , औरंगाबाद
१७ अरबाज कॉम्प्युटर, औरंगाबाद
१८ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,औरंगाबाद
१९ महात्मा गांधी मिशन इन्फोटेक ॲन्ड रिसर्च सेंटर एमजीएम कॉलेज, औरंगाबाद

महानगरपालिका औरंगाबाद च्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना संस्थेची फि स्वतः भरावी लागेल उत्तीर्ण झाल्यानंतर अधिकारी / कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे त्याची प्रतिपूर्ती म्हणून प्रात्साहनात्मक रक्कम व त्यांनी संस्थेमध्ये भरलेली फी परतावा म्हणून शासन निर्णयाप्रमाणे अदा करण्यांत येईल. वरील सर्व संस्थे व्यतिरिक्त शासन निर्णयाप्रमाणे व वेळोवेळी शासन मान्यता येईल अशा संस्थेची निवड आयुक्त, महानगरपालिका करतील. सदरील ठराव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.प्रदिप जैस्वाल : विषय क्र.३ च्या संदर्भात काही स.सदस्यांनी गैरसमज झालेला असून ॲक्ट १२७ अन्वये सहा महिन्यात कार्यवाही झाली नाही तर सदर मिळकत

आरक्षणातून वगळली जाते. दुसरी बाब अशी कि , विषय क्र.७ मध्ये महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना संगणकाचे प्रशिक्षण घेण्यासाठी त्यांनी अगोदर त्यांचे स्वतःचे पैसे खर्च करावे व नंतर प्रशिक्षण पूर्ण होवून

झाल्यानंतर महानगरपालिकेकडून त्यांना त्या प्रशिक्षण झाल्याबाबतचा खर्चाची रक्कम अदा करण्यांत येईल. परंतू अधिकारी यांनी याबाबत अभ्यास केलेला आहे. काय स्वतःचे पैसे अगोदर खर्च करून कुणीही कर्मचारी / अधिकारी संगणकाचे प्रशिक्षण घेणार नाही त्यासाठी त्यांना प्रशिक्षणसाठी सुरवातीपासून नियमाने पैसे देण्यांची कार्यवाही व्हावी.

श्रीमती आबेदा बेगम,श्री.स.अ.मिरा सलामी : स.सदस्य श्रीमती नुरजहाँ बेगम तसेच श्रीमती अलका पाटील यांना पोलिसांनी अटक केलेली आहे. त्याबाबत आपण तक्रार केलेली होती काय खुलासा व्हावा.

मा.महापौर : सदर विषय सभागृहा बाहेरील असून त्या संबंधात मी कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नाही माझा काहीही संबंध येत नाही. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

(याचवेळी आघाडीचे तसेच इतर काही स.सदस्य मा.महापौर यांच्या आसनाजवळ जावून जनरल चर्चा व्हावी स.सदस्यांनी मांडले्ल्या सुचनेबाबत खुलासा व्हावा या मागणीसाठी मोठमोठयाने बोलतात.काहीही ऐकू येत नाही. )

श्री.महादेव सुर्यवंशी : स.सदस्य श्री.जैस्वाल यांनी केलेली सूचनेची अंमलबजावणी व्हावी.

श्री.गौतम लांडगे, श्री.गौतम खरात : सभागृहात कोणत्या विषयावर चर्चा चालू आहे हे कळेना एक एक स.सदस्यांना बोलण्याची परवानगी दयावी सर्वांना आपआपल्या जागेवर बसण्यास सांगावे.

मा.महापौर : स.सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे शांतता पाळावी.(पुन्हा सभागृहात मोठमोठयाने बोलणे सुरू होते कोण काय बोलू लागले स्पष्ट ऐकावयास नव्हते या वेळात मा.महापौर यांनी) आजच्या सभेत विषय पत्रिकेवरील विषयावर स.सदस्यांनी मांडलेल्या सुचनेनुसार दुरूस्ती करून विषय पत्रिकेवरील व पुरवणी विषय पत्रिकेवरील सर्व विषय मंजुर करण्यांत येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र.१०९८ प्र.क्र.१३४/९८/३९ दिनांक ३ मार्च १९९९ अन्वये महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना संगणक प्रशिक्षणासाठी प्रस्तावातील अ.क्र.६ मधील १९ प्रशिक्षण संस्थापैकी कोणत्या एका संस्थेकडे प्रशिक्षण फिस जमा करून प्रस्तावातील अ.क्र.२ मधील ते ५ या संस्थेकडील शासन मान्य पाठयक्रमापैकी कोणताही एक पाठयक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर प्रस्तावातील अ.क्र.१ ते ५ चे नियमाप्रमाणे महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेली रक्कम प्रस्ताव म्हणून शासननियमाप्रमाणे अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७६/८** :

शहर अभियता यांनी प्रस्ताव सादरक`ला की, सादिया मार्केटच्यावर बहुउद्येशिय सांस्कृतिक सभागृह बांधावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन १९९८-

९९ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रूपये १८,३०,८९७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक २-६-९९ अन्वये मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा सन ९९-२००० आर्थिक वर्षा अंतर्गत व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यांत येईल तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू. १८,३०,८९७/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादिया मार्केटच्या वर बहुउद्येशिय सांस्कृतिक सभागृह बांधण्याच्या कामासाठी रक्कम रू. १८,३०,८९७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७७ /९:**

सिडको एन-२ ठाकरे नगर या भागात ५० मी.मी.जी.आय. १०० मि.मि. व १५० मी.मी.ए.सी. जलवाहीनी टाकणे व वितरण व्यवस्था करण्यासाठी २०० मी.मी.सी. आय.आय.जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.१०,३३,१५२/- चे तयार करण्यांत आलेले असून त्यास प्रशासकिय मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामावर होणारा खर्च सिडको प्रशासनाने रू. रू.१०,४०,०००/- दिनांक १५-४-९९ नुसार महानगरपालिकेस दिलेल्या निधीमधून करण्यांत येत आहे.

तरी सिडको एन-२ ठाकरे नगर भागात जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपरू.१०,३३,१५२/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-२, ठाकरेनगर भागात ५० मी.मी.जी.आय.,१०० व १५० मी.मी.ए.सी.जलवाहिनी टाकणे व वितरण व्यवस्थेसाठी २० मी.मी. सी.आय.जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रू. रू.१०,३३,१५२/-च्या अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७८/१०** :

उप संचालक नगर रचना प्रस्ताव सादर करीत आहे कि, औरंगाबाद महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या व सध्या महानगरपालिका लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार मंजुर रेखांकनामध्ये मोठया निवासी संकुलामध्ये नियमानुसार सोडावयाच्या १०% खुल्या जागेमध्ये जिमन्याशियम, पॅव्हेलियन, बालवाडी, वाचनालये, तसेच खुल्या जागा संबंधाने तत्सम वापर देय होतात.

आता शासनाने पत्र टी.पी.एस. १०९८/६२७ /प्र.क्र.२५३/९८ नवि-८ दिनांक २२ जुन १९९९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ (१) अन्वये हया खुल्या जागेमध्ये " पाळणा घराचा " वापर ही समाविष्ठ करण्याबाबतचे निर्देश दिलेले असून त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना १९६६ चे कलम ३७ ची किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करणे क्रमप्राप्त ठरते.

लागू विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजुर अभिन्यासातील जागेत जिन्मनॅशियम , पॅव्हेलियन, बालवाडी, वाचनालय इत्यादीसह पाळणा भराचा वापर ही अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव खालील अटीवर मान्यतेस्तव सादर.

१ पाळणाघराच्या वापरासाठी जागा मागण्याचा अधिकार हा फक्त सामाजिक संस्था व नोंदणीकृत महिला व बाल सुधार संघटना यांनाच असेल.

२ रेखांकनातील खुल्या जागेच्या क्षेत्रापैकी १०% क्षेत्रामध्ये पाळणाघराचा वापर अनुज्ञेय होईल.

३ ज्या रेखांकनातील खुली जागा मागण्यात आलेली आहे तेथील सर्व भूखंड धारकांची संमतीपत्रे / गृहनिर्माण संस्था असल्यास त्यांचे संमतीपत्रे दाखल करावे लागेल.

४ महानगरपालिकेने ज्या खुल्या जागा विकासीत केलेल्या आहेत म्हणजे उद्यान विकसीत केलेले / काही बांधकाम केले आहे. त्या ठिकाणची जागा पाळणाघरासाठी अनुज्ञेय होणार नाही.

५ ज्या जागेसाठी पाळणाघराचा प्रस्ताव आलेला आहे , ती जागा महानगरपिालकेतर्फे विकसीत करण्याचा प्रस्ताव आहे का ? भविष्यात त्या जागेची महानगरपालिकेस आवश्यकता आहे का ? याची प्रथम खात्री करून मगच पाळणाघराचा प्रस्ताव देय करता येईल.

प्रस्ताव मान्यतेनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव शासनास सादर करण्यांत येईल.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाचे पुढील कार्यवाही अंतर्गत शासनाची अंतिम मंजुरी घेण्याकरीता ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीस अनुसरून प्रस्तावित फेरबदलास अंतिम स्वरूप देण्यासाठी जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याचे व सूचना हरकतीचा विचार करून फेरबदलाचे स्वरूपात अंतिम स्वरूप देवून प्रस्ताव शासनाचे मंजुरी करीता राज्य शासनाकडे पाठविण्यांसाठी आवश्यक तो पत्र व्यवहार करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यांत येत आहेत.

करिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यांत येत असून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकासाठी शासनाने मंजुर केलेल्या वसध्या लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार मंजुर रेखांकन मोठया निवासी संकुलामधील सोंडण्यांत आलेल्या १०% खुल्या जागेमध्ये नियमानुसार जिन्मॅशियम ,पॅव्हेलियन, बालवाडी ,वाचनालय तसेच खुल्या जागा संबंधाने देय असलेल्या तत्सम वापर देय होतात त्याचप्रमाणे दिनांक २२ जून १९९९ च्या शासन आदेशाप्रमाणे रंखांकनाच्या खुल्या जागेत पाळणाघराच्या वापर प्रस्तावातील अ.क्र.१ ते ५ प्रमाणे समाविष्ठ करण्यास आणि त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

तसेच मुंबई प्रांतिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये शासनाची अंतिम मंजुरी घेण्याकरीता ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीत कार्यवाही करणे बाबत राज्य

शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्याकरीता पत्रव्यवहार करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७९/११** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्र.जीईएन १०९८/७२४/प्र.क्र.११३/९८ नवि-२४ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक १६ ऑगस्ट १९९९ नुसार मी दिलीप शिंदे सहाय्यक आयुक्त जागतिक बँक प्रकल्प आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांची उपआयुक्त औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या पदावर सोबत जोडलेल्या विहीत अटी व शर्तीनुसार प्रथ्मतः दोन वर्षासाठी प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यांत आली असून त्याकरीता त्यांच्या सेवा नगर विकास विभागाकडे सुपूर्त करण्यांत आल्या आहेत.

करिता श्री.दिलीप शिंदे यांची रूजू झाल्याचे तारखेपासून म्हणजे दिनांक १७ ऑगस्ट १९९९ रोजी मध्यान्हानंतर उप आयुक्त औरंगाबाद मयहानगरपालिका या पदावर दोन वर्षासाठी शासनाच्या सोबतच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्यांबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १६ ऑगस्ट १९९९ चे शासन आदेश आणि त्या सोबत नियम व शर्तीनुसार जागतिक बँक प्रकल्प आयुक्त कार्यालय औरंगाबाद मधील सहाय्यक आयुक्त पदावरील श्री.दिलीप शिंदे यांची औरंगाबाद महानगरपिालकेचे उप आयुक्त पदावर १७ ऑगस्ट १९९९ पासून दोन वर्षाकरीता प्रतिनियुक्ती करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>पुरवणी विषय पत्रिका</u>

**विषय क्र.८०/१** :

संगिता सी.देवरे हाया हदय विकाराने आजरी असून त्यांना अेनक स. नगर सेवकांनी आपल्या स्वेच्छा निधी मधून हदय रोगावरील उपचारासाठी प्रत्येकी एण्क हजार रूपये आर्थिक मदत म्हणून दिलेले आहेत असे एकूण २५०००/- रूपयाचे पत्र आर्थिक मदतीबाबत त्यांना मिळालेले आहेत, परंतू महानगरपालिका नियमानुसार फक्त रूपये १५०००/- मंजूर करण्याची तरतुद आहे या प्रकरणांत आपण रक्कम रूपये २५०००/- संबंधितास हदय रोगावरील उपचारासाठी विशेष बाब म्हणून देणे आवश्यक आहे, जेणे करून त्यांना हदय रोगावरील उपचारासाठी वरील रक्कम मिळू शकेल.

तरी सदरील प्रकरणांत विशेष बाब म्हणून संबंधितास स्वेछा निधी म्हणून रूपये २५०००/- आर्थिक मदत देणेस सर्वानुमते मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी,
अनुमोदक :श्री.कचरू नवपुते, श्री.नरसिंग ढगे
दिनांक ९-७-९९

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संगिता सी. देवरे यांा हदय रोग उपचाराकरीता विशेष बाब म्हणून स.नगरसेवकंच्या स्वेच्छा निधीतून रू.२५०००/- आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८१/२** :

दिनांक २९-६-९९ रोजी स. सदस्य श्री. अ.जावेद रज्जाक यांचे निधन झाल्याने त्यांना श्रंध्दांजली अर्पण करण्यास मा. महापौरांनी दिनांक ३०-६-९९ रोजी शोकसभेचे आयोजन केले होते शोक सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला आहे.

स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी दाने हजार स. सदस्यांच्या मानधनातून प्रत्येकी रू.५००/- प्रमाणे आणि श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय हे रूपये १०,०००/- ची मयतांचे कुटुंबियास अर्थ साहय देण्यांचे मान्य केलेअ आहे.तसेच त्यांच्या एका पाल्यास पात्रतेनुसार महानगरपालिकेत नोकरी देणे व व श्री.जावेद रज्जाक यांचे स्मरणार्थ प्रभाग क्र.३५ मध्ये मोकळया जागेत उद्यान विकसित करण्यांत येवून या उद्या ानास "पै.अ.जावेद रज्जाक यांचे स्मरणार्थ स्व.मिनाताई ठाकरे उद्या ान असे नांव देण्यांस एकमताने मान्यता दिलेली आहे. शोकसभेत घेतलेल्या ठरावाची अंमलबजावणी होणे व ठरावास मुर्त स्वरूप प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

सुचक :श्री.अफसर खॉन यासीन खॉंन
अनुमोदक : श्री.सुर्यवंशी महादेव,
श्रीमती आबेदा बेगम
दिनांक : १२-११-९९

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.सभासद श्री.अ.जावेद रज्जाक यांचे निधन झाल्याने स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रू.२०००/- स.सदस्यांच्या मानधनातून प्रत्येकी रू.५००/- याप्रमाणे अर्थ सहाय्य देण्यास, तसेच श्री.रज्जाक यांचे एका पाल्यास मनपात नोकरी देण्यास प्रभाग अ.३५ मधील उद्यान विकसित करण्यात येवून या उद्या ानास "पै.अ.जावेद रज्जाक यांचे स्मरणार्थ स्व.मिनाताई ठाकरे उद्या ान असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८२/३ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी श्री.मोईनुद्दीन , डॉ.रझवी तसेच सहाय्यक संचालक नगर रचना श्री. चौथाई यांना यापूर्वी महानगरपिालकेच्या सेवेत सामावून (          ) घेतलेले आहे.  मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार मुख्य लेखा परिक्षक हे संविधानिक पद आहे.  सदर पदावर काम करणारा अधिकारी हा सक्षम व अनुभवी असणे आवश्यक आहे.  सध्या या पदावर श्री.म.न.सोनार हे काम करीत असून त्यांनी आपल्या ३!! वर्षाच्या कारर्किदीत लेखा परिक्षण विभगात अत्यंत उत्कृष्टपणे काम केले आहे. सर्व लेखा परिक्षण १९८३ पासून अद्यावत करून त्यांचे अहवालही सादर केलेले आहेत.  त्यांची शासनाकडे इ ालेली दिर्घकाल सेवा लक्षात घेता अशा अनुभवी अधिकाऱ्याची महानगरपालिकेला आवश्यकता असल्याने त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत कायम स्वरूपी सामावून घेण्यात यावे. सध्या त्यांना मिळत असणारे वेतन व भत्ते व इतर सवलती या जशाच्या तशा ठेवून त्यांना समावेशनाची प्रशासकीय कार्यवाही मा. आयुक्त महानगरपिालका यांनी करावी.

सुचक : श्री.प्रदिप जैस्वाल, श्री.अफसर खॉंन, श्री.महादेव सुर्यवंशी, श्री.कचरू नवपूते,
श्री.नरेंद्र पाटील
अनुमोदक : श्री.प्रकाश निकाळजे ,श्री.नरासिंग ढगे, श्री.गजानन बारवाल,श्री.रशिद खॉंन
(मामू) श्री.संजय केनेकर, हमीद ताबा, श्रीमती अलका पाटील

**ठराव :**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये मुख्य लेखा परिक्षक हे संविधानिक पद आहे सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. सध्या या पदावर शासनाच्या वित्त विभागाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी श्री.म.न.सोनार हे काम करीत असून त्यांच्या प्रतिनियुक्ती कालावधी ३१.१२.९९ रोजी संपणार आहे. श्री.म.न.सोनार यांचे महानगरपालिकेच्या सेवेत कायम स्वरूपी समावेशन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येवून दिनांक १-१-२००० पासून त्यांना मुख्य लेखा परिक्षक या पदावर महानगरपालिको आस्थापनेवर नियुक्त करण्यात येवून काम करण्याची अनुमती देण्यात येवून सध्या त्यांना मिळत असणारे वेतन, भत्ते व इतर सवलती या जशाच्या तशा ठेवण्यांत याव्यात श्री.सोनार यांच्या समावेशना बाबतची संपूर्ण प्रशासकीय कार्यवाही मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८३/४** :

सिडको प्रभागाचे महानगरपिलकेत हस्तांतरण प्रक्रिया अंतिम टप्प्यात असलेली असून सिडको कार्यालयातील सुमारे ३२ लिपीकवर्गीय व तत्सम पदांवर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना महापालिका हस्तांतरण समयीकायमस्वरूपी पदांवर सामावून घेण्यात यावे अशी विनंती या कर्मचाऱ्यांनी केली असून सिडको प्रशासनाने देखील तशी मागणी केले आहे. तसेच सचिवालय स्तरावर झालेल्या बैठकीत वेळोवेळी हा प्रश्न उपस्थित झाला असून या कर्मचाऱ्यांना कायमस्वूरपी सामावून घेतल्यास या कर्मचाऱ्यांच्या अनुभवाचा फायदा महापिलकेस निश्चतच होईल.

तरी सदरहू कर्मचाऱ्यांना महापालिकेत कायमस्वरूपी अस्थापनेवर सामावून घेण्याकरीता चर्चा करण्याकरीता महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत विषय घेण्यात यावा ही विनंती.

सूचक : श्री.रविंद्र (राजू) इंगळे

अनुमोदक: श्री.बन्सी गांगवे, सौ.रजनी जोशी, सौ.विमल मुंडलिक,सौ.मंदाताई काळुसे, सौ.सुनंदा कोल्हे, श्री.सुभाष टाकळकर

दिनांक :८-११-१९९९

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको प्रभागाचे मनपात हस्तातरण प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून सिडको कार्यालयातील ३२ लिपीक वर्गीय व तत्सम पदावर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना हस्तांतरणाचे वेळी मनपामध्ये कायमस्वरूपी पदावर सामावून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८४/५ :**

महानगरपालिकेचे सर्व वाचनालय दर दुसऱ्या व चौथ्या शनिवार व रविवार सुटट्ी असल्यामुळै सरकारी कर्मचारी व विद्यार्थी वाचनालयाचा लाभ घेवू शकत नाही. महानगरपालिका दर वर्षी वाचनालयावर लाखो रूपये खर्च करत आहे. याचा सर्वसाधारण नागरिकांना जास्तीत जास्त फायदा घेता यावा या दृष्टीकोनातून दुसऱ्या व चौथ्या शनिवार व रविवारची सुटट्ी रदद् करण्यात यावी. व आठवडाभर वाचनालय चालू ठेवण्यात यावा.

वाचनालयाचे कर्मचारी यांनी आपली सुटट्ी आपसात वाटून घ्यावी व वाचनालय आठवडा भर चालू ठेवण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.मोहसीन अहेमद, श्री.स.अ.इकबालोद्दीन
अनुमोदक: श्री.किशोर तुळशीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा वाचनालयाचा सर्वसाधारण नागरिकांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा या दृष्टीने दुसऱ्या व चौथ्या शनिवारी व रविवारी महानगरपालिका, वाचनालय चालू ठेवण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८५/६** :

कुंभारवाडा , औरंगपूरा पौलिस चौकी समोरिल मार्गास आचार्य देवेंद्रमुनीजी महाराज मार्ग असे नांव देण्यांत यावे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.प्रदिपजी जैस्वाल
अनुमोदक: श्री.विकास जैन
दिनांक :१६-११-९९

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कुंभारवाडा औरंगपूरा पोलिस चौकी समोरील मार्गास आचार्य देवेंद्रमुनीजी महाराज मार्ग नांव देण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६/७** :

रेल्वेस्टेशन स्थीत मंगल कार्यालयास व व्यापर संकुलनास श्री. " संत गाडगे महाराज" असे नांव देण्यांत यावे. प्रस्ताव विचारार्थ सादर.
सुचक : श्री.प्रदिपजी जैस्वाल
अनुमोदक: श्री.विकास जैन
दिनांक : १६-११-१९९९

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन स्थीत मंगल कार्यालयास व व्यापार संकुलनास श्री.संत गाडगे महाराज असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

जन गण मन या राष्ट्रगिताने सभेची सांगता झाली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १३ डिसेंबर १९९९ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त सोमवार दिनांक १३ डिसेंबर १९९९ रोजी सकाळी ११.३० वाता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सभेस मा.महापौर श्री.सुदाम पाटील सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात " वंदेमातरम् " या गीताने सुरूवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकारी व स. सदस्य उपस्थित होते.(सभासदांची उपस्थिती हजेरी रजिस्टर प्रमाणे )**

| | | |
|---|---|---|
| १ | स.स.श्री.केनेकर संजय किशनराव | उप महापौर |
| २ | स.स.श्री.ढगे नरसिंग मुरलिधर | स.सदस्य |
| ३ | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | स.सदस्य |
| ४ | स.स.श्री.अफसर खॉुन यासीन खान | |
| ५ | स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | |
| ६ | स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | |
| ७ | स.स.सौ.साजेदा बेगम | |
| ८ | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | |
| ९ | स.स.सौ.जोशी रजनी रमेश | |
| १० | स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | |
| ११ | स.स.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | |
| १२ | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | |
| १३ | स.स.नरेंद्र यादवराव पाटील | |
| १४ | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | |
| १५ | स.स.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | |
| १६ | स.स.सौ. पदमा बाबुराव शिंदे | |
| १७ | स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | |
| १८ | स.स.श्री.मालाणी प्रफुल्ल लालचंद | |
| १९ | स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | |
| २० | स.स.सौ. विसपुते धनश्री अशोक | |
| २१ | स.स.सौ. फरहद बानो भ्र.मो नवाज | |
| २२ | स.स.श्री.फजलउल्ला खान उजमतउल्लाखान | |
| २३ | स.स.श्री.अजीज खॉ गणी खॅा | |
| २४ | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | |
| २५ | स.स.श्री.महमंद मुश्ताक | |
| २६ | स.स.श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद | |
| २७ | स.स.श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | |
| २८ | स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | |
| २९ | स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव | |
| ३० | स.स.सौ.वाडेकर यशोदा धनंजय | |
| ३१ | स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर | |
| ३२ | स.स.श्री.हमीदोद्दीन ताबा फसीयोद्दीन | |

३३ स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद
३४ स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन
३५ स.स.श्री.जैसवाल प्रदिप शिवनारायण
३६ स.स.श्री.स.अली मिरा सलामी
३७ स.स.सौ.वाघमारे मुक्ताबाई सुदाम
३८ स.स.सौ. लता श्रीनिवास दलाल
३९ स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
४० स.स.श्रीमती अलका रमेश पाटील
४१ स.स.सौ.धांडे शकुंतला हरिदास
४२ स.स.श्री.अ.रशिद खॉन (मामू)
४३ स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
४४ स.स.श्री.डॉ. कराड भागवत किशनराव
४५ स.स.सौ.आव्हाड सविता संजय
४६ स.स.सौ.निर्मला विठठ्ल कांबळे
४७ स.स.श्री.अब्दुल रशिद अ.सत्तार
४८ स.स.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन
४९ स.स.श्री.जैन विकास रतनलाल
५० स.स.श्री.बारवाल गजानन रामकिशन
५१ स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
५२ स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
५३ स.स.श्री.जोशी संजय रामदास
५४ स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५५ स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५६ स.स.सौ.ज्योत्सना दौलत हिवराळे
५७ स.स.श्री.राजकुमार बचाटे (मामा)
५८ स.स.सौ.राधाबाई तळेकर
५९ स.स.श्री.विठठ्ल किशन जाधव
६० स.स.सौ. काळूसे मंदा धनंजय
६१ स.स.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे
६२ स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
६३ स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास
६४ स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान

आजच्या बैठकीसाठी गणपूर्ती नसल्याने ३० मिनिटांसाठी सभा सहकूब करण्यात येते. मा. महापौर यांनी घोषित केले.

११.३५ वाजता तहकुब करण्यात आलेली सर्वसाधारण सभा १२.१५ वाजता मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**<u>संवाद :</u>**

श्री.प्रदिप जैस्वाल : महानगरपालिकेच्या निवडणूका जवळ आलेल्या आहेत. आजची बैठक ही महत्वाची बैठक आहे ती पोस्टपॉंड व करता विषय पत्रीकेवर चर्चा करण्यात यावी.

श्री.मोहसिंन अहमद : अयुबखान यांचे ६ डिसेंबरच्या पोलिसांच्या लाठीहल्ल्यात निधन झालेले आहे. त्यांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.श्री.अय्युब खान यांना सभागृहातर्फे २ मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.मुश्ताक अहमद ,श्रीमती मोहसिना बिल्कीस : पोलिस लाठीमारांचा या सभागृहात निषेध करण्यांत यावा.

श्री.नरेंद्र पाटील : आजच्या सभेत कोणत्याही इतर विषयावर चर्चा न करता विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा करण्यात यावी.

मोहसिन अहमद : माझ्या वॉर्डातील काही प्रश्नाबाबत मला चर्चा करावयाची आहे माझ्या वॉर्डात बरोबर साफसफाई होत नाही. विभागीय कार्यालयातील कर्मचारी स्वच्छतेकडे लक्ष देत नाहीत.

श्री.नरेंद्र पाटील: अशातच माजी खासदार बाळासाहेब पवार यांचे दुःखद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रंध्दांजली अर्पण करण्यात यावी.
माजी खासदार बाळासाहेब पवार यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**विषय क्र.८७/ १**

दिनांक ३०-१०-९९ च्या विशेष सर्वसाधारण सभा व दिनांक २०-११-९९ ची तहकुब सभा दिनांक २५-११-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील सर्वसाधारण सभेत विषय क्र.८३/४ नुसार सिडको कर्मचाऱ्यांना महानगरपालिकाकडे हस्तांतरीत करून घेण्याचा प्रस्ताव पारित करण्यात आला. अद्यापपावेतो सिडको भागाचे महापालिकाकडे हस्तांतरण झालेले नाही. तर केवळ कर्मचारी कसे घेता. प्रथम सिडकोचे महापालिकाकडे हस्तांतरण करण्यांत यावे असे ठराव ठेवून सभागृहात चूकीचा पायंडा पाडला जात आहे.

श्री.स.अली मिरा सलामी : पत्रकारांवर झालेल्या लाठीहल्ल्यांचा निषेध करण्यांत येतो.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : हा विषय सभागृहाचा नाही त्यामुळे यावर चर्चा करण्यांत येवू नये.

श्री.गिरजाराम हाळनोर :या संदर्भाने चौकशी करण्यासाठी शासनाने कमेटी नेमलेली आहे. त्यामुळे येथे त्यावर चर्चा करण्यात येवू नये.

श्री.अफसर खॉन : या लाठी हल्ल्यास दोन नगरसेविका ही जखमी झाल्या आहेत. या घटनेचा निषेध करण्यांत यावा श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी म्हटल्यानुसार सिडकोतील कर्मचारी महानगरपालिका हस्तांतरीत करून घेण्याचा प्रस्ताव रदद् करण्यांत यावा.

श्री.रशिद खॉंन : हा प्रस्ताव प्रशासनातर्फे यावयास हावा होता प्रशासनाने हा प्रस्तव ठेवावा अशी त्यात दुरूस्ती करण्यांत यावी.

श्री.स.अली.मिरा सलामी : सिडकोचे ३३ कर्मचारी महानगरपिालकेकाडे सामावून घ्यावेत असा ठरावात उल्लेख आहे. हे ३३ कर्मचारी कोण आहेत या सदंर्भाने विविध संघटनांनी निवेदने दिलेली आहेत. अशा विशिष्ट कर्मचाऱ्यांबाबत निर्णय न घेता पूर्ण कर्मचाऱ्यांना एकत्रित विचार करावयास हवा. सिडाकेचे

महानगरपालिकाकडे हस्तांतरण झाल्यानंतरच अशा प्रश्नावर विचार व्हावयास हवा.

मा.महापौर : ठराव तसाच करण्यांत आलेला आहे.

श्री.गौतम लांडगे : ठरावात दुरूस्तीचा प्रश्न नाही. सिडको महापालिका अधिकाऱ्यांची बैठक झालेली होती. असा कोणताही प्रश्न त्यावेळी सिडकोकडून आलेला नव्हता. केवळ सेवा सुविधा हस्तांतरित करून घेण्यात बाबत चर्चा झालेली होती. सिडाकेतील कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत हस्तांतरण करून घेण्यात येवू नये. हे करार पध्दतीवरील कर्मचारी आहेत याचा संबंध येत नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सिडकोमध्ये दान प्रकारचे कर्मचारी आहेत. कंत्राटी व सिडकोचे भरलेले . हा ठराव अपूर्ण आहे. सिडकोने जे कर्मचारी लावलेले असतील त्यांचा विचार केला जाईल अशी ठरावात दुरूस्ती करावी.

मा.महापौर : सिडको हस्तांतरणा नंतरच या कर्मचाऱ्यांचा विचार केला जाणार आहे.

श्री.प्रदिप जैस्वाल : हस्तांतरणाचा प्रश्नही आजच्या बैठकीत आहे शहराच्या विकास कामासंदर्भाने आजच्या बैठकीत जे प्रस्ताव आलेले आहेत ते प्रथम पारित करण्यात यावेत.

श्री.गिरजाराम हाळनोर :आजच्या बैठकीत सिडको हस्तांतरणाचा प्रश्नही आहे. त्यावेळी या प्रश्नावर चर्चा करण्यात यावी.

श्री.रशिद खान मामू :सिडकोच्या सेवा सुविधा महापालिकाकडे येत नाहीत तोपर्यंत तेथील कर्मचाऱ्यांना महापिालकेत सामावून घेण्यात येवू नये अशी ठरावात दुरूस्ती करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :सिडकोत केवळ ३२ कर्मचारी कार्यरत नसून ३०० - ३५० कर्मचारी कार्यरत आहेत. सर्वांचाच एकत्रितपणे विचार स्वच्छतेसाठी कर्मचारी लागणारच आहेत.

श्री.गौतम खरात :मागील सर्वसाधारण सभेतील इतिवृत्ताचे पृष्ठ क्र.१६ विषय क्र.८३/३ मी. म.न.सोनार मुख्य लेखा परिक्षक यांना महापिालकेत कायम स्वरूपी सामावून घेण्याबाबत हा ठराव होता. त्यांना तीन वर्षासाठी प्रतिनियुक्ती वर ठेवण्यांत यावे. त्यांना कायम समाविष्ठ करून घेण्यात येवू नये.

श्री.गिरजाराम हाळनोर :त्यांना महापालिका सेवेत मर्च करून घेण्याचा ठराव आपण मान्य केलेला ओ. प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढवून देण्याचा प्रश्न येत नाही. त्यांना महापिालका सेवेत मर्ज केल्याने ते रिटायरमेंट पर्यंत येथेच राहतील.

श्री.मुश्ताक अहमद : मंजुर ठरावात आता दुरूस्ती करता येणार नाही.

सौ.लता दलाल : हा ठराव मंजूर करण्यात यावा त्यांना किती काळ महापालिकेमध्ये ठेवावयांचे हे शासन ठरवेल.

श्री.गौतम लांडगे : इतिवृत्त पान क्र.४ विषय क्र.६९/१ मध्ये अ.क्र.१ व २ मधील दुरूस्ती रदद् करून मुळ ठराव कायम करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :श्री.सोनार यांचा डेप्युटेशनचा कार्यकाळ ४ वर्षाचा झालेला आहे. त्यांना यापुढे महापालिका सेवेत ठेवावयाचे असेल तर त्यांना कर्ज करावे लागेल. अन्यथा परत शासनाकडे पाठवावे लागेल.

सौ.लता दलाल : एखादा पारीत झालेल्या ठरावात दुरूस्ती करता येवू शकते मागचे मंजूर झालेल्या ठरावाची अंमलबजावणी पुढील येणारी सर्वसाधारण सभा करू शकते.

श्री.नरेंद्र पाटील : ठरावात दुरूस्ती करता येणार नाही. त्यांना महापालिका सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्यात यावे.

मा.महापौर : सिडको हस्तांतरण महापालिकाकडे झाल्यानंतरच तेथील कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेत सामावून घेण्याचा विचार करावा असे मुळ ठरावात म्हटलेले आहे. मुख्य लेखा परिक्षक यांना महापालिका सेवेत सेवानिवृत्त पर्यंत सामावून घेण्याचा ठराव एकदा परित झालेला आहे. त्यांना महापिालका सेवेत मर्ज करून घेण्याची अनुमती देण्यांत येते व ठराव जशाचा तसा कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येते विषय क्र.६९/१ मध्ये अ.क्र.१ व २ दुरूस्ती रदद् करून मुळ ठराव कायम करण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच शासनाची मंजुरी मिळेल या अपेक्षेवर सेवा ज्येष्ठता व महानगरपालिकेचे सेवाभरती नियम विचारात घेवून मा.आयुक्त , महानबरपालिका यांचे अधिकारात कार्यकारी अभियता (ड्रेनेज व विद्युत) पदाचा कार्यभार पात्र उप अभियंत्याकडे त्वरीत सोपविण्यात यावा यामुळे जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यास मदत होईल. तसेच ठराव क्र.७५/७ मध्ये संगणक प्रशिक्षणासाठी सॉफटटेक कॉम्प्युटर , औरंगाबाद यांना प्राधान्य देण्यात यावे.

श्री.अफसर खॉंन : ठराव क्र.८२/२ मध्ये श्री.जावेद रज्जाक यांच्या एका पाल्यास नोकरी देण्यांचा ठराव मंजुर झाला आहे. त्यात परमनंट नौकरी देण्यात यावी अशी दुरूस्ती करावी.

मा.महापौर : वरील प्रमाणे दुरूस्ती करण्यास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक २५-११-१९९९ च्या इतिवृत्तातील १) ठराव क्र.६९/१ मध्ये अ.क्र.१ व २ अन्वये करण्यात आलेली दुरूस्ती रदद् करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते व दिनांक १९-६-९९ रोजी मंजुर झालेला मुळ ठराव क्र.५९/५ कायम करण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच कार्यकारी अभियता (ड्रेनेज व विद्युत ) या पदाचा कार्यभार शासनाची मंजुरी मिळेल या अपेक्षेवर मा. आयुक्त यांचे अधिकारात म.न.पा. सेवा भरती नियमानुसार पात्र उप-अभियता त्वरीत सोपविण्यात यावा.

२) ठराव क्र.८२/२ मध्ये श्री.रज्जाक यांचे एका पाल्यास महापालिकेत कायम स्वरूपी नोकरी देण्यांत यावी अशी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते . दिनांक २५-११-९९ च्या इतिवृत्तातील वरील दुरूस्ती सह दिनांक ३०-१०-९९ ची विशेष सर्वसाधारण सभा २०-११-९९ ची तहकुब आणि दिनांक २५-११-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.८६/२** :

मा.शहर अभियता यांनी प्रस्ताव सादर केला कि, जाफरगेट येथे ए.पी.एम.सी.कार्यालयासमोर संपादित केलेल्या जागेवर व्यापारी संकुल बांधणे व विभाग क्र.८ साठी नविन कार्यालयीन इमारत बांधणे करिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९८-९९ चे जिल्हादर सुचीनुसार रक्कम रू. ४८,९०,२९९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील प्रस्तावास मा. आयुक्त महोदय यांची मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदरील प्रस्तावात तळमजल्यावर दुकाने बांधण्यात येतील तर पहिल्या मजल्यावर झ ोन क्र.८ करीता कार्यालयीन इमारत व आरोग्य केंद्र बांधण्याचे कामाचा समावेश आहे.

सदरील कामाचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत सन ९९-२००० मध्ये रक्कम रू. ४८,९०,२९९/- पैकी फक्त रक्कम रू.१०,००,०००/- इतका खर्च होईल व उर्वरित रक्कम रू.३८,९०,२९९/- रूपये पुढील म्हणजेच २०००-२००१ या आर्थिक वर्षा अंतर्गत करण्यांत येईल.

करता रक्कम रूपये रू. ४८,९०,२९९/-चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.नरेंद्र पाटील :प्रस्तावानुसार कार्यालय पहिल्या मजल्यावर व दुकाने तळमजल्यावर दाखवली आहे व दवाखाना दुसऱ्या मजल्यावर दर्शविला आहे . या कामात अंडर ग्राऊंड असेल तर अंडर ग्राऊंड मध्ये कार्यालय व त्यावर वरच्या मजल्यावर दुकाने ठेवावीत त्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदाच होईल.

मा.महापौर : स.श्री.नरेंद्र पाटील यांनी मांडलेल्या सुचनांचा विचकार स्विकृत करून स्विकृतीसह विषय क्र.२ मंजुर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट येथील ए.पी.एम.सी.कार्यालयासमोरील संपादित जागेवर व्यापारी संकुल व विभाग क्र.८ साठी कार्यालयीन बांधण्याच्या कामासाठी रक्कम रू. रू. ४८,९०,२९९/-च्या अंदाजपत्रकास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८९/३** :

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत सन १९९९-२००० च्या उन्हाळया करीता नागरी क्षेत्रास पाणी टंचाई निवारणार्थ तातडीच्या योजनेचे प्रस्ताव मागीतले आहे. या योजने अंतर्गत महानगरपालिकेला रूपये २५.०० लाखा पर्यंत शासकीय अनुदान मिळू शकते यात विंधन विहिरी खोदणे हातपंप बसविणे, विद्युत पंप बसविणे, पाईप लाईन टाकणे इत्यादी कामाचा समावेश आहे.

या वर्षी औरंगाबाद शहर व परिसरात कमी प्रमाणात पाऊस झालेला आहे तसेच ओरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांच्या वस्त्यांची दिवसेंदिवस झपाटयाने वाढ होत आहे. काही नविन वस्त्यांना नळाद्वारे पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही तसेच काही भागात नळाद्वारे कमी प्रमाणात पाणीपुरवठा होतो. अशा भागात या योजने अंतर्गत विंधण विहिरी खोदून हातपंप बसविणे योग्य होईल शहर व सिडको भागात एकूण ८५ विंधन विहिरी खोदून त्यावर हातपंप बसविण्याच्या कामासाठी जी.एस.डी.ए. च्या दराने खालील प्रमाणे खर्च येतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | स्थळ निश्चितीसाठी तपासणी शुल्क | - | ८५,०००/- |
| २ | विंधन विहिरी खोदून त्यावर हातपंप बसविणे | - | २३,१७,५२५/- |
| | **एकूण रूपये** | **-** | **२४,०२,५२५/-** |

वरील प्रमाणे प्रस्तावति योजनेसाठी रू. २४,०२,५२५/- खर्च येत असून पैकी १०% खर्च महापिालकेस लोकवर्गणीतुन करावा लागेल. स्थळ निश्चितीसाठी तपासणी शुल्क रक्कम रूपये ८५,०००/- भुजल सर्व्हे विकास यंत्रणा विभागास अदा करावी लागेल.

तरी शासनाच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत प्रस्तावित योजनेसाठी रूपये २४,०२,५२५/- च्या अंदाजपत्रकीय मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.गिरजाराम हाळनोर : ८५ विहिरीसाठी २३.१७ लाख रूपये खर्च दर्शविलेला आहे. बोअरवेल खोदण्यासाठी व हातपंप बसविण्यासाठी किती खर्च येणार आहे याची माहिती देण्यांत यावी.

कार्यकारी अभियता : शहरात ८५विंधन विहीरी खोदण्यात येणार आहेत.त्यात स्थळ तपासणीसाठी प्रत्येक ठिकाणासाठी एक याप्रमाणे १०००/- खर्च येणार आहे. व बाकीचा खर्च हातपंप बसविण्यासाठी येणार आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर : खोदकामासाइी व हातपंपासाठी किती खर्च येणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

प्र.कार्य.अभियंता (पापु) : बोअर फिटींगसाठी १.१२ लाख, १५२ मी.मी.पाईपसाठी ३२००/- टेस्टसाठी ६५५/- रूपये इंडियन मेकटाईप पंपासाठी ७,२००/- ,क्राँकीटींगसाठी २२००/- रूपये इकरलेक्शन ऑफ हँडपपंसाठी ५००/- रूपये असे एकूण २३.१७लाख व एक विंधन विहिरीसाठी किरकोळ खर्च मिळून २८०००/- रूपये खर्च येणार आहे हा खर्च इन्हॉरमेंट डी.एस.आर.नुसार काढला आहे.

श्री.नरेंद्र पाटील: हापश्याच्या बाजूला संरक्षण भिंत बांधण्यात यावी त्यामुळे ते कोणास तोडता येणार नाहीत.

मा.महापौर : स.सदस्यांच्या विनंतीवरून हा ठराव घेण्यात आलेला आहे. मागील वर्षी काम केलेल्या उज्वल बोअरवेलस या एजन्सीकडून हे काम लवकरात लवकर करून घेण्यात यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : एस्टीमेंट मंजुर करून शॉर्ट टेंडर नोटीस काढण्यात यावी.

मा.महापौर : लवकरात लवकर काम करवून घेण्यात यावे प्रस्ताव विषय क्र.३ दुरूस्तीस सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे काही नवीन वस्त्यांना नळाचा पाणीपुरवठा करणे शक्य नाही, तसेच काही भागात काही प्रमाणात पाणी पुरवठा होतो अशा भागात प्रस्तावित योजनेनुसार शहर व सिडको भागात ८५ विंधन विहीरी खोदून त्यावर हातपंप बसविणेच्या कामासाठी जी.एस.दराने (स्थळ निश्चीती शुल्क रू.८५,०००/- व विंधन विहीर खोदून त्यावर हातपंप बसविणे रू. २३,१७,५२५/- रक्कम रूपये २४,०२,५२५/- च्या अंदाजपत्रकीय स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

कामाची तातडी लक्षात घेत उक्त काम मागील वर्षीच्या एजन्सीक डून हे काम करून घेण्यात आले त्याच एजन्सीकडून हे काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९०/४** :

मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे आदेशानुसार महानगरपालिकेतील जुने वाहने व यंत्रसामुग्री निलेखीत करण्यासाठी ऑक्शन कमिटी मार्फत वाहने व यंत्रसामुग्री

दिनांक २८/९/९९ रोजी तपासणी करण्यात आली सदरील कमिटी मध्ये निम्नलिखीत अधिकाऱ्यांचा समावेश होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उप अभियंता (यांत्रिकी) मेकॅनिकल | - | श्री.बी.बी.सव्हये,इमिटेशनडिपार्टमेंट डिव्हीजन गारखेडा, औरंगाबाद |
| २ | आर.टी.ओ.मोटार वाहन निरिक्षक,औरंगाबाद | - | श्री.एस.एम.खान |
| ३ | मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका,औरंगाबाद | - | श्री.म.न.सोनार |
| ४ | अतिरिक्त शहर अभियता महानगरपालिका औरंगाबाद | - | श्री.सी.एस.सोनी |

ज्या वाहनांचे आयुष्य १० वर्षापेक्षा जास्त किंवा २० लाख कि.मी.पेक्षा जास्त चालली किंवा वाहनांची सध्या स्थिती पाहता कमिटीने निम्नलिखीत वाहने यंत्रसामुग्री जुने भंगार ऑईल यांची तपासणी करून ती निर्लेखित करण्याबाबत शिफारस केली आहे. तसेच त्यांची घसारा किंमत काढून ती बंद लिफाफयात सिलबंद करून ठेवली आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | मॉडेल |
|---|---|---|---|
| १ | एम.एक्स.व्ही/१७९ | ॲम्बेसिडर कार | १९७९ |
| २ | एम.व्ही.जी./८८९० | ॲम्बेसिडर कार | १९८८ |
| | एम.व्ही.जी./८९९० | ॲम्बेसिडर कार | १९८८ |
| | एम.एच.२०/८२२२ | ॲम्बेसिडर कार | १९८९ |
| | एम.एच.२०/ई २०० | ॲम्बेसिडर कार | १९९२ |
| | एम.एच.२०/ई ९९९१ | ॲम्बेसिडर कार | १९९२ |
| | एम.ए.ए.१०५ | महिंद्र जिप बंद बॉडी | १९८५ |
| | एम.एच.२०/ए- ३८६८ | मिनिबस | १९०३ |
| | एम.डब्ल्यु.पी./१५०७ | मॅटेडोर बजाज | १९८३ |
| | एम.एक्स.व्ही /५२६६ | ट्रॅक्टर (इंटरनॅशनल) | १९८२ |
| | एम.टी.बी./४१४८ | ट्रॉली (फोरव्हील) | १९८० |
| | एम.डब्ल्यु.पी./५८५ | ट्रॉली (टँकर) | १९८२ |
| | जुने निरूपयोगी १९८ विविध आकाराचे टायर्स व दोन नविन निरूपयोगी टायर्स | | |
| | जुने भंगार स्पेअरपार्टस् अंदाजे वजन ४५ टन | | |
| | जुने जळालेले ऑईल (४२ बॅरल) | | |
| | अस्पाल्ट मिक्झर (१ नग) | | |

जुनी वाहने व यंत्रसामुग्री तसेच भंगार निर्लेखित करण्यासाठी मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे जरूरी आहे.

तरी वरील प्रमाणे अ.क्र.१ ते १६ मधील सर्व वाहने व यंत्रसामुग्री निर्लेखित करण्यास मंजुरी मिळावी .

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.नरेंद्र पाटील: वाहनांचा लिलाव योग्य पध्दतीने व्हावा यापूर्वी खराब झालेल्या गाडया जवळच्या लोकांना विकल्या गेल्या आहे आहेत विक्री लिलाव पध्दतीने व्हावी.

श्री.अफसर खान : या गाडया कश्या प्रकारे विकणार याचा खुलासा व्हावयाला हवा. पूर्वीच्या लिलावातील काही गाडया अधिकाऱ्यांनी आपल्याकडे ठेवून घेतल्या आहेत.

श्री.गजानन बारवाल : आपल्याकडे अनेकही गाडया खराब आहेत. त्यांचीही विक्री करण्यांत यावी.

श्री.प्रदिप जैस्वाल : दहा वर्ष झाले की गाडया विकल्या जातात. गाडया हर्रास करतांना त्यावेळी कमेटीत कोणकोण होते.

श्री.स.अली. मिरा सलामी : या प्रस्तावात एक गाडी १९७९ ची व एक गाडी १९९२ ची आहे १९९२ ची गाडी लिलाव करण्याचे कारण काय ?

अति.शहर अभियंता : या गाडया निर्लेखित करण्याबाबत समितीकडे शिफारस केलेली आहे.ज्या गाडयांवर मेंन्टेनन्स खर्च जास्त येत आहे व ज्या पूर्णपणे वापरात येत नाहीत त्यांचे ऑक्शन करण्यात येणार आहे. यासाठी एक कमेटी स्थापलेली होती त्या कमेटीने सदरची वाहने निर्लेखित करण्याबाबात अहवाल दिलेला आहे. सोल्ड टेंडर मागवून ते कमेटीपुढे उघडले जातील. गाडयांच्या विक्रीसाठी आपण त्यांची किंमत निश्चित केलेली आहे त्यापेक्ष जास्त किंमत आली तरच गाडया विकल्या जातील.

श्री.गौतम लांडगे : सील्ड टेंडर ऐवजी ओपन हर्रासी करण्यत यावी.

श्री.प्रदिप जैस्वाल : हर्रासी करत असतांना कोणकोण अधिकारी उपस्थित राहतील. अपेक्षित किंमतीपेक्षा जास्त किंमत आली तरच गाडया विकण्यात याव्यात कमेटीत आर.टी.ओ कार्यालयात अधिकारी यांचाही समावेश असावा.

श्री.अफसर खान :ओपन ऑक्शनमुळे महापालिकेचा फायदाच होईल.

श्री.नरेंद्र पाटील : तेव्हा ओप ऑक्शन करण्यांत यावे.

अति.शहर अभियता : हर्रासीच्या वेळेस मुख्य लेख परिक्षक, अति. शहर अभियता, उप अभियता (यांत्रिकी) राहतील, आपेन हर्रासी ठरविली तर त्यात पदाधिकाऱ्यांचाही समावेश करता येईल.

श्री.प्रदिप जैस्वाल : ओपन हर्रासी करावायाची असेल तर त्या ठिकाणी स्थायी समितीचे दोन सदस्य उपस्थित असावयास पाहिजेत ही कायदयातच तरतुद आहे.

मा.महापौर : वाहनांची हर्रासी ओपन पध्दतीने करण्यांत यावी या शिफारसीसह प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्या वाहनांचे आयुष्य १० वर्षापेक्षा जास्त किंवा दोन लाख कि.मी.पेक्षा जास्त रनिंग झाले किंवा वाहनाची सध्याची स्थिती पाहता प्रस्तावातील अ.क्र.१ ते १६ पर्यंतची वाहने आणि यंत्रसामुग्री , भंगार सॉईल इ.साहित्य ऑक्शन कमिटीच्या शिफारशीनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) अन्वये हर्रासी पध्दतीचा जाहिर लिलावाद्वारे ओपनपणे (बोली बोलण्याच्या पध्दतीने )निर्लेखित करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते .

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९१/५** :

अतिरिक्त शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील सिध्दार्थ जलतरण तलावासाठी जलतरण तलावाच्या इमारतीत १६"X ३८" फुटाचे दोन हॉल कॅंटीन करीता तयार करण्यांत आले होते. त्यानुसार येथे जलतरण तलाव सुरू झाल्यानंतर रितसर निविदा मागवून कॅंटीन सुरू करण्यात आली होती परंतू तेथे कॅंटीनसाठी पाहिजे तसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे संबंधित ठेकेदाराने कॅंटीन बंद केली व आजपावेतो ते बंद आवस्थेत आहे.

त्यामुळे कॅंटीनच्या हॉलचा सुध्दा काहीही उपयोग होत नाही तरी सदर कॅंटीन हॉलमध्ये हेल्थ क्लब (व्यायामशाळा) सुरू केल्यास हॉलचा नियमित उपयोग होईल व पावसाळयात जलतरण तलावाचे जे सभासद कमी होतात ते व्यायामाच्या निमित्ताने व्यायाम शाळेचे सभासद होतील व या व्यायाम शाळेस यजनतेचा चांगला प्रतिसाद राहील असे वाटते.

सदरील व्यायाम शाळा सुरू करण्यासाठी अंदाजे रक्कम रूपये ४.०० लाख इतका खर्च येणार आहेत. तरी सिध्दार्थ उद्या ान येथील सिध्दार्थ जलतरण तलाव येथील बंद कॅंटीनच्या जागी व्यायाम शाळा सुरू करणे बाबत दिनांक ४-१०-९७ रोजीच्या सर्व साधारण सभेच्या विषय क्र.९२/४ मध्ये ठरल्या प्रमाणे समिती नियुक्त करण्यांत आली होती त्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालात समितीचे सिध्दार्थ उद्या ान येथील सिध्दार्थ जलतरण तलावाच्या कॅंटीन हॉलमध्ये व्यायाम शाळा (हेल्थ क्लब) सुरू करणे बाबतचा प्रस्ताव मंजुर करणे योग्य राहील व याबाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यांत यावा. असा अहवाल दिला आहे. सोबत अहवाल जोडला आहे.

त्यानुसार सिध्दार्थ जलतरण तलाव येथील कॅंटीन हॉलमध्ये व्यायाम शाळा (हेल्थ क्लब) सुरू करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

## ( समिती अहवाल)

**विषय** : सिध्दार्थ जलतरण तलाव येथे व्यायामशाळा सुरू करणे बाबत.

**संदर्भ** : दिनांक ४/१०/९७ च्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.९२/४ अन्वय पारीत झालेला

**ठराव :**

उपरोक्त संदर्भिय सर्वसाधारण सभेत सिध्दार्थ जलतरण तलाव परिसरात कॅंटीन करीता असणाऱ्या १६"X३८" फुटाच्या दोन हॉलमध्ये व्यायाम शाळा (हेल्थ कल्ब) सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. या प्रस्तावाच्या चर्चे अंती मा. महापौर यांनी त्या धोरणात्मक बाबीचा निर्णय घेण्यासाठी एक समिती नेमावी असे ठरले होते. त्यात स. नगर सेवक श्री. नरेंद्र पाटील , श्री.सुदाम सोनवणे व श्री.फैय्याज कुरैशी यांनी याची सविस्तर पाहणी करून अहवाल सादर करावा असे ठरले त्यानुसार सिध्दार्थ जलतरण तलाव येथे जावून पाहणी केल्या अंती असे निर्दशनास आले की, कॅंटीन की, कॅंटीन करीता असणारे १६"X३८" फुटाचे दोन हॉल सध्या रिकामे आहेत व ते उपयोगात नाहीत त्यापैकी एका हॉल मध्ये सदर व्यायाम शाळा असावी तसेच सभासदांच्या दृष्टीकोनातून या ठिकाणीही व्यायाम शाळेतील साहित्य आणून ठेवल्यास सभासंदाना व्यायामाचा लाभ घेता येईल. तसेच

सभासद वर्गणीत वाढ होवून महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल तसेच उन्हाळी सत्रा व्यतिरिक्त बाकीचे आठ महिने देखील सभासद नियमितपणे राहतील.

तसेच सदरील व्यायाम शाळा सुरू झाल्यास देखरेखी करीता नवीन कर्मचारी नेमणूक करणे ऐवजी सध्या कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी एखादा सक्षम कर्मचारी व्यायाम शाळेची देखरेख करू शकतो त्यामुळे येथे नवीन कर्मचारी नेमण्याचा अतिरिक्त बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही.

महानगरपालिका तर्फे चालवण्यात येणारा सिध्दार्थ जलतरण तलाव हा सध्या अतिशय स्वच्छ व गेल्या चार वर्षात कोणतीही अघटीत व जीवीत हानी न होता व्यवस्थीत चालू आहे. तरी सभासदांच्या मागणी प्रमाणे येथील व्यायाम शाळेचा प्रस्ताव मंजूर करणे योग्य वाटते.

तसेच वरील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीकरीता सर्व साधारण सभेसमोर सादर.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत /- | स्वाक्षरीत /- | स्वाक्षरीत /- |
| श्री.सुदाम सोनवणे | श्री.फैय्याज कुरैशी | श्री.नरेंद्र पाटील |

**संवाद :**

श्री.रशिद खान मामू : यासाठी लेडीज व जेंटस् अशा टायमिंग ठरवण्याबाबात एकात लेडीजसाठी वेगळा हॉल ठेवण्यात यावा.

श्री.मोहसिन अहमद : मशिनरीजची साईज पाहता हॉलची रूंदी कमी आहे . रूंदी वाढवावयास पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : कँटीन आपण स्वत:च चालवावी.

श्री.नरेंद्र पाटील : १६"X१८" फुटाचा हॉल छोटा होईल. याची रूंदी वाढविण्यांत यावी.

श्री.हमीद ताबा : कोणकोणत्या प्रयकरच्या मशिन आपण तेथे ठेवणार याचा खुलासा करावा.

मा.महापौर : दुरूस्तीसह प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील जलतरण तलाव येथील बंद कॅन्टीनच्या जागी माहिलांसाठी एक आणि पुरूषांसाठी एक याप्रमाणे व्यायामशाळा (हेल्थक्लब ) सुरू करण्यास रक्कम रूपये ३,००,०००/-च्या खर्चासह सर्वांनुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

सिध्दार्थ जलतरण तलाव येथे सुरू करण्यात येणाऱ्या व्यायाम शाळेसाठी महिला व पुरूषाकरीता वेगवेगळी वेळ ठेवण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हवी.

**विषय क्र.९२/६** :

शहर अभियता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थानिक विकास कार्यक्रम ९९-२००० अंतर्गत मा.आमदार श्री.शालीग्रामजी बसैय्ये बंधु यांचे निधीतून शहरात खालील ठिकाणी सभागृह बांधण्यात येणार आहेत. सदरील सभागृहास पुढील प्रमाणे नांव देण्यास मा. आमदार श्री.शालीग्रामजी बसैय्ये बंधु यांनी सुचविले आहेत सदरील प्रस्तावाच्या

अंदाजपत्रकास मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडून आदेश क्र.५६५ दिनांक ८-११-९९ रोजी मान्यता दिल्या बाबतचे कळविण्यांत आले आहे. सभागृहास नांवे देण्याबाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याबाबत मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ८-११-९९ अन्वये आदेशित केलेले आहे.

१. छत्रपतीनगर गारखेडा परिसर सभागृह :- वसंतराव भागवत सभागृह
२. मित्रनगर उद्यान मनपा आकाशवाणी :- रामभाऊ म्हाळणी सभागृह
३. वार्ड क्र.५८,कोटला कॉलनी वाचनालय :- प्रल्हादजी अभ्यंकर वाचनालय

यानुसार सभागृहास नांव देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद:**

या कामासाठी आमदार निधीतून पैसा खर्च होणार असला तरी तो पैसा शासकीय आहे. त्या लोकांच्या औरंगाबाद शहरासाठी संबंध नाही त्यांची नांवे कशासाठी द्यावयाची कामाची सुरवात होण्यापुर्वीचे असे प्रस्ताव कशासाठी ज्याचा या शहरासाठी संबंध आहे त्यांची नांवे देण्यास विरोध नाही अभ्यंकर यांचे नांव देण्यास आमचा विरोध नाही अशा प्रकारचा आम्ही निषेध करतो.

श्री.संजय जोशी : भाजपाच्या एका आमदाराने पैसा दिला म्हणून या नावाना विरोध करण्यांत येत आहे काय ?

श्री.काशिनाथ कोकाटे : श्री.संजय जोशी यांच्या म्हणण्यास आमचा आक्षेप आहे आम्ही आमच्या वॉर्डात कोणतही नांव दिलेली नाहीत.

श्री.रशिद खॉन (मामू) : विकास कामांचा पैसा शासनाचा आहे. महानगरपालिकेने बांधलेल्या इमारतींना अशी नांवे देण्यांत येतात.

मा.महापौर : प्रस्ताव सर्वानुंमते मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. आमदार श्री.शालीग्राम बसैय्ये यांच्याकडील निधीतून प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ प्रमाणे बांधण्यात येणाऱ्या सभागृहांना त्यांच्या समोर दर्शविल्याप्रमाणे नांव देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९३/७ :**

मा. मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे दिनांक ५/११/९९ रोजी मा. महापौर यांच्या दालनात संघटना पदाधिकारी तसेच महानगरपालिकेतील पदाधिकारी व कर्मचाऱ्यांशी मा. आयुक्तांच्या उपस्थितीत महानगरपालका कर्मचाऱ्यांना सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात सन १९९८-९९ या वर्षा करीताचे बोनस देणे करीता सविस्तर चर्चा व विचार विनिमय होवून पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१ सन ९८-९९ या वर्षाचा तदर्थ बोनस हा कर्मचाऱ्यांना ३१-३-९९ रोजीच्या प्रत्यक्ष वित्तलब्धीच्या आधारे परिगणीत करण्यात येईल तथापि बोनस वित्तलब्धीची कमाल मर्यादा रू.२४१९/- इतकी राहील. असुधारित किंवा सुधारित यापैकी कोणत्याही वेतन श्रेणी मध्ये घेतली असेल तरीही लागू राहील.

२ जे कर्मचारी ३१-३९९ रोजी सेवेत होते व ज्यांची १९९८-९९ या आर्थिक वर्षात किमान सहा महिने सलग सेवा असेल अशा पात्र कर्मचाऱ्यांना बोनस देण्यांत येईल

तसेच पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना एका वर्षामध्ये सहा महिन्यापासून पूर्ण वर्षापर्यंत केलेल्या सलग सेवेचा कालावधीसाठी तथा प्रमाण बोनसची रक्कम अनुज्ञेय राहील. पात्र कालावधी हा सेवेच्या सहा महिन्याचे संख्येनुसार मोजण्यात यावेत ही संख्या जवळच्या महिन्याशी पुर्णाकिंत करण्यांत येईल

३ दैनिक वेतन कर्मचारी , ठराविक वेतन, बालवाडी शिक्षिका सेविका यांना पण दिवाळी भेट म्हणून रू.१०००/- (एक हजार फक्त) प्रत्येकी देण्यांत येईल. तथापि ३१-१०-९८ रोजी सदर कर्मचारी सेवेत होते व त्यांची सेवा ३१-१०-९८ रोजी सदर कर्मचारी सेवेत होते व त्यांची सेवा ३१-१०-९८ रोजी १८० दिवस पूर्ण झाली असावी अशा कर्मचाऱ्यांना ही भेट देण्यांत येईल.

४ ३० दिवसाचा बोनसची परिगणना

वित्तलब्धी x ३०

३१ या सुत्रानुसार

२५०० x ३०

३१ = २४१९/- ही राहील व बनेसची रक्कम दिनांक ६-११-९९ रोजी वाटप करण्यात यावी.

५ तसेच कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेअ/७५९/९८ दिनांक १५-१०-९९ अन्वये महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सन १९९७-९८ चा वर्षाकरीताचे सन ९८-९९ या वर्षात एकूण ३६ दिवसाचा बोनस देण्यांत आलेला होता. या आदेशात नमुद केल्या प्रमाणे वाढीव सहा दिवसाचा बोनस देण्याबाबत शासन मंजुरी प्राप्त झाली नसल्यामुळे १९९८-९८ साठीचा जो वाढील सहा दिवसाचा बोनस दिलेला आहे. त्याची वसुली कर्मचाऱ्यांच्या माहे नोव्हेंबर ९९ महिन्याच्या वेतनातून वसुल करण्यांत यावे.

उपरोक्त नुसार बोनस वाटपास अंदाजे ९६.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे तरी प्रस्तावास कार्योत्तर मंजुरीस सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ५-११-१९९९ च्या चर्चे नुसार

१ महानगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांना (सुधारित अथवा असुधारित वेतनश्रेणी घेतलेल्या ) दिनांक ३१-३-१९९९ च्या प्रत्यक्ष वित्तलब्धीच्या आधारे परिगणित करण्यात आल्या प्रमाणे रूपये २४१९/- या प्रमाणे तदर्थ बोनस वाटप करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

२ जे कर्मचारी दिनांक ३१-३-१९९९ रोजी सेवेत होते व ज्यांनी सन १९९८-९९ आर्थिक वर्षात किमान महिने सलग सेवा केली असेल अशा कर्मचाऱ्यांना सहा महिन्याचे संख्येनुसार पात्रता कालावधी मोजण्यात येवून प्रमाण बोनसची रक्कम अनुज्ञेय करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

३ महानगरपालिकेच्या कार्यालयात दिनांक ३१-१०-१९९९ रोजी महानगरपालिका सेवेत असलेले व दिनांक ३१-१०-१९९८ रोजी १८० दिवस सेवा पूर्ण झालेल्या दैनिक वेतन, ठराविक वेतन व बालवाडी शिक्षिका ,सेविका कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रूपये १०००/- याप्रमाणे दिवाळी भेट देण्यास तसेच त्यासाठी अंदाजे एकूण रकक्म रू.९६ लाखाच्या अपेक्षित खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

४ कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेअ/७५९/९८ दिनांक १५-१०-९८ अन्वये सन १९९८-९९ यावर्षात महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी वाटप करण्यांत आलेले ३६ दिवसांपैकी

वाढीव सहा दिवसाचा बोनस वाटप करण्यास शासनाची मंजुरी न झाल्याने वाढीव सहा दिवसाचा वाटप केलेल्या बोनसची रक्कम महानगरपालिका कर्मचाऱ्यांकडून माहे नोव्हेंबर १९९९ च्या वेतनातून वसुल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

सदर प्रस्तावात याच सभेत सर्वानुमते स्विकृतीसह कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९४/८ :**

मा.उपसंचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्र.२३३ भाजी मार्केट व प्रारूप विकास योजनेनुसार आरक्षण क्र.११५ भाजी मार्केट व शॉपिंग सेंटर या आरक्षणाने बाधीत होणाऱ्या नगर भूमापन क्र.१०७५ चे मिळकत धारक

१. श्रीमती कमलाबाई केशवराव कबडकर व इतर सहा यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ ५१०.६० चौ.मी.असून संपूर्ण मिळकत सदर आरक्षणाने बाधीत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना असल्याने सहा महिन्यात जमिन भूसंपादन प्रस्ताव मा जिल्हाध्किारी यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. सहा महिन्यात कार्यवाही झाली नाहीतर सदर मिळकत आरक्षणातून वगळली जाते.

करिता आरक्षणाने बाधीत होणारे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार भुसंपादन करणे भूसंपादनास लागणाऱ्या खर्चासह प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**टराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. २३३ भाजी मार्केट व प्रारूप विकास योजनेनुसार आरक्षण क्र.११५ भाजी मार्केट व शॉपिंगसेंटर या आरक्षणाने बाधीत होणाऱ्या नगर भूमापन क्र.१४७५ या मिळकतीचे ५१०.६० चौ.मी.क्षेत्र मुंबई प्रांतिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करण्यांस व भूसंपादनास लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९५/६** :

उप संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नगर भूक्रमांक ६४०८ ही मिळकत क्षेत्र सुमारे ४०.५० चौ.मी. औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार ५० फुट रूंद रस्ता कामाक्षी लॉज ते लोटाकारंजा या रस्त्याने भागश: बाधीत आहे. सदर मिळकतीतून मुख्य रस्त्यालगत २२.६२ चौ.मी. क्षेत्र श्री.अब्दुल मजीद पिता अब्दुल वहाब यांनी खरेदीखत क्र.३१६२ दिनांक १५-६-६२ अन्वये खरेदी केले असून यासाठी संबंधिताने महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार खरेदी सूचना दिलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी सहा महिन्यात कार्यवाही होवून भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाध्किारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे अन्यथा सदर मिळकत ही आरक्षणातून वगळली जाते.

तसेच कामाक्षी लॉज ते लोटाकारंजा चौकापर्यंत एकूण १० मिळकती रस्तयाने बाधीत असून पैकी सहा मिळकती महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या आहेत व चार चार मिळकतीची भूसंपादन कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत सुरू आहे. करिता कामाक्षी लॉज ते चेलीपूरा चौक या रस्त्याने बाधीत (उर्वरित ) मिळकतीचे भूसंपादन केल्यास हा रस्ता पूर्ण विकसीत होवून सलग रोषनगेट पर्यंत दुहेरी रस्ता म्हणून वापर करणे शक्य होईल. करीता मंजूर विकास योजने नूसार ५० फुट रूंद रस्ता (१५ मी.) रस्ता कामाक्षी लॉज ते चेलीपूरा चौक या रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव भूंसंपादनास लागणाऱ्या खर्चासह मंजूरीस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे कामाक्षी लॉज ते लोटाकारंजा या रस्त्याने बाधीत होणाऱ्या नगर भूमापन क्रमांक ६४०८ या मिळकतीपैकी मुख्य रस्त्यालगतचे श्री. अ.मजीद पिता अ.तहाब यांचे मालकीचे आणि २२.६२ चौ.मी. क्षेत्र उक्त रस्त्याने बाधीत होणाऱ्या एकूण १० मिळकतीपैकी सहा मिळकतीस महानगरपार्लिकेने ताब्यात घेतलेल्या असल्याने उर्वरित चार मिळकतीचा ताबा घेतल्याने हा रस्ता पूर्ण विकसीत होवून दुहेरी वापर व शक्य असल्याने या ५०" रूंद रस्त्याचे बाधीत मिळकती चे भूसंपादन करण्यास व भूसंपादनास लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९६/१०** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये महानगरपालिकेच्या अस्थापनेवर मंजूर झालेले कर निर्धारक व संकलक पद भरण्या संबंधिाने व पदास आवश्यक असणारी विहित शैक्षणिक पात्रता निश्चित करण्यासाठी सर्व साधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार सदत्व पद उप आयुक्त पदास समकक्ष असल्याने उपआयुक्त या पदासाठी जी शैक्षणिक पात्रता व आर्हता विहित केलेली आहे तीच या पदासाठी निश्चित करण्याच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.अफसर खान : आकृतीबंधात हे पद आहे काय ?

श्री.महादेव सुर्यवंशी : हे पद निर्माण करण्याचा उद्येश काय ? या पदाची कार्यपध्दती कशी राहील. प्रशासनाने या पदाबाबत इतर महानगरपिालकांचा अभ्यास केला आहे काय ? या पदामुळे मनपाच्या कारभारात काय सुधारण होणार आहे ? या पदावर तांत्रिक की अंतांत्रिक अधिकारी ठेवणार याचा खुलासा व्हावा. हे पद भरण्यासाठी कोणती पध्दत अवलंबविणार .

श्री.संजय जाशी : हा ठराव मान्यतेसाठी परत सभागृहापुढे का आला. यापूर्वीच हा ठराव मान्य झालेला आहे त्यास शासनाची मंजूरीही मिळालेली आहे.

मा.प्र.आयुक्त : मान्यता करावी, प्रभावी वसुली व्हावी यासाठी कर निर्धारक पदास मंजुरी मिळालेली आहे या प्रस्तावास शासनाची मंजुरी मिळालेली आहे. परंतु या पदाची शैक्षणिक पात्रता ठरविलेली नाही. या पदास उपआयुक्त पदासाठी समकक्ष वेतनश्रेणी राहणार आहे. उप आयुक्त पदासाठी जी शैक्षणिक पात्रता आहे तीच पात्रता या पदासाठीही असावी असा हा प्रस्ताव आहे.

श्री.संजय जोशी : शैक्षणिक पात्रता न ठेवताच अर्धवट ठराव शासनाकडे मंजुरीसाठी का पाठविण्यात आला.

सौ.लता दलाल : शासनाकडे प्रस्ताव पाठवतांना परिपूर्ण का पाठवला गेला नाही.

श्री.गौतम खरात : हे पद प्रशासकीय असावे. इतर महानगरपालिकांची माहिती घेण्यात यावी.

श्री.संजय जोशी : सध्या महानगरपालिकेत २ उप आयुक्त आहेत एका पदाकडे प्रशासन व एका पदाकडे महसुल आहे एका पदाकडून महसुल काढून घेतल्यानंतर त्यांच्याकडे काय काम राहील.

श्री.घडामोडे भगवान : ठराव मंजुर करण्यास हरकत नाही.

मा.महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो. प्रशासनाने कार्यवाही करावी हे पद नामनिर्देशनाने भरण्यात यावे.

**ठराव :**

प्रसतावात दर्शविल्याप्रमाणे उप आयुक्त या पदासाठी विहित करण्यांत आलेली शैक्षणिक पात्रता व अर्हता ही कर निर्धारक व संकलक या पदासाठी निश्चित करून सदर पद निमनिर्देशनाने भरण्यात यावे या दुरूस्ती महापालिका आस्थापनेवरील कर निर्धारक व संकलक हे पद भरण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.९७/११** :

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्तावीत केले आहे की, आरोग्य विभागात शासनाच्या संवर्गाप्रमाणे आरोग्य निरिक्षकांची पदे निर्माण करणे जरूरी आहे. त्यामुळे आरोग्य कर्मचारी (एम.पी.डब्ल्यु) यांना पदोन्नतीचा मार्ग राहील त्यासाठी महानगरपिलकेच्या यआस्थापनेवर सात (०७) आरोग्य निरिक्षक पदे खालील अटीवर निर्माण करावयाची आहे.

१ सदर पदाची कार्य आरोग्य विभागातील आरोग्य सेवेवर नियंत्रण ठेवणे, तसेच एम.पी.डब्ल्यु. यांचे कार्यावर पर्यवेक्षण करणे हे राहील.

२ सदर पदे वेतनश्रेणी रूपये १४००-२३०० मध्ये निर्माण करणे आहे (स्वच्छता निरिक्षक समतुल्य वेतनामध्ये )

३ सदरील पदे ही मनपा आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या आरोग्य विषयक सेवा देणाऱ्या उदा.कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन इ. एम.पी.डल्ब्यु मधून पात्रतेनुसार खुल्या पदोन्नती साकळी नुसार पदोन्नतीने भरण्यात येईल.

४ कामाचे स्वरूप वेगळे असल्यामुळे आरोग्य निरिक्षक व स्वच्छता निरिक्षक यांचेत परस्पर संबंध राहणार नाही. तसेच त्यांच्या बदल्याही होणार नाही.

करिता "आरोग्य निरिक्षक " ची सात (०७) पदे वेतनश्रेणी रूपये १४००-२३०० मध्ये निश्चित करणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.हमीद ताबा : माझ्या माहितीनुसार हा ठराव पूर्वी आलेला होता त्यावेळी स्थगित केला होता.

सौ लता दलाल : एम.पी.डब्ल्यु. आरोग्य विभागात काम करतात कि मलेरिया या ठरावास यापूर्वी मंजुरी दिली होती काय ?

सहा.आयुक्त : एम.पी.डब्ल्यु. मधून ही पदे भरण्यात येणार आहेत. ती पदे पदोन्नतीने भरली जातील.

श्री. रशिद मामू, श्री.हमीद ताबा : सहा.आयुक्त -१ यांचा खुलासा असमाधानकारक आहे ही सभागृहाची दिशाभुल आहे.

मा.प्र.आयुक्त : महानगरपालिकेमध्ये मागील १२-१५ वर्षापासून एम.पी.डब्ल्यु कार्यरत आहेत पदनाम बदलण्याचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे मंजुरीस्तव येतात या पदावरील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी नाही. शासनाने त्यांच्या अस्थापनेवर केलेले तरतुदीनुसार ही पदे भरली जातील.

श्री.हमीद ताबा : दोन वर्षापुर्वीच हा ठराव पास झालेला आहे परत हा ठराव कशासाठी आला.

मा.महापौर : हा ठराव पुर्वी स्थायी समितीसमोर गेला होता. सर्वसाधारण सभेकडे आला नव्हता.

श्री.प्रदिप जैस्वाल : प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर येण्यासाठी दोन वर्षे का लागली.

मा.प्र.आयुक्त : प्रशासनाचे एवढेच मत आहे की हा प्रस्ताव पदनाम बदलण्याचा आहे त्यामुळे तो सर्वसाधारण सभेसमोर आला आहे.

श्री.मीरा सलामी : महानगरपालिका कर्मचाऱ्यामधून ही पदे भरण्यात यावीत बाहेरून उमेदवार घेण्यात येवू नये.

मा.महापौर : आयुक्तांनी खुलासा केल्यानुसारच महानगरपालिका कर्मचाऱ्यांमधूनच ही पदे भरली जावीत . ही पदे भरल्याने कार्यरत क र्मचाऱ्यांच्या वेतनात काही वाद होणार नाही किंवा महानगरपिालका आस्थापनेवर खर्च वाढणार नाही.

श्री.मोहसिन अहमद : सात लोकांना पदोन्नती दिल्यानंतर रिक्त झालेली सात पदे कशी भरणार.

मुख्य लेखाधिकारी : आरोग्य निरिक्षकांच्या पदनिर्मितीचा हा ठराव आहे. एम.पी.डब्ल्यु या संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोननती देवून ही पदे भरली जाणार आहेत. पदोननतीनंतर सात पदे रिक्त होतील ती परत भरली जातील. एम.पी.डब्ल्यु पदासाठी शासन महानगरपालिकेस अनुदान देते प्रत्येक झोनसाठी एक आरोग्य निरिक्षक पद भरले जाणार आहे. या पदाचे अनुदान ही शासनाकडून प्राप्त होणार आहे.

श्री.मोहसिन अहेमद : विषय पत्रिकेवरच संपूर्ण माहिती देण्यांत यावी प्रश्न विचारल्या नंतर माहिती देणे चूक आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : पदे भरणे व पदनाम देणे हे वेगवेगळे विषय असावयास हवे. एम.पी.डब्ल्युंना पदोन्नती दिल्यानुसार जी सात पदे रिक्त होतील ती परत भरली जातील असा विषय पत्रिकेत उल्लेख असावयास हवा होता रिक्त पदे कशी भरणार.

श्री. प्रदिप जैस्वाल : स.स.श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या सांगण्यानुसार रिक्त होणाऱ्या पदांच्या भरतीबाबतचा उल्लेख विषयपत्रिकेत असावयास हवा होता प्रस्तावात तशी दुरूस्ती करण्यांत यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : दुरूस्तीसह ठराव पारीत करावा.

मा.महापौर : दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीशिवाय रिक्त होणारी एमपीडब्ल्यु ची पदे भरण्यांत येवू नयेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे शासनाच्या संवर्गाप्रमाणे आरोग्य विभागात प्रस्तावित अ.क्र.१ ते ४ च्या अटीनुसार आरोग्य निरिक्षकांची सात पदे वेतनश्रेणी रू.१४००-२३०० मध्ये निश्चित करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९८/१२** :

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरात शासकीय , समाजसेवक संस्थांच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या संस्थांनी अर्ज केलेले आहे की, त्याच्या संस्थेतील मुला/मुलींना महानगरपालिकेच्या रूग्णालयात व आरोग्य केंद्रात उपचारासाठी घेण्यांत येणाऱ्या शुल्कामध्ये सुट देण्यांत यावी.

१ प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, पद्मपूरा या संस्थेतील वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थीनींना निःशुल्क वैद्यकीय औषधेपचार सेवा उपलब्ध करून देणे बाबत.

२ कार्यालय अधिक्षक, शासकीय मुलांचे बालगृह (वरिष्ठ) सिल्कमिल कॉलनी, औरंगाबाद हया संस्थेतील प्रवेशितांना निःशुल्क वैद्यकीय औषधोपचार सेवा उपलब्ध करून देणे बाबत.

३ अध्यक्षास सदगुरू साई विश्वशांती धाम शिक्षण प्रसारक मंडळ, हडको, औरंगाबाद यांच्या विविध वसतिगृहातील मुला/मुलींना निःशुल्क वैद्यकीय औषधेपचार सेवा उपलब्ध करून देणे बाबत.

वरील संस्था शासकीय / निमशासकीय असल्याने प्रत्येकाने शासकीय रूगणालयात जाणे सोईचे होत नाही. म्हणून त्यांना महानगरपालिकेच्या रूग्णालयात व आरोग्य केंद्रात विना उपचार करण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मोहसिन अहमद : अशा प्रकारचे प्रस्ताव सभागृहात आणणे योग्य नाही हा चुकीचा पायंडा आहे. आपण प्रत्येक संस्थ्सेस अशी मदत करणार का ? कोणतीही संस्था येवून सर्वसाधारण पुढे अशा प्रकारचे प्रस्ताव मांडेल अशा सवलती नेमक्या कोणकोणत्या संस्थांना देणार आज शहरात जवळपास ५०० संस्था आहे. त्यामुळे काम करणेच अशक्य होईल. मंजुर करण्यापूर्वी प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून पॉलीसी डीसीजन घ्यावयास हवा. महानगरपिालका फीसही काही फार घेत नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर : ज्या संस्था मोफत सेवा देतात त्यांनाच ही सुविधा देण्यांत यावी.

श्री.प्रदिप जैस्वाल : एखादी संस्था १०-१५ वर्षापासून अशा प्रकारचे समाजसेवेत काम करत आहे त्यांना मदत करण्यांत यावी त्यांनी तसे प्रमाणपत्र सादर करावे. महानगरपालिकेने आरोग्य केंद्र उभे केले आहे. परंतू त्यातील कर्मचारी भरण्यासाठी शासन मंजुरी देत नाही.

श्री.नरेंद्र पाटील : शहरात अनेक सामाजिक संस्था आहेत हा ठराव चुकीचा आहे आपण रूग्णांना २/- रूपये फीस घेतो एवढी फीसही त्या संस्था भरू शकत नसतील तर त्या खाजगी संस्थंनी समाजसेवेचे काम करू नये याचा हिशेब आपण कसा ठेवणार.

श्री.भगवान घडामोडे : अशा संस्थांना शासकीय निधी मिळाते मग ते महानगरपिालकेची १/- रूपये फीस देवून शकत नाहीत काय ?

मा.महापौर : सर्वानुमते ठराव रद्य करण्यांत`यतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव सर्वानुमते नामंजूर करण्यांत येतो.

**विषय क्र.९९/१३** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पोलिस उप अधिक्षक अँटीकरप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील दिनांक ५-६-९९ च्या पत्रान्वये कळविले होते की, श्री.आर.एस.राचतवार, इमारत निरिक्षक, महानगरपिालका औरंगाबाद यांना दिनांक ४-६-९९ रोजी रू.१२००/- ची लाच घेतांना पकडण्यात येवून त्यांच्या विरूध्द जवाहरनगर पोलिस स्टेशन येथे गु.र.नं.३०२३/९९ कलम ७१३ (२) शह १३(१) (डी) लाच प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यास दिनांक ५-६-९९ रोजी १.५५ वाजता अटक करण्यांत आलेली होती.

त्यास्तव कार्यालयीन आदेश मनपा/आस्थ-१ /९९/२४९६ दिनांक ७-६-९९ अन्वये दिनांक ५-६-९९ पासून संबंधितास निलंबित करण्यांत आलेले आहे.

उक्त आदेश रद्य करून कामावर घेण्याबाबत श्री.राचतवार यांनी मा.स्थायी समितीकडे दिनांक १६-९-९९ रोजी अपिल दाखल केल्याचे व त्यावर प्रशासनाची काय भूमिका आहे, याबाबत अहवाल सादर करण्यांसाठी मा. सभापती, स्थायी समिती यांनी त्याचे दिनांक १७-६-९९च्या पत्रान्वये कळविलयावरून दिनांक २२-६-९९ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र.१८६/५३ अन्वये ठराव पारीत करून सर्वानुमते खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम ४ खालील तरतुदीनुसार अपील कर्त्यास ४८ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी पोलिस किंवा न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले नव्हते.

२ महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांकडून जमा झालेल्या करातून देण्यांत येतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांकडून कामे न घेता ५०% , ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही. तसेच सेवेत असतांना देखील खाते चौकशी करता येवू शकते.

३. अपिल कर्त्याचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार ग्रहीत धरण्यांत यावा. त्यांच्यावर ठेवण्यात आलेल दोषारोप न्यायालयातून अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.

४. उपरोक्त बाबींचा विचार करता श्री.आर.एस.राचतवार इमारत निरिक्षक यांचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रदद् करण्यांत येते. संबंधितास कामावर रहूजू करून घ्यावे प्रस्तावास सर्वानुंते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. स्थायी समितीने पारित केलेल्या उक्त ठराव च्या अनुषंगाने प्रकरण सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : या कर्मचाऱ्यांवर अँन्टीकरप्शनची रेड पडलेली होती. अशा कर्मचाऱ्यास कामावर घेण्याचे कारण काय ? महापौरांनी भ्रष्टाचार निपटण्याचे आश्वासन दिले होते. आपण हा ठराव रद्य करावयास हावा. स्थायी समितीसह आपण समज द्यावयास हवी. यामुळे चोरांना प्रोत्साहन दिल्यासारखे होईल चोरांना साहय करणारे चोरच असतात.

मा.महापौर : स.सभासदांनी उपशब्द वापरू नयेत. स्थायी समितीने हा प्रस्ताव मंजुर केला होता. प्रशासनाने तो सर्वसर्वसाधारण सभेपुढे ठेवला आहे.

श्री.अफसर खान : यापूर्वीही चर्चा झाली होती की, अशा प्रकारचे ठराव स्थायी समितीनेही घेवू नयेत हा ठराव रदद् करण्यांत यावा.

श्री.मुजीब आलम शाह खान : अशा प्रकारचे ठराव रदद् करावयास हवेत.

श्री.काशिनाथ कोकाटे : श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्यांनी आपले शब्द परत घ्यावेत हा ठराव नवीन नाही. सभागृहात यापूर्वीही अशा प्रकारचे ठराव आलेले आहेत व ते मंजुर झालेले आहेत. त्यावेळी अशा ठरावांना विरोध का झाला नाही.

श्री.मुजीब आलमशाह खान :मिलीभगत होवून असे प्रस्ताव सभागृहासमोर मांडले जातात गरिबांचे ठराव मात्र सभागृहासमोर ठेवले जात नाहीत सारे चोर आहेत.

मा.महापौर : स.स.श्री.मुलीब आलम शाह खान यांनी आपले शब्द मागे घ्यावेत. १५ मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यांत येते.

(२.०० वाजता तहकुब झालेली सभा २.४५ वाजता परत मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली.)

श्री.नरेंद्र पाटील : अशा केसेस नेहमीच होतात अशा प्रकरणात एक कायमस्वरूपी तोडगा काढण्यात यावा प्रथम पूर्ण कार्यवाही करण्यांत यावी.व नंतरच निर्णय घेण्यात यावा कर्मचाऱ्यांना सस्पेंड करून सहा महिन्यात परत कामावर घेतले आहे त्यामुळे त्यांच्यावर प्रशासनाचीही वचक रहात नाही.

श्री.मुश्ताक अहमद : आजच्या मराठवाडयात जी बातमी आलेली आहे ती बोलकी आहे ॲन्टी करप्शन मध्ये प्रोव्हिजन आहे कि मॅन्झीमम पिरीयड होत नाही तोपर्यंत त्यांना कामावर घेता येत नाही. अशा प्रकरणांची चौकशी व्हावयास पाहिजे.

श्री.प्रदिप जैस्वाल : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (४) प्रमाणे अपील करण्याचे अधिकार कर्मचाऱ्यांना आहेत. त्यानुसार संबंधिताने अपिल केलेले आहे.

श्री.हमीद ताबा,श्री.अब्दुल रऊफ : इतरही जे अधिकारी कर्मचारी सस्पेंड झाले आहेत त्यांनाही कामावर घेण्यांत यावे.

श्री.अब्दुल रशिद खान मामू : ठराव मंजुर करण्यांत यावा. स्थायी समितीने हा ठराव मंजुर केलेला आहे हा विषय परत स्थायी समितीकडे पाठवत आहोत स्थायी समितीने याबाबत निर्णय घ्यावा. स्थायी समितीने यात फेरचौकशी करावी व योग्य तो निर्णय घ्यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार इमारत निरिक्षक श्री. आर.एस.राचतवार यांचे प्रकरण पुन्हा स्थायी समितीकडे पाठवून सादर प्रकरणी स्थायी

समितीने फेर चौकशी करून निर्णय घ्यावा. असे सर्वानुमते ठरले. सदर ठरावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यांत येते .वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१००/१४ :**

उपसंचालक नगर रचना यांचे कडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगपूरा नारळीबाग भागातून वाहणाऱ्या नाला जमिनीपैकी अंबा, अप्सरा हया चित्रपट गृहाचे उत्तरहद्दीस लागून असलेला भाग हया चित्रपटगृहाचे पार्किंग करीता भाडे पटट्यावर मिळावा म्हणहून जे.बी.अमीन ॲन्ड ब्रदर्स यांनी मागणी केलेली आहे.

मंजुर विकास योजनामध्ये हया नाला जमीनीचा नैसर्गिक प्राणीप्रवाह नाला म्हणून निदेश केलेला आहे. व कोणताही वापर दर्शविलेला नाही. हया नाला जमिनीलगतची जमिन आरक्षण क्र.१३ पार्क व १५.० मी.रूंद विकास योजना रस्ता म्हणून दर्शविलेली आहे. प्रारूप विकास योजनामध्ये मात्र हया नाला जमिनीचा वापर लगतच्या जमिनीसह आरक्षण क्र.१०१ ने दुकान केंद्र व पार्किंग करीता दर्शविण्यात आला होता. नंतर प्रारूप विकास योजना शासनास अंतिम मान्यतेसाठी सदर करतेवेळी त्यामध्ये सदर नाला जमिनी लगतच्या उत्तरेकडील क्षेत्राचा आरक्षण क्र.१०१ वगळून निवासी क्षेत्रात समावेश करण्याची विनंती केली आहे.

शासनाकडे सादर केलेल्या सुधारित प्रारूप विकास योजनामध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे या जमिनीच्या पुर्वेस दाखविलेला १२.० मी विकास योजना रस्ता एकमेव पोच रस्ता (अप्राप्त) या नाला जमिनीसाठी उपलब्ध होतो. सध्या हया जमिनीस विकास योजना रस्त्याशिवाय इतर पोच रस्ता उपलब्ध होत नसल्याने महानगरपालिकाकचाही सध्या सदर नाला जमिन विकसीत करण्याचा प्रस्ताव नाही.

शहर स्वच्छता व शहर सौंदर्य हा प्रमुख दृष्टीकोन समोर ठेवून यापूर्वी शहरातील काही नाला जमिनी नोंदणीकृत सेवाभावी सामाजिक संस्थांना व्यक्तींना भाडेपटट्यावर दिलेल्या आहेत.

हया प्रकरणी प्रस्तावित वापर हा व्यावसायीक असून महानगरपालिकेस नालाजमिन विकसीत करण्यास रस्ता उपलब्धतेची अडचण विचारात घेता संबंधिताकडून व्यवसायिक वापरा संबंघाने हया नालाजमिन करीता ची उत्पन्नाची बाब होणार असल्याने व ही नालाजमिन हया दोन्ही चित्रपट गृहाचे जमिनीस लागून सलगतेने पार्किंग सुविधेसाठी संबंधिताची विनंती विचारात घेवून सदर नालाजमिनीचा वर नमुद भाग दिर्घ मुदतीवर भाडेपटट्यावर देण्याचे बाबत प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

नालाजमिन भाडेपटट्यावर देण्याचे प्रचलित धोरणानुसार शासनाची मान्यता घेवून नेहमीच्या अटी व शर्तीनुसार त्याआधारे निश्चित केलेल्या भाडे रक्कमेआधारे नालाजमिन भाडेपटट्यावर देण्यांत येईल.

मंजुर विकास योजनामध्ये व प्रारूप विकास योजनामध्ये हया जमिनीचा नैसर्गिक प्राणी प्रवाही म्हणून निर्देश`ल आहे व कोणताही वापर दर्शविलेला नाही. या संदर्भाने सदर नालाजमिन भाडेपट्यावर घ्यावयाची झाल्यास हया नाला जमिनीचे हया भागासाठी नाला जमिन ऐवजी "पार्किंग" वापर दर्शवून विकास योजनामध्ये निर्देश करण्याची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.( यापूर्वीची नालाजमिनी देण्याचे प्रकरणी शासन निर्देशानुसार ही कार्यवाही केलेली आहे.)

करीता वर नमुद केल्याप्रमाणे अंबा, अप्सरा चित्रपटगृहाचे उत्तरेकडील हदद्दीस लागून असलेल्या नालाजमिनीच्या भागाचा मंजूर विकास योजनामध्ये "पार्किंग" वापर

दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाचे किरकोळ फेरबदलाचे कार्यवाहीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

प्रस्ताव मान्यतेनंतर किरकोळ फेरबदालाचे मान्यतेसाठी व इतर नेहमीच्या अटी/शर्तीस अधिन राहून नालाजमिन देण्याचे कार्यवाहीचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करण्यांत येईल.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाची पुढील कार्यवाही अंतर्गत शासनाची अंतिम मंजुरी घेण्याकरीता ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीस अनुसरून प्रस्तावित फेरबदलास अंतिम स्वरूप देण्यासाठी जनतेकडून सुचना / हरकती मागविण्याचे व सूचना हरकतीचा विचार करून फेरबदलाचे स्वरूपाचे अंतिम स्वरूप देवून प्रस्ताव शासनाचे मंजुरी करिता राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी आवश्यक तो पत्र व्यवहार करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात यावे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

**<u>संवाद :</u>**

श्री.अफसर खान : या ठिकाणी पार्किंगसाठी बरीच जागा ओ. या ठिकाणी जागा देण्याची गरज नाही.

श्री.नरेंद्र पाटील : पार्किंगची व्यवस्था नसेल तर अंबा, अप्सरा या थियटरांना परवानगी कशी देण्यांत आली हा पस्ताव मुळीच चुकीचा आहे ही जागा कोणासही न देता मनपाने विकसीत करावी.

श्री.हमीद ताबा : अंबा, अप्सरा थिअटरमालकास नाला देण्यांत येवू नये हा ठराव का आणला याची चौकशी करावी. महानगरपालिकेने ती जागा विकसीत करावी.

श्री.विकास जैन : यापूर्वी या सभागृहात असे अनेक निर्णय झालेले आहेत तेव्हा अशा प्रस्तावांना विरोध का केले गेला नाही हा ठराव मंजूर करण्यांत यावा.

श्री.अफसर खान : आमचा विरोध नाही यापूर्वी घेतलेले निर्णय व आजचा प्रस्ताव सर्वच रदद् करावे.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे अंबा / अप्सरा चित्रपट गृहामध्ये उत्तरहद्दीस लागून असलेला नाला जमिनीचा भाग मंजुरा विकास योजनेमध्ये नाला जमिनीचा नैसर्गिक जलप्रवाह म्हणून दाखविलेला आहे. मंजुर विकास योजनेमध्ये नाला जमिनीचा नैसर्गिक पाणी प्रवाह नाला म्हणून निर्देश केलेली अंबा / अप्सरा चित्रपटगृहाचे उत्तर हद्दीत लागून असलेली नाला जमिन "नाला जमिनीचा भाग " "नाला जमिनीचा भाग " या ऐवजी पार्किंग वापर दर्शवून नाला जमिन भाडेपटट्यावर देण्याचा प्रचलित धोरणानुसार शासनाची मान्यता घेवून नेहमी अटी व शर्तीनुसार व त्याआधारे निश्चित केलेल्या रक्कम आधारे श्री. जे.बी. अमीन ॲन्ड ब्रदर्स यांना चित्रपटाचे पार्कगसाठी देण्यांत व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्याच्या कार्यवाहीस सर्वानुमते स्विकृत मंजुरी देण्यांत येते.

तसेच सदर प्रस्तावानुसार शासनाची अंतिम मंजुरी घेणेसाठी ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार प्रस्तावात फेरबदलास अंतिम स्वरूप देण्यासाठी जनतेकडून हरकत नसल्यास सुचना मागविणे व हरकती / सुचनाचा विचार करून फेरबदल करून अंतिम स्वरूप देवून शासनाचे मंजुरीकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०१/ १५** :

मा.कार्यकारी अभिंयता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.भावसिंगपूरा ते वळदगांवकडे जाणारी मुख्य सिव्हर लाईन ७०० ते ८०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३५,००,०००/- चे तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांनी दिनांक २०/१२/९७ रोजी मा. आयुक्त ,महानगरपालिका, औरंगाबाद यांनी मंजुरी दिली असून सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेत प्रस्ताव क्र.१५१/१५ सभेची मंजुरी घेवून सदर कामाच्या निविदा काढून एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी मेसर्स शिवा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा ११% ऐवजी वाटाघाटी नंतर २% जास्त दराने मा. आयुक्त यांनी दिनांक २४-३-९८ रोजी प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे . व त्यानुसार स्थायी समितीने प्रस्ताव क्रमांक ५५६/२५ दिनांक २६/३/९८ रोजी २% वरील ठरावा प्रमाणे मंजूर केले असून सदर कामाचा कार्यादेश देवून काम चालू केले असता पुर्वीचा प्रस्ताव तयार करतांना सिव्हर लाईन नाल्याच्या कडेला टाकणार असे गृहीत धरून कामाचा प्रस्ताव तयार करण्यांत आलेला होता. परंतू प्रत्यक्ष साईटवर काम चालू केले असता सदर नाल्यास लागून असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या जमीनीची हदद् नाल्या पर्यंत आहे असे लेखी आक्षेप घेतल्यामुळे सदर सिव्हर लाईन ही नाल्याच्या माध्यभागातून जात असल्याने व सदर नाला नागमोडी आकाराचा असल्याने पुराच्या तडाख्याने पाईप जॉईट निखळण्याची दाट संभव असतो. त्यामुळे सूपर्ण सिव्हर लाईनवर कॉंक्रीट केसींग करणे जरूरीचे असल्यामुळे कॉंक्रीट केसींगमध्ये ३२५.२६ घन मिटरचे वाढ होते. १३ मेनहोलची वाढ होते.त्यामुळे सदरील कामाच्या अंदाजपत्रकात रक्कम रू.७,०७,६६०=०० ने वाढ होते सदरील वाढीव अंदाजपत्रक मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिनांक १६/२/९९ ला मंजुरी दिलेली आहे. पुर्वीचे काम रूपये ३५,००,०००=०० ७,०७,६६०=०० एकूण रू.४२,०७,६६०=०० रूपयाच्या मंजुरीला मा. आयुक्त यांनी दिनांक १६/२/९९ रोजी प्रशासकीय मंजुरी देवून याच एजन्सी मार्फत काम करण्याची अनुमती दिली आहे तरी या (४) महिने कामाची मुदतवाढीसह प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपूरा ते वळदगांवकडे जाणारी ७०० ते ८०० मी मी. व्यासाची मुख्य सिव्हर लाईनच्या मुळ कामात बदल होवून सदरील मुख्य लाईन नागमोडी आकाराच्या नाल्याच्या मध्यमाभागातून जात असल्याने पुराच्या तडाख्याने पाईप जाईंट निखळण्यांची शक्यता लक्षात घेवून सिव्हर लाईनवर कॉक्रीट केसिंग करण्याचे व १३ मेनहोल वाढ झाल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक (पुर्वीचे काम ) रू.३५,००,००० + ७,०७,६६०/- रक्कम रूपये ४२,०७,६६०/- ला आणि चार महिने मुदत वाढीसह पुर्वीच्याच एजन्सीक डून काम करून घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०२/१६** :

मुख्य लेखा अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दैनिक वेतनावरील / ठराविक वेतनावरील स्त्री मजूर कामगारांना मकर संक्रांतीनिमित्त प्रत्येकी दोन साडया / शर्ट सलवार देण्याबाबत तसेच दैनिक वेतनावरील / ठराविक वेतनावरील पुरूष कामागांराना गणवेश देण्याबाबत युनियम लिडर यांनी मागणी केली आहे. दैथ्नक वेतनांवरील कामगारांना गणवेश देण्याबाबत विनियमात कोणतीही तरतुद नाही. तसेच सदरील बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही.

गतवर्षी महानगरपालिकातील दै.वेतन / ठराविक वेतनावरील स्त्री मजूरांना / कर्मचाऱ्यांना मकर संक्रांती निमित्त प्रत्येकी एक साठी / शर्ट सलवार गणवेश विशेष बाब म्हणून देण्यात आले होत. तथापि गणवेश विनियमात अशा प्रकाराची तरतुद नसल्याने लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आला होता. इतर महानगरपालिकेमध्ये अशा कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याबाबत तरतुद नाही.

दैनिक वेतनांवरील किती वर्षाच्या सेवेनंतर साडी/ गणवेश देण्यांत यावा व किती साडया / गणवेश देण्यांत योवत याबाबत तसेच महानगरपिालकेने बनविलेल्या गणवेष विनियमामध्ये दैनिक वेतन अथवा ठराविक वेतनांवरील कामगार / कर्मचारी यांना गणवेश देण्याबाबत कोणतीही तरतुद केलेली नाही करीता गणवेश विनियमात तशी दुरूस्ती करणे बाबत धोरकात्मक निर्णय घेणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांत येत आहे.

सर्वसाधारण सभेच्या निर्णयानंतर गणवेश करीता लागणारा खर्च काढण्यांत येवून, मान्यतेस्तव स्थायी समितीसमोर ठेवण्यांत येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ व धोरणात्मक निर्णयास्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.महापौर : इतर महानगरपालिकांची माहिती घेवून त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.गौतम खरात : मागील वर्षापासून आपण त्यांना गणवेश देत आहेत.

श्री.रशिद मामू : कापडाचा दर्जा पहाण्यासाठी सभागृहातील ४-५लोकांची कमेटी नेमण्यात यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर : प्रशासनाने हा प्रस्ताव सभागृहासमोर कशासाठी ठेवला याचा खुलासा व्हावा.

मुख्य लेखाधिकारी : दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याबाबत नियमात तरतुद नाही. मागील वर्षी दैनिक वेतनावरील ३००-३५० कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याबाबत लेखा परिक्षणात आक्षेप घेतलेला ओ त्यामुळे नियमात दुरूस्ती करावी किंवा कसे हे निश्चित धोरण ठरविण्यासाठी हा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवला आहे.

मा.महापौर : युनियन लिडर हा प्रस्तावातील शब्द वगळण्यात यावा सुधारित प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावातील युनियन लिडर हा शब्द वगळून सविस्तर माहितीसह सुधारित प्रस्ताव आगामी सर्वसाधारण सभेत ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते ठरले.

## <u>पुरवणी विषय पत्रिका</u>

**विषय क्र.१०३/१** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भडकलगेट ते जुनाबाजार रस्त्यास स्व.रफीक शहेबाज असे नाव देणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.हमीदोद्दीन ताबा

अनुमोदक : श्री.संजय केनेकर

दिनांक : १०-११-९९

**<u>संवाद :</u>**

श्री.प्रदिप जैस्वाल : सभागृहात प्रस्तावाचे सुचक अनुमोदक आहेत का ? एखादया व्यक्तीने काही मोठे चांगले काम केले असेल तर त्यांचे नाव देण्यांत यावे हया बाज तपासून पहावयास हव्यात.

श्री.नरेंद्र पाटील : नामकरणाचे प्रस्ताव एखाद्या कमेटीकडे कमेटी स्थापून द्यावयास हवेत . कमेटीने मंजुरी दिल्यानंतरच असे प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात यावेत.

मा.महापौर : सदरील प्रस्ताव कमेटीकडे पाठविण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर समितीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१०४/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.तरटे रंगनाथ रामराव रा.एन-९ शिवाजीनगर सिडको, औरंगाबाद येथील रहिवाशी असून त्यांच्या मुत्रपिंडाची शस्त्रक्रीया नुकतीच कमलनयन बजाज हॉस्पीटल मध्ये झालेली आहे. सदरील शस्त्रक्रीयेसाठी झालेला खर्च विचारात घेता संबंधितास विशेष बाब म्हणून स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीमधून रक्कम रूपये २५,०००/- (अक्षरी पंचवीस हजार फक्त ) आर्थिक मदत देण्यात यावी.

सुचक : श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव

अनुमोदक: श्री. नरसिंग मुरलीधर ढगे

दिनांक : २/१२/९९

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.तरटे रंगनाथ रामराव यांना मुत्रपिंडाचे शस्त्रक्रीयेसाठी व उपचारासाठी स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून रू.२५,०००/- हजार आर्थिक सहाय्य करण्यास सर्वानुंमते स्वीकृतीस मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५/३** :

श्री.बाबुराव भगवानराव अडाणे यांना गळयांचा कर्क रोग असल्यामुळे नगरसेवक निधितून रक्कम रू.२५०००/- ( पंचविस हजार रूपये ) देण्यांची तरतद आहे. परंतु जे पेशंन्ट शासकीय रूग्णालयात उपचार करत आहे त्यांना या निधीचा लाभ होत नाही म्हणून शासकीय रूग्णालयात उपचार चालू असतांना बाहेरून गोळया, इंजेक्शन ईत्यादी दवा गोळया आणण्यासाठी मदत देणे जरूरी असते.

करिता या प्रकारणात श्री.बाबुराव भगवानराव अडाणे यांना विशेष बाब म्हणून नगर सेवकांची निधीतून रू.२५,०००/- पंचवीस हजाराची मदत देण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अब्दुल रशिद खॉन मामू

अनाुमोदक : श्री.अफसरखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.बाबुराव भगवानराव अडाणे यांना गळयाच्या कर्करोगाच्या उपचारासाठी व औषधोपचारासाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून विशेष बाब म्हणून रू.२५०००/- आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते .

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०६/४** :

श्री. सय्यद इस्माईल नाना हे हिनानगर मजनुहिल येथील रहिवाशी आहेत त्यांचा मुलगा स.तनवीर हा अचानक अस्थी रोगाने त्रस्त झालेला आहे. कोणताही अपघात किंवा कोणत्याही प्रकारचा मार न लागता त्याच्या पायातील हाडांमध्ये गॅप निर्माण झाला आहे. औरंगाबादेतील तज्ञ तसेच पुण्यातील अस्थी रोग तज्ञ यांनाही स.तनवीर यास उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. परंतू फायदा झालेला नाही. आतापर्यंत त्यांच्या उपचारार्थ हजारा रूपये खर्च करण्यात आले . स. इस्ताईल हे मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करित आहे.

औरंगाबादेतील सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांनी पाय कापण्याचे सुचविले आहे. ज्यामुळे या मुलास कायमचे अपंगत्व येणार आहे.

औरंगाबाद येथे दिनांक २२-१०-९९ रोजी अस्थी रोग तज्ञ डॉक्टरांचे तीन दिवसीय अधिवेशन भरविण्यात आले होते. या अधिवेशनामध्ये स. तनवीर यांचे स्लाईडशो दाखविण्यात आले होते. ज्यामध्ये तज्ञ डॉक्टरांनी कोणतेही अपंगत्व न येता उपचार करण्याचे सुचविले आहे.

परंतु या उपचारासाठी अंदाजे ४०,०००/- चाळीस हजार रूपये खर्च अपेक्षित आहे.

या उपचारासाठी कित्येक नगरसेवक स्वेच्छा निधीतून मदत करण्यास तयार आहेत. परंतू महापालिकेने तयार केलेल्या नियमावलीनुसार स्वेच्छा निधीतून या रोगास आर्थिक मदत करता येत नाही.

करिता स. तनवीर या मुलाच्या भविष्याचा विचार करून मानवतेच्या भावनेतून खास बाब म्हणून निधी देण्यास मंजुरी दयावी तसेच रक्कम रूपये १५०००/- पेक्षा जास्त रक्कम नगरसेवक स्वेच्छा निधीतून देण्यासंबंधी प्रस्ताव सर्वसाधारण सभेस मंजुरीस्तव .

सुचक : श्री.मुजीब आलमशाह खान
अनुमोदक : श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय

**<u>संवाद :</u>**

श्री.हमीद ताबा : खाजा नसमद्दीन यांना वैद्यकीय मदत देण्याचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. परंतु प्रत्यक्षात त्यांना वेद्यकीय मदत मिळालेली नाही.
मा.महापौर : श्री.सय्यद ईस्माईल यांना २५०००/- रूपयाची मदत देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या स्वेच्छा निधी नियमावली नुसार अस्थारोग या रोगा ासाठी अर्थसहाय्य करता येत नाही तथापि मानवतेच्या भावनेतून सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार श्री.सय्यद तनवीर यांना अस्थिरोगाच्या उपचारासाठी नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून विशेष बाब म्हणून रू.२५०००/- हजार अर्थ सहाय्य करण्यास सर्वानुमते स्विक्रृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०७/५** :

रेहमानिया कॉलनीत स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून मौलाना आझाद चौक मध्ये शहर सौंदर्याच्या दृष्टीकोनातून ४० फुटी मिनार बांधण्यात आले आहे. सदर मिनार हे शांततेच प्रतिक असल्यामुळे या मिनारला "मिनार - ए - अमन " असे नामकरण करण्यात यावे करिता प्रस्ताव सादर.

सुचक : सौ. फरहत बानो
अनुमोदक : श्री.अफसर खॉन, श्रीमती आबेदा बेगम

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१०८/६** :

श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड ही संस्था खादी व ग्रामोद्योग आयोग महाराष्ट्र शासन यांच्याकडे नोयंदणीकृत आहे. हया संस्थेत महिलांना रोजदांरी उपलब्ध करून देण्यात येवून सामाजिक कामे सुध्दा संस्थेमार्फत करण्यात येतात. त्यांच्या मार्फत उत्पादीत मालास आपल्या महानगरपालिकेतर्फे आकारण्यात येणाऱ्या जकातीतून सुट देण्यात यावी हया बाबत महाराष्ट्र शासनाचे विंनती पत्र सुध्दा आपल्या महापिलकेस आलेले आहे व मुंबई , ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक , कल्याण, सोलापूर, नांदेड इ. महापालिकेने सुध्दा सदरील उत्पादित मालावर जकात सुट दिलेली आहे. सदरील प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.
सुचक : श्री. प्रफुल्ल मालानी
अनुमोदक : श्री. गिरजाराम हाळनोर, श्री.महादेव सुर्यवंशी

**<u>संवाद :</u>**

श्री.नरेंद्र पाटील : लिज्जत पापड ही कंपनी आंतरराष्ट्रीय आहे. महानगरपालिकेस १०० कोटीचे विद्युत देयक अदा करावयाचे आहे असे ठराव मंजुर करू नयेत.
श्री.मिरा सलामी : ॲडव्हर्यटाईज वरती ही कंपनी लाखोचा खर्च करते . मनपाचा कर अदा करण्यासाठी का तयार होत नाही.
मा.महापौर : प्रस्ताव सर्वानुमते नामंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लिज्जत पापड या संस्थेत त्यांच्या उत्पादनावर जाकतीतून सुट देण्याबाबत सभागृहात सर्वांगीण चर्चा होवून जकातीतून सुट देण्यात येवू नये. असा सभागृहाने निर्णय घेतल्याने सदर प्रस्ताव सर्वानुमते नामंजूर करण्यात येतो.

**विषय क्र.१०९/७** :

मे.वतन टेक्सटाईल लिमिटेड पैठण रोड औरंगाबाद हे शहरातील प्रथम मोमीन समाजातील युनिट आहे. सदरील युनिटचा मा. केंद्र सरकार तर्फे परवानगी मिळालेली आहे. त्या परवानगीसह केंद्र सरकारनी राज्य सरकारला पण जास्तीत जास्त फॅसिलिटीज दयावे म्हणून कळविले आहे.

तसेच सदरील युनिटला औरंगाबाद शहरात प्रथम ग्रीन कार्ड ही केंद्रसरकारची दिलेली आहे. असे प्रकारचे शहरात एकमेव युनिट आहे. त्यांना कस्टम व एकसाईज डयुटीही माफ करण्यात आलेली आहे.

तसेच त्यांना जकात डयुटीही माफ करण्यात आलेली आहे. त्याबाबत माननीय श्री.एस.एस.यादवाडकर जाईन्ट डेव्हलपमेंट कमीशनर यांनी आपले पत्र मा. श्री.डी.एन.वैद्य , आयुक्त महानगरपालिका यांना देवून विनंती केलेली आहे की, जकात कर माफ करण्यात यावे तरी वरील प्रमाणे प्रस्तावावर सहानुभुतीपूर्वक विचार करून सदरील युनिटला १००%

एक्सपोर्ट युनिट असल्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारनी दिलेल्या सुट प्रमाणे व इतर महानगरपालिकांना ही दिलेली सुटच्या अवलाकेन करून सदरील मे.वतन टेक्सटाईला यांना त्यांचे येणारे मालावर व मशीनरीवर जकात कर माफ करण्यांत यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मुजीब आलमशाह खॉंन
अनुमोदन : श्री.अब्दुल रशिद अ. सत्तार, श्री.फजलउल्लाखॉन
दिनांक : ११/११/१९९९

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे. वतन टेक्सटाईल लिमिटेड ,पैठण रोड औरंगाबाद यांना जकात कर माफ करण्याच्या प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चाच्या अनुषंगाने व सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्ताव सर्वानुमते नामंजूर करण्यांत येतो.

**विषय क्र.११०/८** :

नारेंगांव प्रभागामधील वोखार्ड कंपनी ते नारेगांव मार्ग वरूड या सार्वजनिक "नामदेव सुर्यवंशी मार्ग" असे नांव देणे बाबत या भागातील रहिवाशंनी मागणी केलेली आहे. रहिवाशींचे मागणीनुसार वोखार्ड कंपनी ते वरूड या रस्त्यांस "नामदेव सुर्यवंशी " असे नाव देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी, व श्री.नरसिंग ढगे
अनुमोदक : श्री. कचरू नवपुते, सौ.सुनंदा कोल्हे, सौ.मंदा काळुसे
दिनांक : ६-१२-९९

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर कमिटीक डे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१११/९** :

चिकलठाणा प्रभागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर , पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व गौतमबुध्द यांचे पुतळे बसविलेले असून सदर पुतळयांना छत नसल्यामुळे पुतळयांचे संरक्षणाकरीता फायबरचे शेड तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. पुतळयांचे संरक्षणसाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतून खर्च करून फायबर शेड बसविणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री.कचरू नवपूते
अनुमोदक: श्री.नरसिंग ढगे, श्री.महादेव सुर्यवंशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा प्रभागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व गौतमबुध्द यांचे पुतळयांच्या संरक्षणासाठी व नगरसेवक स्वेच्छा निधीतून फायबर शेड उभारण्यात सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११२/१०** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.नारायण आनंदराव पाठक निवृत्त मुख्याध्यापक, महानगरपालिका प्रा.शा.बन्सीलालनगर औरंगाबाद यांच्या हदयावर नुकतीच बायपास शस्त्रक्रीया करण्यात आली असून संबंधितास विशेष बाब म्हणून स.नगरसेवकांच्या स्वेच्छा

निधीतून रूपये २५०००/- (रू.पंचविस हजार फक्त ) आर्थिक मदत देणे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री. संजय केनेकर
अनुमोदक : सौ.लता दलाल, श्री.नरसिंग ढगे
**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.नारायण आनंदराव पाठव निवृत्त मुख्याध्यापक महानगरपालिका औरंगाबाद यांना हदयरोग, बायपास शस्त्रक्रीया उपचारासाठी स. नगर सेवकांच्या स्वेच्छानिधीतून विशेष बाब म्हणून रू.२५०००/-अर्थ सहाय्य करण्याच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११३/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका प्राथमिक शाळा नागेश्वरवाडी येथे माझ्या स्वेच्छानिधीतून संगणक देण्यांतस रू.४०,०००/- पर्यंत मान्यता देण्यांत यावी. या शाळेतील ३ ते ४ शिक्षकांनी संगणक प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून या प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी.
सुचक : सौ.लता दलाल
अनुमोदक: श्री.संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका प्राथमिक शाळा नागेश्वरवाडी येथे नगरसेवक स्वेच्छा निधीतून रू.४०,०००/- पर्यंत चे संगणक खरेदी करून देण्यांत विशेष बाब म्हणून सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११४/१२** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, आपल्या शहरात अमेरिकेतील प्लॅस्टीक सर्जन डॉ.शदरकुमार दिक्षीत हे येथील गरीब रूग्णांवर शस्त्रक्रीया करतात साधारण प्रत्येकी शस्त्रक्रीयेला रू.५०००/- खर्च होतो व प्रत्येक कॅम्प मध्ये साधारण ३५० ते ४०० शस्त्रक्रीया केल्या जातात.

प्रत्येक वर्षा प्रमाणे याही वर्षी एक दिवस महानगरपालिकेचा ठेवून त्या दिवसाचे नेहमी च्या वर्षाप्रमाणे रू.१,००,०००/- महानगरपालिकेने मदत लायन्स क्लब चिकलठाणा औरंगाबाद यांना द्यावेत म्हणून प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.भागवत कराड
अनुमोदक: श्री.संजय केनेकर

**<u>संवाद :</u>**

श्री.नरेंद्र पाटील : दरवर्षाप्रमाणे यावर्षी ही मदत देण्यांत यावी.
श्री.गजानन बारवाल : डॉ.दिक्षीतांचे त्यांच्या कार्याबाबत अभिनंदन व त्यांना मानपत्र देण्यांत यावे.
मा.महापौर : डॉ.दिक्षीत दरवर्षी शहरात येवून प्लॅस्टीक सर्जरी शिबीर घेतात ही शहरासाठी अभिमानाची गोष्ट आहे. १९-१२-९९ चे शिबीर

महानगरपालिकेच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. सर्व स.सदस्य , पदाधिकारी, अधिकाऱ्यांना त्या दिवशीच्या शिबीरास उपस्थित रहावे. १९-१२-९९ रोजीच डॉ.दिक्षीतांचा सन्मान करण्यात येईल. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यांत येतो.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात प्लॅस्टीक सर्जन डॉ.शरदकुमार दिक्षीत यांचें शिबीरात रूग्णांनी शस्त्रक्रीया करण्यांत येते व त्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला होत असून या शस्त्रक्रीया शिबीराम दरवर्षी प्रमाणे यावर्षीही एक दिवस महानगरपालिकाचा ठेवून त्या दिवसासाठी प्रतिवर्षी प्रमाणे १,००,०००/- लायन्स क्लब चिकलठाणा औरंगाबाद यांना देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५/१३** :

मालनबाई आठवले वय ५० वर्ष ही महिला हदय विकाराने डॉ.काळबांडे हॉस्पीटल मध्ये भरती आहे. तिच्यावर हदयावर शस्त्रक्रीया एकूण रू.५०,०००/- खर्च येणार आहे. तिच्यावर शस्त्रक्रीया व्हावी म्हणून ५५ नगरसेवकांनी आपल्या निधीतून पत्र दिले आहेत. तरी त्यांना मदत म्हणून ५५ हजार मंजुर करावे.

सुचक : डॉ.भागवत कराड

अनुमोदक: गौतम लांडगे

**संवाद:**

मा.महापौर : मालनबाई आठवले यांना हदयावर शस्त्रक्रीया करण्यासाठी रू.२५०००/- ची मदत मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती मालनबाई आठवले यांना हदयरोग शस्त्रक्रीया व उपचारासाठी स.नगरसेवक स्वेच्छानिधीतून विशेष बाब म्हणून रू.२५०००/- अर्थसहाय्य करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११६/१४** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नारळीबाग येथील अण्णपूर्णा फलोअर मिल समोरिल (पावन गणेश मंदिरा मागील ) चौकास श्री. गणेश पावन गणेश चौक, पावन नगर नारळीबाग असे नाव देण्यांत यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.जयवंत ओक, श्री.संजय केनेकर

अनुमोदक : श्री.विठ्ठलराव जाधव, श्री.गिरजाराम हाळनोर

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.११७/१५** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सध्या महानगरपालिका आस्थापनेवर स्वीय सहाय्यक या पदावर महिला कर्मचारी कार्यरत नाही. तद्अनुषंगाने महापौर कार्यालयात स्वीय सहाय्यक या पदावर सौ.शैलजा गुळवे हया गेल्या दोन वर्षापासून कार्यरत आहे तथापि त्यांना स्वीय सहाय्यक या पदाची वेतनश्रेणी देण्यांत आलेली नाही. संबंधितांनी स्वीय सहाय्यक या पदासाठी लागणारी शैक्षणिक आर्हता धारण केलेली आहे. तसेच महिलांना ३३% आरक्षण देणे असे शासनाचे धोरण आहे.

करिता स्वीय सहाय्यक / लघुलेखक या संवर्गाची वेतन श्रेणी पदनिर्मिती करून देणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्रीमती जाहेदा बेग म.जमीर

अनुमोदक : श्री.राजकुमार बचाटे

सौ.राधाबाई तळेकर

**<u>संवाद :</u>**

श्री.हमीद ताबा :प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नाहीत.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे माहपौर कार्यालय स्वीय सहाय्यक हे पद लघुलेखक या संर्वगात निर्माण करण्यांस सर्वानुमते स्वीकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८/१६** :

लेबर कॉलनी येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात साहित्य रत्न लोक शाहिर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविण्यात आलेला आहे सदर चौकास " लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक " असे नांव देण्यांत यावे.

आण्णाभाऊ साठेयांचे पुतळया पासून ते हर्सुल पर्यंतचे रस्त्यास "साहित्यरत्न लोक शाहिर अण्णाभाऊ साठे मार्ग " असे नांव देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी, श्री.नरसिंग ढगे

अनुमोद : श्री.कचरू नवपुते, सौ.सुनंदा कोल्हे,सौ.मंदा काळुसे

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.११९/१७** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, ओरंगाबाद महानगरपिालका वाढीव हदद्‌ीसाठी मंजुर झालेल्या विकास योजनेमध्ये पैठण रस्त्या नगत महानगरपिालका हदद्‌ी पर्यंतचा सुमारे ४५० मी लांबीचा भाग सोडून इतर सर्व भाग निवास व इतर विविध विकास क्षेत्रात समाविष्ट करण्यांत आलेला आहे. मो.नक्षत्रवाडी येथील ग.अनं.३५ मधून १०० फुट रूंद विकास योजना रस्ता गेलेला असून या रस्त्याचा उत्तरेकडील भाग निवास भागात असून दक्षिणेकडील भाग ना विकास क्षेत्रात सामिल केलेला आहे. शहराचा विकासाचा ओघ याच भागाकडे असून अनेक गृहनिर्माण संस्था व वसाहती विकसित होत आहेत. ग.नं. ३५

नक्षत्रवाडीचा ना विकास क्षेत्रात असलेला भाग देखील रहिवास वापरासाठी उपयुक्त असल्याने आणि पैठण रस्त्याला लागूनच असल्यामुळे स.नं.३५ मधील १०० फुट रूंद विकास योजना रस्त्यांच्या दक्षिणे कडील संपूर्ण भाग हा ना विकास क्षेत्रातून वगळून निवास भागात सामिल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्याची कार्यवाही करण्यास आणि या संदर्भात शासनाची मंजुरी घेण्याकरीता आवश्यक ती ठरवून दिलेला सर्व कार्यवाही पूर्ण करून शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यास व आवश्यक ते सर्व पत्र व्यवहार करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण संभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यांत येत आहे.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.डॉ.भागवत कराड, श्री.अफसर खान, श्री.विकास जैन

अनुमोदक : श्री.संजय केनेकर, श्री.नरसिंग ढगे, श्रीमती चंपाबाई पांचाळ, सो.ज्योत्सना हिवराळे, श्री.सु भाष कच्छवाह, श्री. एन.व्ही.कांबळे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका वाढील हदद्‍ीसाठी मंजुर झालेल्या विकास योजनेत पैठण रस्त्यालगत मौजे नक्षत्रवाडी येथील गट नं.३५ मधून १०० फुट रूंद विकास योजना रस्त्याच्या दक्षिणेकडील गट नं.३५ मधील संपूर्ण भाग नाविकास क्षेत्रातून वगळून निवास भागात सामील करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (अन्वये ) गौण फेरबदल करण्यात आणि या संदर्भात शासनाची मंजुरी घेण्याकरीता आवश्यक ठरवून दिलेली सर्व कारवाई पूर्ण करून शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यांस व आवश्यक ते सर्व पत्र व्यवहार करण्याचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यांत सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०/१८** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी कर्मचारी सेवाभरती नियमानुसार महापालिका, आस्थापनेवरील मुख्य लेखा पिरक्षक हे पद भरणेबाबत विहित पध्दती खालील नुसार नमुद केलेली आहे.

**अ. वेतन श्रेणी रू.३०००-४५००**

टिप : पोटकलम पोटविभाग २ (क) अन्वये नेमलेल्या पदाची वेतनश्रेणी प्रति नियुक्तीच्या अटी शर्ती प्रमाणेच राहील.

**ब. पात्रत - नेमणूक खालील प्रमाणे केली जाईल.**

१ सध्या महानगरपालिकेच्या सेवेत नसतील तर ३५ वर्षाहून अधिक वयाचे नाहीत.

२ कला, वाणिज्य अथवा विज्ञान या शाखेची पदवी धारण करणारे अर्थशास्त्र अथवा गणितशास्त्र विषय घेवून पास झालेले कला पदवीधर आणि शास्त्र पदवीधर गणीत विषय घेवून पात्र असलेल्या या पदासाठी पात्र असतील. अकौन्टसी व ऑडीटींग हे मुख्य विषय घेवून पास झालेल्या वाणिज्य पदविधारकांना प्राधान्य दिले जाईल. विधी शाखेची पदवी ही जादा पात्रता समजली जाईल.

३ ज्यांना कोणत्याही सरकार अथवा स्थानिक स्वराज्य संस्था अथवा खाजगी नावाजलेल्या फर्ममध्ये जबाबदारीच्या जागेवर लेखाधिकारी म्हणून काम केल्याचा सात वर्षाचा अनुभव असेल, किंवा सध्या महापालिका सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना बढती देवून की, जे गणित विज्ञान अथवा अर्थशास्त्रासह कला अथवा गणित

शास्त्रासह शशस्त्र अथवा वाणिज्य पदवीधर आहेत. जसे लेखाधिकारी म्हणून सात वर्षाहून कमी अनुभव नसलेल्या व ज्यांना लेखा व अंकेक्षाणाचा अनुभव आहे असे शासनाकडील योग्य तो अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेवून नियम क्र.३ मध्ये काहीही सांगितले तरी अनुसुचित जाती अनुसुचित जमाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती यापैकी आवश्कक अनुभव उच्च मुलभुत शैक्षणिक पात्रत असणारे पुरेसे उमेदवार त्यांच्या करीता राखून ठेवलेल्या जागा भरण्यासाठी उपलब्ध होण्याची शक्यता नाही असे निवडीच्या वेळी कोणतेही घटकेस अनुसुचित जामाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या बाबतचा अनुभव उच्च मुलभूत शैक्षणिक पात्रता नेमणूक करणाऱ्या अखत्यारिचे इच्छेनुसार शिथील करण्यांत येतील, तसेच महानगरपिलका सेवेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नौकरीचा कालावधी व अनुभव सहा महिन्यासाठी शिथिल करण्यांत येईल.

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नतीच्या कमी संधी उपलब्ध आहेत तसेच वर्ग-१ संवर्गातील बऱ्याचश्या पदांना पदोन्नती करिता कनिष्ठ पदाचा किमान तीन वर्ष अनुभव नमुद केला आहे. तथापि मुख्य लेखा परिक्षक या पदास पदोन्नती करिता ७ वर्षाचा अनुभव प्रस्तावित केलेला आहे. या ऐवजी इतर पदाप्रमाणे मुख्य लखा परिक्षक या पदास अनुभवाची अट नमुद करणे आवश्यक आहे. यापुर्वी उप आयुक्त अर्हतमध्ये या सभागृहाने बदल मंजुर केलेला आहे. त्याच धर्तीवर मुख्य लेखा परिक्षक या पदास सात ऐवजी कनिष्ठ पदाचा ४ वर्षाचा अनुभव असावी अशी दुरूस्ती सेवाभरती नियमात करण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.प्रदिपजी जैस्वाल, श्री.स.अली मिरा सलामी,श्री.गौतम खरात,श्री.नरसिंग ढगे, श्री.महादेव सुर्यवंशी, श्री.राजकुमार बचाटे,श्री.संजय केनेकर

अनुमोदक : श्री.गजानन बारवाल, श्री.गौतम लांडगे, श्री.त्र्यंबक तुपे, श्री.मोहसिन अहमेद, श्री प्रभाकर विधाते.

**<u>संवाद :</u>**

श्री.गिरजाराम हाळनोर : असे प्रस्ताव प्रशासनामार्फत यावयास पाहिजे.

मा.महापौर : प्रशासनामार्फत प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका मुख्य लेखा परिक्षक या पदास पदोन्नतीकरीता सेवा भरती नियमात सात वर्षाचा अनुभव प्रस्तावित केलेला असून त्याऐवजी कनिष्ठ पदाचा ४ वर्षाचा अनुभव अशी दुरूस्ती सेवा भरती नियमात करण्याच्या प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने व सभागृहााने घेतलेल्या निर्णयानुसार सदरचा प्रस्ताव संपूर्णपणे तपासणी करूनच प्रशासनामार्फत सर्व साधारण सभेपुढे ठेवण्यात सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१/१९** :

सामाजिक सांस्कृतिक ,अध्यात्मिक व क्रिडा सभागृह बांधण्यासाठी क्रांतीचौक वार्डात १०० फुट x १०० फुटाची जागा उपलब्ध करून देवून सहकार्य करण्यात यावे. स्वामी

नारायण ट्रस्टला पवन समोरील जागा दिली होती ती रदद् करण्यात यावी कारण अद्याप पर्यंत त्या ठिकाणी पाच वर्षात त्यांनी काहीच काम केले नसून ती जागा द्यावी किंवा आजुबाजूच्या परिसरातील एखादी योग्य जागा उपलब्ध करून द्यावी. सदरील ठिकाणी सभागृह बांधण्यासाठी मा. खासदार श्री.चंद्रकांत खैरे साहेब यांनी आठ लाख रूपये मंजूर केले असून या संस्थेस सर्व वयोवृध्द नागरिक असून ते त्या ठिकाणी सांस्कृतिक व अध्यात्मिक उपक्रम राबवणार आहे. व इतर चांगले कार्य करण्यासाठी या जागाचा उपयोग होणार आहे.

सुचक : श्री. गजानन बारवाल

अनुमोदक : श्री.मोहसिंन अहमद

**ठराव :**

सामाजिक सांस्कृतिक ,अध्यात्मिक व क्रिडा सभागृह बांधण्यासाठी मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे साहेब यांचे खासदार निधीतून रू.८,००,०००/- मंजूर झालेले असून यासाठी क्रांतीचौक वॉर्डातील स्वामी नारायण ट्रस्टला पवन समोरील दिलेली जागा रदद् करून १००X १०० फुटाची जागा किंवा आजूबाजूच्या परिसरात एखादी योग्य जागा उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२/२०** :

मोहल्ला घाटी गौतमनगर जवळील भागात नागरिकांनी मागणी केल्यानुसार सदर भागात व उपलब्ध असलेल्या सार्वजनिक जागेवर नागरिकांचे सोयी एक बहुउदद्शीय हॉल बांधण्यात यावा.

त्यानुसार उपरोक्त प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.गौतम खरात

श्री. अफसर खान

अनुमोदक : श्री.राजकुमार बचाटे

श्री.अब्दुल रऊफ

श्री.संजय केनेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी, गौतमनगर जवळील भागात उपलब्ध असलेल्या सार्वजनिक जागेवर बहुउदद्शिय हॉल बांधण्यात सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३/२३** :

महानगरपालिका उर्दू वाचनालयात गेल्या तीस वर्षापासून महानगरपालिकेच्या मार्फत चालत आहे. सदरील लायब्ररी मराठवाडयातील सर्वात मोठी उर्दुची लायब्ररी असून लायब्ररी मध्ये राज्याचे सर्व वर्तमान पत्र, मॅकझीन, सांस्कृतिक , ऐतिहासकि, शैक्षणिक क्रिडा, कला इत्यादी पुस्तकांनी भांडार उपलब्ध आहे. सदरील वाचनालयामध्ये ग्रंथपाल किंवा सहाय्यक ग्रंथपाल पद नसल्याने लायब्ररी काम काजावर जास्त सभासद असल्याने कामाचा बोझा वाढत आहे. तरी सदरील वाचनालयावर सहा लायब्ररीयनची पदे भरणे अत्यंत गरजेचे ओ. तरी सहा. ग्रंथपालची पद मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहसिन अहमद
श्री.कचरू नवपुते
अनुमोदक:श्रीमती अलका पाटील
श्री.गौतम खरात

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका उर्दु वाचनालयात सहाय्यक ग्रंथपालचे पद निर्मिती करणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४/२२** :

वार्ड क्र.३ कैसर कॉलनी मध्ये नागसेन कॉलनीचे नांव बदलून जैयनब कॉलनी करण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहसिन अहमद
श्री.कचरू नवपुते
अनुमोदक : श्रीमती अलका पाटील
श्री.गौतम खरात

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर समितीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१२५/२३** :

महानगरपालिकेच्या मार्फत नविन बांधण्यात आलेला तीस खाटी प्रसुती गृहाचे काम संपूर्ण झाले आहे. सदरील प्रस्तुती गृहाचे उद्घाटन जानेवारी २००० मध्ये करण्याचे ठरविले आहे. तरी सदरील प्रसुती गृहाचे नाव मकबुल प्रस्तुतीगृह असे नावावर करण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहसिन अहमद
श्री.कचरू नवपुते
अनुमोदक : श्रीमती अलका पाटील
श्री.गौतम खरात

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१२६/२४** :

सिध्देश्वर कॉलनीचा नाव बदलून सोफियान कॉलनी ठेवणे बाबत.

सुचक : श्री.मोहसिन अहमद
श्री.कचरू नवपुते
अनुमोदक : श्रीमती अलका पाटील
श्री.गौतम खरात

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१२७/२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतर्फे संत एकनाथ रंग मंदिरातील कॅन्टीनच्या बाजूला असलेल्या जागेवर खुले रंग मंच बांधण्यात येणार आहे. या रंग मंचास लोकशाहीर कै.विश्वासराव साळूंके यांचे नाव देण्यात यावे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय केनेकर
श्री.अफसर खान
अनुमोदक : श्री.महादेव सुर्यवंशी

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१२८/२६ :**

नांदूर मधमेश्वर प्रकल्प ते औरंगाबाद पर्यंत नवीन जलवाहिनी टाकण्यास भविष्यामध्ये औरंगाबादला पाण्याची कमतरता भासणार नाही. अशा प्रकारे पाईप टाकतांना मधील मार्गाने ७५ कि.मी.लांब पाईपलाईन टाकण्याचा प्रस्ताव असून अशा प्रकारे पाईपलाईन टाकल्यास कमी खर्चात शहराला मुबलक पाणी पुरवठा उपलब्ध होवू शकेल प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

सुचक : सौ.विमल नंदकुमार मुंडलिक
अनुमोदक : श्री.भगवान देविदास घडामोडे

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नांदूर मधमेश्वर प्रकल्प ते औरंगाबाद पर्यंत नवीन जलवाहिनी टाकण्याच्या प्रस्तावात सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र.१२९/१ :**

मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद अधिकारी / कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करणे बाबत शासन निर्णय क्रमांक एएमसी/१४९९/२/प्र.क्र.१/९९/नवि-२४ मंत्रालय मुंबई दिनांक २४-११-९९ प्राप्त झाले असून निर्णय पुढील प्रमाणे आहे.

१ औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याच्या औरंगाबाद महानगरपालिकाच्या ठराव क्र.१८७/१ दिनांक १३/१/९९ च्या प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून सुधारित वेतनश्रेण्या लागू करण्यास वित्त विभागाच्या दिनांक १-१२-९८ च्या अधिसुचनेतील अटी व शर्तीना अधीन राहून शासन या निर्णयान्वये मान्यता देत आहे.

२ औरंगाबाद महानगरपालिकेने आपल्या कम्रचाऱ्यांना या प्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करतांना खालील अटीचे पालन करणे आवश्यक राहील.

अ महानगरपालिका सेवाभरती नियमानुसार कर्मचाऱ्यांना १५ वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना लागू असलेली निवड श्रेणी रदद् करण्यात यावी.

ब महानगरपालिका सेवाभरती नियमानुसार कर्मचाऱ्यांना सात वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी लागू करण्यात येते, मात्र राज्य शासनाने बारा वर्षानंतर कालबध्द पदोन्नती अथवा पुढील वेतनश्रेणी लागू केली आहे.

यास्तव औरंगाबाद महानगरपालिकेने राज्य शासनाच्या तरतुदी प्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी सेवाभरती नियमांत तशी तरतुद करणे आवश्यक राहील. म्हणजेच महानगरपालिका सेवाभरती नियमात सात वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतुद रदद् करून बारा वर्षानंतर पुढील वेतनश्रेणीची तुरतुद करणे आवश्यक राहील.

उपरोक्त नुसार क्र.२ प्रमाणे शासनाच्या निर्णयाचे अंमलबजावणी करणे व पाचवा वेतनाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र.एएमसी/१४९९/२/प्र.क्र.१/९९ नवि-२४ मंत्रालय मुंबई दिनांक २४-११-९९ प्रस्तावित अ.क्र.१ व २ अन्वये महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३०/२** :

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको औरंगाबाद कडील सेवा सूुविधा औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनाचे उपसचिव यांनी पत्र.क्र.डी.ओ.सी.१०९५/७५९/प्र.क्र.१६५/९५दिनांक २७-१०-९९ रोजी पत्र देवून दिनांक ३-८-९९ रोजी मा. प्रधान सचिव , नगर विकास यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रधान सचिव यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सिडको, औरंगाबाद कडील पाणीपुरवठा , रस्ते, मल:निसारण पथदिवे व विद्युतीकरण इत्यादी सेवा सुविधा औरंगाबाद महानगरपालिका हस्तांतरीत करून घेण्याबाबत कळविले आहे. दिनांक ३-८-९९ रोजी मुंबई येथे संपन्न झालेल्या उच्चस्तरीय बैठकीमध्ये प्रधान सचिव यांनी निर्देश दिले आहे की, ज्या बाबीवर सिडको प्रशासन व महानगरपालका प्रशासन यांचे मध्ये वाद नाही त्या बाबींचे टप्प्याटप्प्याने हस्तांतरण करून घेण्यांत यावे. दिनांक २७-७-९९ रोजी मा. आयुक्त ,महानगरपालिका औरंगाबाद व मा. प्रशासक सिडको, औरंगाबाद यांच्या समवेत झ ालेल्या बैठकीचे वृत्तांचे प्रत सोबत जोडली आहे.

तरी शासनाच्या निर्देशानुसार सिडको कडील सेवा सुविधा औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.नरेंद्र पाटील : आपण ठेवलेला ठराव हा सिडकोच्या सुविधा हस्तांतरीत करून घेण्यासाठी आहे हा ठराव चुकीचा आहे हा प्रस्ताव ठेवण्याचे प्रयोजन काय ? ठराव रदद् करण्यात यावा.

मुख्य लेखाधिकारी : सिडको हस्तांतरणाचा हा ठराव आहे . २७-७-९९ ला उच्चस्तरीय बैठक झाली होती त्यात सिडकोच्या सुविधा कशा प्रकारे हस्तांतरीत करून घ्याव्यात हे ठरले होते त्यांचे इतिवृत्त सोबत जोडले आहे.

श्री.प्रदिप जैस्वाल : सिडको हस्तांतरणानंतर महापालिकावर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे. सिडको हस्तांतरणानंतर महापालिकावर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे. सिडको हस्तांतरणानंतर तेथील सुविधा साठी मोठया प्रमाणावर खर्च येणार आहे. या खर्चाचा उल्लेख प्रस्तावात आसावयास पाहिजे. सिडको महापालिकेस किती पैसा देणार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : या प्रस्तावाबाबत जोडलेल्या टिपणीत म्हटले आहे की , सिडाकेत अंदाजीत १४६ कि.मी.लांबीचे रस्ते आहे हे रस्ते आहेत हे रस्ते ३ व २ मीटरचे रस्ते धरून आहेत की, ५,७,९ व १६ मीटर लांबीचे धरून आहेत. यात इंटरनल रोडचा समावेश नसावा. सिउकोचे अंतर्गत रस्ते खुप खराब झालेले आहेत. इतरही बाबींचा या प्रस्तावात पूर्ण उल्लेख नाही. अधिकाऱ्यांनी त्यांच्या बैठकीत नक्की काय निर्णय घेतले सिडको भागातील मालमत्तांचे लिजहोल्डचे प्रित होल्ड करावे ही आमची मुख्य मागणी आहे . शासनाने याबाबत काही हमी दिलेली आहे सिडकोने लिज होल्ड बाबत काही ठराव पारित केला असलयास त्याची माहिती देण्यात यावी. या भागातील नियोजनाचे अधिकार महापालिकेस मिळावयास पाहिजेत. शहर व सिडकोच्या विकास कामात खूयप फरक आहे. सिडकोचा विकास महानगरपालिका आर -२, आर-३ अशा कोणत्या प्रकारात करणार सिडको भागात ३ वर्षात भूखंड विकसीत केला नाही तर त्यास दंड आकारला जातो. शहरात तसे बंधन नाही हस्तांतरणानंतर महानगरपालिका आणि पेनॉल्टी लावणार काय खऱ्या अर्थाने हस्तांतरणा बाबत एकमत झालेले नाही. सिडको भागातील नगरसेवका समवेत चर्चा करूनच हस्तांतरण करण्यांत यावे. हस्तांतरणाच्या दिवसापासून मालमत्ता कराची आकारणी करण्यात यावी.

श्री.प्रदिप जैस्वाल : सिडको हस्तांतरण संदर्भाने अनेक बैठका झालेल्या आहेत. संपर्ण माहिती सर्वांना देवून तिन दिवसानंतर ही बैठक घेण्यात यावी. आजच्या परिस्थीतीत सिडकोतील रस्ते खुपच खराब झालेले आहेत. रस्त्यांवर किती खर्च येणार आहे. याची पूर्ण माहिती देण्यांत यावी. महानगरपालिका सिडको अधिकाऱ्यांनी रस्त्याची पहाणी करावी. रस्ते, जलवाहिन्या, ड्रनेज यांच्यावरती किती खर्च येणार आहे. महानगरपालिकास सिडकोकडून मिळणारे उत्पन्न व त्या भागात होणारा खर्च याची माहिती देण्यांत यावी.

श्री.नरेंद्र पाटील :मागील दहा वर्षापासून या संदर्भाने विविध स्तरावर बैठका झालेल्या आहेत परंतु कोणताही निर्णय घेतला गेलेला नाही. प्रशासन व लोकप्रतिनिधीं यांच्या माध्यमातून सिकडकोचे हस्तांतरण व्हावे एकतर्फी हस्तांतरण आम्हास मान्य नाही. हस्तांतरण म्हणजे काय याची स्पष्ट व संपूर्ण माहिती देण्यात यावी, मालमत्तांचे लिजहोलचे फ्रिहोल्ड होणार का ? सिडकोतील मालमत्ता नागरिकांच्या नावावर होणार का ? याची प्रथम माहिती देण्यात यावी. सिडकोतील सुविधांवर खर्च किती येणार शासनाकडून किती पैसा घ्यावयाचा हा प्रशासनाचा प्रश्न आहे. जो पर्यंत सिडकोने बुकलेट मध्ये दिलेल्या सुविधा पुरविल्या जात नाही व लोकप्रतिनिधींच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हस्तांतरण होवू देणार नाही.

श्री.महादेव सुर्यवंशी :आतापर्यंत अनेक बैठका झालेल्या आहेत. महानगरपालिका व सिडको अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेण्यात यावी सध्या मा आयुक्तांकडेच सिडकोचा अतिरिक्त कार्यभार आहे.

श्री.गजानन बारवाल :सिडको खुल्या जागा विकून टाकत आहे. त्यासाठी त्वरीत योग्य कार्यवाही करण्यात यावी.

श्री.भगवान घडामोडे :ज्या ज्या नागरी सुविधा हस्तांतरीत करून घ्यावयाच्या त्यांचा त्या त्या भागातील नगरसेवक व महापालिका सिडको अधिकारी संयुक्त पाहणी करतील असे पूर्वी ठरले होते. सिडको बुकलेट नुसार सेवा सुविधा पुरविलेल्या आहेत किंवा नाही हे पहावयास पाहिजे अन्यथा एवढया मोठया प्रमाणात महापालिका सुविधा पुरवू शकणार नाही. प्रथम सर्व्हे करण्यात यावा व त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर यासाठी स्वतंत्र बैठक बोलविण्यांत यावी.

मा.महापौर : सिडको हस्तांतरण प्रश्नावरती चर्चा करण्यासाठी २०-१२-९९ रोजी स्वतंत्र सर्वसाधारण सभेचे आयोजन केले जाईल व त्या बैठकीत या प्रश्नावर चर्चा केली जाईल. बैठकीसाठी परिपूर्ण प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको हस्तांतरच्या प्रस्तुत प्रस्तावाबाबत विशेष सर्वसाधारण सभेचे आयोयजन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१३१/३** :

प्र.कार्यकारी अभियता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.भिमनगर भावसिंगपूरा स्लम येथील नाल्यास महाजन क्लिनीक पासून श्री.एकनाथ भालेराव यांच्या घरापर्यंत संरक्षित भिंत बांधणे बाबत (नाल्यांच्या दोंन्ही बाजूस) कामाकरीता सा.बा.खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसूचिनुसार रक्कम रू.४६,७५,९००/- चे अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम शासकीय अनुदान ९९-२००० या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ७-१२-९९ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

करिता सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.४६,७५,९००/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथ मंजूरीस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर भावसिंगपूरा स्लम येथील महाजन क्लिनिक पासून श्री.एकनाथ भालेराव यांच्या घरापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रू.४६,७५,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुंमते स्विकृतिसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३२/४** :

प्र.कार्यकारी अभियता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.सादतनगर स्लम भागातील नाल्यास खंडकी लायनिंग करणे बाबत कामाकरीता सां.बा. खाते यांच्या वर्ष ९८-९९ च्या दरसूचिनुसार रक्कम रू.१६,४५,०८३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "शासकीय अनुदान" ९९-२००० या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या

अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहंबांनी दिनांक ८-१२-९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करिता सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.१६,४५,०८३/-यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादतनगर स्लम भागातील नाल्यास खांडकी लायनिंग करण्याच्या कामास रक्कम रू.१६,४५,०८३/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३४/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलिस उपअधिक्षक-ड ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्याचे कडील दिनांक २५-६-९७ च्या यपत्रान्वये कळविले होते की, श्री.भरत जानराव देवकर, इमारत निरिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद यांना दिनांक २३-६-९७ रोजी रूपये ५००/- ची लाच घेताना पकडण्यात येवून त्यांचे विरूध्द पोलिस स्टेशन, जिन्सी औरंगाबाद येथे गुन्हा र.नं.२-३१/९७ कलम ७,१३ (१) (ड) सह १३ (२) ला प्र.कायदा १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असल्याचे व त्यांना दिनांक २४-६-९७ रोजी ३.१५ वाजता अटक करून दिनांक २६-६-९७ पर्यंत त्यांची पोलिस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली होती.

त्यास्तव श्री. भरत जानराव देवकर, इमारत निरिक्षक महानगरपालिका, औरंगाबाद कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/अस्था-१/९७/३७७१ दिनांक १७-७-९७ अन्वये दिनांक २४-६-९७ पासून निलंबित करण्यात आलेले आहे. उक्त आदेश रद्य करून कामावर घेण्याबाबत श्री.देवकर यांनी मा.स्थायी समितीकडे अपिल दाखल केले असता, मा.स्थायी समितीने दिनांक २४-१२-९८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे ठराव क्र.४३१/१६ अन्वये ठराव पारित केलेला आहे की,

१ महाराष्ट्र नागरी सेवा (श्स्ति व अपिल) नियम/नुसार ४८ तासापेक्षा जास्त कालावधीत पोलिस कस्टडीत होते. संबंधितावर ठेवण्यांत आलेले दोषारोप न्यायालयामधून अद्याप सिध्द व्हावयाचे आहे.

२ महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरीकांच्या जमा झालेल्या करातूनच देण्यात येतात. त्यामुळे प्रकरणांत कर्मचाऱ्यांस निलंबित ठेवून ७५% टक्के वेतन देणे योग्य वाटत नाही.

३ उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निंलबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रद्य करण्यांत येते. तसेच निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहित धरण्यांत यावा. संबंधितास कामावर रूजू करण्याचे आदेश द्या ावेत प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.स्थायी समितीने पारीत केलेल्या उक्त ठरावाच्या अनुषंगाने प्रकरण सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

मा.महापौर : स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात येतो स्थायी समितीने निर्णय घ्यावा. आजच्या सभेत मंजुर करण्यात आलेले सर्व प्रस्तावांना स्विकृती देण्यांत येते.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार इमारत निरिक्षक श्री.भरत देवकर यांचे प्रकरण पुन्हा स्थायी समितीकडे पाठवून सदर प्रकरणी स्थायी समितीने फेर चौकशी करून निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले. सदर प्रस्तावास याच सभेत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३४/६** :

कार्यकारी अभिंयता पाणीपुरवठा व जलनिःसारण विभाग महानगरपालिका यांनी एन-११ विकसीत भागासाठी पाणी पुरवठयाचा प्रस्ताव रू.२०३.४० लाखाचा सादर केला असून सदर प्रस्तावात खालील उपभागाचा समावेश केला आहे.

१ ५०८ मी.मी.व्यासाची पोलादी पाईपाची गुरुत्व वाहिनी २५०० मीटर एन-७ ते एन-११ पर्यंत

२ २६.०० लाख लिटर्स क्षमतेचा उंच खांबावरील जलकुंभ .

३ ५.५० लाख लिटर्स क्षमतेची टाकी व पंपगृह

४ पंपीग मशीनरी

५ ३०० मी.मी.व्यासाची उर्ध्वनलिका

पुढील वर्षी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तर्फे तयार होत असलेल्या वाढीन योजनेद्वारे सिडको विभागास ५५.०० द.ल.लिटर्स प्रतिदिनी पाणी मिळणार आहे. यापैकी एन-११ व विकसीत भागासाठी (सुरेवाडी,जाधववाडी,एन-१२,एन-१३ वगैरे) १० द.ल.प्रति दिनी पुरवठा नियोजित आहे. हया पाण्याच्या साठवण व वितरणसाठी प्रस्तावित योजना अत्यावश्यक व जरूरीची आहे. करीता अंदाजपत्रक रू.२०३.४० लाखाचा प्रस्ताव मंजुरीबाबतचा सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तर्फे पुढील वर्षी सिडको भागासाठी प्रतिदिन ५५.०० द.ल.लिटर्स पाणी मिळणार असल्याने हया पाण्याच्या साठवण व वितरणासाठी प्रस्तावित अ.क्र.१ ते ५ पर्यंतची योजना अत्यावश्यक व जरूरी असल्याने रक्कम रूपये २०३.४० लाखाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३५/७** :

मी गोकुळ जेजुरकर हे किडनीच्या विकाराने आजारी असून त्यांना अनेक स.नगरसेवकांनी आपल्या स्वेच्छा निधी मधून किडनीच्या आजारावरील उपचारासाठी प्रत्येक एक हजार रूपये आर्थिक मदत म्हणून दिलेले आहेत असे एकूण रू.२५०००/- रूपयाचे पत्र आर्थिक मदती बाबत त्यांना मिळालेले आहे.परंतु महानगरपालिका नियमानुसार फक्त रू.१५०००/- मंजुर करण्याची तरतुद आहे. या प्रकरणात आपण रक्कम रूपये २५०००/- संबंधितास किडणीच्या आजारावर उपचारासाठी विशेष बाब म्हणून देणे आवश्यक आहे. जेणे करून त्यांना किडनीच्या रोगावरील उपचाराकरीता वरील रक्कम मिळू शकेल.

तरी सदरील प्रकरणात विशेष बाब म्हणून संबंधितास स्वेच्छा निधी मधून रू.२५,०००/- आर्थिक मदत देणेस सर्वानुमते मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.
सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे
अनुमोदक : श्री.रविंद्र (राजू ) इंगळे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.गोकुळ जेजूरकर हे किडनी च्या विकाराने आजारी असल्याने संबंधितास किडनीच्या आजारावरील उपचारासाठी विशेष बाब म्हणून रूपये २५,०००/- स.नगरसेवकांचे स्वेच्छा निधी मधून आर्थिक मदत देणेस सर्वानुमते स्विकृतिसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३६/८** :

औरंगाबाद शहरात बि बियाणे, किटकनाशके, कृषी उपयोगी औषधे व रासायनिक खते आयात करण्यात येतात. महानगरपालिकेमार्फत त्यांना नियमानुसार जकात आकारण्यात येते. सदरील औषधे , खते, बियाणे हे शेतकऱ्यांना स्थानिक व्यापाऱ्यामार्फत जास्त दराने विकत घ्याव्या लागतात.

बियाणे किटक नाशके , खते हे शेतकऱ्यांना नेहमीच वापरावे लागत असल्याने त्यांना जकातीचा भुंर्दंड पडतो. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान विचारात घेता या कृषी उपयोगी वस्तू वरील जकात माफ करणे आवश्यक आहे, जेणे करून शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.गिरजाराम हाळनोर,
अनुमोदक: श्री.कचरू नवपुते
दिनांक : ९-१२-९९

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात आयात होणाऱ्या बि बियाणे, किटक नाशके, कृषी उपयोगी औषधे व रासायनिक खते यावर महानगरपालिके मार्फत नियमानुसार जकात आकारण्यात येते. सदरील औषधे, खते, बियाणे हे शेतकऱ्यांना स्थानिक व्यापाऱ्यांना नेहमीच वापराव्या लागतात.

शेतकऱ्यांना जकातीचा भुंर्डंड पडतो, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान विचारात घेत या कृषी उपयोगी वस्तु वरील जकात माफ करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदर प्रस्तावात याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३७/९**:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगपूरा भाजी मार्केट समोर सुराणा बिल्डींगचे खालील नाल्यावर महानगरपालिकेच्या शॉपिंग सेंटरच्या मागे नाल्याची खुली जागा पुलाचे बाजूस असलेली मोकळी जागा"कामगार शक्ती संघटना " महानगरपार्लिका व संघटनेस ३० वर्षाचे भाडे पटट्यावर जागा अंदाजे १३० x ४० देण्यात यावी. करिता सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.अफसर खान, श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.गौतम लांडगे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हमीदोद्दीन ताबा, श्री.श्री.मोहसिन अहदम, श्री.संजय जोशी
अनुमोदक : श्री.भगवान घडामोडे,श्री.अविनाश कुमावत, श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपूरा भाजी मार्केट समोरील, व महानगरपालिकेच्या दुकान केंद्राच्या मागे असलेली नाल्याची खुली जागा व पुला लगत असलेली मोकळया जागेपैकी सुमारे १३०" x ८०" चौरसफुट जागा कामगार शक्ती संघटना, महानगरपालिका औरंगाबाद या संघटनेस ३० वर्षाच्या भाडे पटट्याने देण्यांत सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८/९** :

औरंगाबाद शहराचे विकासा बरोबर औरंगाबाद शहरात विविध सामाजिक संस्था तसेच वर्तमानपत्रे सामाजिक कार्य करत आहे. औरंगाबाद सिडकोने लोकपत्र ,एकमत, लोकमत, इत्यादी विविध वर्तमान पत्रांना सवलतीचे दराने व भाडे पटट्याने त्यांच्या कार्यासाठी जागा दिली आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेने सुध्दा विविध संस्थांना जागा भाडेपटट्याने दिलेले आहेत. औरंगाबाद शहरातील एक वर्तमानपत्र मुकदस यास औरंगाबाद महानगरपालिकेचा मालकीची असलेली नगर भूमापन क्र.१२०४१ मध्ये २००० चौ.मिी. क्षेत्राची जागा ९९ वर्षाचा भाडेपटट्याने त्यांचे सामाजिक कार्यास हातभार लावण्याचे दृष्टीने देणे साठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.अफसर खॉन

अनुमोदक : श्री.प्रदिपकुमार जैस्वाल

श्री.संजय केनेकर

श्री.नरेंद्र पाटील

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय

श्री.गौतम खरात

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर भूमापन क्र.१२०४१ महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेपैकी २०००=०० चौ.मी.जागा औरंगाबाद येथील दैनिक वृत्तपत्र मुकदत या वृत्तपत्रस ९९ वर्षाच्या भाडेपटट्याने प्रदान करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३९/११ :**

सौ.शोभा उत्तम देहाडे हया मोतीकारंजा औरंगाबाद येथील रहिवाशी असून हदय विकाराने आजारी आहेत. त्यांचे हदयावर एन.एम.वाडीया रूग्णालय , पुणे येथे शस्त्रक्रीया करण्यात येणार असून हदय शस्त्रक्रीयेसाठी रक्कम रूपये १,४५,०००/- एवढा खर्च करणेस असमर्थ आहेत.

संबंधिताची आर्थिक परिस्थीती विचारात घेता त्यांना नगर सेवक स्वेच्छा निधी मधून विशेष बाब म्हणून रक्कम रूपये २५०००/- आर्थिक मदत मंजुर करणे साठीप्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी

अनुमोदक: श्री.गिरजाराम हाळनोर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सौ.शोभा उत्तम देहाडे यांच्या हदयावरील शस्त्रक्रीया करणेसाठी व औषधोपचारासाठी स.नगरसवेकांच्या नगर सेवक स्वेच्छा निधी मधून विशेष

बाब म्हणून रक्कम रूपये २५०००/- आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच जन गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २०-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सोमवार दिनांक २०-१२-९९ रोजी दूपारी ३.०० वाजता मा.महापौर श्री.सुदाम पाटील सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात " वंदेमातरम् " या गीताने सुरूवात झाली. सदर सभेस कार्यालयीन अधिकारी व स. सदस्य उपस्थित होते.(सभासदांची उपस्थिती हजेरी रजिस्टर प्रमाणे )**

| | | |
|---|---|---|
| १ | स.स.श्री.केनेकर संजय किशनराव | उप महापौर |
| २ | स.स.श्री.ढगे नरसिंग मुरलिधर | स.सदस्य |
| ३ | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव | स.सदस्य |
| ४ | स.स.श्री.अफसर खॉन यासीन खान | |
| ५ | स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव | |
| ६ | स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | |
| ७ | स.स.सौ.साजेदा बेगम | |
| ८ | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | |
| ९ | स.स.ॲड गणेश किशनराव वानखेडे | |
| १० | स.स.सौ.जोशी रजनी रमेश | |
| ११ | स.स.सौ.उषाबाई दिलीप गायकवाड | |
| १२ | स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | |
| १३ | स.स.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | |
| १४ | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | |
| १५ | स.स.नरेंद्र यादवराव पाटील | |
| १६ | स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | |
| १७ | स.स.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | |
| १८ | स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | |
| १९ | स.स.सौ. पदमा बाबुराव शिंदे | |
| २० | स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | |
| २१ | स.स.श्री.मालाणी प्रफुल्ल लालचंद | |
| २२ | स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | |
| २३ | स.स.सौ. विसपुते धनश्री अशोक | |
| २४ | स.स.श्री.फजलउल्ला खान उजमतउल्लाखान | |
| २५ | स.स.श्री.अजीज खॉ गणी खॉ | |
| २६ | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा | |
| २७ | स.स.सौ.नुरजहॉं बेगम अ.रहेमान खॅान | |
| २८ | स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव | |
| २९ | स.स.श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद | |
| ३० | स.स.श्री.मुजीब आलमशाह मीर आलमशाह | |
| ३१ | स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | |

३२ स.स.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर
३३ स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
३४ स.स.सौ.वाडेकर यशोदा धनंजय
३५ स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर
३६ स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद
३७ स.स.श्री.हमीदोद्यीन ताबा फसीयोद्यीन
३८ स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद
३९ स.स.श्री.स.अ.इकबालोद्यीन स.मो.कुतुबोद्यीन
४० स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
४१ स.स.श्री.स.अली मिरा सलामी
४२ स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद
४३ स.स.श्री.फैय्याज अहमद म.हाजी कुरैशी
४४ स.स.सौ. लता श्रीनिवास दलाल
४५ स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
४६ स.स.श्रीमती अलका रमेश पाटील
४७ स.स.सौ.धांडे शकुंतला हरिदास
४८ स.स.श्री.अ.रशिद खॉन (मामू)
४९ स.स.कु.माया लिंबाजी लाडवाणी
५० स.स.सौ.आव्हाड सविता संजय
५१ स.स.सौ.निर्मला विठठ्ल कांबळे
५२ स.स.श्री.अब्दुल रशिद अ.सत्तार
५३ स.स.श्री.विखारोद्यीन पि.खु्दबोद्यीन
५४ स.स.श्री.जैन विकास रतनलाल
५५ स.स.श्री.बारवाल गजानन रामकिशन
५६ स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
५७ स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
५८ स.स.श्री.जोशी संजय रामदास
५९ स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
६० स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
६१ स.स.सौ.ज्योत्सना दौलत हिवराळे
६२ स.स.श्री.राजकुमार बचाटे (मामा)
६३ स.स.श्री.विठठ्ल किसन जाधव
६४ स.स.श्री.मेहेर विजयकुमार गजानन
६५ स.स.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे
६६ स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
६७ स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास
६८ स.स.श्री.नवपुते कचरू चंद्रभान
६९ स.स.सौ.फरहद बानो भ्र. मो.नवाज

**संवाद :**

श्री.नरेंद्र पाटील :सिडको हस्तांतरण या विषयावर बोलण्याआधी मी सांगू इच्छीतो की, मागील २-३ दिवसापासून बरेचसे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत परंतु बऱ्याच स.

नगरसेवकांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यांत आलेले नाही. कार्यक्रमाचे नियंत्रण सर्वच स. नगरसेवकांना जावयास हवे. असे प्रकार होवू नये याची दखल घ्यावी.

मा.महापौर : सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यांत येते की, सर्व कार्यक्रमांच्या पत्रिका स.नगरसेवकांना देण्यात याव्यात व पत्रिका दिल्याबाबत त्याच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

श्री.मोहसिन अहमद : कार्यक्रम पत्रिकांवर मा. आमदार श्री.राजेंद्र दर्डा यांचेही नांव टाकण्यात यावे हा मतदार संघ त्यांचा आहे . पत्रिकेवर त्यांचे नाव असावे.

मा.महापौर : स.नगरसेवकांनी सांगितल्यानंतर आपण संबंधिताची नांव पत्रिकेवर टाकतच असतो.

श्री.नरेंद्र पाटील : आपला पक्ष सरकारात नसला तरी अधिकृत शासकीय कार्यक्रमांना पालक मंत्र्यांना बोलावयास पाहिजे कारण आपण अनुदान मागण्यासाठी सरकारकडेच जात असतो.

श्री.प्रदिप जैस्वाल :प्रथम सिडको हस्तांतरणाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यांत यावी व नंतरच इतर विषय चर्चेले जावेत. अशा इतर विषयांसाठी एक स्वतंत्र बैठक बोलविण्यांत यावी.

**विषय क्र.१४०/१** :

दिनांक १३.१२.९९ च्या सर्वासाधारण सभेतील सभागृहाचे मागणीनुसार सिडको औरंगाबाद कडील सेवा सुविधा औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनांचे उपसचिव यांनी पत्र क्र. डी.ओ.सी.१०९५/७५९/प्र.क्र.१६५/९५ दिनांक २७-१०-९९ रोजी पत्र देवून दिनांक ३-८-९९ रोजी मा. प्रधान सचिव , नगर विकास यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रधान सचिव यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सिडको , औरंगाबाद कडील पाणी पुरवठा , रस्ते मलःनिसारण ,पथदिवे व विद्युतीकरण इत्यादी सेवा, सुविधा औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतरीत करून घेण्याबाबत कळविले आहे. दिनांक ३-८-९९ रोजी मुंबई येथे संपन्न झालेल्या उच्चस्तरीय बैठकीमध्ये प्रधान सचिव यांनी निर्देश दिले आहे की, ज्या बाबीवर सिडको प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांचे मध्ये वाद नाही त्या बाबीचे टप्प्याटप्पयाने हस्तांतरण करून घेण्यांत यावे.

तरी शासनाच्या निर्देशानुसार सिडको कडील सेवा सुविधा औरंगाबाद महानगरपालिकाकडे हस्तांतरण करण्या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

<u>**संवाद:**</u>

श्री.नरेंद्र पाटील : आमच्या भावनांचाही कदर व्हावी सिडको हा मागील २५ वर्षात शासनाने राबविलेला प्रकल्प आहे. गेल्या १० वर्षात लोकसंख्या व इतर प्रगतीचा वेग या भागात मोठा होता १९८२ साली महानगरपालिका अस्तित्वात आली. १९८८ साली प्रथमतः व लोकप्रतिनिधी या महानगरपालिकेवर निवडून आले प्रत्येक महापौरांनी आपल्या कार्रकिदीचा महत्वाचा मुद्या समजून सिडको हस्तांतरणाच्या बैठका घेतल्या परंतु दुदैवाने कोणताही निर्णय झाला नाही. कारण त्यास अनेक कारणे होती त्या अनेक कारणांपैकी गेल्या दहा वर्षापुर्वी जेव्हा ही हस्तांतरणाची चर्चा सुरू झाली तेव्हा लक्षात आले की, सिडकोने ज्या नागरी सुविधा देण्यांचे आश्वासन दिले होते त्या सुविधा दिल्याच नाहीत

त्यामुळे सुरूवातीच्या काळात जन आंदोलने झाली व सिडको हस्तांरणात विरोध करण्यांत आला. परंतु त्याच वेळेस सर्व पक्षीय नेत्यांनी अविकसित भागाच्या मागण्या सिडकोपुढे ठेवताच सिडकोने त्या मागण्या मान्यही केल्या १९९०-१९९३ पर्यंत जवळजवळ ७५ ते ८०% सुविधा देण्याचा सिडकोने प्रयत्न केला १९९५ साली महानगरपालिकेची निवडणूक झाली तेव्हापासून आजपर्यंत पुन्हा केवळ चर्चाच होत आहे. सरकार बदलले तरी काही फरक पडलेला नाही. सिडको व महानगरपालिकेची परिस्थिती आहे तशीच आहे.

अस्तित्वात परंतू आपण सर्वप्रथम महापौर या नात्याने निवडून आल्यानंतर सिडको हस्तांतरण करूनच घेणार ही भूमिका घेतली व आपण हस्तांरण करूनच घ्याल अशी मला अपेक्षा आहे. परंतू हस्तांतरण करतांना त्याचे दोन भाग आहेत प्रशासन व लोकप्रतिनिधी. लोकप्रतिनिधी म्हणून जनतेस हस्तांतरण काय अपेक्षित आहे याची दखल घ्यावयास पाहिजे, लाईन्स टाकणे, टाक्या बांधणे पैसे देणे घेणे हा प्रशासकीय भाग आहे. सिडकोचे हस्तांतरण होत असतांना या भागातील मालमत्ता तेथील लोकांच्या नांवावर झ ााल्या पाहिजेत १५-२० टक्के लोकांनी सिडको भागातील मालमत्तावरील कर भरलेला आहे. सिडको प्रशासन या भागातून सेवाकर घेते. सिडकोच्या हस्तांतरणापासून मालमत्ता कर आकारण्यात यावा. जो कर भरण्यात आलेला आहे तो त्या मालम्तता धारकांचे नांवे जमा करण्यात यावा व हस्तांतरण होईल त्या दिवसापासून तो नियमित करण्यांत यावा.

सिडकोची लोकसंख्या वाढलेली आहे आज सिडकोची लोकसंख्या दुप्पट झ ाालेली आहे. सिडकोने दवाखाने, वाचनालये शाळा यासाठीचे प्लॉट्स् खाजगी संस्थांना दिलेले आहेत. सिडकोने लायन्स क्लबला दवाखान्यासाठी जागा दिलेली आहे. परंतू तेथे ११-११ महिने कोणतीही ॲक्टीव्हीटी होत नाही. सिडकोतील रिकाम्या जागा महानगरपिलकास हस्तांतराने कराव्यात ज्यामुळे महानगरपालिका भविष्यात आवश्यक त्या कारणासाठी वापर करू शकेल या रिक्त जागा सिडकोने विनापैसा महानगरपालिकेस द्याव्यात कोणी किती पैसा कोणास द्याव्यात हा भाग महानगरपालिका व सिडको प्रशासनाने ठेवावे, आता सिडको कंगाल झालेली आहे. आमच्या मागण्यांचा अंतर्भाव झ ााल्यानंतरच हस्तांतरण करण्यांत यावे. या शिवाय हस्तांरण होणार नाही.

श्री.प्रदिप जैस्वाल : स.नगरसेवक नरेंद्र पाटील यांनी सांगितले कि, १९८८ पासून हस्तांतरणाचा प्रश्न चर्चीला जात आहे. परंतु आतापर्यंत हस्तांतरण झालेले नाही याबाबत अनेक बैठका झाल्या. सिडको भागातील रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा लाईन्स, लाईट यांची आजची परिस्थिती कशी आहे याची माहिती द्यावयास हवी. ऑगस्ट ९९ मध्ये बैठक झाली होती. त्यावेळेस रोड ड्रनेजची परिस्थिती काय होती. प्रत्येक सेक्टरमध्ये वॉटर सप्लाय ड्रनेज लाईन आहे की नाही हे पहाणे गरजेचे आहे. सिडको हस्तांतरणानंतर या सुविधांची जबाबदारी महानगरपालिकेवर येवून पडणार आहे. सिडकोतील लोकसंख्या वाढलेली आहे. सिडकोने जो करार केला होता त्यानुसार त्यांनी सर्व सुविधा पुरविल्या आहेत की, नाही याचा विचार होणे गरजेचे आहे.सिडको हस्तांतरणानंतर या सुविधाची जबाबदारी महानगरपालिकेवर येवून पडणार आहे. सिडको तील लोकसंख्या वाढलेली आहे. सिडकोनी जो करार केला होता त्यानुसार त्यांनी सर्व सुविधा पुरविलया आहेत की नाही

याचा विचार होणे गरजेचे आहे. सिडकोने रिकाम्या जागा, उद्या ाने महानगरपालिकेस द्यावयास हव्यात यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडू शकेल. ओपन स्पेस मध्ये महानगरपिलकेस शॅापिंग कॉम्पलेक्स बांधता येतील हस्तांरणाचे वेळा अशा प्रत्येक मुद्या ावर चर्चा करण्यांत यावी.

श्री.मोहसिन अहमद : सिडको हस्तांतरणाच्या प्रस्तावर स.नरेंद्र पाटील व प्रदिप जैस्वाल यांनी सविस्तर चर्चा केली आहे. सिउकोने हस्तांतरण महानगरपालिकेकडे करण्यांत यावे . यासाठी महानगरपालिका सभागृहात ८-१० वर्षापासून चर्चा चालू आहे हे सर्व करत असतांना सिडकोच्या खुल्या जागा, ज्या संस्थांना दवाखाने, वाचनालय यासाठी रिजव्हेशनमधील जागा सिडकोने दिल्या आहेत काय याची चौकशी करावयास हवी. हस्तांतरणाच्या दिवसापासून सिडको भागातील मालत्तावर कर लावण्यात यावा व ज्या नागरिकांनी कर भरलेला असेल तो महानगरपिलकेत जमा करण्यांत यावा. सिडको भागातील पाण्यावर महानगरपालिकेस लाखो रूपयाचे नुकसान होत आहे. याचा भार रहिवासियांवर पडतो. सिडकोने वाचनालय, दवाखाने आदि सुविधा दिलेल्या नाहीत मात्र महानगरपालिका या भागात शाळा, दवाखाने चालवत आहे. यासाठी महानगरपालिकेस लाखो खर्चावे लागतात. सिडको भागात महानगरपालिकेने ज्या सुविधा दिल्या आहेत त्या शहरवासियांच्या करातूनच दिल्या जातात हा झालेला खर्च सिडकोने महानगरपालिकेस द्या ावयास हवे अथवा शासनाने द्यावयास हवा त्यानंतरच सिडकोचे हस्तांरण व्हावे.

श्री.अफसर खॉंन :उपमहापौरांची खुर्ची खाली आहे. व उप महापौर सभागृहात बसलेले आहेत.

मा.महापौर : सभागृहात काय आहे असे उपमहापौर श्री.संजय केनेकर यांनी सांगितले उप महापौरांची खुर्ची खाली राहू नये म्हणून श्री.संजय जोशी यांनी उपमहापौर म्हणून बसावे.

मा.उपमहापौर :

श्री.संजय केनेकर : मी यासाठी सभागृहात खाली बसलो आहे की, या प्रशसना तर्फे या खुर्चीचा मान ठेवला जात नाही. जकात प्रश्नाबाबत मी आज पत्र दिले परंतु प्रशासन त्यावर काहीही करत नाही, भ्रष्टाचार मुक्त प्रशासन हे मला अभिप्रत आहे.

मा.महापौर : सिडको हस्तांतरणाची बैठक संपल्यानंतर आपल्या प्रश्नावर चर्चा केली जाईल.

श्री.हमीद ताबा :उपमहापौर भ्रष्टाचाराच्या प्रश्नावर बोलत आहेत त्यांना त्यावर बोल द्यावे.

श्री.भगवान घडामोडे : उपमहापौर श्री.संजय केनेकर यांच्या काय मागण्या आहेत हे समजून घ्यावयास पाहिजे. प्रशासन जर उप महापौरांचे म्हणणे ऐकत नसेल तर या बाबींचा निषेध व्हावयास हवा.

श्री.अब्दुल रशिद खान (मामू) : उप महापौरांना त्यांच्या खुर्चीवर बसवावे मा. आयुक्त त्यांच्या प्रश्नावर योग्य ती कार्यवाही करावी. मा. उप महापौर, मा. उपमहापौरांनी त्यांच्या खुर्चीवर विराजमान व्हावे व समोपचाराने हा प्रश्न सोडविण्यांत यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : १९७५ साली सिडकोची वसाहत स्थापन करण्यांत आली. या वसाहतीचा एवढा व्याप वाढला की, सिडको भागात जवळपास २०,००० घरे आणि जवळपास १०-१२ हजार प्लॅाट्स् विक्री करण्यांत आली.

सिडकोची लोकसंख्या आज जवळपास तीन लाख एवढी आहे. सिडकोने प्रत्येक सेक्टरला काही सुविधा देण्यांचे कबुल केले होते. तथापी अद्यापही या भागात २०-२५ टक्के सुविधा देणे बाकी आहे. प्रत्येक सेक्टरमध्ये कम्युनिटी सेंटर, हेल्थ सेंटर देण्यांत येईल असे सिउकोतर्फे सांगण्यात आले होते. परंतू बऱ्याचश्या सेक्टरमध्ये या सुविधा दिल्या गेलेल्या नाहीत . या भागात एन-१२ मध्ये एक लहान हेल्थ सेंटर चालू आहे. परंतू भविष्यात जेव्हा हे हेल्थ सेंटर वाढवावे लागेल त्यावेळी जागेची गरज भासणार आहे. १९७७-१९८० पर्यंत सिडकोची लोकसंख्या फक्त १०-१५ हजार होती ती आता तीन लाखावर आहे. सिडकोत होणाऱ्या भविष्यकालीन विस्ताराची गरज लक्षात घेणे आवश्यक आहे. सिडकोने या भागातील संपूर्ण मालमत्ता व प्लॉटस् लिजवर दिलेले आहेत हे लिज बंद करून ते फ्री होल्ड करण्यांत यावेत घरांचा मालकी हक्क लोकांना देण्यांत यावा. हस्तांतरण होईल त्या दिवसापासून मालमत्ता कर लावण्यात यावा. या भागातील काही नागरीकांनी मालमत्ता कर भलेला आहे तो पुढील काळात समायोजित करण्यांत यावा. सिडको हस्तांतरणानंतर या भागात महानगरपालिकेस एखादा प्रकल्प राबवावयाचा असेल तर या भागातील नियोजनाचे अधिकार महानगरपालिकेस मिळावयास हवेत २०-२५ हजार घरे या भागात स्किममधून बांधलेली आहेत. परंतू गेल्या १५ वर्षात त्या घराच्या साईज वाढलेल्या आहेत. सिडकोतील जनतेने मुळ घरांचे एक्सपांशन केले. आणि अशी जवळपास २०,००० घरे सिडकोत आहेत. या घरांना एफएसआय वाढवून देणे आवश्यक आहे. सिडकोने काही अटींवर ३०% एफएसआय वाढवून दिला आहे . परंतू १००% एफएसआय साठीची फी सिउकोने आकारली आहे.म्हणून अशा मालमत्ता धारकांना एफएसआय दोष देणे गरजेचे आहे. सिडकोने खुल्या जागा, मोकळी मैदाने सोडली आहेत परंतू त्या ठिकाणी अशा जागांवर १३ अनाधिकृत वसाहती निर्माण झालेल्या आहेत. सिडकोचे हस्तांतरण झाल्यानंतर जागांवर महानगरपालिका डेव्हलपमेंट करू शकणार नाही. पर्यायी या भागातील नागरिकांना नागरी सुविधा मिळू शकणार नाही. सिडकोने या जागा डिमोटीफाईड कराव्यात . सिडकोतील खुल्या जागा काही संस्थांना १००% लिजवर दिलेल्या आहेत असे लिज रदद् करून त्या जागा महानगरपालिकेस देण्यात याव्यात. एन-५ सेक्टर मध्ये नाटयगृहासाठी कोणशिला बसविली होती. परंतु तेथे कोणतीही डेव्हलपमेंट झालेली नाही हे नाटयगृह पुर्वीच बांधले गेले असते तर त्यावरील संपूर्ण खर्च सिडकोस करावा लागला असता. परंतु हस्तांतरणानंतर महानगरपालिकेस हा खर्च करावा लागेल. हस्तांतरणाचे वेळी नाटयकृहासाठी येणारा संपूर्ण खर्च सिडकोकडून घेण्यात यावा. सिडको भागात ४४ पुनवर्सित सोसायटया आहेत. सिडको या सोसायटयांवर केलेल्या ॲग्रीमेंटमध्ये १९९२ त्यांच्या फायदयासाठी काही फेरबदल केले व लाखो रूपये गोळा केले. या सोसायटयांच्या विकासासाठी सिडकोने घेतलेले पैसे महानगरपालिकेकडे वर्ग करावेत व त्या पैशातून मनपाने या सोसायटयांचा विकास करावा हस्तांतरणाचे वेळी मानवतेचा दृष्टीकोन ठेवून सफाई कामगारांना महानगरपालिकेत सेवेत सामावून घ्यावे कारण या भागातील साफसफाईसाठी मजूराची गरज भासणारच आहे.

श्री.रशीद खॉंन (मामू) : प्रशासनातर्फे पुरविलेल्या टिपणीत सर्व बाबी आलेल्या आहेत. दिनांक २७-७-९९ रोजी मा. आयुक्त व सिडकोच्या मुख्य प्रशासकांची चर्चा झाली परंतू त्या चर्चेत काय ॲग्रीमेंट झाले याची माहिती देण्यांत यावी. या संदर्भाने प्रशासनाची नेमकी काय भूमिका आहे याचा खुलासा व्हावा. प्रशासन सभागृहाचे नॉमीनल मंजूर घेवू इच्छिते काय ?

श्री.गजानन बारवाल : आपण जो प्रश्न मांडलेला आहे त्यांवर आपणास निर्णय घ्यावयाचा आहे. सिडकोची सद्यस्थिती पाहता आपण त्यांच्याकडून नेमके काय घेवू शकतो हे पहावयास हवे. सिडको भागात ज्या खुल्या जागा ओत त्या महानगरपालिकेकडे घेण्यात याव्यात सिडकोने या जागा विक्री करू नयंत . विद्युत रस्ते, ड्रेनेज आदिंचे प्रश्न हाती घ्यावे लागतील. यासाठी एखादी समन्वयक समितीची बैठक घेण्यात यावी. मालमत्ता कर हस्तांतरणा दिवसापासून लावावा. सिडकोकडून जे पैसे घ्यावयाचे आहेत त्या बाबत मा. मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेवून हा प्रश्न सोडविण्यात यावा.

डॉ.विजय कुमार मेहेर :मागील चार वर्षापासून या विषयावर अनेक बैठका झालेल्या आहेत या बैठकामधून विचारमंथन झालेले आहे व नगर सेवकांनी आपल्या मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. सिडकोतील घरे नागरिकांच्या मालकीची झाली पाहिजेत ही मुख्य मागणी आहे परंतू या मागणीचा या टिपणीत कोठेही उल्लेख नाही. अथवा शासनातर्फे तशा प्रकारचे आवश्वासनही देण्यांत आलेले नाही. केवळ सेवांचे हस्तांतरण होणे म्हणजे सिडकोचे हस्तांतरण नव्हे. मालकी हक्काची कागदपत्रे मिळाल्याशिवाय नागरिकांचे समाधान होणार नाही. सिडको प्रशासन फक्त पैसा गोळा करणे जाणते. हस्तांतरणाच्या दिवसापासून मालमत्ता कर घेण्यांत यावा. सर्वोकर व मालमत्ता कर ही दुहेरी पध्दत बंद करण्यांत यावी. सिडको हस्तांतरणाचा निर्णय स. नगरसेवकांना विश्वासांत घेवूनच घेण्यात यावा. सामान्य नागरिकांना हस्तांतरणाचा निर्णय मान्य आहे काय याचा विचार व्हावयास पाहिजे. काही नगरसेवकांनी सिडकोच्या पाणीपुरवठयात तोटा येतो असे म्हटले परंतू शहराच्या पाणी पुरवठयातच तोटा येतो असे म्हटले परंतु प्रॉपर्टीसह हस्तांतरण व्हावे.

श्री.अविनाश कुमावत : सिडको हस्तांतरणा संदर्भाने पुरविण्यात आलेल्या टिप्पणीतील कॉलम क्र.८ मध्ये दर्शविलेले आहे की, सिडको भागात १३ अनाधिकृत वसाहती निर्माण झालेल्या आहेत. त्यांच्या विकासासाठी १५ कोटी रूपये खर्च येणार असून हा पैसा शासनाकडून घेण्यात यावा असे सुचविलेले आहे. शासन हा पैसा महानगरपालिकेस देणार आहे काय ? या अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा देण्यासाठी प्रथमतः शासनाकडून १५ कोटी रूपये मागण्यात यावेत. शासनाने हे पैसे दिले नाहीत तर सिडकोकडून ते घेण्यांत यावेत या वसाहतीसाठी सिडको जबाबदार आहे . शासन हा पैसा महानगरपालिकेस देणार आहे काय ? या अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा देण्यासाठी प्रथमतः शासनाकडून १५ कोटी रूपये मागण्यात यावेत. शासनाने हे पैसे दिले नाहीत तर सिडकोकडून ते घेण्यात यावेत. या वसाहतींसाठी सिडको जबाबदार आहे . शासन हा पैसा महानगरपालिकेस देणार नाही.

श्री.मुजीब आलम :या बैठकीत सिडकोचे अधिकारी उपस्थित असावयास पाहिजे होते

आम्ही विचारलेल्या प्रश्नांना ते उत्तरे देवू शकतील आजच्या बैठकीतील प्रश्नांना उत्तरे कोण देणार.

मा.महापौर स.सदस्यांच्या सूचना विचारात घेवून मा. आयुक्त खुलासा करतील.

श्री.मुजीब आलम शाह खान : सिडकोच्या अधिकाऱ्यांना बैठकीसाठी बोलविण्यात यावे. सिडकोचे अधिकारी स.नगर सेवकांच्या प्रश्नांना उत्तरे देवू शकत नाहीत का? नगर सेवकांची दिशाभुल करण्यांत येवू नये. आम्ही सिडको भागातील पाणी, खुल्या जागा या संदर्भाने प्रश्न विचारू इच्छितो.

मा.महापौर : स.सदस्यांच्या सूचना सिडको अधिकाऱ्यांना बैठकीसाठी बोलविण्यासाठी सभागृहाची परवानगी लागेल. यासाठी त्यांना बैठकीस बोलावले नाही, सभागृहाच्या परवानगीने सिडको अधिकाऱ्यांना या बैठकीसाठी बोलविण्याची परवानगी देण्यांत येते.

(४.४५वाजता तहकुब झालेली सभा ४.५० वाजता मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली परत सुरू झाली.)

श्री.भगवान घडामोडे : सिडको भागातील मालमत्ता करा बाबत यापूर्वी चर्चा झालेली आहे. पुरविण्यात आलेल्या टिपणीत लीज होल्डचे फ्री होल्ड करण्याबाबतचा उल्लेख नाही. सिडको प्राधिकरणाने या बाबत ठराव पारित करून शासनाकडे पाठविला आहे. शासनाकडून चा प्रस्तावास मान्यता आलेली नपाही तर आपण काय करणार याचाही विचार करावयास हवा . हस्तांतरणाचा ठराव पास झाल्यानंतर सर्वसामान्य जनतेस लीज होल्डचे फ्री होल्ड झाले असे वाअेल. त्यांना आपण काय उत्तर देणार सिडकोतील आरक्षीत जागा महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घ्याव्यात सिडकोतील अनाधिकृत वसाहती डिनोटीफाईड करणाचा प्रस्ताव शासनाकडे गेलेला आहे. परंतु तो मंजूर झाला नाही तर या वसाहतीचा विकास कोण करणार. सिडकोतील नियोजनाचे अधिकार महानगरपालिकेकडे देण्यांत यावेत. यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे काय ? महानगरपालिकेस हे अधिकार मिळाले नाहीत र या भागाचे नियोजन कसे करणार. सिडकोतील बऱ्याच ठिकाणच्या जलवाहिन्या पूर्णपणे बदलाव्या लागणार आहेत. सिडको भागात नागरी सुविधा पुरविण्यासाठी कर्मचारी लागतील. महानगरपालिकेने या बाबत काय नियोजन केलेले आहे. दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांची जी चर्चा झाली याचा खुलासा या सभागृहात व्हावा व नंतरच ठराव पारित करण्यांत यावा.

सौ.रजनी जोशी :मागील दहा वर्षापासून सिडको हस्तांतरणाची प्रक्रीया चालू आहे ही प्रक्रिया चालू आहे ही प्रक्रिया वस्तूनिष्ठ आहे . बऱ्याच स.नगरसेवकांनी बऱ्याचशा सूचना चांगल्या आहेत. सिउको भागातील रस्ते, ड्रेनेज , लाईट याबाबत आम्ही कोणतीही कामे करून शकत नाही. महानगरपालिकेच्या निवडणूका होणार आहेत यासाठी मतदाराकडे जावे लागणार आहे. प्रशासनाने मांडलेला प्रस्ताव परिपूर्ण आहे. तो मंजूर करण्यात यावा सिडकोतील मालमत्तांवर हस्तांतरणाचा दिवसापासून मालमत्ता कर लावण्यात यावा. लिज होल्डचे फ्री होल्ड करण्यांत यावे या आमच्या मागण्या आहेत.

श्री.कंवरसिंग बैनाडे : सिडकोने महानगरपालिकेकडे हस्तांतरण होणे गरजेचे आहे. सिडकोतील अंतर्गत रस्ते बरोबर नाहीत लोकांनी अतिक्रमण केलेले आहेत. या रस्त्यांवर रिक्षाही चालू शकत नाही. छोटया छोटया गल्ल्यांमध्ये ड्रेनेज नाहीत त्यामुळे लोक सेप्टीक टँक वापरतात. सिडकोचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे व्हावे ते महानगरपालिका हदद्दीत राहतात.

श्री.सुभाष टाकळकर : मागील ८-१० वर्षापासून सिडको हस्तांतरणाचा प्रश्न चर्चीला जात आहे. सर्वाचींच इच्छा आहे की, सिडकोचे हस्तांतरण व्हावे. आजपर्यंत ३०-३५ बैठका झाल्या. पंरतू निर्णय झाले नाही. आजच्या बैठकीत हस्तांतरणाचा निर्णय घेण्यांत यावा. सिडको भागातील मंदिर, मज्जीद ,बौध्द विहार यांना म.रा.विद्युत मंडळ मिटर घेण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणार आहे काय. याचाही निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात यावा.

सौ.लता दलाल :विषय पत्रिकेत म्हटले आहे की, उच्चस्तरीय बैठकीत या बाबींवर एकमत झ ाले आहे. काही बाबींवर एकमत होणे आहे . हस्तांतरणास कोणाचा विरोध नाही पंरतु हस्तांतरणापुर्वी काही स. सदस्यांनी सांगितले की, काही सोसायटयामध्ये रस्ते , ड्रेनेज नाहीत अशा सोसाटयातील रस्त्यांची ड्रेनेजची स्थळ पहाणी महानगरपालिकेने केली आहे काय ? याच्या खर्चाची माहिती टिप्पणीत दिलेली नाही. लोकवर्गणी पोटी १.७५ लक्ष देण्याचे मान्य केले असले तरी ती रक्कम केव्हा मिळणार आहे. याचाही खुलासा नाही. जलनि:सारण वाहिन्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी प्रथम वर्षात ६-७ लाख रूपये खर्च येणार आहे हा खर्च हस्तांतरण झाल्यानंतर की हस्तांतरण होण्यापूुर्वीच्या वर्षात होणार आहे. ही रक्कम किती खर्चापैकी आहे याचाही टीपणीत उल्लेख नाही. अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी १५ कोटी रूपये खर्च येणार असून हा पैसा देण्याबाबत शासन विचार करणार आहे. परंतु शासन केव्हा विचार करणार आहे त्याचां खुलासा नाही. शासनाने १५ कोटी रूपये महानगरपालिकेस अगोदर द्यावेत आमची मागणी आहे, जेणे करून या अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा देता येतील. सिउकोतील आरक्षीत जागा जर सिउकोच विकसीत करून त्याचा पैसा घेणार असेल तर केवळ मेन्टेनन्ससाठी या जागा महानगरपालिकेस देणार काय. आहे त्या परिस्थितीत सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण व्हावे. सिडकोने बांधलेल्या इमारती या केव्हाच्या आहेत, त्यांची आजची स्थिती काय आहे आणि महानगरपालिकेने यावरील खर्च कशासाठी द्या ावयाचा गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या भुखंडाबाबतही बरीचशी संदिग्धता आहे . शहरातील अनेक वसाहत्यांना आपण पाणी देतो परंतु त्यांचा पैसा वसुल होत नाही. त्याप्रमाणे सिडकोचेही आहे. सिडकोचे हस्तांतरण होत असतांना स. सदस्यांनी उपस्थित कलेल्या मुद्याचा विचार व्हावयास हवा . हस्तांतरण प्रक्रियेत कोणतीही संदिग्धता नसावी काय बोलणी झाली याबाबत प्रशासनाकडून खुलासा व्हावा.

श्री.मुजीब आलम शाह खान : सिडकोचा भाग काही औरंगाबाद शहराचा नावाने विकसीत झ ालेला भाग आहे. सिडकोने नविन वसाहतींसाठी जागा घेतली तेव्हा त्यांची हद्य हाय होती. या भागाची लिगल डेव्हलपमेंट किती इललिगल डेव्हपमेंट किती झाली याचा खुलासा व्हावयास हवा, अन्यथा उद्या महानगरपालिकेवर हा ठपका येईल. सिडकोत ओपन स्पेस मध्ये प्लॉटस्

विकलेले आहेत. सिडकोचे हस्तांतरण होत असतांना या गोष्टीचा विचार होणे गरजेचे आहे. स.सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांवर खुलासा व्हावा.

मा.महापौर : सर्व स. सदस्यांच्या सूचना ऐकल्यानंतर मा. आयुक्त त्यावर एकत्रितरित्या निवेदन करतील.

श्री.रशिद खान (मामू) : सिडकोतील कर्मचाऱ्यांना महापालिकेत सामावून घेण्यांत येवू नये. त्यामुळे येथे कामकरणारे कर्मचारी व त्यांच्या सेवा जेष्ठतेचा प्रश्न निर्माण होईल. आमचा स्टाफ पुरेसा आहे. १५ कोटी रूपयांचा मागणीवर आज चर्चा झालेली आहे. परंतु तीन वर्षापासून आपण सिडको आपल्याकडे घेतले असते तर तेथे आपण काही विकासात्मक कामे करून शकलो असतो. कदाचित त्यावेळी मा.महापौर होतो म्हणून तो निर्णय घेवू दिला नसेल मी कोणावर दोषारोप करून इच्छित नाही. केवळ निवडणूक समोर आली म्हणून असा निर्णय घेतला जावू नये . महानगरपालिका जायकवाडी जलवाहिनी, पोलीस दल असे निर्णय माझ्याच कार्यकाळात घेतले होते.

श्री.प्रदिप जैस्वाल :१९९० पासून हस्तांतरणाची चर्चा चालू आहे. त्या वेळी मीच महापौर होतो. त्यावेळी काही अडचणी म्हणून हस्तांतरण टळत गेले. अन्यथा तेपुर्वीच झाले असते.

श्री.प्रफुल्ल मालाणी : मागील १० वर्षापासून सिडको हस्तांतरणाचा प्रश्न चर्चेत येत असून सिडकोतील नागरिकांना सुविधा कशा मिळतील याकडे लक्ष दिले पाहिजे. नागरिकांना मुलभूत सुविधा कशा मिळतील याकडे लक्ष दिले पाहिजे. नागरिकांना सुविधा कशा मिळतील याचा विचार करण्यांत यावा. मुलभुत सुविधा हस्तांतरीत करून घेण्याबाबत मा.प्रधान सचिवांनी कळविले आहे. परंतु सिडको भागातील नागरिकांच्या प्रमुख मागण्या म्हणजे मालमत्ता कर, जिल होल्डचे फ्री होल्ड करणे अनाधिकृत वसाहती व त्यांच्या नागरी सुविधा देणे सिडकोने सात इमारती महानगरपालिकेस देण्यास विराध दर्शविलेला आहे. व यासाठी त्यांनी सात कोटीची मागणी केलेली आहे. १२ वर्षापुर्वी या इमारती बांधलेल्या आहेत. या इमारतींची डेप्रीसिएशन व्हॅल्यु काय आहे याचाही विचार व्हायला हवा. सिडकोने या सातही इारती विना मोबदला महानगरपालिकेने घ्याव्यात. सिडकोने ज्या जागा आरक्षित ठेवलेल्या आहेत त्या ज्या कारणासाठी आरक्षीत ठेवलेल्या आहेत त्याच कारणासाठी महानगरपालिकेस द्याव्यात व महानगरपालिकेने या जागा विकसीत करण्याची ग्वाही द्यावी.

श्री.जयवंत (बंडू) ओक : हा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवल्याबाबत मा. महापौरांचे अभिनंदन पाण्यासाठी १.७५ कोटी महानगरपालिकेस शासन देणार कि सिडको देणार याचा खुलासा झालेला नाही.

सिडको भागातील अनाधिकृत वसाहती अनाधिकृत म्हणून घोषित करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. या वसाहतीत झालेल्या घरांना दंड आकारून नियमित करावेत व ज्यांना नागरी सुविधा देण्यांत या भागातील झालेल्या इमारती अनाधिकृत आहेत म्हणून महानगरपालिकेस पाडणार आहे काय ? सिडकोतील अशा ३-४ मजली इमारतींना दंड आकारून महानगरपालिकेस उत्पन्नात भर पडेल.

डॉ.विजयकुमार मेहेर : सिडको तशी आहे तशी स्विकारावी लागेल.

श्री.काशीनाथ कोकाटे :स.श्री.बंडू ओक सभागृहाची दिशाभूल करत आहे चार मजली इमारत कोणत्या आहेत त्याचा खुलासा करावा.

श्री.जयवंत ओक (बंडु) :एन -११ भागात भाजी मंडईसाठी जागा होती अनाधिकृत वसाहतींना दंड आकारण्यांत यावा त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्नाही वाढेल. १३ अनाधिकृत वसाहती आहेत. यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :१९९१ पासून या प्रश्नावर चर्चा चालू आहे. सिडकोचे महानगरपिालकेडे हस्तांतरण करून घेण्यांत यावे. सिडको १.७५ कोटी रूपये देणार आहे. परंतू त्यांच्याकडे दहा कोटीची मागणी ठेवण्यांत यावी. हा पैसा सिडको अथवा शासनाने द्या ावा त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेची स्थिती सुधारेल. सिडकोतील नियोजनाचे अधिकार महानगरपालिकेस देण्यांत यावेत. १३ अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडून अनुदान घेण्यांत यावे. मागील पाच वर्षापासून या भागातून मालमत्ता कर वसूल केला जात नाही. त्यामुळे महानगरपालकेचा नुकसान होत आहे.

श्री.वसंत देशमुख : हा प्रस्ताव प्रशासनाचा आहे. या प्रस्तावावर प्रशासनाने प्रथम खुलासा करावयास हवा व त्यानंतर त्यावर चर्चा व्हावयास हवी. सिडकोचे महानगरपालिकाकडे हस्तांतरण होणे योग्यच आहे. रस्ते , ड्रेनेज यावर किती खर्च येणार आहे. याचा खुलासा व्हावयास हवा. प्रथमतः प्रशासनाने आपली स्पष्ट भुमिका मांडावी . विकसीत शहरात सुविधा पुरविण्यांसाठीच आपण कमी पडत आहोत. यासाठी लोकमतांचा विचार करावयास पाहिजे. ज्या भागातून नव्याने निवडून येणारे नगरसेवक सर्व सुविधा मागतील त्या आपण पुरवू शकू का याचाही प्रथम विचार व्हावयास हवा.

श्री.संजय जोशी : सिडकोतील रिकाम्या जागांना सर्व्हे करण्याचे पुर्वी सिडकोने कबुल केले होते. परंतु सिडको या खुल्या जागा विकत आहे. एन-७ च्या मागे जे भांडार आहे ते विकण्याचे ६५ लाखाचे टेंडर काढले. स्विमिंग पुलाचा प्रकल्पही सिडकोने पुर्ण केलेला नाही. या खुल्या जागा सिडकोने विकून टाकलेल्या आहेत. सिडकोने नियोजनाचे कोणतेही नियम पाळलेले नाहीत. आपेन स्पेस विक्रीचे सिडकोने काढलेले टेंडर प्रथम रद्य करण्यास सांगण्यात यावे. केवळ सुविधा हस्तांतरीत करून काय फायदा. स्विमिंग टँकसाठी ठेवलेली जागा जी सिडकोने विकली याचा पैसा महानगरपालिकेकडे वर्ग करण्यासाठी सांगण्यात यावा. जेणेकरून महानगरपालिका या सुविधा त्या भागातील नागरिकांना देवू शकेल.

सौ.पद्मा शिंदे : सिडको हस्तांतरण होत असतांना घरांचा मालकी हक्क मिळाला पाहिजे हस्तांतरणाच्या दिवसापासून मालमत्ता कर घेण्यांत यावा. सिडको भागात दैनंदिन साफसफाई होत नाही. बऱ्याचशा भागातील ड्रेनेज लाईन्स फुटलेल्या आहेत. सिडको अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व्हावयास पाहिजे. एन-९ भागात कचऱ्याचे ढिग साचलेले आहेत. या भागात लाईटही नाही. हस्तांरणानंतर सिडकोतील कर्मचाऱ्यांना मनपा सेवेत सामावून घेण्यांत यावे.

श्री.स.अली मिरा सलामी : हस्तांतरणाचे वेळेस जनतेस विश्वासात घेण्यात यावे. सिडकोतील मालकी हक्काने घरे देण्यात यावीत त्यांची घरे हप्त्याने (इन्सटॉलमेंट) रक्कम भरण्याच्या तत्वावर घेतलेले आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :सिडकोतील अनाधिकृत वसाहतीच्या विकासाठी १५ कोटी रूपये खर्च येणार आहे. या रक्कमेत आपण सर्व सुविधा देवू शकू का ? ही रक्कम शासनाकडून मिळत नाही तोपर्यंत या प्रश्नावर विचार करण्यात येवू नये. ज्या सात इमारतीची मागणी केली आहे त्या इमारती कोणत्या आहेत या इमारती जर जनसुविधेसाठी वापरल्या जाणार असतील तर त्यांना मोबदला देण्याचा प्रश्नच येत नाही. या इमारती महानगरपालिकेस विनामुल्य देण्यांत याव्यात.

श्री.गौतम खरात :सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण व्हावे ही सर्वांचीच इच्छा आहे. सिडको भागातून निवडून आलेले नगर सेवक या भागात कोणतेही विकासात्मक काम करू शकत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. हस्तांतरणानंतर जनतेच्या अपेक्षा वाढणार आहेत. या भागात विविध सुविधा पुरविण्यासाठी करोडो रूपये खर्च येणार आहे. यामुळे मनपाची आर्थिक परिस्थिती डबघाईस येईल. सिडकोचे हस्तांतरण झाल्यानंतर शासन सिडकोकडून पैसा मिळत असेल तरच नागरी सुविधा देता येतील. अनधिकृत वसाहतींच्या नागरी सुविधांसाठी १५ कोटीची मागणी करून ती रक्कम सिडको अथवा शासनाकडून घेण्यात यावी.

श्री.रविंद्र इंगळे :रस्ते, ड्रेनेज लाईन अशा प्रश्नांवर सर्वांनीच चर्चा केली आहे. हस्तांतरणानंतर ताबडतोब सिडको भागात हस्तांतरण मोहिम राबविण्यात येईल काय याचा या विषयपत्रीकेत उल्लेख नाही . हस्तांरणानंतर या भागात तात्काळ स्वच्छता मोहिम राबविण्यात यावी.

सौ.विमल मुंडलिक :हस्तांतरणाच्या दिवसापासून मालमत्ता कर आकारण्यात यावा. सिडकोतील कर्मचाऱ्यांनाही मनपा सेवेत घ्यावे. सिडकोच्या खुल्या जागा मनपास देण्यांत याव्यात.

श्री.महादेव सुर्यवंशी :महानगरपालिकेने सिडकोतील फक्त जलवाहिनी ताब्यात घेतलेली होती. २००५ पर्यंत सिडको पाणी पुरेल अशा प्रकारे जलवाहिनी डिझाईन केलेली होती.परंतु आज सिडकोची लोकसंख्या तिपटीने वाढली आहे. नविन जलवाहिनी टाकण्यासाठी सिडकोने त्यांचा वाटा म्हणून १.१५ कोटी रूपये देण्यांचे कबुल केले होते. परंतु अद्याप त्यांनी ते दिलेले नाहीत. सिडकोतील मेन ड्रनेज लाईन बरोबर असली तरी ते सिडकोत एका एका घराची तीन तीन घरे झालेली आहेत. त्यामुळे अंतर्गत ड्रेनेज लाईन कोलॅप्स झालेली आहे ड्रेनेज लाईच्या दुरूस्तीसाठी येणारा खर्च ६-७ लाख एवढा दाखवला आहे. परंतु यात एकाही सेक्टरचे काम होणार नाही असे वाटते. १६ इमारती पैकी ९ इमारती सिडकोने मनपास दिलेल्या आहेत आणि ७ इमारतींचा पैसा त्यांनी मागितलेला आहे हे बरोबर नाही या इमारती सिडकोने विनामुल्य महापालिकेस द्यावयास हव्यात रस्ते दुरूस्तीसाठी किती पैसा घ्यावयास हवा याचा टिप्पणीत खुलासा नाही. रस्त्यात येणारे विद्युत खांब शिफ्ट करण्यासाठी येणारा खर्च कोण देणार याचाही टिप्पणीत उल्लेख नाही. याचाही खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे.

सिडकोतील प्लॅनिंग ऑथोरिटी बाबतची स्पष्टता व्हावी. सिडकोतील ३९ माळी व ३१ कर्मचाऱ्यांना मनपात घेण्यांचा ठराव आहे. परंतु सिडकोतील कायम स्वरूपी कर्मचाऱ्यांना मनपात सामावून घेण्यात येवू नये. अंतर्गत

ड्रेनेजच्या मेन्टेयनन्ससाठीचा खर्च न घेता ७ इमारती विनामुल्य ताब्यात घ्याव्यात.

श्री.अफसर खान :सिडकोचा मनपाकडील हस्तांतरणास कोणाचाही विरोध नाही. मागील दोन अडीच तासात या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झालेली आहे. सिडकोतील अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा देण्यासाठी येणारा १५ कोटीचा खर्च कोण देणार आहे. याचा स्पष्ट खुलासा व्हावयास हवा. रस्ते दुरूस्ती, विद्युत ड्रेनेज यांच्यासाठी पूर्ण खर्च किती होणार याचा खुलासा व्हावयास हवा. सिडकोने त्यांच्या खुल्या , जागा पूर्णपणे विकल्या आहेत. हस्तांतरणानंतर या भागात नागरी सुविधा पुरविण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा बोजा शहरवासियांवर पडू नये. सिडकोने जाहिर केलेल्या सर्व सुविधा दिल्या शिवाय हस्तांतरण होवू नये.

मा.महापौर : सर्व स. सदस्यांची मते ऐकून घेतल्यानंतर मा. आयुक्त सर्व बाबींचा खुलासा करतील.

मा.आयुक्तः सिडकोचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे व्हावे या विषयावरती अजचा सर्वसाधारण सभेत गेली दोन - अडीच तास चर्चा चालू आहे. स सदस्यांनी या विषयावरती अभ्यासपूर्वक व महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. आर्थिक भार मनपावर किती येईल. हस्तांतरणाचे वेळी कोणती प्रक्रीया पाळली जाईल याबाबतही चर्चा झाली. नियोजन , दुरूस्ती आणि देखभाल याबाबत महापालिकेवर किती भार येणार आहे, सिडकोच्या वसाहती विकसित करतांना ज्या चूका झाल्या त्यांचाही उल्लेख झालेला आहे. सिडकोकडे सध्या अस्तित्वात असलेल्या प्रॉपर्टीज जमिनी, मालमत्ता याबाबतही अत्यंत महत्वपूर्ण चर्चा झालेली आहे. अत्यंत महत्वपूर्ण चर्चा झालेली आहे. अत्यंत महत्वपूर्ण चर्चा झाल्याबाबत सर्वप्रथम सर्व स. नगरसेवकांचे मी आभार मानतो. कोणत्याही संस्थेकडून मालमत्तांचे मनपाकडे हस्तांतरण होत असतांना नियमांच्या अधिन राहून सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागते, काही धोरणात्मक निर्णय घेत असतांना आपणास सर्वच प्रश्नांची उत्तरे त्याचवेळी एकदम घेता येत नाहीत. परंतु काही मुद्यांवर स. सदस्यांचे समाधान होणे तितकेच गरजेचे आहे. प्रशासनातर्फे हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. आज हस्तांतरण नाही झाले तरी हस्तांतरण जेव्हा केव्हा होईल तेव्हा मनपावर आर्थिक भार पडणारच आहे. म्हणून समोर असलेला प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. सिडकोचा मुख्य प्रशासन आणि महानगरपालिका आयुक्त यांच बरोबर आपण या सभागृहात उपस्थित कलेले प्रश्न यावर मी माझे निवेदन सादर करीत आहे.

नगर विकास विभागाचे पत्र दिनांक २७-१०-९९ अन्वये औरंगाबाद महापालिकेस असे आदेशित करण्यात आले आहे की, दिनांक ३-८-९९ रोजी झालेल्या बैठकीत मा. नगर सचिवांनी दिलेल्या निर्देशानुसार सिडकोने सेवा सुविधांचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे करण्यात यावे. या अनुषंगाने सिडकोने पुर्ण केलेल्या पाणीपुरवठा, रस्ते, पथदिवे, जलनिःसारण वाहिन्या, उद्याने इत्यादी सुविधा पुढील देखभालीसाठी महापालिकेकडे हस्तांतरीत करून घेण्यासंदर्भाने हा विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेवला आहे. सिडकोचे नविन औरंगाबाद प्रकल्पाचा नियोजनबध्द पध्दतीने विकास करण्याकरीता

शासन अधिसूचना दिनांक २०-१०-१९७२ अन्वये विशेष प्राधिकरण म्हणून शासनाकडून नियुक्त केलेल्या आहे. यानुसार सिडकोने नवीन औरंगाबाद प्रकल्पाचा सुनियोजित विकास करून सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सिडकोची नियुक्ती सुयोग्य पध्दतीने विकास करण्याकरिताच करण्यात आलेली आहे. विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाकडून नियुक्त केलेल्या मंडळाने सेवा सुविधा विकसित केल्यानंतर त्या सेवा सुविधांचे पुढील देखभाल करण्याकरता त्या सेवा सुविधा स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरीत कराव्यात असे शासनाचे धोरण आहे. या धोरणानुसार सिडकोने विकसित केलेल्या सेवा सुविधा मनपाकडे हस्तांतरीत करून घेणे अनिवार्य आहे. तसेच सिडको व महापालिका या दोन्ही संस्था शासनाच्या नगर विकास विभागाच्या अखत्यारित असतात. त्यामुळे या दोन्ही संस्थांचे संबंध सलोख्याचे असणे अत्यंत गरजेचे आहे. सिडकोने नविन औरंगाबाद भागात विकसित केलेल्या सेवा सुविधा औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी सिडको व महापालिका यांत अनेकवेळा बैठका झालेल्या आहेत.

दिनांक २७-७-९९ रोजी झालेल्या सिडको व औरंगाबाद महानगरपालिकेच्या बैठकीमध्ये खालील विषयावरती चर्चा होवून काही निर्णय घेतलेले आहेत. या निर्णयामध्ये त्यानंतरच्या काही डेव्हलपमेंटस् आणि त्यानंतर जी प्रगती झालेली आहे त्यांना देखील परामर्ष घेण्यांत येत आहे.

१) रस्ते : सिडको प्राधिकरणाने विकसित केलेल्या रस्त्यांमध्ये आजमितीस १४६.७८ कि.मी.लांबीचे रस्ते तयार केलेले असून सदर रस्ते हस्तांतरीत करण्याकरीता दोन्ही बाजूंनी तत्वतः मान्यता दिलेली आहे. आज सर्वसाधारण सभेसमोरही त्याला मान्यता दिलेली आहे. तथापी १-८-९९ रोजीची परिस्थिती विचारात घेवून रस्ते देखभाल व दुरूस्तीसाठी जो खर्च येईल तो खर्च दोन्ही बाजूंच्या तांत्रिक अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करून एकमताने सादर करावा. व देखभालीसाठी येणारा सर्व सिडको प्राधिकरणाने महानगरपालिकेस द्यावा असे ठरले होते. त्यानुसार दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्थळ पहाणी केली व रस्ते दुरूस्तीचे अंदाज पत्रक तयार केले या स्थळ पहाणी नुसार रस्ते दुरूस्तीसाठी अंदाजे २१ लाख रूपये खर्चाचे अंदाजपत्रक सिडकोने तयार केलेले आहे. रस्त्यांची दुरूस्ती करून देण्याचे सिडकोने मान्य केलेले आहे. त्यानुसार रस्ते दुरूस्तीची कार्यवाही होणार आहे. सिडकोचा मुख्य प्रशासक या नात्याने मी सांगू इच्छितो की, रस्ते दुरूस्तीसाठी कार्यवाही पूर्ण होणार आहे.

२. जलवाहिन्या : सिडको भागात राहणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय महानगरपालिके मार्फत केली जाते. तथापी, महानगरपालिकेस पाणीपुरवठा योजना हस्तांतरीत करून करत असतांना लोकवर्गणी पोटी सिडकोने १७५ लाख रूपये देणे आवश्यक आहे व ती रक्कम देण्याचे सिडकोने मोन्य केले आहे.

३. लिज होल्ड फ्री होल्ड करणे बाबत : अनेक स.नगरसेवकांनी हा प्रश्न जिव्हाळयाचा आहे म्हणून त्यावरती जास्त भार दिलेला आहे.

सिडको भागातील मालमत्ता लिजहोल्ड वरती देण्यांत आलेल्या आहेत,त्या फ्री होल्ड देण्याबाबत महानगरपालिकेचा आग्रह आहे. याबाबत सर्व स.नगरसेवकांचाही आग्रह आहे याबाबत सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.८३ दिनांक ८-१२-९७ अन्वये सिउको मंडळाने मान्यता दिली असून त्यांचे पत्र क्र.९८/५४० दिनांक १६-६-१९९८ अन्वये प्रस्ताव मान्यतेस्तव शासनाकडे पाठविला आहे. याबाबत शासनाने त्वरीत निर्णय घ्यावा या करिता दोन्ही विभागांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सिडकोची यांस हरकत नाही. आपली व माननीय महापौरांची जसी मागणी आहे त्याप्रमाणे सिडकोने सदरचा प्रस्ताव शिफारस करून शासनाकडे पाठवला होता. आपण पाठपुरावा करून शासनाकडून तो मंजुर करवून घेणे गरजेचे आहे. देणारी संस्था व घेणारी संस्था यांचे कोणत्या मुद्यांवर एकमत असेल तर शासनासही निर्णय घेण्यामध्ये कोणतीही अडचण निर्माण होणार नाही असे वाटते.

४. जलनिःसारण वाहिन्या : सिडको प्राधिकरणाकडून जलनिःसारण, मलनिःसारण वाहिन्या देखभाल व दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आलेले आहे. सदरचे काम सिडको प्राधिकरणाकडून पुर्ण करण्यांत आलेले आहे. सदरच्या सिडको वाहिन्या महापालिकेला हस्तांतरीत करण्यांत याव्यात याबाबत दोन्ही बाजूचे एकमत झाले आहे. सिडकोने त्या भागात एक एसटीपी प्लॅट विकसीत केला असून त्यावर येणारा विद्युत खर्च आणि जलनिःसारण वाहिन्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी लागणारा खर्च रू. ६.७ लाख महापालिकेस प्रथम वर्षासाठी देण्याबाबत दोन्ही बाजूंचे ठरले आहे. त्याबाबत सिडकोने देखील तयार दर्शविलेली आहे. महापालिका प्रथम वर्षात जलनिःसारण/ मलनिःसारण वाहिन्यांची देखभाल दुरूस्ती प्रभाविपणे करू शकेल याबाबत दोन्ही बाजूंचे एकमत झालेले होते. महापालिका व सिडको अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी केलेली होती. सुरूवातीस यासाठी येणाऱ्या खर्चाबाबत सिडको प्राधिकरणाने मांडलेला सुचनेवर काही स.नगरसेवकांनी सूचना केली होती की, महानगरपालिकेचे तांत्रिक अधिकारी सर्वेसाठी बरोबर गेले तर सर्व्हे बरोबर होवू शकेल त्यानुसार जलनिःसारण वाहिन्यांच्या दुरूस्तीसाठी येणारा ६.७ लाखाचा खर्च सिडको देणार आहे.

५. पथदिवे : सिडको भागात एकंदर ५४२६ विद्युत खांब असून त्यावर ५७२३ पथदिवे आहेत. सिडको हस्तांतराणाचे वेळी बंद पथदिवे चालू करून देणे, उच्चदाब वाहिन्यांचे स्थलांतर करण्यासाठी रक्कम सिडको प्राधिकरणाने भरणे, विद्युत पोल स्थलांतरीत करण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरण्यासाठी सिडकोने तयारी दर्शविलेली आहे. नजिकच्या काळात जी फायनानसियल लाएबलिटी येवू शकली असती ती सिडकोने घेण्याचे मान्य केले आहे.

६. उद्याने : सिडको भागातील एकंदरीत २४ उद्या ाने नर्सरीसह महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून देण्याची तयारी सिडको प्रशासनाने दर्शविलेली आहे . यामध्ये मनपावर फायनानसियल लाएबिलिटी काहीही नाही.

७. खुल्या जागाः सिडको क्षेत्रातील खुल्या जागांचे हस्तांतरणापुर्वी संयुक्त पाहणी करून अशा जागा हस्तांतरीत करण्याचे उभपक्षी ठरले आहे. सिडको प्रशासनाची याला मान्यता आहे.

८. अनाधिकृत वसाहती : सिडको भागात सिडको प्राधिकरणाने अधिसुचत केलेल्या क्षेत्रामध्ये परंतु संपादित न केलेल्या जागेवर एकूण १३ अनधिकृत वसाहती आहेत. याची कल्पना सर्व स.नगरसेवकांना आहे आणि स.नगरसेवकांनी आपल्या भाषणात याचा उल्लेख देखील केलेला आहे. ज्या भागात सिडको प्राधिकरणाने जमिन संपादित केलेली नाही त्या भागात सिडको प्राधिकरण सुविधा देवू शकत नाही ही बाब सिडको प्राधिकरणाने प्रकर्षाने नमुद केली होती. तथापी सदरचे अधिसुचित कामे सिडको प्राधिकरणाच्या कक्षेतून वगळण्यात यावे असा ठराव १५-६-९९ रोजी सिडको संचालक मंडळाने मंजुर केलेला आहे. या संदर्भात स.नगरसेवक श्री.बंडू ओक यांनी मुद्या उपस्थित केला होता की, या वसाहती अनाधिकृत जरी असल्या तरी मानवतेच्या दृष्टीकोनातून सुविधा द्याव्या लागणार आहेत.सिडकोने या वसाहतीच्या जागा विकसित केल्या नाहीत. सिडकोचे महानगरपालिकेकडे जेव्हा हस्तांतरण होईल तेव्हा या वसाहती वगळता, येणार नाहीत. त्यामुळे या अनाधिकृत वसाहतींचे स्वरूप जाहिर करून या वसाहतींना काही सोयी सवलती देता येतील काय आणि त्या जर द्याव्या लागल्या तर त्याचा जो बोजा महापालिकेवर पडेल त्या बाबत शासनाकडे रितसर मागणी मागणी करता येईल. अशा प्रकारे हा प्रश्न मार्गी लावावा लागेल परंतु त्यास थोडासा उशीर लागेल.

९. गृहनिर्माण संस्थांना विकलेले भूखंडः स्थानिक गृहनिर्माण संस्थांना सिडकोने दिलेल्या भूखंडावर घरे बांधणे व त्यातील मुख्य नागरी सुविधा पुरविण्याबाबत शासन निर्णयाप्रमाणे ज्या अटी व शर्ती घातलेल्या त्या सर्व नागरी सुविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक गृहनिर्माण संस्थेची असल्याचे मत सिडको प्रशासनाने नमुद केले आहे या संदर्भात सिडको हस्तांतरण झाल्यानंतरही शासन निर्णयाप्रमाणे ज्या सुविधा संबंधित गृहनिर्माण संस्थांनीच पूर्ण करणे अपेक्षित आहे. या बाबत महानगरपालिकेची जबाबदारी राहणार नाही असे सिडको प्राधिकरणाकडूनही स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे सिडको हस्तांतरणाचेवेळी या सर्व गृहनिर्माण संस्थांना शासन निर्णयाप्रमाणे नागरि सुविधा पुरविण्याचे सुचित करण्यात आले आहे व याबाबत एकमत झालेले आहे.

१०. नियोजनाचे अधिकार : महापालिकेच्या दृष्टीकोनातून हा अत्यंत महत्वाचा मुद्या आहे.काही स. सदस्यांनी यांचा उल्लेख केला आहे कि, हस्तांतरण होईल त्यावेळी महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण (प्लॅनिंग ऑथरिटी) म्हणून महानगरपालिकेस घोषित करणे अत्यंत गरजेचे आहे. महानगरपालिक ा प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब फायदेशिर आहे. या भागात पुढे जो विकास होणार आहे तो महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय होणार नाही. त्यामुळे आजच्या ठरावातील हा एक अत्यंत महत्वाचा भाग आहे. आपण हा ठराव घेतांना त्यात प्रामुख्याने हा उल्लेख करणे आवश्यक आहे की, या भागातील विकासाचे पुर्ण

अधिकार महापालिका प्रशासनास देण्यात यावेत. सिडकोचे हस्तांतरण झाल्यानंतर हस्तांतरीत भागातील सर्व विकासाचे व नियोजनाचे अधिकार पुर्णतः महापालिकेस मिळणे गरजेचे आहे. या संदर्भात शासन पातळीवर तशा स्वरूपाचा निर्णय होवून नियोजनाचे व विकासाचे अधिकार महापालिकेस देण्यांत येणे गरजेचे आहे. नियोजन प्राधिकरणाचे अधिकार महापालिकेस मिळाल्यामुळे महापालिकेस सिडको भागातील भुखंड घर विकसित करतांना भरणा करावयाच्या विकास शुल्कापोटी प्रतिवर्षी दमासे रू.५८ कोटी आर्थिक प्राप्ती होण्याची शक्यता आहे.

११. आरक्षित / विक्री करण्या योग्य जागा : सिडको भागातील नागरिकांना सुविध पुरविण्यासाठी महानगरपालिकेस उत्पन्नाची साधने मिळणे गरजचे आहे. यासाठी सिडको अधिसूचित क्षेत्रत विविध कारणासाठी आरक्षित केलेल्या जागा व विक्री न केलेल्या जागा महापालिकेत मोफत मिळाव्यात अशी महानगरपालिकेची भूमिका आपण सिडकोकडे मांडलेली आहे. तथापी आरक्षित / विक्री करण्यायोग्य जागा सिडकोकडे ठेवून त्यांचा विकास केल्याशिवाय त्या हस्तांतरीत करू शकणार नाही अशी भूमिका सिडको प्रशासनाने मांडली आहे. त्यामुळे या जागा महापालिकेस मोफत देण्यामध्ये प्रशासकीय अडचण निमार्ण झालेली आहे. तथापी महापालिकेस सिडको भागातील ज्या आरक्षित खुल्या जागा मिळणार आहेत त्यातील किमान १० ते १५ टक्के क्षेत्र वाणिज्य वापरासाठी करू शकते. व त्यातून महापालिकेस आर्थिक निधीची प्राप्ती होवू शकते.

१२. कर्मचारी वर्ग हस्तांतरीत करणे : सिडकोतील ३९ माळी व ३१ इतर कर्मचारी वर्ग कायमस्वरूपी सेवेत आहे तो महापालिकेत हस्तांतरीत करून घ्यावा अशी महापालिकेची भुमिका आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने सहमती दर्शविलेली आहे. परंतू कंत्राटी साफसफाई कर्मचारी व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी महापालिका हस्तांतरीत करून घेवू शकत नाही असे महापालिका प्रशासनाने कळविले आहे. याबाबत या सभागृहात चर्चा झालेली आहे.

१३. बांधलेल्या इमारती मनपास हस्तांतरीत करणे : सिडकोने १६ इमारतीपैकी शाळा, दवाखाने, समाज मंदिरासाठी ९ इमारती महानगरपालिकेस दिलेल्या आहेत. विविध सामाजिक सुविधा देण्यासाठी सिडकोने या इमारती बांधलेल्या आहेत ही बाब गृहीत धरता उर्वरित ७ इमारती सिडकोने महापालिकेस हस्तांतरीत करण्यात अशी महापिालकेची भुमिका आहे. या इमारतीवर जमिन व बांधकामासाठी सिडकोने ६ कोटी ७७ लाख खर्च केलेला आहे. हा खर्च महानगरपालिकेने सिडकोस द्यावा व त्यानंतरच या इमारती महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येतील. अशी भुमिका सिडको प्रशासनाची आहे. याबाबत महानगरपालिकेने त्या संमती दर्शविलेली नाही. या बाबत शासन पातळीवर धोरणात्मक निर्णय घेवून आणि स.सदस्यांनी याबाबतीत केलेल्या सूचना की, या इमारती केव्हा बांधल्या, त्यांची व्हॅल्यू या बाबी विचारात घेवून पुढील प्रक्रिया सुरू करता येवू शकेल या इमारतीसाठी ६ कोटी ७७ लाख रूपये देणे महानगरपालिकेस शक्य नाही. परंतु आजच्या परिस्थतीत जी काही परंतु आजच्या

परिस्थतीत जी काही किंमत होईल ती देण्याची तयारी असेल तर या प्रस्तावाचा विचार करण्यास हरकत नाही. विचार करून यामध्ये निर्णय घेतला जाईल.

याशिवाय अनेक मुद्दे आमच्या बैठकीत उपस्थित करण्यात आले होते. हस्तांतरण होत असतांना साफल्याने एकाच वेळी विचार करावयाचा म्हटले तर निणर्य प्रक्रीया करणे व निर्णय घेणे शक्य होणार नाही. चांगल्या मुद्यांचा विचार करणे आवश्यक आहे. प्रशासनास चार - पाच मुद्दे महत्वाचे वाटतात.

१ सिडको भागातील विशेष नियाजनाचे अधिकार महापालिकेस मिळणे आवश्यक आहे.

२ सिडको भागातील मालमत्ता लिज होल्ड ऐवजी फ्री होल्ड करण्यासाठी महानगरपालिकेने व सिडकोने महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करून निर्णय घेणे.

३ सिडकोने विविध सामाजिक वापराकरीता आरक्षित असलेले भूखंडा संस्थांना लिजवर दिलेले आहेत मात्र ज्या संस्थांनी या भूखंडाचा विकास  केला असेल असे भूखंड सिडकोने लिज रद्द करून परत घ्यावेत व महानगरपालिकेस किमान रक्कम आकररून घ्यावेत अशा प्रकारचा उल्लेख केला आहे. आपली मागणी पाहून सिडकोचा मुख्य प्रशासक या नात्याने मी हा निर्णय केला आहे. अशा संस्थांचे लिज रद्द करून कमी किंमतीस या जागा महानगरपालिकेस देण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच सिडको भागातील समाज मंदिरे ही करारावर सामाजिक संस्थांना दिलेली आहेत. ती रद्द करून त्यासाठी किमान किंमत आकारून ती महानगरपालिकेस हस्तांतरीत करावीत.

४ सिडकोतील शिल्लक असलेल्या विक्रीयोग्य जागेपैकी किमान तीन एकर जागा महानगरपिालकेस किमान किंमत आकारून द्यावी यासाठी अशी मागणी महानगरपालकेने सिडको संचालक मंडळाकडे करावी हा प्रस्तावही आपणास सुरू करता येईल. सर्व स. सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्वच मुद्यांचा परामर्श व विश्लेषण करण कदाचित शक्य झाले नसेल परंतू ठळक मुद्यांचे विश्लेषण केलेले आहे.

श्री.नरेंद्र पाटील, डॉ.विजयकुमार मेहेरे, श्री.भगवान घडामोडे :हस्तांतरणाच्या दिवसापासून मालमत्ता कर आकारण्यात यावा व ज्यांनी कर भलेला आहे तो जमा करण्यात यावा हा मुद्याच येत नाही लिज होल्डचे फ्री होल्ड करणे या मुद्यांनंतरच मालमत्ता करास दोन नंबरचे प्राधान्य देणे आवश्यक आहे. यात नाटयगृहाचा उल्लेख नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मा. आयुक्तांनी चांगले मुद्दे उचलले आहेत. सिडकोतील इमारती या नागरिकांना  सुविधा देण्यांसाठी आहेत. त्यांचा पैसा देण्याचा प्रश्न येत नाही. सिडकोस हे पैसे मागण्याचा अधिकार नाही सिडकोने नागरिकांकडून पैसे वसुल करूनच या इमारती बांधलेल्या आहेत.तीन एकर जमिन सिडको आम्हास कशासाठी विकत आहे. महानगरपालिका एवढी मोठी लायबॅलिटी घेत आहे. ज्यात आम्ही १२ कोटीचे नुकसान पाण्यात

आलेले आहे. सिडकोकडून पावणे दोन कोटी ऐवजी कमीत कमी १० कोटी घ्यावयास पाहिजेत अशा मुद्यात दुरूस्ती करूनच प्रस्ताव पारीत करण्यात यावा. सिडकोतील नियाजनाचे अधिकार महानगरपालिकेस मिळाले तर महानगरपालिकेचे उत्पन्नही वाढू शकेल.

डॉ.विजयकुमार मेहेर : मालमत्ता कर आकरणीचा उल्लेख हस्तांतरणाच्या दिवसापासून करण्यांत यावा.

मा.महापौर : मा. आयुक्त या बाबींचा खुलासा करतील.

मा.आयुक्त : मालमत्ता कराची आकारणी सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतरच करण्यांत येईल. मात्र यापुर्वी ज्यांनी कराचा भरणा केलेला आहे त्याबाबत निर्णय घेता येणार नाही. सिडको भागात नाटयगृह बांधण्यासाठी सिडकोने महानगरपालिकेकडून ५० लाख रूपये मागितले होते. याबाबत महानगरपालिका व सिडको मध्ये बराचसा पत्र व्यवहार झालेला आहे. सिडकोने महानगरपालिकेकडून नाटयगृहाच्या जमिनीची जी किंमत मागितली होती ती फार मोठया प्रमाणात होती त्यामुळे आपण आता पावतो त्यास मान्यता दिलेली नाही. परंतु या संदर्भात सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी मी याबाबत चर्चा केलेली आहे. एकूण जागेच्या ५० टक्के रक्क्म द्यावी अशी सिडकोने मागणी केली होती परंतु ही रक्कमही मोठया प्रमाणावर आहे. या ऐवजी सिडको ज्या प्रमाणे शासनास २५ टक्के रक्कम आकारते त्याप्रमाणे महानगरपालिकेस आकारावी असा आग्रह धरला होता. बोर्ड ऑफ डायरेक्टरपुढे ठेवलेला प्रस्ताव त्यांनी मान्य केलेला नाही. व महानगरपालिकेनेच हे नाटयगृह बांधावे असा बोर्ड ऑफ डायरेक्टरने ठराव घेतला व जमीनीची कॉस्ट महानगरपालिकेने द्या ावी असे बोर्डाने ठरविले. परंतु जागेची किंमत अवास्तव असल्याने महानगरपालकेने त्यास मान्यता दिलेली नाही. २५% रक्कम सिडकोकडे भरूनही ही जागा घ्यावयाची की नाही हा निर्णय आपणास घ्यावयाचा आहे.

श्री.नरेंद्र पाटील : चार वर्षापुर्वी या राज्याचे उपमुख्यमंत्री या शहराचे पालकमंत्री या दोघांनी मिळून या नाट्यगृहाची कानाशिला बसविली त्यावेळी नाटयगृहासाठी एक कोटी रूपये देण्यांचे आश्वासन दिले होते. या एक कोटी रूपया बरोबर ५० लाख सिडकोने देवून दिड कोटी रूपयात हा प्रकल्प पूर्ण करण्याची ग्वाही देण्यात आली. त्यानुसार मनपाने २५ लाख रूपये सिडकोस दिले होते. मागील तीन वर्षापासून सिडकोने हे पैसे ठेवून घेतले आहेत. तेव्हा नियोजित जागेसह हा प्रकल्प महानगरपालिकेकडे घेण्यात यावा.

श्री.प्रदिप जैस्वाल :जलनिःसारण वाहिन्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी ६.७ लाख रूपये दाखविले आहेत.एखादया सेक्टरची जलनिःसारण वाहिनी बदलायची असेल तर यासाठी जवळपास ५० लाख खर्च येईल. सिडकोची लोकसंख्या आज जवळपास तीन लाख आहे. एवढया मोठया वसाहतीची जलनिःसारण वाहिनी दुरूस्ती करण्यासाठी केवळ ६.७ लाख रूपये वार्षिक खर्च येईल हे म्हणणे बरोबर नाही. जलनिःसारण विद्युत यासाठी येणाऱ्या खर्चाबाबत खुलासा व्हावयास पाहिजे. विद्युत देखभाल दुरूस्तीसाठीचा १९९० चा खर्च जवळपास ७० लाख रूपये होता. सिडको हडकोत विद्युत देखभाल दुरूस्तीचा आज खर्च दिड कोटी रूपयापेक्षा जास्त होईल. याबाबत खुलासा व्हावयास हवा.

मा.महापौर : मा. आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून खुलासा कलेला आहे.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : सिडको हडको भागातील लोकसंख्या तीन लाखाच्या वर गेलेली आहे. असे असतांना या भागातील जलनि:सारण वाहिनीची देखभाल दुरूस्तीसाठी ६-७ लाखाचा खर्च येईल हे म्हणणे बरोबर वाटत नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी त्या भागात टाकलेल्या जलनि:सारण वाहिन्या किती इंच आहेत व त्यांची आज परिस्थाती काय आहे याचा खुलासा करावयास हवा.

श्री.स.अली मिरा सलामी : सिडकोचे हस्तांतरण झाल्याच्या तारखेपासून मालमत्ता कराची आकारणी करण्यात यावी तथापी या भागातून १९९० पासून कर यावयाचा आहे तो शासन अथवा सिडकोकडून मागविण्यात यावा ही आमची मागणी आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : सिडकोने ज्या सुविधा देवू केलेल्या होत्या त्या दिल्या नाहीत. नाटयगृह देण्याची जबाबदारी सिडकोने घेतलेली होती. ही जागा मनपास विनापैसा द्याावयास हवी. बोर्ड ऑफ डायरेक्टरच्या निकालाशी आम्हास काहीही देणे घेणे नाही. ५० लाखरूपयांसह जागा विनामोबदला सिडकोने मनपास द्यावी. रिलो टेड सोसायटयांचा विकास त्या त्या सोसायटयांनी करावा असा मा.आयुक्तांनी खुलासा केला. १९७५ मध्ये सिडकोने या सोसायटयांची जालना रोडवरील जागा घेतल्या व करार केला होता की या सासायटयां कडून ट्रान्सफर फीस घेतली जाणार नाही. तथापि हे पैसे त्या सोसायटयांच्या विकासासाठी वापरला जाईल. परंतु नियमात बदल करून या सोसायटयांकडून लाखो रूपये वसूल केले गेले. १९९२ नंतर या सोसायटयामधील प्लॉट विक्री होत असतांना सिडकोने सभासदांकडून ट्रान्सफर चार्जेस घेतले हे पैसे सिडकोने मनपाकडे हस्तांतरीत करावा. असे केल्यानंतर त्यातील एक चतुर्थांश रक्कम लोकवर्गणी म्हणून ज्यावेळी आपणाकडे जमा होतील त्यानंतर मनपाने नागरी सुविधा द्याव्यात. या ठिकाणी अत्यंत बेजबाबदारपणाने सर्व्हे झालेला आहे. मागील दोन महिन्यात ५ लाखापेक्षा जास्त रक्कमेचे काम सिडकोस करावे लागलेले आहे. सभेसमोर ठेवलेला अहवाल दोन महिन्यापुर्वीची आहे. स.स.गांगवे मामा यांचया वॉर्डात १० लाखाचे काम मंजूर झालेले आहे व ते चालू आहे अर्धवट कामाबाबत त्यांनी उपोषणाची नोटीस दिलेली होती. जवळपास १० ते ११.५० लाखाचे काम एकाच वॉर्डात चालू आहे. सर्वे बरोबर झालेला नाही. सिडकोच्या जनतेस न्याय मिळावयास हवा. कोणत्या अटीवर हस्तांतरण होणार आहे. त्याचा स्पष्ट उल्लेख ठरावात व्हावयास हवा. सिडको स्किमची १९००० घरे आहेत. वरचा मजला बांधण्यासाठी सिडकोने ३०% एफएसआय वाढवून दिला आहे परंतू १००% वसूली केलेली आहे. सिडकोने २०० चौ.फुटासाठी ६००/- रूपये वसुल केले आहेत. आपण त्यांच्या कडून पैसे परत घेणार आहात काय. मुंबई, वाशी, नाशिक, नांदेड येथे सिडकोचे हस्तांतरण झालेले आहे. तथापि हस्तांतरण करत असतांना आपण कोणकोणत्या अटी घालणार आहात याचा स्पष्ट उल्लेख ठरावात व्हावयास हवा.

डॉ.विजयकुमार मेहेर : मा. आयुक्तांनी जे निवेदन केले त्याची प्रत सर्वांना देण्यात यावी. म्हणजे सर्वांना त्यावर अभ्यास करून बोलता येईल.

सौ.लता दलाल : सिडको त्या भागातील रस्ते दुरूस्तीबाबत २१ लाख देणांर असलयाचे आयुक्तांनी निवेदन केले. सिडकोच्या अनेक भागात रस्ते अत्यंत खराब झालेले आहेत.सिडको भागात १४६.७८ कि.मी.लांबीचे रस्ते आहे सांगण्यात आले. एवढया रस्त्यांसाठी ही रक्कम पुरणार आहे काय? पॅचवर्कचे बजेटही यापेक्षा कितीतरी जास्त रकमेचे असते. सभागृहाच्या डोळयात ही धुळफेक आहे. सिडकोतील किती रस्त्यांची दुरूस्ती करावी लागणार आहे. याची माहिती देण्यात आलेले नाही. केवळ मोघम आकडेवारी येथे देण्यांत आलेली आहे. आयुक्तांनी खुलासा केला की विक्री करण्यायोग्य १०-१५ टक्के जागा सिडको मनपास मनपपास देणार आहे. ८०-८५ टक्के जागा मनपाने कशासाठी सोडवयाच्या सिडको पुर्णत: कमर्शियल बेसवर महानगरपालिकेशी सौदेबाजी करू इच्छित आहे. सिडकोने इमारती पोटी ६.७७ लाख रूपये मागितले आहेत. ज्यावेळी सिडकोने या जागा घेतल्या व इमारती बांधल्या त्यावेळी त्यांची किंमत काय होती तोच खर्च ते घेणार असतील तरच तो देण्यात यावा अन्यथा या इमारती घेण्यांत येवू नयेत. जलनि:सारण वाहीन्या किती किलोमिटर लांबीच्या व किती इंच व्यासाच्या आहेत आणि सिडकोचे वाढते स्वरूप पाहता भविष्यात यावर होणारा खर्च यांचाही स्पष्ट उल्लेख नाही हा भाग महापालिकेत आल्यानंतर लोकांच्या अपेक्षा वाढणार आहेत. झालेला सर्वे खरा आहे काय याचा खुलासा व्हावयास हवा. नाट्यगृहाबाबत अनेक स. सदस्यांनी शावना व्यक्ते केलेल्या आहेत. त्यावर मा. आयुक्तांनी खुला केला की, २५% रक्कम आकारावी. सिडकोने हायवे वरच्या जागा मोठ्या किंमतीवर सिडकोने विकल्या आहेत. त्यासाठी नाट्यगृहासाठी २५% रक्कम देण्यांत येवू नये. रस्ते, ड्रेनेज या प्रश्नांमध्ये बरचिशी संदिग्धता आहे. या सर्व सविस्तर खुलासा होत नाही. तोपर्यंत हस्तांतरणावर विचार करण्यांत येवू नये.

मा.महापौर : मा. आयुक्त खुलासा करतील.

मा. आयुक्त : जलवाहिन्यांसाठी देखभाल व दुरूस्तीसाठी दाखविलेली ६-७ लाखाची रक्कम अपुरी असल्याच्या स. सदस्यांच्या सुचना आहेत. मुद्दा योग्य वाटतो या कामासाठी निश्चितपणे किती रक्कम लागेल याबाबत पुन्हा सर्व्हे करण्यात येईल यासाठी १५ लाखापर्यंत खर्च येणार असेल तर मुख्य प्रशासक या नात्याने मी त्यास मंजुरी देवू शकेन. जलनि:सारण व रस्त्यांचा जो सर्व्हे झाला त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असतील असे वाटत नाही . रस्त्यांच्या रकमेबाबतही काही स. नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केले होते. सर्वे करत असतांना किती खर्च येईल याचा विचार केला जातो. सिडको नाटयगृह किंवा कोणत्याही प्रॉपर्टी विनामुल्य देणार नाही ते सिडकोचे धोरण आहे. आपण आपल्या भावना सिडकोस परत कळवू.

श्री.गजानन बारवाल : सिडको ज्या खुल्या जागा विकत आहे त्या आजपासून थांबविण्यात येणार आहेत काय ? जे टेंडर निघालेले आहेत त्यांना स्टे द्यावयास पाहिजे.

मा.महापौर : एका महत्वाच्या प्रश्नावर आजची सभा आयोजित करण्यात आली आहे. स. सदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा विचार करून मा. आयुक्तांनी २४ तारखेपर्यंत सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवावेत. २४ डिसेंबर ९९ पर्यंत

आजची सभा तहकुब करण्यात येते. २४ डिसेंबर ९९ रोजी दुपारी ३.०० वाजता सर्वसाधारण सभा घेण्यात येईल.

"जन गण मन " या राष्ट्रगीता नंतर ६.४५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौरांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २१-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सोमवार दिनांक २०-१२-९९ रोजी सकाळी ११.३० वा तहकुब करण्यात आलेली सर्वसाधारण सभा दिनांक २१-१२-९९ रोजी मा.महापौर यांच्या अध्यक्षते खाली सुरू झाली. सभेची सुरूवात वंदेमातरम् " या गीताने झाली. सदर सभेस महानगरपालिकेचे तसेच अधिकारी व स. सदस्य उपस्थित होते.(सभासदांची उपस्थिती हजेरी रजिस्टर प्रमाणे)**

१ स.स.श्री.केनेकर संजय किशनराव
२ स.स.श्री.ढगे नरसिंग मुरलिधर
३ स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलीकराव
४ स.स.श्रीमती लोखंडे रूख्मणबाई खंडेराव
५ स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम
६ स.स.सौ.साजेदा बेगम
७ स.स.श्री.गौतम भागाजी खरात
८ स.स.सौ.जोशी रजनी रमेश
९ स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१० स.स.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे
११ स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी
१२ स.स.नरेंद्र यादवराव पाटील
१३ स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१४ स.स.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव
१५ स.स.सौ. पदमा बाबुराव शिंदे
१६ स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी
१७ स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ
१८ स.स.सौ. विसपुते धनश्री अशोक
१९ स.स.सौ.फरहद बानो भ्र मो नवाज
२० स.स.श्री.फजलउल्ला ाखान उजमतउल्लाखान
२१ स.स.श्री.अजीज खॉ गणी खॅा
२२ स.स.श्रीमती आबेदा बेगम मो मुस्तफा
२३ स.स.सौ.नुरजहॉं बेगम अ.रहेमान खॅान
२४ स.स.श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद
२५ स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्यीन
२६ स.स.श्रीमती जाहेदा बेगम म जमीर
२७ स.स.सौ.यशोदा धनंजय वाडेकर
२८ स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर
२९ स.स.श्री.हमीदोद्यीन ताबा फसीयोद्यीन
३० स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद
३१ स.स.श्री.स.अ.इकबालोद्यीन स.मो.कुतुबोद्यीन
३२ स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण
३३ स.स.श्री.स.अली मिरा सलामी

३४ स.स.सौ. लता श्रीनिवास दलाल
३५ स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
३६ स.स.श्रीमती अलका रमेश पाटील
३७ स.स.सौ.धांडे शकुंतला हरिदास
३८ स.स.श्री.अ.रशिद खॉन (मामू)
३९ स.स.कु.माया लिंबाजी लाडवाणी
४० स.स.सौ.आव्हाड सविता संजय
४१ स.स.सौ.निर्मला विठठ्ल कांबळे
४२ स.स.श्री.विखारोद्यीन पि.खुदबोद्यीन
४३ स.स.श्री.बारवाल गजानन रामकिशन
४४ स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४५ स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव
४६ स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
४७ स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मणराव
४८ स.स.श्री.राजकुमार बचाटे (मामा)
४९ स.स.सौ.राधाबाई तळेकर
५० स.स.श्री.मेहेर विजयकुमार गजानन
५१ स.स.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे
५२ स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम
५३ स.स.श्री.घडामोडे भगवान देविदास

<u>संवाद :</u>

मा.महापौर : गणपुर्ती नसल्याने १५ मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते. ११.३० वाजता तहकुब करण्यात आलेली सभा १२.१० वाजता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

मा.महापौर : काल पासून सिडको हस्तांतरणाच्या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा चालू आहे. अधिकाऱ्यांनी स. सदसयंच्या सुचनांवर उत्तरे दिलेली आहेत. स. सदस्यांना काही सूचना मांडावयाच्या असतील तर त्यांनी दोन मिनिट त्या मांडाव्यात.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : काल आयुक्तांनी खुलासा केला की, सिडकोतील ड्रेनेज देखभाल दुरूस्तीसाठी ५-७ लाख खर्च येईल. या भागातील ड्रेनेज देखभाल दुरूस्तीसाठी होणाऱ्या खर्चाबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.डॉ.विजयकुमार मेहेर :आपण २४ तारखेस बैठक घेण्याचे काल घोषित केले होते ती आजच कशी बोलावली. सिडकोमध्ये सध्या जी कामे चालू आहेत परंतु हस्तांतरण होत आहे म्हणून ती कामे सिडकोने थांबवू नयेत अशी त्यांना समज देण्यांत यावी. सिडकोने घरे विकातांना नागरिकांना खूप प्रलोभने दाखविली होती परंतु त्यातील ५०% ही पूर्ण करण्यात आलेली नाहीत. या उर्वरित सुविधा महापालिका देणार आहे काय किंवा यासाठी येणारा खर्च सिडको देणार आहे काय याचाही खुलासा व विचार करावा.

मा.महापौर : २४ तारखेस बरेचसे कार्यक्रम असल्याने सिडको हस्तांतरणाची बैठक आजच बोलविण्यात आली आहे.

श्री.नरेंद्र पाटील :ज्या नागरिकांनी मालमत्ता कर भरलेला आहे तो संबंधिताचे नावे क्रेडीट करण्यात यावा. एन-५ मध्ये नाटयगृहासाठी ठेवलेली जागा विनामुल्य मनपात देण्यात यावी. या दोन गोष्टींचा ठरावात अंतर्भाव करण्यात यावा. मागील १०-१५ वर्षात मनपास शासन अनुदाना अंतर्गत १०-२० काटी मिळालेले आहेत. परंतु १० वर्षात या पेशातून सिडको भागात कोणतेही काम झालेले नाही.

श्री.रशिद खान (मामू) : सिडको प्रशासनाने त्या भागात चालू असलेली कामे थांबवू नयेत. मनपा आयुक्त हेच सिडकोचे मुख्य प्रशासक आहेत. त्यांनी याची काळजी घ्यावी. सिडकोमध्ये जो दैनिक वेतनावर व कंत्राटी कर्मचारी आहे. त्यांना महानगरपिलकात सामावून घेवू नये. कारण त्यामुळे कायम स्वरूपी लोक आहेत त्यांना सामावून घेण्यास हरकत नाही. सिडकोतील खुल्या जागा आपण किती घेणार, त्यांच्याकडून विकासात्मक कामांसाठी किती रक्कम घेणार याचा खुलासा व्हावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : कालपासून सिडको हस्तांतरणाबाबत सविस्तर चर्चा चालू आहे. मा. आयुक्तांनी केलेल्या खुलाशात काही दुरूस्त्या व्हावयास हव्यात काल आम्ही जे निवेदन केले त्या संपूर्ण बाबींचा मिनिटस्‌मध्ये उल्लेख करण्यात यावा. एफएसआय बाबत आयुक्तांनी त्यांच्या निवेदनात कोणताही उल्लेख केलेला नाही. याचाही उल्लेख मिनिटस्मध्ये यावयास हवा. सिडकोने एफएसआय मध्ये ३० टक्के वाढ केलेली आहे. मात्र १०० टक्के बांधकामे झालेली आहेत. सिडकोतील बहुतेक खुल्या जागामध्ये मंदिरे, समाज मंदिरे झालेली आहेत त्यामुळे त्या खुल्या जागा राहिलेल्या नाहीत. धार्मिक स्थळे पाडणे संयुक्तीक होणार नाही. ही बांधकामे नियमित झाली पाहिजेत. सिडकोमध्ये चालू असलेली विकासाची कामे थांबविली जावू नयेत. आयुक्तांनी सिडकोचे मुख्य प्रशासक म्हणून त्या भागातील नगरसेवक व अधिकाऱ्यांची एक बैठक घ्यावी. लिगचे फ्री होल्ड करण्यात यावे.

श्री.अविनाश कुमावत : सिडकोतील अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा देण्यासाठी १५ कोटींचा येणारा खर्च शासन देणार आहे काय ? शासनाकडून जर हा पैसा प्राप्त झाला नाही तर महानगरपालिका कोणत्या फंडातून ही कामे करेल याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

श्री.गजानन बारवाल : सिडकोने बांधकामासाठी दिलेला एफएसआय त्या भागात चालू असलेली विकासाची कामे या बाबी महत्वाच्या आहेत सिडकोतील खुल्या जागा आपण ताब्यात घेणार आहेत काय ? स.स.श्री.अविनाश कुमावत यांनी विचारलल्या प्रश्न अनधिकृत वसाहतीसाठी नागरी सुविधा कशा देणार हाही प्रश्न महत्वाचा आहे. शासनाकडून लवकर पैसा भेटेल असे वाटत नाही. महाराष्ट्र शासनाच्या मध्यस्थीने हा प्रश्न सोडविण्यात येतो काय ? याची ही माहिती द्यावी.

श्री.नरसिंग ढगे :सिडको भागातील ड्रेनेज लाईन, रस्ते आदिबाबत बरीच चर्चा झालेली आहे. सिडकोमध्ये पाणी पुरवण्यासाठी ३६-३६ घरे ज्या ठिकाणी २ इंच व्यासाच्या लाईन्स टाकलेल्या आहेत त्या बदलाव्या लागणार आहेत. याचाही विचार व्हावयास हवा. सिडकोतील व परमनंट कर्मचारी महानगरपालिकात घेण्यात येवू नयेत, त्यांना द्यावयाचे असेल तर त्यांची सिनियारीटी महापालिकात आल्या दिवसापासून गृहीत धरण्यात यावी. टेंपररी कर्मचाऱ्यांना घेण्याबाबत

विचार व्हावा. सर्व सभासदांनी मांडलेल्या सूचना लक्षात घेवून व काही अटीवर हस्तांतरण व्हावे.

सौ.रजनी जोशी : मा.पालक मंत्र्यांनी महाराष्ट्र शासनाकडून २० कोटी रूपये महानगरपालिकास मिळवून दिले. हस्तांतरण होणे वस्तूनिष्ठ आहे. हस्तांतरण हा सर्वांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. शासनाकडून अद्यापही ते अनुदान येणे बाकी आहे ते मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

श्री.भगवान घडामोडे : सिडको हस्तांतरण प्रश्नावर खूप चर्चा झालेली आहे. या मा. आयुक्तांनी केलेला खुलासा स्पष्ट नाही. खुल्या जागा कोणत्या आहेत. अनधिकृत वसाहती डिनोटीफाईड करण्याचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला नाही तर या वसाहती डिनोटीफाईड करण्याचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला नाही तर या वसाहतीतील लोक सुविधांसाठी महानगरपालिकेकडे येतील, त्यांना सुविधा कश्या देणार नियोजनाचे अधिकार शासनाकडे मंजूर केले नाहीत तर काय करणार यावर निर्णय होवून हस्तांतरण करण्यात यावे.

श्री.विखारोद्दीन :मागील तीन वर्षापासून सिडको हस्तांतरणाचा प्रश्न चर्चीला जात आहे. हस्तांतरण व्हावयास हवे. कसे व्हावे यासाठी मा. आयुक्तांनी व आपण नियोजन करावे. सिडकोतील खुल्या जागा, व प्ले ग्राऊंडची जागा कोणाच्या ताब्यात आहे हे पाहून प्रथम महानगरपालिकाच्या ताब्यात घ्यावी अन्यथा लोक ती विकून टाकतील.

सौ.पदमा शिंदे कालपासून या विषयावर चर्चा चालू आहे. सिडकोने सध्या जी देखभाल दुरूस्तीची कामे चालू केलेली आहेत ती पुढेही चालूच ठेवण्यात यावीत. डांबरीकरण, ड्रेनेज लाईन, साफसफाई ही कामे चालू ठेवण्यात यावीत. बंद असलेले विद्युत दिवे चालू करण्यात यावेत.

श्री.राजू इंगळे :सिडको भागातील नागरिकांचे प्रश्न सर्वांनी तळमळीने मांडले. महानगरपालिकेचे आयुक्त हेच सिडकोचे मुख्य प्रशासक आहेत. सध्या सिडकोत चालू असलेली कामे चालूच ठेवण्यात यावेत. सिडको भागातील नगरसेवकांची बैठक सिडकोतच बोलविण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : सिडको हस्तांतरणाबाबत मागील दोन दिवसांपासून सभागृहात चर्चा चालू आहे. हस्तांतरणाबाबत सर्वांची सहमती आहे. सिडकोने नागरिकांना सुविधा देण्यासाठी ज्या इमारती बांधल्या आहेत. महानगरपालिका अस्तित्वात येवून किती वर्षे झाली आजही शहरातील रस्ते खराब आहेत. मग सिडकोतील शाळा, दवाखाने, समाज मंदिरे यासाठी ६.७७ कोटी कशासाठी द्या ावयाचे. सिडकोने ड्रेनेजसाठी १.८५ कोटी देण्याचे कबुल केले आहे ती रक्कम कमी आहे. १९९२ मध्ये वॉटर पंप व संपसाठी ५५ लाख देण्यास सिडको तयार होती. सिडकोने १० कोटी महानगरपालिकेस द्यावयास पाहिजेत. नियोजनाचे अधिकार महानगरपालिकास मिळावयास पाहिजेत जेणे करून सिडको या भागातील जमिनी विकू शकणार नाही. शासन कोणाचेही असले तरी सर्व सरकारांनी महानगरपालिकास आर्थिक मदत केलेली आहे. १० कोटी अनुदान व १० कोटी सिडकोकडून घेण्यात योवत. हस्तांतरणानंतरच स्टाफ बाबत निर्णय व्हावा.

सौ.सुनंदाबाई कोल्हे : हस्तांतरणावर बरीच चर्चा झालेली आहे. येत्या बजेटमध्ये सिडकोसाठी ४०% बजेट ठेवण्यात यावे.

श्री.महादेव सुर्यवंशी :दोन दिवसांपासून हस्तांतणाच्या विषयावर चर्चा सुरू आहे. मा. आयुक्तांनी सविस्तर खुलासा केला आहे. स.सभागृहाचे मत आहे की, सिडकोकडून १६ इमारती पैकी ९ इमारती मिळालेल्या आहेत . उर्वरित ७ इमारती विनामुल्य मिळावयास पाहिजेत याचा खुलासा व्हावयास पाहिजे. ड्रेनेजबाबत सविस्तर खुलासा होणे आवश्यक आहे. सिडकोतील पाणी पुरवठा महानगरपालिकाकडे आहे. लिज होल्डचे फ्री होल्ड व नियोजनाचे अधिकार लवकरात लवकर महानगरपालिकाकडे घेण्यात यावेत.

मा.आयुक्त : सिडकोचे महानगरपालकेकडे हस्तांतरण व्हावे याबाबत कालपासून चर्चा चालू आहे. काल सभागृहात स.सदस्यांनी काही मुदद्, काही उपप्रश्न उपस्थित केले होते. त्यानुसार काही गोष्टींचा खुलासा करण्याचा मी प्रयत्न करत आहे. स.नगरसेवक नरेंद्र पाटील व प्रदिप जैस्वाल यांनी ड्रेनेज लाईन साठी ठेवलेली ६-७ लाख रुपयाची तरतूद अपुरी आहे. अशी सूचना मांडली. सिडको मार्फत जी कामे सध्या चालू आहेत ती सभागृहापुढे ठेवणे आवश्यक आहे. सिडकोतील कामे ही किर्लोस्कर कंस्टल्टन्सी यांच्या अहवालानुसार करण्यात येत आहेत. मागील काळात सिडकोने विविध विकासाची साडे चार कोटीची कामे केलेली आहेत. १९९७-९८ मध्ये १७.५९ लक्षाची कामे झालेली आहेत. १९९८-९९ मध्ये ७.६७ लक्षाची तर एप्रिल ९९ ते नोंव्हेंबर ९९ मध्ये १३ लाख ४६ हजाराची कामे झालेली आहेत. सध्या २.१९ लाखाची ड्रेनेजची कामे चालू आहेत. नवीन प्रस्तावित कामे ५ लाख ९५ हजाराची आहेत. प्रस्तावित केलेली कामे व चालू असलेले कामे ही पुढे चालूच राहतील. सध्या चालु असलेली कामे हस्तांतरणानंतर बंद पडणार का व हस्तांतरणानंतर सिडको प्रशासन ही जबाबदारी महानगरपालिकेकडे सोपविणार असा प्रश्न काही स.नगरसेवकांनी उपस्थित केला. मी सांगू इच्छितो की जी कामे प्रगती पथावर आहेत ती चालूच राहतील व जी कामे प्रस्तावित केलेली आहेत ती कामेही होतील. याबाबत आदेशही काढले जाणार आहेत. देखभाल दुरुस्तीचे रक्कम सिडको महानगरपालिकेस देणार आहे. ड्रेनेजसाठी ६.४५ लाख एवढी रक्कम मिळणार आहे. एस.टी.पी.साठी २.७५ लाख व सिवरबो प्लॅटसाठी ३.३५ हजार अशी एकंदर १२.४५ लाख रुपये महानगरपालिकास मिळतील. याच बरोबर नाट्यगृहाची जागा महानगरपालिकास विनामूल्य द्यावी. या बाबतचा प्रस्ताव सर्वांची सूचना लक्षात घेऊन सिडकोकडे पाठवत आहे. स.महापौर व उपमहापौरांनी प्रयत्न करुन ही जागा विनामूल्य मिळविण्याचा प्रयत्न करावा. एफ.एस.आय. संदर्भाने प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. महापालिकेस नियोजनाचे अधिकार देण्यांत यावेत. अशी मागणी आहे. त्यामुळे हस्तांतरणानंतर या बाबत आपण निर्णय घेण्यास सक्षम आहोत. सिडकोतील कर्मचारी आपल्याकडे घेतल्यानंतर त्यांची सेवा जेष्ठता व इतर प्रश्न निर्माण होतील अशी सूचना मांडली गेली. याबाबत स्पष्ट करण्यात येते की, जेव्हा एखादा संस्थेकडून दुसऱ्या संस्थेकडे कर्मचारी वर्ग हस्तांतरीत करण्यात येतो. तेव्हा शासनाच्या नियमांच्या अधिन राहून सेवा जेष्ठता ठरवता येते. त्या नियमाच्या आधारे निर्णय घेण्यांत येईल. हा प्रश्न परत सर्वसाधारण सभेत ठेवावा लागणार आहे. यामध्ये कोणताही वादविवाद निर्माण होणार नाही. यात आवश्यकता भासली तर शासनाचे मार्गदर्शन घेण्यांत येईल. हा धोरणात्मक

मुद्दा आहे. अनधिकृत वसाहती ही वस्तुस्थिती आहे. याबाबत सर्व साधारण सभेत विचारपुर्वक निर्णय घ्यावा लागणार आहे. या वसाहतीच्या विकासासाठी पैसा कोठून आणणार. याबाबत मी एकटा भाष्य करणे योग्य राहणार नाही. यात सखोल विचार करुन धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. योग्य वेळी हा विषय सर्वसाधारण सभेपूढे ठेवून त्यावर निर्णय घेतला जाईल. या वसाहती अधिकृत असल्या तरी मानवीय दृष्टीकोनातून त्यांना सुविधा द्याव्या लागतील. त्या कशा द्यावयाच्या हे धोरण आपणास ठरवावे लागेल.

श्री.जयवंत (बंडू) ओक : शहरात ६० स्लम आहेत. ६० अनधिकृत वसाहती आहेत. सिडकोतील अनधिकृत वसाहतींबाबत आजच निर्णय घेण्यांत यावा. शासनाची या वसाहतींना मंजूरी घेण्यांत यावी.

मा.आयुक्त : अनधिकृत वसाहती बाबत निर्णय घेतांना आयुक्तांना काय वाटते हे सांगणे या प्रसंगी योग्य होणार नाही. स.नगरसवेकांच्या सूचना, सभागृहाचे मत यांचे म्हणणे ऐककून निर्णय घ्यावा लागणार आहे. हा निर्णय धोरणात्मक असेल. स.नगसेवक काशिनाथ कोकाटे यांनी मांडलेली सूचना की सिडकोतील नगरसेवकांची एक स्वतंत्र बैठक सिडको कार्यालयास बोलविण्यांत यावी. या संदर्भाने लवकरच बैठक बोलावली जाईल.

श्री.नरेंद्र पाटील : जर हस्तांतरण झाले तर येत्या वर्षीच्या अर्थसंकल्पात सिडकोसाठी २५ ते ३० टक्के तरतूद करण्यात यावी. परंतू हस्तांतरण झाले नाही तरी एवढी रक्कम सिडकोतील विकासात्मक कामांवर खर्च करण्यांत यावी, कारण ठराव झाला तरी शासनाकडून त्यास मंजूरी मिळण्यात वेळ लागेल. सिडकोकडे खर्च करण्यासाठी काहीही नाही.

श्री.गजानन बारवाल : सिडको जे प्लॉटस् विक्री करत आहे ते थांबविण्यांत यावे. काढलेल्या टेंडरला स्टे देण्यांत यावा.

श्री.महादेव सुर्यवंशी : सिडकोतील उच्च दाब विद्युत वाहिन्या स्थलांतरीत करण्यासाठी लागणारी रक्कम बाबतही निर्णय घेण्यास यावा.

श्री.रशीद खॉन (मामू) : मा.आयुक्तांनी खुलासा केला की, कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्याबाबत नियमावली आहे. परंतू हा स्टाफ टेक्नीकल नाही. त्यांना महानगरपालिकेत सामावून घेणे जरुरी नाही. सिडकोतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत सामावून घेऊ नये.

मा.महापौर : कालपासून या विषयावर चर्चा चालू आहे. सिडको हस्तांतरणाचा ठराव सर्वांच्या सूचनांसह मंजूर करण्यांत येतो. त्यात खालील अटी घालून तो शासनाकडे पाठवण्यांत येईल. सिडकोतील कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी स.सदस्यांना विरोध आहे. असे शासनास कळविण्यांत येईल. १५ कोटी रुपयाची मागणी करण्यांत यावी. सिडकोतील नाट्यगृह विनामूल्य महानगरपालिकेस देण्यात यावे. सिडकोतील खुल्या जागा विकण्यास स्थगिती द्यावी असे सिडको बोर्डास कळवावे.

श्री.अविनाश कुमावत : महापौर, आयुक्त, उपमहापौर यांनी चांगल्या पध्दतीने सभा चालविली व सिडको हस्तांतरणाचा निर्णय घेतला यासाठी आपणा सर्वांचे अभिनंदन.

श्री.रशिद मामू : या ठरावास माझे अनुमोदन आहे.

श्री.महादेव सुर्यवंशी : सिडको हस्तांतरणाच्या अनेक बैठका झाल्या, परंतू आजचा योगायोग असा की, महापौर सिडकोचे रहिवासी आहेत व महानगरपालिकाचे आयुक्तही सिडकोचे मुख्य प्रशासक आहेत. सर्वांनी हा विषय चांगल्या पध्दतीने हाताळला.

मा.महापौर : हा ठराव सर्वानुमते मंजूर करुन सिडकोच्या नागरिकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. या बाबत सर्वांचेच अभिनंदन उपमहापौर श्री.संजय केनेकर यांनी काल एक पत्र दिले होते. सर्वांची मंजूरी असेल तर त्यावर चर्चा करण्यात येईल. उपमहापौरांनी काल मला कल्पना न देता सभागृहात खाली बसले व आज वृत्तपत्रात त्याबाबत चौकटीत बातमी आलेली आहे. हा सभागृहाचा अपमान आहे. स.उपमहापौरांचे काय म्हणणे आहे हे पाच मिनीटांत ऐकून घेण्यात यावे.

श्री.अविनाश कुमावत : मा.उपमहापौरांनी जकात चोरीच्या गाड्या पकडल्या होत्याृ त्याबाबत काय झाले यावर त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत यावे.

मा.उपमहापौर :अतिशय खेदाची बाब आहे की गेल्या १५ दिवसांपूर्वी शहराच्या मध्यवस्तीत चार गाड्या जकात न भरता आल्याने मला समजल्याने मी त्या माहिती आधारे जकात कर्मचारी श्री.अजमत खॉन यांना या गाड्या चेक करण्याची सूचना केली व गाड्या चेक होतात की नाही हे पाहण्यासाठी एक माणूस पाठवला. श्री.गिरी त्यावेळी भेटले नाहीत. श्री.अजमत खॉन यांनी गाड्या पकडल्या त्या ड्रायव्हर बरोबर १५ मिनीटे चर्चा केली. श्री.गिरी स्वतः त्या ठिकाणी तोपर्यंत आले होते. त्यांनी श्री.अजमत खॉन यांना बोलले व गाडीत बसवून घेऊन गेले व गाड्या सोडावयास लावल्या. मा.श्री.जयसिंगराव पाटील हे विमानाने येणार होते. म्हणून मी गडबडीत होतो. मी.श्री.गिरी यांना फोन लावून गाड्या चेक न करता का सोडल्या याबाबत विचारणा केली. त्यावेळी गिरी यांनी सांगितले की, तुम्ही गाड्या अडवू शकत नाहीत. प्रत्यक्षात मी गाड्या अडवल्याच नव्हत्या अजमत खॉन यांनी गाड्या अडवल्या होत्या. श्री.गिरी यांनी सांगितले की, वरीष्ठांच्या आदेशावरुन मी गाड्या सोडल्या म्हणून मी माझे निवेदन मा.मुख्यमंत्र्यांना पाठविले. मी या पत्राच्या कॉफीज स.पदाधिकारी व उपआयुक्तांना दिल्या. याचे उत्तर प्रशासनाने द्यावे.

श्री.गिरजाराम हाळनोर : मा.उपमहापौरांनी जो आरोप केला की श्री.गिरी यांनी सांगितले की वरीष्ठांच्या आदेशावरुन गाड्या सोडल्या. हे वरीष्ठ अधिकारी कोण याची सभागृहास माहिती देण्यात यावी.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : जकात हे महत्वाचे उत्पन्नाचे साधन आहे. जकातीतील उत्पन्नावरच शहरवासियांना विविध सोयी सुविधा दिल्या जातात. मागील तीन वर्षापासून जकातीचे उद्दीष्ट गाठले जात नाही. डिसेंबर ९९ अखेर ३० कोटी रुपये जकात झालेली असावी. पुढील ३ महिन्यात १८ कोटीची वसुली होणार आहे काय? उप महापौरांनी सांगितल्यानुसार जकात चुकवून आलेल्या गाड्या का सोडण्यात आल्या. केवळ जकातीमुळे आपले बजेट कोलॅप्स होत आहे. संपा सारख्या गोष्टीमुळे ही जकातीवर परिणाम झालेला आहे. हेही बरोबर आहे. वस्तुच्या किंमतीमध्ये दरवर्षी १५ टक्के वाढ होत असते. असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मागील वर्षापेक्षा ३ कोटीने कमी वसुली झालेली आहे. जकातीच्या उत्पन्नातूनच शहरात विकासाची कामे घेतली

जातात. जकातीच भ्रष्टाचार असेल तर याची चौकशी झाली पाहिजे, याबाबत आयुक्तांनी सविस्तर खुलासा करावा.

श्री.रशिद खॉन (मामू) : जकात अधिक्षक श्री.गिरी यांना सभागृहात बोलविण्यांत यावे.

श्री.गजानन बारवाल : उपमहापौरांनी केलेली तक्रार गंभीर आहे. अशा प्रकरणात उपमहापौरांना निषेध म्हणून खाली बसावे लागले व आपण विनंती केल्यानंतर ते वरती उपमहापौरांच्या चेअरवर बसले. महानगरपालिकाकडे पैसा नसतांनाही कारभार कसाबसा चालवण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. उपमहापौरांच्या तक्रारी सारख्या महत्वपुर्ण घटनेची प्रशासन दखल घेत नाही. उपमहापौरांनी तक्रार केली असतांनाही गाड्या सोडल्या गेल्या. यासाठी प्रथमदर्शनी श्री.गिरीवर कार्यवाही करण्यात यावी. भ्रष्टाचारा बाबत नेहमीच बोलेले जाते. जकातीचे खाजगीकरण करण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेण्यांत यावा. दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यांत यावी.

श्री.नरेंद्र पाटील : यापुर्वीही अशा अनेक घटनांबाबत खरेखोटे आरोप करण्यांत आलेले आहेत. अनेकवेळा चौकशीचे आदेश दिले परंतू त्यानंतर असा प्रकरणात काय कार्यवाही झाली. ते मात्र सभागृहासमोर केव्हाही आलेले नाही. जकातीचेच उत्पन्न कमी झाले तर विकासाची कामे कशी हाती घेणार. आवक कमी जास्त झाल्यामुळे जकातीच्या उत्पन्नात थोडाफार फरक पडू शकतो. उपमहापौरांना जर अशी वागणूक मिळत असेल तर ही चिंताजनक बाब आहे. या प्रकाराची चौकशी होण्यासाठी महापौर, आयुक्त, उपमहापौर यांची चौकशी समिती स्थापन्यात यावी. समितीने चौकशी करुन कार्यवाही करावी.

श्री.मिरा सलामी : जकात हे महानगरपालिकाचे उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. दोन वर्षा पुर्वीही असे प्रकार घडले होते. त्याच्या चौकशीची काय झाले. काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या होत्या. तीन महिन्यांत पुन्हा ते कर्मचारी परत जकात विभागात गेले आहे. दहा वर्षापासून जे कर्मचारी तेथे काम करत आहेत. त्यांना तेथून काढण्यांत यावे. दोन तीन वर्षापुर्वी जकातीत एक भरारी पथक स्थापले होते. त्याचे पुढे काय झाले. पुर्वीचे प्रशासक श्री.भोगे साहेबांनी ओपन डिलेव्हरी पध्दत सुरु केली होती. ती का बंद करण्यात आली. नलावडे १९९२ पासून जकातीत आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार ते ९७ पासून तेथे काम करतात. प्रशासनाने माहिती दिली ते जकातीत जानेवारी, ९८ पासून कार्यरत आहेत. प्रशासनातर्फे माहिती चुकीची दिली जाते. ते बऱ्याच वर्षापासून जकात विभागात काम करत आहेत. त्यांची बदली करण्यांत यावी.

श्री.विखारोद्दीन : ८ महिन्यात जकातीचे २८ कोटी वसुली झाली. ४ महिन्यात ५ कोटी प्रत्येक महिन्यांत वसुल होणार आहे काय. याबाबत स्थायी समिती सदस्य म्हणून मी.मा.सभापतीकडेही चौकशी केलेली आहे. मा.उपमहापौरांनी केलेल्या तक्रारीत कोण कोण संबंधित आहेत. उपमहापौरांना अशी वागणूक का देण्यांत आली, याची माहिती सभागृहास देण्यांत यावी. ऑक्ट्राय मध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालु आहे. यामागे कोण कोण आहेत याची चौकशी व्हावयास पाहिजे.

श्री.भगवान घडामोडे : उपमहापौरांना जर अधिकारी कर्मचाऱ्यांकडून अशी अपमानास्पद वागणूक मिळत असेल. सभागृहाने याचा निषेध करावयास हवा.

पदाधिकाऱ्यांना अशी वागणूक मिळत असेल तर सर्वसामान्य जनतेस कशी वागणूक मिळत असेल. याचा गांभीर्याने विचार व्हावयास हवा. या घटनेमध्ये कोण वरीष्ठ अधिकारी होते, कोणाचा आदेश होता याची चौकशी व्हावयास हवी. या सभागृहात अनेक समित्या नेमल्या परंतू पाच वर्षाच्या कालावधीत आम्हास अहवाल मिळाले नाहीत. समिती नेमून वेळ वाया घालवण्यापेक्षा न्याय द्यावयाचाच असेल तर येथेच निर्णय घेवून त्यावर कार्यवाही करावी. एवढा प्रचंड गोंधळ जकातीत असेल तर जकातीचे खाजगीकरण करण्यात यावे. त्यामुळे महानगरपालिकाचे उत्पन्नही वाढेल.

श्रीमती अल्का पाटील : जकात हा महानगरपालिकाचा आत्मा आहे. यावरच कर्मचाऱ्यांची रोजी रोटी चालते. उपमहापौरांना जर अशी वर्तणूक मिळत असेल तर संबंधितांवर कार्यवाही व्हावयास हवी. श्री.रशिद खॉन मामू, महापौर असतांना स.नगरसेवक नुरजहाँ बेगम यांनी जकाती बाबत काही प्रश्न विचारले होते. तेव्हा प्रश्न डावलून त्यांना निलंबित करण्यांत आले होते. याबाबत कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर : मागील ५ वर्षात बजेटमध्ये जकातीचे ठेवलेले उद्दीष्ट व झालेली वसुली यांची माहिती सभागृहात द्यावी.

मुख्य लेखाधिकारी : जकातीबाबतची पूर्ण आकडेवारी आज उपलब्ध नाही. तथापि दिलेले उद्दिष्ट पूर्णतः गाठले गेलेले नाही. त्यामुळे रिवाईज्ड बजेटमध्ये ते कमी जास्त केले जाते. यात १५ ते २०% फल्कच्युएशन असते. डिसेंबर मध्ये आढावा घेऊन टार्गेट रिवाईज केले जातात.

श्री.गजानन बारवाल : इतर विषयांवर न बोलता याच विषयावर बोलण्यात यावे. जकातीचे खाजगीकरण करता येईल की नाही हे पाहावे.

श्री.हमीद ताबा : व्हिडीओकॉन कंपनीच्या जकातीच्या १.३० लाखाच्या बोगस पावत्या पकडल्याबाबत वृत्तपत्रात बातम्या आलेल्या आहेत. डुप्लीकेट पुस्तके छापल्याबाबत क्रांतीचौक पोलिसात गुन्हा दाखल झालेला आहे.

उपआयुक्त (प्र.) : व्हिडीओकॉन कंपनीची घटनाही औरंगाबाद च्या हद्दीतील नाही ती परभणी नगर पालिकेच्या हद्दीतील आहे. याबाबत सूंपर्ण माहिती जकात अधिकाऱ्यांकडून घेतली आहे.

श्री.हमीद ताबा : ही घटना औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील नाही. ही माहिती बरोबर नाही. यात परभणीचे दोन लोक आहेत.

उपआयुक्त (प्र.) : ही घटना औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील नसून ती परळी नगरपरिषदेच्या हद्दीतील आहे. तथापि व्हिडीओकॉन कंपनी औरंगाबादची असल्यासने गुन्हा क्रांतीचौक पोलिस स्टेशनमध्ये नोंदविलेला आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : गुन्हा परभणीत घडला असेल तर त्याची नोंद तेथेच व्हावयास हवी.

श्रीमती नुरजहाँ बेगम : सोन्या चांदी वरील जकात चुकीच्या पध्दतीने लावण्यात येते. याबाबत मी मागे प्रश्न विचारला होता. त्यावेळी महापौर रशिद मामूंनी माझे सदस्यत्व १५ दिवसांसाठी निलंबित केले होते. आजच याबाबत चर्चा कशी करण्यांत येत आहे. भोगे साहेबांच्या ट्रान्सफर नंतर जकात वसुली कमी झालेली आहे. त्यावेळी माझ्यावर वेगवेगळे आरोप लावण्यात आले.

मा.महापौर : यापुर्वी माझ्यासमोर जकात वसुलीबाबत चर्चा झालेली नव्हती. आजच अशी चर्चा होत आहे.

श्री.रशिद मामू : स.नगरसेविका दुकानात जाऊन सोन्या चांदी वरील जकाती बाबत चौकशी करत आहेत, अशी बातमी वृत्तपत्रात आली होती. नगरसेवकांना असे अधिकार नाहीत. त्यावेळी सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी मी त्यांना समज दिली होती. दुकानात जाऊन चेक करणे, जकात अधिक्षकांना धमकवित हे बरोबर नाही. नुरजहाँ बेगम जकातीत गेल्या असे मी म्हणालो नाही.

श्रीमती नुरजहाँ बेगम : नगरसेवकांचा कालावधी संपण्यासाठी तीन महिन्याच्या कालावधी राहिलेला आहे. जकात कमी प्रमाणात का वसुल होत आहे.

डॉ.विजयकुमार मेहर, श्री.गजानन बारवाल : उपमहापौरांनी १५ दिवसापुर्वी पत्र दिले होते. या पत्रावर कार्यवाही का झाली नाही, याचा खुलासा व्हावा. सभागृहाचा वेळ का घेण्यांत येत आहे.

मा.महापौर : जकात हा उत्पन्नाचा कणा आहे. जकात अधिक्षक श्री.गिरी यांना सभागृहात बोलविण्यांत आलेले आहे. ते येईपर्यंत १० मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यांत येत आहे.

(दु.१.३० वाजता तहकुब करण्यात आलेली सभा मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली दु.२.१५ वाजता परत सुरु झाली.)

मा.महापौर : जकात अधिक्षकांनी विषयाची माहिती घेऊन खुलासा करावा. उपमहापौरांचे म्हणणे आहे की, चार गाड्या जकात न भरता आल्याचे निदर्शनास आल्यानंतर आपल्याकडे तक्रार केली. आपण सोडून दिल्या. वरीष्ठ अधिकारी कोण, गाड्या का सोडल्या याचा खुलासा करावा.

जकात अधिक्षक : दि.०३.१२.९९ रोजी दैनिक तरुण भारतमध्ये दोन गाड्या जकात न भरता सोडल्याबाबत वृत्त प्रकाशित झाले होते. त्यावर खुलासा सादर करण्यांत आला होता. वृत्तानुसार बॅटको सोडलाईन्स मार्फत वाहन क्र. एम.डब्लबी-८७०९ हे वाहन मुंबई नाक्यावरुन दि.१५.११.९९ रोजी करारपत्र फाडून (करारपत्र नं.७७२१२) मध्यवर्ती नाक्यावर पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आले होते. सदर वाहनास १०९ एलआर होते. त्यापैकी १३ एलआरचा माल औरंगाबाद हद्दीबाहेरील होता. एकूण ९६ एलआरचा माल औरंगाबाद मधील विविध व्यापाऱ्यांचा होता. मध्यवर्ती गोदाम येथे कार्यरत जकात निरिक्षक यांनी संबंधित वाहनासमवेत असलेल्या एलआर व देयकांची तपासणी करुन व आयात मालाचे मुल्यांकन भरुन महानगरपालिकेची जकात पावती क्र.३४१८२ ते ३४२०० तसेच ३४२०१ ते ३४२७४ अशा एकूण ९३ जकात पावत्या फाडल्या त्याची जकात रु.१४,१०१ वसुल करण्यात आली व महानगरपालिका फंडात जमा करण्यात आली. मध्यवर्ती गोदामावर वाहने आल्यानंतर करारपत्रक मालाची व कागदपत्राची तपासणी करुन जकात आकारला जातो. यात जकात अधिक्षकांचा कोठे ही संबंध येत नाही. वृत्तपत्रातील वृत्तात वाहन क्रमांक एम.एच.०९ एल ९४८ या वाहनातील माल पानदरीबा येथे गोदामात उतरला. संबंधित माल कोणत्या व्यापाऱ्यांचा व वाहतुकदार कंपनीचा होता याचा खुलासा केल्यास त्याचाही खुलासा करण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : उपमहापौरांनी आरोप केला की चार गाड्या पकडल्या. त्या गाड्या अजमत खॉन यांनी पकडल्या. त्या गाड्या आपण वरीष्ठांच्या आदेशानुसार सोडल्या असा त्यांचा आरोप आहे. यावर आपण खुलासा करावा.

जकात अधिक्षक : कोणत्याही चार गाड्या पकडल्या नव्हत्या. ज्या दिवशी मा.श्री.जयसिंगराव गायकवाड साहेब येथे मिरवणूकीत आले होते. त्या दिवशी मा.उपमहापौर सेंट्रल नाक्यावर आले त्यांनी सांगितले की दोन गाड्या चेक करावयाच्या आहेत. त्यावेळी मी तेथे नव्हतो. इन्स्पेक्टर घेऊन ते गेले. मोंढ्यातून गाड्या चेक करत मी येत होतो. त्यावेळी इन्स्पेक्टरची माझी भेट झाली व त्यांनी मला हे सांगितले त्यावेळी उपमहापौर बरोबर नव्हते. दोन अनोळखी इसम होते. त्यांच्या सोबत गाडी चेक करण्यासाठी मी माझा इन्स्पेक्टर दिला नाही. व मी इन्स्पेक्टरला घेऊन परत गेलो. कोणत्याही वरीष्ठ अधिकाऱ्यांने आदेश दिले नाहीत.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : श्री.गिरी यांचे म्हणणे की ते राऊंडवर असतांना इन्स्पेक्टर मा.उपमहापौरांना भेटले. गाड्या उभ्या असतांना इन्स्पेक्टर काय करत होता? नगरसेवकांना गाड्या चेक करण्याचे अधिकार नाहीत हे बरोबर आहे. परंतू तक्रार केल्यानंतर आपण गाड्यांची तपासणी करावयास पाहिजे होती. गाड्या जकात नाक्यावरच आल्या असल्या तर त्यांना चेक करण्याची गरज नव्हती.

श्री.रशिद खॉन मामू : उपमहापौरांनी गाड्या पकडल्यानंतर कार्यकर्ता बरोबर न पाठवता आयुक्तांना सांगावयास पाहिजे होते.

श्री.गजानन बारवाल : उपमहापौरांनी गाड्या जकात चुकवून आल्याची माहिती दिली होती. याची चौकशी व्हावयास पाहिजे.

श्री.गिरजाराम हाळनोर : कोणत्याही नागरिक गाड्या चेक करण्यासाठी सांगू शकतो.

मा.उपमहापौर :१६.११.९९ रोजी मला माहिती मिळाल्यानंतर मी श्री.गिरी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतू तो झाला नाही. मी मा.श्री.जयसिंगराव पाटील यांच्या कार्यक्रमासाठी जात होतो. जकात न भरता आलेल्या गाड्या पकडण्यासाठी सांगण्याची माझी भावना प्रमाणिक होती.

श्री.रशिद खॉन मामू : उपमहापौरांनी तक्रार केल्यानंतरही श्री.गिरी यांनी गाड्या का चेक केल्या नाहीत याची माहिती घ्यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : गाड्या पकडल्या आहेत हे माहित असतांना इन्स्पेक्टरला परत नेणे हे बरोबर नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर : उपमहापौरांनी गाड्या १६.११.९९ रोजी पकडल्या आहेत. परंतू पावत्या त्या तारखेच्या दिसत नाहीत. त्यात काहीतरी विसंगती आहे.

श्री.गजानन बारवाल : उपमहापौरांनी पत्र दिल्यानंतर त्यांना १५-१५ दिवस प्रशासनतर्फे उत्तर का दिले जात नाही.

श्री.प्रभाकर विधाते : शहरातील कोणत्या नाक्यावर गाड्या आल्या व कोणत्या नाक्यावर पावत्या फाडण्यात आल्या याची चौकशी करण्यात यावी. त्यांना गाड्या सोडण्याबाबत कोणत्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी आदेश दिले होते.

सौ.लता दलाल : उपमहापौरांच्या म्हणण्यानुसार चार गाड्या पकडल्या हे त्या तर जकात अधिक्षकांच्या म्हणण्यानुसार दोनच गाड्या गेल्या कोणत्या दोन गाड्या पकडल्या याचे नंबर द्यावेत म्हणजे प्रकरण नेमके समजेल.

श्री.गौतम लांडगे : जकात चुकवे गिरीबाबत उप महापौरांनी तक्रार दिलेली होती. कोणत्याही नागरिकांकडून तक्रार आली तरी ती पडताळून पहावयास पाहिजे. उपमहापौरांची तक्रार ही विशेष गांभीर्याने घेतली गेली नाही. वृत्तपत्रात जी बातमी आली त्यावर कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. जकातीची वसुली प्रतिदिनी १५.३० लाख व्हावयास हवी. या प्रकरणात काहीतरी काळेबेरे आहे असे वाटते. जकात अधिक्षकांचे उत्तर समाधानकारक नाही. या प्रकाराची सखोल चौकशी व्हावयास पाहिजे.

मा.महापौर : उपमहापौरांच्या पत्रांवर काय कार्यवाही झाली याचे उत्तर उपआयुक्त (प्र.) यांनी द्यावे.

उपआयुक्त (प्र.) : याबाबत मा.उपमहापौरांनी समक्ष चर्चा झाली आहे. त्यानुसार सर्व कागदपत्रे पाहिली सर्व गाड्यांची एकत्रित जकात १४,१०१/- एवढी होते. याची परत चौकशी करण्यांबाबत मी श्री.गिरी यांना सूचना दिल्या होत्या. मा.उपमहापौरांच्या पत्राची दखल घेतली नाही असे नाही. इतः वर प्रशासन योग्य ती काळजी घेईल.

श्री.गजानन बारवाल : आपण मा.उपमहापौरांना सविस्तर माहिती दिली आहे काय? मा.उपआयुक्तांचे उत्तर असमाधानकारक आहे. आलेली तक्रार व देण्यांत येत असलेले उत्तर यात संदिग्धता आहे. या प्रकरणाची चौकशी व्हावयास पाहिजे.

श्री.प्रभाकर विधाते : उपमहापौरांनी दिलेले पत्र चुकीचे होते का? प्रशासनाचे उत्तर संदिग्ध आहे. गाड्यातील मालाबाबत कोणकोणत्या कंपनीचे एलआर होते.

मा.उपमहापौर :पत्र देण्यामागे माझा एकच हेतू होता की ऑन द स्पॉट गाड्या चेक का झ ाल्या नाहीत. इतर बाबींशी मला काहीही घेणे देणे नाही.

श्री.गौतम खरात : जकात प्रश्नासंदर्भाने वारंवार चर्चा होत असते. परंतू अधिकारी या बाबीकडे डोळेझाक करतात. हे बरोबर नाही. दोन गाड्या जरी असल्या तरी त्यांची चेकींग का केली नाही. श्री.अजमत खॉन यांनी कोणत्या सांगण्यावरुन हे कृत्य केले. अशी पॉलीसी असेल तर उद्दीष्ट पूर्ण होणारच नाही. शहरात आलेल्या मालावर पूर्णपणे ऑक्ट्राय फाडला पाहिजे. एकाच पावतीवर शहरात पुनः पुनः माल आणला जातो. असेही प्रकार होत आहेत. गाड्या पुर्णपणे अनलोड होत नाहीत. जकातीसाठी खोटी देयके आणली जातात. गाड्या पुर्णपणे अनलोड व्हावयास पाहिजेत. ठराविक ट्रान्सपोर्टची वाहने अनलोड होत नाही. फटाक्यावरील जकाती संदर्भानेही काही बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. त्याचीही चौकशी व्हावयास हवी.

श्री.गजानन बारवाल : या प्रकरणाची चौकशी व्हावयास हवी. गेल्या पाच वर्षात जकातीत मोठी तुट आलेली आहे. आपण ठरविलेले + उद्दिष्ट पूर्ण होत नाही. यासाठी जकातीचे खाजगीकरण करण्यात यावे.

मा.महापौर : उपमहापौरांनी केलेल्या तक्रारीवरील उत्तर समाधानकारक नाही. मा.आयुक्तांनीच या प्रकरणाची चौकशी करावी व येत्या सर्वसाधारण सभेसमोर अहवाल ठेवावा. संबंधितावर कार्यवाही करावी. जे कर्मचारी तीन वर्षापेक्षा जास्त काळापासून जकातीत काम करत असतील. त्यांच्या बदल्या करण्यांत याव्यात. जकात ही उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. एखादी संस्था ५७ कोटी रुपये म्हणजेच २०% वाढ करुन जकात घेण्यास तयार असेल तर जकात वसुलीचे खाजगीकरण करण्याचा प्रशासनाने विचार करावा.

१) औरंगाबाद महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण करतांना सिडकोने रस्ते, जलवाहिन्या, जलनि:सारण वाहिन्या व पथदिवे अद्यावत स्वरुपात द्याव्यात. महानगरपालिका अधिकारी व सिडको अधिकारी यांनी हस्तांतरणापुर्वी या बाबींवर संयुक्त अहवालावर स्वाक्षऱ्या कराव्यात, जेणेकरुन महानगरपालिकेस भविष्यांत आर्थिक अडचणी येणार नाहीत.
२) लिज होल्डरचे फ्रिहोल्ड करणे बाबत सिडको संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. सिडकोचे हस्तांतरण आदेशामध्ये या बाबींचा समावेश करावा. व प्रशासनाने शासनाकडून या प्रस्तावावर लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबत पाठपुरावा करावा.
३) सिडको भागातील अनधिकृत वसाहती मधील नागरी सुविधां करिता महानगरपालिकेस १५ कोटी देण्यांत यावेत.
४) सिडको भागातील सर्व विकासाचे व नियोजनाचे अधिकार पुर्णत: महानगरपालिकेस मिळावेत. हस्तांतरण आदेशामध्ये याचा समावेश करण्यांत यावा.
५) सिडकोतील ३९ माळी व ३१ इतर कर्मचारी वर्ग जो कायमस्वरुपी सिडकोच्या सेवेत आहे. ती पदे महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेण्यांत यावेत.
६) सिडकोने बांधलेल्या इमारती महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरीत करुन देण्यांत याव्यात कारण सुखसुविधा व सार्वजनिक इमारती बांधणे ही सिडकोची कामे होती. त्यामुळे सुख सुविधा सेवा सोबतच इमारती हस्तांतरीत करण्यात याव्यात.
७) सिडको भागातील नर्सरी व उद्याने महानगरपालिकेस विनाअट हस्तांतरीत करण्यात याव्यात.
८) सिडको क्षेत्रातील खुल्या जागेस हस्तांतरणापुर्वी तार कुंपन अथवा संरक्षित भिंत सिडकोने बांधून द्याव्यात.
९) गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या भूखंडाचा विकास सिडकोच्या अटी व शर्तीनुसार करण्यात यावा.
१०) * लोकवर्गणी सिडकोने महानगरपालिकेस १.७५ कोटी महानगरपालिकेस द्यावेत.

** सिडको हस्तांतरणाच्या तारखेपासून मालमत्ता कर आकारण्यांत येईल.

*** सिडको नाट्यगृहा करिताची जमीन सिडकोने विनामूल्य महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावी.

११) नाट्यगृहासाठी महानगरपालिकाने सिडकोस दिलेले रु.२५ लक्ष सिडकोने महानगरपालिकेस परत करावेत.

**ठराव :**

सिडको औरंगाबादकडील सेवा सुविधा औरंगाबाद महानगरपालिकाने हस्तांतरीत करुन घेण्याबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्व बाबींचा विचार करता खालील दर्शविलेल्याप्रमाणे सिडको औरंगाबाद कडील सेवा सुविधा (उदा.पाणी पुरवठा, रस्ते, जलनि:सारण, पथदिवे व विद्युतीकरण सेवा इत्यादी) महापालिकेकडे हस्तांतर करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१) औरंगाबाद महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण करतांना सिडकोने रस्ते, जलवाहिन्या, जलनि:सारण वाहिन्या व पथदिवे अद्यावत स्वरुपात द्यावयात. महानगरपालिका अधिकारी व सिडको अधिकारी यांनी हस्तांतरणापुर्वी या बाबींवर संयुक्त अहवालावर स्वाक्षऱ्या कराव्यात, जेणेकरुन महानगरपालिकेस भविष्यांत आर्थिक अडचणी येणार नाहीत.

२) लिज होल्डरचे फ्रिहोल्ड करणे बाबत सिडको संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. सिडकोचे हस्तांतरण आदेशामध्ये या बाबींचा समावेश करावा. व प्रशासनाने शासनाकडून या प्रस्तावावर लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबत पाठपुरावा करावा.

३) सिडको भागातील अनधिकृत वसाहती मधील नागरी सुविधां करिता महानगरपालिकेस १५ कोटी देण्यांत यावेत.

४) सिडको भागातील सर्व विकासाचे व नियोजनाचे अधिकार पुर्णत: महानगरपालिकेस मिळावेत. हस्तांतरण आदेशामध्ये याचा समावेश करण्यांत यावा.

५) सिडकोतील ३९ माळी व ३१ इतर कर्मचारी वर्ग जो कायमस्वरुपी सिडकोच्या सेवेत आहे. ती पदे महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेण्यांत येतात.

६) सिडकोने बांधलेल्या इमारती महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरीत करुन देण्यांत याव्यात कारण सुखसुविधा व सार्वजनिक इमातर बांधणे ही सिडकोची कामे होती. त्यामुळे सुख सुविधा सेवा सोबतच इमारती हस्तांतरीत करण्यात याव्यात.

७) सिडको भागातील नर्सरी व उद्याने महानगरपालिकेस विनाअट हस्तांतरीत करण्यात याव्यात.

८) सिडको क्षेत्रातील खुल्या जागेस हस्तांतरणापुर्वी तार कुंपन अथवा संरक्षित भिंत सिडकोने बांधून द्याव्यात.

९) गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या भूखंडाचा विकास सिडकोच्या अटी व शर्तीनुसार करण्यात यावा.

१०) * लोकवर्गणी पोटी सिडकोने महानगरपालिकेस १.७५ कोटी महानगरपालिकेस द्यावेत.

** सिडको हस्तांतरणाच्या तारखेपासून मालमत्ता कर आकारण्यांत येईल.

*** सिडको नाट्यगृहा करिताची जमीन सिडकोने विनामूल्य महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावी.

११) नाट्यगृहासाठी महानगरपालिकाने सिडकोस दिलेले रु.२५ लक्ष सिडकोने महानगरपालिकेस परत करावेत.

"जन-गण-मन" या राष्ट्रगीतानंतर २.४५ वाजता सर्वसाधारण सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौरांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## दिनांक ११.०१.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेची इतिवृत्त

मंगळवार, दिनांक ११.०१.२००० रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मा.महापौर श्री.सुदाम पाटील सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदेमातरम्" या गिताने सुरुवात झाली.

या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. केनेकर संजय किसनराव | - | सभासद |
| २. | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | - | सभासद |
| ३. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | - | सभासद |
| ४. | स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन | - | सभासद |
| ५. | स.स.सौ. लोखंडे रुख्मनबाई खंडेराव | - | सभासद |
| ६. | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | - | सभासद |
| ७. | स.स.सौ. साजेदा बेगम | - | सभासद |
| ८. | स.स.श्री. महमद सलिम म.हनिफ कुरैशी | - | सभासद |
| ९. | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | - | सभासद |
| १०. | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | - | सभासद |
| ११. | स.स.सौ. उषाताई दिलीप गायकवाड | - | सभासद |
| १२. | स.स.सौ. विमलाबाई नंदकुमार मुंडलिक | - | सभासद |
| १३. | स.स.सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे | - | सभासद |
| १४. | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | - | सभासद |
| १५. | स.स.श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | सभासद |
| १६. | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | - | सभासद |
| १७. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | सभासद |
| १८. | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | - | सभासद |
| १९. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | सभासद |
| २०. | स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | - | सभासद |
| २१. | स.स.सौ. पदमा बाबुराव शिंदे | - | सभासद |
| २२. | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | - | सभासद |
| २३. | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | - | सभासद |
| २४. | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | - | सभासद |
| २५. | स.स.श्री. तुळशीबागवाले | - | सभासद |
| २६. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | सभासद |
| २७. | स.स.श्री. हमीद उद्दीन ताबा फसियोद्दीन | - | सभासद |
| २८. | स.स.श्री. महमद अब्दुल रऊफ म.अ.माबुद | - | सभासद |
| २९. | स.स.श्री. स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन | - | सभासद |
| ३०. | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | सभासद |
| ३१. | स.स.श्री. सय्यद अली मिरा सलामी | - | सभासद |
| ३२. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | सभासद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | - | सभासद |
| ३४. | स.स.सौ. दलाल लता श्रिनिवास | - | सभासद |
| ३५. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | सभासद |
| ३६. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | सभासद |
| ३७. | स.स.सौ. धांडे शकुंतला हरीदास | - | सभासद |
| ३८. | स.स.श्री. अब्दुला रशिद खॉन मामू | - | सभासद |
| ३९. | स.स.कु. माया लिंबाजी लाडवाणी | - | सभासद |
| ४०. | स.स.डॉ. कराड भागवत किशनराव | - | सभासद |
| ४१. | स.स.सौ. आव्हाड सविता संजय | - | सभासद |
| ४२. | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबखे | - | सभासद |
| ४३. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | सभासद |
| ४४. | स.स.श्री. विखारोद्दीन सुदबोद्दीन | - | सभासद |
| ४५. | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिसन | - | सभासद |
| ४६. | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | - | सभासद |
| ४७. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | सभासद |
| ४८. | स.स.श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | - | सभासद |
| ४९. | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | - | सभासद |
| ५०. | स.स.सौ. फरहद बानो मो.नवाज | - | सभासद |
| ५१. | स.स.श्री. फजलऊला खान अजमतऊला खान | - | सभासद |
| ५२. | स.स.श्री. अजिज खान गणी खान | - | सभासद |
| ५३. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | सभासद |
| ५४. | स.स.श्रीमती नुरजहाँ बेगम अ.रहेमान खान | - | सभासद |
| ५५. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | सभासद |
| ५६. | स.स.श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहमद | - | सभासद |
| ५७. | स.स.श्री. मुजीब आलमशाह मीर आलमशाह | - | सभासद |
| ५८. | स.स.सौ. मोहसीना बिल्कीस विखारोद्दीन | - | सभासद |
| ५९. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | सभासद |
| ६०. | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | - | सभासद |
| ६१. | स.स.श्री. जोशी संजय रामदास | - | सभासद |
| ६२. | स.स.श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | - | सभासद |
| ६३. | स.स.सौ. जोत्सना हिवराळे | - | सभासद |
| ६४. | स.स.श्री. राजकुमार बचाटे | - | सभासद |
| ६५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | सभासद |
| ६६. | स.स.श्री. विठ्ठल किसन जाधव | - | सभासद |
| ६७. | स.स.डॉ. मेहेर विजयकुमार गजानन | - | सभासद |
| ६६. | स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय | - | सभासद |
| ६७. | स.स.सौ. सुनंदा उत्तम कोल्हे | - | सभासद |
| ६८. | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | - | सभासद |
| ६९. | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | - | सभासद |

**संवाद :**

मा.महापौर : कोरम अभावी सभा ३० मिनीटासाठी तहकुब करण्यात येते.

(११.३० वाजता तहकुब झालेली सभा १२.१५ वाजता मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.)

श्री.प्रदिप जैस्वालः भरताचे माजी राष्ट्रपती श्री.शंकरदयाल शर्मा यांचे अशात निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अपर्ण करण्यात यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : भारताचे माजी राष्ट्रपती श्री.शंकरदयाळ शर्मा यांचे अशातच दु:खद निधन झाले आहे. त्यांना सभागृहात एक मिनीट स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. एक मिनीट स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(सभागृहात एक मिनीटाची स्तब्धता पाळून भारताचे माजी राष्ट्रपती श्री.शकरदयाळ शर्मा यंना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.प्रदिप कुमार जैस्वाल : आयुक्त श्री.पवार साहेबांची बदली महानगरपालिकेच्या उद्घाटन कार्यक्रमास राज्य मंत्र्यांना बोलावले नाही म्हणून झाली. अशी बातमी काही वृत्तपत्रातून आलेली आहे. याचा खुलासा व्हावा. राज्यमंत्र्यांना उद्घाटन कार्यक्रमास बोलावले नाही म्हणून बदली झाली आहे काय याचा खुलासा व्हावा. कारण महानगरपालिकेचे महापौर, पदाधिकारी हे ठरवतात की कोणास उद्घाटनास बोलावावे. येथून पुढेही अनेक उद्घाटने होणार आहेत. संबंधित भागातील नगर सेवक उद्घाटनास कोणास बोलवावे ठरवत असतात. सध्याचे आयुक्त हे नव्यानेच आलेले आहेत. पुढील उद्घाटनास एखाद्या मंत्र्यास बोलावले नाही म्हणून त्यांचीही बदली न होवो. उद्घाटनासाठी पाहुणा ठरविण्याचे अधिकार आयुक्तांना नाहीत ते अधिकार सभागृहाचे आहेत. तसेच विद्युत मंडळाची पुरवठ्याचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याची धमकी दिलेली आहे. ही थकबाकी कधीपासूनची आहे. याचा खुलासा व्हावयास हवा. या धमकीस न घाबरता सभागृहात याबाबतचा ठराव पारित करण्यात यावा. कायद्यातील तरतूदीनुसार पाण्यासारख्या आवश्यक जीवनावश्यक बाबीचा विद्युत पुरवठा विद्युत मंडळ खंडीत करु शकत नाही. विद्युत मंडळाच्या थकीत बाकीचे नांव काढून काही राजकारणी मंडळी राजकारण करत आहेत.

श्री.मोहसिन अहमद : एखाद्या वृत्तपत्रात अशा स्वरुपाची बातमी आलेली असेल म्हणून बातमीस गृहीत धरुन सभागृहात चर्चा करणे योग्य ठरणार नाही. अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे ही बाब राज्यशासनाच्या अधिकारातील आहे. यापुर्वी १९८८ पासून निवडणुकीच्या काळात दोन आयुक्तांच्या बदल्या झालेल्या आहेत. महापालिका आयुक्त म्हणून कोणास नेमावे हा राज्य शासनाचा अधिकार आहे. कोणाचे नाव उद्घाटन पत्रिकेत टाकलेले नाही. म्हणून आयुक्तांची बदली झालेली नाही. पाणी पुरवठ्या विद्युत बिलाची बाब गंभीर स्वरुपाची आहे. मागील शासनातील काळातच विद्युत बिलापोटी कनेक्शन कट होणार होते. परंतू तत्कालीन मंत्री मा.श्री.अजित पटेल, श्री.अशोक चव्हाण यांनी विद्युत मंडळाच्या बिला बाबतचा योग्य निर्णय

घेतलेला होता. विकासाच्या कामासंदर्भाने या सभागृहात चर्चा व्हावी. केवळ आरोप होऊ नयेत.

श्री.अ.रशीद खान मामू : आयुक्तांच्या बदलीचे स्क्युलर आलेले आहे काय. पुर्वीच्या आयुक्तांच्या विरोधात मी आपणाकडे व शासनाकडे निवेदन सादर केलेले आहे. पुर्वीच्या आयुक्तांनी काही नगर सेवकांना पकडून एक ग्रुप बनवला होता व त्यांचीच कामे होत होती. मी महापौरांकडे त्यांच्या तीन तक्रारी केलेल्या होत्या. ५७ हजारांच्या कामात त्यांनी नकार दिला. मात्र दीड कोटीचे काम जास्तीच्या दराने करण्यास संमती दिली. रेल्वे पुलाच्या उद्‌घाटनाचे उदाहरण मी देऊ इच्छितो. शहरातील जे मंत्री आहेत. त्यांनी उद्‌घाटनास बोलावले पाहिजे. पुर्वीच्या आयुक्तांच्या काळता बऱ्याचशा संचिका अबोव्हने मंजूर झालेल्या आहेत. या महापालिकेस १६ वर्षानंतर डायरेक्ट आय.एस.ए. दर्जाचा आयुक्त मिळालेले आहेत.

श्री.प्रदिप कुमार जैस्वाल : शांताराम काळे हे महापौर असतांनाही बऱ्याचशा उद्‌घाटनांना तत्कालीन विरोधी पक्ष नेता श्री.मनोहररावजी जोशी यांना बोलवावे असा आग्रह असतांनाही त्यांना उद्‌घाटनास बोलावण्यात आलेले नव्हते. आयुक्तांवर दबाव टाकून आम्ही कामे करवून घेऊ इच्छित नाही. नविन आयुक्तांच्या नियुक्तीबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आलेला आहे काय याचा खुलासा व्हावा.

श्री.अफसर खान : यापुर्वीच्या आयुक्तांचा नियुक्तीचे वा बदलीचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आले नव्हते. मग आजच हा प्रश्न का काढण्यात येत आहे. ही सभागृहाची दिशाभूल आहे. नियुक्ती बदली ही प्रशासकीय बाब आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आयुक्तांच्या बदलीच्या विषयावर चर्चा चालू आहे. बदलीच्या वादविवादात मी जाऊ इच्छित नाही. परंतू ज्या परिस्थीतीत बदली झाली. विकास कामांच्या संचिका मंजूरीसाठी सादर केल्या असता म्हटले जाते की, बजेट नाही सहा महिन्यापासून एक एका कामासाठी आम्ही विनंती करत आहोत. आठ दिवसानंतर आचार संहिता लागणार आहे. किमान आजच्या दिवस आयुक्तांना रिलीव्ह करावयास नको होते. अशी माझी मागणी होती. स.श्री.मोहसिन अहमद यांनी सांगितले तसे नाही, सर्वसाधारण सभेचे अधिकार शासनापेक्षा जास्त आहेत. आम्ही ठराव घेतला की आम्हास हे आयुक्त नकोत तर उद्याच्या उद्याच आयुक्तांना रिलीव्ह व्हावे लागेल. काही लोक मंत्र्यांना खुष करण्यासाठी आम्हास रिमोइलाईज करतात हे बरोबर नाही. महापालिका ही स्वायत संस्था आहे. त्यामुळे अशा प्रकरणासाठी शासनापेक्षा आमचे अधिकार जास्त आहेत. आम्हास एखादे आयुक्त नको असतील तर सर्वसाधारण सभा तसे निर्णय घेऊ शकते. परंतू आम्हास शासनाच्या आदेशाचा मान ठेवावा लागेल. पंचेवीस-पंचेवीस हजाराच्या संचिका बजेट नाही म्हणून परत जात आहेत. आयुक्तांनी स्वतः अशा प्रकरणात लक्ष घालून संचिका मंजूर करवून घ्याव्यात. कौंसीलच्या पॉवर्स सर्वात जास्त आहेत.

श्री.अ.रशीद खॉन (मामू) : स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचे म्हणणे बरोबर आहे. सोलापूर, पुणे महापालिकेत आयुक्तांबाबतचे २/३ बहुमताने निर्णय घेण्यात

आलेले आहेत. सभागृहाने एखादा ठराव मंजूर केला तरी शासन तो मंजूर करेलच असे नाही.

श्री.नरेंद्र पाटील : स.नगरसेवक श्री.प्रदिपकुमार जैस्वाल यांनी सभागृहात आपल्या भावना व्यक्त केल्या.

मा.महापौर : स.सभासदांनी प्रश्न विचारावयाचे असतील तर ते मला विचारावेत. कोणाची नावे घेवू नयेत.

श्रीमती अलका पाटील : ही जवळ जवळ शेवटचीच सभा आहे. सर्वच नगरसेवकांना बोलण्याची संधी देण्यांत यावी.

श्री.संजय जोशी : महिलांसाठी आरक्षण ठेवण्याच्या घोषणा केल्या जातात. परंतू सभागृहात त्यांना बोलण्याची संधी दिली जात नाही. हे बरोबर नाही.

श्री.नरेंद्र पाटील : वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या आयुक्तांच्या बदली बाबतच्या बातमीवर माजी महापौरांनी चर्चा केली व आपले मनोगत व्यक्त केले. कायद्याच्या दृष्टीकोनातून नेमके काय करावे काय करु नये याचा सचिवांनी खुलासा करावा. श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी सांगितल्या प्रमाणे २/३ बहुमताने शिफारस करुन बदली करुन शासनाकडे पाठवली तरी शासन ते प्रपोजल मान्य करेल किंवा नाही हे सांगता येत नाही.

श्रीमती नुरजहाँ बेगम : महापालिकेत कोण आयुक्त म्हणून येतो कोण येत नाही. याच्याशी काही घेणे देणे नाही, शहराची विकासाची कामे झाली पाहिजेत. ती आमची अपेक्षा आहे. नवीन आयुक्तांचे आम्ही स्वागत करतो. प्रत्येकजण आपआपल्या पार्टीसंबंधी बोलतात. विषय पत्रिकेवरील बाबींवर चर्चा करावी.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : आमचा वाद आयुक्तांशी नाही. महानगरपालिकेने ठराव घेतला तर चोवीस तासात शासनास निर्णय घ्यावा लागेल. कायद्यात तशी तरतूदही आहे.

श्री.नरेंद्र पाटील : या सभागृहात आयुक्तांच्या बदली झाल्यानंतर चर्चा व्हावयास नको. बदली प्रकरणात आपण पक्षीय राजकारण करु नये. राज्यमंत्री दर्डा यांनी महापालिकेच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमास बोलावले नाही म्हणून त्यांनी विद्युत पुरवठा खंडीत करण्याचे आदेश दिले असे आपले स्टेटमेंट वृत्तपत्रात प्रकाशित झालेले आहे.

सौ.लता दलाल : ही दुर्देवाची गोष्ट आहे की आपले अधिकार काय आहेत व काय नाहीत हे सिनीयर सदस्यांच्याही लक्षात येत नाही. एक महिन्यांवर निवडणुका आलेल्या असतांना एका समारंभात गृहमंत्री तक्रार करतात व आयुक्तांची बदली होते या गोष्टीचा आम्ही निषेध करतो. कोणते काम होत नसेल, कोणत्या समारंभासाठी मंत्र्याला बोलावले नसेल ही बाब सभागृहात आणू नये.

श्री.काशिनाथ कोकाटे : स.सदस्या लता दलाल यांनी आपले आरोप परत घ्यावेत. त्यांनी सभागृहात अपशब्द वापरु नये.

मा.महापौर : सदरची सभा दहा मिनीटांसाठी तहकुब करण्यांत येते. (मा.महापौरांनी १.०० वाजता तहकुब केलेली सभा १.५५ वाजता परत मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.)

सौ.लता दलाल : वृत्तपत्रातून व सभागृहातही एका महत्वाच्या प्रश्नावर चर्चा चालू आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने एक कोटीचे देयक अदा करण्याबाबत सुचना देण्यांत आलेली आहे. कृषी दराने शासनाने व विद्युत मंडळाने विद्युत पुरवठा

करावा जेणेकरुन एवढ्या मोठ्या प्रमाणावर भूर्दंड मनपावर पडणार नाही. या महानगरपालिकेत १८ खेड्यांचा समावेश झालेला आहे. शहरास पाणी पुरवठा करणारे पंप हे ग्रामीण भागात आहेत. तसेच मनपात समाविष्ट झालेल्या खेड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गरीब वस्ती आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी टॅक्सही भरला जात नाही. शासनाने व विद्युत मंडळाने या बाबींचाही विचार करावा. या सर्व गोष्टींचा विचार करता कृषी दराने पाणी पुरवठ्याबाबत विद्युत पुरवठा करण्यात यावा असा प्रस्ताव पारित करण्यांत यावा.

श्री.हमीदोद्दीन ताबा : निवडणूक आयोगाने महापालिका निवडणूक प्रोग्राम जाहीर केलेला आहे. आचार संहिता डिक्लेअर झालेली नव्हती तरी आपल्याकडील एका अधिकाऱ्यांने आचार संहिता लागू झाल्याचे पत्र काढले आहे. त्यामुळे कामे होत नाहीत. याबाबत मी आपल्याकडेही तक्रार केलेली आहे. सदस्यांची ही दिशाभूल कोणी केली याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : २७ तारखेस आचार संहितेचे परिपत्रक काढण्यांत आले व त्यानुसार २७ तारखेपासून आचार संहिता लागू केलेली आहे. या परिपत्रकाच्या अनुषंगाने मी शासनाकडे पत्रव्यवहार केला. शासनाने त्येची त्रुटी दाखवली व २२ तारखेपासून आचार संहिता लावण्यात यावी. असे पत्र शासनाने पाठवले आहे. त्यानुसार २२ जानेवारी पासून आचारसंहिता लागू होईल.

श्री.हमीदोद्दीन ताबा : आयुक्त, महापौर यांना न सांगता हे पत्र कोणी काढले. ही दिशाभूल कोणी केली याचा खुलासा व्हावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : २२ जानेवारी पासून आचार संहिता लागू होणार आहे. मंजूर झालेली विकास कामे करण्याची परवानगी शासनाने आम्हास द्यावी असे शासनास कळविण्यांत यावे. कारण या बॉडीची मुदत २८ एप्रिल पर्यंत आहे. निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याची तारीख आहे. त्या तारखेपासून आचार संहिता लावण्यात यावी असे निवडणूक आयुक्तांना लिहिण्यात यावे. मार्च मध्ये मनपाचे बजेट मंजूर व्हावयास पाहिजे. बजेट आम्हास बदलावयाचे आहे. १ मार्च पासून २६ दिवसांची आचार संहिता लावण्यात यावी. जेणेकरुन तोपर्यंत विकासाची कामे करता येतील.

श्री.हमीदोद्दीन ताबा : निवडणूक आयुक्तांकडून पत्र आलेले नसतांनाही महानगरपालिकेने आचार संहिता बाबतचे पत्र कसे काढले याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : निवडणूक आयुक्तांचे पत्र होते की २७ डिसेंबर पासून आचार संहिता लावावी. या विषयाबाबत माझाही गैरसमज झाला होता. आयुक्तांसमवेत माझी चर्चा झाली. आचार संहितेबाबत आलेला दुसरा फॅक्सही मी पाहिलेला आहे. पाणी पुरवठा खंडीत झालेल्या संबंधात व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला विज बिलापोटी रक्कम देण्याबाबतचा विषय सुरुवातीलाच घेण्यात येत आहे. कृपया त्यावर सभागृहात चर्चा व्हावी.

**विषय क्र.१४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेस होणाऱ्या पाणी पुरवठ्यापोटी विद्युत मंडळाच्या थकबाकी बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने दिनांक २८ डिसेंबर, ९९ ला नोटीस देऊन वीज पुरवठा खंडीत केला होता. पुन्हा त्यांनी सात (७) दिवसांचा अवधी देऊन नोटीस पाठविली आहे.

महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी ठरल्याप्रमाणे रु.७५ लक्षाचा हप्त्याचा भरणा करण्यात येतो. परंतु माहे ऑक्टोंबर ९९ पासून रूपये एक कोटीचा भरणा करण्यात यावा अन्यथा विज पुरवठा खंडीत करण्यात येईल अशी नोटीस क्र.००४२ दिनांक ५ जानेवारी २००० रोजी प्राप्त झाली आहे. ज्यात १३-१-२००० रोजी सदरील वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल असे कळविले आहे.

तरी रूपये ७५ लक्ष ऐवजी ऑक्टोबर ९९ पासून रूपये एक कोटी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे वीज बिलापोटी भरण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

<u>**संवाद :**</u>

श्री.काशिनाथ कोकाटे : विद्युत मंडळाच्या बिला संदर्भाने मागील ८-१० दिवसापासून वृत्तपत्रातून उलटसुलट बातम्या प्रकाशित होत आहेत. परंतु या पाणी प्रश्नावर कोणतेही राजकारण येवू नये. माजी महापौर श्री. अ. रशिद खॉन मामू यांनी त्यांच्या कार्यकाळात एक समिती स्थापन केली होती. महाराष्ट्रातील इतर कोणत्याही महापालिकेस पंपींग करून पाणी पुरवठा करावा लागत नाही. आगामी पाणीपुरवठयाचे विद्युत देयक कृषी दराने आकारण्यात यावे अशी शासनाकडे विनंती करण्यात यावी त्यांना आज उपस्थित झालेला प्रश्न सुटू शकेल. ८४ कोटीची थकबाकी भरण्याचा महापालिकेची परिस्थिती नाही. आर्थिक वर्ष संपावयास आलेले असल्याने थकबाकी अदायगीबाबत स्वतंत्र बजेट प्रोव्हीजन करता येणार नाही. येत्या अर्थसंकल्पात तशी तरतुद करता येवू शकेल. शासकीय पातळीवर या प्रश्नावर काय चालू आहे याची माहिती देण्यात यावी. यासाठी आवश्यक असेल तर पालकमंत्री, राज्यमंत्री यांचीही मदत घेण्यात यावी. यासाठी महापौरांनी स्वतंत्र पुढाकार घ्यावा. या प्रश्नावर राजकारण करण्यात येवू नये. जनप्रतिनिधींनी काही केले तर जनता त्यांना माफ करणार नाही. शासनास महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव देवून सध्या ७५ लाख रूपयाप्रमाणे करण्यात येत असलेली परतफेड चालू ठेवण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : आयुक्तांनी ज्या ठिकाणी बदली झाली त्याची माहिती सभासदांना आहे काय. महापालिका निवडणूकीची आचारसहिंता कोणत्या तारखेपासून लागू होणार आहे याचीही माहिती सभागृहास देण्यात यावी. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची शासनास कल्पना देण्यात यावी. एवढया मोठया प्रमाणात आपण थकबाकी भरू शकणार नाही. याबाबत सभागृहात ठोस निर्णय घेण्यात यावा. या संदर्भाने मुख्यमंत्री अथवा पालकमंत्री यांचे समवेत आपली चर्चा झाली आहे काय. आपण शासनाकडूनकाही मदत मिळविणार आहेत काय याचीही माहिती देण्यात यावी.

श्री.प्रदिपकु मार जैस्वाल : अतिशय महत्वाच्या प्रश्नावर चर्चा चालू आहे. विद्युत मंडळाने १३-१-२००० पर्यंत विद्युत देयक न भरल्यास विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस दिलेली आहे. आतापावेतो याबाबत कितीवेळा बैठका झ ााल्या. कृषी दराने विद्युत पुरवठा करावा या मागणीसाठी शासनाकडे कितीवेळा पत्रव्यवहार झाला याची माहिती देण्यात यावी. पूर्वी आपण ५०

लाख रूपये भरत होतो. त्यानंतर ७५ लाख भरण्यास सुरूवात केली. बजेटमध्ये तरतुद नसतांनाही रू.७५ लाख विद्युत मंडळास देत आहोत.

सभागृहास ठोस निर्णय घ्यावा लागेल की आपले चारही पंप ग्रामीण भागात आहेत व यासाठी कृषी दराने विद्युत देयकाची आकारणी करण्यात यावी. ही वारंवार मागणी करूनही शासनाकडून त्याची दखल घेतली जात नाही. यासाठी उच्च न्यायालयात एक रिट पिटीशन करण्यात यावे. पूर्वी पाणीपटट्‍ी रू.५०० होती ती ७०० करण्यात आली व सध्या आपण १०० रूपये पाणीपटट्‍ी आकारत आहोत. महापालिकेस पाणीपुरवठयावर १५कोटी रूपयांचा तोटा आहे. यासाठी पाणीपटट्‍ी ३५०० रूपये करावी लागेल. यासाठी कृषी दराने पाणीपुरवठा विद्युत देयक आकारण्यात यावे अशी शासनाकडे मागणी करण्यात यावी. न्यायालयात गेल्याशिवाय न्याय मिळणार नाही असे वाटते. पालक मंत्री, मुख्यमंत्री यांना भेटूनही तोडगा निघत नसेल तर १३ तारखेपूर्वी उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करणे आवश्यक आहे. अन्यथा विद्युत पुरवठा खंडीत होवून शहरातील जनतेस वेठीस धरल्यासारखे होईल. ७५ लाख रूपयापेक्षा जास्त रक्कम महापालिका देवू शकत नाही हे विद्युत मंडळास कळविण्यात यावे.

श्री.सअली मिरा सलामी : मागील दोन तासांपासून आयुक्तांच्या बदली संदर्भाने चर्चा चालू आहे. नविन आयुक्तांनी विकासाची कामे तातडीने करावीत अशी विनंतीही बऱ्याच स.सभासदांनी केली. एका वर्षात विधानसभा/ लोकसभेची निवडणूक त्या संदर्भाने लागू केलेली आचार संहिता तसेच महापौरांनी निवडणूक एका वर्षात दोनदा झाली. त्यामुळे बराचसा वेळ वाया गेलेला आहे. विकासाची कामे होवू शकलेली नाहीत. आता महानगरपालिकेची आचारसंहिता लागू होणार आहे. अशा पार्श्वभूमीवर आयुक्तांची बदली झालेली आहे. माजी आयुक्तांबाबत आम्हीही बऱ्याचशा तक्रारी केलेल्या होत्या. माझ्या वॉर्डातील उद्‌घाटनांचे वेळी ते घरीच होते तरीही ते घरी नसल्याचे सांगितले गेले. त्यांच्या कामाच्या पध्दतीमुळे बरेचसे सदस्य नाराज होते. कित्येक कामाचे टेंडर्स निघालेली आहेत मात्र एजन्सीज ठरलेल्या नाहीत. जी विकासात्मक कामे थांबली आहेत ती नविन आयुक्तांनी तातडीने हाती घेण्यास अधिकाऱ्यांना सूचन द्याव्यात. बदलीच्या राजकारणाशी आम्हास काही घेणे देणे नाही. मंत्र्यांचा स्थानिक प्रशासनात हस्तक्षेप नसावा. स्थानिक प्रश्नांसाठी नागरिक लोकप्रतिनिधींना जबाबदार पकडतात. माजी आयुक्तांनी बऱ्याचशा संचिकांवर चर्चा करा असे लिहून ठेवलेले आहे. त्यांनी बऱ्याचशा रेट लिस्ट बंद केल्या त्यामुळे छोटी कामे बंद झालेली आहेत. विकासात्मक कामांना तात्काळ सुरूवात व्हावी ही अपेक्षा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : पाण्याचा जो प्रश्न आहे, त्यात आज आम्ही एक कोटी रूपये देवू शकणार नाही. पूर्ण महाराष्ट्रात केवळ औरंगाबाद शहरास पंपाद्वारे पाणी पुरवठा होतो. इतर महापालिकांमध्ये ग्रव्हीटी द्वारे पाणीपुरवठा होतो. त्यामुळे त्यांचे विद्युत देयक कमी असते. पंपींगमुळे आमचे विद्युत देयक वाढत आहे. मा. मनोहर जोशी यांच्या काळात दोन बैठका झाल्या होत्या त्या बैइकीत ठरविण्यात आले होते की, औरंगाबाद शहरात सबसिडाइज्ड रेटने विद्युत पुरवठा करण्यात येईल अथवा यासाठी शासन अनुदन देईल. यासाठी एक ठराव पारित करण्यात यावा की, विद्युत देयक कृषी दराने

आकारण्यास यावे अथवा ५० टक्के अनुदान शासनाने द्यावे जेणे करून जनतेवर कराचा बोजा पडणार नाही. सरकार सांगते की पाणीपटट्ी ३००० करा, परंतु स.सदस्यांनी या ठरावास मान्यता दिली नाही. व १००० पाणीपटट्ी आकारली यासाठी शासनाने अनुदान स्वरूपात रक्कम द्यावयास पाहिजे. एक कमेटी स्थापून १३ तारखेपूर्वी शासनाची भेट घेवून त्यांच्याकडून स्टे आणावयास पाहिजे.

श्री.भागवत कराड : औरंगाबाद शहरास पैठणहून पाणी आणावे लागते. यासाठी पंपींग करावी लागते व त्यामुळे विद्युत देयक वाढते. कोर्टात जाण्यापूर्वी एक कमेटी बनवून त्यात पदाधिकारी अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा व त्यांनी मा. मुख्यमंत्री, उर्जा मंत्री यांची भेट घेवून सदरचे देयक माफ करण्याबाबत कार्यवाही करावी. आपण एक कोटी रूपये भरण्याचा निर्णय घेतला तर महापालिकेच्या तिजोरीवर मोठा ताण पडेल.

श्री.गौतम लांडगे : विद्युत पुरवठयाच्या देयकांसदर्भाने महत्वाच्या प्रश्नावर आज सभागृहात चर्चा चालू आहे. विद्युत मंडळास ७५ लाख ऐवजी १ कोटी दरमहा देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. अर्थसंकल्पात महापालिकेने ७५ लाख दरमहा देण्याची तरतुद केलेली आहे. कर्मचाऱ्यांचा पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे त्यामुळे अस्थापनेवरील खर्च वाढलेला आहे. एक कोटी रूपये मंजूर केले तर दरमहा २५ लाख रूपयाने खर्च वाढणार आहे. याची तरतुद महापालिका कशी करणार आहे. कृषी दराने विद्युत पुरवठा दर आकारण्यात यावा ही आमची जूनिच विनंती आहे. परत मा. मुख्यमंत्री व संबंधित खात्याचे मंत्री यांना निवेदन देण्यात यावे. आज ते एक कोटी मागत आहेत उद्या सव्वा कोटीची मागणी करातील. मालमत्ता कर, पाणीपटट्ी जकात यांची वसुली म्हणावी तशी होत नाही म्हणून हा खर्च आपण देवू शकत नाही. प्रशासनाने विद्युत मंडळास एक कोटी रूपये देण्याचा ठेवलेला प्रस्ताव मंजूर न करता दरमहा ७५ लाख रूपये विद्युत मंडळास देण्याचा ठराव पारित करावा.

श्रीमती मोहसिना बिल्कीस : आयुक्तांच्या बदली संदर्भाने सभागृहात बरीचशी चर्चा झालेली आहे. आमच्या वॉर्डातील शिल्लक कामे नविन आयुक्तांनी त्वरीत करण्याबाबत प्रयत्न करावेत. ड्रेनेजच्या कामासंदर्भाने टेंडर्स पास झालेली आहेत. एजन्सीजही ठरलेल्या आहेत परंतु कामे सुरू होत नाहीत. वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटूनही कामे पूर्ण होत नाहीत. त्यामुळे वार्डात घाण वाढलेली आहे. अर्धवट कामे बजेट नाही म्हणून हाती घेतली जात नाहीत. माझ्या वॉर्डातील फरशीचे काम सुरू झाले होते केवळ २-३ गल्ल्यातील कामे पूर्ण झाले बाकीची कामे तशीच आहेत. ती पूर्ण करण्यात यावीत.

श्री.वसंत देशमुख : विद्युत मंडळाच्या थकबाकी संदर्भाने मागील दोन तासापासून सभागृहात चर्चा चालू आहे. यापवूीही विद्युत पुरवठा खंडीत करण्याची सूचना महापालिकेस मिळाली होती. परंतु या बाबीकडे अधिक गंभीरतेने पाहिले गेले नाही. वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी मंत्र्यांशी बोलणी करून तोडगा काढावयास हवा म्हणजे आज निर्माण झालेला धोका टळेल. विद्युत मंडळाने शहरात मोठया प्रमाणावर जागा व्यापलेली आहे. भारत सरकारच्या धोरणानूसार विज वाहकाच्या कोणत्याही बाबीवर कर आकारता येणार नाही. विद्युत मंडळाने डी.पी.साठी व्यापलेल्या जागेवर कर लावू शकतो का हे तपासून

पहावे. तसेच महानगरपालिकेसाठी कृषी दराने विज पुरवठा करण्याबाबत विद्युत मंडळाकडेही चर्चा चालू आहे. त्यासाठी मनपाने त्यांच्याकडे मागणी करावी. महापालिकेसमोर काही अंधांनी उपोषण सुरू केलेले आहे. यावर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करून प्रश्न सोडवावा.

मा.महापौर : विद्युत मंडळास पूर्वी आपण ५० लाख देत होते सध्या ७५ लाख देत आहोत व तशी तरतुद बजेटमध्ये केलेली आहे.

श्री.मोहसिन अहमद : विभाग क्र.३ व ८ मध्ये ड्रेनेजच्या खूप तक्रारी आहेत. बजेट नाही म्हणून कामे हाती घेतली जात नाहीत. यासाठी रिवाईज्ड बजेटमधून आवश्यक ती तरतुद करण्यात यावी व पेंडींग एस्टीमेंटस्ना मान्यता देण्यात यावी.

श्री.हमीदोद्यीन ताबा : टेंडर्स मंजूर झालेले आहेत तरीही वर्क ऑर्डर्स देण्यात येत नाहीत याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : विद्युत मंडळास द्यावयाच्या देयकावर चर्चा चालू आहे. त्याच प्रश्नावर चर्चा करण्यात यावी. इतर प्रश्नांवर नंतर चर्चा करण्यात येईल.

श्री.भगवान घडामोडे : आयुक्तांची बदली व पाणी प्रश्नावर बऱ्याच वेळेपासून चर्चा चालू आहे. या प्रकरणामध्ये राजकारण आणण्यात येवू नये. आयुक्तांच्या बदलीशी आम्हास काही देणे घेणे नाही. २२ तारखेपासून आचार संहिता सुरू होत आहे. नविन आयुक्तांनी मंजुर झालेल्या टेंडर्सच्या वर्क ऑर्डर्स तात्काळ देण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. राजकीय हेतूने कोणतेही काम रोखण्यात येवू नये. पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. विद्युत मंडळाने एक कोटी रूपये भरण्याची नोटीस दिलेली आहे. परंतू महापालिकेची परिस्थिती तशी नाही. आपण एवढं पैसे भरू शकू का याचा खुलासा व्हावा. विद्युत मंडळास ७५ लाख रूपयेच देण्यात यावेत व मागील थकबाकी माफ करण्याबाबत शासनास लिहीण्यात यावे. युती शासनाने महापिालकेस २३ कोटी रूपये अनुदान रूपाने दिले होते. या शासनाकडे एक पैसाही या महापालिकेस दिलेला नाही. यासाठी आपण शासनाकडे शिष्टमंडळ नेले पाहिजे.

श्री.प्रकाश निकाळजे : बऱ्याच वेळेपासून सभागृहात पाणी प्रश्नावर चर्चा चालू आहे. वैद्य साहेब आयुक्तपदी असतांनाही विद्युत मंडळाकडून नोटीस आली होती. त्यावेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री.मुंडे साहेबांची ७५ लाख रूपये भरण्याबाबत महापालिकेस सुचविले होते. पूर्वीच्या नोटीसला एक वर्षही झ ाालेले नाहीत तर दूसरी नोटीस देण्यात आलेली आहे. हा प्रकार खपवून घेण्यात येवू नये. औरंगाबाद शहरास पाणी पुरवठा होत असता तर पंपस् मात्र ग्रामीण भागात आहेत त्यामुळे कृषी दराने विद्युत देयक आकारण्यात यावे. व थकबाकी माफ करण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी. विद्युत देयकही चुकचे आकारण्यात येते, बरेचसे मिटर्स बंद आहेत त्यामुळे ॲव्हरेज स्वरूपात देयक आकारण्यात येते. हा शहरास वेठीस धरण्याचा प्रयत्न आहे. महापालिकेची परिस्थिती पाहता कृषी दराने विद्युत देयक आकारण्यास शासनास भाग पाडावे. तत्कालीन आयुक्तांनी सभागृहाची मान्यता घेताच ७५ लाख रूपये भरण्याचे कबुल केले होते. सभासद वर्णन करतात त्याप्रमाणे महापालिकेची अधिक परिस्थिती खराब नाही. आपले प्रशासन जागरूक नसल्याने कराची वसूली परिणामकारकपणे होत नाही,

जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा निर्णय झाला होता. परंतु तो अंमलात आला नाही. सभागृहाचे कोणी एकेत नाही. प्रशासन पॉवरफुल झालेले आहे व लोकप्रतिनिधींची बॉडी लूज झालेली आहे. नवीन आयुक्तांनी प्रशासन सशक्त करण्याचा प्रयत्न करावा व करांची वसूली परिणामकारकपणे कशी होईल हे पहावे. विद्युत मंडळास ७५ लाख रूपयांपेक्षा जास्त रक्कम देण्यात येवू नये.

श्री.प्रफुल्ल मालाणी : सर्वप्रथम मुस्लीम बांधवांना ईदच्या शुभेच्छा. विद्युत देयकाबाबत पाच वर्षापासून चर्चा चालू आहे. या पूर्वीही सभागृहात ठराव झालेला आहे की, एक परिपूर्ण निवेदन मुख्यमंत्री व संबंधित मंत्री महोदयांना सादर करण्यात यावे. वृत्तपत्रातील बातमीनुसार विद्युत मंडळाने महापालिकेकडे ८४ कोटीची थकबाकी दाखविली आहे. यात व्यात किती, दंडव्याज किती याचा खुलासा व्हावयास हवा. आपल्या शासनाचा ५० वर्षाचा इतिहास आहे जेव्हा जास्त थकबाकी होते तेव्हा ती माफ करण्याचा निर्णय मंत्रीमंडळ कॅबीनेट बैठकीत घेतला जातो.

मागील पाच वर्षापासून शासनाकडे याबाबत आपण पाठपुरावा करत आहेत. शासनाने यातून मार्ग काढण्यासाठी काही मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. ८४ कोटीच्या थकबाकी संदर्भाने अहवाल तयार करून एक निवेदन मुख्यमंत्री पालकमंत्री यांना देण्यात यावे. मा. मुख्यमंत्री व पालकमंत्रीही मराठवाडयाचेच आहेत. विद्युत देयकाच्या मुद्यांवर कृषी दराने देयक आकारण्याबाबत विनंती करण्यात यावी व ते मनपाने येत्या पाच वर्षात फेडले जाईल असे शासनास कळवावे व हप्त्याहप्त्याने ते फेडण्यात यावे. तोपर्यंत ७५ लाख रूपये प्रतिमहा विद्युत मंडळास देण्यात यावेत.

श्रीमती रूख्मणताई लोखंडे : भावसिंगपूरा भागातील पाण्याचा प्रश्न बऱ्याच दिवसापासून प्रलंबित आहे. १९९९ मध्ये हाती घेतलेले काम घेतले परंतू काम सुरू करून चार महिने झालेले असले तरी ते अद्याप पुढे चालू झालेले नाही. गल्ल्यातील फरशा बसविण्याचे कामही अपूर्ण आहे. हे काम तात्काळ हाती घेतले जाईल याबाबत प्रशासनाने लेखी द्या वे. नवनियुक्त आयुक्तांचे अभिनंदन, माझ्या वॉर्डातील कामांकडे त्यांनी लक्ष देवून ती पूर्ण करून घ्यावीत.

श्री.नरसिंग ढगे : मागील दोन तासांपासून मनपास विद्युत मंडळाने दिलेल्या नोटीस संदर्भाने चर्चा चालू आहे. मनपात वार्षिक बजेट ठरवून देण्यात येते. जानेवारी मधील विद्युत मंडळाने विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस दिली आहे. मा. पालकमंत्री यांना आपण फक्सद्वारे कल्पना दिलेली आहे. आचारसंहितेमुळे मार्चमध्ये बजेट कोण तयार करेल हे निश्चित नाही. तेव्हा पालकमंत्र्यांना व उर्जा मंत्र्यांना या गोष्टीची कल्पना देवून तोपर्यंत या नोटीसला स्टे मिळवावा व कृषी दराने विद्युत पुरवठा करण्याबाबत विनंती करावी.

श्री.गौतम खरात : आयुक्तांच्या बदली बाबत व विद्युत मंडळाने महापालिकेचा पाणीपुरवठा विज कनेक्शन खंडीत करण्याबाबत जी नोटीस दिलेली आहे त्याबाबत सभागृहात चर्चा चालू आहे. अधिकाऱ्यांच्या बदल्या होतच असतात. त्या का होतात हे ही सर्वांना माहित आहे. चांगल्या कामाचे पडसाद नेहमीच चांगले पडत असतात. भोगे साहेबांच्या बदलीनंतर शहरातील नागरिकांनी त्यांची बदली रदद् व्हावी म्हणून मोर्चे काढले होते. त्यांनी सहा महिन्यांच्या

कालावधीत महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारली होती, मालमत्ता कर पाणी पटट्ी यांचे वसुली उदिष्ट पूर्ण होत नाही, त्यामुळे अकार्यक्षम अधिकाऱ्यांच्या बदलीचे कोणस वाईट वाटत नाही. मागील पाच वर्षे शिवसेना भाजपाचे सरकार होते. विद्युत देयकासंर्दीभाने वेळोवेळी मा. महापौर यांच्या नेतृत्वाखाली मा. मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांनी निवेदने दिलेली आहेत. आर्थिक बाबतीत कोणतेही सरकार तात्काळ निर्णय घेवू शकत नाही हेही तितकेच खरे आहे. महापालिकेची बाजू सरकारला समजावून सांगण्यात यावी. परंतू जर विद्युत मंडळ अशा प्रकारे त्र९ास देण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यांना तशाच शब्दात उत्तर देण्यात यावे. महापालिका एखादा कारखाना चालवत नसून शहरवासीयांना पाणीपुरवठा करत आहे. तेव्हा पाण्यासारख्या पश्नांची विज तोडण्याची ताकद कोणातही नाही. राज्यातील २४५ नगरपालिका व १६ महानगरपालिकांकडे मोठया प्रमाणावर विद्युत मंडळाची थकबाकी आहे. श्रीरामपूर नगरपालिकेकउे ४५० कोटीची थकबाकी आहे. पाणी पुरवठयात यावर्षी महापालिकेस २० कोटीची तुट येईल असे वाटते. मा. आयुक्तांना या शहराची चांगलीच माहिती आहे. या महापालिकेची अर्थिक स्थिती सुधारावयची असेल तर कठोर उपायोजना करणे आवश्यक आहे उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून विद्युत मंडळाच्या निर्णयास स्थगिती मिळविण्यात यावी.

सौ.रजनी जोशी : नविन आयुक्तांनी शहरातील विकासात्मक कामांकडे स्वतः लक्ष देवून ती लवकरात लवकर पूर्ण करून घेण्यात यावीत. पाणी पुरवठा हा जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. प्रशासननाने आजचा ठराव आभ्यास न करता ठेवलेला दिसतो. विद्युत पुरवठा खंडीत होवू नये यासाठी प्रयत्न करावयास पाहिजेत. विद्युत मंडळाने महापिालकेचा विद्युत पुरवठा खंडीत केला तर जनता त्यासाठी आंदोलन छेडेल.

श्रीमती फरहद बानो : नवनियुक्त आयुक्तांचे आम्ही स्वागत करतो. त्यांनी शहरातील साफसफाईकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शहरात दररोज साफसफाई होत नाही. माझ्या वॉर्डात एक नाला आला आहे. त्यात खुप घाण साचलेली आहे. विभागीय अधिकारी तक्रार करूनही बाबीकडे लक्ष देत नाहीत. तेव्हा आयुक्तांनी अशा बाबींकडे स्वतः लक्ष देवून कालबध्दरित्या काम करण्यासाठी सर्वांना सूचना द्याव्यात सद्या शकरात पाणी पुरवठा वेळेवर होत नाही. आयुक्तांनी दोन-दोन चार्ज सांभाळू नयेत त्यामुळे मनपाच्या कामांवर परिणाम होतो. पाणी पुरवठयाच्या विद्युत देयका संदर्भाने कमेटी स्थापन करण्यात यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : औरंगाबाद हे शहर ऐतिहासिक आहे. महाराष्ट्रात औरंगाबाद ही एकच अशी महापालिका जीस कोटयावधी रूपये पाणी पुरवठा विद्युत देयकावरती खर्च करावे लागतात. इतर महापालिका ग्रॅव्हीटीद्वारे पाणी पुरवठा करतात. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठयाची विद्युत वापरासंबंधि खर्च करावा लागत नाही. परंतू औरंगाबाद शहराच्या भैागोलिक परिस्थितीमुळे पाणी पंपींग करून पुरवावे लागते. वेळोवेळी शासनास निवेदने देवूनही ८-१० महिन्यापूर्वी अशीच नोटीस देण्यात आलेली होती. बजेटमध्ये तरतुद नसतांनाही त्यावेळी ९ कोटी रूपयांची तरतुद करून महिना ७५ लाख रूपये भरण्याची व्यवस्था मनपाने केली होती. बजेट तयार होण्यापूर्वीच विद्युत

मंडळाने २८ डिसेंबर ९९ रोजी नोटीस देवून ४ तास विज पुरवठा खंडीत केला होता.त्यानंतर उर्जामंत्री श्री.दर्डा साहेबांनी विद्युत मंडळ अधिकाऱ्याबरोबर चर्चा केली व त्यांनी हा प्रश्न सोडविण्यात आला अशी बातमी वृत्तपत्रात प्रकाशीत झालेली होती. त्यानंतर पुन्हा विद्युत मंडळाने ७ दिवसाची नोटीस दिली ती आपणास ५ जानेवारीस मिळालेली आहे. १३ तारखेपासून विद्युत पुरवठा खंडीत करण्याची त्यात धमकी दिलेली आहे. प्रत्येक खेडयास मोफत पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. एक वेळ अशी येईल की महापालिकेचे पूर्ण बजेट पाण्यावरच खर्च केले तरी ते कमी पडेल व इतर कोणतेही विकासाचे काम होणार नाही. या प्रश्नावर गांर्भीर्याने विचार होणे आवश्यक आहे. १९९५ पासून या प्रश्नावर केवळ चर्चा चालू आहे. आपण १ कोटी रूपये भरू शकतो कि नाही हे ही पहावयास पाहिजे ऑक्टोंबर ९९ पासून हा १ कोटी भरण्याचा प्रस्ताव आहे. मध्ये अशी नोटीस प्रशासनास आली होती का ? मग प्रशासनाने तो सभागृहासमोर का आणला नाही . ही प्रशासनाची चूक आहे. ८४ कोटीची थकबाकी आपण कधीच भरू शकणार नाही. आजचे आपले बजेट १०० कोटीचे आहे. ७५ लाख रूपये भरण्याचीही आपले ऐपत नाही. तरीही आपण ते भरत आहेत. शेतीच्या दराने विद्युत पुरवठा करावा ही महापिालकेची जुनीच मागणी आहे परंतु शासन त्यावर विचार करत नाही . ना नफा ना तोटा या तत्वावर आपण शहरास पाणी पुरवठा करत आहोत. पाणी पुरवठयावर २४ कोटीचा खर्च होतो व वसुलीमात्र ५ कोटीची होते. १९ कोटी रूपये कोठून आणावयाचे पाणीपटट्ीपोटी जवेढी रक्कम वसुल होते तेवढीच भरण्याबाबत विचार करण्यात यावा. अशा प्रकारचा ठराव घेवून तो शासनास पाठविण्यात यावा. पाणी पुरवठा खंडीत होण्यापूर्वी उच्च न्यायालयात रिट याचीका दाखल करण्यात यावी.

श्रीमती नुरजहाँ बेगम : विद्युत मंडळाच्या थकबाकीसाठी पाणीपुरवठयाचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबत विद्युत मंडळाने नोटीस दिलेली आहे. त्यांनी कनेक्शन कट केले तर पाणी पुरवठा बंद होईल. सभागृहात जनतेच्या कामावर विचार व्हावा. यासाठी एक वेगळी बैठक घेण्यात यावी. ज्या नगर सेवकांना हा प्रश्न समजतो त्यांना बोलावून यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :विद्युत मंडळाने ८४ कोटीची थकबाकी दाखविली आहे. त्यांनी १०-१२ वर्षाचे व्याज दाखविलेले असावे. प्रथम बिल किती येते. थकबाकी किती त्यावर व्याज किती याची माहिती घेण्यात यांवी . व्याज सोडून चालू देयक भरण्याबाबत विचार करण्यात यावा. यासाठी विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यांत यावी.

श्री. अब्दुल रशिद खान (मामू) :पूर्वीच्या आयुक्तांनी जे जादा दराने टेंडर्स मंजुर केले त्याची चौकशी व्हावयास पाहिजे. टेंडर्स भरतांना गुत्तेदार रिंग करतात ती थांबवण्याचा प्रयत्न आयुक्तांनी करावा याबाबत संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी. गुत्तेदारांची काही प्रकरणे पोलिस स्टेशन पर्यंत गेलेली आहेत. पाणीपटट्ी वाढवण्याबाबत शासन सूचना देते. विद्युत देयकाच्या अदायगीबाबत एक कमेटी स्थापन करण्यांत यावी. मा. मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यांत यावे. कोर्टात जावून काही होणार नाही विद्युत मंडळास १

कोटी रूपये दिले तर विकासाची कामे बंद होतील. तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी पत्र दिले होते ते पाहण्यात यावे.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल :स.स.अ.रशिद खान मामू यांनी सांगितले की, माजी उपमुख्यमंत्र्यांनी पत्र दिले होते की, ७५ लाखाच्या वर रक्कम भरू नये. परंतू ही थकबाकी वाढतच जाणार आहे. १९८८ पासून हा प्रश्न चालू आहे . यासाठी उच्च न्यायालयात रिट याचिका सादर करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात जो दर विद्युत मंडळ लावते तोच दर महापालिकेसाठी आकारावा अशा सूचना न्यायालय देवू शकते. आज पाणी पुरवठयात महापालिकेस १५ कोटीचा तोटा आहे. पाणी पुरवठा विद्युत देयकावरती एकदाच तोडगा काढावयास पाहिजे. कायद्याने विद्युत मंडळ विज खंडीत करू शकत नाही. यासाठी त्यांना किमान एक महिना आणि नोटीस द्यावयास पाहिजे. टेंडर्स मंजूर होण्यासाठी स्थायी समिती समोर जात असतात. कंत्राटदार जी रिंग करतात अशा प्रकारवरही आळा बसावयास पाहिजे.

श्री.प्रकाश निकाळजे : एक कमेटी स्थापून सभासदांनी तात्काळ मुंबई जावून मंत्र्यांना भेटून तोडगा काढावा, तो निघत नसेल तर कोर्टात केस करण्यात यावी.

श्री.राजकुमार बचाटे :शहरात येणाऱ्या विजेवर जकात कर बसवता येतो काय हे तपासून पहावे. माजी आयुक्ती श्री. भोगे साहेबांनी तसा निर्णय घेतला होता.

श्री.विखारोद्दीन : जायकवाडी पासून शहरास पाणी पुरवठाहोतो. या लाईनवरती ज्यांनी ज्यांनी कनेक्शन घेतलेले आहेत त्यांच्या कडून पैसे घेण्यात यावेत.

मा.महापौर : विद्युत मंडळ कमर्शियल संस्था आहे . ते कमी दराने विद्युत घेतात व जास्त दराने विकतात. शहरास लागणाऱ्या विजेवर आपण जकात लावू शकतो. हा प्रश्न सध्या विचाराधिन आहे. या प्रश्नावर मा. आयुक्त सविस्तर खुलासा सादर करतील.

मा.आयुक्त : मागील दोन तासांपासून सभागृहात एका गंभीर प्रश्नावर चर्चा चालू आहे. पाणी पुरवठयाचा विद्युत पुरवठा खंडीत झाला तर शहराच्या पाणी पुरवठयावर परिणाम होईल यात दुमत नाही. पाणी पुरवठयासाठी विद्युत पुरवठा खंडीत होवू नये ही सर्व सभागृहाची भावना आहे. शासनासही याची जाणीव आहे. यामध्ये मार्ग काढण्यासाठी रिट पीटीशन करावे किंवा विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करावी हा महत्वाचा विषय आहे. याबाबत स.सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित कलेले आहेत कि किती ग्रामीण भागात पंप चालू आहेत, किती शहरी भागात आहेत. कृषी दराने विद्युत देयक आकारता येईल का विद्युत मंडळाने जी थकबाकी दाखविलेली आहे ते खोखरच तेवढी आहे का त्यात व्याज पेनॉल्टी लावून दर वाढविलेले आहेत. याची शहनिशा करावी लागेल. यासाठी विद्युत मंडळाशी चर्चा करावी लागणार आहे. त्यांच्याकडून महिती घ्यावी लागणार आहे. याचबरोबर संबंधित खात्याचे स. मंत्री यांचे समवेतही चर्चा करावी लागणार आहे. या प्रकरणाची पूर्ण माहिती घेण्यात येईल. थकबाकी वाढण्याची कारणे आदि बाबींची माहिती घेतली जाईल. महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीबाबत तसेच पाणीपटट्ी , मालमत्ता कराच्या वसुली बाबतही बऱ्याचशा संदस्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. वसुली केवळ २८ ते ३० टक्के असल्याबाबत चिंता व्यक्त करण्यांत आली वसुली वाढली तर यासाठी लागणारा जास्त

पैसा आपण देवू शकू तसेच त्यामुळे विकास कामेही हाती घेता येतील. वसुली वाढावी यासाठी प्रशासकीय यंत्रणा गतीशिल केली जाईल. यासाठीच कराव्या लागणाऱ्या कार्यवाहीसाठी सर्व स. सदस्यांचे सहकार्य लाभेल अशी मी अपेक्षा ठेवतो. वसुली वाढवण्यासाठी काही कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत ही वस्तूस्थिती आहे. गुत्तेदाराच्या रिंग संदर्भाने काही प्रश्न स.सदस्यांनी उपस्थित केले.अंदाजपत्रकापेक्षा जास्त दराने टेंडर्स भरले जातात. या बाबींना आळा घातला जाईल. परंतु यासाठी आपणाकडून फार मोठया प्रमाणावर सहकार्याची गरज प्रशासनास भासणार आहे. प्रशासनात सुरळीतपणा आणण्याचा प्रयत्न केला जाईल. विद्युत देयकाच्या प्रश्नावर विधायक दृष्टीने काम कार्यवाही करता येते हे तपासून पाहिले जाईल व आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : कमी दराने मंजूर झालेल्या टेंडर प्रमाणे काम करतांना वैद्यकीय प्रमाणपत्र देवून तीच कामे दुसऱ्यांना हायर रेटने दिली जात आहेत. ही पध्दती बंद झाली पाहिजे. ज्या गुत्तेदाराची प्रकृती चांगली नसेल त्याचे रजिस्ट्रेशन कॅन्सल करण्यात यावे व त्यांना ब्लॅक लिस्ट करण्यात यावे.

श्री.महादेव सुर्यवंशी : विद्युत मंडळ अधिकाऱ्यांशी देयका संदर्भाने कायदेशिर बाबींचा खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : विद्युत मंडळ अधिकाऱ्यांशी याबाबत विचार विनिमय करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

मा.महापौर : विद्युत मंडळास द्यावयाच्या देयकाबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. यासाठी सभागृहनेता, विरोधीपक्ष नेता, सभापती स,सदस्य जैस्वाल साहेब व इतर स.सदस्य त्यांना या प्रश्नाबाबत माहिती आहे व निर्णय घ्यावयाचा आहे. अशा काही स.सदस्यांनी माझ्या दालनात चर्चेसाठी यावे. यासाठी १० मिनीटासाठी सभा तहकुब करण्यात येते.

(३.३० वाजता तहकुब सभा ४.०० वाजता मा. महापौर अध्यक्षतेखाली परत सुरू झाली.)

मा.महापौर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास द्यावयाच्या पैशा संदर्भाने आज सभागृहात चर्चा झालेली आहे. सर्व स. सदस्यांनी आपआपली मते व्यक्त केलेली आहेत. सर्वमते, सूचना ऐकून घेतल्यानंतर निर्णय घेण्यात येतो की, औरंगाबाद शहरास होणाऱ्या पाणी पुरवठया संदर्भाने कृषी दराने विद्युत देयक आकारण्यात यावे यासाठी एक समिती स्थापन करण्यात येते. समिती सदस्यांनी मा. मुख्यमंत्री मा.उर्जामंत्री मा.उर्जा राज्यमंत्री पालकमंत्री यांची भेट घेवून त्यांना सविस्तर निवेदन सादर करावे. शासनाचा निर्णय येईपर्यंत पूर्वीप्रमाणेच प्रतिमहा ७५ लाख रूपये विद्युत मंडळाकडे भरण्यात येतील.

आयुक्तांच्या बदलीचा प्रश्नही आजच्या बैठकीत चर्चीला गेला. वैद्य साहेबांनी औरंगाबाद महानगरपालिकेत अडीच ते तीन वर्ष झालेले होते त्यामुळे शासनाने त्यांची बदली केली. नविन आयुक्तांची नियुक्तीही शासनानेच केलेली आहे. आजच सकाळी मा. आयुक्तांनी त्यांच्या नियुक्तीबाबत मला कल्पना दिली. सर्व स.सदस्य व सभागृहाच्या वतीने मी आयुक्तांचे स्वागत करतो. त्यांनी कामा संदर्भाने कोणतेही लेबल लावून घेवू नये ही त्यांच्याकडून अपेक्षा आहे . स. नगरसेवकांचे सहकार्य घेवून शहरातील विकासाचे प्रश्न सोडवण्याकडे त्यांनी लक्ष द्यावे ही विनंती.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालका पाणी पुरवठया पोटी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला प्रतिमहा रूपये ७५ लाख भरण करते. त्यात कोणत्याही प्रकारची वाढ न करता तितकीच रक्कम विज बिलापोटी भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच औरंगाबाद शहरास होणाऱ्या पाणीपुरवठा संदर्भाने म.रा.विद्युत मंडळाने महानगरपालिकेस कृषी पंप दराने आकारण्यात येणाऱ्या देयक आकारण्यात यावे तसेच या संदर्भाने मा. मुख्यमंत्री , मा.उर्जा मंत्री , मा. उर्जा राज्यमंत्री व जिल्हयाचे पालकमंत्री यांची भेट घेवून त्यांना सविस्तर निवेदन सादर करण्यासाठी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचे त्यांना पूर्ण अधिकार देण्यात येतात. त्यानुसार त्यांनी निवेदन सादर करावे व शासनाच्या निर्णय येईपर्यंत पूर्वीप्रमाणेच प्रतिमहा रूपये ७५ लाख (पंचहत्तर लाख म.रा.विद्युत मंडळास भरण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.)
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४२/१** :

दिनांक १३-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे

**<u>संवाद :</u>**

श्री.गिरजाराम हाळनोर : दिनांक १३ डिसेंबर ९९ रोजीच्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.८ हातपंप बसवण्यासाठी सभागृहात पारित करण्यात आला होता. प्रस्ताव मंजूर करत असतांना सांगितले गेले होते कामाची तातडी लक्षात घेता मागील वर्षी काम केलेल्या एजन्सीकडूनच काम करवून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तथापी प्रशासनाने या ठरावाची अंमलबजावणी न करता निविदा मागविल्या आहेत असे समजते. हा सभागृहाचा हक्कभंग आहे. मी हक्कभंगाचा ठराव मांडत आहे. यावर खुलासा व्हावा.

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :शासनातर्फे महापालिकेस मिळालेल्या २५ लाख रूपयातून तातडीची पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी हापंपाचे काम हाती घ्यावयाची होते. नियमानुसार २५ लाखाच्या कामाच्या निविदा काढावयास पाहिजेत . मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दोन - तीन दिवसापूर्वीच प्राप्त झालेले आहे. निविदा काढलेल्या आहेत. टेंडर ओपन झालेले आहेत. तुलनात्मक तक्ते बनलेले आहेत. अंतिम निर्णय व्हावयाचा आहे तो सभागृहाने घ्यावा.

सौ लता दलाल : सदर प्रश्नावर सभागृहात निर्णय झाला तेव्हा संबंधित अधिकारी उपस्थित नव्हते का आचार संहिता लागू होणार होती म्हणूनच सभागृहाने ठराव स्विकृतीसह पास केला होता. संबंधित अधिकाऱ्यांनी त्याच वेळी ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून द्या ावयास पाहिजे होती. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे कामास विलंब होत आहे.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : सभागृहात चुकुन रूलींग झाली असली तरी मु.प्रा.मनपा अधिनियम प्रकरण ५(२) प्रमाणे टेंडर काढणे आवश्यक आहे. सभागृहाचे

निर्णय अंमलात आणावयास पाहिजेत परंतू हे पाहात असतांना कायद्यानुसार कामे व्हावयास हवीत.

कार्यकारी अभियंता (पापु) : एजन्सी फिक्सींगसाठी प्रस्ताव आहे. तो मंजूर होताच काम सुरू करण्यात येईल. प्रत्येक वॉर्डात बसवावयाच्या हातपंपाबाबत यादी तयार करण्यात आलेली आहे. सदरचे काम सुरू होण्यास १५ दिवस लागतील जेणेकरून सध्या चालू असलेले प्रॉब्लेम्स दूर होतील. परंतू इतिवृत्तात अनेक गाडया खराब आहेत त्यांची विक्री करण्यात यावी असे आले आहे. आपल्या काही चालू गाडयांची स्थिती चांगली नाही त्या चालण्याच्या स्थितीत नाहीत. त्या लिलावात काढण्यात याव्यात अशी दुरूस्ती करण्यात यावी. त्यांच प्रमाणे विषय क्र.१२१/१९ मधील ठरावा पवन समोरील ऐवजी पवन गॅस समोरील दिलेली जागा अशी दुरूस्ती करण्यात यावी.

मा.महापौर : स.स.गजानन बारवाल यांनी सुचविल्यानुसार इतिवृत्तात दुरूस्ती करण्यात यावी.

श्री.महादेव सुर्यवंशी : इतिवृत्ताचे पृष्ठ क्र.१५ ठरावातील अट क्र.२ बाबत खुलासा व्हावा.

मा.मुख्य लेखाधिकारी : ठरावातील अट क्र.२ मध्ये म्हटले आहे कि, जे कर्मचारी ३१/३/९९ रोजी सेवेत होते व त्यांनी सन १९९८-९९ आर्थिक वर्षात किमान महिने सलग सेवा केली असेल अशा कर्मचाऱ्यांनाही सहा महिन्याचे संख्येनुसार पात्रता कालावधी मोजण्यात येवून प्रमाण बोनसची रक्कम अनुज्ञेय करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. ९८-९९ मध्ये ज्या कर्मचाऱ्यांची सलग सहा सहिने सेवा झालेली आहे. अशा कर्मचाऱ्यांना बोनस अनुज्ञेय राहणार आहे. इतर कर्मचाऱ्यांबरोबरच दैनिक वेतन कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे हे शासनाच्या धोरणास अनुसरून आहे.

श्री.गौतम लांडगे : विषय क्र.१२०/१८ सदरचा ठराव शासनामार्फत ठेवण्यात यावा असे ठरावात म्हटले आहे. यापूर्वी असे अनेक अशासकीय ठराव पारित झालेले आहेत. सदरचा ठराव प्रशासनामार्फत ठेवण्यात यावा ऐवजी ठराव मंजूर करण्यात येते अशी दुरूस्ती करण्यात यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर : यावर्षी आर. आर. मध्ये दुरूस्ती करण्याचे ठराव आले होते ते सर्व प्रशासकीय ठराव होते.

श्री.गौतम खरात, श्री.गौतम लांडगे, सौ.लता दलाल : हा प्रस्ताव मान्य करावा अन्यथा रदद् करून टकावा.सदरचा प्रस्ताव प्रशासनामार्फत येवू दयावा.

मा.महापौर : १९ जानेवारी रोजी घेण्यात येणाऱ्या सर्वसाधारण सभे समोर हा प्रस्ताव शासनामार्फत सादर करण्यात यावा. १९ जानेवारीच्या सभेत हा ठराव आला नाही तर प्रस्तावात दुरूंस्ती करण्यात येईल.

श्री.मोहसिन अहमद : विषय क्र.१२५/२३ महापालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या विस खाटी रूग्णालयास नाव देण्याबाबतचा प्रस्ताव होता. २० तारखेस या हॉस्पीटलचे उद्‌घाटन आहे. ही इमारत नवीन आहे हे नामांतर नाही, नविन इमारतीस नाव द्यावयाचे ाहे तेव्हा हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री.प्रदिप जैस्वाल : २० तारखेस उद्‌घाटन आहे हे मा. महापौरांना माहिती आहे काय ? उद्‌घाटनाची तारीख कोणी निश्चित केली आहे. ते कोणाच्या हस्ते आहे. अधिकाऱ्यांनी जर आपणास या उद्‌घाटनाची माहिती दिली नसेल तर संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मोहसिन अहमद : आचार संहिता लागू होण्यापूर्वी मी आपणास पत्र दिले होते. आपण स्वत: स्थळ पहाणी ही करणार होतो परत पाच दिवसापूर्वी मी आपणास पत्रही दिलेले आहे. इतरांच्या भावनेचाही स. सदस्यांनी विचार करावयास पाहिजे. सर्वाना आपल्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार आहे. मी सर्व संदस्यांबाबत आदर व्यक्त करतो, सभागृहात दादागिरी करण्याचा प्रयत्न करू नये.

मा.महापौर : आपण पत्र दिलेही असेल. १५ तारखेस नामांतर समितीची बैठक घेण्यात येणार आहे. त्यात असे ठराव ठेवण्यात यावेत. त्यानंतर उद्घटनाची तारीख ठरवण्यात येईल.

श्रीमती जाहेदा बेगम : जे कर्मचारी घाण साफ करतात. ड्रेनेज साफ करतात त्यांना गमबुट देण्यांत यावेत.

मा.महापौर : जे कर्मचारी अशी कामे करतात त्यांना गमबुट देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

श्री.गौतम खरात : पृष्ठ क्र.२७ दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना संक्रातिनिमित्त साडया द्याव्या असे ठरले होते. त्यांना साडया देण्यात याव्यात तसेच विषय क्र. १३७/९ मध्ये महा. प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करून संस्थेसाठी जागा दर्शविण्यात यावी. यासाठी इतर प्रकरणांप्रमाणेच या प्रकरणात कार्यवाही करून शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

मा.महापौर : स.सदस्यांनी सूचवलेल्या व मंजूर केलेल्या दुरूस्त्यांसह विषय क्र.१ सर्वानुमते मंजूर करण्यात येतो. ठराव क्र.८७/१ अ.क्र.२ मधील "अ" बाबत कनिष्ठ लिपीक तसेच लघुटंकलेखक , लघुलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी कमी असते ही बाब लक्षात घेत या संवर्गातील २० टक्के कर्मचाऱ्यांना त्यांचे उत्कृष्ट गोपनीय अहवाल, व सेवा पाहून सेवा भरती नियमात १५ वर्षानंतर दिलेली निवडश्रेणी कायम ठेवण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

दिनांक १३/१२/९९ रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तातील १) विषय क्र.१२१/१९ मध्ये पवन समोरील जागा ऐवजी पवन गॅस समोरील जागा अशी दुरूस्ती करण्यास सर्वानुंमते मंजूरी देण्यात येते.

२) विषयक क्र.१३७/९ मध्ये महा प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करून संस्थेसाठी जागा दर्शविण्यात यावी. यासाठी इतर प्रकरणाप्रमाणेच या प्रकरणात कार्यवाही करून शासनाची मंजूरी घेण्यात यावी अशी दुरूस्ती करणास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. उपरोक्त व इतर दुरूस्त्यांसह दिनांक १३/१२/९९ च्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुंमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.१४३/२ :**

शहर अभियंता यांना प्रस्ताव सादर केला की, तक्षशिला नगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेउकर यांचे पुतळयावर शेड टाकावयाचे आहे. सदरील काम हे स.न.सेवक यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यात येणार असून सदर प्रस्ताव धोरणत्मक निर्णय घेण्यास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेबाबत मा. आयुक्त महोदय यांनी आदेशित कलेले आहे. त्यानुसार उपरोक्त कामास्तव धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार तक्षशिला नगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयावर शेड टाकावयाचे काम हे स. नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४४/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगपूरा (बलवंत वाचनालय) ते सतिष मोटर पर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन ९८-९९ चे सर्वाजनिक बांधकाम खात्यचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रूपये १९,९७, ३३५-०० चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च शासकीय अनुदान सन १९९९-२००० (२.२८ कोटी ) मधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगपूरा (बलवंत वाचनालय) ते सतिष मोटार पर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये १९,९७, ३३५-०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, बिजली नगर उस्मानपूरा (देशमेशनगर ) येथे रस्ते व कल्व्हर्ट तयार करण्याच्या कामासाठी सन ९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या जिल्हा दर सुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये १२,१७,३९०/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन ९९-२००० च्या नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येईल.  करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :उस्मानपूऱ्यातील डांबारीकरणाच्या कामाचाही या प्रस्तावात समावेश करण्यात यावा व हे काम ९ ते १० लाखाचे जवळपास आहे. या कामाची निविदा काढण्यात यावी. इतर कामांच्या बचतीतून हे काम करण्यात यावे.  आता काढण्यात येणाऱ्या निविदा सूचनांमध्ये याचा समावेश करण्यात यावा.

मा.महापौर :   प्रस्ताव सर्वानुंमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बिजलीनगर उस्मानपूरा (दशमेशनगर) येथे रस्ते व कल्व्हर्ट तयार करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये १२,१७,३९०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४६/१** :

केंद्र शासनाच्या लवचिक औद्योगिक धोरणास अनुसरून महाराष्ट्र शासनाने सुध्दा उद्योग धंदयाबाबत लवचिक धोरण स्विकारले आहे. उद्योग धंदयांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच उत्पादनाच्या दर्जा प्रमाणकानुसार आंतरराष्ट्रीय पातळीवर टिकवून ठेवण्यासाठी संशोधन व विकास (रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट) यास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता निर्माण झ ााली आहे.

महापालिका क्षेत्रात बरेच मोठे क्षेत्र ना विकास विभाग अगर हरित विभागात समाविष्ठ आहे. या क्षेत्रामध्ये संशोधन व विकास असा वापर अनुज्ञेय केल्यास त्याचा फायदा उद्योगांना मिळू शकेल यासाठी संशोधन व विकास याची व्याख्या विकास नियंत्रण नियमावलीत करणे जरूरीचे आहे.

त्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये पत्र क्र.टी.पी.एस. १२९७/३२१/प्र.क्र.११०/९७ नवि-१२ , मुंबई -३२ दिनांक १६-४-९९ अन्वये खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत. त्या निर्देशाप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील मंजूर विकास आराखडयामध्ये ना विकास क्षेत्रामध्ये संशोधन व विकास असा वापर खालील अटींवर अनुज्ञेय करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर. (सदरील अटी शासनाच्या वर उल्लेख केलेल्या पत्रा प्रमाणेच आहेत.)

१ भुखंडाचे कमीत कमी क्षेत्र १०,००० (दहा) हेक्टर असणे आवश्यक आहे.

२ जोत्याचे क्षेत्र (प्लींथ एरिया) एकूण भूखंडाच्या १० टक्के अनुज्ञेय होईल.

३ एकूण बांधकामाच्या जास्तीत जास्त १ टक्का इतके क्षेत्र कार्यालयीन वापर तसेच अत्यावश्यक कर्मचारी वर्गाच्या निवासस्थाना करिता जास्तीत १ टक्का (एक टका) क्षेत्र अनुज्ञेय होईल.

४ कर्मचारी वर्गाचे प्रमाण प्रति कर्मचारी ३०० प्रति चौरस फुट इतके असावे.

५ ज्वालाग्रही व धोकादायक रासायनिक उपयोगाचे संशोधन व विकास अनुज्ञेय होणार नाही.

६ इमारत बांधकाम जास्तीत जास्त तळमजला + एक अशी दोन मजली इमारत अनुज्ञेय होईल.

७ प्रति हेक्टरी ५०० वृक्ष लागवड करणे बंधनकारक होईल.

८ प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर वरील एक ते सात अटींचे पालन झालेले नाही असे आढळून आल्यास परवानगी रद्य करण्यात येईल.

प्रस्ताव मान्यतेनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये पुढील कार्यवाहीस्तव शासनास सादर करण्यात येईल.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाची पुढील कार्यवाही अंतर्गत शासनाची अंतिम मंजूरी घेण्याकरीता ठरवून दिलल्या कार्यपध्दतीस अनुसरून प्रस्तावित फेरबदलास अंतिम स्वरूप देण्यासाठी जनतेकडून सूचना / हरकती

मागविण्याचे व सूचना / हरकतींचा विचार करून फेरबदलाच्या स्वरूपास अंतिम स्वरूप देवून प्रस्ताव शासनाच्या मंजुरी करीता राज्यशासनाकडे पाठविण्यासाठी आवश्ययक तो पत्रव्यवहार करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात यावेत.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत असून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.१४७/६ :**

उप आयुक्त (महसूल) महानगरपालिका औरंगाबाद सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभाग यांच्याकडे शैक्षणिक संस्थेमार्फत पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी "ना हरकत" प्रमाणपत्र देण्याकरीता प्रकरण सादर केले जाते. या प्रकरणाची पडताळणी करून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते तथापी यापुढे धोरणात्मक बाब म्हणून निर्णय घेणे आवश्कय आहे. करिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत खालील अटी व शर्ती एस.एस.कोड नियम २.१ च्या नुसार पूर्ण केले जावे.

१ शाळेचे नांव
२ शिक्षणाचे माध्यम
३ शाळा /विभागाचे नांव
४ संस्था न्यासकार्यालयात पंजीकृत आहे काय ?श
५ परवानगी कोणत्या वर्षाकरीता पाहीजे.
६ असल्यास नोंदणी वर्ष व क्रमांक
७ शाळा सुरू करण्याचे ठिकाण
८ त्या प्रभागातील लोकसंख्या
९ त्या प्रभागातील लोकसंख्या किती आहे.
१० वर्गवार विद्यार्थी संख्या
११ शैक्षणिक साहित्य आहे काय एकूण किती
१२ इमारत स्वतःच्या मालकीची आहे काय (आर्थिक स्थिती)
१३ एकूण वर्ग खोल्या.
१४ खेळाचे मैदान उपलब्ध आहे काय
१५ परिसर
१६ जवळपास मनपाची शाळा आहे काय मनपा शाळा मुख्याध्यापक यांचा अभिप्राय
१७ शिक्षक संख्या
१८ विनित/ अविनित
१९ सेवक
२० अभिप्राय

वरील अटी व शर्तीची पुर्तता केल्यानंतर सदरील संस्थेच्या शाळेस कोणत्याही माध्यामाचे असले तरी त्यांना " ना हरकत " प्रमाणपत्र देण्याअगोदर रू.१०००/- शुल्क पूर्व प्राथमिक विभागासाठी रू.३०००/- शुल्क प्राथमिक विभगासाठी आकारण्यात यावे तद्नंतर ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.हमीदोद्यीन ताबा :हे शुल्क आजच का आकारण्यात येत आहेत. यापूर्वी ते का आकारण्यात आले नाहीत.

श्री.अ.रशिद खान (मामू) : महापालिकेच्या शाळा चालाव्यात म्हणून आपण खाजगी शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यांचे बंद केले होते. हा ठराव पास झाल्यास मनपाच्या शाळा बंद पडतील.

मा.महापौर : महानगरपालिकेच्या शाळेपासून ५०० मीटर अंतरापर्यंतच्या शाळेसाठी परवानगी देण्यांत येवू नये अशी दुरूस्ती करण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : अशा शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यांत यावे म्हणजे सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळेल.

श्रीमती बिल्कीस बेगम : असे ना हरकत प्रमाणपत्र दिले तर मनपाच्या शाळा बंद पडतील.

श्री.मोहसिन अहमद : महापालिका शालेय विद्यार्थ्यांना ज्या सवलती देते त्या सवलती इतर कोणत्याही खाजगी शाळा देत नाहीत. शालेय विद्यार्थ्यांना आपण पुस्तके, गणवेष, ,तांदुळ मोफत देतो, तरीही आपल्या शाळांचा दर्जा खालावलेला आहे. यास शिक्षण विभाग जबाबदार आहे. शहराचा ज्या प्रमाणात विकास होत आहे त्या नुसार अशा संस्थांना ना हारकत प्रमाणपत्र देणे गरजेचे आहे अन्यथा हे लोक कोर्टात जातील. मनपाच्या शाळेजवळ अशा शाळांना ना हरकत प्रमाणपत्र दिले जाणार नाही याची खबरदारी घ्यावी.

मा.महापौर : आतापावेतो अशा शाळांना कोणतेही शुल्क न आकारता आपण ना हरकत प्रमाणपत्र देत होतो. आता असे प्रमाणपत्र देण्यासाठी शुल्क आकारणार आहेत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : इंग्रजी शाळांबरोबरच मराठी, उर्दु शाळांनाही परवानगी देण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : रू.२००० ते रू.५००० शुल्क आकारावे.

प्र.शिक्षणाधिकारी : प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट अन्वये संस्थेच्या प्राथमिक शाळांना परवानगी देण्याचे काम महापालिकेकडे आहे नो ऑब्जेक्शन सर्टीफिकेट देतांना एस.एस.कोड मध्ये दिलेल्या नमुन्यातील बाबी पडताणून पहिल्यानंतर संस्थेच्या पूर्व प्राथमिक प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी मनपा परवानगी देवू शकते. ही पडताळणी करत असतांना संबंधित शाळांना तीन भेटी द्याव्या लागतात. एकदा संबंधित संस्थेच्या जाबाबदार अधिकाऱ्यांबरोबर एकदा ते उपस्थित नसतांना आपण एकदा अचानक , या भेटी दिल्यानंतर त्या शाळेची परिस्थितीची एकूण वर्ग चालू करणार असलेले वर्ग, शिक्षकांची संख्या, शिक्षक योग्य पात्रतेनुसार आहेत किंवा कसे, आणि शाळेत अनुदान मिळत नाही. किंवा से हया बाबी पडताळून पहिल्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र देण्याची तरतुद एस.एस.कोड मध्ये नियम २.१ मध्ये आहे. या सर्वांची पडताळणी केल्यानंतर २ ते ३ किलोमिटर परिसरात महानगरपालिकेच्या शाळेच्या जवळ संबंधित संस्थेची शाळा असणार नाही ही दक्षता घेतली जाते. इतर महापालिका मध्ये ही फि ३ ते ५००० आहे. आपल्याकडे बालवाडीचे रजिस्ट्रेशन करतांना शासकीय कोषागारात ५०० रूपये भरावे लागतात मात्र त्याची पडताळणी महापालिका करते. याबदद्लचा महापालिकेचा वाटा असावा यासाठी बालवाडीसाठी १०००/- रूपये पूर्व प्राथमिक विभागासाठी रू.३०००/- फी आपण आकारलेले व ती योग्य असे या विभागाचे मत आहे.

श्री.मोहसिन अहदम : आज लोकसंख्या एवढी वाढलेली आहे कि एक किलोमिटरमध्ये पाच शाळा असणे आवश्यक आहे. जून पासून हा ठराव लागू करावा.

मा.महापौर : हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो. एका विभागात एकाच व्यक्तीस ही परवानगी देण्यात येईल व ज्या ठिकाणी जागा दाखवली आहे. त्याच ठिकाणी शाळा सुरू करण्यात यावी असे बंधन घालण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेस शिक्षण विभागाकडे शैक्षणिक संस्था मार्फत पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता एस.एस.कोड नियम २.१ नुसार वर प्रस्तावित नियम केल्याप्रमाणे व प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून कोणत्याही माध्यमाच्या शाळेकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी पूर्व प्राथमिक विभागासाठी रू.१०००/- व प्राथमिक विभगासाठी रू.३०००/- शुल्क आकारल्यानंतरच ना हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.महादेव सुर्यवंशी : मागील सर्वसाधारण सभेत जकातच्या बाबतीत मा. उप महापौरांनी प्रश्न उपस्थित केला होता. सर्वसाधारण सभेत प्रश्न उपस्थित कले जातात. जकातच्या बाबतीत काय कार्यकाही झाली याचा खुलासा व्हावा.

मा.महापौर : मागील बैठकीत उप महापौरांनी काही प्रश्न उपस्थित केले होते. सभागृहाच्या मतानुसार रूलिंग दिली होती की जकात विभागात ज्यांना तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे त्यांच्या बदल्या कराव्यात यावर काय कार्यवाही झाली याचा प्रशासनाने खुलासा करावा.

मा.उप आयुकत: सर्वसाधारण आदेशानुसार ज्या कर्मचाऱ्यांना जकात विभागात तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे त्यांची टिप्पणी तयार केलेली आहे. दोन-तीन दिवसात ती मा. आयुक्तांकडे सादर करण्यात येत आहे.

मा.उपमहापौर: अतिशय खेदाची गोष्ट आहे की ज्या ज्या वेळी चौकशीसाठी पथक जात असे त्या त्यावेळी मला धमकी देणारे फोन आलेले आहेत की चौकशीसाठी पथक आमच्याकडे का पाठवले . पथक जाण्यापूर्वीच संबंधित गोडावून धारकांना समजते. मध्येच मा. आयुक्तांनी आपल्याच एका अधिकाऱ्यास चौकशीसाठी पाठवले होते. चौकशीपूर्वीच तेथे समजले व त्यांनी गोडावून मधील माल लपवला. त्यावेळी आपले जकात अधिक्षक गायब झाले. याचा मला निषेध करावा लागतो.

श्री.महादेव सुर्यवंशी : मला खेदाने सांगावेसे वाटते की, या गोष्टीचा मी खुपवेळा पाठपुरावा केलेला आहे. कोणकोणत्या ट्रान्सपोर्टवाल्यांनी उप महापौरांना चौकशी न करण्याचे फोन धमक्या दिल्या याची माहिती देण्यात यावी व संबंधितावर कडक कार्यवाही करण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : उपमहापौरांना असे फोन येत असतील तर संबंधित ट्रान्सपोर्टवाल्यांविरूध्द कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मोहसिन अहमद :धमक्या देणारे फोन येणे ही गंभीर बाब आहे. याची व्हावयास पाहिजे.उपमहापौरांनी यापूर्वी दोन-तीन वेळा तक्रारी केलेल्या आहेत.

विकासाच्या कामात व मनपाच्या उत्पन्न वाढ करण्यासाठी जर अशा धमकया येत असतील तर इतर सदस्यांनाही अशा धमक्या येवू शकतात. संशयास्पद लोकांना जकात विभागातून तात्काळ काढून टाकावयास पाहिजे. ईदच्या काळात शहरात जो माल आयात झाला त्यापासून किती जकात मिळाली याचीही चौकशी व्हावी. उपमहापौरांना धमक्या येण्यात काहीतरी राज आहे.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : मागील बैठकीत उप महापौरांनी जकात विभागातील भ्रष्टाचाराबाबत प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत आपण रूलींग दिली होती. प्रशासनाने यात आतापावेतो काय कार्यवाही केली याचा खुलासा सभागृहात देण्यांत यावा. एका जबाबदार पदाधिकाऱ्याने प्रश्न उपस्थित केल्यानंतर व सर्व सभासदांचे मत ऐकून घेतल्यानंतर आपण जी रूलींग दिली होती त्यावर एक महिन्यात प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावयास पाहिजे.

श्री.अब्दुल रशिद खान (मामू) : गोडावून वाल्यांना कसे माहिती झाले की त्यांच्या गोडावूनवर धाड पडणार आहे अशा गोपनिय गोष्टी लीक कशा होतात. अशा प्रकारांची चौकशी व्हावयास पाहिजे व संबंधित अधिकाऱ्यांची बदली व्हावयास पाहिजे.

श्री.महादेव सुर्यवंशी :जकातच्या प्रश्नावर चर्चा चालू आहे परंतू जकात अधिक्षक सभागृहात उपस्थित नाहीत.

श्रीमती अलका पाटील : दैनिक वेतनावर चतुर्थश्रेणी कर्मचारी काम करत आहेत त्यांनी विनंती केली आहे की, ते ६५ रूपये दैनिक वेतनावर काम करत आहेत. त्यांना ६५/- प्रतिदिन ऐवजी १००/- रूपये प्रतिदिन दैनिक वेतन देण्यात यावे.

मा.महापौर : येत्या सर्वसाधारण सभेत हा विषय ठेवण्यात यावा म्हणजे त्यावर निर्णय घेण्यात येईल.

डॉ.विजयकुमार मेहेर : महापौरांनी आदेश दिल्यानंतर प्रशासनाने प्रकरणात काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा. तसेच कोणत्या अधिकाऱ्यांनी संबंधित ट्रान्सपोर्टवाल्यास माहिती दिली याची चौकशी व्हावयास पाहिजे.

मा.महापौर : चौकशी करण्याचे या पूर्वीच आदेश दिलेले होते. आयुक्तांनी त्यावर गोपनीय चौकशी केली असे उप आयुक्तांचे म्हणणे् आहे ज्या ट्रान्सपोर्टवर आपण धाडी टाकल्या त्याची माहिती स्वतः उप आयुक्तांनांही नव्हते असे त्यांचे म्हणणे आहे. प्रशासनाने चौकशी अहवाल माझ्याकडे सादर करावा. या प्रश्नावर १६ तारखेस स्वतंत्ररित्या सर्वसाधारण सभा घेण्यात येईल. तोपर्यंत कोणकोणत्या विना जकातीच्या सोडल्या गेल्या, कोणत्या ट्रान्सपोर्टवर धाडी टाकण्यात आल्या. संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली या सर्व बाबींचा अहवाल १६ तारखेच्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा.

सौ.लता दलाल :जे एस्टीमेटस् मंजूर केलेले आहेत त्यांना याच बैठकीत स्विकृती देण्यांत यावी.

मा.महापौर : मुळ विषय पत्रिकेवरील जे विषय मंजूर करण्यांत आलेले आहेत . स्विकृतीसह मंजूर करण्यांत येतात.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र.१४८/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा वर्धापन दिनानिमित्त सालाबादाप्रमाणे यावी वर्षी राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमास विशेष बाब म्हणून पावर क्रिडा मंडळ, उस्मानपुरा यांना २५०००/- (पंचवीस हजार) आर्थिक मदत देण्यांत यावी. नगर सेवक स्वेच्छा निधीतून अर्थ सहाय्य करण्यास मंजूरी देण्यांत यावी.

सुचक : श्री.प्रकाश निकाळजे

अनुमोदक : श्री.बापू घडामोडे

**<u>संवाद :</u>**

श्री.गजानन बारवाल :महानगरपालिका वर्धापन दिनानिमित्त देण्यांत यावे अशी दूरूस्ती करण्यात यावी.

मा.महापौर : वरील प्रमाणे दुरूस्तीस मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने महानगरपालिका वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यासाठी पावर क्रीया मंडळ ,उस्मानपूरा यांना विशेष बाब म्हणून स.नगर सेवकांच्या निधीतून रू.२५०००/- (रूपये पंचविस हजार) आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४९/२** :

औरंगाबाद शहर हे जागतिक पर्यटनाचे महत्वाचे शहर आहे. अजंठा, एलोरा जगप्रसिध्द लेण्या, बीबी का मकबरा, या बरोबरच महानगरपालिकेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय व मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र कार्यान्वित होत आहे. ही सर्व माहिती जागतिक पातळीवर मिळणेसाठी इंटरनेटवर वेब साईट कनेक्शन मनपाने घ्यावे यासाठी सर्वसाधारण सभेत ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.गौतम लांडगे

श्री.गौतम खरात

अनुमोदक : श्री.कोकाटे काशिनाथ

श्री.भगवान घडामोडे

**<u>संवाद :</u>**

श्री.भगवान घडामोडे : यात भारतमाता मंदिराचाही समावेश करण्यात यावा.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र , छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र व भारतमाता मंदिर याबाबत महानगरपालिकेने इंटरनेटवर वेबसाईट कनेक्शन करण्यात सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५०/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद येथील माजी खासदार व राजकीय पुढारी स्वर्गीय बाळासाहेब पवार यांचे आताच दुःखद निधन झाले आहे. करिता त्यांचे नाव बस स्टँड जवळ वरद गणेश मंदिराच्या चौकाचे नाव स्वर्गीय बाळासाहेब पवार असे नामकरण करण्यात यावे.

सुचक : श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय

श्री.अफसरखान यासीन खॉन

अनुमोदक :स.अली मिरा सलामी, प्रफुल्ल मालानी, गिरजाराम हाळनोर, नरेंद्र पाटील, श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.गजानन बारवाल ,गौतम खरात प्रकाश निकाळजे, राजू इंगळे, सुभाष टाकळकर, गणेश वानखेडे, संजय केनेकर, कंवरसिंग बैनाडे, फैय्याज कुरैशी, सौ.शिलाताई गुंजाळे, डॉ.माया लाडवाणी, सौ.सुनंदा कोल्हे, सौ.ज्योत्सा हिवराळे, श्रीमती पुष्पाताई गंगवाल, सौ.यशोदा वाडेकर, सौ.निर्मला कांबळे ,सौ.सविता आव्हाड.

मा.महापौर : उद्घाटनापुरती मंजूरी देण्यात येते. नामांतर समितीकडे प्रकरण सादर करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बसस्टँड जवळील वरद गणेश मंदिराच्या चौकात स्वर्गीय बाबासाहेब पवार असे नामकरणाचे उद्घाटन कार्यक्रम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते व हा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी नामांतर कमेटीकडे पाठविण्यास सर्वानुंमते स्वीकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५१/४** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठण गेट येथे सादिया टॉकीजच्यापाठीमागे व्यापारी संकुलाच्या पहिल्या मजल्यावर असलेले बहुउदद्देशीय हॉल बनविण्यात येत आहे. या बहुउदद्देशीय हॉलचा नामकरणासाठी कॉ.सय्यद मिरा सलामी हे नाव प्रस्तावित करण्यात येत आहे. कॉ.सय्यद मिरा सलामी यांचा अल्पसा परिचय आंध्र प्रदेशमध्ये कॉ.राजबहादद्दूर गौंड तसेच मकदूम मोहयोद्दीन यांच्या बरोबर निजामशाही विरूध्द ७ वर्ष भूमीगत राहून लढा दिल्यानंतर स्वातंत्र्य सैनिकाचे प्रमाणपत्र मिळविण्याकरीता प्रयत्न न करता सन १९५१ साली औरंगाबाद जिल्हा तालुका जालना येथे सहकुटुंब आले . संयुक्त महाराष्ट्र समितीने पुकारलेल्या आंदोलनात सन १९५६-५७ साली कॉ. ॲड गंगाधर चिटणीस यांच्या नेतृत्वात कॉ.इफ्तेखार अहमद, कॉ.सुदाम मगर, कॉ.अंबादास नगर, ॲड कोकीळण भावराव जुनागडे, काशीनाथ पडोळे इत्यादी सहकाऱ्यांसमवेत स्वतःला ओतून दिले. मुंबई येथे झालेल्या सत्यागृहात त्यांनी हिरीरीने भाग घेतला हे सर्व करत असतांना ते ज्या कामगार कुटुंबात जनमले त्यांचा त्यांना विसर पडू दिला नाही. करिता त्यांनी मराठवाडयात सर्वात पहिली

मुद्रण कर्मचारी कामगार संघटना उभारून दिवसातून बारा तासाऐवजी आठ तास मंजूर करून घेतले. तसेच टोपी बनविणाऱ्या असंघटीत कामगारांना संघटीत करून त्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे प्रयत्न केले. सन १९७३-७४ साली झालेल्या मराठवाडा आंदोलनात ते सक्रीय सहभागी होते.

तसेच मराठवाडयाच्या विकासासाठी रेल्वे ब्रॉडगेजसाठी त्यांनी वेळोवेळी जेलभरो सत्यागृह व जेलभरो आंदोलने केली. मराठवाडा विद्यापीठाला विस्तार होवून कष्टकरी जनतेला न्याय मिळावा म्हणून त्यांनी स्वत:ला अटक करून घेतले. सदरील बहुउद्येशीय हॉल हा कामगार वस्तीत बनत असून येथे बहुतांश कामगार माथाडी कामगार, विडी कामगार, रिक्षा चालक राहत असून येथे बीडी कामगार राहात असून या परिसरात विडी कामगार हॉऊसिंग सोसायटी वसलेली आहे. त्याकरीता कॉ.सी.डी.चौधरी व कॉ.बाबुराव बुरकुल , कॉ.रामभाऊ फटागळे यांच्या बरोबर लढा देवून औरंगाबाद जिल्हाधिकारी कडून गरीब विडी कामगारांना ही जागा उपलब्ध करून देण्यात कॉ.मीरा सलामी यांचा सिहांचा वाटा आहे. तरी या सर्व बाबींचा विचार करून व मिरा सलामी यांनी दिलेल्या लढयांचा विचार करून त्यांचे नाव या बहुउदद्शीय हॉलला देणे योग्य होईल.

सुचक : श्री.रशिद खान मामू, श्री.अफसर खान , श्री.अविनाश कुमावत श्री.हमीद ताबा.
अनुमोदक: श्री.प्रदिप जैस्वाल, श्री. महादेव सुर्यवंशी, श्री.संजय केनेकर.

**विषय क्र.१५२/५** :

प्रभाग क्र.६६ क्रांतीचौक सहकार नगर विभागात मा.श्री.चंद्रकांतजी खैरे (माजी आमदार) यांच्या आमदार निधीतून एक सांस्कृतिक सभागृह बनविण्यात आले आहे.

सहकार नगर विभागात तेथील रहिवाश्यांचे श्री.गणेश सांकृतिक व क्रिडा मंडळ र.न.महा/४२७/९९ ही संस्था कार्यरत असून सदरील सभागृह हे देखभालीसाठी तेथील मंडळाच्या नांवे हस्तांतर करण्याबाबत तेथील रहिवाश्यांनी मागणी केली आहे. करिता सहकार नगर येथील सांस्कृतिक सभागृहाचे हस्तांतर तेथील रहिवाश्योचे श्री.गणेश सांस्कृतिक व क्रिडा मंडळ या संस्थेच्या नांवे करण्यात यावे.

सुचक : श्री.गजानन बारवल, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.महादेव सुर्यवंशी
अनुमोदक : श्री.प्रफुल्ल मालानी, श्री.विकास जैन, सौ.कांबळेताई, श्री.अविनाश कुमावत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्र.६६ क्रांती चौक सहकार नगर भागातील आमदार निधीतून बांधण्यात आलेले सांस्कृति सभागृह श्री.गणेश सांस्कृतिक व क्रीडामंडळ या संस्थेस देखभालीसाठी नेहमीच्या अटी व शर्तीनुसार देण्यास सर्वानुमते स्विकृतिसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५२/५** :

प्रभाग क्र.६६ क्रांतीचौक सहकार नगर विभागात मा.श्री.चंद्रकांतजी खैरे (माजी आमदार) यांच्या आमदार निधीतून एक सांस्कृतिक सभागृह बनविण्यात आले आहे.

सहकार नगर विभागात तेथील रहिवाश्यांचे श्री.गणेश सांकृतिक व क्रिडा मंडळ र.न.महा/४२७/९९ ही संस्था कार्यरत असून सदरील सभागृह हे देखभालीसाठी तेथील मंडळाच्या नांवे हस्तांतर करण्याबाबत तेथील रहिवाश्यांनी मागणी केली आहे. करिता

सहकार नगर येथील सांस्कृतिक सभागृहाचे हस्तांतर तेथील रहिवाश्योचे श्री.गणेश सांस्कृतिक व क्रिडा मंडळ या संस्थेच्या नांवे करण्यात यावे.
सुचक : श्री.गजानन बारवल, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.महादेव सुर्यवंशी
अनुमोदक : श्री.प्रफुल्ल मालानी, श्री.विकास जैन, सौ.कांबळेताई, श्री.अविनाश कुमावत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्र.६६ क्रांती चौक सहकार नगर भागातील आमदार निधीतून बांधण्यात आलेले सांस्कृति सभागृह श्री.गणेश सांस्कृतिक व क्रीडामंडळ या संस्थेस देखभालीसाठी नेहमीच्या अटी व शर्तीनुसार देण्यास सर्वानुमते स्विकृतिसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५२/५** :

प्रभाग क्र.६६ क्रांतीचौक सहकार नगर विभागात मा.श्री.चंद्रकांतजी खैरे (माजी आमदार) यांच्या आमदार निधीतून एक सांस्कृतिक सभागृह बनविण्यात आले आहे.

सहकार नगर विभागात तेथील रहिवाश्यांचे श्री.गणेश सांकृतिक व क्रिडा मंडळ र.न.महा/४२७/९९ ही संस्था कार्यरत असून सदरील सभागृह हे देखभालीसाठी तेथील मंडळाच्या नांवे हस्तांतर करण्याबाबत तेथील रहिवाश्यांनी मागणी केली आहे. करिता सहकार नगर येथील सांस्कृतिक सभागृहाचे हस्तांतर तेथील रहिवाश्योचे श्री.गणेश सांस्कृतिक व क्रिडा मंडळ या संस्थेच्या नांवे करण्यात यावे.
सुचक : श्री.गजानन बारवल, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.महादेव सुर्यवंशी
अनुमोदक : श्री.प्रफुल्ल मालानी, श्री.विकास जैन, सौ.कांबळेताई, श्री.अविनाश कुमावत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्र.६६ क्रांती चौक सहकार नगर भागातील आमदार निधीतून बांधण्यात आलेले सांस्कृति सभागृह श्री.गणेश सांस्कृतिक व क्रीडामंडळ या संस्थेस देखभालीसाठी नेहमीच्या अटी व शर्तीनुसार देण्यास सर्वानुमते स्विकृतिसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५२/५** :

प्रभाग क्र.६६ क्रांतीचौक सहकार नगर विभागात मा.श्री.चंद्रकांतजी खैरे (माजी आमदार) यांच्या आमदार निधीतून एक सांस्कृतिक सभागृह बनविण्यात आले आहे.

सहकार नगर विभागात तेथील रहिवाश्यांचे श्री.गणेश सांकृतिक व क्रिडा मंडळ र.न.महा/४२७/९९ ही संस्था कार्यरत असून सदरील सभागृह हे देखभालीसाठी तेथील मंडळाच्या नांवे हस्तांतर करण्याबाबत तेथील रहिवाश्यांनी मागणी केली आहे. करिता सहकार नगर येथील सांस्कृतिक सभागृहाचे हस्तांतर तेथील रहिवाश्योचे श्री.गणेश सांस्कृतिक व क्रिडा मंडळ या संस्थेच्या नांवे करण्यात यावे.
सुचक : श्री.गजानन बारवल, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.महादेव सुर्यवंशी
अनुमोदक: श्री.प्रफुल्ल मालानी, श्री.विकास जैन, सौ.कांबळेताई, श्री.अविनाश कुमावत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्र.६६ क्रांती चौक सहकार नगर भागातील आमदार निधीतून बांधण्यात आलेले सांस्कृति सभागृह श्री.गणेश सांस्कृतिक व क्रीडामंडळ या संस्थेस देखभालीसाठी नेहमीच्या अटी व शर्तीनुसार देण्यास सर्वानुमते स्विकृतिसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५३/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.६६ क्रांतीचौक/श्रेयनगर विभागातील मनपाची खुली जागा सर्व्हे नं.१५८५६/२ सिट नं.१४० ही जागा तेथील रहिवाश्यांची नोंदणीकृत संस्था असून सदरील जागा संस्थेच्या नावे करणे बाबत तेथील नागरिकांनी मागणी केली आहे. ही संस्था त्या जागेवर स्वत: खर्च करून जागा विकसीत करणार आहे. सदरील जागा तेथील रहिवाश्यांच्या संस्थेस देणे बाबत जा.क्र.९३६/९९ दिनांक १०/७/९९ या पत्राद्वारे मा.आयुक्त महापौर, मा.सभागृहनेता यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

करिता श्रेयनगर विभगातील सिटी एस.नं.१५८५६/२ सिट नं.१४० ही जागा तेथील संस्थेच्या ताब्यात देण्यात यावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन बारवाल

अनुमोदक : श्री.अविनाश कुमावत,

श्री.गिरजाराम हाळनोर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : प्रस्तावात माहेश्वरी ट्रस्ट असे संस्थेचे नांव टाकण्यात यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : हा प्रस्ताव बरोबर नाही. सदरची इमारत आपली आहे. ती इतर संस्थेस देण्यात येऊ नये. सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर : सदरची पॉलिसी सभागृहाने ठरवलेली आहे. प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. यापुर्वी इतर प्रस्ताव ज्या अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आले. त्याच अटी व शर्ती टाकून हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : सदरची जागा ही सोसायटीची ओपन स्पेस आहे. त्यांना ती वापरण्याचा अधिकार आहे. एखाद्या सोसायटीचा लेआऊट मंजूर झाल्यानंतर ती जागा सोसायटीच्या मालकीची असते. अथवा कसे याचा नगर रचना विभागाने खुलासा करावा. १९९२ मध्ये सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला आहे की, सोसायटीतील लोकांना तेथील लोकांना द्यावी. सदरची इमारत ही आमदार निधीतून बांधण्यात आलेली आहे. व ती सोसायटीच्या नागरिकांनी मागितलेली आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : सोसायटीचे ओपन स्पेस सोसायटीच्या विकासासाठी असते. अशा इमारती एखाद्या विशिष्ट संस्थेस देण्यात येऊ नयेत. जागांची अशी खैरात वाटण्यात येऊ नये. एकच पॉलिसी सर्वांसाठी असावी.

श्री.गौतम लांडगे : यात कोणत्याही अटी प्रस्तावित केलेल्या नाहीत. यापुर्वी अशाच प्रकारचा एक ठराव पारित झालेला होता. त्यात काही अटी व शर्ती टाकण्यांत आलेल्या होत्या. प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : या इमारतीवर आपला कायमस्वरुपी हक्क आहे. संस्था फक्त त्या जागेची देखरेख करणार आहे. यापुर्वीही अशा स्वरुपाचे ठराव पारित झालेले आहेत.

मा.महापौर : महापालिकेचा या इमारतीवर हक्क राहील. संस्थेने महापालिकेकडे भाडे भरावे असा ठराव करण्यांत येईल. ठराविक काळासाठी ही इमारत देण्यांत यावी. तसेच यापुर्वी ठरविण्यांत आलेल्या अटी व शर्ती या ठरावासही लागू राहतील. अशी तरतूद करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रभाग क्र.६६ क्रांतीचौक/श्रेयनगर भागातील सी.टी.सर्व्हे नं.१५८५६/२ सिट नं.१४० ही महापालिकेची खुली जागा तेथील रहिवास्यांना नोंदणीकृत माहेश्वरी ट्रस्ट या संस्थेस नेहमीच्या अटी व शर्तीनुसार देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५४/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका औरंगाबाद सर्वसाधारण सभा दिनांक २०.०५.१९९९ ठराव क्र.२३/३ अन्वये माजी नगर सेवक श्री.खाजा नासेरोद्दीन यांच्या पत्नीस स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून हृदय रोगाच्या उपचारासाठी मशिन खरेदी करण्यास विशेष बाब म्हणून रु.८०,०००/- मंजूर करण्यांत आले आहे.

तरी स.सदस्यांना त्यांच्या स्वेच्छज्ञ निधीतून प्रत्येकी रु.१०००/- ऐवजी रु.५०००/- पर्यंत अर्थसहाय्य करण्यात विशेष बाब म्हणून नियमात शिथीलता देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर.

सुचक : श्री.हमीदोद्दीन ताबा.

अनुमोदक : श्री.व्ही.व्ही.देशमुख,

श्री.किशोर तुळशीबागवाले.

<u>**संवाद :**</u>

श्री.हमीदोद्दीन ताबा : संबंधितास ८०,०००/- रुपये देण्याचा ठराव आपण पारित केला होता. संबंधितास १०-१२ नगर सेवकांची पत्रे मिळाली आहेत. काही नगरसेवकांनी ५०००/- रुपये देण्याची इच्छा दर्शविली आहे. तशी मंजूरी देण्यांत यावी.

मा.महापौर : हा ठराव पुर्वीच मंजूर झालेला आहे. ज्या नगरसेवकांना ५०००/- देण्याची इच्छा असेल त्यांनी तसे पत्र संबंधितास द्यावे. ठराव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे माजी नगरसेवक श्री.खाजा नासीरोद्दीन यांच्या पत्नीस हृदय रोगाच्या उपचारासाठी आवश्यक असलेली मशीन खरेदीसाठी स.स.स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रु.१०००/- ऐवजी रु.५०००/- या प्रमाणे विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५५/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रकल्प विभागांतर्गत येणाऱ्या बालवाडीमध्ये सेविका म्हणून एकूण १६ सेविका आहेत. त्या ३०० रुपयावर काम करतात. या महागाईच्या युगात ३००/- रुपयात त्यांचे भागत नाही. त्यामुळे त्यांना ७००/- रु.मानधन वाढवून देण्यांत यावे.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : स.सौ.मोहसिना बिल्कीस
अनुमोदक : स.श्री.प्रकाश निकाळजे,
स.श्री. भगवान घडामोडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रकल्प विभागात १६ बालवाडी सेविकांना रुपये ३००/- वरुन रु.७००/- मानधन वाढवून देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५६/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सौ.उषा काशिनाथ बाहाणे या सहशिक्षीका म्हणून गेल्या चार वर्षापासून जिल्हा परिषद, औरंगाबाद मध्ये प्राथमिक शाळा सिल्लोड येथे कार्यरत आहेत. परंतू त्यांचे पती औरंगाबाद मध्ये एम.जी.एम. रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

तरी त्यांच्या पती पत्नी एकत्रीकरणाचा विचार करुन त्यांची सेवा महापालिकेत वर्ग करुन घेण्यांत यावी. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : स.सौ.शिलाताई गुंजाळे
अनुमोदक : स.श्री.गिरजाराम हाळनोर,
स.श्री.नरसिंग ढगे.

**<u>संवाद :</u>**

मा.महापौर : प्रशासनाने प्रस्तावात योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या बाबी संबंधी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१५७/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राजाबाजार संस्थान पासून ते जिन्सी पर्यंत शहर नियोजन रस्त्यावर आहे. हा गेल्या २०० ते ३०० वर्षापुर्वीचा रस्ता असून अद्याप पर्यंत या रस्त्याचे रुंदीकरण झालेले नाही. सिडकोला जाण्यासाठी जुन्या शहरातून हा एकमेव रस्ता आहे. तरी या रस्त्याचे भू-संपादन करणारा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : स.श्री.गौतम खरात.
अनुमोदक : स.श्री.किशोर तुळशीबागवाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राजाबाजार संस्थान गणपतीपासून ते जिन्सी पर्यंत विकास योजना रस्त्याचे भूसंपादन करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५८/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, (अहीरगवळी) समाज मुळ उत्तर प्रदेशातून गेल्या २०० ते ३०० वर्षापासून आपल्या महाराष्ट्रात उदरनिर्वाहासाठी आलेला होता. परंतू काही समाज आपल्या शहरामध्ये राहात आलेला आहे. त्यांचा मुळ धंदा दुध व्यवसाय पुर्वी म्हशी गायी पाळणे व त्यांचा सांभाळ करणे हा मुख्य उद्योग. परंतू काही कालांतराने जो समाज महाराष्ट्रात राहिलेला समाज अद्यापपर्यंत दुध व्यवसाय चालू आहे. त्यांचेकडे गायी म्हशी आहेत व औरंगाबाद शहर हे आशिया खंडात वाढत जाणारे शहर आहे. त्यासाठी तेथील (अहिरगवळी) समाजाला शहरामध्ये राहण्यासाठी जागा नाही व म्हशी व गायी ठेवण्यासाठी देखील जागा नाही. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : स.श्री.गौतम खरात

अनुमोदक : स.श्री.किशोर तुळशीबागवाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अहिरगवळी समाजाला औरंगाबाद शहरामध्ये राहण्यासाठी व गायी म्हशी ठेवण्यासाठी योग्य ती जागा देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५९/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.नारेगांव व त्या परिसरात विविध जाती धर्माचे नागरिक राहतात. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (११) प्रमाणे प्रेतांची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर येते. मौजे नारेगांव येथील गट नं.४ ही जमिन महानगरपालिकेच्या मालकी व ताब्यातील असून या जागेत हिंदू स्मशानभूमी गोसावी समाजाची स्मशानभुमी इत्यादी स्मशानभुमीचा विकास झालेला आहे. व तेथे स्मशान जोगींसाठी निवासस्थान बांधलेले आहे या परिसरात कब्रस्थानची व्यवस्था नाही. त्यामुळे गट नं.नारेगांव या महानगरपालिकेच्या जमिनीत वरुड रस्त्याच्या दक्षिणेला व विद्यमान नाल्याच्या पश्चिमेला व हिंदु स्मशान भूमीच्या उत्तरेला सुमारे १ एकर जागेत कब्रस्थानचा वापर करण्यासाठी विकास करण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी,

अनुमोदक : श्री.नरसिंग ढगे,

श्री.महंमद विखारोद्दीन मो.कुतुबोद्दीन,

श्री.राजकुमार बचाटे,

श्री.विकास जैन, श्री.गौतम खरात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे नारेगांव येथील गट क्र.४ पैकी महापालिकेच्या मालकी व ताब्यातील जमिनीपैकी एक एकर जागेस कब्रस्तानचा वापर करणे व त्याचा कब्रस्थान म्हणून विकास करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६०/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.खा.श्री.चंद्रकांतजी खैर यांच्या निधीतून वॉर्ड क्र.२२ (नवीन वॉर्ड क्र.५४) येथील बसैय्ये नगर वसाहतीत बांधण्यात येणारा सभागृह श्री.संताजी तिळवण तेली समाज मंडळ, संभाजीनगर (औरंगाबाद) या धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या संस्थेस नाममात्र भाड्यापोटी देण्यात यावे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रफुल्ल मालानी,
कु.माया लाडवाणी.
अनुमोदक : श्री.गिरजाराम हाळनोर,
श्री.महादेव सुर्यवंशी,
श्री.नरसिंग ढगे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२२ (नवीन वॉर्ड क्र.५४) येथील बसैय्येनगर वसाहतीत बांधण्यांत येणारे सभागृह श्री.संताजी तिळवण तेली समाज मंडळ (औरंगाबाद) यांना नाममात्र भाडे पट्ट्याने देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६१/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, रहेमानियाँ कॉलनी अंतर्गत हबीब कॉलनी व फत्तेसिंगपुरा टाकीजवळ ड्रेनेज लाईन मंजूर झालेली आहे. परंतू २५ टक्के रक्कम नागरिकांनी भरल्यानंतर काम सुरु करण्यात येईल, असे महानगरपालिकेने कळविले. परंतू त्या ठिकाणचे नागरिक अत्यंत हलाखीचे जीवन जगत असल्यामुळे व त्यांची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे २५ टक्के रक्कम न घेता ड्रेनेज, पाणी व वीज अशा मुलभूत सुविधा देण्यांत याव्या. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : स.सौ.फरहत बानो मो.नवाज
अनुमोदक : श्री.अफसर खान यासीन खाँ.

**संवाद :**

सौ.लता दलाल : यापुर्वीही असा प्रस्ताव आला होता तेव्हा ठरले होते की, संबंधित ठिकाणच्या नागरिकांनी २५ टक्के रक्कम भरावी. इतर वसाहतींनाही आपण ही सुविधा देणार का.

मा.महापौर : २५ टक्के रक्कम घेऊन सुविधा द्याव्या असा पूर्वी ठराव होता. सिडको नोटीफाईड एरियातील वसाहतीसाठी २५ टक्के रक्कम घेण्याचा ठराव होता. इतर वसाहतीतील नागरिकांना २५ टक्के रक्कम भरण्याची आवश्यकता

नाही. या भागास मी भेट दिलेली आहे. इतर विकासाची कामे झालेली आहेत. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने रहेमानियाँ कॉलनी अंतर्गत हबीब कॉलनी व फत्तेसिंगपुरा टाकीजवळ ड्रनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी पुर्वी त्या ठिकाणी इतर सर्व विकास कामे झालेली असल्यामुळे २५ टक्के लोकवर्गणी न कारता ड्रेनेज, पाणी व तीन अशा मुलभूत सुविधा पुरविण्यास सर्वानुमते स्विकृतीस मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६२/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.५८ समता नगर भागात महापालिकेची शाळा नसल्यामुळे येथील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना (मुलांना) शाळेसाठी लांब जावे लागते. या भागात शाळेची इमारत तयार आहे. तरी या ठिकाणी महापालिकेतर्फे बालवाडी आणि १ ली ते ४ थी पर्यंत शाळा त्वरीत सुरु करण्यांत यावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : डॉ.श्री.भागवत कराड,

अनुमोदक : श्री.राजकुमार बचाटे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.५८ समता नगर भागात महापालिकेची शाळा नसल्यामुळे या भागात बांधण्यांत आलेल्या शाळेच्या इमारतीत महापालिकेतर्फे बालवाडी व इयत्ता १ ली ४ थी पर्यंत शाळा सुरु करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६३/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स.नं.९/२ शहानूरवाडी जी जमिन मंजूर विकास योजनेमध्ये प्राथमिक शाळा, खुली जागा व ४० फुट रस्त्याने बांधीत होते. शासनाने या आरक्षणातील ३० टक्के जमिन महापालिकेला विना मोबदला हस्तांतर करण्याच्या अटीवर उर्वरीत ७० टक्के जागा रहिवास विभागात अंतर्भूत करण्याची अधिसूचना ४ ऑक्टोंबर रोजी काढली असून त्या नुसार ३० टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात आलेली आहे. महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेली जमिन ही प्राथमिक शाळा व क्रिडांगण या कारणाकरिता ठेवण्यात आलेली आहे.

वरील जागेचे क्षेत्र असून त्यातील निम्मी जागा मिश्री शिक्षण प्रसार क.मंडळ, पदमपुरा, औरंगाबाद व निम्मी जागा अष्टविनायक मंडळ, गुलमंडी, औरंगाबाद या नोंदणीकृत संस्थांना देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. वरील संस्था सदरहू जागेचा वापर शैक्षणिक वापरासाठी करणार असल्याने नेहमीच्या अटी व शर्तीवर वरील जमिन सदरहू संस्थांना देण्याबाबत प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.प्रदिपकुमार जैस्वाल,

अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे,

श्री.राजकुमार बचाटे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.नं.९/२ शहानूरवाडी पैकी शासन मंजूर विकास योजना मधील प्राथमिक शाळा खुला जागा व ४० फुट रुंद रस्त्याने बाधीत जागा पैकी ३० टक्के जमिन महानगरपालिकेला विना मोबदला हस्तांतरीत झालेली आहे. या हस्तांतरीत झालेल्या जागेपैकी ४० फुट रुंद विकास रस्त्याचे बाधीत क्षेत्र वगळता उर्वरीत महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेल्या क्षेत्रापैकी निम्मी जागा मिश्री शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद व निम्मी जागा अष्टविनायक मंडळ, गुलमंडी, औरंगाबाद या नोंदणीकृत संस्थांना शैक्षणिक वापरासाठी नेहमीच्या अटी व शर्तीनुसार जागा देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६४/१७**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मौ.भावसिंगपुरा, भिमनगर, औरंगाबाद येथील सर्वे नं.४७/१ क्षेत्र २ एकर ४ गुंठे ही जमीन साई विश्वशांती गृहनिर्माण हौसिंग सोयाटीची असून मंजूर विकास योजनेमध्ये कोणत्याही प्रस्तावाने बांधित नसून रहिवाशी भागात आहे. महानगरपालिकेने सदर जागेमध्ये आरोग्य केंद्र आणि उद्यान करण्यासाठी भूसंपादन करणे सुरु केले आहे. सदर जागा ही सोसायटीच्या बेघर सभासदांसाठी आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव सभूसंपादनातून वगळण्यातून यावा व दिनांक २०.०३.१९९९ रोजी सर्वसाधारण सभेचा भूसंपादन करण्याचा ठराव क्र.२५३/१ रद्द करण्यात यावा. करिता सदर जागा भूसंपादनातून वगळण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीकरिता सादर.

सुचक : स.सौ.शकुंतला धांडे,<br>
श्री.जयवंत ओक.<br>
अनुमोदक : स.सौ.मंदाताई काळुसे,<br>
स.सौ.सुनंदाताई कोल्हे,<br>
स.सौ.मोहसिना बिल्कीस

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर भावसिंगपुरा येथील सर्व्हे नं.४७/१ चे २ एकर ४ गुंठे हे क्षेत्र साई विश्व शांती गृहनिर्माण हौसिंग सोसायटी यांचे असून मंजूर विकास योजनेत रहिवाशी भागात असतांनाही महापालिका सदर जागा आरोग्य केंद्र आणि उद्यानासाठी संपादित करत असल्याने या संस्थेतील सभासद बेघर होणार असल्याने ठराव क्र.२५३/८ अन्वये मंजूर करण्यांत आलेली भूसंपादनाची कार्यवाही रद्द करण्यास व भूसंपादनातून ही जागा वगळण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६५/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीसाठी १९९१ मध्ये विकास योजना मंजूर झालेली आहे. या मंजूर विकास योजनेमध्ये बीड वळण रस्त्याच्या दक्षिणेला सर्व्हे नं.३७ सातारामध्ये मध्ये उद्यानाची अरुंद पट्टी व अनियमित आकारात डी/बी-१ असे आरक्षण ठेवलेले आहे. त्याच प्रमाणे या उद्यानाचे आरक्षण म्हणजेच डी/बी-१ च्या दक्षिणेला नाल्यालगत सातारा येथील सर्व्हे नं.३०,३१,३३ व ३९ मध्ये उद्यानानेच भव्य

आरक्षण ठेवले. त्यास डी/बी असा क्रमांक दिलेला आहे. या दोन्ही उद्यानाचे आरक्षण नैसर्गिक दृष्ट्या तुटक झालेले आहे. बीड वळण रस्त्यालगतचा या परिसरातील भाग निवासासाठी विकसीत झालेला आहे व स.नं.३५ व ३७ मधील उद्यानासाठी डी/बी-१ हा आरक्षित ठेवलेला भाग अत्यंत कमी रुंदीचा व लांब अनियमित आकाराचा असल्याने व याच्या दक्षिणेस नाल्यानंतर उद्यानाचे भव्य असे आरक्षण ठेवलेले असल्याने स.नं.३५ व ३७ मधील उद्यानाचे विनियोगाचे दृष्टीने देखील योग्य असा उपयोग होणार नाही व हे आरक्षण अनावश्यक असल्याने तसेच हया आरक्षणातील जमिन मुख्य राज्य रस्त्यास लागून असल्याने त्या जमिनीच्या संपादनास तुलनेत जास्त किंमत द्यावी लागणार असल्याने या आरक्षणाखालील संपूर्ण जमिन आरक्षणातून वगळून निवास भागात सामील करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही सुरु करणेसाठी आणि किरकोळ फेरबदलाची अंतर्गत करावी लागणारी सर्व कार्यवाही जसे, सुचना/हरकती मागवणे त्यावर निर्णय घेऊन परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करणे इ.साठीचे अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर.

सुचक : श्री.मो.विखारोद्दीन
अनुमोदक : श्री.अशफाक सलामी,
श्री.अ.रशिद अ.सत्तार,
श्री.प्रदिपकुमार जैस्वाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचे वाढीव हद्दीसाठी १९९१ ला मंजूर झालेल्या विकास योजनेमध्ये बीड वळण रस्त्याच्या दक्षिणेला सर्व्हे नं.३५ व ३७ मधील आरक्षण क्रमांक डी/बी-१ उद्यानासाठी आरक्षित असलेली जमीन सदर आरक्षणातून वगळून निवास भागात सामिल करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर किरकोळ फेरबदल करतांना लागणारी कार्यवाही जसे सूचना/हरकती मागवणे, त्यावर निर्णय घेऊन प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठवणे या बाबातचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६६/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभागामधील ब्रिजवाडी या वसाहतीमध्ये उद्यान नसल्यामुळे येथील लहान मुले, नागरिक व रहिवाश्यांची अत्यंत गैरसोय होत आहे. ब्रिजवाडी भागात महापालिका शाळेचे इमारतीचे दक्षिण बाजूस व विद्यमान नाल्याच्या पश्चिम बाजूस डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर उद्यानासाठी बरीच खुली जागा उपलब्ध असून तेथील रहिवाश्यांची मागणी विचारात घेता या परिसरात उपलब्ध असलेल्या खुल्या जागेतील सर्व सोयींनी युक्त असे उद्यान विकसीत करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी,
अनुमोदक : श्री.नरसिंग ढगे,
श्री.सुभाष टाकळकर,
श्री.रविंद्र इंगळे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ब्रिजवाडी येथील महापालिका शाळेच्या दक्षिण बाजूस व विद्यमान नाल्याच्या पश्चिम बाजुस डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील खुल्या जागेवर सर्व सोयींनी युक्त असे उद्यान विकसीत करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६७/२० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नारेगांव प्रभागात राजेंद्रनगर, साठे नगर, ब्रिजवाडी, विठ्ठलनगर, हनुमाननगर, केसरकॉलनी, एकनाथनगर, इत्यादी वसाहती आहेत. प्रभागात कुठल्याही वसाहतीत मंगल कार्यालय नसल्यामुळे रहिवाशांची अत्यंत गैरसोय होते. नारेगांव येथील पाण्याच्या टाकीच्या बाजुस असलेल्या जागेवर नियोजित उद्यान विकसित करण्यात येणार आहे. परंतू सदर जागेवर येथील रहिवाशी उद्यान तयार करणेस विरोध करत असून या जागेवर सार्वजनिक मंगल कार्यालय उभारणे बाबत मागणी करत आहेत. रहिवाशांची मागणी विचारात घेता या जागेवर उद्यान तयार करणे ऐवजी मंगल कार्यालय उभारणे आवश्यक आहे. जेणेकरुन येथील रहिवाशांची गैरसोय दूर होईल.

वरुड रोड लगतच्या दक्षिण बाजूस महानगरपालिका प्राथमिक शाळेच्या इमारतीचे उत्तरबाजूस असलेल्या जागेवर सर्व सोयींनी युक्त असे उद्यान विकसीत करण्यात यावे व नियोजित उद्यानाच्या जागेवर मंगल कार्यालय उभारणे बाबत प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी,
अनुमोदक : श्री.नरसिंग ढगे,
श्री.सुभाष टाकळकर,
श्री.रविंद्र इंगळे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव पाण्याच्या टाकीच्या बाजुस असलेल्या जागेवर नियोजित उद्यान विकसीत करणे ऐवजी त्या जागेवर सार्वजनिक मंगल कार्यालय उभारण्यास तसेच वरुड रोड लगतच्या दक्षिण बाजुस महापालिका प्राथमिक शाळेच्या उत्तर बाजुस असलेल्या जागेवर सर्व सोयींनी युक्त असे उद्यान विकसीत करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## सभागृहात ऐनवेळी सादर करण्यात आलेले प्रस्ताव

**विषय क्र.१६८/१ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की, कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत नवीन वैयक्तिक शौचालय बांधणे, टप्पा-२ बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३६.०० लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सन १९९९-

२००० या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात कमी खर्चाची शौचालये बांधे ही योजना मंजूर असून चालू आर्थिक वर्षात १७५.०० लाख तरतूद आहे.

मा.आयुक्त यांनी दि.१०.१२.१९९९ रोजी प्रस्तावास मान्यता दिली असून सदरील काम शासन परिपत्रक क्र.ग्रास्वका/१०९८/प्र.क्र.-४८४/पापु-१६, दि.२७.११.९८ अन्वये जिव्हाळा या संस्थेस प्राधान्यक्रम दिलेला आहे.

सदरील काम जिव्हाळा सेवाभावी संस्था प्रति शौचाकुप रु.५०००/- प्रमाणे करण्यास तयार असून तसे लेखीपत्र दिलेले आहे.

करिता सदरील काम हे जिव्हाळा सेवाभावी संस्था औरंगाबाद यांचेकडून प्रति शौचकुप रु.५०००/- प्रमाणे करुन घेण्याच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.३६,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कमी खर्चाची स्वच्छता योजना अंतर्गत नवीन वैयक्तिक शौचालय बांधणे-टप्पा-२ बाबत तयार करण्यात आलेले रक्कम रु.३६,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच शासन परिपत्रक क्र.ग्रास्वका/१०९८/प्र.क्र.-४८४/पापु-१६ दिनांक २७.११.१९९८ अन्वये सदरील काम जिव्हाळा या सेवाभावी संस्थेस प्रती शौचाकुप रु.५०००/- प्रमाणे करण्यास तयार असल्याने त्यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६९/२ :**

प्रस्ताव क्र.१०२/१६, दि.३१.१२.१९९९ नुसार दै.वेतनावरील/ठराविक वेतनावरील स्त्री कामगारांना मकर संक्रातीनिमित्त साड्या, ब्लाऊजपीस, शर्ट सलवार, देणे बाबत प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी ठेवण्यात आला होता. परंतू सभेच्या आदेशानुसार फेरप्रस्ताव सादर करणे आहे. फेर प्रस्ताव खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

सन १९९८-९९ या वर्षात मा.महापौरांच आदेशानुसार दैनिक वेतनावरील/ठराविक वेतनावरील सर्व स्त्री कामगारांना प्रत्येकी एक साडी, ब्लाऊज पिस, शर्ट सलवार पीस देण्यात आले होते. त्यासाठी १.८५ लक्ष खर्च झाला होता. या वर्षीही अशा कामगारांना प्रत्येकी दोन नग देणे बाबत मागणी आहे. अशा प्रकारचे साहित्य देणे झाल्यास त्यास अंदाजे रक्कम रु.२.७५ लक्ष खर्च येईल. तसेच दै.वेतन/ठराविक वेतनावरील पुरुष कामगारांना देखील प्रत्येकी दोन गणवेश देणे बाबतची मागणी आहे.

दैनिक वेतनावरील किती वर्षाच्या सेवेनंतर साडी/गणवेश देण्यात यावा व किती साड्या गणवेश देण्यात यावेत. या बाबत तसेच मनपाने बनविलेल्या गणवेश विनियमामध्ये दैनिक वेतना अथवा ठराविक वेतनावरील कमागर/कर्मचारी यांना गणवेश देण्याबाबत कोणतीही तरतूद केलेली नाही. करिता गणवेश विनियमात तशी दुरुस्ती करणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत आहे. सर्वसाधारण सभेच्या निर्णयानंतर गणवेशाकरिता लागणारा खर्च काढण्यात येवून मान्यतेस्तव स्थायी समिती समोर ठेवण्यात येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ व धोरणात्मक निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मागील वर्षानुसार हंगामी दैनिक/ठराविक वेतनावरील प्रत्येक महिला कामगारांना तीळ संक्राती निमित्ताने गणवेश एक ब्लाऊज पीस, साडी देण्यात आलेली होती. त्याच धर्तीवर याही वर्षी महिला कामगारांना एक साडी एक ब्लाऊजपीस, शर्ट सलवार देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. तशी विनियमात दुरुस्ती करण्यात यावी. त्या अनुषंगाने वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७०/१ :**

औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार परिषदेला महानगरपालिकेने देऊ केलेल्या पत्रकार भवनाच्या समर्थ नगरच्या वरद गणेश मंदिराजवळील नाला जागेसाठी प्रति चौ.मी.१५५/- रुपये इतक्या दराने वर्षासाठी रु.१,९९,९५०/- रुपये इतके भाडे भरावे असे सुचविले आहे. सदर भाडे हे पत्रकार परिषदेला परवडणारे नाही. तेव्हा १५५/- रुपया ऐवजी ते २५/- रुपये प्रति चौ.मिटर एवढे आकारण्यांत यावे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.महादेव सुर्यवंशी,
श्री.डॉ.भागवत कराड,
अनुमोदक : श्री.नरसिंग ढगे,
श्री.गजानन बारवाल,
श्री.संजय केनेकर,
श्री.मोहसीन अहमद,
श्री.रशिद खान (मामू)

मा.महापौर : आजच्या बैठकीत मंजूर करण्यांत आलेले विषयांना याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावा दर्शविल्याप्रमाणे पत्रकार भवनासाठी समर्थनगर येथील वरद गणेश मदिराजवळील नाल्याची जागा प्रति चौ.मी.रु.१५५/- ऐवजी प्रति चौ.मी.रु.२५५/- या दराने भाडे आकारुन पत्रकार परिषदेला देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन-गण-मन" या राष्ट्रगितानंतर ५.४५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०.०१.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दिनांक २०.०१.२००० रोजी सकाळी ११.३० वाजता मा.महापौर श्री.सुदाम पाटील सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यांत आले होते. सदर सभेस महानगरपालिका अधिकाऱ्यास खालील स.नगरसेवक उपस्थित होते. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने झाली.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री.केनेकर संजय किशनराव | - | मा.उपमहापौर |
| २. | स.स.श्री.ढगे नरसिंग मुरलीधर | - | सभापती |
| ३. | स.स.श्री.सुर्यवंशी महादेव पुंडलिकराव | - | सदस्य |
| ४. | स.स.श्री.अफसर खॉन यासीन खॉन | - | सदस्य |
| ५. | स.स.सौ.लोखंडे रुख्मनबाई खंडेराव | - | सदस्य |
| ६. | स.स.श्री.विधाते प्रभाकर सिताराम | - | सदस्य |
| ७. | स.स.सौ.साजेदा बेगम | - | सदस्य |
| ८. | स.स.श्री.गौतम भागाजी खरात | - | सदस्य |
| ९. | स.स.सौ.रजनी रमेश जोशी | - | सदस्य |
| १०. | स.स.सौ.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | - | सदस्य |
| ११. | स.स.सौ.शिलाबाई सिताराम गुंजाळे | - | सदस्य |
| १२. | स.स.श्री.लांडगे गौतम लिंबाजी | - | सदस्य |
| १३. | स.स.श्री.नरेंद्र यादवराव पाटील | - | सदस्य |
| १४. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | सदस्य |
| १५. | स.स.श्री.इंगळे रविंद्र बाबुराव | - | सदस्य |
| १६. | स.स.सौ.पदमा बाबुराव शिंदे | - | सदस्य |
| १७. | स.स.श्री.टाकळकर सुभाष भिकाजी | - | सदस्य |
| १८. | स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद | - | सदस्य |
| १९. | स.स.श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | - | सदस्य |
| २०. | स.स.सौ.विसपुते धनश्री अशोक | - | सदस्य |
| २१. | स.स.सौ.फरहदबानो भ्र.मो.नवाज | - | सदस्य |
| २२. | स.स.श्री.फजलउल्लाखॉन अजमत उल्ला खॉन | - | सदस्य |
| २३. | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो.मुस्तफा | - | सदस्य |
| २४. | स.स.सौ.नुरजहाँ बेगम अ.रहेमान खॉन | - | सदस्य |
| २५. | स.स.श्री.देशमुख वसंत विनायकराव | - | सदस्य |
| २६. | स.स.श्री.हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद | - | सदस्य |
| २७. | स.स.श्री.मुजीब आलमशहा मीर आलमशहा | - | सदस्य |
| २८. | स.स.सौ.मोहसिना बिल्कीस विखारोद्दीन | - | सदस्य |
| २९. | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म.जमीर | - | सदस्य |
| ३०. | स.स.सौ.वाडेकर यशोदा धनंजय | - | सदस्य |
| ३१. | स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर | - | सदस्य |
| ३२. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | सदस्य |
| ३३. | स.स.श्री.हमीदोद्दीन ताबा फसीयोद्दीन | - | सदस्य |
| ३४. | स.स.श्री.म.अ.रऊफ म.अ.माबुद | - | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५. | स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबुद्दीन | - | सदस्य |
| ३६. | स.स.श्री.जैस्वाल प्रदिप शिवनारायण | - | सदस्य |
| ३७. | स.स.श्री.स.अली मिरा सलामी | - | सदस्य |
| ३८. | स.स.श्री.रमेश दिपचंद लाहोट | - | सदस्य |
| ३९. | स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल | - | सदस्य |
| ४०. | स.स.श्री.ओक जयवंत केशवराव | - | सदस्य |
| ४१. | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | - | सदस्य |
| ४२. | स.स.सौ.धांडे शकुंतला हरीदास | - | सदस्य |
| ४३. | स.स.श्री.अ.रशिद खॉन (मामू) | - | सदस्य |
| ४४. | स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह | - | सदस्य |
| ४५. | स.स.डॉ.कु.माया लिंबाजी लाडवाणी | - | सदस्य |
| ४६. | स.स.सौ.सविता संजय आव्हाड | - | सदस्य |
| ४७. | स.स.सौ.निर्मला विठ्ठल कांबळे | - | सदस्य |
| ४८. | स.स.श्री.अब्दुल रशिद अ.सत्तार | - | सदस्य |
| ४९. | स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | सदस्य |
| ५०. | स.स.श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन | - | सदस्य |
| ५१. | स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन | - | सदस्य |
| ५२. | स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | - | सदस्य |
| ५३. | स.स.श्री.निकाळजे प्रकाश भाऊराव | - | सदस्य |
| ५४. | स.स.श्री.जोशी संजय रामदास | - | सदस्य |
| ५५. | स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर | - | सदस्य |
| ५६. | स.स.सौ.जोत्सना दौलतराव हिवराळे | - | सदस्य |
| ५७. | स.स.श्री.राजकुमार बचाटे (माम) | - | सदस्य |
| ५८. | स.स.सौ.राधाबाई तळेकर | - | सदस्य |
| ५९. | स.स.श्री.विठ्ठल किसन जाधव | - | सदस्य |
| ६०. | स.स.श्री.मेहेर विजयकुमार गजानन | - | सदस्य |
| ६१. | स.स.सौ.काळुसे मंदा धनंजय | - | सदस्य |
| ६२. | स.स.सौ.सुनंदा उत्तम कोल्हे | - | सदस्य |
| ६३. | स.स.श्री.गांगवे बन्सी तुळशीराम | - | सदस्य |
| ६४. | स.स.श्री.घडमोडे भगवान देविदास | - | सदस्य |
| ६५. | स.स.श्री.नवपुते कचरु चंद्रभान | - | सदस्य |

**संवाद :**

मा.महापौर : कोरम अभावी सभा २० मिनिटासाठी तहकुब करण्यात येते.

(११.३० वाजता तहकुब झालेली सर्वसाधारण सभा १२.०० वाजता मा.महापौर यांचे अध्यक्षतेखालील पूर्ववत सुरु झाली.)

श्री.गजानन बारवाल : नांदेड गुरुद्वाराचे पुजारी संत बाबा हुजुरासिंधजी यांचे अशातच दुःखद निधन झालेले आहे. सभागृहात त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.प्रफुल्ल मालाणी : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.भगवान घडामोडे : स.नगरसेवक श्री.कंवरसिंग बैनाडे यांचे वडीलांचे अशातच दुःखद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

श्री.हमीदोद्दीन ताबा : तसेच हजरात मौलाना सय्यद अबुल हसन अली हसनी नरवी (अलीमियाँ) हे महान तत्वज्ञानी होते त्यांनी पैगाने इन्सानीयत या चळवळी अंतर्गत सहिष्णुता, बंधुभाव राष्ट्रीय एकात्मतासाठी आयुष्य अर्पण केले त्यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर: नांदेड गुरुद्वारचे मुख्य पुजारी संत बाबा हुजुरासिंघजी स.न.स.कंवरसिंग बैनाडे यांच्या वडीलांना व हजरत मौलाना सय्यद अबुल हसन अली हसन नरवी (अलीमिया) यांना सभागृहात दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. श्री.संत बाबा हजुरासिंघजी, श्री.बैनाडे किशनसिंग व हजरत मौलाना स.अबुल हसन अली नरवी (अलिमिया) यांना सभागृहात दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

श्री.अफसर खान : मनपा गेट समोर एक स्त्री उपोषणांस बसलेली आहे. तीने मनपात आठ वर्ष काम केलेले आहे. यापुर्वीही ती उपोषणास बसली होती. त्यावेळी उप आयुक्त व मा.आयुक्तांनी उपोषण सोडवून कामावर घेण्याचे कबुल केले होते. सदर स्त्रीने २४० दिवस सतत काम केलेले आहे. तेव्हा तिला कामावर घेण्यांत यावे. तसेच सुरत पॅटर्न अंतर्गत काम करणाऱ्या ज्या लोकांना कामावरुन कमी केलेले आहे. त्यांना कामावर परत घेण्यांत यावे. शहरात बरीच घाण वाढलेली आहे. हे लोक सतत उपआयुक्त शिंदे साहेब व कांबळे साहेब यांना भेटत आहेत. सहा महिन्यापासून ते चकरा मारत आहेत. त्यांना कामावर घेण्यात यावे. जे लोक भ्रष्टाचार करतात त्यांना कामावर घेतले जाते. मात्र जे काम करतात. त्यांना घेतले जात नाहीत. बाहेर उपोषणास श्रीमती नेहरी बसल्या आहेत. त्यांचे उपोषण सोडवण्यात यावे.

मा.महापौर: सुरक्षा रक्षकांनी सभागृहाचा दरवाजा लावून घ्यावा व स.नगरसेवकांव्यतिरिक्त इतर कोणीही सभागृहात येणार नाही याची दक्षता घ्यावी. स.स.अफसरखान यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, सुरत पॅटर्नमध्ये काम केलेल्या कर्मचाऱ्यांना परत कामावर घेण्यात यावे. तसेच आठ-आठ वर्ष काम केलेल्या कर्मचाऱ्यास सतत गॅप देणे योग्य नाही. प्रशासनाने नेहरी यांचे उपोषण सोडवावे व त्यांच्या निवदेनावर कार्यवाही करावी.

श्री.नरेंद्र पाटील : आपण या बॉडीचे पाचवे महापौर आहात.श्री.गजानन बारवाल महापौर होते तेव्हापासून मी मागणी मांडत आहे की, पुर्वीच्या बॉडीतील ६० स.नगरसेवक व या बॉडीतील ८२ स.नगरसेवकांचा बोर्ड या सभागृहात लावण्यात यावा. माजी महापौर श्री.गजानन बारवाल तसेच रशिद खान मामू यांनी आदेशही दिले होते. परंतू त्यावर कार्यवाही झालेली नाही. या लोकनियुक्त बॉडीचे आता केवळ तीन महिने राहिलेले आहेत. याबाबत आतातरी निर्णय देण्यांत यावा.

श्री.महादेव सुर्यवंशी : महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर आतापर्यंत शहरातील विविध पक्षाचे मोर्च मनपावर आलेले आहेत. परंतू काल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने मोर्चा आणला होता तो गेटवर अडवण्यात आला होता. मोर्चकऱ्यांनी मनपा गेटचे कुलूप तोडून मा.आयुक्तांच्या चेबरमध्ये प्रवेश केला. यावर काय कार्यवाही करण्यात आली. याची माहिती देण्यांत यावी. मोर्चकरी गेटवरील कुलूप तोडून आत आले. त्यावेळी मनपाचे सेक्युरिटी काय करत होते. याबाबत पोलिसात तक्रार सादर झाली आहे काय? याची माहिती देण्यात यावी. अशीच प्रथा पडली तर विविध पक्षाचे मोर्च येऊन मनपात तोडफोड

करतील. आयुक्तांनी अशातच त्यांच्या पदाचा चार्ज घेतलेला आहे. काल त्यांना भेटण्यासाठी स.सभापती तसेच इतरही काही स.नगरसेवक गेले होते. तेव्हा त्यांना आयुक्तांनी कॅबीन बाहेर थांबवले, आतापर्यंत कोणत्याही आयुक्तांनी नगरसेवकांनी अशा प्रकारची वागणूक दिलेली नव्हती. आयुक्तांनी स.सभापती व इतर नगरसेवकांना कॅबीन बाहेर थांबविण्याचे आदेश सेक्युरिटी गार्डला दिले होते काय? आज आपण २० मिनटिासाठी सभा तहकुब केली होती. सभा सुरु झाल्यानंतर सभागृहात कोणासही येऊ देऊ नये. असे आपण आदेश दिले होते. सभा सुरु झाल्यानंतर सभागृहात येण्यासाठी आपण मा.आयुक्तांना परवानगी दिली होती काय?

श्री.कचरु नवपुते : तहकुब झालेली सभा सुरु झाल्यानंतर कोणत्याही अधिकाऱ्यास सभागृहात येऊ देऊ नये. असे आपण आदेश दिले होते. आयुक्त सभागृहात विनापरवानगी कसे आले याचा खुलासा व्हावा. अन्यथा आम्ही नगरसेवक वॉक ऑउट करणार आहोत.

श्री.गजानन बारवाल : विकास विषयक प्रश्नावरती योग्य प्रकारे मोर्चे आणण्याचा सर्वांना अधिकार आहे. परंतू काल आलेल्या मोर्च्याने मनपा गेटचे कुलूप तोडून कार्यालयात प्रवेश केला याबाबत काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती देण्यांत यावी. काल आयुक्तांना भेटण्यासाठी काही स.सदस्य गेले असता त्यांना कॅबीन बाहेर थांबविण्यात आले. सदर सदस्य ३ ते ५ च्या दरम्यान आयुक्तांना भेटण्यासाठी गेले होते. ३-५ या काळात अधिकारी कर्मचाऱ्यांनी नागरिकांना भेटावयास पाहिजे. आपण २० मिनिटासाठी सभा तहकुब केली होती. व परवानगीशिवाय कोणासही सभागृहात सोडू नये असे आदेश दिले होते. सेक्युरिटी गार्डनी यांची कोणतीही दखल न घेता आयुक्तांना सभागृहात येऊ दिले, याची माहिती देण्यात यावी.

श्री.हमीदोद्दीन ताबा : काल मनपावर मोर्चा आला होता त्यावेळी पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली. काल पोलिसांनी मोर्चेकरी काय करत आहेत हे पाहण्याचे नाटक केले. त्याची दखल घेण्यांत यावी.

श्री.विजयकुमार मेहेर : मोर्चेकऱ्यांनी काल जो प्रकार केला या गोष्टीची दखल आपण घेतली आहे काय? पोलिस डिपार्टेमेंटला आपण याबाबत कल्पना दिली आहे काय? संबंधित पोलिसांना निलंबित करण्यात यावे. व त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यांत यावी.

श्री.रशिदखान (मामू) : पोलिस विभागातील जे लोक आपल्याकडे काम करतात त्यांचे पगार आपण देतो ते कार्यालयात केव्हाही येतात व केव्हाही जातात. मागे १८ दिवस विनासूचना मनपातून निघून गेले होते. ते मागे ८२ स.नगरसेवकांविरुध्द बोलले. त्यांना मा.आयुक्तांनी समजही दिली होती. तरीही ते बोलले. सभा तहकुब झाल्यानंतर ती दिलेल्या वेळेपेक्षा १० मिनीटे उशिरा सुरु झाली. आयुक्त वेळेवर सभागृहात आले नाहीत. यात राजकारण आणण्यात येऊ नये. आपणास आयुक्तांकडून कामे करवून घ्यावयाची आहेत. तेव्हा त्यांच्याशी सलोख्याने वागावे.

श्री.गिरजाराम हाळनोर : आयुक्त उशिरा सभागृहात येतात हा सभागृहाचा अपमान आहे.

मा.महापौर : १० मिनीटासाठी सभा तहकुब करण्यात येते.

(१२.१० वाजता तहकुब झालेली सभा १२.३५ वाजता मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली परत सुरु झाली.)

सौ.शिलाताई गुंजाळे : काल मी आयुक्तांना भेटावयास जात होते. त्यावेळी त्यांच्या दालनावरील सेक्युरिटीने आपणास ५-१० मिनीटे दालनाबाहेरच थाबवलं व सांगितले की, विचारल्या शिवाय दालनात कोणास पाठवू नयेत असे आदेश आहेत. मा.आयुक्तांनी सेक्युरिटींना तसे आदेश दिले आहेत काय? हा लोकप्रतिनिधीचा अपमान आहे. या बाबींचा मी निषेध करते.

श्री.मोहसीन अहेमद : यावर मा.आयुक्तांना त्यांचा खुलासा करु देण्यात यावा.

सौ.लता दलाल : काल स.नगरसेविका, सभापती व इतर काही स.नगरसेवकांना आयुक्तांकडून अपमानस्पद वागणूक देण्यात आली. याबाबत चर्चा चालू आहे. लोकप्रतिनिधींचा अपमान झालेला आहे असे आम्ही मानतो. या गोष्टीचे समर्थन होऊ शकत नाही. ही बाब निषेधार्ह आहे. याबाबत आयुक्तांना कही सांगावयाचे असेल तर त्यांनी सांगावे. त्यानंतर सभागृहात निर्णय घेण्यांत यावा.

श्री.नरेंद्र पाटील : मला माहिती असलेल्या गोष्टींचा उल्लेख मी करतो. मला कोणाचेही समर्थन करावयाचे नाही. मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की, आयुक्त हे सभागृहाचे सदस्यही असतात. ज्या प्रमाणे आम्ही सदस्य केव्हाही सभागृहात येऊ जाऊ शकतो. त्याचप्रमाणे आयुक्त केव्हाही सभागृहात प्रवेश करु शकतात.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : स.स.नरेंद्र पाटील हे मागील दहा वर्षापासून या सभागृहाचे सदस्य आहेत. सभागृहात एखाद्या विषयावर चर्चा चालू असतांना सदस्य म्हणून मा.आयुक्त विचार मांडू शकतात. स.सदस्यांच्या भावना दुखावल्या असतील तर मा.आयुक्तांनी सभागृहात खुलासा करावयास हवा.

श्री.गौतम खरात : मा.आयुक्तांनी त्यांच्या पदाचा चार्ज घेतल्यानंतर एकच दिवस ते कार्यालयात थांबले. कालच्या प्रकाराबाबत काही गैरसमज झाला असेल आयुक्तांना भेटण्यासाठी चिठ्ठी पाठविण्याची भाषा झाली असेल. त्यावरुन काहीतरी गैरसमज झालेला आहे. त्यावर सभागृहात चर्चा चालू आहे. नगरसेवक हे मनपाचे ट्रस्टी आहेत. पुर्वीच्या कोणत्याही आयुक्तांनी स.नगरसेवकांना चेंबरमध्ये येण्यासाठी चिठ्ठीची परंपरा ठेवली नाही. आयुक्त नवीन आहेत आपणास अद्याप सर्वांचा परिचयही झालेला नसेल. पुर्वी एकदा जयरथ साहेब आयुक्त असतांना त्यांनी चिठ्ठीची परंपरा सुरु केली होती. परंतू त्यावेळीही नगरसेवकांनी ती बंद पाडली. सभागृहाने या प्रकरणात राजकारण करण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते कालच्या घटनेबाबत मा.आयुक्तांनी खुलासा करावा. सभागृहाने आपणास सहकार्य राहील. परंतू आपण प्रशासनाचे प्रमुख या नात्याने स.नगरसेवकांशी सलोख्याचे वातावरण ठेवले असे मला वाटते.

श्री.प्रभाकर विधाते : स.न.स.गौतम खरात यांचे म्हणणे योग्य आहे. परंतू सुरक्षा रक्षकास माहिती होते की, सौ.शिलाबाई गुंजाळे या माजी महापौर आहेत. तर स.श्री.नरसिंग ढगे हे सभापती आहेत. त्यांनी मा.आयुक्तांना तरी कल्पना द्यावयास हवी होती. त्यांने मा.आयुक्तांना तशी कल्पना दिली का? याचा खुला व्हावा.

सौ.पद्मा शिंदे : मी काल १२ वाजता आयुक्तांना भेटण्यासाठी आले होते. मलाही सेक्युरिटी गार्डने सांगितले की, आयुक्तांना भेटण्यासाठी परवानगी पाहिजे. पुर्वी

आयुक्तांना भेटण्यासाठी परवानगी लागत नव्हती. मग आताच का लागते. नगरसेवकांना आयुक्तांची परवानगी लागत असेल तर आयुक्तांनाही नगरसेवकांची परवानगी लागेल. नसता त्यांचे गेट आम्ही बंद करु.

श्रीमती मोहसिना बिल्कीस : पुर्वीच्या आयुक्तांच्या काळातही बैठका होत होत्या. त्यावेळी बैठक चालू असल्याबाबत भेटणाऱ्यांना निरोप देण्यात येत असत. तेव्हा आजच हा प्रश्न का निघत आहे. त्यावेळी हा प्रश्न का निघत नव्हता. याचा खुलासा व्हावयास पाहिजे. सदस्यांनी चिठ्ठी पाठवून भेटावयास बोलावणे योग्य वाटत नाही. याचा खुलासा व्हावा.

श्री.मुजीब आलमशहा खान : हा उद्‌भवलेला वाद चुकीचा आहे. आम्ही शहरातील नागरिकांचे सदस्य आहोत. मनपाची विकसाची कामे बरोबर होत आहेत किंवा नाहीत हे पाहण्यासाठी जनतेने आम्हास निवडून दिलेले आहे. प्रत्येक अधिकाऱ्यास भेटण्याचा अधिकार आहे. आयुक्त अथवा इतर अधिकाऱ्यांनी स.सदस्यांना भेटावयास न येऊ देणे हे चुक आहे. हा आमचा अपमान आहे. याची दखल घ्यावी. आपण केवळ नगरसेवकांचा नाही तर जनतेचा अपमान करत आहात. यातून रस्ता काढण्यात यावा.

श्री.नुरजहाँ बेगम : मा.आयुक्तांना बोलण्याची संधी देण्यांत यावी. केवळ चर्चा होऊ नये.

श्री.स.अली मिरा सलामी : माझ्या वॉर्डात ईद मिलनचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. मी पत्रिका देण्यासाठी गेलो असता मला चपराशाने कॅबीनबाहेरच थांबविले. पुर्वीच्या आयुक्तांकडेही आम्ही जात होतो. त्यांच्याकडे काही गोपनिय चर्चा चालू असेल तर ते निरोप देत होते. आयुक्तांच्या कॅबीनसमोर चपराशी आम्हास थांबवतात. हा आमचा अपमान आहे. पुर्वीच्या आयुक्तांकडूनही काही पक्षपात झालेले आहेत. काही सदस्य त्यांच्याकडे २-२ तास बसत होते. ही पध्दत बंद झाली पाहिजे. आयुक्तांनी पहिल्याच दिवशी सांगितले होते की, मी येथे काम करण्यासाठी आलो आहे. आचार संहिता १५ दिवसावर आलेली आहे. आयुक्त महापौरांनी शहरातील विकासाची कामे मिळून करावित. काल जो प्रकार झाला. त्याचा सभागृहात निषेध करण्यता यावा. स.स.श्री.मुजीब आलमशहा खॉन यांनी सांगितल्यानुसार हा लोकप्रतिनधीचा नाही तर शहरातील जनतेचा अपमान आहे. स.सदस्यांनाही मा.महापौरांनी सुचवावे की, त्यांनी ३-३ तास आयुक्तांकडे बसू नका. आम्हासही आयुक्तांकडे काही गोष्टी बोलावयाच्या असतात. अशा सदस्यांचय उपस्थितीत आम्ही त्या बोलू शकत नाही.

श्री.गौतम लांडगे : स.सदस्यांना चेंबरबाहेर थांबण्यास आयुक्तांनी सांगितले असेल तर ते चुक आहे. त्यांनी जर असे सांगितले असेल की, कोणीही नगरसेवक किंवा कोणीही पदाधिकारी यांना विचारल्याशिवाय चेंबरमध्ये सोडू नये तर ते चुक आहे. सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन यावर जास्त चर्चा न करता आयुक्तांनी यावर खुलासा करावा.

श्री.महादेव सुर्यवंशी : काल राष्ट्रवादी कॉंग्रेसचा मोर्चा आला होता. त्यावर खुलासा व्हावा.

मा.महापौर : सर्व स.सदस्यांचे मत लक्षात घेता ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. या संस्थेचे आपण सर्व जण प्रतिनिधी आहोत. आपला मान सन्मान या ठिकाणी झालाच पाहिजे. सदस्यांचा अपमान म्हणजे तो महापौरांचा अपमान आहे. स.स.मुजीब आलमशहा यांनी सांगितले की हा शहराचा अपमान आहे. जे स.सदस्य आयुक्तांना भेटावयास येतात त्यांना चिठ्ठी पाठवण्याची गरज नाही.

जे लोक उपोषणास बसतात. त्यांचे उपोषण सोडवण्याचे प्रशासनाचे काम आहे. लोकप्रतिनिधी निर्णय घेतात व प्रशासन त्यात अडचणी आणते. त्यामुळे लोकप्रतिनिधीची त्यात बदनामी होण्याची दाट शक्यता असते. मोर्चेकरी, उपाषणकर्ते यांना सामोरे जावे. काल जे मोर्चेकरी कुलूप तोडून कार्यालयात आले. त्याबाबतचा खुलासा आयुक्तांनी करावा. कालच्या प्रकार बाबतचा खुलासा आयुक्तांनी करावा. आयुक्तांच्या बदलीचा प्रस्ताव पुढच्या बैठकीत सभागृहासमोर ठेवण्यात यावा, अशी सूचना करण्यात येते.

मा.आयुक्त : सभागृहात दोन प्रश्नावर चर्चा चालू आहे. एक काल झालेल्या मोर्चाबाबत व स .नगरसेवकांना भेटण्या बाबत चिठ्ठी पाठवण्याची वा पुर्वपरवानगीची गरज का पडली. या ठिकाणी दोन तीन गोष्टंचा उल्लेख करु इच्छितो. मी येथे काम करण्यासाठी आलेलो आहे. व सर्व लोकप्रतिनिधीचे सहकार्य घेऊन काम करण्याचा माझा हेतू आहे. यात दुमत होण्याचे कारण नाही. नगरसेवकांनी भेटण्यासाठी चिठ्ठी पाठवावी असे मी कोणास सूचना दिलेली नाही. व कोणी तशी चिठ्ठी पाठवलेली नाही. काल बऱ्याचशा स.नगरसेवकांशी माझी भेट झालेलल आहे. तेही सांगू शकतील की त्यांना चेंबरबाहेर अडवले आहे किंवा नाही मात्र भेटण्यास येणार कोण आहेत. याची पुर्वकल्पना देण्याबाबत मी सूचना दिल्या होत्या. मी ही नवीन आहे. भेटावयास येणारे कोण आहेत. याची माहिती मिळावी. यासाठी ही सूचना दिली होती. कोणास मुद्दाम थांबवण्यास हेतू नव्हता याबाबत कोणाच्याही स.नगरसेवकांचा गेरसमज होऊ नये. कोणाचा अपमान करण्याचा आपला हेतू नाही.

काल मोर्चेकऱ्यांनी जो प्रकार केला तो गंभीर आहे. याबाबत आपण मोर्चेकऱ्यांनाही बोललो आहे. कामात शिस्त असली पाहिजे. चार-पाच प्रतिनिधींना चर्चेसाठी पाठवण्याची आपण सांगितले होते. ५०-६० लोक आत आले तर चर्चाही बरोबर करता येत नाही. त्यामुळे केवळ गोंधळच होतो. काही गैरजरुरी प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न मोर्चेकऱ्यांनी केला होता. अशा विषयांवर चर्चा न करण्याबाबत मी मोर्चेकऱ्यांना स्पष्टपणे सांगितले. मोर्चेकऱ्यांनी त्यांच्या अडचणी सांगाव्यात. त्यावर कार्यवाही करण्यात येईल असे त्यांना सांगितले होते. सेक्युरिटी ऑफिसरलाही काल समज दिलेली आहे. जबाबदार कर्मचाऱ्यांवर ॲक्शन घतली जाईल.

सभेस मी उशिरा आलो. त्याचे कारण कालचा मोर्चा स्वत: डी.सी.पी. आले होते. त्यांच्याशी चर्चा चालू असतांना बैठकीस सुरुवात झाली. याबाबत मी बैठकीत पाच मिनीटे उशिरा येत आहे. असा निरोपही पाठवला होता. परंतू तो मा.महापौरांना मिळाला की, नाही हे माहिती नाही. कालच्या पोलिसांच्या भूमिकेबाबत मी डी.सी.पी. यांच्याशी बोललो आहे. तसा या संदर्भाने २२ तारखेस बैठक आहे. हा पूर्ण कार्पोरेशनचा प्रश्न आहे. अशी घटना परत घडावयास नको. मनपाची निवडणूक जवळ आलेली आहे. त्यामुळे हे प्रमाण वाढणार आहे. अतिक्रमणे काढणे, करांची वसुली करणे या संदर्भाने काही अप्रीय निर्णय आपणास घ्यावले लागणार आहेत. यात लोकांचा वाईटपणाही घ्यावा लागणार आहे. वसुली वाढावी उत्पन्न वाढावे यासाठी असा वाईटपणा घ्यावा लागणार आहे. २२ तारखेपर्यंत नवीन सी.पी.रुजू होतील. त्यांच्या

समवेतही या प्रश्नावर चर्चा करण्यात येईल. अशी घटना परत घडू नये. यासाठी योग्य ती व्यवस्था करणे आवश्यक आहे.

श्री.विठ्ठल जाधव : सेनेतर्फे काही कार्यकर्ते उपोषणांस बसलेले होते. गजानन महाराज मंदिरा समोरील हटविलेल्या टपऱ्यांचा प्रश्न होता. उपोषण कर्त्यांना भेटण्यासाठी मी आयुक्तांना सांगितले परंतू आपणास काम आहे असे सांगू त्यांनी भेटण्याचे टाळले.

मा.आयुक्त : ही चुकीची माहिती आहे. उपोषण कर्त्यांना भेटण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना मी पाठवतो असे सांगितले होते ते अगोदर उपोषण कर्त्यांशी चर्चा करतील.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासनास जी कामे करावयाची आहेत. त्यासाठी त्यांना फ्रि हॅण्ड दिला तरच प्रशासन काम करु शकेल. भ्रष्टाचार कमी व्हावा अशी आम्हीच मागणी करतो. मोर्चे येणारच आहेत. त्यांनाही आला घालावयास पाहिजे. स.न.से.जाधव यांचा गैरसमज झालेला दिसतो. काही नगरसेवक यांच्या विरोधातच त्यांच्या वॉर्डातून मोर्चे येणार आहेत. हा राजकीय स्टंट आहे. आयुक्तांनी दररोजच मोर्चेकऱ्यांना सामोरे जावे असे सांगणे उचित नाही. एखाद्याची मागणी गैरवाजवी आहे. असे आयुक्तांना वाटत असेल तर ते बरोबर आहे. दोन महिन्यात बरेच मोर्चे येणार आहेत. या गोष्टीत राजकारण आणू नये. आयुक्तांनीही आम्हास सन्मान द्यावयास हवा. व आम्हीही त्यांना सन्मान द्यावयास हवा. ठरलेल्या वेळेत भेटण्यासाठी आलेल्यांना येऊ देण्यात यावे. वाटल्या स.स.नगरसेवकांना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात ायवी. नगरसेवकांचे सहकार्य असते. तरच शहराच्या विकासाची कामे होऊ शकतील. मी कोणाचीही बाजू घेत नाही. प्रशासनास स्ट्रीक्ट होण्यासाठी ८-१५ दिवसाचा वेळ देण्यात यावा. जेणेकरुन ते सर्वांवर नियंत्रण ठेऊ शकतील.

श्री.विठ्ठल जाधव : मागील आठ दिवसापासून पुंडलिकनगर बाबत वृत्तपत्रांत बातम्या येत आहेत. मागील ४-५ वर्षापासून जे लोक या भागात हातगाड्या लावून काम करत आहेत. त्यांना सोमवार, मंगळवार या दिवशी अतिक्रमण हटाव पथकाने हटवले व त्यांच्या गाड्यांची मोडतोड केली. त्यामुळे मनपा गेटसमोर सेना भाजप कार्यकर्त्यांनी उपोषण सुरु केले होते. ही माहिती देण्यासाठी मी आयुक्तांकडे गेलो असता त्यांनी उध्दट वर्तन केले.

श्री.हमीदोद्दीन ताबा : ही सभागृहात दादागिरी चालू आहे याचा मी निषेध करतो. बी.जे.पी. वाल्यांनी गरीबांवर दादागिरी केलेली आहे.

(सेना-भाजपचे स.नगरसेवक मा.महापौरांचे असनासमोर बसतात. सभागृहात घोषणा दिल्या जातात. अनेक स.नगरसेवक मा.महापौरांचे समोर जावून चर्चा करतात.)

मा.महापौर : स.स.श्री.हमीद ताबा यांनी केलेला प्रकार हा सभागृहाचा अपमान आहे. श्री.हमीद ताबा यांनी सभागृहाची माफी मागावी.

श्री.हमीदोद्दीन ताबा : माझ्या वक्तव्यामुळे कोणाचा भावना दुखावल्या असतील तर मी माझे शब्द परत घेतो.

मा.महापौर : मला निवदेन प्राप्त झालेले आहे. ठरावही आहे. मी अधिकाऱ्यांना आदेश देतो की, ज्या ठिकाणी भाजी मार्केटसाठी जागा उपलब्ध असेल त्या ठिकाणी भाजी मार्केट बांधण्यात यावे. अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी करावी.

मा.आयुक्त सभागृहाच्या परवानगीनुसार बैठकीसाठी गेलेले आहेत. उपआयुक्त (प्र.) यांनी प्र.आयुक्त म्हणून काम पहावे. पुंडलिकनगरमधील जे नागरिक मनपासमोर उपोषणास बसलेले आहेत. त्यांना आयुक्तांनी स्वतः भेटावे.

श्री.नरेंद्र पाटील : आयुक्तांनी आताच खुलासा केला होता की, सेक्युरिटी अनसेफ आहे. अतिक्रमणे हटवणे व मालमत्ता कराची वसुली या दोन गोष्टींना मा.आयुक्त प्राधान्य देणार आहेत. असे त्यांच्या निवेदनावरुन जाणवते. माझी सभागृहातर्फे विनंती आहे की, कमीत कमी दोन महिने हे काम स्थगित ठेवण्यात यावे. कोणत्याही वॉर्डात गेले तर तेथे दोन गट होणार आहेत, पुन्हा वाद निर्माण होणार आहेत. परत सेक्युरिटीचा प्रश्न उद्‌भवेल निवडणूकीत पोलिस निवडणूकीचे काम पाहणार की, मालमत्ता वसुलीचे काम पाहणार, की अतिक्रमणे तोडण्याचे काम करणार दोन महिन्यासाठी ही कामे थांबवून रुटींगचीच कामे चालू द्यावीत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : श्री.नरेंद्र पाटील यांचा निवदेनास समर्थन आहे. जुनी अतिक्रमणे न पाडता नवीन अतिक्रमणे पाडण्यात यावीत. गरीबांचे गाडे काढण्यांत येऊ नयेत. अधिकारी पैसे खाऊन एकीकडचे अतिक्रमण काढून दुसरीकडे बसवतात. ही पध्दत बंद करण्यात यावी.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : स.स.नरेंद्र पाटील इतर काही सदस्यांनी सांगितले की, आयुक्तांना प्रशासकीय कामे करण्यासाठी फ्री हॅण्ड सोडावयास हवे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे. अर्थसंकल्पात २० कोटीचा तोटा आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली आयुक्तांना त्यांच्या पध्दतीने करु द्यावी. आयुक्तांनी चांगली कामे करावीत अशी अपेक्षा ठेवत असतांनाच निवडणूकीचे नाव दाखवून वसुली थांबवावी म्हणणे बरोबर नाही. महापालिकेच्या तिजोरीत पैसा आला नाही तर शहरात विकासाची कामे कशी होणार.

श्री.नरेंद्र पाटील : यात कोणी अडथळा आणत असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : टॅक्सेसची वसुली करण्यात यावी. परंतू छोटे छोटे धंदे करणाराची अतिक्रमणे काढण्यात येऊ नयेत असे मी सांगितले. चांगल्या कामांसाठभ प्रशासनास आमची साथच आहे.

सौ.फरहद बानो : शहरातील स्लम भागासाठी कर वसुलीत सवलत देण्यात यावी. २ महिन्यानंतर नोटीसा देण्यांत याव्या.

श्री.मुजीब आलमशहा खान : आयुक्तांनी कशाप्रकारे काम करावे याची सभागृहात चर्चा करण्याचे कारण नाही. निवडणूका जवळ आलेल्या आहेत. जी जुने अतिक्रमणे आहेत. ती न काढता नव्याने झालेली अतिक्रमणे काढण्यांत यावीत. टॅक्स वसुलीसाठी आयुक्तांना फ्री हॅण्ड सोडण्यात यावे. टॅक्स वसुल झाले तर शहराचा विकास होऊ शकेल. गरीबांना लहान व्यापाऱ्यांना सतावण्यात येऊ नये. नगरसेवक हे जनतेचीच कामे करत असतात. त्यासाठी ते कामे घेऊन आयुक्तांना भेटण्यासाठी येतात. कामे थांबवण्याचा आमचा उद्देश नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर : मागील पाच वर्षात एकाही टपरीस परवानगी दिलेली नाही. ज्या टपरी धारकांनी टपरीसाठी अर्ज दिलेले आहेत. ते निकाली काढण्यात

यावेत. म्हणजे टपऱ्यांची अतिक्रमणे हटवणार नाहीत व महानगरपालिकेस उत्पन्नही मिळेल.

मा.महापौर : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे. सर्व कामे चांगले झाली पाहिजेत. आतापर्यंतच्या सर्वच आयुक्तांना सहकार्य केलेले आहे. नवीन आयुक्तांवर दबाव आणण्याचा आपला हेतू नाही. आयुक्तांनी स.नगरसेवकांचा अपमान जाणूनबुजून केला की, नळकत तो झाला याचा खुलासा होणे जरुरीचे होते. आयुक्तांना प्रेशर आणण्याची कोणतीही गरज मला वाटत नाही. मालमत्ता कर, पाणीपटद्वटी, जकात कर यांच्या वसुलीसाठी हे सभागृह त्यांना कधीच डिस्टर्ब करणार नाही. त्यांनी त्यांचया पध्दतीने वसुली करावी. कारण या मनपास २० कोटीचा तोटा आहे. वसुली करुन टार्गेट पूर्ण करण्यात यावे. यासाठी सर्वांनी प्रयत्नशिल रहावे. टपरी समिती ज्या अटी व शर्ती सुनविलेल्या आहेत. त्यानुसार टपऱ्यांना परवानगी देण्यांत यावी. ज्या नवीन लोकांनी टपरी टाकली असेल त्यांचा काही अडथळा होत नसेल तर त्यांनाही परवानगी देण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

श्री.अफसरखान : जुन्या टपऱ्या काढण्यांत येऊ नयेत. नवीन टपऱ्या जर बसल्या असतसील तर त्या काढण्यात याव्यात. टपरी कमेटीची बैठक घ्यावी असे ८-९ महिन्यापुर्वीच पत्र दिले होते. परंतू बैठक घेतली नाही. ती लवकरात लवकर घेण्यात यावी. करांची वसुली ही झालीच पाहिजे. जे लोक १०-१० हजार रुपये एका वेळी भरु शकत नाहीत. त्यांना सवलत देण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : जकात कराची वसुली किती झाली. जकात कराचे उत्पन्न १५ कोटीने कमी येणार आहे. आतापावेतो जकातीची किंमत वसुली झाली, उर्वरित दिवसात ती किती होणार टार्गेट पूर्ण होणार का याचा खुलासा करण्यात यावा. १०० कोटीच्या बजेटमध्ये ४८ कोटी जकात आहे. याचा खुलासा व्हावा.

श्री.अफसर खॉन : जकात वसुलीत खूप लिकजेस आहेत. जकात विभागात मोठा भ्रष्टाचार आहे. ९७-९८ च्या रेटवरच प्लायवुडीची जकता घेतली जाते. प्लायवुडचे मार्केट रेट वेगळे आहेत. जकात मात्र वेगळ्या दराने घेतली जाते. मध्यंतरी लक्ष्मी उद्योगांची मशिनरी पकडली होती. त्या मशिनरीचे ७५ लाखांचे व्हॅल्युशन होते. परंतू पैसे घेऊन ते १५ लाख दाखवण्यात आले. व त्यावर जकात घेण्यात आली. जकात प्रश्नावर स्वतंत्र बैठक घेण्यांत यावी.

श्री.प्रकाश निकाळजे : मा.आयुक्तांनी कशाप्रकारे काम करावे. याबाबत सभागृहात चर्चा चालू होतो. जकात कराबाबतही सभागृहात चर्चा चालू आहे. पुर्वीही याबाबत चर्चा झालेली आहे. गाडी नाक्यावरुन निघाल्या नंतर जकात कर भरला आहे. की नाही हे पाहण्यासाठी एक पथक होते. बैठकीत जे निर्णय घेतले जातात त्यावर कारवाई होत नाही. अधिकाऱ्यांनी चांगले काम केले तर त्यांना सांभाळण्याचा प्रश्नच येत नाही. बैठकीच्या दिवशी अधिकारी सांगतात. आम्हास खूप टेंशन होते. करांची वसुली झाली पाहिजे. जकात कराचे उत्पन्न १५ कोटीने कमी येणार आहे. नगरसेवकांनीही मनपाच्या हिताच्या गोष्टींना अडथळा आणू नये. नाक्यावर गाडी आल्यानंतर तिला चेक करण्यासाठी पथक आवश्यक आहे. आयुक्तांना त्यांचे अधिकार माहित आहेत. त्यांना त्यांच्या पध्दतीने कामे करु द्यावीत. टपरी समितीचा अहवाल सभागृहाने मंजूर केलेला आहे. १०० फुट व ८० फुट रस्त्यावर टपऱ्या देऊ

नयेत असे त्यावेळी ठरले होते. जुन्या टपऱ्यां न काढता नवीन टपऱ्या काढण्यांत याव्यात.

श्रीमती अलका पाटील : श्री.भोगे साहेब आयुक्ता असतांना व श्री.प्रदिप जैस्वाल चेअरमन असतांना जकात कराची वसुली चांगली होत होती. परंतू त्यानंतर जकात वसुली ढासळली. जकात करामुळे भोगे साहेब शहराचा विकास घडवून, आणू शकत होते. उपमहापौरांनी जकात बाबत विचारलेल्या प्रश्नांवर कोणताही खुलासा झालेला नाही. उपमहापौरांनी अपमान होत असेल तर कारभार चालणार कसा.

श्री.मुजीब आलमशहा खान : उपमहापौरांनी जकातीबाबत काही प्रश्न विचारले होते. उपमहापौरांचा अपमान झाला यांचा खुलासा करण्यांत यावा. जकाती संदर्भाने चुक कोणाची होती याचाही खुलासा व्हावा. उपमहापौरांचा अपमान हा सभागृहाचा अपमान आहे.

डॉ.श्री.विजयकुमार मेहेर : उपमहापौरांनी वेळोवेळी प्रश्न विचारुनही त्याची दखल घेतली जात नाही. उपमहापौरांना आपण अशीच वागणूक देणार का?

मा.उपमहापौर : जकात प्रश्नावर चर्चा चालू असतांना स.सदस्यांनी मलाही खुलासा विचारला. मला खेद वाटतो की, उपमहापौर काहीही करु शकत नाही. असे जकात अधिक्षक श्री.गिरी म्हणतात, माझ्या खुर्चीस न्याय मिळत नाही, याचा मी निषेध करतो. स.सदस्य निकाळजे यांच्या बोलण्यास मी संमती देतो. जकात विभागात अनेक वर्षापासून काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जात नाही. त्यामुळे कार्यालयात माझे हसू होत आहे.

श्री.मुजीब आलमशहा खान : ही मोठी शर्मेची गोष्ट आहे. महापौर यांच्यानंतर उपमहापौरांचे पद मोठे आहे. त्यांचे कोणी मानत नसतील तर याचा निषेध म्हणून आम्ही सभागृहाबाहेर जात आहोत. संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

डॉ.विजयकुमार मेहेर : प्रशासनाचा व आपला मी निषेध करतो की वारंवार सांगुनही उपमहापौरांच्या निवदेनावर कार्यवाही केली जात नाही.

मा.महापौर : २० मिनीटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.

(१.३० वाजता तहकुब केलेली सभा दुपारी २.३० वाजता परत मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली.)

श्री.अफसरखॉन : जकात विभागात ८-८ वर्षापासून एकच ठिकाणी कर्मचारी काम करत आहेत. याबाबत मी पुर्वीही बोललो आहे. अशा कर्मचाऱ्यांची बदली का करण्यात येत नाही. चांदीच्या चोरीबाबत मी वारंवार प्रश्न विचारलेले आहेत. परंतू त्यावर खुलासा होत नाही.

मा.महापौर : जकात वसुलीबाबत स.सदस्यांनी आपआपली मते मांडली उपमहापौरांचाही जकातीवर रोष आहे. जकात प्रश्नांवर प्रशासनामार्फत खुलासा करण्यात यावा. मुख्यलेखाधिकारी यांनी जकात, मालमत्ता, पाणीपट्टी बाबत संपूर्ण माहिती द्यावी.

श्री.मुजीब आलमशाह : उपमहापौर यांच्या बरोबर जी घटना झाली. त्यावर प्रथम खुलासा व्हावा. संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्यात यावी. नंतरच जकातची आकडेवारी देण्यांत यावी.

जकात अधिक्षक : आतापर्यंत ३४ कोटीची जकात वसुली झालेली आहे. मा.उपमहापौरांनी चार गाड्या पकडल्याची माहिती दिली होती. त्या गाड्यांची जकात वसुली झालेली आहे. दुसऱ्या गाडीचा नंबर बरोबर नव्हते म्हणून ती सापडली नाही. उपमहापौरांचा अपमान होईल असे वक्तव्य मी केलेले नाही. १४,०००/- रुपये जकात वसुली झालेली होती.

श्रीमती नुरजहाँ बेगम : ज्या गाड्यांचे नंबर दिले होते ते बरोबर होते. गाड्या पकडण्यासाठी वेळ का लागला.

श्रीमती बिल्कीस बेगम : जी गाडी त्या गाडीचा नंबर सांगावा.

जकात अधिक्षक : जी गाडी आली तिचा जकात वसुल केलेला आहे.

श्री.अफसरखॉन : जकात अधिक्षक यांना त्यांच्या पदावरुन हटविण्यांत यावे.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : जकात विषयांवर बऱ्याच वेळेपासून चर्चा चालू आहे. स.उपमहापौरांचा अपमान केला गेला असे सभागृहात सांगण्यात आले. मागील बैठकीत मी एवढाच प्रश्न विचारला होता की, उपमहापौरांनी ज्या गाड्या दाखवल्या होत्या. त्या परत का चेक करण्यांत आल्या नाहीत. जकात निरिक्षक यांना गाडी चेक न करण्याबाबत सांगितले असे मा.उपमहापौरांचे म्हणणे आहे. संबंधित जकात निरिक्षकाने गाड्या का चेक केल्या नाहीत. याचा खुलासा व्हावयास पाहिजे.

जकात अधिक्षक : दुसऱ्या इन्स्पेक्टरने गाड्या चेक केलेल्या आहेत. त्याचे स्टेटमेंट आपल्याकडे आहे.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : उपमहापौरांनी सांगितल्यानंतर आपण दुसऱ्यांदा गाडी का चेक केली नाही. उपआयुक्त (प्र.) यांनी याबाबत खुलासा करावा. मा.महापौरांनी दोन महिन्यापुर्वी रुलींग दिली होती की, तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जकात तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जकात विभागातून बदल्या कराव्यात. त्यावर काय कार्यवाही झाली.

श्री.गौतम लांडगे : संबंधित जकात निरिक्षक गाड्या चेक करण्यासाठी जात असतांना जकात अधिक्षक गिरी यांनी त्यास परत नेले असे मा.उपमहापौरांचे म्हणणे आहे. त्याचा प्रथम खुलासा व्हावयास हवा. गिरी यांनी त्या जकात निरिक्षकास गाड्या का चेक करु दिल्या नाहीत.

श्री.मुजीब आलमशहा खान : एक गाडी शहरात नाक्यावरुन मोंढ्यांपर्यंत आली तोपर्यंत ती कशी चेक करण्यात आली नाही. मोढ्यांपर्यंत आलेल्या गाड्यांची वसुली करण्यासाठी कर्मचारी रात्री मोंढ्यात जातात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे का दिली जात नाहीत. अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावयास हवी.

श्री.हमीदोद्दीन ताबा : दोन बैठकापासून या विषयावर चर्चा चालू आहे. आपण इन्क्वॉयरी करण्यास कोणास सांगितले. चौकशी अहवाल आला असेल तर तो सभागृहासमोर ठेवण्यात यावा.

श्री.वसंत देशमुख : चौकशी अहवाल येत नाहीत. तोपर्यंत चर्चा करण्यांत अर्थ नाही. स.स.हमीद ताबा यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो समर्थनीय आहे.

श्रीमती नुरजहाँ बेगम : जोपर्यंत चौकशी होत नाही. तोपर्यंत गिरी यांना जकात विभागातून काढण्यांत यावे व दुसऱ्यास तेथे नेमण्यात यावे.

मा.महापौर : जकाती बाबतचा महत्वाचा प्रश्न उपमहापैर यांनी उपस्थित केला होता. तेही सभागृहात झालेल्या चर्चेशी सहमत आहेत. मागील बैठकीत प्रशासनाने

चौकशी करुन अहवाल सादर करावा. असे आदेश देण्यात आलेले होते. सदरची चौकशी करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. परंतू अद्याप चौकशी अहवाल यावयाचा आहे. जकात विभागात तीन वर्षापेक्षा जास्त काळ राहिलेल्या लोकांच्या बदल्या करण्यात याव्यात. अशी रुलींग दिलेली होती. बदल्या बाबतची संचिका मा.आयुक्तांकडे सादर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. यावर्षासाठी जकातीचे उद्दिष्ट ४८ कोटी एवढे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. जकात कराची वसुली म्हणावी तशी नाही. विरोधी पक्षे नेता श्री.अफसर खान यांनी मुद्दा उपस्थित केला की, प्लायवुडवर जुन्या दराने जकात कर आकारला जातो. १९९८-९९ च्या दरानेच प्लायवुडवर जकात कर आकारला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. श्रीमती नुरजहाँ बेगम यांनी मुद्दा उपस्थित केला की, श्री.गिरी यांना तेथून हलवून दुसऱ्या ठिकाणी देण्यांत यावे. यासाठी एक समिती स्थापण्यांत येते. त्यात अधिकारी, पदाधिकारी व एक-दोन अधिकारी यांची समिती स्थापुन चौकशी पूर्ण होत नाही. तोपर्यंत कोणाचीही त्या ठिकाणातून बदली करण्यांत येणार नाही. चौकशी अहवाल फक्त पाच दिवसात सर्वसाधारण सभेसमोर येईल, अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी व तीन वर्षापेक्षा ज्यांना जास्त कालावधी झालेला आहे. त्यांच्या बदल्या पाच दिवसानंतर करण्यात याव्यात.

श्री.मुजीब आलमशहाखॉन : पाच दिवसात कमेटीचा अहवाल आला नाही तर आपणास त्याचा निर्णय घ्यावा लागेल. कमीट्या स्थापन केल्या जातात. परंतू अहवाल येत नाहीत. पाच दिवसात निर्णय देणे ही आपली जिमेदारी असेल.

मा.महापौर : समितीमध्ये असलेल्या नगरसेवकांपैकी उपलब्ध असलेल्या सदस्यांमार्फत चौकशी करण्यात येईल. जकातीची वसुली ३४ कोटी झालेली आहे. उद्दीष्ट ४८ कोटीचे आहे. जकात मालमत्ता कराबाबतचे अपेक्षित उत्पन्नाबाबत मुख्य लेखाधिकारी माहिती देतील.

मुख्यलेखाधिकारी : १९९९-२००० या अर्थसंकल्पात ५० कोटीचे जकातीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते. आतापर्यंत ३४.२७ कोटीची वसुली झालेली आहे. जी ७०% आहे. पाणी पुरवठ्यासाठी १० कोटीचे उद्दीष्ट देण्यात आले होते. १५ जानेवारी पर्यंत ३.०५ कोटीची वसुली झालेली आहे. उद्दीष्टांच्या प्रमाणात ती ३१% आहे. मालमत्ता कर वसुलीसाठी १५ कोटीचे उद्दीष्ट देण्यात आले होते. आतापावेतो ४.११ कोटी ३०% एवढी वसुली झालेली आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आतापर्यंत केवळ ३०% वसुली झालेली आहे ती वाढणार आहे काय? वसुली वाढावी यासाठी आपण काय उपाय योजना करणार आहोत याचा २५ तारखेच्या बैठकीत खुलासा करण्यात यावा.

श्री.मुजीब आलमशहा खान : पाण्याची थकबाकी किती आहे याचा खुलासा व्हावा. वसुलीसाठी केवळ गरीबांवर दबाव आणला जातो. मोठ्या लोकांकडे किती थकबाकी आहे. त्यांच्याकडून प्रथम वसुली करण्यांत यावी. फाइव्हस्टार वाल्यांचे नळ कनेक्शन कट करण्यात यावेत.

सौ.लता दलाल : शहरात काही मोठ्या हॉटेल्सवाल्यांनी १ इंच, २ इंच नळ कनेक्शनची मागणी केली असतांना त्यांना अनिधकृतरित्या ३ इंची ४ इंची नळ कनेक्शन देण्यात आलेले आहेत. नळ पट्टीची अशा हॉटेल व्यावसायिकाकडून वसुली मात्र होत नाही. मोठ्या लोकांकडील वसुली झाली तरी गरीब लोकांना

वसुलीसाठी थोडी बहुत सवलत देता येते. अनधिकृतरित्या ४ इंची कनेक्शन देण्यामध्ये कोणते अधिकारी गुंतले आहेत. याचीही चौकशी व्हावी.

श्री.मुजीब आलमशहाखान : शहरातील लो लेव्हल असलेल्या भागात पाणी पुरवठा बरोबर होत नाही. काही लोक मोटारी लावतात. त्यामुळे इतरांना पाणी मिळत नाही. त्यांच्या मोटारी लावणाऱ्या लोकावर कार्यवाही व्हावयास हवी. त्यांच्या मोटारी जप्त करण्यात याव्यात व सर्वांना पाणी मिळेल याची उपाययोजना करण्यात यावी.

श्री.नरसिंग ढगे : शहरात आठ झोन आहेत याची आठ महिन्याची वसुली केवळ ३०% आहे. बऱ्याचशा झोनमध्ये सरासरीपेक्षा कमी वसुली झालेली आहे. याबाबत कार्यवाही व्हावयास हवी.

श्री.प्रकाश निकाळजे : जे विभागीय अधिकारी चांगली वसुली करतील त्यांना वेतनवाढ देण्याची पूर्वी ठरले होते.

उपआयुक्त (प्र.) : कर वसुली संदर्भाने मोठ्या थकबाकी दारांवर कार्यवाही चालू आहे. विभागनिहाय मालमत्ता कराची मागणी उद्दीष्ट व वसुली खालीलप्रमाणे

**(आकडे लाखांत)**

| विभाग क्र. | मागणी | वसुली | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २८० | ५५ | २४ |
| २ | ४५४ | ८२ | २३ |
| ३ | २१९ | ४० | २४ |
| ४ | ४०२ | १०८ | ३३ |
| ५ | २०८ | ६७ | ३९ |
| ६ | २२४ | ५९ | ३८ |
| ८ | १५० | ३० | २६ |

पाणीपट्टी कराची विभागनिहाय मागणी व वसुली खालीलप्रमाणे

**(आकडे लाखांत)**

| विभाग क्र. | मागणी | वसुली | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ८६ | २६ | ३७ |
| २ | ८१.७६ | २२ | ४४ |
| ३ | १२३ | १९.९५ | १८ |
| ४ | २४८ | ६६.८९ | २९ |
| ५ | २८ | ७.५२ | ३० |
| ६ | १०८ | २६ | २६ |
| ७ | ३४० | १२५ | ३९ |
| ८ | १०५ | १९.७६ | १९ |

वसुली प्रभावीरित्या व्हावी यासाठी कार्यालयातून अतिरिक्त कर्मचारी वर्ग वसुलीसाठी दिलेला आहे. प्रत्येक विभागात ८-८ कर्मचारी दिलेले आहेत.

श्री.रशिद खॉन (मामू) : ४ इंची व्यासाचे नळ कनेक्शन कोणत्या हॉटेलला देण्यात आले याचा खुलासा व्हावा.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : मालमत्ता कर वसुली संदर्भाने काही डिस्टपुट असू शकतात. परंतू पाणीपट्टी १००% वसुली व्हावयास हवी. परंतू ती २१%, २८% अशी आहे. ही वसुली का होत नाही, याचा खुलासा व्हावा.

उपआयुक्त (प्र.) : वसुलीचा आढावा वेळोवेळी घेण्यात आलेला आहे. काही ठिकाणी दोन दोनदा टॅक्सेस लागलेले आहेत. अशा प्रकरणांची चौकशी करण्याचे काम चालू आहे. पुढील बैठकीत ही माहिती देण्यात येईल.

श्री.प्रदिपकुमार जैस्वाल : ही माहिती चुकीची आहे. पाणीपट्टी बाबत भारतमाता नगर बाबत डीस्टपुट आहे. विभाग ७ मधील सिडकोतील काही भागातील नळ कनेक्शन बाबत डिस्प्युट आहेत. शहरातील इतर भागातील पाणीपट्टीची वसुली का होत नाही. पाण्याबाबत वाद नसेल तर १००% वसुली व्हावयास पाहिजे याचा खुलासा व्हावा.

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेचे हे महत्वाचे उत्पन्न आहे. कराची वसुली म्हणावी तशी होत नाही. नळ कट करण्याची मोहीम सुरु असल्याच्या बातम्या वृत्तपत्रात येतात. मात्र मोठमोठे थकबाकी धारक यांच्याकडून वसुली होत नाही. मात्र स्लम भागात वसुलीसाठी जाऊन वसुलीची हवा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. केवळ सिडको भागातून पाणीपट्टीची वसुली होते. शहरातून व्यवस्थित वसुली होत नाही. वसुलीसाठी विशेष मोहित राबविण्यांत यावी. ज्यांच्याकडे जास्तीत जास्त थकबाकी आहे. त्यांच्याकडून प्रथम वसुली करण्यांत यावी.

श्री.संजय जोशी : वसुली नेमकी कशामुळे होत नाही. डीस्प्युटेड मॅटर्स किती आहेत. की आपले अधिकारीच वसुलीसाठी सक्षम नाहीत याची माहिती देण्यात यावी.

सौ.लता दलाल : आयुक्तांनी एकाच बाबीचा खुलसा केला की,काही विभागात पाणी पुरवठ्याच्या लाईन्स टाकल्या नव्हत्या परंतू देयके दिली गेली असे किती विभागात घडते. वसुलीसाठी आपले अधिकारी कमी पडते की अनधिकृत नळ कनेक्शन देण्यात आलेले आहेत. पाणी पुरवठा न झाल्याचा प्रश्न फक्त सिडको पुरताच मर्यादित आहे. शहराच्या इतर भागातून वसुली व्हावयास हवी.

श्री.गौतम लांडगे : आर्थिक वर्ष संपण्यास केवळ ७० दिवस बाकी राहिलेले आहेत. जकात करापोटी आतापावेतो ३४ कोटी एवढीच वसुली झालेली आहेत. उर्वरित दिवसात २० लाख दररोज या प्रमाणे वसुली होणार आहे काय? असे झाले तरच उद्दीष्ट पूर्ण होऊ शकते हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. नळपट्टी संदर्भाने निवासी, व्यावसायिक कनेक्शन किती व त्यांची वसुली किती याचा खुलासा करण्यात यावा. झालेल्या वसुलीची आकडेवारी पाहता ती १८ ते २० टक्के एवढी आहे. वसुलीचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र बैठक लावण्यात यावी व उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी धोरण ठरविण्यांत यावे.

श्री.नुरजहाँ बेगम : सकाळपासून इतर विषयावरच बैठक चालू आहे. अजेंड्यावर चर्चा चालु करण्यात यावी.

## ऐनवेळी सभागृहात चर्चेद्वारे आलेला विषय

**विषय क्र.१७१ :**

औरंगाबाद महानगरपालिका सन २०००-२००१ साठीचा अर्थसंकल्पास आचारसंहितेचा कालावधीत मंजूरी देण्यासाठी सुट देणे व आचार संहितेचा कालावधी ४५ दिवस ठेवण्या संबंधी शासन मा.निवडणूक आयुक्त यांचेकडून मंजूरी घेणे बाबत.

सुचक : श्री.नरसिंग ढगे,
अनुमोदक : श्री.महोदव सुर्यवंशी

**संवाद :**

श्री.नरसिंग ढगे : ५ फेब्रुवारी २००० पासून आचारसंहिता सुरु होणार आहे. सन २०००-२००१ साठीचे अंदाजपत्रक अद्याप स्थायी समितीसमोर यावयाचे आहे. या अंदाजपत्रकास २० फेब्रुवारी स्थायी समितीने मंजूरी देणे आवश्यक आहे. व त्यानंतर ३१ मार्च २००० पर्यंत सर्वसाधारण सभेने मंजूरी देणे आवश्यक आहे. आगामी आर्थिक वर्षाचे बजेट या बॉडीच्या काळात मंजूर होणे आवश्यक आहे. आचार संहितेत बजेट मंजूर करण्याची सुट देण्यात यावी व ४५ दिवसांचीच आचारसंहिता लागू करण्यात यावी. अशी विनंती निवडणूक आयोगास करण्यात यावी. अशी विनंती निवडणूक आयोगास करण्यात यावी. त्यासंदर्भाने ठराव पारित करण्यात यावा.

श्री.महादेव सुर्यवंशी : या प्रस्तावात माझे सभागृहातर्फे अनुमोदन आहे.

श्री.अफसरखान : ४५ दिवसांची आचार संहिता लावणे बाबत शासनास लिहावे.

मा.महापौर : निवडणूक आयोगाने ६५ दिवसाची आचार संहिता लागू केली आहे. सन २०००-२००१ साठीचा महानगरपालिकाचा अर्थसंकल्प मंजूर व्हावयाचा आहे. यासाठी सभागृहात मांडण्यात आलेल्या प्रस्ताव मा.निवडणूक आयोग व शासन फॅक्सद्वारे पाठवून ४५ दिवसाची आचारसंहिता लागू करणे याबाबत शासन व निवडणूक आयोगास विनंती करण्यात यावी यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने आचार संहितेचा कालावधी ४५ दिवस ठेवण्यासंबंधी व आचार संहितेच्या कालावधीमध्ये अर्थसंकल्प बैठक घेणेस मंजूरी घेण्यासाठी महाराष्ट्र शासन व मा.निवडणूक आयोग यांची मंजूरी घेणे करिता प्रस्ताव पाठवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा.महापौर : पाणीपट्टी व मालमत्ता कर वसुलीचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यांत येईल. शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन शोधण्यासाठी एक स्वतंत्र पथक स्थापण्यात यावे. व त्यासाठी एका अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यांत यावी. जे लोक पाणीपट्टी भरत नाहीत. त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत यावी. यासाठी सर्व अधिकार त्यांना देण्यात यावेत. ज्या ज्या ठिकाणी ४ इंची नळ कनेक्शन दिलेले आहेत. त्यांचा शोध घेण्यात यावा. मालमत्ता कराबाबत बरेचसे न्यायप्रविष्ट आहेत. ते कशा प्रकारे हाताळावित यासाठी एक बैठक घेऊन त्यात चर्चा करण्यात येईल.

श्री.नरसिंग ढगे : इमारत बांधण्यासाठी परवाना देतांना आपण प्रथम त्या मालमत्तेवरचा पूर्ण कर भरुन घेतो. परंतू काही ठिकाणी पूर्ण करांचा भरणा करुन न घेता

बांधकाम परवाने दिले आहेत. ५०-५० हजाराचा टॅक्स बाकी असतांना दुसऱ्या मजल्याच्या परवानग्या दिलेल्या आहेत. खुल्या प्लॉटवर तीही टॅक्स भरल्याशिवाय परवाना देत नाहीत.

मा.महापौर : आपण याबाबत तशा प्रकारची पत्रे द्यावीत. ही गंभीर बाब आहे. यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रशिद खान (मामू) : महापौर चषक स्पर्धेतील बॉडी बिल्डर्स असो. चा चेक लवकरात लवकर देण्यात यावा.

श्री.संजय जोशी : ५० हजाराची थकबाकी असतांनाही दुसऱ्या मजल्याची बांधकाम परवानगी देण्यात येते. ही गंभीर बाब आहे. या बाबतचा अहवाल दोन दिवसांत सादर करण्यांबाबत सांगण्यात यावे. ज्यांनी अशी परवानगी दिली असेल त्यांच्या वर कारवाई करण्यात यावी.

मा.महापौर : महापौर चषक संघटनेचा चेक त्वरीत देण्यात यावा. स.सभापतींनी अशा मालमत्ता धारकाने नाव द्यावे, त्यावर चौकशी करुन मा.आयुक्तांनी संबंधितावर त्वरीत कारवाई करावी.

सौ.पद्मा शिंदे : माझ्या वॉर्डात बरेचसे अनिधकृत नळ कनेक्शन आहेत. याबाबत मी वेळोवेळी तक्रार केलेली आहे. परंतू त्यावर कारवाई केली जात नाही ती ही व्हावी.

मा.महापौर : याबाबत आयुक्तांनी चौकशी करावी.

(आजची सभा दिनांक २५.१२.२००० पर्यंत तहकुब करण्यांत येते.)

सर्वांचे आभार मानून ३.२५ वाजता "जन-गण-मन" राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा तहकुब केल्याचे मा.महापौरांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |